शुभांगी पासेबंद

# प्राजक्ताची फुले



# प्राजक्ताची फुले

हे पुस्तक विनामूल्य आहे

पण फ़ुकट नाही

हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# प्राजक्ताची फुले

शुभांगी पासेबंद

ई साहित्य प्रतिष्ठान

# प्राजक्ताची फुले (स्तंभ संग्रह)

लेखिका : शुभांगी पासेबंद

9869004712

scpaseband@gmail. com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

प्रकाशन : ३ मार्च २०१९

©esahity Pratishthan®2018

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

प्राजक्ताची फुले

"मनोगत"

माझे हे प्रकाशित होणारे, बाविसावे पुस्तक आहे. ते रसिक मायबाप वाचकांना खूप आनंद देईल.

हे सर्व स्तंभ, मनापासून, आवडतील अशी मला आशा आहे.

शुभांगी पासेबंद

3/3/2019

९८६९००४७१२

scpaseband@gmail.com

Blog- writing in a different creative way.3/3/2019

# शुभांगी पासेबंद यांचे अन्य प्रकाशित साहित्य

1 मयूरमासा कादंबरी - 2012 - महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ मुंबईतर्फे (नवोदित अनुदान योजने अंतर्गत, हार्ड कोपी)

2. नाते शब्दांचे -ललित - 2014 पुणे-हार्ड कॉपी

3. मुलीही जन्माला येऊ द्या- ललित-2015- द कृ सांडू पुरस्कार बक्षिसपात्र -पुणे-हार्ड कॉपी

4. रंगकेशरी - कादंबरी- इ-बुक - 2015 बुकगंगा डॉट कॉम

5. बिलिव्ह इट ऑर नॉट- कथासंग्रह - इ-बुक - 2016बुकगंगा डॉट कॉम, विनामूल्य

6. कस्तुरी पक्षी- इ बुक- कादंबरी- इ साहित्य -2016 विनामूल्य

7. एक दिवा लावूया - स्तंभ संग्रह - 2016 बुकगंगा डोट कॉम

8. जाईन मी विचारीत रानफुला- स्तंभ संग्रह - 2016 बुकगंगा डोट कॉम

9. राहू दे घरटे- इ कादंबरी-2016 विनामूल्यwww.esahity.com

10. मी तुझेच गीत गात आहे- इ साहित्य - कादंबरी-2016 विनामूल्य

११ कृष्णकुसुमांजली-२०१६-स्तंभ संग्रह इ साहित्य- विनामूल्य

१२ आम्रकुसुमांजली -२०१६- स्तंभ संग्रह- इ साहित्य- विनामूल्य

१३ why did i fall in love? novel, Amazon .com, Createspace, ई बुक.२०१२

१४. मधुर दंश कथासंग्रह - नवल प्रकाशन २०१६ पुणे, हार्ड कॉपी

१५ बेलाची पाने-स्तंभ संग्रह- ई बुक-बुकगंगा डॉट कॉम-२०१७एप्रिल

१६  रानफुलांचे थवे स्तंभ संग्रह -ई-साहित्य-२०१७ एप्रिल

१७ केशरबाग-विचक्षण प्रकाशन= स्तंभसंग्रह- जुलै २०१७ शिरपुर=

१८ कुठे शोधिशी रामेश्वर अन् कुठे==२०१७

१९ दीपज्योति नमोस्तुते-स्तंभसंग्रह-ईबुक-२०१८

२० कशाला ऊद्याचि बात -कथासंग्रह=पुणे-१५/८/१८-hard copy

२१unholy water नोवेल, English bookganga.com 5/1/19

२२ प्राजक्ताची फुले-स्तंभसंग्रह-हे पुस्तक

आगामी...

२३रंगसावल्या, कथासंग्रह-आगामी-hard copy-अनघा प्रकाशन

२३ तू ऐकतो आहेस ना? कवितासंग्रह=

२४ नक्षत्रबन =आगामी=कथासंग्रह=पुणे

२५डाव मांडून मांडून मोडू नको-कादंबरी

सर्व पुस्तके ई बुक स्वरूपात उपलब्ध आहेत

***********

Biodata-2019 ३-३-2019

1. Shubhangi Chandrashekhar Paseband,

   Phone: 9869004712, 02225345992

2. M.Sc. B.Ed. Certificate course in Journalism

   Diploma in performing Arts

3.about 350 columns published on loksatta, dainik aikya(satara), prahaar, pudhari, gramodhhar(satara), Gavkari(Nasik)

4. Address

   202, Anandi Bhuvan Veer Savarkar Marg

   opp Maharashtra Vidyalaya

   Thane (West) 400602.

5. Retired as Branch Manager from a Nationalized bank in 2012

6. I am Writing stories and articles in various magazines, with a social message.

7. Perform programmes

Mulihi Janmala Yeu Dya …Marathi, Kya Itni Buri Hoon Mai

Maa Hindi (both with message to stop female foeticide)

Manachi Mashagat (about mental health) Pasaydaan (telling students about fraternity)

8. Other appreciations and prizes

   TMC Samaj Sevika Puraskar 2008

   Maharashtra Deep Puraskar 2008

Maharashtra deep puraskar 2009

Samata sahitya academy, Savitribai Fule puraskar 2008

9.Mumbai Marathi Granth Sangrahalaya

Kavi Prafull Datta Kushal Sampadak prize 2016

10 D K Sandu, best book award 2016, Thane Municipal Corporation, Thane Gaurav puraskar 2016

10Thane gaurav 2016, first novel Mayurmasa was published in navodit anudaan yojna of Maharashtra rajya Sahitya Sanskriti mandal 2012

10 Blog. Writing in a different creative way

12 Till 25.1.2019, 22 books, of various genre published(List Enclosed)

**********

Best wishes

Best wishes to my dear wife, on publication of her 22nd book, on her birthday

Chandrashekhar paseband

3/3/2019

**************

## ई साहित्य प्रतिष्ठानसह शुभांगी पासेबंद यांचे प्रकाशित साहित्य

कस्तुरी पक्षी- इ बुक- कादंबरी- इ साहित्य -2016 विनामूल्य

राहू दे घरटे- इ कादंबरी-2016 विनामूल्यwww.esahity.com

मी तुझेच गीत गात आहे- इ साहित्य - कादंबरी-2016 विनामूल्य

कृष्णकुसुमांजली-२०१६-स्तंभ संग्रह इ साहित्य- विनामूल्य

आम्रकुसुमांजली -२०१६- स्तंभ संग्रह- इ साहित्य- विनामूल्य

रानफुलांचे थवे स्तंभ संग्रह -ई-साहित्य-२०१७ एप्रिल

दीपज्योति नमोस्तुते-स्तंभसंग्रह-ईबुक-२०१८ मार्च













शुभांगी पासेबंद
दीपज्योती
नमोस्तुते


शुभांगी पासेबंद
तुझेच मी गीत गात आहे


शुभांगी पासेबंद
आम्रकुसुमांजली


रानफुलाचे थवे
शुभांगी
पासेबंद

## अनुक्रम


१रुबरु रोशनी
2श्रावणधारा
3नाती-गोती
४गूढ पर्यटन
५स्वच्छता
६सांत्वना
७प्रजापिता ब्रम्हाकुमारी
८होवु कशी उतराई
९नाणी अर्पण
१०आनंदाची खरेदी
११पाऊसखुळा
१२जुन्नरचा वाडा
१३जुन्या काळचे खेळ
१४विवाहे नातिचरामि
१५वृध्दाश्रम
१६वागावे कसे
१७शाळेच्या बाकावरुन
१८सदन तेजोमय
१९लाकडी खेळणी
२०गेले ते दिन गेले
२१बिन साखरेचे श्रीखंड
२२सावर रे
२३ मागचा बाक
२४हक्कांशी भांडतो आपण
२५आहे मजा जगण्यात या
२६उगवता सूर्य
२७हसरतोंके दाग
२८नातेसंबंध
२९ स्त्री स्वातंत्रम अर्हति
३० समुद्रपक्ष्यांचा थवा
३१ ईक दिन बिक जायेगा माटीके मोल
३२अमर प्रेम
३३न भरलेल्या जखमा
३४ गच्चीतल्या गप्पा
३५ शाळा सुटली, पाटी फुटली
३६ कार्टुनची दुनिया
३७ स्वल्पविराम
3८ प्रवास पर्वणी, गोडगाणी
३९ प्यासा
४० लोणचेवालि आजी
४१चैत्र रे चैत्र, चैत्रपालवी
४२तपकिरी ताजमहाल
४३ आपला सर्वकाळ आनंदात जावो
४४बुध्दीबळातील राणी
४५ क्रोएशिया, प्रेमभंगाचे गाव
४६वजन का वाढते?
४७मी कामगार आहे
४८सहलीला जायचे
४९बाली
५०चित्रपटकथा
५१सांगू की नको
५२फुलांच्या गावाला कधी जायचे
५३जुनी गाणी चलनी नाणी
५४मार्गशीर्षाची थंडी
५५ नाते नजरेचे
५६ काश्मीर फुलवारी
५७ तेरे बिना
५८ समर्पण
५९गोष्टी आणि गाणि
६०हमारी याद आयेगी
६१मला काय कमी
६२दूधातील साय
६३नावाचीच राणी
६४झपूर्झा, अक्षय तृतीया
६५आईचे आशिर्वाद
६६देवा बोला हो माझ्याशी
६७ बलुत ते आयदान, ते शनिप्रवेश
६८ सणसाखळी
६९मोत्याची माळ
७०टोपणनाव
७१मनाची मशागत
७२ वेळ मिळत नाही
७३नैराश्याचे निळे चांदणे
७४चैत्रांगण
७५लिम्ब्याची गोष्ट
७६सिनेमा सिनेमा?
७७अनुवादित साहित्य
७८उपेक्षिता उर्मिला
७९नको, ही माघाची थंडी
८० क्या हाल है क्या दिखा रही हो
८१जानेकी जिद ना करा
८२खूप काम आहे
८३प्रेम म्हणजे काय असते
८४मला विसरुन जा
८५माझी नोकरी
८६ संध्या छाया भिवविती र्हुदया
८७रिमझिम झरती श्रावन धारा
८८बकेटलिस्ट
८९पिवळया पंखांचा पक्षी
९०गाणारे गाव
९१गणेश कृपा
९२माहेर गीत

९३चन्ना मेरेया
९४आई चा पगार किती
९५ मुंबईचे डब्बेवाले
९६लेडिज स्पेशल
९७ वेड्या बहिणीची माया
९८परीक्षण, नाते
९९बाणगंगा तलाव
१००जनाबाई आजी
१०१मै मेरी फेवरिट हू
१०२गच्चीतल्या गप्पा
१०३ पेपरवेट
१०४निष्पाप गाणी
१०५ चला गप्पा मारु या
१०६पारिजातकाची फुले
१०७ आनंदाचे शास्त्र
१०८अंगणात पारिजातकांचा सडा
१०९साडीची मोहिनी
११०तू असा जवळी राहा
१११घरी माणसे चार
११३कालवा -कालवी, कालवे
११४ मनाचा फ्रिज
११५परिक्षण, हसताय ना
११६तडा गेलेली
११७सांग दर्पणा
११८मैत्र-शत्रुचा शत्रु
११९स्वयंपाक कला
१२०परिक्षांचे दिवस
१२१ किमया
१२२जीवनधारा
१२३उरला सुरला फराळ
१२४ दोन मनांची गाठ
१२५रस्त्यावरचे खाणे
१२६माहेरची वाट
१२७ काजव्यांचे झाड
१२८चला सारे गावू या
१२९ कसेतरीच होतेय
१३०साधना कट
१३१ चित्रपट रसग्रहण
१३२बंद पडणार
१३३तुझे घर कुठे सांग
१३४भूकेचा प्रश्न
१३५वास्को द गामा
१३६येणार आहे

# १ रुबरु रोशनी, (श्री गणेशाय नम:)

हे शिवशंकर गिरीजा तनया, गणनायक प्रभूवरा

शुभकार्याच्या शुभप्रारंभी, नमन तुला ईश्वरा.

गणेशाला गणपती बाप्पाला शुभारंभी नमस्कार केल्यास कार्य निर्विघ्न पार पडते, असे आजही मानले जाते. जुन्या वर्षांचे, भूतकाळाचे इतिहास, मोहन जो दरो, प्रमाणे खोलवर, टाकून नव्या तेजाला रोशनीला सामोरे जाण्याचा शुभारंभ म्हणजे गणेश पूजन हा होय. म्हणजेच रूबरू रोशनी होणे. पुरातन काळापासून गणेशभक्त मंडळी आपण बघतो. आधुनिक पिढी मात्र, “माय फ्रेंड गणेशा” म्हणत, गणपती बाप्पाला आपला मित्र मानतो. बालकांमध्ये सुद्धा गणपती बाप्पा लाडके आहेत. फ्रेंड वाटणारा गणेश बाप्पा सुख देतो, दुःख दूर करतो, कृपा करतो. जुने मागे टाकून नव्याचा शुभारंभ करायला सुचवतो. गणेशोत्सव आला कि फक्त सकलजनाना गणपती आठवतो असे नाही तर वर्षभर “तुज मागतो मी आता गजानना, मज द्यावे तू अनंता..” अशी आरती आर्तपणे म्हणत आपण एकदंताला आळवतो. अगदी मित्राकडे मागण्या (ऐहिक ) मागाव्या, इच्छा सांगाव्यात, तसे त्याच्याशी स्काईपने  कम्युनिकेट करतो. वेळप्रसंगी गुळखोबऱ्याची, मोदकांची लालूच पण दाखवतो. आपलासा वाटणारा हा गणनायक, सौम्य व मित्रवत असतो.

गणेशाचे रूप, श्रीशंकराप्रमाणे गळयात, नर मुंडाची माळ घालणारा, स्मशान योगी किंवा देवी प्रमाणे राक्षसाच्या डोक्यावर पाय ठेवणारा व थयथयाटाचा अवतार दाखवणारे पद्धतीमध्ये उभा ठाकलेला असे उग्र नाही. गणपति बाप्पा, त्याचे वाहन उंदीर आहे. देवीचे वाहन सिंह असते, ज्यामुळे देवीची शक्ती बघून आधार वाटतो. कि देवी तो सिंह सोडून त्या पशूच्या हस्ते शत्रू वाढ करू शकते. मग उंदिरावर बसणाऱ्या गणेशाला तरीही लोक का मानतात? याचे कारण गणपती बुद्धीची देवता आहे. शिवगण गणपती देवांचे आज्ञेत वावरतात. मानवाने संगणकाच्या माउसची

संकल्पना, उंदीर बघून शोधली असावी. हा माउस आता खूप शक्तिशाली झालाय बघा. गणपती बाप्पाचे वाहन असलेला उंदीर हळूहळू दाताने कुरतडून, वाटेल त्या वस्तूचा, धान्याचा नाश करू शकतो. उंदराला काळाचे प्रतिक मानतात. जो हळूहळू गोष्टी संपवतो. नष्टत्वाकडे नेतो. अर्थात काही वेळ जावा लागतो.

डोळे बारीक करून तीव्र निरीक्षण करून, दक्ष असा दोस्त, बाप्पा जणू आपल्या तुंदिलतनुच्या लंबोदरामध्ये सर्व सामावून घेतो. प्राप्त परिस्थितीचा द्रष्टा विचार करून योग्य काळ येता, हळूहळू योग्य वेळी निर्णय घेतला जाईल, हा विचार बाप्पा कडून मिळतो. अनेक घटना वेदना, निसर्गाचे प्रकोप यात बाप्पाच धीर देतो. हेही दिवस जातील असे शिकवतो. विकट लंबोदर असूनही गणेशा सुस्त नाही. तो सतत चल राहतो. उंदीर वाहन असूनही, तो गणेश, मंदगती नाही. सतत हुळूहुळया वळवळया असून तो भक्त संकटी धावून जातो. चटकन.

“आउस याची खिल्लारी, बापूस झटीया रे, फाडफाड्या कानाचो भारी हुळूहुळो, ”असे बाप्पाचे वर्णन एका लोककला नृत्यात आहे.

गणपती बाप्पाच्या तुंदिल तनु सावरत धावण्याच्या जलदगती रुपाला चंद्र हसला होता. त्यामुळे रागावलेल्या गजाननाने, त्याला शाप (घाईत) दिला कि तुझे तोंड लोक बघणार नाहीत. चंद्र घाबरला. माफी मागितली, गणेशाने उदारमनाने त्याला लागलीच माफ केले व सांगितले कि “फक्त गणेश चतुर्थीलाच तुझे दर्शन घेणार नाही. बाकी दर महिन्याच्या चतुर्थीला भक्तगण, चंद्राचे दर्शन घेऊनच उपवास सोडतात. म्हणजे बाप्पा पटकन क्षमा करतात. भाबड्या स्वभावामुळेच, या मित्राला आपण दहा दिवस घरी पाहुणा म्हणून बोलावतो. त्याचे लाड करतो व उत्सव साजरा करतो.

गणेश पूजेने, व्यक्ती संतुलित विचार करते. मस्तकाची थरथर, चंचलता, अथर्वशीर्ष पठणाने थांबते. मनाची चंचलता कमी होते. संतापावर नियंत्रण जमते. दुर्वामुळे उष्णता कमी होते. हल्ली

“तत्काळ” सगळे अशा जमान्यात गणपती बाप्पा मित्रवत वागतो. शिकवतो “तत्काळ काही मिळणार नाही, डोके शांत ठेवायला हवे” असे व्यवस्थापन जाण हे शिकवतो. शीघ्रफलदायी व्रत असे गणेशाचे व्रत नाही. बुद्धी वापरून विचार व द्रष्टा स्वीकार हे गुण लंबोदर शिकवतो.

व्यासांनी सांगितलेले महाभारत गणेशाने लिहून घेतले म्हणून त्याला स्टेनो, शोर्ट हंड रायटर म्हणतात. खूप मोठी आश्वासने नाहीत. जसे आहे तसे स्पष्ट सांगून. वैचारिक स्पष्टतेने, वेगळया विचारांची बुद्धी वापरून, एका वेगळयाचे तेजाला सामोरे जाता येते. गणेशाच्या बाबत फेसुबुक रिलेशनशिप स्टेटस, “ फ्रेंड्स फॉर एव्हर” वाटू लागलाय. पौराणिक विचार आपण नेहमी वाचतो. हा नवा विचार मला स्पर्शून गेला. तरुणाईच्या भाषेत बोलू?

धुवा छटा गगन मेरा, नयी डगर नया सफर मेरा,

नामोनिशान रहे ना रहे, ये कारवा रहे ना रहे

उजाले मै पी गया. रोशन हवा जी गया.

रूबरू रोशनी हो गया.

# २ श्रावणधारा:श्रावणधारा

श्रावणधारा बरसल्या की वाटते, हासरा नाचरा श्रावण आला. त्या चीज किसून टाकावे तशा पांढऱ्या रेशमी पाऊसधारा, हळूहळू पृथ्वीवर पडून, पृथ्वीला गुदगुल्या करतात. आषाढ, श्रावण, भाद्रपद तीन महिने हे पावसाचे महिने असतात. पृथ्वी सुंदर दिसते. माणसांची मने हिरवी होतात. ज्याला त्याला प्रेमाचे दिवस आठवतात, प्रेम करावेसे वाटते. भावगीते आठवतात.

‘रिमझिम झरती श्रावणधारा धरतीच्या कलशात

प्रियावीण उदास वाटे रात’

यात प्रेम ही आहे आणि त्या दुसऱ्या व्यक्तीबद्दलची आसक्ती आहे.

‘सावन के झुले पडे, तुम चले आओ’ म्हणत प्रेयसी खिडकीशी बसून, खिडकीच्या गजांना धरून, बाहेरचा पाऊस बघत प्रियकराला, जणू अंतःप्रेरणेने telepathy ने संदेश देते. प्रियकर कदाचित थरथरत असेल, पण येत नाही. खेकडे, बेडूक, किडे, गांडूळ, पक्षी, मोर सर्वांचाच, श्रावण हा आनंदाचा महिना असतो.

सावन का महिना पवन करे शोर,    जियारारे झुमे ऐसे, जैसे बनमा नाचे मोर!

तर लहान मुले बालके म्हणतात,   ए आई मला पावसात जाऊ दे

एकदाच मला पावसात चिंब न्हाऊन येऊ दे!

विरहिणी गाते,

अबके बरस सावन में, आग लगेगी बदनमें

घटा बरसेगी, नजर तरसेगी, मगर मिल न सकेंगे दो मन----

यांत व्यक्ती सजीव आहे, पण प्रेम संपलेले आहे. अगदी एक दूजे के लिए मधला वासू म्हणतो तसे—प्रेम कहाँ चला गया? पावसाच्या खूप आठवणी असतात, बालपणी कागदी नावा

सोडल्याच्या, तरूणपणी एका छत्रीत भिजल्याच्या, आडोशाला चोरून स्पर्श केल्याचा, पावसाळी सहलीच्या---

आयुष्याच्या Albumमध्ये
आठवणींचे फोटो असतात
आणखी कॉपीज काढायला
निगेटिव्ह्ज मात्र शिल्लक नसतात

वो कागज की कश्ती, वो बारिश का पानी कहॉं चले गए? ती दिवानी प्रेयसी मात्र प्रयकराची वाट बघते. तो पुढे निघून गेला असला तरीही तिला वाटते आपण फसलो की त्याने फसवले?

अरे हाय हाय ये मजबूरी, ये मौसम और ये दूरी

मुझे पल पल ये तडपाए, तेरी दो टकीयों की नौकरी में, मेरा लाखोंका सावन जाए

सासुरवाशीण म्हणते,

अब के बरस भेज भैय्या को बाबूल

सावन में लिजो बुलाय

श्रावण हा पक्वान्नांचा श्रावण सुद्धा असतो. हल्ली गल्लीबोळात फास्टफूड पार्लर्स असतात. आईस्क्रीम, चॉकलेट्स व मिठाईची दुकाने असतात. मात्र पूर्वी या श्रावणात जे गोडधोड केले जाई, त्या गोडधोड पदार्थांची वाट बघितली जाई. अजूनही बंदे ह्या अंधारउजेडाचा कशिदा काढलेल्या दिवसांची सर्वजण आनंदाने वाट बघत असतात. पारंपारिक पदार्थ ज्यांच्यासारखी चव आजीलाच जमते. देवघरातील फुलांच्या वासात मिसळलेला पक्वान्नांचा वास आयुष्यभर आठवतो.

वो कागज की कश्ती, वो बारिश का पानी?

वा! काय मजा असे. श्रावणधारा रिमझिमत असतात. श्रावणरंगी कुंद हवेत घरी आई पावसात भिजू नको ग बेटा सांगत असे. पण बसस्टॉपवर कॉलेज मध्ये पावसाळ्यात नाही

रेंगाळायचे तर कधी? त्यामुळे पावसाळा बसस्टॉपवर रेंगाळून मैत्रिणी शोधण्याचा सुद्धा असतो. मनाची हुरहुर सैराट झालेली असते. आपण मनाचा दरवाजा बंद का केला? ‘रस्त्यावर ती एकटीच पावसात भिजत एकाकी गेली, ही व्याकुळता हे दिवस देतात. डोळयांमध्ये उतरते पावसाचे पाणी, प्रश्नांची उत्तरे शोधत मी खोदतो आठवणी…..’

वृद्ध व वयस्क यांना सुद्धा पावसाळा अस्वस्थ करतो. लग्न झाले, मुले झाली म्हणून आपण लौकिकार्थाने सुखी झालो. पण आपण त्या पावसाळयात मैत्रिणीचा हात हातात घेऊन तिला ‘आय लव्ह यू’ म्हणायला हवे होते. घरी महाभारत झाले असते, प्रेमाचे सैराट झाले असते, ब्ल्यू व्हेलसारखा तो प्रेमप्रकरणाचा खेळ जिवाशी होऊन अंगाशी येऊ शकत होता म्हणून आपण माघार घेतली. पण त्या पावसाची आठवण काळजात रूतत राहिली.

दुनिया जिसे कहते है, जादू का खिलौना है

मिल जाए तो मिट्टी है, खो जाए तो सोना है

म्हणून पाऊस आला की आपण ओरडतो  Rain Rain go to Spain, never show your face again

आणि पाऊस आला नाही तर उनाड शब्द पावसावर बरसतात. पण हेच खरे की तेरे बिना जिया जाए ना सांगणारा बालकवींचा औदुंबर दिसत राहतो. आपण तरीही म्हणतो,

श्रावणमासी हर्ष मानसी हिरवळ दाटे चोहीकडे

क्षणात येते सरसर शिरवे क्षणात फिरूनी ऊन पडे!

****************

## ३ नातीगोती

मानवाच्या जीवनात बारा शब्दाला, सहजीवनात फार महत्त्व आहे. बारा बलुतेदार, बारा महिने, बारोमास, बारा वर्षे (तप), बाराखडी ही त्यातलीच उदाहरणे आहेत. मी मात्र आज बारा नात्यांबद्दल सांगणार आहे. ही बारा नातीः

१) प्राथमिक नाती २) द्वितीय प्राथमिकता नात३) गुरू-शिष्य, रितीभातीची नाती

४) भावनिक नाती५) कार्यालयीन नाती ६) सहप्रवासी नाती

७) कामानिमित्त जोडलेली ८) आभासी नाती९) संकटकालीन नाती

१०) बघून माहित असलेले ११) सेलिब्रिटींचे नाते १२) अनाम नाते- अन्य नाते

१) प्राथमिक नातीः आई-वडील. कारण या दोघांपासून, नव व्यक्तीचा जन्म होतो .कायमसाठी म्हणून आई-वडील ही नाती प्राथमिक नाती होय. ती गुंतागंतीची असतात.

२) द्वितीय प्राथमिकता नातीः भावंडांची, मायेने ममतेने जोडलेली चुलत बहिणी भाऊ, पुतणे चुलते, आजीआजोबा. नातेवाईक ज्यांच्यातील व आपले काही जैविक घटक समान असतात अशी द्वितीय प्राथमिकता, नाती होत.

३) गुरू-शिष्य रितीची नातीः शिक्षक-विद्यार्थी, पाळणाघर- बालक, व्यायामशाळा-व्यक्ती, गुरू-शिष्य, धार्मिक गुरू-भक्त अशी नाती या तिसऱ्या प्रकारात येतात.

४) भावनिक नातीः मित्रमैत्रिणी, शेजारी, सख्य असलेले सहकारी, ही नाती फक्त भावनेने जोडलेली असतात. त्यात रक्तबीज समानता नसते.

५) कार्यालयीन नातीः औपचारिक व केवळ कामानिमित्त, एकत्र राहणाऱ्या व्यक्तींमध्ये, No hate no love अशी ही कार्यालयीन नाती असतात. ही नाती असून नसल्यासारखी असतात असे नाही, पण या नात्यात अपेक्षांचे ओझे नसते.

६) सहप्रवासी नातीः रोज प्रवासात भेटणारी, रस्त्यावर कधीतरी बोलणारी व्यक्ती अशी सहप्रवासी ठरते. या नात्यात गुंतागुंत नसते. प्रवासापुरते नाते असते. पुढे भेटू वगैरे ठरवूनही, कुणीही पुढे, ही नाती सहसा वाढवत नाही.

७) कामानिमित्त जोडलेली नातीः कामानिमित्त घरी येणारे नोकर, ड्रायव्हर, स्वयंपाकीण, मोलकरीण, पेपरवाले, दूधवाले ही नाती, या प्रकारात मोडतात.

८) आभासी नातीः व्हर्च्युअल नाती म्हणजे व्हॉट्सऍप, ट्विटर, फेसबुक फ्रेंड्स यामध्ये मोडतात. या व्यक्तींबद्दल सत्यास्थित अशी कोणतीही माहिती, दुसऱ्या व्यक्तीला नसते. ही नाती संकटकाळी उपयोगी नसतात. “फेसबुकवर मित्र सत्रा, अंत्ययात्रेला फक्त कुत्रा” अशी ही नाती असतात. अपेक्षांचे ओझे नसते. फील गुड टाईमपास असतो.फसवणूक होवू शकते.

९) संकटकालीन नातीः फक्त संकटकाळी, काही व्यक्ती जुने राग, लोभ विसरून, मदतीला धावून येतात. मात्र संकट संपताच पुन्हा औपचारिक अंतर ठेवू लागतात. काही जण संकटकाळी, पैसे मागायला ही नाती वापरतात.

१०) बघून माहित असलेलेः फक्त बघून ओळखीचे वाटणाऱ्या, व्यक्तींचे नाते यात येते. नाव पक्के माहित नसते. केवळ तोंडओळख असते.

११) सेलिब्रिटींचे नातेः स्वार्थीपणाने, सेलिब्रिटींचे ग्लॅमर उपयोगी पडावे म्हणून जोडलेले, हे नाते असते. त्यात अर्थव्यवहार नसतात तरीही स्वार्थ असतो.

१२) अनाम नातेः ह्यात मानवाचे मानवाशी असलेले नाते येते. माणुसकीचे व अर्थसंबंध नसलेले नाते यात येते.नैसर्गिक संकटाचे वेळी जुळू शकते.

यातील कोणतेही नाते श्रेष्ठ, कनिष्ठ, ज्येष्ठ, विशिष्ट नसते. जीवनात जशी बदलती परिस्थिती बदलते, तसतशी नातीही बदलतात. कधी रेशमी तर कधी खडबडीत बनतात. बारा नात्यांच्या मजबूत गुंफणीने, जीवनाचा गोफ गुंफला जातो. बारा अंकाचे महत्त्वच असे आहे.नाती पाळावी लागतात, जपावी लागतात.अशा नवनवीन नात्यांची घडमोड, नात्यांची गुंफण, हेच तर जीवन असते!

**************

# ४ गूढ पर्यटन

प्रवासात रस्ता चुकणे, चकवा, भुतंखेतं दिसणे बऱ्याचदा घडते. त्यात अंधश्रद्धा असू शकते. पण तरीही यातील काही गोष्टी अनाकलनिय असतात. काही वेळा काही अनाकलनीय आकर्षणाने दिल एक मंदिर ते दिल तो पागल है असा प्रवास क्षणात होतो. त्याला चकवा लागणे, प्रेमात वेडे होणे अशी अनेक नावे देता येतील. संध्याकाळच्या वेळी हे प्रेमिक वेडे होतात पौर्णिमा आली कि बिथरतात. "शयाम ढाले सिटी बजाना छोड दो" म्हणावे अशी यांची संध्याकाळ गूढ, भारलेली असते. तिन्ही सांजा चिंचेच्या झाडाखालून गेली, चाळा झाला, बाहेरची बाधा झाला अशी बतावणी केली जाते. त्याबद्दल मग कथा गुंफल्या जातात. त्या अरुपाला रूप देते ते साहित्य होय. लेखक कथेत स्वतः स्वतःला समजावतो. कल्पना घालतो आणि मग अशा गूढ कथा पसरत जातात. त्यात अंधश्रद्धा, भीती, प्रेम, आकर्षण असते. कि सर्व जुने सुसंस्कार क्षणात पुसले जातात. माणसाचे जनावरच होते. त्या जागेत काहीतरी गूढ शक्ती असते कि त्या शक्तीने झपाटले जातो. सृष्टीचा देव्हारा दरवलेलेला गाभारा न राहता फक्त तो मानव देह धर्मी उरतो. कौसल्येचा राम अ-राम होतो. अशा गूढ कथा जशा कोकणातील भुताखेतांच्या असताता तश्या संपूर्ण भारत देशभर आढळतात. ऐकलेल्या सांगितलेल्या अनुभवलेल्या अशा अनेक गूढ जागा या देशात आहेत.

१) मन्नर शाळा - कोचीजवळ चेरथला जवळ मन्नरशाळा नावाचे एक देऊळ आहे. पुल्लुखन पार्ट म्हणजे सापाच्या आरत्या सर्प गाणी या मंदिरात म्हटली जातात.

२) सापुतारा- सापुतारा नावाचे महाराष्ट्र गुजराथच्या सीमेवरचे एक गाव आहे. साप चावला कि पूर्वी आदिवासी लोक या डोंगरावर त्या व्यक्तीला नेत. मंदिरात अनेक साप छतावर जमिनीवर फिरत असतात. इथे पोचताच सर्प विष उतरते अशी समजूत आहे. महाराष्ट्र, कर्नाटक, केरळात सर्प मंदिरे बरीच आहेत. या मंदिरांची संरचना खूप छान असते. विजेचे दिवे नसतात. काळाच्या मागे ऐतिहासिक, पुराणिक काळात गेल्यासारखे वाटावे म्हणून मिणमिणते तेलाचे दिवे

असतात. दगडी चाके असतात. अनेक मंदिरे पांडवकालीन आहेत. भीती वाटावी अशा गूढ लहरी या मंदिरात आहेत.

३)जेजुरी -

काही घटना घडतात. जेजुरीला जाऊन आल्यावर काही संसारा मध्ये मोठं मोठी वादळे येतात. त्याचे मूळ कारण या जागेतील विचित्र लहरी आहे.

४) ओम बन्ना बुलेट बाबाचे मंदिर पाली राजस्थान

मोटारसायकल मंदिर- राजस्थान मधील जोधपूर जवळील देवळाला मोटारसायकल टेम्पल असेच नाव आहे. श्रद्धा अंधश्रद्धेचा पुसत रेषेवरचे अनुभव येथे येतात. जोधपूर पासून ५० किमी पालीपासून २० किमी वर हे बुलेट मंदिर आहे. प्रवास सुखकर व्हावा म्हणून रोज हजारो लोक या देवळाला भेट देतात. ओमसिंग बन्ना नावाचा एक बुलेटस्वार या ठिकाणी ठार झाला. पोलिसांनी हि बुलेट पोलीस स्टेशनवर नेली मात्र दुसऱ्या दिवशी ती बुलेट पुन्हा अपघातच्या ठिकाणी आली. पोलिसांनी साखळदंडांनी बांधून पेट्रोल टँक रिकामा करून मोटार सायकल परत जागेवर आली मग गावकर्यांनी या बुलेटचे मंदिर बांधले. ओम बन्ना चे भूत अडचणीतील प्रवाशांना मदत करते. राजस्थान मधील करुनि माता मंदिराची कथा देखील अशीच आहे.

बदामी - हंपी बदामी घ्या जागा गेलेल्या साम्राज्याच्या खुणा आहेत. या काही ठिकाणी पुजारी सुद्धा राहू शकत नाही अद्भुत भीती वाटते.

५) कोल्हापूरच्या अंबाबाईचे मंदिर- या मंदिरात एक बाई हट्टाने मी या मंदिराला किती दरवाजे आहेत ते मोजणार म्हणाली व मंदिरात रात्री लपून बसली. ती सकाळी भ्रमिष्ट झाली होती.

६) स्कीला नावाचे, आरणमुला या कन्नड नावाचे, एका मंदिरात असे दगड आहेत जे घासले कि आरश्या संख्या दगडांमुळे रात्री किरणोत्सर्ग झाल्यासारखे दिसते.

७) नागपूर जवळील रामटेक येथे कालिदासाने मेघदूतात वर्णन केलेली अनेक स्थानके आहेत. येथे एक दगडी डुक्कर आहे. वराह रुपी या देवाचे पोटाखालून जाऊ शकल्यास पापाचा नॅश होतो. अशी कथा आहे हि जागा रात्री गूढ वाटते.

८) नागमपट्टा- (केरळ) येथे कोंबडी बाली दिला जातो. दारूचा नैवेद्य दाखवला जातो. कलकत्त्याला कालीमातेला माशांचा व सुरा (दारू) चा नैवेद्य दाखवत असत. (१९७९) देवीची नवरात्रीची मूर्ती घडवताना कलावंतिणीचा अंगणातील माती घ्यावी लागते. अन्यथा मूर्ती घडणी येत नाही. देशनोक राजस्थान (बिकानेर) जंक्शन जवळ करणी माता मंदिर येथे

९) विजयस्तंभ - चितोडगढ गडावर राजस्थान मध्ये आहे. इथे राणी पद्मावतीसह १६००० स्त्रियांनी सती पतीच्या मृत्यू नंतर त्यांनी अग्नीत उडी मारली त्यांच्या किंचाळया या गडावर ऐकू येतात. इथे रात्री एकही व्यक्ती राहू शकत नाही.

१०) शेगाव- गजानन महाराजांच्या पोथीत तेव्हरचा रस्ता चुकल्याचे उल्लेख आहे. आम्ही तीन वेळा तिथे रस्ता चुकलो आहोत. काहीतरी गूढ तिथे असावे. मात्र गजानन महाराजांवरील भक्ती मुले आपले रक्षण होते. रात्री बरोबर बारा वाजता आम्ही इथे होतो. आंब्याचा सिझन होता. एप्रिल महिना असल्याने झाडावर आंबे लटकलेले होते. ड्रायव्हर झाडावर मुंडकी लटकली आहेत म्हणून किंचाळू लागला. आम्ही साडेपाच पर्यंत त्याच जागी थांबलो सूर्य उगवल्यावर पुढे गेलो.

११) पोर्तुगीज राजवटीत व निसर्ग असा असल्याने गोवा गूढ आहे. जे असते दिसते ते तिथे नसते हा अनुभव काळ आणि जगबुडी दोन्ही नाड्याजवळ आला. समोरून पांढरी आकृती गेल्यासारखे वाटून ड्रॉयव्हरने ब्रेक दाबला व गाडी उलटली. रात्रभर आम्ही रस्त्यावर बसून होतो.

१२) कोकणातील महाडजवळ सावित्री नदीवरील पूल जिथून वाहून गेला तिथे उभे राहून जर काही काळ रेंगाळले. तर कसेतरीच होते.ल अनेक मृत व्यक्तीचे मृतदेह सुद्धा अजून सापडले नाहीत. देवस्थानातील काही खोल्यांमध्ये दार ठोठावली असा भास होतो. अपरात्री जग येऊन आकृती दिसते. स्मशान जवळ जाऊन आल्यावर झोप डिस्टरब राहते. त्यावरून काही जागी काही वेगळया शक्ती वेगळया व्यक्ती वावरत असाव्यात.

१३) आमच्या एक काकू होत्या खूप देव देव करायच्या. घराच्या परसात हरिहरेश्वर गावाच्या परिघात, मुलाच्या केंद्रबिंदू भोवती नवऱ्याचे आसपास बाई फिरत असत. एकदा एक साधू गावात आला. त्याने काकूंना काय तरी प्रसाद दिला. काकू एकदम भ्रमण लालसा लागली. नसते अनेक उपद्व्याप त्या करू लागल्या. मुक्त भ्रमंतीसाठी यात्रा चित्त भ्रमंती साठी खासियत भ्रमंतीसाठी  त्या वेगवेगळया ठिकाणी जाऊ लागल्या. काका शोधून त्यांना धरून घरी आणत. त्या परत मंदिरात जाऊन राहत असत. कधी आल्या कि सांगत "मी माझी राहिले नाही. मला काशीला न्या, मला गंगापूरला जाऊ दे."

तासंतास काकू घरातील एका विहिरीजवळील मूर्ती जवळ जाऊन बसत असत. काही दिवसांनी त्या मूर्ती चोरीला गेल्या. ती विहीर सुखाली. काकू घरात आल्या व गायब झाल्या. त्या गंगापूर येथे सापडल्या. त्यांना काका परत आणताना त्या निसटून गिरनारच्या गेल्या. काकानि परत आणले. काकांनी त्यांना घरात बांधून ठेवले होते.

एक दिवस तो साधू परत आला. काकांनी त्याला विचारले "तू असे काय करतोस?" का येतोस? ती विचित्र वागते.तो म्हणाला, "मी दुसऱ्याची वस्तू घेत नाही, माईंना दूरच्या मंदिरातून बोलावणे आले आहे"

काका म्हणाले, "तू परत येऊ नको"

तो म्हणाला, "मी काही गेलेला काळ नाही कि जो परत येत नाही. मी परत येईन." एका मांत्रिकाच्या सल्ल्याने काकांनी नागपूजा केली. काकांनी घरातच काशी विश्वेश्वराचे मंदिर बांधले. त्या नंतर तो साधू दिसला नाही. काकू घरातच राहू लागल्या. त्या मंदिरात आजही गूढ वलय वाटते. (हरिहरेश्वर ला ते मंदिर आहे)

१४) नर्मदा परिक्रमा- नर्मदा परिक्रमेत नर्मदा माता दर्शन देते म्हणतात. नदी काठी स्त्री रूपात, नावेत जाता येता अथवा शूलपाणी जंगलात नर्मदा देवी दर्शन देते. या परिक्रमेत अश्वत्थामा दर्शन देतो त्याच्या कपाळावरची जखम स्पष्ट डिसास्ट त्या जखमेतून रक्त वाहत असते व तो परिक्रमा वासियांकडे तेल हळद मागतो. भिल्लांची लुटण्याच्या घटनाही ऐकायला मिळतात. एखाद्या ठिकाणी व्यक्ती विचित्र बरळू लागते. डिसोझा चाल माहीम, मुकेश मिल कंपाउंड मुंबई १५.

गूढ अनुभव- कान्हेरी गुंफा - कुर्ला पूर्वेचे पूल, चेम्बुरचे भूत बंगले, बांद्र्याचा (पश्चिमेच्या) काही जुन्या हवेल्या नासी रंगात वाडी माहीम, सम सरीत बिल्डिंग माहीम. गूढ अनुभव येतात. वस्ती वाढल्याने दिव्यांच्या चाकचकाटाने पूर्वी इतके नसले तरीही मुंबईत देखील गूढ स्थळांचे अनुभव येतात. त्रिंबकेश्वर, काशी, अयोध्या, हृषीकेश, हरिद्वार या ठिकाणी काही स्थळे अशी आहेत. हि नकारात्मक ऊर्जा कमी व्हावी म्हणून पूर्वजांनी तिथे मंदिरे बांधली. पण मूळच्या शक्ती अजूनही काही प्रमाणात तिथे असल्याने गूढ अनुभव येतात. जागेपणी स्वप्नात काहीबाही दिसते. दृष्टांत दिले जातात. काही मागण्या केल्या जातात. कधी भक्ताला इथून जा असे सांगितले जाते. कधी त्या गूढ शक्तीला सोबत हवी असते. ज्याचे त्याचे अनुभव.

## ५ एक पाऊल स्वच्छतेकडे चला ५

स्वच्छ भारत मोहिमेत लोकांचा सहभाग वाढविण्याच्या योजना अनेक आहेत, मात्र ...

स्वच्छ भारत मोहिम हि २/१०/२०१४ रोजी पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांनी सुरु केली आहे. अर्थात कोणत्याही मोहीमेचे यश जन सहभागावर अवलंबून असते. लोकांचा सहभाग वाढविण्याच्या योजनांचा आता आपण आढावा घेऊ या.

१ स्वच्छता आणि आपण

पूर्वीपासुनच आपल्या देशाच्या प्रतिमेतील अस्वच्छतेबद्दल टिका केली जाते. अनेक सिनेमांमध्ये भारतातील अस्वच्छ आंगण, संडास, गरीबी, भूकबळी, अज्ञान अशी नकारात्मक कल्पना आंतरराष्ट्रीय जनतेत अजूनही अाहे, भारतात अस्वच्छता रोगराई ने खूप जण मृत्युमुखी पडतात हे सत्य आहे. स्वच्छ अन्न, स्वच्छघर, स्वच्छ कपडे असे मूलभुत गरजांबद्दलचे मूलभूत प्रश्न य़ा देशात आहेत.

अशी  स्वच्छता मोहिम अापल्या देशात नवीन नाही. प्राचीन वेद काळापासून दिवाळीच्या सणात वार्शीक स्वच्छतेचे महत्व अधोरेखीत केले आहे.महात्मा गांधींनी स्वच्छतेचे महत्व बिंबवले.संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाने रोगराई दूर झाली. भारतात आज श्री नरेंद्र मोदी यांनी सुरु केलेल्या या मोहिमेस आज आंतरराष्ट्रीय रंग आहे. ही मोहिम आता पर्यंतच्या मोहीमेंचा मुकुटमणी आहे.

ही मोहीम आपल्या देशाची प्रतिमा ऊज्वल करु शकते. ही मोहीम दोन स्तरावर राबवता येते अ.बाह्यस्वच्छता मोहिम

ब.आंतरिक स्वच्छता मोहिम

या मोहीमेचा अंमलबजावणी आराखडा खालीलप्रमाणे बनवता येतो

बाह्यस्वच्छतेसाठी

१. लोकसंख्या नियंत्रण

२. घंटागाडीच्या फेऱ्या वाढविणे

३. प्लास्टिकवर बंदी

४. सुका आणि अोला कचरा विभक्त करणे

५. जनसहभाग

६. देशांतर्गत सोयी सुविधांचे विकसन

७. स्व स्वच्छता मोहिम(हात धुणे, अंघोळ करणे, स्वच्छ पेय जल)

८. स्वच्छता कर्मचारी भरती मोहिम

९. कचरा डेपोचे व्यवस्थापन

१०. कागदाचा वापर टाळणे

११. जागोजागी स्वच्छतागृहांची सोय करणे

१२. सर्व स्वच्छता मोहिमेत स्त्रियांचा सहभाग वाढविणे

आंतरिक स्वच्छतेसाठी असाच आराखडा बनवता येतो

स्वच्छतेच्या कार्यकर्ता यांचे शंकूमध्ये, pyramid मध्ये स्वच्छता कर्मचारी तळाशी आहे आणि डॉक्टर सर्वात वर आहे. म्हणजे सामान्य व्यक्ती आणि स्वच्छता कर्मचारी हा पाया आहे, कारण डॉक्टर आजारपणानंतर उपयोगी पडतो, पण स्वच्छता कर्मचारी आणि नागरिक आजारपण येऊ नये म्हणून प्रतिबंधात्मक काम करतो. स्वच्छ राहणे, हे रोगराई टाळण्यासाठी करता येणारे प्राथमिक काम आहे. चला टाकू या,

एक पाऊल स्वच्छतेकडे,

*****************

## ६ “सांत्वना”

आपल्या मराठी भाषेत, मनात एक म्हण आहे, ‘तोरणदार चुकवले तरी चालेल, पण मरणदार चुकवू नका’ म्हणजे लग्नघरी जेवण, मजा यासाठी नाही गेलात तरी चालेल, पण जर एखाद्या घरी मृत्यू झाला असेल तर सांत्वनाला जरूर जा.

१) वेळः कोणत्याही वयातील मृत व्यक्ती मागे राहणाऱ्यांना दुःखच देत असते. अशा वेळी दहा मिनिटांची भेट देखील सांत्वनाला पुरेशी होते. आपण त्या व्यक्तीच्या त्या दुःखात सहभागी आहोत, एवढेच सांगायचे असते. ती औपचारिकता असते.

२) सोबत नाश्ता नेणे.     खरे तर सांत्वनाला जाताना काहीही सोबत नेऊ नये असे म्हणतात. मात्र ब्रेड, बिस्किटे, चिवडा, चहा, पिठलेभात हे पदार्थ सांत्वनाला जाताना नेणे ही पद्धत काही घरी असते.

३) दुःखाने बधिर झालेल्या सुतकी घरात हसून खिदळून वागू नये. मात्र उगीच खोटे रडूही नये. हल्ली तर “भेटायला येऊ नये” असे फोनवर सांगितले जाते.

४) केवळ थोडावेळ बसून न बोलता परत आलो तरी चालते. परत जाताना काहीही बोलू नये. (येतो अथवा जातोमध्ये वेगळा अर्थ निघतो.)

५) मृत व्यक्तीची एखादी आठवण त्या व्यक्तीचा चांगुलपणा जरूर सांगावा. पण ती भेट व चर्चा थोडक्यात आटोपावी.

६) ते तुमच्यासोबत मृत्यूनंतरही राहतील असे सांत्वन करता येते. मात्र गेलेल्या व्यक्तीला आपण परत बघू शकणार नाही, ऐकू शकणार नाही ही कल्पना वेदनादायी असते. “स्मरणात ते तुमच्यासोबत राहतील” “त्यांचे आशीर्वाद कायम तुमच्या पाठीशी राहतील” असे म्हणू शकता.

७) मी तुमचे दुःख समजू शकते, पण या प्रसंगाला धीटपणे सामोरे जायला हवे. जीवनपथावर पुढे जायला हवे असे बोलता येते.

८) "कसे झाले, काय झाले", खोदून खोदून विचारू नये. इच्छा असेल तर सुतकातील व्यक्ती सांगेल. काही व्यक्तींना त्या घटनेबद्दल वारंवार बोलणे वेदनादायी वाटते.

९) जुन्या गोष्टी सोडा आता, भविष्याकडे बघा असे सांगणारे असतात, पण प्रसंग बघून बोलावे.

१०) संदेशः भेटायला जाणे जमतेच असे नाही, फक्त सांत्वनाचा लघुसंदेश पाठवला तरी चालू शकते.

११) वृद्ध होते, खूप वर्षे जगले होते असे कधीही म्हणू नये.

१२) मृत व्यक्तीच्या वस्तू हाताळू नयेत, विकून टाका असे सांगू नये. काही काळ तरी त्या स्मृतीत सांत्वन मिळवणे दुःखी व्यक्तीला बरे वाटते.

*****************

# ७ प्रजापिता ब्रम्हाकुमारी

माऊंट अबु येथे, ज्ञानसरोवर येथे "जग घडवण्यात लेखक आणि कलाकारांचे वरदान "या विषयीचे शिबिरात सहभागी होण्याचा योग अाला़कलाकारांना राजयोग शिकवण्यात आला़या सांस्क्रुतिक संमेलनात पुर्ण देशातुन विविध क्षेत्रातील कलाकार आले होते.कलाकारंाद्वारे सामाजिक शान्ति, सद्भावना हेतु लेखन, कार्य करण्याची या कार्यात सतत सहयोग देण्याची प्रतिज्ञा एकत्रित पणे करण्यात आली, कलाकार तणावमुक्त रहावेत, म्हणून येथे राजयोग अभ्यास करुन घेण्यात आला

तणावमुक्ती

तणावमुक्त जीवन कोणाला नको असते? तणावमुक्ती साठी विविध उपक्रम आपण करतो, ़गुरु, महाराज, मंत्र, तंत्र, मंदिरांना भेट, कुत्र्याला बिस्कीटे खायला देणे, असे व इतर उपाय करुनही, तणावमुक्ती सहजपणे मिळत नाही, मिळाली तर ती अल्पकाळ टिकते, वाद, नैैराश्य, विकार पुन्हा येतातत्रअशा वेळि, राजयोगाच्या मार्गाने, फक्त अोम शांति मार्गावर चालून तणावमुक्ती होणार असेल तर ति बाब सोन्याहुन पिवळी असेल़सर्व दुखांचे मूळ हे विचारांमध्येच असते, त्या विचारांवर नियंत्रण केले तर मन शांत होते़ ही गोष्ट अवघड आहे, मात्र अशक्य नाही

सर्व प्रश्न देवावर सोपवा, हे तत्वज्ञान कायम अनेक, तणावमुक्ती कार्यक्रमांत असते़सामान्यपणे प्रश्न तोच असतांना, दृष्टीकोन बदल झाल्यास मानसिक त्रास कमी होवु शकतो़ 'होणारे न चुके जरी येई ब्र;म्हा तया अाडवा', मग चिंता, विशाद का?प्रजापिता ब्रम्हाकुमारी हे

आपले पिता असुन आपण त्यांवी अपत्ये आहोत हा विचार राजयोगाचा पाया आहेजाति धर्म, भाषा, वय, प्रंात, स्त्री पुरुष हा भेदभाव न ठेवता साधक नणावपुर्ण येतात, तणावमुक्त जातातअबुशिखरावर निसर्गसान्निद्ध्यात येतात व शान्तिचा अनुबव घेतातकठोर व्रत, तप, जप, ऊपवास मंत्रोपचार असा रोजच्या जबाबदारितुन वेळ मिळनार नाही असा कार्यक्रम या साधनेत नसतो

प्रजापिता ब्रम्हाकुमारी, हि संस्था १९३७ सालि सुरु झाली, १९४७ साली देशाची फाळणी झाल्यावरही या संस्थेचे शान्ति, प्रेम, बंधुभाव रुजविण्याचे कार्य गेले ७७ वर्षे चालु आहेप्रजापिता ब्रम्हाकुमारीया संस्थेला युनो, इकोसाॅक युनिसेफ या द्वारे मान्यता मिळाली आहे, शांतिदुत व अन्य पुरस्कार या संस्थेकडे चालुन आले आहेतप्रजापिता ब्रम्हाबाबा यांचे सन्मानार्थ आणि स्मरणार्थ भारतसरकारद्वारा पोस्टाचे तिकिट छापले गेले आहे

आधी स्वमनात, मग घरात, नंतर कुटुंबात, गावात, देशात जगात शान्ति यावी म्हणुन, मानवी मनात बदल होवुन अंतर्गभात शान्ती यावी, जी सर्वत्र पसरु शकते द्वेस मारु शकते, असे प्रजापिता ब्रम्हाकुमारी चे त्तत्व आहे

प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरिय विश्व विद्यालय, अबु याद्वारेविविद गावी, शहरांमध्ये, देशात सेंटर्स चालविली जातात, शिबिरे घेतलि जातातभाषणे, चित्र प्रदर्शने, चित्रपट, शिबिरे घेवुन, मानवी मनाचे विचार सकारात्मक व्हावे, सद्भावना निर्माण व्हावी म्हणुन कार्य केले जाते, समाजप्रबोधन केले जातेऔषधोपचार, समाजसेवा, महीला प्रगति, शिक्षणकलासंस्क्रुती अशा षकषेत्रात अनेक प्रजापिता ब्रम्हाकुमारीचे शिष्य, ब्रम्हाकुमारी आणि ब्रम्हाकुमार कार्य करतात येथे अंधश्रद्धा अजिबात नाही, दूरदर्शनवर, आस्था आणि पीस आॅफ माईंड या चॅनेलवर प्रजापिता ब्रम्हाकुमारी येथील कार्यक्रम बघता येतात

प्रजापिता ब्रम्हाकुमारी यांचेतर्फे मुरली, म्हणजे सुविचार धन साधकांना ठराविक वेळी, वितरित केले जाते, लिखित वाटले जाते, अनुभवावरुन असे वाटते की जणु आपले विचार ब्रम्हाबाबा जाणुन आपल्याला बोध देत आहेत्प्रजापिता ब्रम्हाकुमारी च्या राजयोग शिबिराद्वारे मन:शांति, प्रेम जरुर वाढेल व अच्छे दिन, स्वर्णींम युग येइल अशी आशा वाटते

अोम शांति

*******

# ८ होऊ कशी उतराई

बाळा तुझ्यामुळे मी झाले आई"

होवू कशी उतराई?---- मी शुभांगी पासेबंदआज मातृदिनाल हे लिहिते आहे

आईची महती सांगणारी, अनेक गाणी, ओव्या, कविता आपण वाचतो ऐकतो लिहितो. पण आईचे बाळाप्रती आणि बाळाचे आईप्रति भाव वेगळे का आणि काय असतात? आई म्हणजे बाळाचे विश्व असते. सर्व वेळी आईच्या मनात, बाळा बद्दलचा एक कृतज्ञता भाव असतो. जो विश्वव्यापी उरतो.

बाळा तुझ्यामुळे मी झाले आई, होऊ कशी उतराई

बाळा तू माझ्या आयुष्यात आलास, माझ्या देहात वाढलास, माझे स्त्री जीवन समृद्ध केलेस. झाला तर बाळ, नाहीतर काळ. अशा खूप दुःखद, नऊ महिन्यांच्या ताणतणावातून गेल्यावर, आईची हाती, तो दुपट्यात गुंडाळलेला लहानसा गोळा येतो. तेव्हा आई भरून पावते. आयुष्यातील हि एकच वेळ असते, जेव्हा बाळ रडल्यावर आईला आनंद होतो. (कारण जन्मल्या बरोबर बाळ न रडणे, हे बाळाचा मृत्यू सुचवते)

ते रडणे ऐकून आई म्हणते.

धन्य कूस आईची धन्य कान लोचने

कृतार्थ जन्म जाहला, फिटून जाई पारणे

अनंत कष्ट सोसले, फेडशील पांग तू

बाळाची प्रगति

बाळ हळू हळू, शिशु शी आणि शु, या अवस्थेतून मोठा होतो.थोडा सुट्टा होतो. चिमण्या कावळे, कुत्री मांजरे, गाय बैल, हे प्राणीसुद्धा त्याच्या भावविश्वात येतात. चंद्र सूर्य, आईबाबा हे चौकोनी विश्व नवीन मित्रांमुळे वाढते. कुटुंबातील लोकांचा ते बाळ डोळयाचा तारा असते. आशा असते.

आई म्हणते-

तुझे सुरज कहूं या चंदा, तुझे दीप कहुं या तारा

मेरा नाम करेगा रोशन, जग में मेरा राज दुलारा

बाळाला झोपवताना आई अंगाई गाते, त्या अंगाईत एक कातरता असते, अज्ञात भविष्याची भीती असते, काळजी असते.

लिंबोणीच्या झाडामागे, चंद्र झोपला ग बाई

आज माझ्या पाडसाला, झोप का ग येत नाही.

अनेक व्रत करीत, वेगवेगळ्या अंगाया गात, आई बाळाला मोठा करते. बाळाच्या दूर जाण्याची, भिती आईच्या मनात नेहमी असते.देवाकडे ती स्वत:साठी काही मागत नाही, जे मागते ते, बाळासाठी मागते.

“देव जरी मज कधी भेटला, मग हवे ते मग म्हणाला,

म्हणेन प्रभू रे माझे सारे जीवन देई मम बाळाला.

हल्ली, सार्वजनिक लसीकरणामुळे, बालक वाढवण्यात, खूप सुलभता आली आहे. अन्यथा पूर्वी बालपणीच्या आजारपणाचे आणि बाळ मृत्यूचे प्रमाण खूप मोठे होते. बालकांच्या अकाल मृत्यू हरणासाठी, आई खूप व्रत वैकल्य करत असतेच (हल्ली हि करते)संतान गोपाल व्रत,

जिवतीचे शुक्रवार, पिठोरी अमावस्या, दत्ताचे गुरुवार, संकष्टी चतुर्थी, ईत्यादि.स्त्रीची सर्व व्रते बाळाच्या हितासाठीच असतात. बालकाचे वय बदलते, पण आई तीच असते. भाबडी. हळवी, बालकाची काळजी करणारी! अन्य कसलाही विचार न करणारी. राजमहालातल्या राजमातेच्या पोटी येणारं◌ा सम्राट असो किवा रस्त्याच्या कडेला बाळंत होतंय अशा एखाद्या अगतिक कष्टकरणीचे बाळ असो, आईच्या नजरेत ते सम्राट अशोक असते. देव देखील, बालक उद्दात हेतूने जन्माला घालतो.

With the birth of every child God shows that he is still hopeful about mankind.

आईला तर बालक हे आशापूर्तीचे प्रतिक वाटते. असेही म्हणतात. आई बाळाभोवतीच्या आसा भोवतीच आयुष्यभर फिरते.

God made mothers because he cannot be everywhere.

कॉंग्रेस पक्षाचे पूर्वीचे चिन्ह सुद्धा गाय वासरू म्हणजे मातृत्वाचे प्रतिक होते.

सपानोंके पार, परीयोंके देश में

जाना है तुझको मेरे लाडले

अशी स्वप्ने आई बाळाला दाखवते.प्रत्येक आई मात्रोश्री असते आणि आईच्या नजरेत, प्रत्येक बालक, सम्राट चक्रवर्ती असते. कुरळ्या जावळाचे, अर्धे टकले बाळ, आणि दुध पाजणारी आई, जगात स्वर्ग तिथेच असतो. बालकाचा आई प्रतीचा आदर बालक व्यक्त करतेच.

मेरी दुनिया है मां तेरे आचल में

शीतल छाया तू दुखभरे जीवन में

आईचे मात्र संपूर्ण विश्वच ते बालक असते. आई होणे हि एक कठोर तपस्या असते. बाळापासून दूर होताना खूप वेदना आईने सोसलेल्या असतात. बाळंतपण शब्दात “अंत” शब्द येतो. आई झाली कि स्त्री “आई” याच नात्यात सर्वस्व झोकून देते. तिच्यातली  शारीरिक संप्रेरके तशीच बनलेली असतात.

आई म्हणजे मंदिराचा उंच कळस

आई म्हणजे अंगणातील पवित्र तुळस

असे बालक म्हणतो, तर आई मात्र महाते, "मेरी पुरी दुनिया तू ही है”

" तू मिला तो मैने पाया जिने का नया सहारा”

आईला बाळाकडून ज्या अपेक्षा असतात, त्यात आईचा स्वार्थ नसतो. बाळाचे हित हीच अपेक्षा आईची असते. मातेचा भाव स्नेहाचा असतो.

"एकटाच मजशी तू उभ्या जगात लाडका, तूच दुःख सागरी उभावलीस द्वारका "असे तिला वाटते.

हळू हळू बाळ – कन्या अथवा पुत्र स्वतंत्रपणे वाढू  लागते. बालकाचे आयुष्यात बदल घडत असतात. नवनवीन व्यक्ती येतात. आई मात्र अजून आईपणातच गुंतलेली असते. मुल सत्तरीला आले, तरी आई, बाळयाला लहान समजून, त्या बालकाची काळजी करते. बाळाला त्याची स्वप्ने, त्याची नोकरी, नवे मित्र, जीवनसाथी, सासुरवाडीचे लोकं, ऑफिस मधील सहकारी, व्हॉट्सॉप ग्रुप, असे मोठे विश्व असते. आई मात्र आईपणाची, ती कालबाह्य, जीर्ण झूल घालून उभी राहते. दुखऱ्या गुढग्यांनी बाळामागे फरफटत असते. स्वतःच्या घरात, स्वतःच्या प्रश्नात गुंतलेल्या, मुलाला, आई बद्दल आदर असतो, पण सवड नसते. एकत्र कुटुंबात आई -मुल एकत्र राहत असले, तरीही, मुल आपल्या नव्या विश्वात रमलेले असते. पाणी पुढे वाहत असते.

आई वृद्ध होते, बालक तरुण होतो. बालकाला मागे वळून आईकडे धावणे, व्यवहार्य वाटत नाही. तो माय-लेक हा बंध, केवळ नावापुरता उरतो.

बालक आईबद्दल उदासीन होऊ लागते. मला वृद्धाश्रमातील आयांना बोलते केल्यावर जाणवते कि या आयांना, आपल्या मुलाबद्दल आकस नाही. मात्र सून अथवा जावई या मुळेच आम्हा दोघात अंतर आले अशी खंत आहे.

मग ताण नको, भांडणे नको म्हणून हळूहळू आई कालबाह्य ठरते. आईचे आजारपण, भूनकाळात रमणे, वृद्धत्व, जरामरणाची चर्चा, तरुण बालकाला नकोशी होते. बालकाची आई मधली गुंतवणूक कमी होऊन बालक अधीक उदासीन होते.

आईने कधी काळी बाळाला टणक व्हावे म्हणून रागावले, मारले असेल, अभावात ठेवले असेल, तर बालक ते आठवून नाराजी ठेवते. आई मला सर्व काही देऊ शकत होती, तरी तिने दिले नाही म्हणून कधी बाळ आकसाने वागतो. आईचा मात्र त्यात सद्हेतू असतो.बालकाला जीवन जगायला सक्षम करणे, लढून स्वकर्तृत्वावर कमाई करणे बालकाने शिकावे, हा आईचा हेतू असतो.

रामायणात माता कैकयी आहे, जी आई म्हणून दुष्ट मानली जाते. “माता न तू वैरिणी” असे म्हणणारा भरत, आजही गीतरामायणात दिसतो आहे. पण कैकयीने केलेला दुष्टावा, भरताच्या हितासाठी लढवलेली कैकयीची शक्कल असते. त्यात कैकयीचे आंधळे मातृप्रेम असते. वात्सल्य असते. महाभारतात डोळयाची पट्टी सोडून, दुः शासनावर नजर टाकून, पुत्र दुःशासनाला अमर करण्याची इच्छा बाळगणारी गांधारी आहे. सूतपुत्र कर्णासाठी, झुरणारी कुंती आहे. पुराणातील या कथा तर आहेतच, पण आपल्या माघारी मुलांचे हाल होवू नये म्हणून मुलांना पोटाशी बांधून मृत्यू समोर उडी मारणारी, आधुनिक स्त्री देखील दिसते आहे. आईच्या दुष्टाव्याच्या

कथा, ज्या आहेत, त्या बालकाच्या कल्याणाचा, आईचा हेतू दाखवतात. सर्व प्रसंगी, म्हणजे कायमच, आई बालक हिताचाच निर्णय घेऊ इच्छिते.

कुपुत्रा जायेत, क्वचीतपी कुमाता न भवेत.

मुले वाईट निघाली तरीही आई वाईट ठरत नाही. आई मुलांना कधी शिव्या शाप, बद दुवा देत नाही. मांजर दातात पकडून पिल्लांना नेते, पण ते दात पिल्लांना लागत नाहीत. पक्षीण नवजात पक्षांना उडण्यासाठी, घरट्यातून बाहेर, हलका धक्का देऊन ढकलते, कारण पक्षाने उडायला हवे. पक्षाचे आकाश मोठे आहे. हे आई जाणते. मुलांच्या भविष्यासाठी आई त्याग करते.

युद्धभूमीवर आपल्या मुलांना पाठवणारी आई, पोटासाठी परदेशी, परगावी जावे लागलेल्या मुलांची आई, दोन्ही आया आपल्या दूरवर परदेशी गेलेल्या, कर्तव्य पार पडत असलेल्या, मुलाचा विरह सोसत असतात. त्यात त्याग, बालकांचे, देशाचे मानवांचे हित असते. सणाला आईचे डोळे पाणावतात. विरह व्याकूळ आई बालकाला म्हणते,

लिंबलोण उतरू कशी असशी दूर लांब तू

इथून दृष्ट काढते निमिष एक थांब तू

बाळाचा लहानपणीचा पाळणा, लाकडी घोडा, तीन चाकाची सायकल, नंतरची दोन चाकाची स्कूटर, सायकल बाळाचे लहानपणीचे फोटो, बाळ लेणी, असंख्य आठवणी हाच तर आईचा खजिना असतो. स्त्रीजीवनाचा सर्वोत्तम पैलू मातृत्व, आईपणाचा असतो. कुठल्याच अन्य नात्याला आई- बालक या नात्याची सर येणे शक्य नाही. आईच्या बालकाप्रतीच्या भावाला, वात्सल्याला, जगात कुणीही नाव ठेऊ शकत नाही. आई-मुलाचा बंध मजबूत असतो. स्त्री जीवनातील सर्वोत्तम नाते आई -बालकांचेच असते.

बालका बद्दल व्याकुळता वाटो न वाटो आईला वाटतेच. बाळा तू जन्मलास तेव्हाच माझे मी पण संपले, मी फक्त आई झाले. मी फक्त आई रुपी उरले आहे.

आईचे मागणे देवाकडे असते.

शिवरायाच्या मागित शौर्या, कर्णाच्या घेऊन औदार्या

ध्रुव चीलयाच्या अभंग प्रेमा, लाभू दे चिमण्या राजाला.

स्त्री जीवनाची हीच कहाणी, पदराआड दुध डोळयामध्ये पाणी.

******************

# 9 नाणी अर्पण

आपण समुद्रात अथवा नदीत पैशाची नाणी का टाकतो?तीर्थक्षेत्री तलावात नाणी टाकली जातात. परदेशातील ट्रेव्ही फाऊंटेन या ठिकाणी देखील पाण्यात नाणी टाकतात, असे मला बहीणीने सांगितल्या मुळे मी विचार करु लागले जलाशयात नाणी का टाकतात?

जिज्ञासा असते, जसे अतः जे कुठे मावत नाही ते जाणण्यासाठी पर्यटनाला जायचे असते. निगेटिव्हीटी आली म्हणून नव्हे. वैराग्य मार्गावर संकटी, वैराग्याकडे एकटेच जावे लागते. या मार्गावर‘स्व’ कळते. परमार्थाचे मधुर आम खायचे तर वेळ यावी लागते. यमनियम आसन प्राणायाम करावे. चुकीच्या सवयी सोडायला हव्या.अतः योग अनुशासनम्

खोजियो तुम नहीं मानोगे

श्रीमंत लोक दौलतजादा करताना नाणी फेकतात, बाकी पैसे फेकणे, हे तर आपण लक्ष्मीचा अपमान मानतो, मग नाणी फेकणे का बरे सुरु झाले असावे. लक्ष्मीच्या कलशातून नाणी पडत असतात जे समृद्धीचे लक्षण असते.त्यामुळे?

देवदर्शनाला गेल्यावर देवळाजवळील तलाव, नद्यांची पात्रे, ओढे यात नाणी टाकण्याची भारतीय धर्म परंपरा आहे. परकीय देशात समुद्रात अथवा धबधब्यात नाणी टाकली जातात.

नदी ही देवी मानली जाते आणि नदीच्या पात्रात नाणे टाकल्यास नदी आपली इच्छा पूर्ण करेल असे मानवाला वाटते. नदीच्या वरीस पूलावरुन जेव्हा ट्रेन जाते, त्यावेळी प्रवासी तत्पूर्वी हातात काढून ठेवलेली नाणी, नदीत टाकतात.

अगदी पुरातन काळातील नाणी अशा प्रकारे नदी पात्रात साठवली गेली आहेत आणि इथे यापूर्वी आलेल्या पर्यटकांच्याबद्दल माहिती, त्यांचे देशाची ओळख सांगतात. दुर्मिळ नाण्यांवरुन या गोष्टी कळतात. अशी दुर्मिळ नाणी, धातूची, असल्यामुळे खराब होत नाहीत. गरजेला गरिबाला पोटापाण्याला, उपयोगी पडतात.कधी, दुर्मिळ असल्यास संग्रह करणार्यांमुळे, लाखो रुपयांना विकली जातात. मानव वंशाच्या समृद्ध वारशाचे रुप, ही जुनी नाणी आहेत.के. सी.ई.चंद्रशेखरराव तेलंगणाचे मुख्यमंत्री, यांनी नदीत नाणी फेकून राज्याच्या भरभराटीची इच्छा व्यक्त केली, असे करतानाचा फोटो आहे.

गोदावरी, गंगा, कावेरी अशा मातारुप, नदीपाशी, गाडी येताच ज्येष्ठ नागरिक सांगत, नदी जवळ येतेय नाणी काढून ठेवा,

विशिष्ट इच्छाधारी व्यक्ती, अथवा दृष्ट लागली आहे, असे समजणारे लोक नाणी फेकतात.यात, अतृप्त इच्छा नदी पूर्ण करो ही श्रद्धा आहे, जणू काही नाणी टाकून नदी देवतेशी फोन लागणार आहे. शास्त्रीय दृष्ट्या, नाणी, असे coin तांबे धातूचे असते, तांबे जल स्वच्छ करते, त्यामुळे या कृतीत, जमीनीतील पाणी धातूमय व आरोग्यदायी व्हावे हा हेतू असे. पंड्या लोक नदीत अंघोळ केल्यावर नदीत नाणी टाका म्हणतात .नदीत/वाटेत मृतदेह दिसल्यास नाणी उधळली जातात. पोटासाठी ही नाणी गोरगरीब नदीत उडी मारून, नदीतून काढतात. नदीला माता मानून ती आपल्या अल्पभेटीने संतुष्ट होईल असे मानले जाते.अशाच हेतू व्यक्त करणारी ही प्रथा जर्मनी इंग्लंड मध्येही आहे. रोमच्या ट्रेव्ही फाउंटेनमध्ये देखील अशी नाणी फेकतात.(तांब्याची नाणी)

फारपूर्वी जलप्रवास सोपा नव्हता. नदीला पूर आला, समुद्र खवळला की जलसमाधी मिळे म्हणून नातेवाईक नाणी टाकून रक्षणाची भीक मागत.

तांब्याची नाणी टाकली की पाणी आरोग्यदायी बनते. जलात नाणी टाकणे म्हणजे आवळा देऊन कोहळा काढणे, अशी कल्पना आहे. मानव आपल्या स्वार्थासाठी ज करतो, जे विविध क्लुप्त्या लढवतो त्यातली ही श्रद्धा आहे, ही चतुराई आहे?

काळ बदलला, पण पाण्यात नाणी फेकणे अजूनही चालू आहे.

विशेष टीपः सुट्टी नाणी नेहमी जवळ ठेवावी, चहा, पाणी, फळ, खरेदी, टीप्स, भिकाऱ्याला देणे अशा कारणासाठी उपयोगी पडतात.

***********

# १०आनंदाची खरेदी

खरेदी करणे हा म्हणे, एक मानसिक आनंद देणारा चांगला प्रकार आहे.

नंबर एकवरचाstress buster नाही पण उपयोगी उपाय आहे.

हल्ली पुरुष व स्त्री या दोघांनाही खरेदी करायला आवडते. पूर्वी स्त्रियांच्या खरेदीची खूप टर्र उडवली जाई. पावसाळी खरेदीला पळणाऱ्या बायका, सेल मधल्या रद्दीवस्तू, ही विनोदाची विषयवस्तू होती. हल्ली पुरुष सुद्धा खरेदीत रमले गेले आहे.

घरात भांडण झाले, बाजारात जा, मॉल मध्ये जा खरेदी करा. मनोवैज्ञानिकांनूसार प्रेमाचा अभाव भरुन काढण्यासाठी बायका खरेदी करतात आणि त्या वस्तू साठवून ठेवतात.(शॉपिंग अण्ड हॅन्डलिंगhoarding ) या खरेदीत पुस्तके, कपडे, दागिने, चपला, सौंदर्य प्रसाधने, पर्सेस, शोभेच्या वस्त, चादर, पडदे अशा नऊ वस्तूंवर भर असतो.मानवी मनातील पोकळी भरायला बायका खरेदी करतात. श्रीमंत बायका दुपारी कळपाने खरेदीला जातात व अनावश्यक गोेष्टी गोळा करतात. दोज हू से मनी कॅनॉट बाय हॅप्पीनेस डू नॉट नो व्हेअर टू शॉप.

रस्त्यावरच्या वस्तू, फॅशन स्ट्रीट, मॉल्स, ऑनलाईन शॉपिंग सर्व ठिकाणी खरेदी करणे, या बायकांना आवडते. काही जणींनी भावाची घासाघीस करायला फार आवडते तर काही जणी फीक्स रेट शॉपमध्ये जातात. खरेदीसाठी आलेल्या व्यक्तिला खूश केले, तर ती अधिक खरेदी करते. यात दुकानदाराचा धंदा व कमाई होते, खरेदीदाराला आनंद मिळतो, मग स्वतःसाठी नाही, तर, अन्य कुणाला भेट द्यायला होईल म्हणून देखील खरेदी होते.

काही जणांना मॉलचे वातावरण आवडते, एसी असतो, पॉश माणसे बघायला मिळतात, फिलगुड (चांगले) वाटते, म्हणून उगीचच ते मॉलमध्ये चक्कर टाकतात. उगीच

टाईमपास म्हणून बाजारात चक्कर मारणारे ग्राहक असतात. निदान तिथे ते खादाडी करुन परत येतात. आदर्श आयुष्य, इतरांना हेवा वाटावा, अशी राहणी कशी असावी? तर गाडी- खादाडी - खरेदी असा समज, आज समाजातील काहींचा असतो, काहींचे मते परफेक्ट आयुष्य तसे मानले जाते.

या खरेदीदारांना बहुतांश हेल्थ हॅपिनेस अन्ड मनी हवे असतो. तरुण रहावे, वाटणारी मंडळी महागडी सौंदर्य प्रसाधने खरेदी करताना दिसतात .खूप जगावे असे वाटते ते आरोग्य पुरवणी औषधे घेतात. आपण स्मार्ट असावे, गावठी नको असे लोक खरेदीला ध्येय मानतात.जाहिरातीला भुलतात.

आपण चंगळवादाकडे झुकतोय, असा आरोप झाला तरी आनंदी राहण्याचा मार्ग, जर इतका सोप्पा असेल, तर, कधीतरी, जमले तर, खरेदी करून बघावी.

चला खरेदी करुया.

*******************

# ११ पाऊस खुळा

मला खुणावते पाऊसवेळा. पावसात माझी प्रतिभा खूप बहरते. पावसात उघड्या माळावर, मळयावर, माझ्या मनावरनेहमी वेगवेगळया कल्पनांचा वर्षाव होतो.

1) घराबाहेर पडता येत नाही. त्यावेळी घरातला टाईमपास मी करते, मी पावसात पावसाळी चित्रे काढते. खिडकीच्या काचेवर दिसणाऱ्या आकृत्या, आकाशातील ढग, झाडांवरचे अर्धे ऊन, नागडा पाऊस, मोत्यासारखे चमकणारे पाऊस थेंब, इंद्र धनु रंगवते. कुंड्या, जुने कपड रंगवतेे क्रेऑन्सने छान जमते व  त्यांचा खर्चही जास्ती नसतो.

2) कागदी नावा बनवून पाण्यात सोडते. ईतरांनाही ते बनवायला, होडी करायला शिकवते. बुडणाऱ्या नावेतला आनंद मी जाणते.

3) हात दूर पसरुन, अंगणात विहार करुन पावसाचा थेंब न् थेंब शरीरात भिनतो.

4) पावसाचे फोटो काढते.

5) पावसाळी गाणी ऐकते.

6) पावसात साधारणतः उदास एकाकी वाटते. कारण सूर्यप्रकाश नसतो. मग मित्र/मैत्रिणींसाठी वडापाव, भजी, चहा पार्टी ठेवते.

7) पावसाळी सहल काढते.

8) छत्र्यांवर कॅमलिन रंगांनी चित्र काढते.

9) पानांवर टिबकणारे पाणी, ओरडणारे बेडूक, किलबिलणारे पक्षी, मोराचा केकारव कान देवून ऐकते. पावसाळ्यातले आवाज मोबाईलवर टेप करते. डोळ्यांनी, कानांनी, त्वचेने मी पाऊस टिपते. टिपकागदासारखी पाऊसवेळा टिपते, शोषते. नाकाने पावसाळी वास, मृदगंधित हवा श्वासात भरते, पहिल्या पावसाचा वेगळा मृदगंध मनात साठवते.

पाऊसवेळा मला नेहमीच संदेश देतो, वेळ कशीही, कधीही असो, ओलावा टिपत राहा, अंकुर येवू देत जा, हिरवे होण्यासाठीचा क्षण कधीही संपलेला नसतो. एका पावशा पक्ष्याची कथा आहे. तो फक्त पावसाचे पाणी पिवून वर्षभर जिवंत राहतो. तुम्ही ही पाऊस पिवून बघा. कदाचित जीवनरस, उर्जा व उमेद देण्याची अपार शक्ती पाऊसच देईल.

पाऊस म्हणजे मित्र

पाऊस म्हणजे प्रेमपत्र

छत्रीत भिजवणारा

बरसणारे नेत्र

पाऊस म्हणजे जीवनसूत्र

पाऊस म्हणजे नवे सत्र!

पाउसवेळा, म्हणजे नवी सुरुवात

********************

# 12जुन्नरचा, हांडे देशमुखांचा वाडा

सहलींसाठी प्रसिध्द असा निसर्गरम्य माळशेज घाट, क्षेत्र शिवनेरी - छत्रपती शिवाजी महाराजांचे जन्मस्थान, असे गाव म्हणून जुन्नर प्रसिद्ध आहे. अंबालिका गुंफा, लेण्याद्रीचा गणपती, वडुजचा कुलस्वामी - खंडोबा, अोझरचा विघ्नेश्वर ही ठिकाणंही जुन्नरच्या आसपासच आहेत. मात्र माझी मोठी बहीण, जुन्नरला, लग्नानंतर राहिली होती, त्यामुळे सुट्टीत जुन्नरला, आम्ही भावंड वारंवार जात असू. कलाकार अशोक हांडे आमचे गावपाहुणे लागतात.

अशा या जुन्नर मधील, शतकोत्तर जुन्या, हांडे देशमुखांच्या वाड्याबद्दल, मी आज सांगणार आहे. बुधवार पेठेत, वैजनाथ मंदिराजवळील, मुख्य प्रवेशद्वारातून आत, तिथे वाड्यात प्रवेश करताच, लिंबू, लिंबोळी व संत्र्याचे पानांचा मंद सुगंध येतो. मिलिंद बोकिल यांच्या ‘गवत्या’ कादंबरीतील डोंगरांचे वर्णन, नवनाथ गुंफेचे वर्णन, जुन्नरच्या परिसराला, टेकड्यांना तंतोतंत लागू पडते. जुन्नरमध्ये उड्डाणपुलांचे, भुयारीमार्गांचे जाळे अजूनतरी नाही. गावात सर्वत्र एकाच उंचीवर आपण वावरतो. रस्त्याने बसने जा, गाडीने जा, अथवा बैलगाडीने, मजा येते. रस्त्याचे दुतर्फा,  आपले सोबत येणारी, हिरवी शेते, मचाण, गवताच्या गंज्या, शेतातील बुजगावणी, टुमदार घरे सुबक ठेंगणी आहेत. मुंबईत फळे टोपलीत बघणाऱ्या माझ्या, मुलाने जुन्नर इथेच फळांनी लगडलेली झाडे प्रथमच पाहिली होती.

शौर्याचे स्मरण

श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराजांच्या, पवित्र पाऊलखुणांमुळे, जुन्नर शौर्याचे गाव वाटते. कै. कृष्णराव हांडे देशमुखांचे, वाड्याचे मूळ वंशज, मराठा सरदार भोसलेंचे समकालीन होते. हुषार होते. त्यांचाच वारसा सध्याच्या पिढीत आला आहे. एका तैलचित्रानुसार हांडे देशमुख आजोबा, उंचेपुरे आणि रुबाबदार होते. त्यांच्या हातातील लाकडी काठीवर कोरीव काम असलेली टोकदार नागनक्षी होती.

शिवाजी टॉकिज

जुन्नरला शिवाजी थिएटर हे चित्रपट गृह, अंदाजे शंभर वर्षापूर्वी, हांडे देशमुखांनी बांधले. देशमुख साहेबांनी, बदलत्या काळची पावले अोळखून, दूरदृष्टीने आधी तेथे नाटकाचा रंगमंच सुरु केला. तेथे संगीत नाटके होता होता, नंतर मूक सिनेमाही दाखवला गेला. नंतर आता बोलपट ही या शिवाजी थिएटरात लोकांनी पाहिले. या चित्रपटगृहात, दस्तुरखुद्द बालगंधर्वांनी प्रयोग केल्याचेही बुजुर्ग सांगतात. पुणे जिल्ह्यातील ही दुसरी टॉकिज आहे.पुण्यातील आर्यन ही पहिली होती, तिचा आता पुनर्विकास चालू आहे.जुन्नर मध्ये, आधुनिक ममता टॉकिज खुप नंतर बांधली गेली आहे.

वाडा

आता आधुनिक बदल केलेला, वाडा आहे.आज जुन्नर शहरात बरेच बंगले आणि फ्लॅट स्कीमदेखील आल्या आहेत, मात्र हा हांडे देशमुख वाडा, सामाजिक बदल बघत, निशब्दपणे, पण स्थिर उभा आहे. सुशांत, दुमजली अशा या वाड्यात, वरच्या मजल्यावर तिन प्रशस्त दालनं व खालील मजल्यावर चार दालनं आहेत. मोठे स्वयंपाकघर आहे. या मुख्य घराच्या मागे, आउटहाउस आहे. वाड्यात, जुन्या काळचे लाकडी प्रशस्त पलंग, प्रसाधन टेबल, जुने फर्निचर आहे. ईतक्या वर्षानंतर तुट-फुट स्वाभाविक असते.इतिहासाचा वारसा सांगणारे असे, या वाड्याच्या आवारात बरेच काही आहे. तुरळक अशी तुटक भिंत, फूट असलेली तटबंदी, दगडी भिंती, काळे कातळ, जमिनीत सापडणाऱ्या शीळा, मातीची भांडी, जुन्नरमध्ये बऱ्याच ठिकाणी सापडतात. हा वाडा बांधणारे कै हांडे, हे छत्रपती शिवाजी महाराजांचे वडील शहाजीराजे भोसले यांच्या सैन्यात होते.

चौकोनी विहिर

वाड्याच्या आवारातील, जागेतील, बागेमध्ये ४० फूट बाजूची, आयताकृति, स्वच्छ गोड पाण्याची दगडी विहिर आहे. या विहिरिवर, वर्तुळ षटकोन यांची झकास नक्षी आणि त्यातून पुराण कथा, दंत कथा सांगणारी देवीची मुर्ती बरीच वर्षे तेथे होती. आता पडझड झाली आहे.जुन्या काळी डबे बांधून पोहोणे शिकायला मुली येथे जमत. मुले नदीवर पोहायला जात. मुली इथे येत.(सैराटमध्ये मुली, विहिरित पोहतात, असे दाखवले आहे, आम्ही १९७० साली या विहिरित पोहायचो.)

बाग

बागेमध्ये छानशी बंगळी आहे. हिरव्यागार बागेत, वर नमूद केलेले लिंब, लिंबोळी, संत्री, तसेच शेवगा, नारळ, सिताफळ, आंबे, जांभूळ, पेरु, जाम अशी फळझाडे आणि अनेक फूलझाडे आहेत. कुंड्यांमधली लहान सहान रोपे, मोगरेही सुंदर आहेत. दर वर्षी या बाग सौंदर्यात भरच पडते आहे.

पक्षी देवांची नक्षी

या बागेत रोज, रजा न घेता, चुबुक डुबुक पक्षी, भारद्वाज, कोकीळ, मैना, हळद्या, पोपट, धोबी, तांबट असे अनेक पक्षी येतात. पहाटे उठण्यासाठी, घड्याळाचा आलार्म लावायची गरज नाही. भारद्वाजच्या हूक, हूक आवाजाने, वटवट्या बूलबूलच्या गाण्याने जाग येते. नारळाचे झाडावर बुलबुल, घारी येतात.चिमण्या पूर्वी तर खुप येत असत.हांडे देशमुखांचे वाड्यात संध्याकाळ गारेगार असते, नवरंगी रंगात नाहाते, झाडाचे शेंड्यांवर सोने अोतते.जुन्नरचि हवा छान आहे

परंपरा

घरात अनेक पितळी समया आहेत, लामण दिवे, तांब्याची घंगाळी, पितळी हांडे आहेत. कोणी आजारी पडलं तर, कपिला गाईचं दूध आणि गवती चहाचा उकाळा, विहिरीचे

पाणी हेच अौषध अधिक उपयोगी ठरते. अंगणातील तुळशी वृंदावनात, सांजवेळी तेलवात लावली जाते. घरात शुभं करोतीचे स्वर गुंजतात. पडवीत आजी नातवंड, पतवंडाना गोष्टी सांगतात.

आतिथ्य : हसऱ्या आनंदी घरी रात्री जेवायला, झीटीव्हीफेम अशी जुन्नरची झणझणीत मिसळ बनवली जाते. घरचे गृहस्थ, येणाऱ्या फोटो स्टुडिअोचे कामातून, वेळ काढून पाहुण्यांसोबत बसतात. वडुजचा खंडोबा, शिवनेरी, लेण्याद्री, अोझरचा विघ्नेश्वर, निमदरीचे रेणुकादेवीचे मंदिर येथे जातात.लेण्याद्रीला तर मी उंच चढण अवघड जाते म्हणून  डोली करुन जाते छत्रपती शिवाजी महाराजांचा रुबाबदार पुतळा, तैलचित्र घरी अाहे. देवादिकांबरोबर या महा दैवताचेही पूजन केले जाते. खंडेनवमी, नवरात्री, दिवाळी, गणपती, खास मराठमोळी संस्कृती जपायचा प्रयत्न देशमुखांकडे होतो.

या हांडे देशमुखांचे वाड्यात, आलेल्या, ज्ञात व्यक्तींसाठी, कुंकवाच्या बोटाला, चहाच्या घोटाला आणि जेवणाच्या ताटाला हे घर नेहमी तत्पर असते.

श्री वैजनाथ मंदिर

जुन्या काळी घरच्या स्त्रियांना पूजा करता यावी म्हणून, बागेत उघडणारे, शंकराचे, श्री वैजनाथ मंदिर आहे.या मंदिराचे दार बागेत उघडते आहे. या मंदिराचे दुसरे दार, बुधवार पेठेतील रस्त्यावर उघडते व भक्तांसाठी वापरले जाते. श्री वैजनाथ मंदिरातील शिवशंभो नवसाला पावतो असे म्हणतात.

किती पायी लागू तुझ्या, किती आळवू शंभूते।

किती शब्द बनवू गे, अब्द, अब्द मनी येते।।

# 1३जुन्या काळचे खेळ

आमच्या त्या काळी, माणसांना टी.व्ही. चे वेड नव्हते, मोबाईलचे, आभासी खेळांचे वेड, विविध व्यसने नव्हती. त्या वेळी अतिशय छान, बुद्धीला चालना देणारे खेळ, खेळले जात. खेळ जमा करणारे, खेळणारे खेळाडू असे खेळ नेहमी जमवतात.

या जुन्या खेळांची माहिती बोर्डवर लिहून, सोंगट्या बनवून, कलिनाला भरलेले प्रदर्शन मी नुकतेच पाहिले. "कहत कबीर सुनो भाई साधू" म्हणत पूर्वीच्या बुद्धिमान लोकांचे खेळले गेलेले खेळ, इथे बघायला मिळाले."मोको कहाँ ढूंढे रे बंदे" अशी कबीरची रचना आहे. शोधून सापडणार नाही असे खेळ होेते.अडकलेल्यांना मदतीचा हात देणाऱ्यात देव असतो, असे खेळातील देव बघितले.  पोथी पढके कोई न पंडित होय,  ढाई अक्षर प्रेम के पढे तो पंडित होय।दुनिया जग दर्शन का है मेला, जग बघावे लागते.

१।सापशिडी, मोक्षपट्टम/ पळंगुडी, ग्यान-चौपाल ह्या खेळात, पटावर ८४ घरे असतात. हा खेळ ज्ञान व नीती शिकवतो.

२।वाघ बकरी चौपाल- बाघ चाळ (नेपाळ) ३ ते ५ वाघाचे बिल्ले व १७, २१, २४ बकरीचे बिल्ले घेऊन हा खेळ खेळला जातो. बकरीला वाघ खातो विशेषतः जवळपासच्या बकर्यांना! ही खेळपद्धती सोपी आहे, पण शिकावी लागते.मजा येते,  जीवनातील विविध प्रसंगांना तोंड द्यायला, हे खेळ शिकवतात. गणित शिकायला, व्यापार शिकायला मदत करतात.  आजचे virtual games, video games, हे या मूळ पुरातन खेळांचेच सुधारित रूप आहे.

३।नवकंकरी(महाराष्ट्र)-  ३X३=९ घरे असलेला हा खेळ दोन व्यक्ती खेळतात. wiremen’s moris या युरोपियन (रोमन) खेळासारखा हा आहे.जोडपी आता. असे (कन्नड) नाव आहे. गुजरात मध्ये नवकंकरी म्हणतात.

४।मिकाडू काचपाणी- दोन रंगी बांगडीच्या काचांवर, मजेत खेळले जाते. व्यापार sequence, हे आधुनिक रूप या खेळातील रंजक रूप आहे. अली गुली माने (कन्नड), पलंगुडी (तामिळ) मध्ये, चिंचेच्या बियांनी म्हणजे चिंचोक्यांनी, सागरगोट्यांनी हा खेळ खेळला जातो. श्रीलंकेत सीतेने हा खेळ खेळला, अशी वदंता आहे. ७/७ घरे एकूण १४ घरे असतात, सातव्या घरात बी रूजवणे हे तत्व असते.

५।अष्टपद- ८X४ अशी ३२ घरे असलेल्या, चौकटीवर हा खेळ खेळतात. मध्ये किल्ला व खेळघर, आराम असतो. फुलीच्या आकाराचा हा सारीपाट असतो.विणलेला देखील असतो.

पचीसी- ५X५ अशी २५ घरे असलेल्या, या खेळाला चौपाल/सारीपाट/पचीसी असे म्हटले जाते. ल्युडो सारखा, दोन ते चार व्यक्ती खेळतील, असा हा खेळ आहे. अकबर राजाच्या फतेपूर सिक्रीच्या कोर्टात, हा खेळ खेळला जात असे असे गाईड सांगतो. महाभारतात या खेळाचा उल्लेख आहे.

हे सर्व खेळ करमणुकीसाठी आहेत.कुठल्याही खेळात पैसे लावून खेळू नये, खेळाचे व्यसन लावून घेऊ नये.

खेळात मन रमवावे

************

# १४विवाहे नातिचरामि

“समाजात, घटस्फोटाचे प्रमाण फार वाढलेय” असे कुटुंब न्यायालयाचे संशोधन हल्ली सांगते. समाजात, भविष्य स्वतंत्रपणे जगायची इच्छा, वैवाहिक जीवनातील सुरक्षेपेक्षा प्रिय वाटू लागली आहे. “धर्मे च अर्थे च नातिचरामि” अशी ती संकल्पना, आजच्या पिढीत, या आधुनिक काळात, कालबाह्य वाटू लागली आहे. घटस्फोट पूर्वीसुद्धा होत होते. घटस्फोटिता, म्हणजे नवऱ्याजवळ न राहु शकणारी, स्त्री अशी एक संकल्पना त्या काळी होती.

१) विवाह कायदाः १९५५ सालचा हिंदू विवाह कायदा व त्याच्या पुढच्या सुधारणा घटस्फोटाच्या परिणामांचे स्त्रियांच्या जीवनावर होणारे परिणाम जाणून घ्यायला कुठेतरी कमी पडला. समाजाने घटस्फोटित स्त्रियांना, एक प्रकारे वाळीतच टाकले होते. घटस्फोटाने जखमी न झालेली स्त्री विरळाच असते. पुरूषप्रधान संस्कृतीत, पुरूष घटस्फोटातून पुनर्विवाहाच्या दिशेने सहज चालतो. स्त्री मात्र लढत सोसत राहते. पुनर्विवाहासाठी देखील घटस्फोटितेला, बीजवर, वयस्कर, व्यंग असलेला, मुले असलेला वयस्कर स्विकारावा, अशी बळजबरी होत असते.

२) रहायचे कुठे?- नवरा सोडून घटस्फोटितेला रहायचे कुठे, ही भीती कायम वाटते. मुले सांभाळणे, नोकरी असुरक्षितता, भविष्याची भीती, काळजी, घटस्फोटाच्या जखमा, लग्न न टिकवू शकल्याची खंत, स्त्रीला सतावत राहते. पुनर्विवाह हा तर पर्याय ताबडतोब कधीच नसतो. ८०% स्त्रिया काही काळ माहेरी राहतात. कारण स्वतंत्र राहणे अवघडच असते.

३) भावनिक आधारः घरचे, दारचे, मित्र मैत्रिणी, भावनिक आधार द्यायला कचरतात. जे असा आधार देतात, ते “फायदा काढतील” अशीही भीती, घटस्फोटितेला घालण्यात येते. घरवाघे, दारवाघे, भुंकून टीका करून, हैराण करतात.

४) पैसाः आर्थिक स्वातंत्र्यानंतर, सुद्धा घटस्फोटितेला वगळले जाते. तर आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र नसलेल्या स्त्रिया बऱ्याचदा पुन्हा त्या त्रासदायक नवरा-सासर या वर्तुळात जातात. कधी कधी, नाईलाजाने काहीजणी  आत्महत्या करतात व प्रश्न सोडवतात.

५) मनाची तयारीः घटस्फोटासाठी मनाची तयारी केलेली असली, तरी अनपेक्षित विघ्ने, अक्राळविक्राळ तोंड करून सामोरी येतात. घटस्फोट म्हणजे मनावरचा बॉम्बहल्ला असतो. स्त्रीच्या दुःखाला, तिचे स्वतःचे हळवे मनच जबाबदार असते. काटे तर सर्वत्र असतात.

पुनर्विवाह सोपे नसतात. For second marriage you get secondhand quality, असे सांगतात

६) माहेरची मदतःस्त्रीचा दोष नसला, तरी माहेर मदत करतेच असे नाही. सासरी एवढा त्रास प्रत्येकच स्त्रीला होतो, तिथेच रहा, तडजोड कर, असा सल्ला माहेरी दिला जातो. समाजाची भीती, अडनिड वय, आर्थिक परावलंबत्व, माहेरची सवय या कारणाने घटस्फोटितेचा माहेरी राहण्याकडे कल असतो. आधार देतो सांगून, आधार नाकारणारी माहेरघरे पण आहेत. माहेरी देखील, कधी वाईट अनुभव येतात. मुलीचा घटस्फोट झालाय, हे माहेरच्या लोकांना लाजिरवाणे वाटते. “तू मेली का नाहीस सासरी?” असेही बोलले जाते. “नवरा परदेशी गेलाय, नवऱ्याची बदली झालीय, तिची तब्येत बरी नाही, तिला पुढे शिकायचेय” अशा खोट्या सबबी परतलेलि बद्दल माहेरचे सांगतात. पण समाजातील, भोचक, रिकामटेकड्या, बायका बरोबर जाणतात, घटस्फोटितेवर टीका करतात. घरात घटस्फोटित स्त्री मोलकरीण बनली, तरीही सुनांना, (वहिनींना), भावाला, आय़ांना, कुणा एकाला ती नको असते.

७) टीकाः “हिच्या आळशी स्वभावाने, रागाने, अतिविचाराने घटस्फोट झाला असेल” असे तिचे खच्चीकरण केले जाते. “मूर्ख पुरूष देखील हुशार स्त्रीपेक्षा श्रेष्ठच असतो” असा

समाजात विचार असतो. “ती नकोशी होती, म्हणून सोडली” असे बोलून नवऱ्याकडे राहणाऱ्या, अन्य स्त्रिया नवऱ्याकडून परत आलेल्या स्त्रीला दुखावतात.

वास्तवात, कधीही, कोणतीही, श्रीदेवी, हेमा मालिनी, त्या घटस्फोटितेला दुखावणाऱ्या विवाहितांना देखील, कधीही घराबाहेर काढू शकते.विवाह हा नशिबाचा भाग आहे हे इतर बायका विसरतात. समाजातील वाढते Infidelity & Extra marital relations चे प्रमाण इंटरनेटवर व बातम्यांवरून कळते.

८) घरखर्चावर भारः घटस्फोटितेच्या रूपाने, घरखर्चावर भार आला, असे मानले जाते. आमचा मौजमजेचा पैसा, ह्या घटस्फोटितेला सांभाळण्यात, खर्च होतो, असे मानले जाते. थोडे-फार पैसे दिले, तरीही समाधान होत नसते. “राणीसाहिबा नवरा सोबत राहात नाही, पगार कमवत नाही, तर चांगले चुंगले कशाला खाते?” असा प्रश्न असतो.

९) मुलेः नवऱ्याशी पटत नव्हते, तर मुले कशाला होऊ दिली? आता हिच्यासोबत, त्या मुलांचा पोरवाडा, ते लोढणे सांभाळावे लागते, असा भावांचा, नातेवाईकांचा मनोभाव असतो. कधी घटस्फोटितेच्या मुलांना, उरलेसुरले अन्न दिले जाते. घरासाठी पैसे हवे म्हणून नोकरीवर जाणाऱ्या स्त्रीला, घरी वेळ कमी मिळतो. “ही बया नटून नोकरीवर जाते, हा पोरवाडा माझ्यावर सोडून जाते” अशी टीका होते. हल्ली तर वृद्ध आया/बापांना, सासवांना देखील, मूल सांभाळायला नको असते. “नातिचरामि” खरे तर आज सर्व समाजालाच लागू आहे.

१०) गुप्त वेदनाः माहेरी देखील फार स्वागत होत नाही, हे जाणूनही घटस्फोटिता ते गुप्त ठेवते व गुप्त वेदना सोसते. “परत सासरी जा, नवऱ्याला भेट, ९० टक्के लग्ने तडजोडीनेच चालतात” असा सल्ला सतत बाईला दिला जातो. “नवऱ्याकडे नसेल जायचे तर वेगळी रहा” अशी धमकी दिली जाते. मानवी नातेसंबंध विचित्र असतात. ही घरची माणसेच, त्या घटस्फोटितेबद्दल,

बरेवाईट सांगत फिरतात. घटस्फोटितेच्या प्रश्नांकडे समाजाचे कायम दुर्लक्ष होते. मुलांच्या संवर्धनात आईवडिलांचा असे दोन्ही रोल ही बाई करते, पण ती टिकेचि धनी हि होते.

११) घर भाड्याचेः भाड्याचे घर शोधणे, या घटस्फोटितेला अवघड असते. घरभाडे मोठे असते. चांगल्या भागात जवळपास घर घेणे, शक्य नसते. एकट्या स्त्रीचे घर भाड्याने घेणे संशयाने बघितले जाते. विधवांना सहानूभुती मिळते, पण घटस्फोटितेकडे संशयाने बघितले जाते. “हिच्याकडे अशी तशी माणसे येतील” असे घरचेच बोलतात. “पुढे पैसे देऊ शकाल की नाही” अशी विचारणा व विचार होतो. जणू काही नवरा घरी असणे, ही बाईच्या चांगल्या वागण्याची व पैसे नियमित मिळण्याची हमी आहे.पगाराचे साधन आहे, खात्री आहे.

१२) संशय आहेः एकटी बाई काय करते, संशयच आहे, असे म्हटले जाते. Men look such a woman with anticipation and women look such a woman with suspicion. अशा वेळी पहिला संशय, बाईच्या चारित्र्यावर घेतला जातो. विधवा देखील एकाकी असते.पण सहानुभूति मिळून बिचारी ठरते, मात्र घटस्फोटिता बऱ्याचदा आगाऊ मानली जाते.

१३) भाऊ अथवा वडील-काकाः यापैकी कुणी पुरूष घटस्फोटितेबरोबर, भाड्याचे घर घेताना यावा असे बाईला आशेने वाटते, पण असे शक्य होत नसते.

विवाहीत स्त्री, घटस्फोटितेला मैत्री करून, घरात Access देत नाही, कारण त्या विवाहीतेचा, स्वतःच्या नवऱ्यावर विश्वास नसतो. पुरूषांना वाटते “ही बाई सहज मिळेल, या घटस्फोटितेला शारीरिक गरज असेल” मजा करता यावी या स्वार्थापायी काही वाकुटे पुरूष मग घिरट्या घालायला लागतात.

१४) ऑफिसातील मित्र येतील अशी भिती घरच्यांना वाटते.घटस्फोटिता ही प्रसंगाची बळी असते. तिच्याकडे साफ नजरेने बघावे.पण कधी कधी मदत हवी म्हणून, तुरळक

भेटीसाठी किंवा अन्य कारणाने ऑफिसातील मित्राच्या जवळ घटस्फोटिता जावू शकतात. हे नाते अ ौपचारिक ठेवण्या ईतकी घटस्फोटिता सूज्ञ असते.

१५)समाजाला भिति वाटते की, ऑफिसातील मित्राला, या नव्या स्त्रीमध्ये पत्नीपेक्षा अधिक रस निर्माण होऊ शकतो. एखादा या घटस्फोटितेच्या, मुलांना सल्ला देण्याचे निमित्त करतो व बंध जोडतो. हा पुरूष घटस्फोटितेला मदत करतोच असे नाही पण स्वतःच्या पत्नीला बेघर करतो. नवीन घटस्फोटिता जन्मास येवू शकते.

१६)पूर्वी घटस्फोटितांवर केलेली टीका जहाल होती.आता समाज या स्त्रीकडे नव घटस्फोटितेकडे ठीक पाहतो.प्रश्नाशी लढणाऱ्या एकल स्त्रीला शक्य ती मदत करा, निदान दुखवू नका.

आज अनेक वर्षांनी पण घटस्फोटितांचे प्रश्न सुटत नाहीत.समाजाने वैवाहिक, विषमवादाचा बळी ठरलेल्या, स्त्रीकडे सुसंस्कृतांनी तरी अनुकंपेने पहावे.

**************

# १५    वृद्धाश्रमांची अ०ोळख १

आला क्षण गेला क्षण, जपा मन

प्राप्त काळ हा विशाल भूधर

सुंदर लेणी त्यावर खोदा,

"येथे मी कमी बोलते" वृद्धाश्रमातील मैत्रीण सांगत होती.

“खरेखुरे आपण आनंदी राहावे. सर्वात चांगली सांगत म्हणजे आपली स्वतःची सांगत असते. तिथे कपट नसते. स्वतःशीच आप संवाद करतो. "मनाशी संवाद आणि मनाशीच वाद" होतो.”वृध्दाश्रमातील मॅडम म्हणाल्या

हि स्वतःची भेट घेण्याची संधी, उत्तररात्री, वयाच्या उत्तरायणात वृद्धाश्रमातील काही दिवसाच्या तात्पुर्त्या स्टे मध्ये मिळते.

मी बघितले, माणसे नेहमी भडाभडा बोलतात. अनावरपणे! शब्द बंबाळ होतात. पण उत्तरायणात त्यांचे ऐकून घ्यायला, कुणीच उत्सुक नसते.

“ताई तसे पहिले तर वृद्धाश्रमात देखील समान अभिरुचीच्या लोकांशी मैत्री होऊ शकते. पण अति टाळावे. तरीही छंद बाळगावेतच.”मॅडम  स्मृती संग्रहात साठलेल्या अनेक गोष्टी छोट्या गैरसोयी सुरुवातीला काही दिवस अस्वस्थ करू शकतात. पुढे आपल्याला त्याची सवय होते.करून घ्यावी लागते

कसे जायचे- बेलापूर स्टेशन पासून रिक्षाने २५ रुपये खर्च येतो.दहा मिनिटात येथे पोचता येते.

पत्ता

१ वृद्धाश्रम- नर्मदा निकेतन

प्लॉट नं.२ सेक्टर सी ए

सीबीडी बेलापूर, नवी मुंबई.

४००६१४

फोन २७५७१५५५

प्राजक्त केअर सेंटर

प्लॉट नं.९ अ

नर्मदा निकेतन जवळ

आर्टिस्ट व्हिलेज सेक्टर ८

सीबीडी बेलापूर

नवी मुंबई, मुंबई - ४०००६१४

फोन - ०९००४३५२६९२

इथे राहणाऱ्या वृध्दांना, मध्ये मध्ये त्यांचे नातेवाईक भेटू शकतात. वृध्द काही वस्तू सोबत ठेऊ शकतात. उदा.तुमचा खाऊ पुस्तके, कपडे, मोबाईल. खोल्या हवेशीर आहेत. तुम्ही दरमहा रु ९००० पासून पुढे, खर्चात येथे राहू शकता.

सर्व आवश्यक सोयींनी संपन्न अशी वृद्धांसाठी राहण्याची सोय आहे. परिसरात छोटे देऊळ आहे. प्रार्थना सभागृह आहे. वाढणारी वृद्धांची संख्या व मागणी बघता, मुंबईपासून अगदी जवळ असा केवल ३२ किमी अंतरावरील हा आश्रम, वृध्दाश्रम योग्य वाटला.

डॉक्टर, दवाखाने सर्व जवळ आहे. सोयी चांगल्या आहेत.

आलो मी एकला, जाणार एकला

एकांत येथला कान साहे.

आला क्षण गेला क्षण, जगायचे आहे प्रत्येक क्षण विसरून जा कालमान, जगायचे फक्त वर्तमान.

2 वयाने सावल्या मोठ्या होतात.

वृद्ध व्यक्तींना संध्याछाया भिववू लागतात. जीवनात मागे बघितले कि खूप काही असते. पण पुढे काही फारसे आशादायक नसते. वृद्धांचे प्रकार असतात.

१. कुटुंबात नसलेले जोडीदार नसलेले एकल

२. कुटुंब असून जोडीदार नसलेले एकल

३. कुटुंब असून जोडीदार असून दोघेही शारीरिक दृष्ट्या अस्वस्थ

४. कुटुंबाने नाकारलेले श्रीमंत

५. कुटुंबाने नाकारलेले गरीब.

या प्रसंगी म्हणावेसे वाटते. दुखी वय करत नाही ज्यांनी मागे टाकले ते मित्र मैत्रिणी नातेवाईक करतात.

अर्थ हीन जगणारे लोकांना काळजी वाटते. पुढे आपल्या दुखण्याने आपल्या नातेवाईकांना त्रास होता कामा नये. चांगुलपणावर विश्वास टाकावा तर काही चुकले का? अपंगत्वाची भेटी वाटते. एकाकी वाटते. चिडचिड होते. वृद्धांमध्ये काही कायम त्रस्त असतात

काही कायम कामात व्यस्त असतात. काहीजण काहीही न करणारे सुस्त असतात तर काहीजण मस्त असतात.  पुष्पगुच्छ शब्दगुच्छ बघून आनंदी होणारे असावे. अनुकंपा ठेवावी. वृद्धापकाळ आनंदी व्हावा.

क्षणाची फुरसत नाही

दंडाची मिळकत नाही

मरणाचे दुःख नाही

आनंदाला कमतरता नाही

सुरुवातीला वेगळे वाटले तरीही वृद्ध जमवून घेतात. निसर्गाला रितेपण मंजूर नसते. ओळखी होऊन माणूस रमते. अशी जीवन शैली वृद्धाश्रमात राहण्यासाठी अंगी बाळगावी लागते. अवघड आहे पण त्याने वर्तमानावरच लक्ष केंद्रित करावे.

आजवरी कमळांच्या द्रोणी, मधू पाजला तुला भरुनी

सेवा हि पूर्वीची स्मरुनी, रोष सखया दूर करी

नैवेद्याची एकच वाटी आता दुधाची माझ्या गाठी

देवपुजेस्तव हि कोरांटी, बाळगली अंगानी कशीतरी.

आज भारती ताई सांगतात तसे, वृध्दाश्रमाला मी घराचं मानलेय. मी जे आहे त्यात खुश आहे. सर्व सुखसोई आहेत. चोरांची भीती नाही. सुरक्षा आहे. प्रेम आहे. थकलेले पाऊल सहज उठावे, सामोरे जे येईल ते पाहावे. भविष्याचे स्वागत आणि सरावा प्रवास सारा.

ड्रमला ८१०० च्या पुढे प्रत्येकी

२ वृध्दाश्रम रहेजा वृधाश्राम वाशी

शरण कमला रहेजा होम

सिनिअर सिटीझन आश्रम

स्टार रेटिंग ३

प्लॉट एस २ सेक्टर ९ ए फादर आंग्लेन इंग्लिश मिडीयम शाळेच्या बाजूला वाशी नवी मुंबई.

फोन ०२२ २७६५९४५५ /२७६६१८४९

एक रकमी पैसे भरावे लागतात. वृद्ध -६५

पूर्ण वेळ नर्स डॉक्टर १२ तास

पूर्व परवानगीने कुटुंबासह राहायला जात येते. भेट देणारे स्वतंत्र खोलीत काही दिवस पैसे भरून राहू शकतात

वृद्धाश्रम ३

आनंद आश्रम

आज आपण नव्या वृध्दाश्रमा बद्दल माहिती घेऊ या.

जलाराम धाम, आनंद आश्रम वज्रेश्वरी भिवंडी रोड

अकलोली वज्रेश्वरी

जिल्हा ठाणे - ४०१२०४

फोन- ८००७८८२२१०

०२५२२ २६१८५६

०२५२२ २६१६४२

रेटिंग ४.४.

अंतर मुंबई पाउण ६४ किमी

निसर्गरम्य ठिकाणी वसलेला शहरापासून दूर असा सरहम प्रसन्न वाटतो. वज्रेश्वरी देवीच्या मंदिराजवळ वसलेला आहे. गरम कुंडाच्या समोर आहे. चंद्रकांत बेन त्रिकामजीभाई चाटवानी यांच्या प्रयत्नाने हा आश्रम सुरु झाला. डॉ. छबिलदास जोबन पुत्रांचे प्रयत्न हि आहे.

वृद्ध प्रति असलेली कृतज्ञता दाखवण्या साठी हा आश्रम सर्वोत्तम करण्यासाठी सर्वजण झटतात.

रोज भजने प्रवचने, योग, ध्यान घेतले जाते. उत्तम वाचनालय आहे. रोज टीव्ही बघता येतो. होळी दिवाळी सर्व सण व त्यानुसार जेवण बनवले जाते.

उत्तर हवेशीर स्वयंपूर्ण खोल्या आहेत. श्रीराम साईबाबा, व जलाराम बाबा यांचे सुदंर मंदिर आवारात आहे. भोजनालय स्वतंत्र व मोठे आहे. वुर्धांव्यतिरिक्त येथे गुरुवारी व रविवारी भक्तांना निशुल्क जेवण दिले जाते. वृद्धांच्या जीवनात गौरव आनंद आणण्याचे काम आनंदाश्रम करते. घर सर्वांचं आवडते. पण काही कारणामुळे जर घरी राहणे शक्य नसेल तर जिथे राहतो तो निवास स्वीकारावा. आनंददायी करावा.

वृद्धाश्रम ४

मुलांनो आम्ही तुम्हाला सुखी करू

आरती नावाची वृद्धाश्रमात राहणारी एक मैत्रीण, एका लग्नात भेटली. ती सांगू लागली. मला एक दिवस मुलगी म्हणाली, आई तू वृद्धाश्रमात जा. मी उलट प्रश्न विचारला रडले, भेकले. पण ती ठाम होती. शेवटी मी उत्तरले. "मुलांनो जशी तुमची इच्छा, मी तुम्हाला सुखी करिन" आणि या वृद्धाश्रमात आले." आरतीबाई म्हणाल्या,

मुलांनी इथे आणून टाकले त्यावेळी त्यांनी वृद्धाश्रमाची पाहणी केली होती. अथवा नाही मी सांगू शकत नाही.

"तुम्ही घरी कधी गेला होतात? मी"

"मी इथे आल्या पासून हेच माझे घर झाले आहे" आरतीबाई

"मुले भेटायला येतात का? मी"

"हो येतात. शनिवारी संध्याकाळी येतात. गप्पा मारतात इथे जर पाहुणे आले तर ९० रुपये भरून पाहुण्यांना जेवायला देता येते." आरती. "दोघे इथे जेवून बाहेर सिनेमा बघून घरी जातात." त्यांनाही बदल होतो. मलाही भेटीने बरे वाटते. आरतीबाई सांगत होत्या. संगम, सार्वजनिक सेवा समिती संचालित हा आश्रम आहे. काही दिवसांनी घरी नेईन म्हणाले आहेत बघू." आरती बाई

वृद्धाश्रमात येणाऱ्या स्त्रियांची संख्या जास्ती असते. शिवाय इथे आल्यावर देखील बायकांमध्ये अनबन होते. पैसे रु.१०, ००० पर्यंत दर महिना आम्ही घेतो. डिपॉझिट देखील असते. वृद्धाश्रमात सर्व सोइ आहेत. नर्स, डॉक्टर सर्व जवळ आहे. त्यामुळे सोयीस्कर आहे. निसर्ग छान आहे.

अटी-

१) मैत्रिणी - मित्र तर्फे येत येत नाही. एखाद्या तरी नातेवाईकांचा संदर्भ द्यावा लागतो.

२) भेटीला लोक येऊ शकतात, येथे राहू शकत नाहीत.

३) जेवणाच्या वेळा पाळाव्या लागतात.

४) इतरांना त्रास होईल असे वर्तन करून चालत नाही. तुम्ही तुम्हाला हवा असल्यास तुमच्या खोलात तुमचा आणलेला टीव्ही ठेऊ शकता.

५) बरण्या मध्ये डब्या मध्ये खाऊ ठेवू शकता.२९९ क्वेअर फूट रूम विथ डब्लू सी ३८ खोल्या आहेत.

वृद्धांना आवारात फिरू शकतात.

सणाला जेवणात गोड धोड केले जाते. वृद्धांशी संवाद साधला जातो.

नातेवाईक काही काळासाठी घरी नेऊ इच्छित असतील तर परवानगी घेऊन जाता येते.

वृद्धांचे वय ५५ वर्षे हुन अधिक असावे.

वृध्दाश्रमाचे नाव -

रेटिंग -३

वेळ सकाळी ९.३० ते ६.३०

फोन- पद्मश्री अण्णासाहेब बेहेरे वृद्धाश्रम

१५/२ ए चंदन नगर खरेदी पुणे ०२० २७०१२४६४

*************

# १६वागावे कसे

कसे वागावे हे मला कळलेच नाही असे मला वाटते. मी पाळणूक केली. तरीही खूप सुख, पैसा, नावलौकिक मिळाला तरी इतरांचा अपमान करू नये. भपका दाखवू नये. “हेही दिवस जातील” हे लक्षात ठेवून विनम्र रहावे. हे जाणून नम्र राहिले तरीही काही बाबतीत अपयश आले. पण वयाने आलेले अनुभवी निष्कर्ष मला सांगावेसे वाटताहेत.

अनुभवानेच माणूस माणसाला ओळखू लागतो. एकदम कुणालाही जवळ करू नये. कुणाजवळ मन मोकळे करू नये. पण मी करत गेले.

१) धनव्यवस्थापनः परंपरागत धनदौलत नाही म्हणून partner ला अपमानित करू नये. धन मिळवावे, खर्च कमी करावा, संचय करावा.

भविष्यकाळः भविष्यकाळातील कठीण प्रसंगांसाठी पैसे ठेवावेत. उत्पादक अनुत्पादक खर्च करून आजारपण, म्हातारपण यासाठी पैसे ठेवावेत. आरोग्यविमा, आयुष्य विमा उतरवावा. बँकेत पैसे ठेवावेत.

२) संततीप्रेम व संतती कर्तव्य पाळावे. आपल्यापेक्षा आपली संतती वरचढ होईल यासाठी प्रयत्न करावा. संतती एक-दोनच होऊ द्यावी.

शारीरिक हिंसा करू नये. पत्नीला, पतीला, मुलांना मारहाण करू नये. मुलांना रडू द्यावे, हसू द्यावे, खेळू द्यावे, वाढू द्यावे. शेवटी आपली मुलेच आपली असतात. लहान मुलांना अजिबात मारू नये.

आदर- वडिलधारे, आईवडिल, गुरू, शिक्षक यांचेबद्दल आदर ठेवावा.

आधार- निराधारांना पाठीराखा होऊन मदत करावी. आधार द्यावा. अन्नखर्च भुर्दंड मानू नये.

३) निरपेक्षता-माणुसकीः मोबदल्याची अपेक्षा ठेवू नये. परतफेडीची शक्यता शून्य मानून उपकार करावे. अपेक्षाभंग दुःखदायक असतो. विद्यादान, धन, अन्न निराधाला द्यावे. त्याला कामाला लावावे.

४) वयः वय वाढले की जुन्या चुका स्पष्ट दिसतात व दुखावतात. पूर्ववयात असे वर्तन करावे जे उतारवयात सुख देईल. तरूणपणीचे बेछूट वर्तन वृद्धापकाळाचे कर्ज असते, जे फेडावे लागते.

५) श्रद्धाः देवावर श्रद्धा ठेवा. खरी खोटी आशा देव या संकल्पनेने मिळते.

६) आईची शिकवणः आजी सांगे "सदा लिहिण्याचा व्यासंग ठेव." त्या काळी खरे तर केवळ पाठांतराने स्तोत्र, वचने, आरती, ओव्या म्हटल्या जात. पण मी लिखाण करावे ही आईची इच्छा होती. चरित्रलेखन मी करावे अशी वडिलांची इच्छा होती.

उधळ माधळ न करणे, हात राखून खर्च करणे आईने शिकवले. उसने उधार धान्य, अन्न कधी घेऊ नये हे आईने शिकवले.

७) स्वयंपाकघर हे बाईचे कार्यक्षेत्र असे व सुगरणीचे सल्ले नेहमी घरी अन्नाबद्दल दिले जात. "पोटातून हृदयाचा मार्ग जातो" ही म्हण आजही आहेच.

८) आठवडी बाजारः शनिवार रविवारी हल्लीसारखे हॉटेलातून मागवणे नसे. आई स्वतः आवश्यक गोष्टींच्या खरेदीसाठी मोलकरणीला सोबत घेऊन जाई. लागेल तेवढे सामान भरून ठेवावे, उठसूट बाजारी जाऊ नये.

भार्यां मनोरमां देहि मनोवृत्तांत सारिणीम्

तारिणीम् संसार सागरस्य कुलोद्भवात्

९) दुपारी लोळणे झोपणे आरोग्याला आवश्यक वाटल्यास करावे. अन्यथा शिवण, विणकाम, टिपणे, निवडणे, हस्तकौशल्य, लोकरकाम करावे. थोडाफार व्यायाम करावा. आळस पाळू नये. नोकरांवर अवलंबून राहू नये. “या रे या साऱ्यांनो या” असे कुटुंब जोडून ठेवावे.

१०) तडजोडः पुरूष व स्त्री दोघांनीही संसारात तडजोड करावी, एकमेकांना उर्जा द्यावी.

करले शृंगार चतुर अलबेली

साजन के घर जाना होगा

मट्टी ओढावन मट्टी बिछावन

मट्टीमें मिल जाना होगा

नहाले धो ले, शीस गुथा ले

फिर वहाँसे नही आना होगा

जग हे वेगवेगळ्या माणसांनी भरलेले आहे. त्यात काही गुणग्राहक माणसे असतात. काही स्पष्टवक्ती असतात. सर्व अनुभव घ्यावे मृत्यू अटळ आहे हे लक्षात ठेवून वावरावे.

एका प्रकाशकाने हस्तलिखित गहाळ केली त्यामुळे पुन्हा लिहिताना flow जमेना तरी ही अशी गृहिणी सहाय्यकाची संकल्पना! कसे वागावे हे मला वाटले तसे मी आचरणात आणले, तुमचे काय मत आहे?

****************

# १७शाळेच्या बाकावरून

गेले ते दिन गेले, असे आपण बऱ्याचदा म्हणतो. बऱ्याच व्यक्ती तर वर्तमानाचा खूप मोठा काळ, भूतकाळाची आठवण काढण्यात रमतात. बालपणीच्या घरात, आईवडिलांच्या छत्रछायेत, त्या काळीच्या अंगणात(हल्ली अंगण नसते) छोट्या गल्लीत मन रेंगाळते. आपल्या मनातील बालक, शैशवातील स्मृतिरंजनात रमते.

स्मृतीत रमणे वाईट नसते. जुन्या आठवणींची वर्तमानाशी गोधडी नसते तर ते एक अखंड वस्त्र असते. बालपण आपण सोबतच नेतो, तरूणपणाचाच तो भाग बनतो आणि असतो. त्या स्मृती आपण लंगोटी-यार, नातेवाईक, भावंड गाववाले, गावकरी मंडळी भेटली, की रसभराने चघळतो. उघडपणे त्या आठवणी काढताना, आपण त्यात हरवून जातो, हरखून जातो. काहीजणांना या स्मृती आवडत नाहीत. अति जवळीक साधण्यासाठी, आपण त्या आठवणी काढतो, असे त्यांना वाटते. Whats app वर सुद्धा बालपणीचा काळ सुखाचा, अशा पोस्ट्स् कायम फिरतात.

दहावी बारावीचे निकाल, हे तर बालपणीच्या आठवणींच्या “खुल जा सिम सिम” खजिन्याचे प्रमुख द्वार आहे. ज्यांना पूर्वी खूप मार्क मिळाले होते, जे Good Boys होते त्यांना दहावी बारावीचे दिवस, आईचे प्रेम, वडिलांचा अभिमान आठवतो. प्रत्येक आईवडिलांना “मेरा नाम करेगा रौशन, जग में मेरा राज दुलारा” असे वाटते, ते कौतुक आठवते. मार्कांवर जीवन अवलंबून नसते, अशी पोकळ वाक्ये टाकली, तरीही मार्कांवर जीवन अवलंबून असतेच. मार्क कमी मिळताच, होणारे हृदयभंग, मार्क मिळाल्याचा अभिमान, स्वतःबद्दलचा आत्मविश्वास असे कोलाज असते.

आमचे काळी ट्युशनचे खर्च नव्हते, स्वतःहून अभ्यास केला जाई. एवढा मार्कांचा पाऊस त्या काळी नव्हता. Hero “माँ मै first class first आया” असे सांगत असे, कारण first

class क्वचित मिळे. एका वर्षीच्या दहावीच्या मार्कांच्या, आठवणींभोवती जीवन कायम घुटमळते. अगदी भविष्यात, नोकरीच्या मुलाखतीत, दहावीचे मार्क विचारले जातात.

शाळेच्या वळणवाटा, गोल जिना, पाऊस, छत्र्या, गणवेष, शाळेचा टिफिन, खाऊ डब्बा, शिक्षक, काळा फळा, रंगीत खडू, बाकांवर कोरलेली नावे व चित्रे कायम आठवतात. मुख्याध्यापकांबद्दल आदरमिश्रित भीती असे, शिक्षकांची टोपणनावे असत, पण सभ्यतेचे आत असत.

“Get out of my class or stand on bench” ची आज्ञा मिळताच उलट collar ताठ होई.अभ्यास करत नाही, म्हणून शिक्षक घरी सांगायला येत असत.

शेक्सपिअर म्हणतो, “जग हा रंगमंच आहे.” त्या रितीने Free period ला आपली classroom रंगमंच बनते. Darwin चा सिद्धांत, माणसे ही माकडापासून जन्मली, हे सिद्ध आपण बालपणीच करतो. हाताची ढोपरे, पायाचे गुढघे कायम फुटलेले, करवंदाच्या व कैरीच्या चिकाने ओठाभोवती पुरळ उमटलेले, पायात काटा अथवा काच बोचलेले, बारिक उंच, ते माझे ध्यान रूप मला आजही आठवते.

बालपणीच्या आठवणी सांगायला लागले की पोरगा म्हणतो, “आई बास, बोअर करू नकोस.”

मोठ्या सायकलीवर पाय पुरत नव्हते, तरी चालवत, मी रानोमाळ भटकायचे. साप नागाची भीती, घरच्यांनी घातली तरीही मी नागांना घाबरत नसे. “भगवान शंकरदेवाचा नाग हा मफलर असतो” असे मी दादांना सांगे. कच्चे निच्चे पेरू, दगड मारून पाडलेल्या कैऱ्या काहीही (रानमेवा) आवडे. आमची आई, तिच्या बालपणीच्या वेगळया आठवणी सांगे, आम्ही हसत असू. १९७९ साली टेलिव्हिजन संच आला, भला मोठा एँटेना लावला. एकच चॅनेल व बरेच काजवे चमकल्यासारखे काळे पडदे दिसणे, दूरदर्शनचा व्यत्यय, माशी हे जीवनात आले. मुले मोठी

झाली. त्यांना तर आता mobile, internet अभ्यास हे सुद्धा भूतकाळ वाटते. दूर दर्शन मालिका हे काकू मावश्यांचे वेळ घालवायचे माध्यम वाटते.सिनेमा थिएटर्स त्यांना cheap वाटतात. Netflix मुळे TV नको वाटतो. त्यांच्या आठवणींच्या राज्यात व आपल्या आठवणींमध्ये खूप फरक आहे.

आपल्या मुलांच्या आठवणींना, कदाचित त्यांची मुले हसतील व म्हणतील, "बाबा, बोअर मारू नका."

रात्री भावंडांनी गच्चीत एकत्र झोपणे व सुट्टीतला मामाचा गाव आता मागे पडलाय. ग्रामोफोन, सिनेमा, मोबाईल, सिडी, फ्लॉपी, पेनड्राईव्ह पण मागे पडलेत. वर्तमानकाळ क्षणाक्षणाला भूतकाळात जमा होतोय. भूतकाळ या क्षणाला संपलेला असतो. फक्त आठवणी उरतात.काही क्षण शाळेच्या बाकावर जा, विचार करा,

जग वेगळेच वाटेल।happy 15 th june, school opening day,

*****************************

## १८‘सदन तेजोमय’

हवामान बदलामुळे, देखरेख न झाल्याने, बरीच घरे हल्ली लवकरच, अकेली, अकारण जुनी वाटू लागतात. घर म्हणजे बंगला, अथवा सदनिका होत.ते स्नेहाचा वास असलेले सदन आतून सुंदर असते, पण आकर्षक प्रवेशद्वार, जिना, lift, गाडी लावायला वाहनतळ(पार्किंग), वॉचमन अशा आधुनिक सुविधा या घरांना नसतात.

‘अति जुनी घरे एकप्रकारे कालबाह्य अशा ह्या लहरी घेवून येतात’, असा माझा समज होता. माझ्या काकू म्हणायच्या ‘घर जुने असले की, कितीही पडदे बदला की रंगरंगोटी करा, त्याच्यातले जुनेपण जात नाही’. मैत्रीण म्हणायची ‘घरात राहवेसे वाटत नाही, जुन्या फरश्या बदलल्या, दरवाजे बदलले दरवाजाच्या चौकटी बदलल्या, पण घर काही आधुनिक वाटत नाही’नवे घर लहान असते, एरिया superbuilt up मोजून मापून, विहार, वापर याची जागा कमी होते. 05% दरवर्षी या न्यायाने घरांची झीज होत असते. तरीही परेल, दादर  वरळी, पुणे, औरंगाबाद, नाशिक येथील अनेक 25 वर्षांहून जुनी घरे अजूनही दिमाखदार वाटतात. काय कारण असावे जे जुन्या घराला ताजेतवाने ठेवते?असणारे न दिसणारे ते काय असते. जे सदनिकेला घर बनवते व जुन्या सदनिकेला ‘ओल्ड इज गोल्ड’ म्हणावे असे छान वाटणारे बनवते. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर जुनी घरे बदलणे शक्य नसते. जुन्या इमारतींचा पुर्नविकास होई पर्यंत त्या सदनिकात वावरावेच लागते. तर तोपर्यंत या सदनिकात प्रसन्नता कशी वाटावी याच्या काही टिप्स जाणून घेवून त्या पाळाव्यात.

1) आकर्षक प्रवेशद्वार- जमल्यास इमारतींचे, नीदान स्वतःच्या सदनिकेचे दार सुंदर स्वच्छ ठेवावे. दरवाजाजवळ अडगळ ठेवू नये. अनावश्यक कुंड्या, कचरा, चपलांचा पसारा नसावा. भटकी कुत्री बसलेली नसावी, कचरा साठलेला नको, घाण वास मारणारे असे पसारे नसावे.

2) असे म्हणतात, घर हे माणसाच्या मनाचे प्रतिबिंब असते, तरुणांना सहसा, जुन्या घरात रहायला मुळीच  आवडत नाही. साधारण वृध्द, मध्यम, उतारवयातील लोकांना मात्र आपले जुनी घरे सोयिस्कर वाटतात. या गैरसोयीच्या सदनाचे जवळपासची ओळखीची माणसे आधार देतील असे वाटते. त्यामुळे घर बदलणे, नवे सदन, सदनिका घेणे ही बऱ्याचदा संघर्षाची कारणे असतात.विविध कारणांनी जुन्या, ओल येणाऱ्या, घरात रहावे लागते. प्रत्येक घर स्वतःची गोष्ट सांगते.त्यामुळे  निदान घराला, लिपापोती रंगरंगोटी तरी करावी.

3) वास्तू फेंगशुई- मानव गृहात राहतो, माणसाला गृहस्थ म्हणूनच म्हणतात! ज्या अभासी गोष्टीवर आपला विश्वास आहे, त्यानूसार गृह रचना करावी मात्र यापैकी उपाय, होम कशाचाही अतिरेक करु नये. आजोबांना जिथे आरामखुर्ची ठेवावी, झोपावे, बसावे असे वाटत असेल तिथे ती वस्तू ठेवू द्यावी. देव सर्व दिशांना असतो, त्यामुळे घरात आजीला हवे तिथे देवघर ठेवू द्यावे, पूजा करु द्यावी. अर्थात या विविध  शास्त्रांच्या अगदी विरुध्द जावू नये.

4) घरातली उर्जा- घरात शिरताच आपलेपणा वाटला पाहिजे. उगीच शोरुममध्ये आल्यासारखे वाटू नये.किंवा कबाडखाना    वाटू नये.घरात एक उर्जा असते जी आपल्याला बोलावते, सुखावते, रिलॅक्स करते, कवेत घेते, सुरक्षा देते.

5) जुन्या वस्तू *लाकडी कपाटे यांचा मोह बाईला असतोच .मात्र होणारे उपयोग बघून वस्तू ठेवाव्यात.कारण, जुन्या दिव्यांवरची, फोटोफ्रेम, मूर्तींवरची धूळ स्वच्छ करत रहावी लागते. अर्थात वृद्धांना त्यांच्या सोयीसाठी या गोष्टी हव्या असतील, तर त्या वृद्धांच्या भावना दुखावू नये. हल्ली कामाला नोकर मिळत नाहीत.त्यामुळे  वृद्धांना वस्तू हाताशी व सवयीच्या जागी असलेल्या योग्य असतात.

6)प्रकाश : अति भकभकीत दिवे लावू नये. अधिक प्रकाश येत असेल, तर पडदे लावावेत. मित्र मैत्रिणी, नातेवाईक, कुटुंबीय यांचा एखादा समूह फोटो, देवाची एखादी तस्वीर

ठेवावी पण घराला घरपण राहू द्यावे. स्टूडिओ अथवा आर्ट गॅलेरी बनवू नये.कॅलेंडरमुळे गुर्हाळाचे रुप येवू  नये जनावरांचे पुतळे, टोकदार वस्तू, लहान मुलांना दुखापत होवू शकते असे शोपिसेस ठेवू नये.

7)घरात एक तरी कॅलेंडर व एक तरी घड्याळ, घराचे भिंतीवर असू द्यावे. बेत व योजना या दृष्टीने या दोनही  गोष्टी उपयोगी असातात.

8)प्रवेशानंतर : घरात किल्ल्या टांगायची जागा जरुर असावी. मोबाईल ठेवायला स्टँड, स्टूल, टेबल, टिपॉय स्वतंत्र असावे. पेन, वही, फोन डायरी, चार्जर सर्व वस्तू तिथेच ठेवाव्यात. लॅपटॉप, टॅब, फोन तिथेच ठेवावे.पाणी ठेवावे.

9) घरात गॅलरीत एखादी तुळस, एखादे मनीप्लँट जरुर ठेवावे. आवड व सवड असल्यास घरगुती बाग जरुर करावी. जुन्या फुटक्या कुंड्या बदलत जाव्यात. सारे अवघड असते पण अशक्य नसते.

10) आवडत असल्यास साउन्ड ऑफ म्यूजीक/ वाईन्ड चीम टांगावे, पडद्याला बारीक घुंगरु लावावेत. रंगीत जाळीचे पडदे लावावेत.

आधुनिक घर कुणाला आवडणार नाही? पण मर्यादा, अडचणी असतात. जुन्या घरांना संजीवनी देणाऱ्या या सूचना आहेत. जुने घर ताजेेतवाने होईल. सुशांत व सौम्य होईल. गणपती बाप्पा येणार आहेत. त्यांच्या स्वागताची तयारी घरापासून करु या!

या भवनातील गीत, पुराने उदास हळवे सूर, आज जावू द्या दूर!

ते घर ‘सदन तेजोमय’ होईल!घराचे जुनेपण लपून बसेल

घर हासरे, नाचरे, बोलावणारे होईल.********************

# १९लाकडी खेळणी (सावंतवाडीची)

महाराष्ट्रातील सावंतवाडीच्या लाकडी खेळण्यांना बालपणा, आठवणीत, समाजात फार महत्व आहे.चेंडू, देवांच्या मूर्ती, रेलवे, कासवे, बॉल्स, चेंडू, घंटी, बाहुल्या, गाड्या, खेळणी, मेकॅनो, डमरू, भोवरे, भांडी, छोटी सुपे, डबे, भातुकली हे या गावातच बनवले जातात.

पुढे मागे दोन्ही ठिकाणी, लाकूड तासून, त्याचा पृष्ठभाग गुळगुळीत केला जातो. त्यावर पॉलिश पेपरने घासून, छिन्नीने आकार देऊन, मग रंग दिला जातो. एका काचेच्या शोकेसमध्ये येथे ही नमुन्याची सर्व खेळणी ठेवली आहेत. मध्यंतरी मी सावंतवाडी सारखीच पालघरला देखील अशी खेळणी बघितली होती. सावंतवाडीला मिळनाऱ्या भातुकली सारखी, अन्यत्र देखील अशी खेळणी विकत मिळतात. लाकडी ठोकळयांवर, सुबक कोरीवकाम, वेगळया प्रकारच्या पेनाने केले जाते. लाकडावर पॉलिश लावले जाते. त्यातच रंग कालवला जातो. आंध्र प्रदेशा चन्ना पटना व कोंडीपल्ली व राहा नदीच्या किनारी जी गावे वसली आहेत, तेथे सुध्दा खेळणी बनतात.साववंवाडीला दिलेले रंग पुन्हा घासून त्यांना स्मूथ केले जाते. सावंतवाडी सारखी, येथील खेळणी शुभ मानली जातात. माझ्या घरी, मुलीच्या पहिल्या वाढदिवसाला सावंतवाडीची लाकडी भातुकली, व मुलाला सावंतवाडीचा भोवरा, बॅट—बॉल बक्षिस देण्याची प्रथा आहे. आंध्रात अंकुडू नावाच्या झाडाच्या लाकडापासून ही खेळणी बनवली जातात. हे लाकूड जाळणे अशुभ मानतात. उन्हात सुकवून कोरड्या झालेल्या लाकडापासून ती बनवली जातात. जंगलातून जमा केलेली किड्यापासून मिळवलेली लाख रंगकामाला, जोडकामाला वापरली जाते.सावंतवाडीला आंब्याचे लाकूड वापरात येते.

सावंतवाडी महाराष्ट्रः सावंतवाडीला सर्व लाकडी खेळण्यांसाठी पूर्वी नैसर्गिक रंग वापरले जात असत. हल्ली कृत्रिम रंग वापरतात. तसेच पूर्वीच्या पारंपारिक खेळण्यांसोबत इतरही वस्तू हल्ली इथे बनवतात. जसे लोंबती शोभेची माळ, भातुकली, पेनस्टँड, होल्डर, लाकडी कंगवे, बाहुल्या, दोरीच्या उड्या, कि चेन, बाऊल, भ ाडी, मूर्ति. लाकडी खेळणी

पर्यावरणस्नेही असतात व लहान मुलांच्या दृष्टीने सुरक्षित असतात. पांगुळगाडा, बैलगाडी ही सावंतवाडीच्या खेळण्यातली खास खेळणी आहेत. सावंतवाडीला गेले असता अशी लाकडी खेळणी विकत मिळतात. पोलपाट लाटणे, बुटकुली, गाड्या, ससे! ५० रुपयापासून २००० रुपयापर्यंत किंमत असू शकते.आंब्याचे अथवा अन्य लाकूड ही खेळणी बनवण्यासाठी वापरले जाते. कधी आकारांचे ठसे कापून, यंत्राने आकार कापला जातो. फुलांचे आकार त्यातून बनवून रंगवले जातात. आकर्षक चकचकीत रंग, असतो जो लवकर खराब होत नाही. बरण्या, रंगीत स्टूल, स्टूलचे पाय देखील बनवले जातात.

लोकप्रिय असलेली सावंतवाडीसारखीच एटीकोप्पाका आंध्रप्रदेशमधील लाकडी खेळणी प्रसिद्ध आहेत. या दोन्ही शहरातील लाकडी खेळणी जनमानसात प्रसिद्ध आहेत.

आंध्रप्रदेश एटीकोप्पाकाची खेळणी, ही त्यांच्या वारसाहक्काने आलेली कला आहे. हल्ली आंध्रप्रदेशात अशी खेळणी बनवणारे कलाकार फार थोडे उरले आहेत. विशाखापट्टणम् जवळील एटीकोप्पाकाची लाकडी रंगीत खेळणी सुबक व छान, एटीकोप्पाका बोम्मल या नावाने ओळखली जातात. मद्रासमध्ये मायलापूरला जशा कोलू बाहुल्या बनतात, तसेच अन्य कागदी लगद्यापासून जशी काही ठिकाणी बाहुल्या बनवायची पद्धत आहे तशी, सावंतवाडीला इथे लाकडी खेळणी बनतात. खेळण्यातील लाकडी बैलगाडी हे सावंतवाडीचे वैशिष्ट्य आहे. वेगवेगळे भाग सुटे व स्वतंत्र बनवून, नंतर पुढे जोडले जातात. कीचेन, रंगीत पोपट, फळे, मिरच्या, खेळणी, टोपल्या, घरे, पोलपाट लाटणी, बसायच्या सीटवर ठेवायचे मण्यांचे आच्छादन, झोपाळे, पांगुळगाडे, मान डोलावणाऱ्या बाहुल्या, लाकडी पुतळे, पाट, विळया, फुलदाण्या, नावाच्या पाट्या, चमचे, उचटणी, सोरे, बॅट, बॉल, डमरू, कासव इ. खेळणी बनतात.नारळाच्या अथवा बांबू, ज्यूट चे डबी ही खेळणी विकली जाातात.प्लास्टिक आणि चीनची खेळणी याच्याशी सावंतवाडीच्या खेळण्यांची स्पर्धा केवळ किंमतीतच आहे.गुणवत्तेत, सावंतवाडीची खेळणी श्रेष्ट आहेत

सिंधुदुर्ग जिल्ह्यात सावंतवाडीला जायला थोडी वाट वाकडी करावी लागली, तरीही हायवे वरील धाब्यात, दुकानात, प्रदर्शनात ही खेळणी विकत मिळतात. फार पूर्वी पांगाऱ्याचे लाकूड वापरत असत.आता निवडक झाडांची लाकडे वापरतात. लाकडाची नासधूस न करता, कौशल्य, योग्य अवजारे वापरून, खेळणी बनवली जातात. शहरातून गायब झालेली, ग्रामीण जीवनाचा भाग असलेली ही खेळणी मशीनच्या मदतीने बनवली जातात. कटाई यंत्राने होते, पण रंगकाम कारागीर करतात. घड्याळे, पक्षी, कार्स, चारचाकी, भातुकली, सर्व वाजवी किंमत असते. प्रतिकूल परिस्थितीतही हे कारागीर ही कला जपतात.सावंतवाडीच्या लाकडी खेळण्यांना अधिक बाजारपेठ मिळावी, ही सदिच्छा!

मोतीतलावाकाठी वसलेले सावंतवाडी, लाकडी खेळणे बनवण्याच्या कला संस्कृतीचा वारसा जपते. आत घरगुती रूपाने सुद्धा ही खेळणी पारंपारिकरित्या बनवली जातात, वारसा रुपाने या कला पुढचे पिढीकडे जाातात, सावंतवाडीची खूण म्हणून जपली जातात, बहुतांश ती चिंतार आळीमध्ये बनतात. कलाकार लाकडी हत्ती, चपटी कलापूर्ण शोपीसेस बनवतात. शिल्पग्राममध्ये लाकडी पुतळे आहेत. आंबोळी घाटात सहलीला जाता ना? गोव्याला भटकं◌ी करता ना?येताना लाकडी खेळणी जरुर आणा.

शहरात, गावोगावी, खेडोपाडी पारंपारिक पद्धतीची कामे करून पोट भरणारे, उदरनिर्वाह करणारे हे कलाकार. यांच्याकडे खूप कला आहे. आधुनिक काळात प्लास्टिक, कचकड्याची, फायबरची खेळणी लहान मुले वापरतात जी आरोग्याला धोकादायक असतात. ग्रामीण जीवनात, घरगुती वातावरणात आस्थेने बनवलेली, ही खेळणी जरूर विकत घ्या. त्या पैशांनी, एक घर चालेल आणि ती आपली महाराष्ट्राची परंपरा आहे.

गणपतीत येताना सावंतवाडीची  लाकडी खेळणी आणणार ना!

## २० गेले ते दिन गेले

जुन्या पिढीचे जुनी कटकट गेली, असे म्हणत आपण जुन्या वस्तू टाकून देतो. जुन्या सवयी टाकतो मात्र नव्या तकनिकीशी तडजोड करताना, कधीतरी मन म्हणते, "गेले ते दिन गेले"

अश्या गेल्या ३० वर्षांपूर्वी च्या लोकप्रिय वस्तू सांगते बघा.

१) टेलिफोन लँडलाईन

पूर्वी १९९२ सालापर्यंत फोन एका जागी बांधलेला असायचा. त्यांना लँडलाईन म्हणत. आता मोबाईल फोन आले आहेत. ते मोबाईल फोन व्यक्ती सोबत सर्वत्र नेता येतात. व्यक्ती त्या फोनशी स्वतः ला बांधून ठेवतात. पूर्वी लँडलाईन वर, सर्वांसमोर बोलावे लागे आणि प्रायव्हसी ची ऐशी तैशी होई.

मत्रिणीला अथवा मित्राला फोन केल्यावर, लॅण्डलाइनवर चुकीची व्यक्ती येई.तर कधी वारंवार रॉंग नंबर लागे.

ज्यांच्या घरी असा फोन असे, त्यांचा नंबर देऊन तिथे निरोप ठेवला जाई किंवा फोनवर त्या व्यक्तीला बोलावत असत.

२)टेलिफोन बूथ - पुढे सार्वजनिक टेलिफोन बूथ आले. १ रुपयाचे नाणं टाकून लोकल फोन होई. रात्री १० नंतर बिल कमी येते, म्हणून रात्री लाईन लावून फोन होई. त्या एस टी डी बूथवर, फोन डिरेक्टरी, म्हणजे फोन नंबर शोधण्यासाठी असलेली पुस्तिका असे. आणि त्यातून फोन नंबर शोधला जाई.

मोठमोठाले फोन नंबर पाठ केले जात असत, अथवा छोटी टेलिफोन डायरी ठेवली जाई.

२) नोकरीसाठी अर्ज करणे- मार्कशीटच्या कॉपी टाईप करून, अॅटेस्ट केल्या जात. पूर्वी नोकरीचा अर्ज प्रत्यक्ष जाऊन त्या अॉफिसात दिला जाई. फोटो लावलेल्या त्या अर्जाला, सीव्ही ऐवजी तेव्हा बायोडेटा असे म्हटले जाई. तो बायोडेटा पोस्टाने पाठवला जाई.

३) कॅसेट रेकॉर्डर- आवडती गाणी ऑडिओ कॅसेट मध्ये ठेवली जात. कॅसेट रेकॉर्डर, तबकडीच्या ग्रामोफोनच्या तबकड्या, व्हिडीओ कॅसेटची लायब्ररी असे व व्हिडीओ आणून सोसायटीतले माणसे एकत्र जमून सिनेमे बघत असते. गायनाचे भजनाचे कार्यक्रम, गणपती उत्सवाचे ऑर्केस्ट्रा, इतकीच करमणूक असे. सिनेमा थिएटर एखादेच असे. व सरकत्या गाडीवरून सिनेमाची पोस्टर्स गावात फिरवली जात.

४) वाचनालय - एखाद्या विषयाचा अभ्यास करण्यासाठी अथवा ते प्रोजेक्त करण्यासाठी वाचनालयातून पुस्तके आणून अथवा तिथे अभ्यासिकेत बसून रिसर्च केला जाई. आता संगणकावर सर्व मिळते. (गुगल सर्च) आता किंडल वर कथा कादंबऱ्या ई बुक्स वाचता येतात.पूर्वी वाचनालय हा जीवनाचा अविभाज्य घटक असे.

५) टाईप रायटर - टाइपिंग साठी रेमिंग्टन चे टाईपरायटर असे. त्यासाठी कागद कार्बन, रिबीन वापरली जाई. चूक दुरुस्त करण्यासाठी व्हाईट इंक वापरली जाई.टाईपिंग शिकण्यासाठी कोर्स केला जाई

६) टेलिग्राम - चांगली किंवा वाईट बातमी कळवण्यासाठी कड्कट्वर चालणारा असा टेलिग्राम वापरला जाई. पोस्ट खाते फार महत्वाचे असे.

७) रॉकेलवर चालणारे स्टोव्ह - स्वयंपाक  करणे, पाणी तापविणे, यासाठी स्टोव्ह वापरला जाई. वातीचे स्ट्रोव्ह आणि भडक्या स्टोव्ह वर रॉकेलच्या काकड्याने आग पेटवून स्वयंपाक केला जाई. १९७० च्या दरम्यान गॅस शेगडी आली, २००७ च्या सुमारास मायक्रोवेव्ह ओव्हन आले.

८) टांगा - वाहतुकीसाठी घोड्याने ओढला जाणारा टांगा १९८० पर्यंत असे. रिक्षा, गाड्या कार्स चा सुळसुळाट नंतर झाला.

९) काचेच्या बाटलीतले दूध - दूध केंद्रांवर काचेच्यात बाटल्यातून दूध विकले जाई. लंबकाची भिंतीवर लावलेली टोल देणारी घड्याळे असत. ज्यांना किल्ली दिली जाई.लवकर ऊठण्यासाठी गजराचे घड्याळ काही घरी असे.

१०) शेंगदाणे कूट करण्याचे यंत्र, ताक करण्याची घुसळणी, मोदकपात्र हांडे, कळशी.बिडाचे तवे, पाणी तापवण्याचा बंब, शेगडी आणि वायन, घंगाळी, खलबत्ता, लंगडी, काशाच्या थाळया, दगडी जाते, अशी भांडी स्वयंपाकघरात असत. स्वयंपाक घरातील या वस्तू आता अडगळीत गेल्या आहेत.

११) कंदील, चिमण्या, लामणदिवे - विजेचे दिवे नसताना, अथवा वीज कनेक्शन नसल्यास, वीज गेल्यास  वापरण्यासाठी रॉकेलवर चालणारे कंदील, चिमण्या व लामणदिवे असत. आता विजेरी आल्याने हे दिवे अडगळीत गेले. काही घरी तर पलिते व मशाली वापरल्या जात.

१२) पितळी, फिरकीचे तांबे, - प्रवासात पाणी नेण्यासाठी, त्या काळी पाण्याचे प्लास्टीकचे बाटली ऐवजी फिरकीचे तांबे वापरात असत.

१३) रेडिओ - न्हाव्याच्या धोपटी सारखा रेडिओ खांद्यावर नेत (ट्रॅन्झिस्टर)

१४) पत्र पाठवणे - पूर्वी एकमेकांना ख्याली खुषालीची पत्रे पाठवली जात. पत्र देणाऱ्या पोस्टमनची वाट अंगणात ऊभे राहून बघितली जाई, दिवाळित भाऊबीज आणणाऱ्या मनी अॉर्डरची खास वाट बघितली जाई.

१५) अंगण, तुळशी वृंदावन - घरा भोवतीच्या रिकाम्या जागेस अंगण म्हणत .ज्यात बांधलेले उंच तुळशी वृंदावन असे.

आता ते चित्रपटात अथवा संस्कृती म्युझियम मध्ये बघता येते.

१६) नऊवार साडी

काष्टी घालून नऊवारी साडी बांधली जाई.

तर मंडळींनो या वस्तू आता गेल्या,

काळ बदलला आहे,

गेले ते दिन गेले***********

# २१"काहीही हं श्रीखंड "

बिन साखरेचे श्रीखंड

मधुमेहींसाठी, साखर हि विषासमान असते. त्यामुळे सर्वच पदार्थ साखर रहित खास मधुमेही करता मिळत असतात. खजूर, खारीक, अंजीर कृत्रिम गोडवा आणणारी स्टीव्हिया साखर घालून बनवलेले पदार्थ चविष्ठ असतात, शिवाय मधुमेहींसाठी योग्य प्रमाणात खाल्ल्यास योग्य असतात. हानी करत नाहीत.

पोटासाठी अन्न खाणे हे यद्य कर्म असते. खायला काहीतरी हवेच, त्यात जिभेचे चोचले असतात. पोट भरण्यासाठी मधुमेहींना बिनसाखरेचा पदार्थ शोधणे हे मोठे काम असते. शहरातील काही ठराविक दुकानां मधेच हे पदार्थ मिळतात. श्रीखंडाचे स्वप्न पडत होते, पण पथ्य पाळलायला हवे होते. बालपणापासून श्रीखंड हा माझा खूप लाडका पदार्थ होता. आता गल्ली बोळात अमूल, वारणा, गोकुळ, चितळे, सामंत अशा विविध नावाची श्रीखंड मला फारच लाडकी आहेत. प्रत्येक सणाला जसे घरी श्रीखंड हवे तसे फ्रीझ मध्ये एक डबा श्रीखंड हवेच असे माझे मत आहे. हो कायमच तोंडी लावायला हवे. नुकतेच वजन कमी करणे, मधुमेहींनी भीती दूर करणे या कारणांनी मी बिनसाखरेचा पदार्थ खायला सुरुवात केली. फळे, सॅलॅड, काकडी टोमॅटो, वित्त यांचा रतीब लौब सर्व बिनसाखरेचा मिठायांचा शोध घेतला. श्रीखंडाच्या बाबतीत तसे जमे ना. नुसता चक्क आणून खाणे आवडेना. श्रीखंडाचा विरह सोसेना.

एक दिवस असा आला कि " श्रीखंड वाचून होईना"

" आई दोन तीन मॉल्स मध्ये जाऊन साखर विरहित श्रीखंड शोध"

असा सल्ला मुलाने दिला. " काहीही हं श्री, श्रीखंड खायचे " सासूबाई

"रिक्षाने जाऊ नकोस, चालत जा." नवऱ्याने सांगितले.

"येताना फळे भाज्या, फुटाणे आण" सासूने सांगितले

" आईस्क्रीम, फालुदा खाऊ नको" मुलाने बजावले.

" खूप गर्दी असते, चालत जात येणार नाही " मी म्हणाले

" सर्व्हिस रोडने जा, " मुलाने सुचवले.

" सकाळी फिरायला जात जा सांगतो तर ऐकत नाही. आता निदान रात्री तर फिरत जा. नवऱ्याने ऐकवले.

सगळीकडून आरोग्य सल्ले आदळल्याने तो मारा टाळण्यासाठी बाहेर पडावे म्हणून मी कपडे बदलले, उठले मला श्रीखंड खायचे होते.

काहीही हं श्री, श्रीखंड!

नाईलाजानेच श्रीखंडाच्या ओढीने मी चालत जायला सुरुवात केली. पहिल्या मॉल मध्ये साखर विरहित श्रीखंड मिळालेच नाही. चालून चालून कंटाळा आला. मॉल वातानुकूलत होता म्हणून जीव घामाघूम झाला नाही अन घाम निघाला एक वाक्य आठवले.

आरोग्य रक्षणा बाबत काय चुकीचे आहे कळून फरक पडतो कि नाही माहित नाही. आरोग्यासाठी चूक सुधारून खूप फरक पडतो.

चालून चालून कंटाळा आला मात्र श्रीखंडाचे प्रेम गप्प बसू देईना. दोन तास मॉल मध्ये फिरणे झाले. मी मुलाला फोन लावला. "साखर विरहित श्रीखंड सापडत नाही" मी मुलाला सांगितले.

"रिक्षा करून परत येणार का?" मुलाने विचारले.

" अरे ठाण्यात रिक्षा मिळतात का?" मी

"श्रीखंड खायचे ना, शोध मग" नवरा म्हणाला.

असा कौटुंबिक मराठी मालिकांची आठवण करून देणारा संवाद झाल्यावर मी अर्धा तास रस्त्यावर रिक्षांना हात करत थांबले.

ठाण्यातले रिक्षावाले तर ऐश्वर्याचे भाडे सुद्धा नाकारतील मग मला म्हातारीला यायला नाही म्हणाले त्यात नवल ते काय? पाय ओढत ओढत चालत घराजवळ आले. फोन वाजला.

"आई बिनसाखरेचा श्रीखंड आणले आहे. ये आता घरी." मुलगा. मला खूप आनंद झाला. मलईदार केशर इलायची युक्त श्रीखंड आठवले. मी पळत पळत चालू लागले. चालता चालता पळू लागले. तोंडात चव आठवत लाळ जमली. बरे बरे वाटले. काहीही हं श्रीखंड.

घाई घाईने घराचे तीन जिने चढले.

"चाल जेवायला बस" मुलगा."'गरम पोळया शेवग्याच्यात शेंगांची आमटी, न आवडणारी शेपूची भाजी खायला सुरुवात केली.

"श्रीखंड कुठे आहे" मी विचारले

"जेव शेवटी वाढतो" मुलगा म्हणाला.

" कमी साखरेचे थोडे लिंबू पाणी घे" मुलगा म्हणाला. ते लिंबूपाणी फार चविष्ठ होते. शेवटी त्याने पिशवीतून ते साखररहित श्रीखंडाचे कार्टन काढले. ते साधे दही होते. मी चविष्ठ श्रीखंड समजून ते दही खाल्ले. काय करणार? साखर विरहित श्रीखंड काहीच असणार? काहीही हं श्री श्रीखंड!

***********************

## २२सावर रे

रामाच्या त्या मंदिरात जोरजोरात आरती चालू होती. मी एकदम गप्प! मी नक्की कुठून आले कुठे चालले आहे? त्या घरातून मी का बाहेर पडले, तरीही माझे मन त्या घराकडे का ओढ घेते. मी का जन्माला आले ? का जगले व जिवंत राहून काय मिळवले? माझी जीवनयात्रा कुठून सुरु झाली व कुठे संपणार आहे? वाटेत त्या यात्रेच्या काळात जागोजागी कोणती स्टेशन लागणार आहेत. मला काही केल्या कळेना. मला राम भेटला कि मला जीवनात राम वाटेना. मला कळेनासे झाले.

कभी कभी मेरे दिलमे ये खयाल आता है

के जिंदगी 'तेरी जुल्फोकी नरम छाव में

गुजर न पती तो शादाप हो भी सक्ती थी

ये रंगो गमकी स्याही जो दिल पे छायी है

'तेरी नजर कि छाव में खो भी सकती थी

मगर ते हो ना सका

मगर ये हो न सका

और अब ये आलंम है के

तू नहीं तेरा गम 'तेरी गुफ्तगु भी नहीं

गुजर रही है ये जिंदगी ऐसे

जैसे ईसे किसीके सहारे कि आरजू भी नहीं

ईनही अंधेरॉमे रह जाऊंगा कभी खोकर,

मै जानता हूं

ऑल इस वेल, असे वर वर म्हणून, ऑल इस वेल असे मन होते का ?

जीवनाच्या यात्रेत यशाचे मुक्काम कुठे कुठे येतात? बाबा सावर रे

मनशांती म्हणजे काय? आई वडिलांचा त्रास होतो म्हणून, त्यांना घराबाहेर फेकणे हि मनःशांती ? स्वतःची एखादी मोठी हवेली असावी, तसा हा देह असतो. पाचशे शिडक्या नऊशे दारे अशी विविध ज्ञानेंद्रिय व संवेदना, सर्व विचार या हवेलीत असतात. कितीही प्रयत्न करा सर्व दरवाजे सर्व खिडक्या बंद होत नाहीत.. मनाला हळवा करणारा भाव उरतो

वसवलेले ते शहर उध्वस्त करणारा भाव, एखाद्या खिडकीतून झरोक्यातून शिरतो. षड्रिपू वैगेरे मोठे शब्द आहेत. सामान्यांना उध्वस्त करायला, एखादा अणु सुध्दा बास होतो. जखमा भरत नाहीत. नासूर बनतात. विकार वाढतात. वृद्धत्व, संवेदना बोथट झाल्या कि, पैलतीरावरिल पुढे गेलेल्या सवंगड्यांची साद ऐकू येते.

मोठमोठी घरे आहेत पण माणसांना आपुलकी नाही, प्रेम नाही. बाबा सावर रे!

जीवनाचा प्रवाह बालपण, तरुणपण व वृद्धत्व या तीन अंकातून जातो. जीवनात कधी कधी वाटते उगीचच आपण एवढे साधे होतो. त्यामुळे आपल्याला हातोहात, सर्वांनी फसवले. त्या फसवणुकीत एखादा दलाल असतो, किंवा एखादा वृद्ध हि असतो. कधी पैशाची फसवणूक, कधी आर्थिक फसवणूक कधी नातेसंबंधां मधील फसवणूक सुद्धा असते. खूप वेळा वाटचाल करताना, तुम्ही वरकरणी हसत असता, आत मन रडत असते. व आपली फसवणूक करून नियती हस्ते.

"सबसे बडा रुपय्या" हि जगाची वृत्ती जखमी करते. सावर रे, मना सावर रे!

पैसे नसल्यास तुम्ही दुखी होणार, हे नक्की असते. मात्र पैसा असल्याने तुम्ही सुखी होणार, हि खात्री नसते. आई वडिलांना वृद्धाश्रमात सोडून तुम्हाला स्वातंत्र्य मिळेल. संतोष नाही. पाचशे खिडक्यातुन विचार येऊ देत, पण ते सद्विचार असू देत. मनाच्या सर्व खिडक्या व सर्व दारे उघडी करा, त्यातून विश्वशांती, सर्वधर्म समभावाचे व बंधू प्रेमाचे विचार येऊ देत.

पाचशे खिडक्या नऊशे दारे

शेतीसाठी झटू या सारे

आई वडिलांना वृद्धाश्रमात मुले पाळणाघरात समजून घेऊ या सारे

सावर रे बाबा सावर रे!

*****************

## २३मागचा बाक

पहाटे, पहाटे मला स्वप्न पडले - मी कॉलेजमधल्या शेवटच्या त्या बाकावर कविता लिहित बसले आहे. तास संपला. सर्व विद्यार्थी वर्ग सुटल्यावर बाहेर निघून गेले. कविता लिहीण्याच्या नादात मला वास्तवाचे भान राहिले नाही. कविता पूर्ण झाली मी वर बघितले, पश्चिमेला खिडकीतून रंगांची उधळण दिसत होती. मी उठले वर्गाबाहेर पडले. कॉलेजच्या लांबच लांब व्हरांड्यात, कॉरीडॉरमध्ये शांतता होती. उंच, उंच कमानी अंधारू लागल्या होत्या. पक्षीही हळूहळू घराकडे परतून िकलबिलाट करत होते. मला पळायला हवे हे जाणवले. मी घावरले, माझ्या बाकीच्या मैत्रिणी कुठे गेल्या? कदाचित कॉलेजातून शहरात जाणारी बस सुध्दा गेली असेल. वर्गातील फर्स्टक्लास फर्स्ट करीयर वाली मुलगी मी, कुठून हे कविता लिहिण्याचे प्रेम सुचले? ही त्या कॉरिडॉरमधून खेळाच्या मैदानंातील झाडाखाली त्यांच्यापैकी कुणी बसले आहे का ते शोधले. कुणीच सापडले नाही. मी सैरावैरा पळायला व त्यांना शोधायला सुरुवात केली. त्यांना शोधत मी रेल्वे ट्रॅकवर आले. ट्रॅकवरुन चालत रस्ता हरवला आणि रेल्वे आली म्हणून बाजूला झाले. पुन्हा चालते झाले. समोर माझ्या कॉलेज क्लासरुमची मागची बाजू होती. मी वर्गात शिरले व मागच्या बाकावर बसले. समोर परीक्षेचा पेपर आला. पेपर देताना बाकीचे सहाध्यायी कुणीच नव्हते. शिकवलेल्या धड्यांचा, या प्रश्नाशी काहीही संबध नव्हता. मी परीक्षेत नापास झाले तर? मला त्या मागच्या बाकाचा राग आला.

मी वैतागले आणि मला घड्याळाच्या गजराने जाग आली. आठ ते आठच्या वेठबिगारीसाठी मी कपडे घालून रेल्वे स्टेशनच्या दिशेने चालू लागले. पोटासाठी पकडलेल्या नोकरीकडे जाऊ लागले. लोकल आली, लोकलच्या डब्यात मी मागच्या बाकावर बसले. पुढे बसलेले लोक हसत, खेळत होते. त्यांची खरेदी, विक्री चालू होती. त्यांच्या गप्पाटप्पात त्यांनी मला अध्याहृत धरले होते. लोकल थांबली, मी शेवटी उतरले. बसच्या रांगेत, मी बाकावर मागे बसले. इतर जण पुढे घुसून जात होते. काही वेळाने खरे तर वेळ निघून गेल्यावर बस आली. बस

मध्ये सुध्दा मी मागच्या बाकावर बसले. मी कुणाच्या खिजगणतीत नव्हते. एक इसम, तिकीट पाच रूपये एवढीच माझी किंमत होती. मी असहाय्य होते. अॉफिसच्या बसस्टॉपवर उतरले. माझ्याबरोबरचीच एक वर्गमैत्रीण बॉस म्हणून प्रसिध्द झाली आहे. तिने मला तिच्या होंडा गाडीतून हात केला. मी नाराज मन लपवून अॉफिसमध्ये आले. माझ्या त्या अॉफिसमधील कोपऱ्यातील मागच्या जागेवर बसले. अॉफिसमध्येही माझ्या येण्याजाण्याची दखल घेणारे फारसे कुणी मित्र मैत्रीणीचे मेळावे नव्हते.

दिवस कामात गेला. घरी आल्यावर मुलगा तक्रार करीत म्हणाला "आई मी उंच आहे, म्हणून मला मागच्या बाकावर बसवतात, मला आवडत नाही." "ठीक आहे, मी शिक्षकांना भेटेन, बोलेन, पण पुढच्या बाकावर बस. मागच्या बाकाने माझे फार नुकसान केले रे!"

मी विचार करू लागले, कुठल्याही शाळा कॉलेज मध्ये मागच्या बाजूच्या बाकावर बसणारे विद्यार्थी, लक्ष न देणारे, थोडेसे ढ, बरेचसे मस्ती करणारे असतात. मागच्या बाकावरच्यांच्या गप्पाटप्पा, लिखाण, खेळीमेळी चालू असते. त्या उलट पहिल्या बाकावर बसणारे हुषार, अभ्यासू, ध्येयवादी असतात.

नाटकाला पहिल्या रांगेत बसणारे व्हि. आय्. पी. किंवा लेखक, टिकाकार असतात. तर मागच्या रांगांत नुसतेच खुर्च्या गरम करणारे असतात, असा समज आहे. सिनेमाच्या थिएटरांचे मागचे बाक तर नेहमीच कसे कुप्रसिध्द असतात. मागच्या रांगांकडे वळून पाहिले तरीही आई रागावत असे.

कॉलेज जीवनात मागच्या बाकावर बसून वह्यांमध्ये चित्र खरवडणे, सामानाची यादी करणे, कपड्यांचे ड्रेस डीझाइन बनवणे, आवडती गाणी लिहीणे, टिकटॉकचा म्हणजे गोळा आणि फुलीचा खेळ खेळणे अशी कामे आपण नेहमीच करतो. त्या कविता, ती गाणी आयुष्यात यश देऊ शकत नाहीत. मागच्या बाकावर शेजारी बसणाऱ्या मित्रमैत्रीणी संकटात कधी सोबत करीत नाहीत. मागच्या बाकावर बसून त्या, त्या अल्लड वयात तुम्हाला जी गंमत वाटत होती, ती

आयुष्यात पुढे "मजेची सजा" झाली, असेच म्हणायला लावते. मागच्या बाकावर लबाड आपल्या नोटस् साठी आपल्याला त्यांच्यात खेचतात. त्यांच्याबरोबर आपण मागे पडतो. ते मागेच पडलेले असतात, त्यांची ध्येय वेगळी!

हॉटेलमधल्या मागच्या बाकावरचे गिऱ्हाईक चार तास गप्पा मारुन कटींगचा चहा पिऊन जाते. हे मालकाला माहित असते. कोर्टात मागच्या बाकावर बसून कामकाज बघणारे फक्त नंबर म्हणूनच काऊंट होत असावे. स्टेडीयमच्या मागच्या बाकावरचे लोक पिटातल्या प्रेक्षकासारखे मानले जातात. मग असे काय असते की मागच्या बाकाचे माणसाला आकर्षण वाटते? मागचा बाक मित्र का वाटतो? तोच मित्र पुढे शत्रू का बनतो?

मला माझ्या कॉलेज जीवनातील एक मुलगा नेहमी आठवतो. खरेतर माझ्यापेक्षा त्याला कमी मार्क होते पण पुढे त्याने अभ्यासात जोर मारला. जाडभिंगाचा चष्मा लावून तो पहिल्या रांगेत बसत असे. घोगऱ्या अावाजात तो वेगवेगळया खास शंका विचारत असे. आंम्ही सरांच्या शिकवण्याकडे लक्ष देत नसू, त्याच्या शंका तर काय अगम्यच वाटायच्या. मागच्या बाकावर बसून पाय, पुस्तक व चष्मा असे त्याचे कार्टून काढून सर्वांना दाखवत असे. आम्ही मैत्रीणी त्याला हसत असू. आज तो प्रथितयश शल्यचिकित्सक आहे. आम्ही मागच्या बाकावरच्यापैकी सर्वजण पोटासाठी कुठेकुठे विखुरलो आहोत. एकदा वर्गात "अभ्यास करत जा, काळाला रिवाईंडचे बटण नसते." असे त्याने मला घोगऱ्या आवाजात, मागच्या बाकावर येऊन सांगितले होते. तो मेडीकलला गेला. मी मागे पडले आणि त्याच मागच्या बाकावर बसून डोळयांच्या शिंपल्यात अश्रू लपवत राहिले. कागदावर काही लिहित राहिले. शब्द धन वाटायचे! कधीतरी या अश्रूंचे मोती होतील. अशी आशा बाळगायचे. कधीतरी माझ्या कविता लोकप्रिय होतील. कॉलेजच्या दिवसात मागचा बाक स्थितप्रज्ञ राहीला. साथ देऊन मला मागच्या बाकाने फसवले. मला मागचा बाक आठवतो पण ---------मागच्या बाकाचा चकवा बोचत राहातो!

******************

## २४ हक्कांशी भांडतो आपण!

हक्क हे आपल्याला जन्मदत्त अधिकाराने कायद्याने मिळायला हवे, पण मिळतात का?

वर्तमानपत्रात "सुखाशी भांडतो आपण" नावाच्या नाटकाची जाहिरात वाचली आणि मला नाटकाचे त्या नावाचे सुद्धा नवल वाटले. खरंच सुख कसे, एखाद्या बक्षिसाच्या गिफ्ट बॉक्समध्ये, चंदेरी आवरणात बांधून, त्यावर रेशमी रिबिनीचं बो बांधून यावे. आपण ते बक्षिस आनंदाने उत्सुकतेने उघडावे, त्यातला तो आनंद वेगळाच असतो.

हल्ली मात्र वर्षानुवर्षे सुखासाठी धडपड करावी लागते. त्या सुखाची वाट बघावी लागते. कंटअऴल्यावर आणि खूप तरसल्यावर ते सुख येते, युद्ध जिंकल्यावर येते तशी थकावट घेऊन मिळालेले ते सुख मग उपचारा पुरतेच उरते. "सुखाशी भांडतो आपण" म्हणावे असेच ते सुख मिळवणे असते.

कलियुगात, बदलत्या काळात, वातावरणात सर्वत्र प्रदूषण भरलेले असताना सुख सहजप्राप्य उरलेच नाही आहे. खूप लोकसंख्या मोठी असलेल्या या देशात, माणसाला माणसाचे कौतुक नाही. मिळालेल्या यशापेक्षा, अजून काहीतरी हवे म्हणून धडपड करावी लागते व ते मिऴाल्यावर, इतक्याच सुखाचे एवढे काय कौतुक? अशा शब्दांनी त्या सुखावर गालबोट लावले जाते. सुख अजून हवे असते. गाड्या दोन असल्या तर तिसरी हवी, घर सेकंड होम हवे, सहली वारंवार हव्या, शिवाय दुसऱ्यांच्या सुखाशी तुलना अधूण मधून चालूच राहते.

आयुष्यभर हा सुखाचं शोध, ही सुखाची तुलना चालूच राहते.

वाटते, भला उसकी साडी मेरी साडी से सफेद कैसे?

असे म्हणणाऱ्या काही बायकां प्रमाणे हेवे दावे, अहंकाराची टक्कर कधीच संपत नाही. माणूस म्हटलं कि ते एक गुण कमी व अवगुण जास्ती असेच गाठोडे असते. तरुण वय, धावपळ,

विकारी भावना, पैसे कमवणे, यात संपते. पुढे कायमच दुसऱ्याच्या सुखाचा हेवा वाटतो, मनाचे खोटे समाधान करून, वरवर सारे काही ठीक आहे, असे खरं दाखवूनही, आतला सल  उरतोच.

सुखांशी भांडतो आपण.हक्कांसाठी लढतो आपण

युद्धच जणू हे रात्रंदिन!

अगदी स्वर्गद्वारी दिसेल यम, तेव्हा फक्त हे संपते रणांगण.

करीत पोचलो नकळत तीर्थाटन

शेवट तव दारी, अन तुझिया दारी, गवसली मम् हक्काची ती शिदोरी

********************

## २५  आहे मजा, जगण्यात या!

सुखाचा शोध, सुखी माणसाचा सदरा, अशा लोककथा आपण नेहमीच ऐकतो. मी सुखी आहे ते रोज दहा वेळा लिहा, म्हणजे तुम्ही सुखी व्हाल, असा हि सल्ला ऐकतो. मात्र सुख हे लबाड असते.ते फसवेगिरी करीत राहते. बऱ्याच काळ दुखी राहिल्यावर, मी एकदा एका क्षणी, सुखी व्हायचा निश्चय केला. कदाचित तो चुकीचा निर्णय, माझी त्या काळची, काही अंशी गरज होती.त्यानंतर, माझ्या जीवनातील ती कित्येक वर्ष, त्या सुखी होण्याच्या हट्टाचे, स्लो पॉयझनिंग मध्ये, गुदमरत होती.

तू कशी तू अशी, तू फुलात मी पानात

मन जाईच्या कळयात, मी चंद्र, तू चंद्रिका

अशी गाणी आठवून मला नेहमीच, जुन्या खुणा शोधण्याची घाई झालेली असे.

हातात हात तिचा,

हात्तिच्याच (सहज) यावा

असा सौम्य संदेश मनात येई, मात्र विरून जाई. छोट्या पडद्यावरच्या, त्या खोट्या पडद्यात, मी उगीचच वेळ घालवत असे.फुलांनी फुलायचे, कळयांनी हसायचे, असे हे प्रत्येक क्षणांचे थेंब, कधी सुकून गेले कळलंच नाही. वाटायचे, घड्याळाचे काटे दोन असतात, कारण माणूस दोन पायानी धावत असतो.एका अपघातानंतर माझ्यातील वेगऴी, ती मी, जागी झाले. वाढत्या वयाबरोबर, मला संगणक शिकणे, रॅट रेस मध्ये धावणे जमणार नाही, हे मी जाणले. त्या दिवशी, ताप आल्यामुळे मी घरी आजारी झोपले होते. ऑफिसची कामे, फोनवरून केली जात होती. घराच्या सर्वांना, त्यांची-त्यांची कामे होती. पोटात भूक मी म्हणत होती. तापाने हातपाय

चालत नव्हते. पाठदुखी पाठ सोडत नव्हती. ऑफिसचे काम पाठी लागले होते. मी आजारपणात सुद्धा मेहनत करीत होते. मला औषधांनी ग्लानी अ ाली होती.

त्या दिवशी माझा मोबाईल वाजला, मला स्वप्नात यमराज दिसले, ते म्हणाले,

"मी तुला न्यायला आलो आहे. 24 तास बाकी आहेत. तुझ्या आयुष्याचा आज शेवटचा दिवस आहे. काय करायचे ते करून घे" मी मोबाईल बंद केला, लाडक्या मैत्रिणीला फोन केला. मुलासाठी गरम चहा करून, मी स्वतःसुद्धा तो चव घेत प्याले. अल्केमिस्ट या माझ्या लाडक्या पुस्तकांची पाने उलटत, मी यमराजाची वाट पाहू लागले. यमराज आले नाहीत. कंदाचीत रॉंग नंबर असावा. त्या क्षणापासून, एक सकारात्मकता माझ्यात आली.जुनी मी काहीशी बदलले

फुलण्याचे दिवस परत आले आहेत.

आहे मजा जगण्यात या.

रोजचा दिवस आनंदाने जगणे किंवा आहे त्यात आनंद मानने म्हणजे सकारात्मकता होय. एक राहते घर असताना, वीक एन्ड घर हवे असणे, एक गाडी असताना दुसरी हवी, सहली हव्या, यातून मी अलिप्त झाले.

एका कवितेत कवीने म्हटल्याप्रमाणे  निशब्द संध्याकाळ होती ती

आकाश फिकटल्या ताऱ्यांचे झाले होते.

वेलींची कुजबुज नव्हती कि पानांचे हितगुज नव्हते.

यमराजांचा कॉल पुन्हा आला, यमराज म्हणाले,

"तुला मी त्या दिवशी नेले पण ते त्या पहिल्या कुत्तरओढीच्या धावपळीच्या जन्मातून उचलले, हा तुझा नवा जन्म आहे.तू हे आयुश्य जग”

"मधुमास" नसतानाही मधुरमास वाटत होता. म्हणजे त्या दिवशी यमराज मला न्यायला आले नव्हते, तर सूचना देण्यासाठी आले होते. कामातून निवृत्ती, कधीतरी घ्यावीच लागते. हि निवृत्ती स्वतःसाठीच असते. हे सांगायला यमराज, समोर दिसावे लागतात. खूप जवळ, समोर स्पष्टपणे यमराज दिसले, कि जगण्याची मौज कळू लागते. जीवनाची किंमत मृत्यूचे दूत, दर्शन देवून, समोर येवून समजावून सांगतात.

यमराज पुढे म्हणाले,

“येईन पुन्हा कधी तरी येईन,

तो पर्यंत जीवन जग,

केवळ कसेबसे  जिवंत राहू नकोस"

आहे मजा जगण्यात या.

******************

## २६ उगवता सूर्य,

जन्माला उगवत्या सूर्याची उपमा दिली, तर सकाळ मध्यान्ह, संध्याकाळ अशा जीवनाच्या तीन अवस्था, बालपण, तरुणपण, व वृद्धावस्था होय. पण त्यांचा काळ मात्र बदलतो. कधी प्रास्ताविक उगीचच लांबावे तसे, बालपण लांबते, तर कधी तरुणपणाच्या झुळझुळत्या झऱ्याचे गाणे, मंजुळवाणीत गावे, तसे तरुणपण खुशनुमा असते. सुंदर झाडे, गाणी गाणारी पाखरे असे तरुणपण पटकन, खुशीत संपते.

उतारवय मात्र रेंगाळते, शरीराची साथ मिळेना झाल्याने, हळूहळू कुठल्यातरी काठीच्या आधाराने, कसेतरी ढकलले जाते. एक समज आलेली असते. पैलतीर दिसू लागलेला असतो. त्यामुळे त्या तिरप्या उन्हात, सावल्या मोठ्या वाटू लागतात. डोळयात मोतिबिंदू आल्यामुळे किंवा मोतीबिंदू येऊनही फिकट डोऴयांनी, जीवनाचे महत्व स्पष्ट दिसू लागते. सूर्य नारायण नित्य नेमाने उगवा, अंधाराच्या दारी प्रकाश पाठवा म्हणत, उगवत्या सूर्याला सर्वच नमस्कार करतात. सावलीचा सूर्य आवडत नाही असे नाही, पण उगवत्या सूर्यात ऊर्जा असते. प्रसन्नता देण्याची शक्ती असते. अभावाचे जीवन जगणाऱ्याना, दगड धोंड्यांना, सुवर्णमय करण्याची शक्ती सूर्यात असते. मी असे सांगतेय म्हणून, "अलिबाग से आएला समझा है क्या?" म्हणून टाळू नका. सूर्य हा सर्व विश्वाचा केंद्रबिंदू आहे व ऊर्जेचा स्रोत आहे.

आज निसर्गातील सर्व नैसर्गिक ऊर्जेचे स्रोत, वापरण्याची वेळी अाली आहे. वाऱ्यापासून चालणाऱ्या पवचक्क्या, सूर्यचुली, व नैसर्गिक वातानूकुलता देणारी यंत्रे, जलयंत्रे वापरायला हवीत.

निसर्गसुद्धा माणसाला किती भरभरून देतो, फुले, फळे, यांची ती टोपली, शुद्ध हवा, निर्मळ पाणी तो परमेश्वर निसर्गाच्या हाती ठेवून मानवाला मुक्त हस्ते देतो.

नाही थकवा, कंटाळा नाही

इतुकी माया, कोठेची नाही

सोनेरी सूर्यकिरण जमिनीवर पसरवत, तो सूर्याचा तप्त लालजर्द गोळा, रोजच उगवतो. पण कंटाळा करीत नाही. नवीन आशा घेऊन येतो. नवीन आशा देऊन जातो जगण्यासाठी शक्ती देतो.

किती सुंदर आहे हि सकाळ

देवा दया तुझी, हि शुद्ध दैव लीला

लागो ना दृष्ट माझी माझ्याच वैभवाला

नमस्कार माझा उगवत्या सूर्याला.

******************

## २७ हसरतों के दाग

**युं हसरतोंके दाग मुहब्बत में धो लिए**

**खुद दिल से दिल की बात कही, और रो लिए|**

चाळीस वर्षांपूर्वी गाजलेली हि गझल आज पुन्हा एकदा चर्चेत आली आहे.

जो मिलकर खो जाती है जिंदगी में

उसे मुहब्बत कहते है

जो छूकर भी पायी नहीं जाती

उसे ग़ज़ल कहते है

त्यामुळे हि गझल, तशी सामान्यांच्या डोक्यावरूनच जाणारी आहे. "तुम अगर मेरी नही तो सकती, तो किसी और कि भी नहीं हो सकती" असे किंचाळणारा हिरो, तोकड्या कपड्यात वावरून, शोभेची बाहुली वाटणारी हिरॉईन, त्यांचे ते उथळ वागणे, झाडांभोवती लपंडाव खेळणे, डिस्कोत नाचणे, यावरून तरी मुहब्बत म्हणजे काय? हे कळण्या इतपत ते प्रेक्षक, निर्माते, प्रेमिक प्रगल्भ वाटतच नाहीत. त्यांच्या वागण्यातच, गन्दी हसरतेच हसरते दिसतात. उगीचच अँग्री यंग मॅन म्हणून कालिख फेकत, टाळ्या घेत, सर्वत्र मारामाऱ्यांमध्ये, मधला अजून थोडा मसाला, म्हणून टाकलेले जवळीकतेचे काही सिन, म्हणजे मुहब्बत असे प्रेक्षकांना चित्रपटांनी समजवायचे असते.

आंबट शौकीन लोकांसाठी तर मुहब्बत (अशी) बेडसीनची पर्वणी असलेलेही उथळ चित्रपट निघतात. मग मुहब्बत कशाला म्हणायचे? हसरत?ज्याच्याशी एकनिष्ठ राहणे व त्याने राहावे हि अपेक्षा करणे- हसरत, संसार करणे- हसरत

या सगळ्यांना हसरत म्हणायचे आणि एकमेकांकडून कुठलीही अपेक्षा न करता वेगळ्या वाटेने जायचे, हे प्रेमाचे रूप अनोखे व आगळे रुप असते. शिवाय गायिका पुढे कबुलीच देते. लता दीदींच्या आवाजातील हे गीत बघा

घर से चले थे हम तो ख़ुशी की तलाश में

गम राहमें खड़े वही साथ हो लिए

मुरझा चूका है दिल मगर ये फूल ही तो है

अब आपकी मर्जी इसे पातों में तो लिए

आजच्या लिव्ह इन रिलेशनशिप च्या जमान्यात,

हसरतोके दाग मुहब्बत मी धो लिये, मी कसे समजावून स्पष्ट करून सांगायचे ?

खुद्द दिल से दिल कि बात कही और रो लिये हेतर अजून अवघड,

हसरते शाहिद हुई है, हवस जागी है,

मग, हसरतो के दाग?काय सांगू

**********************

# २८ नाते संबंध

जीवनात आदर्श असे नातेसंबंध सुखद असतात. मात्र ते टिकवणे अवघड असते. जगातील सर्व साहित्याचा गाभा, नाते संबंध हाच असतो.  हि नाती माणसा माणसातील असतील किंवा मानवेतर पाळीवप्राणी पक्षी किंवा वस्तू या सोबतची असतील. पण कथानके नेहमी या गूढ नात्यांभोवती गुंफलेली असतात. विवाहबाह्य संबंधाबद्दलच्या कथा हिट जातात. हल्ली कुटुंबीय, दिवाळीच्या दिवशी साधारणपणे एकत्र घरी जमतात. अजूनही तो सण आपले महत्व टिकवून आहे. त्या दिवाळी पाडव्याला वडिलांनी सुचवले, कि आपण नदीकाठी फिरायला जाऊ या. गाव बघायला आलेले भावाचे मित्र निघाले, वाहिनी हि निघाली. खूपच थंडी होती. काही गावकरी खेकडे पकडत होते. बिळात हात घालून त्यांचे खेकडे शोधणे चालू होते. बाजूला उंच गवत वाढलेले होते. काही मित्र शिकार करत, उगीचच शहाणपणा दाखवत ऊडणारे पक्षी मारत होते. बेडकांचा एक थवा पाण्याभोवती क्वाक क्वाक आवाज करीत फिरत होता.

आपापल्या  मैत्रिणींसह आलेले भावाचे मित्र त्या वातावरणाने भारले गेले होते. वहिनी, गरोदर होती, वाढलेली पोट सांभाळून दुडक्या चालीने पळत होते. घरातल्या प्रश्नां मुळे फिरण्याची उभारी माझ्या वडिलांना नव्हती. मात्र तरीही ते नाराजी दाखवत नव्हते. वडिलांचे वय बघता, ते अजून जास्ती वर्ष माझ्यासोबत राहू शकतील किंबहुना जगतील असे वाटत नव्हते. त्यांना चालताना धाप लागत होती. माझा भाऊ आशावादी होता. म्हणजे वडील जगले तरी ठीक, नाहीतर सर्व मालमत्ता विकून परदेशी जाण्याचा मार्ग त्याच्यापुढे होता. त्याची पत्नी हि काळा सोबत भावाबरोबर, माल घेऊन परदेशी जाण्यास उत्सुक होती. नाईलाजानेच, घरावरचा हक्क जाऊ नये, म्हणून ते गावी येत असत. वडिलांशी त्याने नाते जवळजवळ तोडलेच होते. फक्त त्यांचे मित्र आले कि, त्यांना गाव, वाडा, निसर्ग दाखवायला भाऊ ऊठतो, सहल म्हणून घेऊन येतो.

नदीकाठी फिरत फिरत भाऊ दूरवर गेला. त्याचे मित्र मागे रेंगाळले आणि भाऊ सापडेना झाला. त्या मड्डुमच्या डोहावर हिरवळ होती. कुरणावर बकऱ्या चरत होत्या. पाण्यात भोवरे होते. भीतीदायक प्रकारे, पाणी दाही दिशांनी वाहून येत होते. आकाशात पक्षी विचित्र आवाज करीत होते. फुलांच्या मंद सुगंधात एक विचित्र वास येत होता. मानवी नाती उमलेना तशी जणू फुलेही रुसली आहेत.

नातेसंबंध हा एक गुंता गुंतीचा प्रश्न उरला आहे असे वडील नेहमीच म्हणत. आज त्याच्या डोळयात तेच भाव होते.पाणी जोरात वाहताना बघून धडकी भरत होती. भाऊ पाण्यात वाहून गेला नसेल ना? ओढा नाले, भरून वाहत होते. अर्धातास वाट बघून, आम्ही हिरमुसून, परत आमच्या घरी जायला निघालो. घराजवळच्या कोपऱ्यावर, एका नोकराला आम्ही, नदी नाल्या काठी जाऊन भावाला शोधण्याची विनंती केली.

नदीकाठी बरेच गावकरी जमले. शोधाशोध करूनही भाऊ सापडला नाही. रात्र वर चढली.सर्वजण टेन्शन मध्ये होते. उगीचच प्रश्न नको प्रॉब्लेम नको म्हणून, पहाटेच्या गाडीने भावाचे मित्र पुन्हा त्यांच्या घरी मुंबईला पळून गेले. हे मित्र! मी व वडील रडत होतो, पण ते मित्र हळूच सटकले. सकाळी, लोक जमले, वहिनी रडू लागली “ हे जुने घर अपशकुनी आहे विका आणि चला मुंबईला" ती म्हणाली. मृत्यूचे भीतीत दुपारी बारा वाजले, अचानक भाऊ परत आला. त्याला ताप चढला होता.

अंगाला थोडे खरचटले होते. त्याने सांगितले, कि तो पाण्यात धपकन पडला, मात्र कुणीतरी त्याला उचलून, पलीकडच्या तटावर, उंचावर नेले. रात्र पडल्यावर बाकीचे लोक घरी गेलेहोते व भावाला रस्ता सापडेना. सर्वांना हरवलेली वस्तू परत मिळाली, मात्र मित्रांची पात्रता भावाला कळली..हरवलेली व्यक्ती परत आली. आमचा ताण निवळला.

खरोखर वस्तू हरवल्यावर व "ती" परत मिळाल्यावर तिची किंमत कळते.

नातेसंबंधांचे असेच असते. री -री करत आपण ते बिढार, बुढीच्या खटला प्रमाणे ओढत राहतो. तेव्हा त्याची किंमत कळत नाही. मात्र विरहानंतर त्या नात्याची समज अधिक प्रगल्भ होते. पैसे नसतानाही खरे मित्र असले तर, दिवस आनंदी जातात. आनंद मनात असतो, हॉटेलात, जेवणात नसतो. संकट काळी मित्र मैत्रिणीशी, प्रामाणिक राहायला हवे. राग व्यक्त करायला, ती नात्यातील व्यक्ती वापरणे हि चूक बरेच जण करतात. राग लोभ व्यक्त करायची, पंचिंग बॅग म्हणजे मित्र ? खर्च करताना देखील माणसाने आपली ऐपत बघायची, मित्रांची नव्हे. कठीण समय येता कोण कामासी येतो? चांगले माणूस नशिबानेच भेटते, ते टिकवायचे प्रयत्न आपण करावे. नात्या बद्दल अर्थात हे नियम सामान्यतः लागू आहेत. विचित्र विक्षिप्त व अपवादी व्यक्ती या मानसिक समुपदेशन कक्षेच्या बाहेर असतात.

11 ऑक्टोबर हा मानसिक आरोग्य दिन मानला जातो. त्या मानसिक आरोग्य दिनाच्या शुभेच्छा. नाते टिकवण्या साठी काय करायचे?

मैत्री व नातेसंबंध जोडण्याची व नाते टिकवण्याची सवय ठेवा.

महिन्यातून एकदा फोन, वर्षातून दोनदा शुभेच्छा, वर्षातून एकदा भेट घेणे या ऊपायांनी नाते घट्ट होते.हॅप्पी फ्रेंडशिप डे

****************

# २९ स्त्री स्वातंत्र्यम अर्हति!

आजही स्त्री असुरक्षितच अाहे. असे म्हणतात, खरे तर भ्रामक वल्गनेने, मी मुक्त आहे, म्हणणार्यांनी, कधी कोष सोडलेलाच नसतो. प्रत्येक विचार एक प्रार्थना असते. व देव तथास्तु म्हणून ती इच्छा पूर्ण करतो. आपले मनचं जणू त्या इच्छेला साद घालते. त्यामुळेच काहीही लिहिताना अज्ञाताची भीती, स्त्रीत्वाची असुरक्षितता, पाठलाग करीत राहिली. जीवन म्हणजे यात्रा असते. पण तित बाईचा आदर, भक्ती मात्र नसते. स्त्रीला सन्मान का नसावा? कोषाबाहेर ती इतकी असुरक्षित?

आजची कन्या होतीस, तू उद्याची माऊली

माझ्या वृद्ध मातेची, तू लाडकी लाडली

तुझ्यावर धरायला हवी, हिरवी सावली

तुला दुखावून क्षुद्रांनी, छाती फुगवलेली

आमच्या मुळे व्यथित, ती देवी माऊली

वसुंधरेची काया, तेव्हा वेदनेने थरारली

माफी मागतो तुझी, हात जोडून मुली

समाजाची तुझ्या बाबतीत, दृष्टी चुकली

खरेतर ना बोलून, तू आमची लाज राखली.एक पिता

भूतकाळाच्या काही वेदना ठसठसतात व सूड घ्यावासा वाटतो. त्याच वेळी दुसरे मन सांगते, सूड नको, न्याय हवा. मग हळू हळू आपण न्यूट्रल होतो व आपापल्या मार्गावर चालतो. कुत्रा चावल्यावर कुत्र्याची भीती वाटावी, तसेच काहीसे मला पर्यटना बद्दल वाटते. जगन्नाथ

पुरीला आईला हृदय विकाराचा झटका आला व आई वारली, तेव्हा पासून मी कधी पर्यटनाला गेले नाही. वर्तमानाला लागून येणाऱ्या भूतकाळाच्या आठवणी, कधी बालपणात नेतात तर कधी त्या एकाकीपणात ! तो क्षण मनात गारठूनच बसलेला असतो. त्या त्या वेळी, परक्या ठिकाणी, जसे जमेल तसे वागून वेळ काढला, पण त्यामुळेच समुद्र पर्यटनाशी माझी निगेटिव्ह फिलिंग जोडली गेली. स्त्रीत्व नको वाटते. स्त्रीला जीवन पर्यटनाला जायला शारीरिक शक्ती हवी व उगीचच चड्डी बनियान छाप टूर्सवाले, हालच करतात. अशा टूरला जावून व थोडे पैसे वाचवून, आपण आपल्या जवळच्या व्यक्तीच्या आरोग्याशी व आपल्या आयुष्याशी खेळ करतो. असेच मला वाटते. पुढे संताप करून उपयोग नव्हता.

थोडी चिडचिड कंटाळा, संतापाचा उद्रेक, होणारे सहप्रवासी होते, पण पर्याय कुठे होता. महिलांसाठी या देशात, स्वछता गृहे सुद्धा पुरेशी नाहीत.

आंबट शौकीन संधिसाधूंचे प्रमाण, सभ्य पुरुषांच्या अनेक पट आहे. एकाकी मुलींचे अनुभव ऐकून त्या असुरक्षिततेचि भीती वाटते. कुटुंब, न्यायालये, स्त्री हक्क संरक्षण समितीचे ऑफिस, व पत्रकारितेतील अनुभव लक्षात घेता, स्त्री बद्दलच्या दृष्टिकोनाला, चित्रपट जबाबदार असावेसे वाटते. स्त्री करियर करण्यासाठी बाहेर पडून, अधिक असुरक्षित झाली. कोषाबाहेर पडून तिचे फुलपाखरी पंख, अधिक आकर्षक झाले. मात्र पाखरे पकडायचे जाळे व सापळेही पुरुशांचे हाती आले, वाढले.

जीवन म्हणजे येणे, राहणे जाणे,

कधी गुंतणे कधी डाव मोडून जाणे

एकवीस अपेक्षित सोडवून, डिग्री परीक्षा पास होणे,

कसे जगावे नाही कळले. पाठ्य पुस्तकांच्या पानामध्ये

वानवाच होती जगामध्ये धाडस शिवणाऱ्या शाळांची

मांदियाळी मतलबी पैसे काढू, बिळात लपणाऱ्या स्नेह्यांची

फसवणार्यांना मागे टाकून, डोळे पुसत पुढे पुढे जाणे

आव्हानांना तोंड देणे, ठेच खात करायचे संधीचे सोने

वाळवंटांवर धाय मोकलून, मन खंबीर होते म्हणे

देव दोतो आशीर्वाद, माणूस मात्र लाजिरवाणे

संस्कारांच्या शिदोरीवर, खणखणते आपुले नाणे.

सोडून गेलेले सोबती, तेव्हा उधळती स्तुतीसुमने

फायद्याच्या गुळाच्या ढेपेपाशी, लबाडांचे लाळ गाळणे

यशस्वी झाल्यावर मात्र येतील घेऊन फुलपाने

स्त्री म्हणून जगताना असे कोषातून हे उमलणे

स्त्री म्हणून जगताना असे मिटूण जाणे

न स्त्री स्वातंत्रम अर्हती, हे मनूने स्त्रीला नव्हे तर पुरुषाला उद्देशून म्हटले असावे.

कि हे पुरुषा, तुला स्त्रीला त्रास देण्याचे हे स्वातंत्र्य योग्य नाही.

स्त्री स्वातंत्रम अर्हती

*******

## ३० समुद्र पक्ष्यांचा थवा*******************

अनंतगुणमयी सांगू लागली, “समुद्र पक्ष्यांचा थवा बघायला आम्ही मैत्रिणी नेहमी समुद्रावर जावून बसतो.प्रसन्नवदनाबरोबर त्यदिवशी देखील गेलो· कोळयाची आरोळी, हात हलवणे, जवळपास कुठे खलाशी आहेत किनारा आहे हे, सांगत होते. मला विचारत होते, फुलपाखरांच्या मागे धावणाऱ्या नजरेने मी कुठे निघालेय?

मनाची सीमारेषा ओलांडायला! आम्ही तिघी मैत्रिणी रोज भेटतो. या समुद्र किनारी. वाटते तेव्हढे सोप्पे आहे का ते? अलका नावाच्या मैत्रिणीनी बरोबर मी समुद्र किनारी बसते, जवळचे कुणी नसलेली, गुण नसलेली मी मला सावरायला वेळ हवाय.अजून सुखाची हाव न धरता, मी आहे त्या सुखाची पूर्वीच दृष्ट काढायला हवी होती”.

“ज्याच्यावर प्रेम केले तो सोडून जाईल कल्पना नव्हती.नाईलाजाने ज्याच्याशी लग्न केले, त्याच्यावर प्रेम करण्याची अपेक्षा नव्हती. आपल्याबरोबर मला ने, अशी गळ मी अरमानला घालायला हवी होती का?” पण तरी मला लग्न झाल्यावर प्रश्न सुटल्यासारखे वाटले, ते का?”

अनंतगुणमयी सांगू लागली, “ ब्रेक अप म्हणजे कबर असते, प्रियकराची, मी प्रियकरांच्या कबरी वरच्या अंधार् लाटा, कावळे, दुधभात, फुले बघते.माझ्या प्रियकराची, ती कब्रस्तानातील कबर सुंदर कबर नव्हती, कोपऱ्यात सुकलेली फुले होती.कबरीसी बोलते.

“किती गोष्टी अजून सांगायच्या होत्या”

तुझी रोज आठवण येते.

मला एकटीला सोडून तू का निघून गेलास?

एक मात्र खरे कि तू लहान होतास, अपरिपक्क होतास तू. त्या प्रेमभंगातून सहज सावरलास, पुरुष सावरतातच. पुरुष, हसतात, ते पुढे जातात गालावरचे अश्रू वाळण्यापूर्वी.

या कबरीबर रडत मी काय सांगू?”

माझ्या मनात विचार आला, “मी त्या ब्रेक अप च्या कब्रस्थानातून बाहेर पडले. गर्भपतानंतर तुकड्या तुकड्यात बाहेर आलेल्या त्या बाळा बद्दल., फसवणुकी नंतरच्या काळा बद्दल? कि समाजाच्या घृणास्पद अशा व्यवहाराबद्दल? सर्व अनुरूपता असताना, जमू न देणाऱ्या दगडाच्या देवा तुझी लीला अगाध हो!”

“ तरी दर रविवारी तुझ्या कबरीवर रडत बसून काय करते? जुन्या आठवणी दफन करण्या ऐवजी जागवते.

कुणाचा सूड घेऊ शकले मी?

काय झाले मी फसले?

देवानेच हे असे डाव का मांडले?

खरा गुन्हेगार तर तो देव असतो. “माझे मन विचार करत होते.देव खेळवतो. ती वेळ आणतो. “समुद्रावर आम्ही तिघी मैत्रिणी येतो. गप्पा मारतो, जातो. प्रियकरावर, अरमानवर देवाने कधीही संकटे आणली नाहीत? त्याचे जाऊ दे माझ्यावर का आणली? शापित नागकन्या सारखे भोग माझ्या नशिबी लाद्लेस. अलका भेळ आणते. आम्ही खातो अलका हसरी बोल्ड आनंदी आहे. तिच्या गाडीतूनच आम्ही तिघी येतो.”अनंतगुणमयी असंबध्द बोलत होती.

मी प्रसन्नवदना! मला आज अनंतगुणमयी भेटली. मी प्रसन्नवदना. हि माझी आणि माझ्या मैत्रिणीची गोष्ट आहे. अस्पष्ट भरकटलेली सुद्धा. आमच्या बागेत नलिबांगला मोगऱ्याच्या फुलाचा, लिंबाचा, गवती चहाचा वास घेत मी बसते. सर्व गाव शहरात पळून गेलेय, या

कुटुंबातील भविष्यहीन काही जण इथेच उरले आहेत.मी ठीक आहे, मात्र, थाटात, एखाद्या नटीसारखी देखणी दिसणारी, रुबाबदार राहणारी, ती अनंतगुणमयी, शिळे उरले सुरलेले खाऊन, आश्रमात, दिवस काढत होती. आयुष्य जसे सोप्पे वाटते तसे असतेच असे नाही. देवाच्या काठीचा मार कुणाही वर कधीही आदळतो. विनाकारण? बेगुनाहांवर तर देव काठी झपाट्याने आदळतो.

बारीकशा हवेच्या झुळुकीने आठवण यावी, इतके ते अरमानबद्दलचे प्रेम अनंतगुणमयीचे आत रुतून बसले होते. काय करणी झाली होती कि, त्या प्रेमाचा विसर मला इतकी वर्षे पडला. कोणता शाप होता? जणू नळ दमयंतीला विसरला होता आणि आता पुन्हा ते का आठवावे? कोणतीही वस्तू, नाते, देव पूर्णपणे कधी संपवत नाही. एखादा तुकडा उरतोच! आठवणी पुन्हा काढल्या तर दुखावतात असे म्हटले जाते, पण आठवणी दाबल्या कि नासूर जखम करतात.अनंतगुणमयीचे तसे झालेय.

“हम दिल दे चुके सनम” सारखी कथा बऱ्याच स्त्रियांची असते. पुरुष गुंतलेला नसतो. बाई नात्यातून बाहेर पडलेली नसते. अनंतगुणमयीची तशी कथा झाली असती, तरी चालले असते. पण तिची एकाकी अशी जीवनधारा बघवत नाही. पूर्वी उतावीळ, पेशंन्स नसलेले अनंतगुणमयी आता जड स्थिर झालीय. अनंतगुणमयी आजदेखील, विद्यार्थिनी अथवा अविवाहित मुलगी वाटत असे. पण दम लागणे, ओठावरची तिरपी रेषा फिकट त्वचा व डोळयातून हद्दपार आशा दिसतात.अरमानने फसवल्यावर तिचे बोलणेच बंद झाले होते कारण

आपली दुःख सांगायला तिला कुणी उरले नाही.

अनंतगुणमयी कवितात रमत होती. ते वाईट नव्हते पण फार चांगलेही नव्हते. असे दुःखाचे म्युझीयम ५ मिनिटे ठीक वाटते. पुढे त्या नकारात्मकतेचा उबग येतो.

“who wants marriage? “अलका आमची बोल्ड मैत्रीण म्हणे तिला २ मुले होती. “ who whats kids?” असे म्हणण्यापर्यंत समाजाने ४० वर्षात प्रगती केली. आता खाण्या

पिण्याची आस सुद्धा अनंतगुणमयीला नसेल का? मला माहित आहे अनंतगुणमयीचे सर्व दुःख अरमानला माहित होते. तिचे हाल दुर्दशा पण माहीतच होती, ते कळूनही अरमान ते न कळल्यासारखे दाखवले.

जीवनाची लढाई लढून अनंतगुणमयी हजार वर्षांनी म्हातारी झालीय. मी हि थकलेय, विवश दिसतेय, पण जिवंत आहे. सगळ ठीकच आहे, हे नाटक अनंतगुणमयी माझ्या सारखेच वठवतेय. हजारो वर्षाचे दुःख आवाजात साठलेले, शब्द चन्ना मेरिया गाणे गातेय. मंत्र मुग्ध झालीय. अंधारातून वावरतेय.माझी मैत्रीण फसली आहे. पुर्वी अलका, मी, अनंतगुणमयी एका क्लासला जायचो. क्लास मध्ये मानसोपचार चर्चा असे. अलका सांगे, "जर मनातून एखादे नाते जमले नसेल तरी काही व्यक्ती सुखाचा भ्रम निर्माण करतात"

"स्त्री खूप लांबच्या रस्ता पार करून पुरुषाकडे येते. पुरुषाच्या रस्त्यावर, वाद, जिज्ञासा, सुखाचा शोध असू शकतो. फसलेली स्त्री दरवाजे ठोठावत राहते. बंद दरवाजे उघडत नाहीत.एखादे गीत डोंगरावरून उतरून, मनात उतरावे तसे, प्रेम दुरून येते. साधारणतः सर्वच गीते डोक्यावर वेदनांचे बाड घेऊन येतात, दरीतल्या दगडांवर पोचणाऱ्या हाकांची करुणा घेऊन येतात.का! बाईच्या नशिबी एखादे वळण आले कि, ती परकी होते. तिचा उद्या त्या क्षणाला संपतो. जिथून पुन्हा परत येत येणार नाही, अशा सिमे पलीकडे बाई जाते. लोकगीते हि जणू भविष्यवाणी असतात. पुढे निघून गेलेल्या प्रियकराची, दुःखभार मागे सोडून गेलेल्या प्रियकरासाठी रडत बसलेल्या, हताश प्रेयसीच्या डोक्यावर टोला मारणारी. तो प्रियकर जाणून बुजून गेलेला असतो. ती चेटूक झाल्यासारखी सुन्न बसते. वाट बघत. अनंतगुणमयी सांगे, you gave me back something that belonged to me which you tried to take away but could not.

My confidence in myself" मी

"कठोर प्रियकर, निरोप पण न घेता तो जातो, अधांतरी ठेवून.

हळवे करणारे प्रश्न सोडून. पुढे कसे होणार या प्रश्नाचा खंजीर खुपसून!

It is simple so impossible to express

It is simple so impossible to share

It is simple so impossible to personal

It is simple so impossible to secret

It is simple so impossible to talk about

ती शोधत राहते त्या अनाम, पत्ता न दिलेल्या प्रियकराला आजन्म जो गेलाय.

“स्त्री आयुष्या एवढी किंमत चुकवते. एका दुष्ट प्रियकरावर प्रेम केले याची. घटस्फोट लग्न झाल्यावर होतो. पण लग्नापूर्वीच हा धोकेबाज प्रियकर जीवांचा घडा फोडून जातो.अनंतगुणमयीला तो प्रियकर, अरमान पुन्हा सापडलाच नाही. नंतर सापडला तरी त्यावेळी त्या प्रियकराच्या चेहऱ्यावर एक मुखवटा असतो. सुखी संसारी सभ्य गृहस्थाचा. याच सभ्य गृहस्थाने एकेकाळी प्रेयसीचा खून केलाय, हे तो दाखवतच नाही. अरमानने तसेच केलेय. माझ्या बाबत. अनंतगुणमयी बाबत. हे फसवे पुरुष, जुना काळ काय आत्ताचा काय असे का वागतात? बाई फसते एका ओळखीच्या कडून.

किती वर्षापूर्वी अरमानचा मृत्यू झालाय, हे मला नुकतेच कळले. मी त्याचे कबरीवर जाते, कष्ट करून स्वप्नपूर्ती कडे वाटचाल होत असताना अचानक काही घडते. मनात बोलल्यासारखे खूप असते, पण लोकलाजेस्तव आणि प्रतिष्ठेची कल्पना, यात सर्व दुःखे भुयारात टाकली जातात. फसवले त्याचे नाव देखील मी सांगितले नाही.

प्रेम म्हणजे विस्तवाशी खेळ असतो. भाजून निघतो. काही नाती सांभाळायची, तर काही उचलायची. कुणाचे दुःख लहान, कुणाचे मोठे असते. अशी तुलना करता येते का? प्रत्येकाला स्वतःचे दुःख मोठे वाटते.

एक मैत्रीण मला आवाज चढवून सांगत होती. “माझ्या मुलाला भास होतात, चालत्या गाडीतून उतरून जावेसे वाटते. ती नैराश्यात आहे. तिला इतरांना लोखंडी कांबीने मारावेसे वाटते.” हा प्रकार इतरांचे लक्ष स्वतःकडे वेधण्यासाठी असे.” आशा.

“हो असे लोकं आत्महत्या करत नाहीत” अलका.

नवल म्हणजे त्या मैत्रिणीच्या मुलीने, जीवाचे बरे वाईट केले नाही. तर भलत्याच व्यक्तीने केले.

ती व्यक्ती अलका होती. आमच्या भिशितली. बोल्ड, घर संसार दोन मुले, दोन फ्ल्याट असलेली अलका गेली.लोकांना वाटते, अलकाला, असे काय दुःख असावे. एका हातात थाळी दुसऱ्या हातात आईस्क्रीम, गाडी लेडी डायना सारखे रूप. तरी अलका गेली.Human relationships are complicated.

हेच खरे असावे. अलका कायम आठवते.

मीही जगतेय. अनंतगुणमयी जगतेय आणि सुसाट सुखी आयुष्य जगणारी अलका जग सोडून गेलीय.

समुद्रपक्ष्यांचा थवा पीटर पीटर चर्र चर्र आवाज करीत उडाला.

त्या थव्यात अलकाचा आत्मा असेल का?

आम्ही इतकी फरफट सोसत जगलो.

अलका का जग सोडून गेली?ब्रेक अप चि, अलकाच्या लेखी असलेली, प्रेम कबर कोणती?

दूरवरून फिरून चक्कर मारून, समुद्र पक्षांचा थवा पुन्हा त्या खडकावर बसला.बाई जशी हरवलेल्या प्रेमाकडे येते, तसाच।

## ३१ 'ईक दिन बिक जायेगा माटीके मोल'

कालच वर्तमानपत्रात 'आर के स्टुडिअो' जमिनदोस्त होणार, ही बातमि आली, लवकरच ती जागा विकली जाईल.पण भारतीय प्रेक्षक तो आर के स्टुडिअो, आणि कै राज कपूरला विसरणे कदापि शक्यच नाही.निळया डोळयांचा देखणा, रुबाबदार, वेलड्रेस्ड राज कपूर कायम आठवतो.

माझ्या सारख्या, खूप जुनी मुंबई, नारळीचे बागांची, ट्रामचि, टांग्यांची मुंबई बघितलेल्या, निवडक लोकांना, राज कपुर नावाची मोहिनी तर चांगलीच ज्ञात आहे.

बॅनर

'अार के बॅनर'ची स्थापना, राज कपूर यांनि, १९४८ सालि वयाचे २४ वे वर्षी केली.'आग', 'अंदाज', 'बरसात' 'आवारा', 'श्री ४२०', 'जागते रहो', 'जिस देशमें गंगा बहती है', हे आर के बॅनरचे सुरवातीचे गाजलेले चित्रपट होत.'बरसात' चित्रपटातील एक दृश्य, ज्यात राज कपूर गिटार घेवून उभा आहे, नर्गिस त्यांचे हातावर झुकली आहे, हे चित्र 'आर के फिल्मस्' चे बॅनर बनले.कृष्ण धवल चित्रपटांचे युग आर के बॅनरने गाजवले.

ईमेज

कै राज कपूर, यांचि चित्रपटातील ईमेज, भाबडा गबाळा तरुण अशी होति.प्रत्यक्षात राजसाहेब, रॉयल, श्रीमंत, हुषार, चतुर, पॉश, मस्त होते.पडद्यावरच्या भोळया ईमेजने त्यांना तूफान यश दिले.अतिशय श्रीमंतीत वाढलेले राजसाहेब, happy go lucky होते.चित्रपटातील नटीच्या निवडीपासून, गॉसिप, अफवा, वलय, गाणी ईत्यादि कारणांनी, आर के बॅनरचे चित्रपटांची रसिक वाट बघत.हे चित्रपट मनोरंजन, मसाला, गाणी नशा सारे देत असत.

r k banner sold dreams and entertinment.आर.के .होम प्रॉडक्शन व्यतिरिक्त , 'अनहोनी', 'आह', 'चोरीचोरी', 'अनाडी', 'छलिया', दिल ही तो है, अराऊंड द वर्ल्ड सपनोंका सौदागर, तिसरि कसम, जागते रहो, दिल ही तो है, 'फिर सुबह होगी', हे राज कपूर यांचे नट म्हणून गाजलेले, अन्य चित्रपट होत.बूट पॉलिश, अब दिल्ली दूर नही, हे आर के बॅनरने बनवलेले अन्य सामाजिक चित्रपट होत.

रंगीत चित्रपटाचे युग

१९६४ साली बनवलेला' संगम 'हा अार के बॅनरने बनवलेला, पहिला रंगीत चित्रपट होता.परदेशी चित्रीकरण, आकर्षक सेट्स, देखणी, अंगप्रदर्शन करणारी नटी, गाणी यामुळे आर के बॅनरचे चलत् चित्रांचि, परदेशात देखील कायम चर्चा असे.

राज कपूर वैजयंतीमाला, राजेन्द्र कुमार यांचा 'संगम' हा चित्रपट अमाप चालला.१९७० साली 'मेरा नाम जोकर' मधून ऋषि कपूरची चित्रपटामधील घोडदौड सुरु झाली.'कल आज अौर कल' मधून रणधीर कपूर ला राजसाब नी ब्रेक दिला.१९७३ साली आलेला 'बॉबी' तूफान गाजला.त्यानंतर धरम करम, सत्यम शिवम सुंदरम, प्रेमरोग, राम तेरी गंगा मैलीहे चित्रपट प्रेक्षकांना शोमॅन, राज कपूरची, आर के बॅनरची सुंदर भेट होते.

शोमॅन चार्ली चॅपलीन

भारतीय सिनेमाचा शोमॅन, चार्ली चॅपलीन असे राज कपूर यांना म्हटले जाई.अनेक बक्षिसांनि गौरवल्या गेलेल्या, राज कपूर यांना पद्मभूषण १९७१ साली, दादासाहेब फाळके ॲवार्ड १९८७ साली दिले गेले.२ जून १९८८ रोजी धो धो पाऊस पडत असतांना, अवध्या ६४ व्या वर्षी राज कपूर देवाघरी गेले.जणू त्या पावसात आर के बॅनरचा एक खांब कोसळला.

१९८८ साली आर के बॅनरचे हिना चित्रपटाची सुरवात केल्यानंतर राज कपूर यांचा मृत्यु झाला होता.रणधीर कपूर यांनी आर के बॅनरचा तो चित्रपट पूर्ण केला.त्यानंतर आर के

बॅनरचे प्रेमग्रंथ, आ अब लौट चले, हे चित्रपट आले.लोणि, जिल्हा पुणे येथील, आर के फार्म, काहि वर्षापूर्वी विकण्यात आले.राज कपूर आणि कृष्णा कपूर यांची पाच अपत्ये, तीन मुले, रणधीर, ॠषि, राजीव, दोन कन्या, रीतू कपुर, नंदा, रिमा कपूर जैन आपापल्या परीने यशस्वी झाले.मात्र काळ बदलला, चित्रपटांचे चित्रीकरण परदेशि होवू लागले.स्टुडिअो फारसे चालेना.

काळ बदलला

चेंबूर येथील, आर के स्टुडिअोची होळी, पार्ट्या, येणारे प्रसिध्द लोक, रसिक, नट यामुळे हा स्टुडिअो, आकर्षणाचे केंद्रबिंदू असे.मागच्या वर्षी आर के स्टुडिअोला आग लागली होती.या आगीत महत्वाचे सामान, वस्तू, भस्मसात झाले.आता पर्यंत, ॠषि कपूर हा स्टुडिअो चालू ठेवणार असे मुलाखातीत म्हणत होते.आणि अचानक स्टुडिअो विक्रीची बातमि आली.

ईक दिन बिक जायेगा, मातीके मोल हे, राज कपूर यांच्या चित्रपटातील वाक्य खरे ठरले.

जगरित असते.जन पळभर म्हणती हाय हाय, मी जाता म्हणतील कार्य काय?

अर्धाच टाकूनी डाव जायचे अंती, ध्वज नाचत राही कुणा कुणाचे हाती.

*************************

## ३२ अमरप्रेम

1972 साली रिलीज झालेल्या अमरप्रेम चित्रपटाला नुकतीच 45 वर्षे पूर्ण झाली. 83% लोक या चित्रपटाबद्दल, खूप आवडलेला चित्रपट, असे आजही बोलतात.स्त्रीजिवनाबद्दल सांगणारा, हा वास्तव दर्शी चित्रपट आहे

दिग्दर्शक शक्ती सामंता,

कलाकार . शर्मिला टागोर (पुष्पा), राजेश खन्ना (आनंद बाबू) विनोद मेहरा (नंदकिशोर) सुजितकुमार, बिंदू, ओमप्रकाश, मदनपुरी(नोपाळी बाबू)

संगित दिग्दर्शन - आर.डी. बर्मन,

मूळ कथा - हिंगेर कचोरी, लेखक, विभूती बूषण, बंडोपाध्याय, निशी पदम.

चित्रपट का गाजला?

राजेश खन्नाची छबी, त्याचे हास्य, डोळे मिचकावणे, आवाज यासाठी हा चित्रपट गाजला. शर्मिला टागोरचे रुप, कपडे दागिने, गाणी

कथा

सावत्र आईच्या त्रासाने कंटाळलेला, नंदकिशोर (लहानपणीचा विनोद मेहरा) शर्मिला टागोर (पुष्पा) या गणिकेकडे, माया मिळवतो. पुष्पा त्या बालकात मातृत्वाचे उद्दातीकरण शोधते. गणिका असूनही ती कालांतराने वृद्धत्वाचे काळी एका पुरुषांच्या वस्तीगृहात उर्फ हॉटेलमध्ये भांडी घासते, अभावी जीवन जगते.

बंदिनी

ज्या कलकत्यात नवरात्रीत देवी पूजेसाठी बनवण्याची, दुर्गा देवीची मूर्ति घडवायला, गणिकेच्या अंगणातील माती वापरली जाते, त्या कलकत्ता अथवा बंगाल राज्यात स्त्रीयांचे शोषण, पतीतांचे प्रश्न, गरीब स्त्रीला भोग्य वस्तू मानणे, या गोष्टी सर्रास होतांना आढळते. तसे खरे तर ते जगभरच आढळते. आधुनिक काळात ऑनलाईन फ्रेडंशीप क्लब, डान्सबार आले, त्यापूर्वीपासून गायिका नृत्यांगणा, तवायफ, कोठीवाली नाचनेवाली, 'वो औरत' अशा रुपाने हे घडत होतेच.असे सत्य स्त्रियांची आगतिकता, गरिबी, या देशातील बेकारी, नोकरी न मिळणे, वाढती लोकसंख्या, जबाबदारी टाळणारे, निरुपयोगी नातेवाईक या कथेत आहेत. नाईलाजाने कोठीत राहणारी, पुष्पा संस्कारी स्त्री दाखवली आहे. तर आईचा मृत्यू झाल्यानंतरही आईसाठी पैसे घेवून जाणारा, नेपाळीबाबू या कथेत आहे।.

तो काळ

प्रेक्षकांच्या नजरेतून बघता, 1972 साली तो काळ चेहरे वाचायचा नव्हता. शब्द वाचायता, शब्दांच्या मूळापर्यंत जाण्याचा होता. नवे मित्र मिळवण्याचा होता. अनाथांना आधार देण्या घेण्याच होता. तरीही अगातिक स्त्रिचा फायदा घेणे असतेच, निराधारांचा, शेवटी अंतिम मुक्काम कोठा हाच असतो. स्त्रियांच्या कोठीवरच्या दुनियेतील पुष्पाचे काम, शर्मिला टागोरने केले असले तरी ही ते वास्तवदर्शी आहे. स्त्रियांचे शोषण, सामाजिक विरोध याबाबत हा चित्रपट, कौटुंबिक स्तरासोबत सामाजिक स्तरावर, समाजावर बोलतो.

मानसोपचार:खूप सुंदर मानसोपचार देणारी, कालातीत गाणी या चित्रपटाने दिली.

1) रैना बीती जाये, श्याम न आये

2) चिंगारी कोई भडके तो सावन उसे बुझाये

3)कुछ तो लोग कहेंगे, लोगोंका का काम है कहना

४)ये क्या हुवा

५) बडा नटखट है ये कृष्णा कन्हैया!

ही गाणी खूप गेय, असून जीवनाचे तत्वज्ञान सांगायचे, सामर्थ्य, आनंद बक्षींचे शब्दात आहे.ही गाणी, दु:खी लोकांना, मानसोपचार ठरतात.

स्त्रीजीवन:परित्यक्ता स्त्रीचे, पुष्पाचे जीवन वेदनामय होते.

सामान्यतः पुरुषांच्या जीवनात, दुसरी स्त्री आल्यावर घरची लक्ष्मी रस्त्यावर येता.पण समाज सहानुभूति ऐवजी, अशा स्त्रीला बदनामी देतो.पुष्पाचा पति, परस्त्रीचे नादी लागून, पुष्पाला मारहाण करुन घराबाहेर काढतो. (एक स्त्री दुसऱ्या स्त्रीचे घर का मोडते? जगात पुरुषांची कमतरता आहे का?) हा जागतिक चिरंतन प्रश्न आजदेखील उरलेला आहे, समाजाचा दृष्टीकोन आजही तोच आहे.पुष्पा आईकडे येते पण आई जबाबदारी झटकते. पुष्पाच्या चारित्र्यावर आरोप केले जातात. पुष्पा गळयाला मटका बांधून आत्महत्या करायचा प्रयत्न करते. त्यावेळी तिला गावातील काका (मदनपुरी) नेपाळी बाबू वाचवतो. माया दाखवून सोबत नेतो आणि तिला कलकत्यात कोठीवर विकतो. कलकत्याच्या कोठीवर, आनंदबाबू (राजेश खन्ना) पुष्पा कडे आकर्षित होतात व पुष्पाचे कायमचे गिऱ्हाईक बनतात (सधन). सुजितकुमारचे कुटुंब, पुष्पाच्या गावचे एक कुटुंब, तिच्या कोठी जवळ राहायला येते. त्या कुटुंबांचा बालक, लहान मुलगा, नंदू पुष्पाला जीव लावतो. नंदू पुष्पाला मातृप्रेमाची अनुभूति देतो.

एके दिवशी आनंदबाबूंचा मेव्हणा, पुष्पाला विनंती करतो की तिने आनंदबाबूंचा संसार मोडू नये. आनंदबाबूंचे सुखासाठी, म्हणून त्याग करावा. आनंद बाबूला, कोठ्याचे दार बंद करावे. पुष्पा नंदूमुळे मातृत्व भावनेकडे वळते. नंदूचे वडिल, सुजितकुमार ते कुटुंब पुन्हा खेड्यावर राहायला जातात. त्यावेळी नंदू पुष्पाचे घरी रजनीगंधाचे/निशिगंधाचे रोप लावतो. पुष्पा तो व्यवसाय सोडते.25 वर्षे उलटतात. नंदू व आनंदबाबू व पुष्पा पुन्हा एकत्र येतात. पुष्पा वृद्ध

झालेली असते. तिच्याने मोलकरणिचे काम होत नसते. इतर लोक तिचा अपमान करीत असतात. त्याप्रसंगी नंदू पुष्पाला आईप्रमाणे मानून, स्वतःचे घरी नेतो. चित्रपटभर 'आय हेट टिअर्स' म्हणणारे आनंदबाबू शेवटी रडतात. रडतांना म्हणतात. ‘रडण्यात खूप आनंद असतो, अश्रू वाहू द्यावे.”

तोंडाची वाफ दवडणे म्हणतात म्हणजे वाफेत शक्ती असते. शब्दात शक्ती असते. 'आय हेट टिअर्स' या तीन शब्दांत खूप मोठी शक्ती आहे.

सादारणपणे, तरुण वय धन संचयातच जाते. शेवटी स्त्रीला मातृत्त्वाचा अथवा कुटुंबातल्या कर्तव्याचा आनंद मानतामना दाखवून कथेचा शेवट केला जातो. (उदा. अर्थ, आराधना) वृद्धावस्थेतील स्त्री केविलवाणी बनते. अशा वयात मनातल्या मनात मनतरंग उठतात. फिकटसे गॉसिप करता येते. मन धरायला देवाची मनधरणी करावी लागते. मधुराभक्ती बरी वाटते. पण तो आळस असतो. व्यक्त, अथवा मनातल्या मनात अथवा पुटपुटतं ते अमरप्रेम जपावे लागते.

अमरप्रेम, अशा ती आणि त्याच्या कथा आजही घडत असतात. पण इतके चांगले चित्रपट मात्र आज बनत नाहीत.चित्रपट आजदेखील आठवतो, राजेशखन्ना या सुपरस्टारचे यश त्यातच आहे. शोषणाची, अमर प्रेमाची साखळी अशी किती वर्षे चालू राहणार?

# 33 भरलेल्या जखमा

जखमी व्यक्तिला मदत करणे, हा मनुष्यधर्म आहे असे अध्यात्म सांगते. पण खरे अध्यात्म किती जणांना समजते?रोजच्या जेवणात, चवीचा बदल म्हणून, लोणचे चटणी खावी, तसे संस्कृतीचे अध्यात्माचे तुणतुणे, काही लोक कायम वाजवतात. ती भ्रमसंस्कृती संधी साधू असते. जखमा झाकते, पण जखमा भरायला मदत करीत नाही. अध्यात्माचा, रागावणारा, रडणारा, भाबडा चकचकीत डोळयाचा तो भाबडा बाळ असा स्वतंत्र झालाय. तो मोठा झाला म्हणजे मी वृद्ध झालेय.हल्ली अध्यात्माची फॅशन आलीय. मृत्यूची भिती माणसाला कायम वाटते. कुणी कबूल करते. कुणी करत नाही. मला हल्ली असे वाटते, माझाही पूर्णविराम जवळ आलाय.

१त्यामुळे मी माझ्या शाळेत तीस वर्षांनी भेटायला गेले. नवे शिक्षक, नवीन विद्यार्थी होते. गणवेष बदलला नव्हता. पण मुले बदलली होती. पण शाळेचे ईमारतीचा काही भाग तुटलेला होता. त्या भग्न वास्तूत उरल्या होत्या आठवणी! या आवारात, जिथे झाडी होती, माशांचा तलाव होता, आता तिथे काहीच नव्हते. तीस वर्षांनी समृद्ध हिरवीगार शाळेची बाग आक्रसली होती. काही जमीनीचा भाग कुणा दुकानदाराला विकला होती.

2 शाळेची इमारत, राजापूरच्या धनगर वस्तीत होणारा हरिगज्जा हा कलाप्रकारचा नाच, आम्ही या तलावाभोवती करीत असू. या कलाप्रकारात, नृत्यात नाचगाणे, मस्ती, व धिंगा असते. तीथेच आम्ही या शाळेतल्या तळयाभोवती मस्ती करीत असू. तळे बुजवून इथे इमारत उभी आहे.

३ईथले वाचनालय मोडले आहे. मी इथे बसून कविता लिही. माझ्यावर टिका झाली. दुःखाचे भांडवल करते म्हणून लिहिते असे म्हटले गेले. क्रिएटिव्हिटीत मी सर्वात पुढे होते, तरी

थोडी थोडी मागे पडत गेले. शिक्षकांनी माझी जात बघितली असावी. मला फारसे उत्तेजन दिले नाही.

३मैत्रिणी काही फारशा प्रेमळ नव्हत्या. कवितांमधील शब्द म्हणजे काय भावना क्षणिक सूर्यप्रकाश की अंधार? त्या माझ्या कविता, मी अभ्यासात लक्ष देत नाही म्हणून शिक्षकांनी फेकून दिल्या. माझ्या कविता नष्ट झाल्या. रडणे उरले की संपले?

माझ्या जखमांचे व्रण बघा,
तुम्हाला कळतील माझ्या वेदना
या व्रणाचा काळ तीस वर्षांचा,
तरीही जखमा राहिल्या ताज्या
वरवरून भरल्यासारखे व्रण पहा,
पण जखमा नाही त्या भरायच्या

मित्रांनो, शिक्षकांनो, एखाद्या दुःखी व्यक्तिला, मदत करता आली नाही, तरी चालेल, मात्र त्याच्या जखमांवर मीठ चोळू नका. कुणाला कलेत सुधारणा सुचवता आली नाही तर नका सुचवू, पण त्याला नाउमेद करू नका.

काळाने ज्या भरल्या होत्या
त्या जखमा बोलू लागल्या
भरल्या नव्हत्याच त्या.
आतमध्ये दडल्या होत्या.
न भरलेल्या जखमा

# ३४ गच्चीतल्या गप्पा

खरेतर उन्हाळया रात्री, वातानुकूलित खोलीत माझा जीव गुदमरतो. गावातले गच्चीत झोपणे आठवते.गावातली गार हवा, ती हिरवळ, ती बैठी घरे मला आवडते. फार पूर्वी तीस वर्षांपूर्वी पर्यंत, आजचे सारखे, घरोघरी वातानुकूल करणारे यंत्र क्वचितच असे. बाकी उन्हाळ्यातील गर्मीला तोंड देण्यासाठी खसचे पडदे, माठातले पाणि, कलिंगड खापा, अोले पडदे, पंखे, क्वचित कूलर हेच उपयोगात आणत.

रात्री गप्पा रंगतात.दिवस कसातरी जाई, पण उन्हाळयात, गच्चीतच रात्री गाद्या अंथरुन, झोपायची पध्दत रुढ होती. संध्याकाळी सहा वाजता, गच्चीतल्या त्या झोपायच्या जागेवर, पाणी शिंपडून, हंडा पेला ठेवून, घरची गृहिणी, रात्रीच्या त्या गच्चीतल्या गप्पांची आणि झोपण्याची तयारी करत असे. काका एखादा कंदिल / विजेरी जवळ ठेवत असत. सुर्य मावळला, की एकेक व्यक्ती गच्चीत येई. रात्री एकेक चांदणी उगवावी, तसे एकेक महाभाग, एकेक जण वर येई आणि गच्चीच्या पॅरापेट वर बसून गप्पा सुरू होत. रोज काहीतरी घडतच असे, प्रत्येक क्षणी! त्यामुळे गप्पा रंगत. एखादी काकू रेडिअो, टीव्ही समोर बसे, पण लवकरच तिचा त्या घरात, एकटेपणात, भावनांच्या कोलाहलात, जीव गुदमरायला लागे. आपल्याला अहंकार ठेवून एकटेच राहावे लागेल, हे जाणून चांदणे सांडलेल्या, गच्चीत ती हजर होई. रात्रीचा बराच वेळ ग्पा गजाली चालत, झोपणे कमी त्याऐवजी, गप्पांमध्येच रात्र संपे.

कायपे चर्चा?

बोलायला विषय काय?

“केवळ आवाज म्हणजे चेतना नव्हे, गप्पा हव्यात, ” आजी म्हणे.

“या गप्पा की चिडवाचिडवी, की एकमेकाला टोमणे मारणे?” मोठ्या वहिनी.

“मुले भांडतात, शब्दांनी चावतात, ” दादा.

“असू दे कुटुंब आहे, ” आजोबा.

“त्या नातेवाईकांपेक्षा मित्र बरे, ” एखादा तरुण.

“अरे मुलांनो, मित्र दुरून राम, ठीक, नीट दिसतात, व्यवहाराची लक्ष्मणरेषा अ◌ोलांडली की त्यांच्यातला रावण खरे रुप दाखवतो, ” दादा.

“या जगात आल्या बरोबर श्वास घेण्यासाठीही रडावे लागते. मात्र आपण जेवण सहज मिळते म्हणून खात सुटतो. जरा जास्तीच जेवलो मी, ” काका.

“खाण्यासाठी जगू नाही, जगण्यासाठी खावे. स्वत:ची चूक कबूल करणे खूपच अवघड असते, मग आपण खात सुटतो, ” डाएट करणारी एखादी तरुणी.

मला असे म्हणायचे होते, माझ्या बोलण्याचा तसा तो अर्थ नव्हता, असे वाद देखील होत आणि होतात

गच्चीतील पॉट आईस्क्रिम

गच्चीत पॉट आईसक्रिमचा कार्यक्रम पूर्वी फार गाजत असे.हल्लि फॅमिली पॅक आणतात, कुलफी आणतात.

बाप रे डास

डास किडे चावू नये, म्हणून मच्छरदाणि बांधली जाते, किंवा मॅट, कॉईल लावतात.सुरक्षा, आरोग्य महत्वाचे असते.

संवाद

माझ्या मनातले, तुमच्या मनापर्यंत पोहोचवतो, ते मी सांगितलेले कळले, असे तुमची नजर सांगते, तेव्हा संवाद पूर्ण होतो.रात्री reading between lines वाला संवाद, चतुर कथनकार कल्पनेने पुर्ण करतो.वाच्यार्थ, लक्ष्यार्थ सांगतो.असे म्हणतात, ऊष्ण कटिबंधातील लोकांना वायफळ गप्पा मारायला खूप आवडते.

कथाकथन

गोष्ट कोण सांगते यावर, त्या गोष्टीची सत्यता अवलंबून असते.एकांगी, मसाला मारके, सांगितलेली गोष्ट, भाव खावून जाते.चित्रपटातसुध्दा दु:खद गीत गाणारा कलाकार, ते गीत गातो व राजा नाराज होतो म्हणून त्याच्यावर सगळे अन्य लोक रागावतात. तसे रडके लोक, या गच्चीतल्या गजालीत सुध्दा नकोसे असतात. अपरात्री गूढकथा, भूतकथा विनोद यांच्या कथा रंगतात.

रंगलेल्या गप्पा

हल्ली पूर्विसारख्या गप्पा रंगतच नाहीत, दणादण आज्ञेपेक्षा हळूवार बाता, गप्पा, थापा हव्या.नाजूक नाती, प्रवासात भेटलेला परका वाटसरु, रंगतदार निसर्ग, गप्पांना सर्व विषय चालतात.

सुहानी चांदनी राते, हमे सोने नहीं देती

आजोबांचे ज्ञान

आम्हाला आजोबा रात्री गोष्टी सांगत, ते भाव मला आजदेखील आठवतात.वाईट बघून नजर, हळुवार भावना मरु नये, म्हणून केलेले ते समुपद्देशन असे, असते.अध्यात्मिक घटना पासून, ते क्ष ज्ञान, सारे ईथे मिळते.संपूर्ण कुटुंबातील, शेजारचे, विविध वयोगटातील, लोक एकत्र बसतात, बोलतात.

आनंदरंग

हिवाळ्यातील शकोटीभोवतीही अशा कथा रंगत आणतात. जुनाट रंगहीन जीवनातही, गप्पांनी आनंदरंग भरला जातो. म्हणून तर गप्पा “रंगणे” असे म्हटले जाते. रात्री चांदण्यांचि, चंद्रप्रकाशात दौलदारपणे चालणाऱ्या ढगांची चाल, आकाशरुप बघता येते.रात्र तृप्त शांत पहुडलेली असते, काजव्याची एखादी दिवटी चमकते.रंगसावल्या हलतात.रात्री गच्चीत झोपून, पक्षी अोरडला तरी घाबरणारी बाळे सुध्दा धीट होतात.पेंगुळलेल्या डोळयांनी चांदण्या बघत रात्र संपते. पहाटे उजेड आणि प्रकाशाचा गोंधळ होतो.

पहाट

संपलेल्या रात्री, वापरलेल्या चादरी, ढीग करुन अस्ताव्यस्त पडलेल्या असतात, मात्र पहाटे कोरा करकरीत दिवस क्षितिजावर उभा दिसतो.चांदण्या असतील तर पाूस पडत नाही, असे मत आहे.पण तरी रात्री एखाद्या वेळी पाऊस कोसळू लागतो किंवा चार शिंतोडे तरी येतात. मग सर्व झोपण्याचा पसारा, गाद्या, पांघरुण घेवून, जीना उतरुन घरात खाली जायचे. घरात गरम होते, पाऊस चकवा देतो, मग परत गच्चीत यायचे! शांत झोप लागायला पहाट होते. पूर्व दिशा फटफटू लागते, रंग रेषा उधळतात, मग अंग आणि रंग वेगळे उरत नाहीत.

दुसरा दिवस सुरु होतो.

गच्चीतील गप्पा, मनाच्या कोपऱ्यात लपून बसतात, रात्री बाहेर येण्यासाठी।

********************

# ३५शाळा सुटली पाटी फुटली

प्रत्येक व्यक्तीच्या मनात एक शाळकरी मूल लपलेले असते. ते बोलते, संवाद करते.

मनात असेल ते बोला नसेल ते बोला,

पण संवाद संपवू नको रे मना, उगी राहू नकोसच रे मुला!

कधी मन म्हणते, "पण मनाला हल्ली बोलावेसेच वाटत नाही. "असे म्हणणारे रुसलेले ते आतले मूल निरखा.बऱ्याच वेळा हल्ली वाटते मी यात्रेकरू आहे, मी विस्थापित मी जोगीण झाली आहे. “जा मुली जा दिल्या घरी तू सुखी रहा” असे सांगून मला वाटेला लावले गेले आहे, म्हणजे जे मिळाले त्यातच तू खुश रहा इतरांकडून अपेक्षा करू नको व आहे ते स्वीकार असे सांगितले गेले आहे! शाळेनेच हे शिकवले, मला असे वागवले.जगात तत्वे ही भिंतीवरिल सुविचारात असतात, सत्यात नाही. नीट राहा, शाळा संपली आहे, हा संदेश मला हल्ली ऐकू येतो.

आयुष्याच्या चांगल्या वाईट आठवणी, हव्या तेव्हा, हव्या तशा, हवा तोच, भूतकाळ जिवंत करतात. निसटलेले क्षण, अपूर्ण स्वप्नांची फुलपाखरे समोर येऊन, अर्ध्या सत्याचा अर्ध्या पूर्णत्वाचा आनंद, न विसरता येणारी खंत देतात. पूर्ण एकटेपणी कधी टोला खाल्ल्यावर, कधी शाळेसमोरून जाताना, या आठवणी स्नेह वाढवतात. आयुष्याची पाने उलटवतात. शिक्षण ही तपश्चर्या अजूनही आहे. प्रश्न पुढे वेगळेच येतात. शाळेच्या घंटेच्या आवाजाने मुले पांगली, जणू सर्वांना भूक लागली असावी.  पोळे (मधमाश्यांचे)फुटले जणू. पुढे पोटासाठी कोवळे पाय धावू लागले. काही कोकरे रानात वाट चुकली. बालपण शाळेच्या अंगणात हरवले. झापड बांधून, मी देखील शाळेनंतरच्या शर्यतीत धावू लागले. शाळेच्या फळयावरचे सुविचार आठवत, मन आताशा

खंतावू लागले आहे. सत्याचे काटे बोचू लागले आहेत, वेदना बेवारस झालीय. बाहेर दंगा, दणदणीत करमणुकीचे जलशे चालू असताना, मनातले ते शाळकरी मूल एकाकी रडत होते. सर्वांच्याच वाटा वेगळ्या झाल्या. करियरमागे, पैसा देव मानून शाळेतील स्कॉलर धावू लागले.

कधी वाटते चार दिवस शाळकरी पोर व्हावे

आईचा हात धरून दप्तर हलवत शाळेत जावे

वरणभात खाऊन, घरात खुशीत हसत निजावे

पुन्हा व्हावे लहान पक्षी रावे, पुन्हा शाळेत जावे

हरवलेले शाळेचे गाणे भक्तिभावाने गावे

शाळेची आठवण हा, मानवाचे अस्तित्वाचा भाग असतो. शाळांइतकीच, आज समाजाची मनोवृत्ती गोंधळाची आहे. आज विरक्तीचा मुखवटा घालून, चंगळवाद मजा करतोय. देव देवळातून कधीच निघून गेला आहे. संत आता महंत बिझनेसमेन व सेलिब्रिटी झाले आहेत. देवाचा शोध घेण्यासाठी, पर्यटनाची नवनवीन पॅकेजेस बाजारात आली आहेत. यात्रेच्या पॅकेज टूरचे, स्वस्त व आकर्षक पर्याय, विकत मिळतात. ऐच्छिक व विनाकारणही, चंगळलेले लोक, जिभल्या चाटत त्या यात्रेत, देव खरेदी करीत आहेत. सर्वांना फसवून झाल्यावर, आता या कथित अध्यात्मवाद्यांना, देवाला देखील फसवायचे आहे. देव कधी फसतो का? असावा.कदाचित देवसुद्धा फसला असावा.

शाळा मला खूप आवडते. मुले निरागस असतात. अशा वेळी मला बालपण, शाळा ह्या स्मरणरंजनातच रमावेसे वाटते. शाळेचे जड दप्तर घेऊन जाणारा एक विद्यार्थी मुलगा बघून मी थबकते. पुढे याचीही माझ्यासारखी, माझ्या मुलासारखी गोंधळलेली अवस्था होईल? काळाच्या रेट्याशी हा जुळवून घेऊ शकेल? पुढे तो दुष्काळात, नोकरी शोधत पोटासाठी भरकटत

तो “भारत माझा देश आहे” ची प्रतिज्ञा आठवून मनात खंतावेल? शाळांना सुट्टी लागली म्हणून दारूपार्टी करणारे विद्यार्थी बघून अर्धपोटी शिक्षणासाठी केलेली वणवण व हॉस्टेलवरच्या गैरसोयी आठवतात. पुढचे बेकारीचे दिवस छळतात. मात्र शाळेच्या आवारात मात्र गोड आठवणीच असतात.

हल्ली शाळासुद्धा आता पंचतारांकित हॉटेल्ससारख्याच झाल्या आहेत, काही काळ जाण्यापुरत्या व फक्त नवीन मार्गाने पुढे पुढे जाणे शिकण्याकरिता. तरीही मी अजूनही शालेय शिक्षणाबद्दल आशावादी आहे. शिक्षक हे अजूनतरी गुरूस्थानी आहेत.

शाळेच्या इमारतीत मन पुन्हा लहान होते

सैरभैर नजरेनेच अस्तित्वाचे आभाळ व्यापून जाते

अशावेळी मन क्षणभर मागे वळते

आठवणींच्या पाऊलखुणा पुन्हा पुन्हा अनुभवते

हो मी शाळा संपल्यावर लिखाण करते, पोटापुरते कमवू शकते. जेव्हा आंब्याच्या झाडाला आलेला तो मोहोर वातावरण धुंद करून टाकतो, आंब्याच्या मोहोराला आम्रकुसुम नावाने संबोधणे, मोहोर असे म्हणणे रोमांचक व काव्यात्मक वाटते. अशा आंब्याच्या सुगंधी, सृजनक्षम मोहोराची ओंजळ, जशी महाशिवरात्रीला शंकराला वाहतात, तशी मी मायबाप प्रेक्षकांच्या चरणी, लेख  वाहते. शिवाय प्रत्येक आंब्याच्या त्या मोहोराच्या छोट्याशा फुलामध्ये किती मोठी शक्ती असते. त्या छोट्या दाण्यातून पिवळाधम्मक कुयरीच्या आकाराचा गोड, रसाळ आंबा बनू शकतो. त्याचप्रमाणे माझ्या या छोट्याशा स्तंभातील विचारांनी तुमच्या मनात रुजून एखाद्या सुंदर रसाळ विचाराचे, प्रकल्पाचे रूप धारण करावे ही इच्छा धरून मी तो लिहिते.माझे लिखाण शाळा आहेत जणू!शाळा जसे म्हणते, मी काही विक्रीची साखळी चालवत नाही. वस्तू विकत नाही, मी विचार देऊ इच्छिते. ते अनमोल असू शकतात किंवा मातीमोल होऊ शकतात.

माझे शिक्षणाचे तसेच झाले. शाळेत हुशारीला आलेला मोहोर, हो, वादळवाऱ्याने, अवकाळी पावसाने जर झोडपले, तर तो मोहोर गळून जातो व त्या रसाळ फळांची स्वप्ने पूर्ण होत नाहीत. माझ्यासारख्या एखाद्या विद्यार्थ्याचे तसे होऊही शकते पण ते होऊ नये ही इच्छा असते पण त्याला शाळा जबाबदार नसते. दरवर्षी नवा मोहोर येतो, नवी पालवी बहरते व आम्रकुसुमांचा बहर येतो.

जूनमध्ये शाळेत प्रवेश घेणारी विद्यार्थी मुले पाहून वाटते यांचे पुढे काय होईल? शाळेच्या आणि आंब्याच्या मोहोराचा संबंध असतो का? परीक्षा संपताच जेलमधून सुटावे तशी धावत सुटलेली मुले बघून वाटते, यांना शाळा आवडत नसेल का?कदाचित जुन्या पिढीचे शाळा प्रेम व शाळेबद्दलचे आकर्षण वेगळेच असावे. मधली सुट्टी नावाचा, एक कार्यक्रम दूर दर्शन वर प्रसिद्ध होतो, त्यावरून अजूनतरी लोक शाळेच्या स्मरण-रंजनात रमत असावेत. आधुनिक काळात शाळा सुटली पाटी फुटली ही वाक्य रचना काही विद्यार्थ्यांच्या बाबतीतच खरी आहे. आता फारतर म्हणता येईल

शाळा सुटली पाटी फुटली, मुल संगणकात रमली, पोरे मोबाईलवर बोलू लागली, शाळेत जाणे टाळायला लागली .

*************************

# ३६कार्टूनची दुनिया

व्यंगचित्रांना कार्टून म्हणतात. पण कार्टून शब्दात, व्यंगाहूनही अधिक खूप काही लगडून येते. तसा कार्टुन हा विषय, अनेक महिने मनात एखाद्या गुप्तकटाप्रमाणे शिजत होता. संथ पावले टाकत, सासुरवाडीची वाट चालणाऱ्या, माहेरवाशिणीप्रमाणे जड पावलांनी चालत तर होता, पण अगदीच अोल्या मनाने घोळत होता. मी त्याला मनात मुरू दिला, लिहू लिहू म्हणत टाळला. अगदीच बालिश म्हणून खेळण्यांच्या टबमध्ये बुडवून सुद्धा टाकला. पण आज मला त्या लिखाणाला निमित्त झाले, आलेल्या नववर्षाच्या कार्टूनच्या शुभेच्छापत्रांचे!

माझ्या घरी सुट्टी साठी रहायला आलेल्या बहिणीच्या नातीला मी “बंद कर तो टी.व्ही. ते कार्टून बघणे” असा सज्जड दम दिला. आणि तिने मला उलट उत्तर दिले, “आजी माझा निर्मळ आनंद हिसकावू नकोस गं” अचानक मला काळ पंचवीस वर्षे मागे वळल्यासारखे वाटले. माझ्या मुलाला जेव्हा मी टीव्ही वर कार्टून बंद करायला सांगितले तेव्हा तो म्हणाला,

If you take our cartoons away from us, we will grow up without sense of humor and be robots.मुले यंत्रमानव, रोबोट बनू नये म्हणून भावभावनानिर्मितीत, या कार्टून्सचा वाटा असतो.आज मनोरंजनाचा अतिरेक होत असताना व बुद्धिशून्य गाणी व चित्रपट हिट होत असताना, कार्टूनचा निर्मळ आनंद, आपण बालकांकडून हिरावू नये असे मला वाटते, मला कार्टूनचे महत्त्व पटते!

१९७८ साली जेव्हा गुलजार साहेबांनी जंगल बुकसाठी शीर्षकगीत लिहिले तेव्हा ते कार्टून, जंगलबुक मोगली फिल्ममध्ये बघताना वृद्ध सुद्धा बालकांबरोबर रमले. शब्द पण किती छान होते बघाः

जंगल जंगल बात चली है,    पता चला है

चड्डी पहन के फूल खिला है।

नंतर स्पायडरमॅनने, बालकांच्या मनावर चढाई केली. जाळे विणणारा स्पायडरमॅन लहान मुलांच्या खेळण्यात, कपड्यात, कॉलेजच्या, शाळांच्या, बालवाड्यांच्या, फॅन्सी ड्रेस स्पर्धेत दिसू लागला. बालराज्यात त्याचीच चर्चा असे. आभासी व्यक्तिमत्त्वात नंतर आला सुपरमॅन. त्याचे ते उडणे, संकटात धावत येणे, पँटच्या वर अंडरवेअर घालणे, यावर खूप विनोद आले. तो काळ फेसबुकचा नव्हता म्हणून बरे, नाहीतर युट्यूब वर व सर्वत्र "लाईक्स्" चा पाऊस पडला असता.

टेलिटबीज नावाचा एक शो नंतर आला. खास त्या शोसाठी शाळा बुडवणारे विद्यार्थी होते. त्याच दरम्यान सुपरमॅनचे देशी रूप शक्तिमान हे आले. या शक्तिमानमध्ये मालिकेत शेवटी एक संदेश दिला जाई. ज्यामुळे पालकांनाही शक्तिमान आवडे.

पुढे थंबलीना, ऍलीस इन वंडरलँड, पिनाकियो, टॉम अँड जेरी यांनी धमाल उडवली. थंबलीनामधील फुले, वंडरलँडमधील ससा, व पिनाकियोमधला लाकडी बाहुला गाजला. वेगवेगळी स्वप्नवत वाटणारी कार्टून्सची चित्रे कल्पनेची दुनिया रंगवून सजवू लागले. मूळ परदेशी कार्टूनच्या देशी व्हर्जनमध्ये भीम, हनुमान, माय फ्रेंड गणेशा, पोकेमॉन आले. चाचा चौधरीच्या कार्टून्सनी तर देश हादरवून सोडला, हसवूनही सोडला. भालू, ट्वीटी, परी, लांडगा, हिमराणी- सात बुटके (princess and seven dwarfs) sleeping princess झोपलेली राजकन्या, श्रेक, पॉवर गर्ल्स, कॅसल अशा कार्टून्सनी वेगवेगळे विषय पुढे आणले. जन्मजात वैर असलेले टॉम व जेरी, म्हणजे मांजर व उंदीरसुद्धा जगाला मैत्रीचा संदेश देतात.

टॉम अँड जेरीची मोहिनी जगभर खूपच पसरली. MGM Films चा सिंह प्रसिद्ध झाला. अगदी गाडीत रेल्वेस्टेशन वर टॉम अँड जेरी दिसू लागला. व पुढे हमतुमची, कार्टूनसुद्धा त्यामुळेच आली.बच्चे तो बच्चे, बूढे भी! बाप रे बाप! सर्वच बालकांना खदखदून हसवायला

निर्बुद्ध व बाष्कळ विनोदांचे ऐवजी, ते निर्मळ आनंद देणारे कार्टून खूपच आवडते. ही बालके १ ते ९१ वयातील असू शकतात. कार्टून फिल्मप्रमाणे, वर्तमानपत्रातील चिंटू मिंटू, काय म्हणालात?याबरोबर, आर. के. लक्ष्मणचा कॉमन मॅन हीसुद्धा त्या कार्टूनचीच रूपे होती. वर्तमानपत्रातून, मासिकातून ती दूरदर्शनवर चालत गेली व चलत्चित्रे बनली. तरी कोपरखळया मारायचे त्यांचे सामर्थ्य तिळमात्र कमी झाले नाही. उलट अनेक पटीने वाढले. व्होडाफोनचे झुझु खूपच लोकप्रिय झाले.

२००६ साली नटरंग गाजल्यावर “जाऊ दे ना घरी” वर झुझु नृत्य करीत होते. त्यानंतर “हमतुम”ची कार्टून्स गाजली. चित्रे किंवा चलत चित्रे दोन्ही रूपांमध्ये कार्टून्सची चलतीच होती, आहे व होत राहणार आहे. जुने नवे रिमोट कंट्रोल येतील, जातील पण.... Every science begins as philosophy and ends as an art—काहीशी भडक, खोटी तरीही सुबक अशी कार्टून्स अभिजात चित्रकलेतही टिकून राहिली. कार्टूनची कला अशीच व्यंग करता करता, खास कला बनली. गॉडझिला, जुरासिक पार्क, अवतार, अशा चित्रपटात ऍनिमेटेड प्राणी, कधी मोठा अजगर किंवा अजस्र डायनासोर म्हणून दिसू लागले. एक स्वतंत्र कार्टून चॅनेलच, दूरदर्शनवर दिसू लागला. आभासी विश्व आपली पृथ्वी हादरवू लागले. डायनासोर, जुरासिक पार्क, अवतार असे चित्रपट गाजू लागले.लहान मुलांच्या खेळण्यांच्या दुकानात हल्ली कार्टून कला दिसते. भीमाची गदा, श्रीकृष्णाचे सुदर्शनचक्र, रामाचे बाण, पोकेमान, कार्टून्सचे डॅगर्स, बाण धनुष्य, मोगलीचे बूमरॅंग, कार्टूनचे विमान, गिटार! पिक्सार, बिगुल, डॉंकी, हरणे, मिकी माऊस, सिंड्रेला! हल्ली खेळण्याची दुकाने अधिक आकर्षक झाली आहेत. व्हिडियो गेम्स, कॉम्प्युटर गेम्स आले आहेत. पण कार्टूनचे आकर्षण मात्र तसेच आहे.

पक्षी-प्राणी मित्र संघटनांनी तर कार्टून्सचे आभार मानायला हवेत. बगिरा, शेरखान, पंखुली, पक्षी, कुत्री, साप, सिंबा, टॉम जेरी, डालमेशियन कुत्री, सर्किट किडा, मुंग्या, डिस्रे, घुबडे, साप, सर्व प्राणी पक्ष्यांचे ज्ञान कार्टून्सनी दिल्यामुळे, पुढच्या पिढीला हे प्राणी

मित्रवत वाटतात. डॉरीअल, मासे, हत्ती, सिंहसुद्धा पाळीव प्राणी वाटतात. “योजकः तत्र दुर्लभः” असे वाटावे इतके आश्चर्यजनक जग कार्टून्सनी दिले. राजा राणी, राक्षस युद्ध, यापलिकडचे सुंदर व आकर्षक जग मानवाला वेगळ्याच विश्वात नेते. डोनाल्ड डक, बेटी बूप, सिंड्रेला, बार्बी, मिकी माऊस, मोगली, डिस्ने कॅसल ही सर्वाधिक लोकप्रिय कार्टून्स आहेत.

ग्रेट शोमॅन राज कपूर म्हणे कार्टून्सच्या चित्रमालिका बघून, नट्यांचे आधुनीक कपडे बनवीत असे. फनी बनी वरून टोप्यांचे अनेक प्रकार आले. ट्विटर या वेबसाईटवरचा पक्षी हे तर सर्वांचे लाडके कार्टून आहे. स्माईलीज्, कॅट्स, टेडी बेअर्स, ग्रिटिंग्ज्, सर्वात कार्टून्सचेच तत्व आहे व त्या कार्टूनची लोकप्रियता इमोजीत वापरली आहे. डिझ्नेने जगाला डिझ्ने वर्ल्ड नावाचे सुंदर आभासी स्वप्नजगच दिले आहे. डिझ्ने नाव घेताच “आर्ट अटॅक” येतो. मानवी मनाचा आविष्कार म्हणजे ही कार्टून्सची अजब गजब दुनिया होय. चित्रकाराच्या चुकीने अपघातानेच जरी कार्टूनचा शोध लागला तरी जोपर्यंत आकाश निळे राहील व बाळ जन्मल्यावर कोऽहम— क्यूँ? रडत राहील, कार्टून्सची लोकप्रियता कमी होणार नाही.

लिहिणे थांबवते, तुम्हीही थोडा वेळ थांबा! माझी कार्टून बघायची वेळ झाली.

***********

# ३७स्वल्पविराम

डॉक्टरांनी ऑपरेशनचे सांगितले, तेव्हा मला माझ्या तब्बेतीच्या प्रश्नाचे गांभीर्य कळले. पंचवीस वर्ष नोकरीत रोज जाणे २ -२ तास येणे हा pravas पुढे काम, घरी काम, पळापळ, वाकडे उभे राहणे, यामुळे कधीतरी मी खूप आजारी पडणार हे मी जाणून होते. पण आपल्याला अमर पट्टा मिळालाय अशा गैरसमजात वावरत होते. पळत होते. पण ऑपरेशन बेड रेस्ट ने स्वल्प विराम झाला. तब्बेत बघून आज वाटले भविष्य कुणी पहिले आहे. उद्या असेल कि नाही?

मध्यम वर्गीय वृत्तीने सावध राहून आपण काय मिळवले? जगभरात खूप मोठ मोठ्या आजारातून लोक जगतात, तर कधी तापाने सुद्धा मरतात. देव सेवा जेष्ठता पाळत नाही. वाटेल त्याला उचलतो. रोज कुत्र्यासारखे काम करून, मग विश्रांती घेऊ म्हणणार्यांना ती छोटी अल्प विश्रांती न देत चिर विश्रांती देतो. देव म्हणजे लहरी सम्राट असतो व यमराज म्हणजे जंगली जनावर असते. वाटेल त्याला उचलणारे, पंजा मारणारे. राज्य करणे म्हणजे काय? हि सत्ता कुठ पर्यंत? सुख म्हणजे काय? सत्यवतीच्या राजा कुणी व्हायचे " या मुलभूत अभिलाषेने महाभारत घडले ते? शंतनुला मुलासाठी मत्सगंधेचा मोह टाळता आला असता तर भीष्म प्रतिज्ञा झाली नसती. जगात बऱ्याच घरी स्वतःच्या सुखासाठी मुलांच्या सुखाचा बळी दिला जातो. सुदैवाने माझे तसे नव्हते. मात्र. दीर्घकाळ असे बिछ्यान्यात जर पडले तर आपल्या लोकांनाही मी नकोशी होईन किवा होऊ शकते, हे मी जाणते. आता या आजारपणामुळे सगळयाच जुन्या जगाला आपण अंतरणार असे मला हल्ली वाटतेय. राम मंदिरातून स्वर ऐकू येत होते.

जाई जुई शेवंती दुपारी

फुले गुंफली नानापरी

हार गुंफिते कुसरी

देव मी पूजिते सोमवारी

स्वल्प विरामात मी जीवनच रिव्ह्यू करीत होते. विचार बदलू पाहात होते. विश्रांतीने झालेली हानी भरून काढू इच्छित होते.

वारा देई कांगा मल्हारी

तुझे वारीचा मी भिकारी

राम वेचितो कळया

सीता ग गुंफते  माळा

आली ग लगीन वेळा!!

असे ते फुल फळांचे निसर्ग राजाचे रामराज्य संपले. आता कलियुगात फुल पुडा सुद्धा मिळत नाही. मला बाहेर पडायला होत नाही. नोकर मनसे मिळत नाही. पूर्वी भाजी, दुधवाले घरी येत. हल्ली दुध आणायला बाहेर जावे लागते, पूर्वी दहा रुपयाचा वडापाव खाऊन राहता येई. आता आजूबाजूला भारी दुकाने झाली. पण तीस रुपया खाली काही मिळत नाही. नव्वद वर्षाची सासू सकाळी रोज  प्रभात फेरीला जाते. राम मंदिरात जाऊन बसते. मी मात्र अशी घरी पन्नाशीत बिछान्यात पडले. किती दिवस? कदाचित २ महिने. कदाचित बरी होईन कि नाही? मी राम मंदिरातील वर्दळ निरखत बसले.

या राम मंदिरात आईचे बोट धरून परकरी पोर म्हणून गेले. मग तरुण वयात विविध नवस बोलत राहिले. उतार वयात आता भजन- प्रवचनाला जायचे ठरले होते. तर राम रायानीच मला प्रवेश बंद केला. जरा बरे वाटले कि आधी चालत जाऊन त्या राम मंदिरात दिवा लावायचा. असू दे सर्व मंगलच होईल. अशी अशा ठेवूया ! बराच वेळ बसले, आता आत जायला हवे.

डॉक्टरांनी बेड रेस्ट सांगितली आहे. सरळ झोपेच्या गोळया द्या म्हणव नाहीतर मी काहीतरी खुडबुड करतच बसेल. बाईचा जीव स्वयंपाक घरात. संसारात, लुडबुडत राहतो. आपल्या वाचून जग बंद पडेल असे तिला वाटते, व ती राबत राहते विना मोबदला व विनाश्रेय सुद्धा ! आता आजारपणात मदतीला गेले कि मुले खेकसतात. तू झोप म्हणतात पण पोटातली माया झोपू देत नाही. पण लवकर बरे व्हायला हवे.

हल्लीच्या पिढीला नम्रपणे काही सांगताच येत नाही. "झोप आता, तुझ्यावाचून काही देश बंद पडणार नाही" साधेच वाक्य पण मला जखमी करून गेले. या मुलांसाठी सर्व करतो पण त्यांना चार शब्द प्रेमाने बोलत येत नाही.

वृद्धापकाळ जीवन -मृत्यू, बहर- पानगळ चालूच राहते. सांगावे पण कठोरपणे फसवणाऱ्या मित्रांना, स्वार्थी मुंगळयांना प्रियतम, सख्या म्हणून घर फोडणाऱ्या या पिढीला फक्त हातात हात घालून आश्वासक पानाचे महत्व कळावे हि माझी इच्छा ! शब्दांनी माणूस खुश हि होते. इतपत सुद्धा हे त्यांना कळू नये इतके शब्द बोथट झाले आहेत? अजून काय काय ऐकावे लागेल देव जाणे? मनात नसतानाही नकळत कोणी दुखावले जाते हे कळले असे कदाचित माझ्याकडून सुद्धा झाले असेल, माझ्या बालवयात आता तरी आठवत नाही.

श्रीराम श्रीराम श्रीराम म्हणा तिन्ही वेळा

हा सुखसोहळा आगळा वेगळा! राम तार रे !

म्हणत मी बिछान्यावर पडले. किती आजारी व्यक्तींना मी आजपर्यंत शिरा, पोहे, लिंबू लोणचे घेऊन भेटायला गेले. आता मी आजारी असताना चहा बिस्कीट खाते आहे. जातील हेही दिवस जातील. मला लवकर बरे व्हायला हवे हे त्या सर्वातील सार आहे.

"वाचनालयाची पुस्तके बदलायला जा" म्हणून सोसायटीतले कोणी दिसते का म्हणून ग्यालारीतून बघू लागले. कोणीच दिसत नव्हते. मी पुन्हा छताकडे शुन्य नजरेने बघून झोपायचा

प्रयत्न करू लागले. गाण्याची सिनेमाची, टीव्ही ची आवड नोकरीतील धावपळीने सुटली नाहीतर वेळ घालवता आला असता. असे वाटले. लवकर बरे व्हायचे आहे. माझा मयुरपंख स्तंभ पुन्हा पुन्हा वर्षानुवर्ष लिहायचा आहे. खिंडीतल्या गणपतीला दर्शनाला जायचे आहे. माहुलीच्या मंदिरात फोटो काढायचे आहेत. सध्या घरातच सक्तीची विश्रांती आहे. लवकर बर वाटू दे.

हा स्वल्पविराम आहे. वेगवेगळे विषय थोडक्यात लिहून नंतर पुन्हा जोमाने लिखाण सुरु करायचे आहे. स्वल्पविरामा नंतर

ये फुरसत एक रुकी हुई ठहरी हुई चीज नाही हैं

एक हरकत हैं, एक जुंबिश हैं पायी हुई चीज हैं

हा एक स्वल्पविराम आहे. भेटू या अल्पश्या विश्रांती नंतर

*********

# ३८ गाणी, प्रवास पर्वणी, गाणी

प्रवास हा जीवनाचा अविभाज्य भाग झाला आहे यात शंका नाही. 'सुहाना सफर और मौसम हसीन' असे म्हटले जाते. तसेच 'बडी तेज है रफ्तार है जिंदगी की' म्हणतात हे काही खोटे नाही, बस, रेलवे, विमान, बोटी, गाड्या, जहाज, घोडसवारी रोपवे, अशा वाहनांची प्रवास होत राहतो.माणसे स्थलांतर करतात. प्रवास सुखकर व्हावा अशी ईच्छा धरुन, गाणी म्हणत असतात.

हिन्दी-मराठी चित्रपटांचे बघा ना, नट नट्या, प्रवासाला, भेटायला, प्रेमात पडायला, प्रेम प्रणय करायला, चालत्या वाहनात भेटतात.

ऊदा

1चित्रपट दिल, 'हमने घर है छोडा है', माधुरी दिक्षीत व अमीर खान एका ट्रेलर च्या छतावर गातात.

2'मेरे हमसफर, ओ मेरे हमसफर', जीतेन्द्र व शर्मिला टागोर ट्रकच्या टपावर गातात

3 जुन्या 27'डाऊन' या चित्रपटात राखी व नसिरुउद्दीन शाह यांचे प्रेम लोकलगाडीत जमते.

4 एक दुजे के लिए मध्ये 'हम बने तुम बने' म्हणत रति अग्निहोत्री व कमल हसन मोटरसायकलवर भेटतात.

5 खट्टा मिठा त अमोल पालेकर व टीना मुनीम लोकल ट्रेनमध्येे भेटतात, प्रेम करतात 'बातो बातों में प्यार हो जायेगा ' गाणी म्हणतात.कहीये सुनीये गीत गात, प्रवासपर्व आनंद पर्व होते.

6'एक था बुल और एक थी बुलबुल' गाण्यात, नटी नंदा घोड्यावर बसून जाते व शशि कपूर तिच्या आजूबाजूने चालतो.

7'हम दोनो दो प्रेमी दुनिया छोड चले, जाना कहाँ है बता दे' म्हणत नट झीनत अमानला रेल्वे मालगाडीतून नेतो. राजेश खन्ना(चि.अजनबी)

7 'बहारे फिर भी आयेंगी' मध्ये जॉनी वॉकर गाणे गातो ते मोटारमध्ये, हे गाणे 'मिस्टर चॅटर्जी सुनलो दिलकी मॅटरजी'.

8 देव आनंद 1954 टॅक्सी ड्रायव्हर चि, टॅक्सी चालवतो 'जायेंगे तो जायेंगे कहाँ' गातो.

टॅक्सी नं.9369. टॅक्सी ट्रायव्हर अशा चित्रपटात टॅक्सीत प्रेम जमते.

9 'मुहब्बत करलोजी किसने रोका है' केश्तो मुकर्जी गातो.

'पर बडी गजब की बात है इसमें धोका है!'

10 छोटी छोटी सी बात, चित्रपटात, मुंबई  मध्ये बेस्ट बस मध्ये अमोल पालेकर व विद्या सिन्हा अनेकदा फिरतात.

11 रजनीगधांत टॅक्सीत त्यांचे गाणे आहे. 'कई बार यूँ ही देखा है, ये जोमन की सीमा रेखा है'

मन तोडने लगता है।

12 टायटॅनिक (इंग्रजी) चित्रपट तर पूर्ण जहाजावर चित्रीकरण केलेला आहे.

13 टांग्यात दिलीप कुमार व वैजयंतीमाला‘ मांग के साथ तुम्हारा मैंने माँग लिया संसार’ गातात. प्रवासातच मनाचा प्रवास होतो.

14 साथिया चित्रपटात राणी मुखर्जी व विवेक ओबेरॉयचे प्रेम मरीन लाईन्स स्टेशनवर जमते लोकल मध्ये उमलते.

15 ‘दिलवाले दुल्हनिया ले जायेंगे’ मध्ये काजोल व शाहरुख खान ट्रेनमध्ये भेटतात (युरोपच्या)

16 जॉनी मेरा नाम हेमा मालिनी देवानंद प्रॉपरवे मध्ये गाणे गातात.

‘वादा तो निभाया, ओ मेरे राजा’

17 ‘अॅन इव्हनिंग ईन पॅरीस’ मध्ये शर्मिला टागोरसाठी ‘आसमान से आया फरिश्ता प्यार का सबक दिखलाने’ मध्ये तर शम्मी कपूर हेलिकॉप्टरमध्ये उतरतो,

18 चांदनी चित्रपटा मध्ये ऋषी कपूर श्रीदेवीवर हेलिकॉप्टर मधून फूल उधळतो.

19 शर्मिली मधील‘ ओ मेरी शर्मिली’ शशी कपूर गाढवावर बसतो.

20 ‘अपनी तो हर आह एक तूफान है’ देव आनंद, आशा पार्कला एक्सप्रेस ट्रेनमध्ये म्हणतो.

21‘जीवन के सफर में राही मिलते है बिछड जाने को’ गीता बाली व देवानंद मोटर कारमध्ये म्हणतात.

22 कारमध्ये बरीच गाणी आहेत. एक दुजे के लिए लिफ्टमध्ये, कमल हसन, रति अग्निहोत्री हिन्दी कविता टीच करतो(सत्यम शिवम् सुंदरम्)

23 वैजयंतीमाला आणि धर्मेन्द्र लिफ्ट मध्ये गाणी गातात ‘मै े कही कवि न बन जाऊ तेरे प्यार में ऐ कविता’.

24 ‘ मेरे सपनों की रानी कब आयेगी तू’

चित्रपट आराधना, दार्जिलींगच्या मिनीट्रेन मध्ये म्हटलेले आहे.

25 चित्रपट  बर्निंग ट्रेन मध्ये ‘पल दो पल का साथ हमारा पल दो पल की यारी है’ आशा सचदेव ट्रेन मध्ये गाते.

26 ‘ताजा ताजा कली खिली है हम उसके दिवाने है’ असे हृतिक रोशन अमिषा पटेलला म्हणतो क्रूजवर, चित्रपटात . 27 तय्यबअली प्यार का दुश्मन (अमर, अकबर, अँथनी) (यादी खूप मोठी आहे).हे बोरीवलीच्या मिनीट्रेन मध्ये म्हटलेले आहे. ठळक

आठवल्या त्या वाहन गीतांच्या ओळी लिहिल्या आहेत. गावो गुणगुणाते रहो. शर्मिला टागोर, उत्तम कुमार दोघे

28‘कलके अपने ना जायें क्यों हो गये आज पराये’ जहाजावर आहे

29 सायकल वर बसून ‘ए मेंने कसम ली, ए तुने कसम ली’, ‘ तेरे  मेरे सपनें’ दोघेजण गातात.

30 हल्लीच्या पॅडमॅनमध्ये, अक्षयकुमार चे, सायकलवरच ‘आजसे तेरी बीजलीका बील मेरा हो गया’ असे गाणे आहे.

31सुनिल दत्त, नूतनला चित्रपट मिलन मध्ये, ‘हम तुम युग युगसे ये गीत मिलमिल के’ आणि ‘सावनका महिना पवन करे शोर’ मोठ्या जहाजावर म्हणतोे.

32 ‘सारे के सारे रमाको लेकर गाते चले’ जीप मध्ये आहे. चित्रपट- परिचय

33 ‘मुसाफीर हूँ यारो’ चित्रपट - परिचय  बसमध्ये आले. ‘अपनापन’ मधील ‘आदमी मुसाफीर है आता है जाता है’ देखील..बसमध्ये आहे.( सुलक्षणा पंडीत व जीतेन्द्र)

34 समुद्रसफरीवर बरीच गाणी आहेत. 'समुद्रालाच ठरवू भराव घालून समुद्र हरवल्यामुळे समुद्र लांब गेल्या तरी 'रिमझिम गिरे सावन' मधील समुद्रकिनारी चालत म्हटलं आहे

35 'दिल अपना और प्रीत परायी' मधील समुद्रातील सफर आठवते. गाणे 'अजीब दास्ता है ये'. चित्रपट सागर मधील 'सागर किनारे' समुद्रकिनारी आहे.

36 रफ्ता रफ्ता देखील आख मेरी लडी है, रेखा, धर्मेंद्र यांचे गाणे बांधकामाच्या उघड्या लिफ्ट मध्ये आहे.

37 जिंदगी एक सफर है सुहाना, चित्रपट जिंदगी, राजेश खन्ना, मोटरसायकलवर गातो.

38चल छैया छैया, गाणे, शाहरूख खान, रेलवे चे टपावर गातो, चित्रपट दिलसे आहे.

39 हाथी मेरे साथीत, हत्तीवर बसून प्रवास आणि गाणी आहेत.

40 सदमा चित्रपटात म्हशीच्या पाठीवर बसून, प्रवासाचा एक शॉट आहे

41 ये जो है जिंदगी, मालिका, त्यात टायटल सॉंग उंटावर बसून आहे.

सहज कानावर पडत असलेले गाणे मूड बनवते.वेळ मजेत जातो.वाहनांची गर्दी असली तरी चालेल, गाणी आनंद देतात.

प्रवासपर्व कंटाळवाणे होवू देऊ नका.गाणी ऐकत जा. प्रवासात वाहनामध्ये ही, चालता बोलता प्रेम होते, गीत ओठी येते.

गुणगुणत रहा.

गात रहावे, प्रवास पर्व सुखाचे जाईल.

# ३९ प्यासा

पुरुष असाही असतो

चित्रपट सृष्टीतील महान, दुर्दैवी प्रेमकथा असे प्यासाचे वर्णन करता येइल. प्यासा १९५७ सालचा हिंदी चित्रपट आहे. पण तो आजही वैश्विक सत्य सांगतो.

भूमिका- विजय (गुरु दत्त), गुलाबो (वहिदा रहमान) मीना (माला सिन्हा) श्री घोष(रेहमान).

संगीतकार सचिनदेव बर्मन,

दिग्दर्शक गुरुदत्त यांच्यासारखा, आपल्या सर्वच प्रेक्षकांचा, हा आवडता सिनेमा आहे.

ंMust see:भारतातील top २५ must see चित्रपटात प्यासाचा नंबर लागतो. (India times)

प्यासा प्रेम चित्रपटातील, पहिल्या दहा चित्रपटांपैकी  एक आहे.

चित्रपट कथा

चित्रपटाचा नायक, विजय हा एक अयशस्वी कवी आहे. प्रकाशक आणि कुटुंबातील इतर जण, भाऊ विजयची प्रतिभा जाणत नाहीत. भाऊ विजयच्या कविता रद्दीत विकतात. विजय 'तू काही कामाचा नाही' ह्या टोमण्याला कंटाळून विजय घराबाहेर, अधिकतर रस्त्यावर, व्यर्थ भटकंती करीत राहतो.

गुलाबो नावाच्या गाणिकेला, सुस्त्रीला, विजयची कविता सापडते आणि ती विजयच्या प्रेमात पडते. मजबुरीने अन्य पुरुषाशी लग्न केलेली, कॉलेज मधील प्रेयसी मीना विजयला भेटते.जिच्यापासून विजय मनाने दूर गेला आहे. मीनाचे पती श्री. घोष एक चांगले प्रकाशक

असतात. मीनाबद्दल, मनात संशय येऊन, केवळ मीना व विजयच्या संबंधाबद्दल अधिक माहिती काढण्यासाठी, घोष विजयला नोकरीवर ठेऊन घेतात. आर्थिक मजबुरीने विजय ती नोकरी स्वीकारतो. मिनाचा संसार व स्वतःची मजबुरी यामुळे विजय जे गाणे पार्टीत म्हणतो, जे सत्य कालातित ठरले आहे.

"जाने वो कैसे लोग थे जिंनके प्यार को प्यार मिला"

उध्वस्त विजय रेल्वे स्टेशनवर फिरत असताना, एका भिकाऱ्याला आपला कोट देतो, कारण भिकारी थंडीत कुडकुडत असतो. विजय आत्महत्या करेल, या संशयाने हा भिकारी विजयच्या मागे मागे येत असताना, ट्रेन खाली येऊन भिकारी मृत्यू पावतो. भिकाऱ्याच्या अंगावरील, विजयच्या कोटामुळे, कवी विजयला मृत घोषित केले जाते.

विजयला श्रद्धांजली म्हणून, गुलाबो श्री. घोष कडे जाऊन विजयच्या कविता प्रकाशित करून घेते.

"जिंदा आदमी खाकला, मर जाये तो दस लाख का"

या न्यायाने, पैसे कमावायच्या हेतूने, श्री घोष त्या कविता प्रकाशित करून पैसे कमावतो. मरणोत्तर विजय कवी म्हणून गाजतो.

मात्र काही दिवसांनी, आपल्या घरी विजय जिवंत परत येतो व सांगतो' मी विजय आहे'. शाम नावाचा विजयचा मित्र, विजयचे भाऊ, सर्वजण विजयला ओळखायला नकार देतात. याचे कारण, ते सर्वजण घोषबाबू कडे विकले गेलेले असतात. वेडा ठरवून खऱ्या विजयला मनोरुग्णालयात ठेवले जाते. विजयचा पुतळा बसवून मोठा कार्यक्रम ठेवला जातो. त्यावेळी विजय मनोरुग्नालयातून पळून तिथे येतो.

यावेळी जे गाणे आहे ते तर जगातील सर्वोत्तम गाणे आहे.

“ये महलो ये तख्तो ये ताजोन्की दुनिया,

ये इंसानके झुठे रीवाजोंकि दुनिया.

ये दुनिया अगर मिल भी जाये तो क्या है?

स्पर्धेच्या युगात, पैशाच्या अधिक मोहाने 'हा विजय आहे, असे सांगायला काही जण तयार होतात. विजय या साठी तयारी दाखवतो, मात्र विटलेला विजय त्या वेळी सांगतो

, 'मी विजय नाही!' लोकं मारझोड करून, हल्ला गुल्ला करतात. घोष वीज घालवतात, विजयला मारहाण होते, जखमी, हताश विजय गुलाबो सह नवे आयुष्य सुरु करण्यासाठी दूरवर निघून जातो.

येथे चित्रपट संपतो.

खरेच पुरुष एवढे प्रेम करतात? मिनावर जर विजय खरे प्रेम करत असतो, तर तो गुलाबो बरोबर नवे आयुष्य सुरु करायला का जातो? हे प्रश्न उरतातच?

पुरुष अथवा कोणीही खरे प्रेम करू शकते का?की स्वार्थ, सुखसोयींची तडजोड?.

या चित्रपटात दहा गाणी आहेत.

1. हम आपकी आंखोमे इस दिल को बसा दे तो
2. सर जो तेरे टकराये या दिल डूबा जाये
3. ये दुनिया उसीकी
4. जाने वो कैसे लोग थे
5. आज सनम मोहे अंग लगाले

6. जाने क्या तुने कहि

7. जिन्हे नाज है हिंद पर वो

8. तंग आ चुके है हम

9. ये हस्ते हुए फुल

10. ये कूचे ये नीलामघर

या चित्रपटातील महत्वाची वाक्ये

1. लोग अपने शौक के लिये प्यार करते है और अपने आराम के लिये प्यार बेचते है.

2. हसणारी फुले, सुगंध, सुंदर रंगीत जग, भुंग्यांना भुलवणारा मधुकोश, आनंद

या जगातल्या सौदर्यात मी काय भर घालू शकतो?माझे थोडे अश्रू व उसासे ?

3. तू चाललीस कि आकाश जमीन चालते. माझ्या सोबत सावली सुद्धा नसते.

4. तू थांबलीस कि निर्झर व चंद्र प्रकाश थांबतो. मी थांबलो कि माझी व्याकूळ अगतिक संध्याकाळ थांबते.

5. जिन्हे नाझ है हिंद पार वो कहा है?

राधे पुरुष असाही असतो?पगरेम करणारा?

माझे असे मत आहे कि स्त्री जन्मभर प्रेमाची भुकेली असते. पण प्रेमाचा भुकेला, प्यासा, पुरुष सहसा सापडत नाही. एक योगायोग सहज ऐकलेले विधान,

अपघाती भेट माणसाच्या आयुष्याला संपूर्ण वेगळे वळण देणारे कारण ठरू शकते. भक्त हट्ट करू लागला कि देवाला पण संकट पडत म्हणे. असे आयुष्यात प्रेम येते, चटका देऊन जाते. तशी त्या लहान गावात प्यासा चित्रपट बघायची संधी मला योगायोगाने मिळाली. प्रेम, प्रेमभंग वैगेरे गोष्टी ह्या इतरांच्या जीवनात मूर्खांबाबत होतात, असे समजायच्या वयात मी प्यासा बघितला होता. प्यासाची अतीव दर्दभरी गाणी जणू काही जीवनाची tag line बनायचे, ते दिवस नव्हते.

पण ती गाणी खूप आवडत असत.

साहीर लुब्धीयान्विने या सिनेमाची गाणी लिहिली होती. मला आठवते, साहिरच्या ९७ व्या स्मृतीदिनी त्यांची कबर देखील जमीनदोस्त झाली असेल. त्यांची गाणी, ते बोल रेंगाळत आहेत. प्रस्थापित व्यवस्थेला नकार देण्याची हिम्मत, हि गाणी दाखवतात. गाईड, मुगले आझम या चित्रपटाच्या पंगतीत बसायचे भाग्य प्यासा या चित्रपटाला लाभले आहे.

ये दुनिया अगर मिल भी जाये तो क्या है?

या गीताचे उच्चार, अर्थ, भावना याद्वारे हि गाणी सर्व सरहदी पार करतात.

तुम्ही काय समजायचं ते समजा, असे न सांगता, ऐका मी काय सांगतोय. अशी सांगणारी हट्टी गाणी प्यासात आहेत. जी स्पष्टपणे, स्वार्थी जगाची रित सांगतात. स्वतःचेच आरशात दिसणारे, समाजाचे अस्वस्थ करणारे रूप, प्यासा चित्रपटात आहे. मानवी नातेसंबंध असेच असावेत. पुरुष कधी खरे प्रेम करतो का? करू शकतो. गुलाब, शबाब, सुख, लब, इश्कच्या पलीकडे काहीतरी प्यासात आहे.

त्यामुळे वाटते-

ये कूचे ये निलामघर दिल कशी के, ये लुटते हुए कारवा जिंदगी के.

कहा है? कहा है? मुआफिज खुदा के, जिन्हे नाज है, हिंद पर वो कहा है?

समाजात मोठ्या संकटांची, शोषणाची जी मालिका असते, त्याचा खऱ्या whistle blower प्यासा चित्रपट आहे, विजय आहे. गाण्याच्या ढिन्च्याकमध्ये, गाण्याचे बोल हल्ली ऐकू येत नाहीत. मनात रेंगाळणे तर दूरच, जुनीच गाणी पुन्हा नव्या ढंगात, नव्या रंगीत वेष्टनात येतात. Old wine in new bottle. म्हणून रिमिक्स बनतात.

प्यासा हि एका उदयोन्मुख कवीची कथा आहे, ज्याची गाणी त्याच्याच घरचे रद्दीत विकतात. एका गणिका, वेश्या (वहिदा रहेमान) त्या विजयच्या गाण्यावर, पुढे त्या कवीवर प्रेम करते. कलाकाराला पैसे मिळणे अवघड असते. कवि मरत नसतो. कवितांच्या अोळि आणि शायरीच्या चारोळीच्या रुपात कवी कायम जिवंत राहतो.

********************

# ४०लोणचेवाली आजी

आमच्या आईचे नाव लोणचेवाली आजी असे पडायला, तशी अनेक कारणे होती. एकतर कुणीही स्त्री गरोदर असली, की आई करकरीत आंब्याच्या फोडींचे, आंबट गोड लोणचे, डब्यात भरुन, त्या स्त्री साठी पाठवायची. दुसरे तर आमच्या आई सारखे चवदार लोणचे घालणे, कुणालाच जमायचे नाही. तो काळ विकतच्या पापड, लोणची, मसाल्यांचा नव्हता. तेंव्हा आई सारखा लोणच्याचा मसाला व लोणचे शिकायला, अनेक बायका आई कडे येत. शिवाय कैर्यांचे बाठीसह, फोडी करण्याचा धारदार अडकित्ता, त्या एरियात आई कडेच होता. सुग्रास लोणच्यासाठी पुरुष मंडळी देखील आईला मानत असत.

माझ्या नजरेत तर ती माझी आई म्हणून देवीच होती. सामान्य गोष्टीत असामान्यत्व, ती नजर तो नजरीया देतो. तसे फक्त ती माझी आई होती म्हणून नव्हे, तर त्या पंचक्रोशीतील मुलांच्या निबंधांच्या वह्यांमध्ये “आमची आजी” मध्ये आमच्या आईचे वर्णन असे. सासुरवाशीणीच्या मुखी आईच्या अोव्या, भजने, पाळणे, डोहाळगीते असत.

भरपूर मोठी बाग - फुलझाडे, पेरू, आंबा, केळी, पपयांची झाडे यामुळे लहान मुले व फुले यांनी आईचे आंगण कायम भरलेले असे. केसांचे अंबाड्यावर, बागेतले एखादे सुगंधी फुल, ती सहज माळत असे. बागकाम, झाडांना पाणी घालणे, तुळशीला प्रदक्षिणा घालणे, हे तिचे व्यायामाचे प्रकार होते. जीवनात काही सकारात्मक छंद, जसे विणकाम, भरतकाम, मणी लावणे, रांगोळया काढणे, चित्रकला, माळा गुंफणे, अोव्या बनवणे, सर्वांना आवश्यक आहेत असे तिला वाटत असे.

मध्ये, मध्ये मजा करावी, हसावे, गप्पा माराव्यात, नदीवर फिरून यावे असे आई सांगत असे. नवीन वातावरणात नवे विचार मनात येतात असेही ती सांगे. आईची अत्तरे पूर्णपणे

नैसर्गिक असत - मृदगंध, चहा कॉफीचा वास, फुले, वेलदोडे, दालचिनी इत्यादी. तिच्या हाताच्या सुरकुत्यांत, सामान्यांच्या जीवनरेषा होत्या, अनुभवाचे पुस्तक होते, मदर इंडियाच होती ती. आजचे काळच्या, गूगल सर्च प्रमाणे प्रत्येक प्रश्नाचे उत्तर तिच्याकडे असे. घरातले निर्णय घेण्याचे अधिकार, तिला नव्हते .पण मिळालेल्या पैशांचा्, खर्चाचा हिशेब ती व्यवस्थित लिही. काटकसरीने टापटिपीने ती घर चालवी. जगात सोज्वळतेला कमी लेखून चालत नाही, असा तो काळ होता. तिच्या सोज्वळतेत मनास शांती देण्याची शक्ति होती. मंदिरात जाणे म्हणजे तिला कामाची खोटी होणे वाटत असे. दुपारच्या वेळी गॉसिप करणे तिला मंजूर नव्हते. शिलाई मशिनवर जुन्या, नव्या कपड्यांच्या कुंच्या, दुपटे, पिशव्या, खोळी, पडदे, टेबलक्लॉथ अशी काही न काही शिवत, तिची शिलाई जोरात चालत असे.

दिवसभरात ती खुप काम करी. आमचे घर गावाबाहेर होते, त्यामुळे नोकर मिळत नसत, पण ती खूप राबत असे, स्वच्छ ठेवत असे.

व्यथा असो, आनंद असू दे

प्रकाश किंवा तिमिर असू दे

वाट दिसो अथवा न दिसू दे,

गात पुढे मज जाणे, माझे जीवन गाणे, माझे जीवन गाणे,

असे ती म्हणत असे, ती रडव्या तोंडाने कधी वावरली नाही. अगदी झेपेना झाले तरी, तेंव्हाही ती अपार कष्ट करीत बिझी राहिली. मधुमेहाने थकायची, पण इतरांना मदत करायला धावायची. तिच्या दारातून चहाचे घोटा शिवाय, कुंकवाचे बोटा शिवाय, दहीभाता शिवाय, कुणीही रिकामे परत जात नसे.

अपार सकारात्मकता, दुसऱ्यांना मदत करणे, अशी कृती आईची होती. अनेकजणांनी, अनेक वेळा तिला, तिचे मुलांना हातोहात फसवले, तरीही आईने आपली परोपकारी वृत्ती सोडली नाही. खुप संकटे आली, आईचे गाणे जरा उदासी कडे वळले, पण ती  लढली. जनरितीने, लौकिक अर्थाने, ती फारशी शिकलेली नव्हती. माझ्या आजोबांनी घरी शिक्षक बोलवून, तिला कामापुरते साक्षर केले होते. देवाधर्माचे, पोथीपाठ ती माफकच करायची. तिच्यावर संकट आले की - “तू देवाचे अधिक कर” असे कुणी नातेवाईक तिला सांगत असत. मात्र कर्म हाच तिचा देव होता. सर्वांना ती शाळा शिकायला सांगत असे. “शिक्षणाची गाडी चालली रे” यावर तिचा अतूट विश्वास होता.

लाडक्या सुपुत्राला, हवाईदलात जाण्यासाठी तिने उत्तेजन दिले. पुतण्याचा सैन्यदलातील गणवेष ती खुप आदराने बघत असे. स्वत:चे घरासाठी तिने खुप त्याग केले. सासरच्या माणसांचे शिक्षण, माहेरच्यांच्या भेटी, मुलांच्या सुट्या, नातवंडांचे खेळ, मुलींचे माहेरपण सर्व क्षेत्रात ती पास होत गेली. जीवनाला तोंड देणे व आहे त्यात आनंद मानणे, पैसे उरवून, पुरवून वापरणे, तिने सर्वांना शिकवले. चार पावले चालतांना थकणाऱ्या, आजकालच्या आम्ही बायका बघता, तिला आठवून वाटते, एवढी उर्जा ती कुठून आणत असेल? काटकसर करुनही तिचे जेवण चविष्ट कसे बनत असे?

चार ठिकाणचे चार दुकानांचे, भाव बघून, ती वस्तू खरेदी करीत असे. आज वाटते, तिच्याशी वाईट वागणाऱ्यांना ती कशी माफ करीत असेल? खुप वैभवशाली दिवसांनंतर, सेवानिवृत्तीचे काटकसरीचे दिवस आईने काढले. आम्हा सर्व भावंडांना सेटल करून दिले. एक शिक्षित सुसंस्कृत स्त्री काय करु शकते, याचे ती ज्वलंत उदाहरण आहे. तिने आमचे संपूर्ण घर पुढे आणले.

आई वडीलांना वृध्दाश्रमात ठेवणारी मुले बघितली की वाटते, ही माणसे अशी कशी वागू शकतात?लाडक्या मुलांना यश आले, आई मात्र आज हे सुख बघायला भोगायला, राहिली नाही.

त्याकाळी मधुमेह कॉमन नव्हता. आईची मधुमेहाची साखर वाढत असे. आईने गोड अथवा भात खाऊ नये म्हणून, मी घरी शिजवलेला भात लपवून ठेवत असे. माझा हेतू आईची साखर वाढू नये हा असे, पण आई त्यानंतर पुन्हा भात शिजवून मग खाई. आज वाटते मी आईला उगाच त्रास दिला. कारण नसतांना अपराधी वाटते. आजच्या काळात मधुमेहावर कितीतरी अौषधे निघाली आहेत. वाटते, आई जगायला हवी होती. आज आई हवी होती. बाजारातल्या बेचव आणि फोडी मऊ पडलेल्या, पिशवीतल्या, बरण्यांतल्या लोणच्यांच्या भाऊगर्दीत, आईच्या हातच्या लोणच्याची, चव  कधीच मिळतच नाही. लोक उगीच नाही म्हणत, लोणचेवाली आजी गेली आणि लोणच्याचा स्वाद आणि आनंद संपला. एक साठवणीतला पदार्थ, पारंपरिक घरचा स्वाद, म्हणुन तर लोणचे  प्रिय असते. लोणची काय बाजारात पुष्कळ मिळतात, लोणची हे निमित्त आहे. खरी जाणवणारी उणीव तर प्रेमाची आणि स्नेहाची असते.

आई असते जन्माची शिदोरी

सरतही नाही, उरतही नाही.

**************

## ४१चैत्र रे चैत्र

‘उगवला नारायण काय मागू त्याच्या पाशी

बाई ग मागते, हळदकुंकवाच्या राशी

उगवला ग दिनकर, काय मागू त्याच्या पाशी

बाई ग मागते, उदंड आयुष्य लेकरांशी

बालपणी, गुढी पाडव्याला, सूर्योदयापूर्वी अशी, आईच्या मंजुळ आवाजातील आरती कानावर पडे· डोळे किलकिले करून बघितले कि, घर सजवलेले दिसे.आईने गुढीपाडव्यासाठी बांधायच्या, वेळू/बांबूच्या गुढीची तयारी केलेली दिसत असे. लाकडी काठीला, वरती निऱ्या करून बांधलेली साडी लावून, वर तांब्याचा गडू पालथा घातलेला असे. गुढीला हार व साखरी गाठ्यांची रंगीबेरंगी माळ घालून सजवलेली असे, गुढी जणू नवरात्रीत सजवलेलि देवीच वाटत असे.

सण

चैत्री पाडवा हा, हिंदू नवीन वर्ष सुरु होते, हे सांगणारा पारंपरिक सण आहे. प्रभू श्रीरामचंद्र रावणासोबतचे युद्ध जिंकून, वनवासातून परत आले, तो दिवस चैत्र प्रतिपदा, पाडवा होता.तो विजयोत्सव श्रीराम आल्यावर, जनतेने गुढ्या उभारुन, आनंदाने त्यांचे स्वागत करून, साजरा केला. अशी कथनी आहे. गुढी पाडवा म्हणजे चैत्र प्रतिपदा होय. या दिवसापासून बरोबर ९ दिवसांनी रामनवमी येते. त्यामुळे या दिवसापासून, श्रीराम नवरात्र आरंभ करतात.

कर्नाटकात आंध्रात हा दिवस ऊगाडी म्हणून साजरा केला जातो.एकूण काय या उत्सवाला येणाऱ्या शुभ घटनांची, पुढे येणाऱ्या सुबत्तेचे स्वागत करण्याची, सुंदर सोनेरी अशी झालर आहे.

या दिवशी ब्रम्हदेवाने जग निर्माण केले असे पुराणात सांगितलेले आहे.

धार्मिक कृत्ये

या दिवशी सकाळी उठून, अभ्यंग स्नान करून, गुढी उभारावी.

'ब्रह्मध्वजाय नमः' म्हणून गुढीचे पूजन करून पावन व्हावे.

'ब्रह्मध्वज नमस्ते अस्तु, सर्वाभीष्ट फलप्रद,

प्राप्ते अस्मीन्वत्सरे, नित्य मद्गृहे मंगलं कुरू.'

अशी " सबका मंगल हो" या अर्थाची प्रार्थना करून, पंचागावरील गणपतीचे पूजन करावे. या दिवशी संध्याकाळी, सूर्यास्ताचे वेळी, आकाशातील नूतन चंद्रकोरीची पूजा करावी. 'बालचंद्रमसे नमः 'असे म्हणावे. नववर्षातील हे पहिले चंद्रदर्शन असते. वसंत ऋतूची चैत्र पालवी बहरून, निसर्गदेवी सजलेली असते. म्हणून वासंतिक देवी नवरात्र देखील, या दिवसापासून सुरु करतात.

निसर्गदेवी

गुढी पाडवा हे, निसर्गरूपी आदिमायेचे स्वागत असते. फाल्गुनाच्या त्या भकभकित उष्म्यानंतर, निसर्ग कूस पालटवतो. उत्तरायण सुरु होते. अगदी रुक्ष सुकलेल्या झाडाखोडांना देखील, चैत्र पालवीचे वेध लागतात.

अरसिक मनांना सुद्धा चैत्र पालवी, कोवळी पाने, मोहोर, फुलोरा खुलवतो. ओढ लावतात. कोकीळपक्षी कुहू कुहू चा राग आळवतो. आंब्याची सुवर्ण फळे, रंग-केशरी रूपाने, नजरेला जिव्हेला मोहवतात. सांगतात "वसंत ऋतू बहरला" दिवस तापत असला तरी, संध्याकाळचा गार वारा इच्छानंद दायी, आनंदाची पोचपावती देतो.

देहाच्या, सुस्त आळशी कंटाळलेल्या, तिकीट लावून पडलेल्या रेंगाळलेल्या लिफाफ्याला सुद्धा पाडवा ओला स्पर्श करतो. सहन होईना, अशी काहिली, आग संपणार आहे. उष्णता गर्मी संपून, सांगता येणार नाही असा आनंदमय ऋतू पुढे आहे, असा आशाआनंद सुरु होतो. पृथ्वी हिरवा स्क्रीनसेव्हर शोधू लागते. वाळयाचे खसचे पडदे, लाल, काळे माठ, आंबे, कलिंगडाच्या गाड्या, कुल्फीवाले जागोजागी दिसू लागतात.

गुढीपाडव्याचा प्रसाद, म्हणजे कोवळया निंबफूलाचे चूर्ण, चिंच, मिरे, ओवा, साखर, मीठ (नावापुरते) हे कुटून, कालवून बनणारा प्रसाद होय. ते औषधी म्हणून खाल्ले जाते. त्या मुळे रोग शांती होते. आजार बाधत नाहीत, अनंतगुणमयी आहाराची सुरवात, असा हा प्रसाद असतो.

यथाशक्ती दान

आपल्या हिंदू धर्मात प्रत्येक सणालाच सत्पात्री दानाचे पुण्यकर्म सांगितले आहे. गुढीपाडव्याला जुने वर्ष संपून, नवे वर्ष सुरु होते. त्यावेळी प्रत्येकाने जुन्या, नकोशा अतिरिक्त वस्तू, अन्न, कपडे, सत्पात्री दान करायला काय हरकत आहे? माणुसकीची भिंत हि पद्धती, नुकतीच सुरु झाली आहे, तिथे दान करावे.धनिक, पाण्याचे दुर्भिक्ष असेल तिथे या दिवशी पाणपोया घालतात. पाण्याचे माठ दान करतात. अन्नदान करतात.

चैत्र चाहूल

नियोजनाचे पहिले पाऊल, नव वर्षाचा पहिला दिवस, पाडव्याला टाकले .नवीन वर्ष सुरु होताच पंचांगाचे पूजन केले जाते. खोलवर विचारमंथन करून पाहिले तर कळते कि, या सणाला सांस्कृतिक मोल तर आहेच, शिवाय नियोजनाचे अंग देखील आहे. वर्षभरातील सणांचे, दिवाळी दसऱ्याच्या खरेदीचे, बेत ढोबळ आराखड्यात, पाडव्यालाच मांडले जातात.

ठकीचे लग्न वैशाखात, गंगीचे डोहाळेजेवण कार्तिकात

तीर्थयात्रा माघात, माहेरी जायचे पौषात,

असे बेत या दिवशी ठरतात. सण उत्सव मंगलकार्ये, यांची चैत्र चाहूल गुढीसोबतच उभारली जाते. वर्षभरात करायच्या, कुलधर्म कुलाचाराचे नियोजन, संकल्प या दिवशीच घातले जातात. गुढीपाडव्याचा दिवस हा, येणाऱ्या नूतन वर्षाचे, मनाच्या आरश्यात पडलेले, लहान प्रतिबिंबच होय.

मन शुद्ध तुझं,

मनाच्या मशागतीची सुरुवात, गुढी पाडव्याने होते. दुष्टांवर सुष्टांचा विजय, आपण गुढी उभारून जेव्हा साजरा करतो, तेव्हा मनाला समजावतो कि "सुदिन सुवेळी” सर्व दुष्ट शक्ती नष्ट होऊन, अच्छे दिन नक्की येतील.सुखाबरोबर दु:खाचे कडू घोट गिळावे लागतील, जीवनात त्या घटना टाळता येणार नाहीत असा मानसोपचार हा सण देतो. या दिवशी आई आपल्या अपत्याला ओवाळते. पत्नी पतीला ओवाळते आणि सांगते. "औक्षवंत हो"

या विधीमध्ये असा आश्वासक भाव असतो कि तुम्ही माझे खूप लाडके आहेत. मला तुम्ही खूप खूप हवेसे आहेत. नवीन वर्षी, आपले कुटुंब असेच गोडीगुलाबीत आनंदात राहील. स्त्रिया, मुले अलंकारांनी सुवस्त्रांनी विभूषित होऊन उत्साह करतात. फिलगुड सोबत, खोलवर जपलेल्या नात्यांच्या ओलाव्याची मुळे, चैत्री उत्सवाने दृढ होतात. दारी मंगल तोरण बांधले जाते. रांगोळी काधली जाते.दुचाकी चारचाकी, गोधनाची पूजा होते. ज्यामुळे देखिल घरात लक्ष्मी स्थिर होते.

मिष्टान्न भोजन -

गुढीला नैवेद्य दाखवून नववर्ष सोहळा साजरा केला जातो. राम कथा प्रवचन केले जाते.

आंबेडाळ पन्हे हा चैत्री पाडव्याचा खास मेनु असतो. श्रीखंडपुरी, खीर पोळी, जिलबी, पुरणपोळी असे कोणते तरी पारंपरिक पक्कान्न, मिष्ठान्न करून, कुटुंबीय एकत्र जेवून, जेवणा-जीवनाचा आस्वाद घेतात. 'चैत्रे पुण्यमये वसंतसमये' असा थाट असतो.

चैत्रांगण- पाडव्या पासून अंगणात चैत्रांगण मांडले जाते. खास चैत्रांगणाची सुंदर रांगोळी काढून, बाजूला विविध रोपे लावलेल्या कुंड्या ठेऊन, दीप लावून, अंगण सुशोभित करतात. पाहुण्यांना पन्हे आंबेडाळ दिली जाते.

आपला देश कृषी क्षेत्राशी संबंधित असल्यामुळे सण देखील कृषी अमृतानुभवावर आधारित आहेत.पाडवा हा शब्द प्रदुर्भू म्हणजे पीक या शब्दावरून आला आहे.रब्बी पीकाचा हंगाम संपल्यावर हा सण येतो.सण ही सुभाषितेच आहेत. शेतीची मशागत चांगली करून हिरवी लक्ष्मी शेतात यावी म्हणून पेरते व्हा सांगणाऱ्या पक्षाची वाट पाडव्यापासून बघितली जाते.बळी राज्याला, धनधान्य पिकणे हेच लक्ष्मीचे येणे असते.

शोभायात्रा

आधुनिक काळात, नववर्षाचे, विविध कार्यक्रम होतात, शोभायात्रा निघते.या शोभायात्रेत वेगवेगळे संदेश देणारे देखावे असतात.पारंपरिक वेषात मिरवणूक निघते, स्नेहभेटी होतात.रात्री रंगोत्सव होतो.हा बदल देखील चांगलाच आहे.

साडेतीन मुहूर्त

या दिवशी चांगल्या कार्याचा, नवीन शास्त्र शिकण्याचा आभ्यास करायची सुरुवात करतात.वर्षाची धूम खरेदी या दिवशी होते.साडेतीन मुहूर्तातील एक सुमुहूर्त म्हणून, या दिवशी नवीन वस्तू गाड्या, दागिने, घड्याळे मोबाईल इत्यादीची खरेदी केली जाते.

'काळी चंद्रकला तिच्या पदराला मोती

माझ्या ग बापाजीने केली खरेदी अमरावती'

अशी खरेदी, गावभर, गाडीभर खरेदी होते

फुलापानांना हलवणारा वारा महत्वाचा

मायेचा पान्हा महत्वाचा

दान करणारा हात महत्वाचा

जीवनाची गोडी चाखणारा हिम्मतदार महत्वाचा

भरपूर दुःख आले तरी, संसार महत्वाचा

काहीही असो जगण्याचा उत्सव महत्वाचा

जैत ते जैत आला, चैत्र रे चैत्र महत्वाचा

गुडी पाडवा, आनंद वाढवा

*******

# ४२ तपकिरी ताजमहाल

ताजमहालाचा रंग तपकिरी होतो आहे. कारण की ताजमहालावर चिखल आणि मुलतानी मातीचा लेप केला जातो. या मुलतानी मातीमुळे या संगमरवराचे खडबडीत होणे सुरू झाले. मूलतः असलेला वज्रलेप (संगमरवर खराब होऊ नये म्हणून असलेला लेप) मुलतानी मातीमुळे बिघडून गेलाय.

ताजमहालाबद्दल ‘यमुनेकाठी ताजमहाल’ असे आपण थाटात म्हणतो. मात्र ही यमुना नदी कोरडी पडली आहे. ताजमहालाच्या संदुकी व परिसरातील विहिरीत आवश्यक पाणी यमुनेच्या विशाल पात्रामुळेच वाढते. पण लक्षात कोण घेते? भूगर्भातील पाण्याच्या पातळीमुळे ताजमहालाची इमारत खचली नाही. राजस्थानातील अनेक संगमरवरी किल्ले, इमारती, दिलवाडा मंदिराचा संगमरवर दुधाळच राहिला. पण ताजमहाल मात्र मलीन झालाय. कालांतराने भेगा जाणे ही वास्तूंची मोठीच डोकेदुखी ठरू शकते. पण सुधारणा, रखरखाव, दुरूस्ती हवी.

१६५२ मध्ये ताजमहालाच्या घुमटाला भेग गेली होती. डिंक, राळ व गूळ यांच्या मिश्रणाने दुरूस्ती केली गेली. Lime morter मिक्स, चुना + माती + वाळू + पाणी लेपाने दुरूस्ती आधीपर्यंत होई, वज्रलेपाने सुरक्षा केली जाई. वायू प्रदूषण ताजमहालाला खराब करतेय. वारंवार दुरूस्ती व लेपन करावे लागणे हे दुरूस्तीची सामान्य गुणवत्ता व प्रदूषणाची वाढती पातळी दाखवते. ताजमहालाचे विद्रूपीकरण थांबायला हवे.

चिमणीच्या दातांचे चावे व कावळयांच्या टोचा, पक्ष्यांची विष्ठा यांनी रंग खराब होऊ शकतो का?

ताजमहाल जपायला हवा, हे नक्की!

# ४३ आपला सर्वकाळ आनंदात जावो

आपला सर्वकाळ आनंदात जावो.नुकताच ऊन्हाळा संपला, पावसाळा छळून गेला.मान्य आहे.पण हल्ली तर बारमाही उन्हाळा असतो.उन्हाळा न आवडणाऱ्या व्यक्ती खूप असतात. त्यात मी सुद्धा आहे. उगीचच कूलर लावून, एसी लावून, वाळयाचे पडदे लावून, खोलीत अडकायचे, फिरणे बंद करायचे, शी House Arrest सोसावी लागते.

पन्हे, लिंबूपाणी, माठातले पाणी मोगरा, वाळा घालून प्यायले, तरीही तो उन्हाळा आवडता होतच नाही. उन्हाळ्याचे दुःख कमी व्हावे म्हणून, बहुधा शाळा, कॉलेजेसना सुट्टी दिली जाते. मुलांना आजोळी, मामाच्या गावी, सहलीला, देशी परदेशी फिरायला नेण्याचे आमिष दाखवले जाते. काहीजण, “पण तरी उन्हाळा आवडत नाही” असेच म्हणतात.

तर या उन्हाळ्यावर मात कशी करावी? बघूया काही कल्पना सुचतात का?

१) वजन कमी करण्यासाठी, डाएट करायला उन्हाळा चांगला. भूक फारशी लागत नाही. भरपूर पाणी प्यायले की झाले.

२) वेळ घालवायला झाडांना पाणी घाला. पक्ष्यांसाठी पाणी ठेवा.

३) गरमीमुळे दारू, जंक फूड, सिगारेटची इच्छा होत नाही. त्यामुळे सरबत व ज्यूसेसच प्यावेत, तब्येतीला मस्त.

४) ताक, लस्सी, कोकम सरबत प्या. चहा, कॉफी टाळा.

५) लिंबू पाणी भरपूर प्या. विटॅमिन सी मिळते. ताजे वाटते.

६) काकड्या कलिंगड घ्या. ताजेतवाने वाटेल.

७) उसाचा रस प्या.

८) इच्छा नसताना, वडा भजी, सामिष जेवण, मासे खाऊ नका.

९) घरून सोबत पाण्याची बाटली न्या, पाणी प्या.

१०) सैलसर सुती कपडे घाला. छत्री वापरा, पंखे वापरा.

११) वारंवार चेहऱ्यावर पाणी मारा.

१२) दोन वेळा अंघोळ करा.

१३) दीर्घ श्वसन करा.

१४) उन्हात जाताना डोक्यावर रूमाल अथवा टोपी वापरा.

१५) डोळ्यावर गॉगल, काळा चष्मा वापरा.

१६) झोपताना तळपायाला खोबरेल तेल अथवा एक थेंब एरंडेल तेल चोळा.

मग “आपला उन्हाळा आनंदात जावो” ही शुभेच्छा.त्या त्या ऋतूतील सूचना पाळा असाही देशात, हल्ली बारमाही, बारोमास उन्हाळा असतो.

********************

## ४४“नावाचीच राणी, बुद्धिबळातील राणी”

तर मग हो, ही मी सांगते आहे ती आहे राणीची गोष्ट ! राजाच्या राणीची गोष्ट नाही, तर ही बुद्धिबळातील राणीची गोष्ट आहे. बुद्धिबळाच्या पटावरच्या सोंगट्या पाहिल्यात. त्यात  राजा, वजीर, हत्ती, घोडे, शिपाई सर्वजण असतात. नसते कोण, तर फक्त राणी! का? कधी विचार केला आहे? बुद्धिबळात पटावर राणी का नसावी?

तर राणीची कथा, राणी माझी लाडकी मैत्रिण, सुवर्णपदधारक, मेरीट होल्डर, हुशार, सुंदर पण साधी, जगरहाटीचे छक्के पंजे न समजणारी, एक साधी बानळट स्त्री. आता सुगृहिणी होवून, सुस्थित अशा राणीच्या घरी जायला मला खास वेळ आली होती. खास कारण होते, आमच्या, कॉलेजचे रियुनियनचे.

राणीच्या घरी जावून तिच्या दरवाजाची बेल वाजवून, मी घराच्या दाराशी उभी राहिले. आतून जोरजोरात गाण्यांचे आवाज, पाश्चात्य संगीताचे हल्ले ए‍ेकू येत होते. “दार तू उघड, मी उघडणार नाही, तूच उघड” अशी तू तू मै मै ऐकू आली. शेवटी एका स्त्रीने तोंडावरचा घाम, पदराने पुसत, दार उघडले. ती क्षणभर स्तब्ध राहिली व नंतर आनंदाने ओरडली.“तू, शुभांगी” ती राणी होती. माझी लाडकी मैत्रिण.

"राणी, कॉलेजच्या माजी विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन घ्यायचे ठरवले आहे. आपण सर्वांनीच आयुष्याची सेकंड ईनिंग सुरु केली आहे, कॉलेज जीवनाच्या फुलपाखरी आठवणी काढण्यासाठी एकत्र जमायचे. "मी

"वा! दॅट इज ग्रेट” राणी म्हणाली.

"दाराशीच काय बडबड करत बसली? कोण आहे?" घरचा कर्ता घरातून ओरडला.

राणीने मला चल आत असे म्हणत घरात नेले मी सोफ्यावर बसले. घर पॉश होते, पण जुने होते. राणी वरकरणी सुखी होती. घरातली कर्ता पुरुष, घरभर वर्तमानपत्र पसरुन चाळत वाचत होता, म्हणजे कागदाची चाळण करत होता. कर्ती मुलं काही करत नव्हती तर सजत सवरत होती. संगीत पेटिकेतून धाडधाड आवाज अंगावर कानावर आदळत होते.

“ह्या आवाजाच्या कोलाहालात काय बोलावे ते सूचत नाही” मी राणीने संगीताचा आवाज कमी केला. लागलीच आतल्या खोलीतून मुलगा ओरडत बाहेर आला “आवाज का कमी केलास? रबीश”

“इतका वेळ मी बेल वाजवत होते, तो बेलचा आवाज तुला ऐकू आला नाही आणि गाण्याचा आवाज कमी होताच तुम्ही धावत आलात”! मी राणीच्या मुलाला म्हणाले.

माझे मत काही राणीच्या चिरंजीवांबद्दल चांगले जमले नाही. “आईची, खास मैत्रिण आईसा़रखीच ईलमॅनरड् दिसतेय ” असे पुटपुटत तो आत गेला. तरीही मी दुर्लक्ष करुन माझे काम पुढे दामटवले. “राणी कॉलेजच्या गेट टुगेदरला जमायचे आहे."मी माझ्याशी बोलता बोलता राणीने, कुटुंबप्रमुखाने पसरवलेले ते पेपर आवरुन ठेवले.

“माझे पेपर आवरायची काय घाई तुला” पतीराज खेकसले.

“अहो तुम्ही पसरुन ठेवता, खराब दिसते माझी मैत्रिण पाहुणी आली आहे म्हणून आवरले”राणी

“शटाप” नवरा खेकसला. मला वाटते गेल्या तीस वर्षात तो कधी हसलाच नसेल. राणी बीचारी केविलवाण्यापणाने, "हळू बोला, अभ्यागतासमोर गृहिच्छिद्र दिसायला नको" म्हणून सावरायचा प्रयत्न करत होती.

“ अहो  लिंबू मसाला आणायला जाता का?” राणीने दबक्या आवाजात दोन्ही मुलांना, शेवटी नवऱ्याला विचारले. तिघांनीही ते काम एकंमेकांवर ढकलले. शेवटी राणीने बिचारीने कपडे ठिकठाक केले  व चपला सरकावून मला म्हणाली

“ पाच मिनटात येते, बस हं शुभांगी”

“ हे काय, अशा अवतारात बाहेर जाणार? लोक काय म्हणतील?” कर्ता पुरुष करवादला.

राणी नटूनथटून कधी मसाला आणणार आणि कधी  पुढचा तो स्वयंपाक करणार! पण क-क च्या मालिकातील व सास बहुच्या मालिकांमधील नट्यांप्रमांणे, आपली मोलकरीण म्हणू्न राबवली जाणारी पत्नी सुद्धा, कायम नटूनथटून वावरावी असे राणीच्या नवरदेवांना वाटत होते. राणी त्याचे न ऐकताच गेली. राजा माझ्यासारख्या तिऱ्हाईतासमोरही तक्रारीचा पाढा वाचू लागला.

“बघा राणी असे करते, ती तसे करते, मी असा बसतो...” राजा सांगत होता.राजाची वाक्ये मला क-क च्या वाक्यांप्रमाणे कात्रीप्रमाणे करकरा कापू लागली. नवरा म्हणजे न-आवरा।

“पहा भारतीय स्त्री मिस वर्ल्ड झाली, मिस अर्थ झाली आणि ही राणी, गबाळ ध्यान, तुम्ही तिची मैत्रिण, तुमची राहणी बघा. नटावे सजावे फॅशन करावी. केस कापून मोकळे सोडावे, मॉर्डन रहावे हिला सांगा, इतर बायका बघा!”राजा करवादला.

मी हिंमत करुन उत्तरले.

“इतर बायकांचे नवरे घरकामात मदत करतात. घरकामाला नोकर ठेवतात, पैसे सढळ हाताने खर्च करतात. मिस युनिव्हर्स मिस वर्ल्ड बायका, काही घरी काही स्वयंपाक करतात

का? की घरच्या पेपरचा पसारा आवरतात. मिस अर्थ आपल्या सामान्यांकडे कशाला येईल, करोडपती नवरा शोधेल ना"

"मी काय करावे मग'' राजा

"मुलांना शिस्तच लावा, नोकर ठेवा, व्यायाम करण्याऐवजी तुम्ही स्वतः खाली जावून मसाला आणला असता, तरी चालले असते ना'' मी.

स्वतःच्या कानावर विश्वास न बसून राजा अवाकपणे माझ्याकडे बघू लागला. आजपर्यंत एवढी सुचना, त्याला कोणीही केली नसावी. तोंडपुज्या माणसांची फौज, बाजू नेहेमी पुरुषाचीच घेते. स्त्रीची बाजू कोण घेणार?

"बाईची कर्तव्ये काय?"तो

"मोलकरिण?"मी

"अॅ, काय या बायका" असे पुटपुटत "तुमच्याशी बोलण्यात अर्थ नाही" असे म्हणत तो आत निघून गेला. कदाचित पुढच्यावेळी मला या घरात प्रवेश मिळणार नाही, हे मी जाणले. शिवाय राणीला "तुझी मुर्ख ही मैत्रीण'' असे ही ऐकावे लागेल हे वेगळेच. राणी सामान घेवून परत आली. स्वयंपाकघरात कामाला लागली.

"हल्ली सर्वांचे अहंभाव फारच वाढले हो. चांगला सल्ला देणाऱ्या व्यक्तीला खड्याप्रमाणे वगळणे व नावडता माणूूस तोडून टाकणे ही हल्ली समाजव्यवस्थेतील प्रस्थापित पद्धत आहे'' मी.

"हव्या त्या वस्तू मिळवणे, नको त्या वस्तू गाळणे, आपण या काळात फार पटकन शिकलो. वस्तूंच्या बाबत जुने द्या नवे घ्या ह्या आले तसे माणसांच्या बाबतीत एक्सचेंज ऑफर सुरु झालेयं'' राणीची, एक शेजारीण गप्पांमध्ये भाग घेत म्हणाली

“सल्ला देणारे कमी झालेत "राणी

“जर गरज पडली तर कौटुंबिक सल्लागार, समुपद्देशक अशा डॉक्टरांकडे लोक जातात, मग माका माणसे हवी कशाला” राजा तोंड खुपसत म्हणाली.

राणीने सुंदर कांदेपोहे केले.“काय बनवलय?” मुलगा

“शी पोहे गावठी स्नॅक्स” मुलगा. नंतर ती शेजारीण, मुले, नवरा सर्वांनी भरपूर पोहे चोपले. शेवटी राणीलाच उरले नाही राजाला पुन्हा कुरकुरायला संधी मिळाली.

“हिला अंदाजच नसतो, कधी जास्त बनवते, अन्न उरते. तर कधी कमी पडते. मला अजून हवे होते.” राजा

“ब्रेड टोस्ट बनव” राजा

राणीला उरले नाही याचे दुख कोणालाच नव्हते. हा सुखी संसार की ही पिळवणूक? सहजीवन याला म्हणतात?

“तुम्ही का बनवत नाही, ब्रेड टोस्ट तरी, मला बोलायचे आहे” मी विचारले

“मला प्रत्येक गोष्ट व्यवस्थित लागते, स्वच्छ किचन, चहा, करावे तर उत्तम नाहीतर करु नये” याच उत्तरा भोवती राजा फिरत होता. म्हणजे करणार नव्हता.

“शुभांगी, गप्प बस तू अजून काही बोललीस, तर तुला बाहेरची वाट दाखवली जाईल” राणी मला हळूच म्हणाली.

अंतर्मुख लोकांचा काही भरोसा नाही त्यांना कुणाचीच गरज नसते माझ्यासारख्याच बडबड्या बाईला, गरजवंताला अक्कल नसते म्हणून मी घरोघरी हे अनूभव

टिपायला जाते.माझ्या लाडक्या मैत्रिणींसाठी मला हे सहन करणे भागच आहे. शिवाय परकी व्यक्ती आली की आपली व्यक्ती, आपल्याला परकेपणा दाखवू लागते.

इस्त्रीवाला आला, राणीने कपडे मोजून इस्त्रीवाल्याला दिले इस्त्रीवाला गेल्यावर, राजपुत्र कानाला वॉकमन लावून बााहेर आला.

“इस्त्रीवाल्याला सांग नीट ईस्त्री करत जा. नाहीतर आई तू असे कर, पुढच्या चौकातल्या लाँड्रीत टाकत जा, " ते ही तूच कर हा सूर मी ऐकला.

“तूच का टाकत नाहीस” मी मध्येच नाक खुपसत

“शटप, ही आमच्या घरची खासगी बाब आहे”राजपुत्र

राणीने "गवतीचहा घातलेला, गरमागरम वाफाळता चहा घ्या” असा मला आवाज दिला.

आम्ही दोघी चहा पिणार तोच राजपुत्र आत आला.आयतोबाने“मला ग्रीनटी करुन दे” अशी भूणभूण लावली “मला जीम मध्ये जायचे आहे” राजपुत्र नं. 2

“छोटी छोटी कामे करायाची शिस्त लाव तू त्याला” नवरा राणीला म्हणाला

सर्व कामे राणीने करायची. कर्त्या पुरुषाने काम काय तर, राणीने काय करायाचे, काय करावे, ही यादी सांगणे, एवढेच होते.

राणी अवघडली. “मी कधी जाईल असे तुला झाले असेल ना राणी” मी

“काम काय होते आज कशी वाट चुकलीस” राणी

“तू सुवर्णपदक धारक आहेस, कॉलेजमधील कार्यक्रमाला तू माझ्या विद्यार्थ्यांना, अभ्यास कसा करावा हे सांगायाचे” मी

“अहो तिला केमेस्ट्रिचे स्पेलिंग आठवत नसेल, तिला बोलावून काय उपयोग? शिवाय ती तुमच्यासोबत आली, तर घरी कामाचे काय? कामवालीचे मला बघावे लागेल, राणीकडे चांगली साडी, धड एक ब्लाऊज नसेल'' राणी आली तर आमची गैरसोय होईल.

“ती येणार नाही'' राजपुत्र म्हणाला

आयुष्यभर कर्त्याने राणीचा आवाज बंद केला आणि उपकर्त्याने म्हणजे राजपुत्राने, राणीचे पंख छाटायचे काम केले होते.

“प्रत्येक नवऱ्याच्या बायकोबद्दल तक्रारी असतात, पण बोलून दाखवत नाहीत. घरच्या गोष्टी बाहेर सांगून, तुम्ही काय साधत आहात'' मी

माझा ॲप्रोच चुकला असे वाटून माझ्या मनात अपराधी भावना वाटून आली, मी राजाला मस्का मारत म्हणाली

“तुम्ही या, अध्यक्ष म्हणून किंवा मुलाला पाठवा'' मी

राणीच्या नवऱ्याने मुलाला हाक मारली, “प्रिन्स'' तो मुलगा उत्तरला

“शी !मराठी स्कूल''

“अजून अपरिपक्व आहे. वेळ आली, की कळेल मराठी बाणा किंवा आपला मायमराठीचा महिमा''मी

“माझी ना नाही, तिला यायचे असेल तर ती ठरवेल'' असा नकार राजाने दिला

“बाय राणी, विचार कर'' मी जड मनाने बाहेर पडले. चिकाटी न सोडता मी बऱ्याच मैत्रिणींकडे पायपीट केली, थोड्याफार फरकाने हाच अनूभव आला. घरातील गृहिणीचे

स्थान, हेच असते का? आशा नावाच्या एका लेखिका मैत्रिणीकडे गेले ती अविवाहितच राहिली आहे.

“प्रेमविवाह सर्वांना जमत नाही, पण विवाहात प्रेम मिळायला काय हरकत आहे. प्रेम व विवाह वेगवेगळ्या गोष्टी थोडीच आहेत फार फारतर आयुष्यात पुढे मागे येण्याचा क्रम वेगळा असू शकतो.”मी

“राणीला लग्नाआधी चांगली नोकरी होती, पण बदली मिळाली नाही म्हणून राजाने राणीला नोकरी सोडायला लावली. अर्थात बरेच झाले, त्यामुळे राणी मुलांकडे अधिक लक्ष देऊ शकला. नवरा करियर करु शकला. इतर कुणी कबूल करो न करो, मुलांच्या यशाचे, घराच्या स्थैर्याचे श्रेय, राणीकडेच जाते” मी

“राणी कार्यक्रमाला यायलाच हवी” आशा

“मंदिराच्या कळसाकडे, बघून वाटचाल करावी तशी मुलांच्या भवितव्यासाठी मन मारुन, तडजोड बाईलाच करावी लागते” मी

“देव काय फक्त देवळातील मूर्तीतच असतोे का? मंदिराभोवतीच्या निसर्गात त्या परिसरात वारीत यात्रेत देखील देव, आनंद असतो. सहजीवनाच्या वाटेवरील आनंद हवा” आशा

“तू लग्न केले नाही, म्हणून तुला लग्न स्वप्नवत वाटते” मी

गेट टुगेदरच्या तयारीच्या सभेला, आम्ही मित्रमैत्रिणी जमलो.

“समाजात सगळे ठिक आहे की हे फीलगुड आगहे. ऑल इज वेल? सत्य काय आहे?” आशा

“ लग्न म्हणजे काय? बायकोवरचा मालकी हक्क” मी

"हूँ" आशा म्हणाली मी तिथून बाहेर पडले, माझ्या नोकरीत संस्थेत रमले, पण कधीतरी वाईट वाटत असते" राणी आली नाही तर आपल्या कार्यक्रमा, त काही दम राहणार नाही. तिचे भावूक बोल लांब ओलसर पापण्या हळवेपण, रात्री शेकोटी पेटवून खेळलेल्या गाण्याच्या भेंड्या अजून आठवतात" आमच्या कॉलेजचा मित्र अरमान म्हणाला

"होठोसे छुलो तुम, मेरे गीत अमर कर दो" म्हणताना दिसणारे ते तिचे पोवळ्यासारखे चकचकीत ओठ मला अजून रात्र रात्र आठवतात"ज्ञानेश्वर म्हणाला

राणी येणार असेल तरच आम्ही येऊ असे वर्ग मित्रांचे म्हणणे पडले. घामाने चिंब उतरलेला उदास चेहरा असलेली राणी मला पुन्हा आठवली.

"बघते एकदा त्या राणीच्या पसारा घरी जावून, नाव मोरपिसारा आहे, पण मोर, more पसारा आहे.प्रयत्न करुन बघते" असे म्हणून मी उठले.

राणीच्या घरी मी पुन्हा आले. माझ्या वर खुप टिका होणार, मला विरोध होणार, हे जाणून ही मी राणीच्या घरी मन घट्ट करुन पोचले. राणीच्या नवऱ्याला पटवणे भाग होते. यावेळी राणी ऐवजी तिच्या मोलकरणीने दार उघडले. राणी आजारी होती. पाठदुखी मुळे उभी राहू शकत नव्हती. मी विचारले "राणी आता कुठे आहे?"

"आत झोपलेल्या आहेत, यावा आत" मोलकरीण म्हणाली

घराचा अवतार आता रद्दीचे दुकान कम जीम कम लाँड्री असा होता. मी आत गेले. सक्तीच्या विश्रांतीमुळे राणीला विश्रांती मिळाली होती. बराच वेळ, आम्ही दोघांनी खुप गप्पा मारल्या. जेवणाचा डबा लावला होता. राणीला पुस्तके वाचणे, लिहिणे, हे तिचे आवडते काम मिळाले होते.

आज मला चहा सुद्धा मिळाला नाही. रबर तुटेपर्यंत ताणल्यावर तुटून राणीचा तब्येत बिघडणार नाहीतर काय? होम थिएटर्स, संगीत पेटिका जोरात होत्या, मुले सोफ्यात होती.

" काय उपयोग अशा मुलांचा, नवऱ्याचा जे घरातील गृहिणीला जाणून घेत नाही" मी

"असू दे, राहू दे" राणी

मीच चहा बनवला राणीच्या उशाशी थर्मासमध्ये चहा व जवळ बिस्किटे ठेवली.

राणीने मला एक कविता वाचायला दिली

माहेर माझे घर

उंबरठ्यावर माप ओलांडले,

हो मी सासर घरी आले.

सासरच्यांनी कधी दुखावले नाही,

पण मला"आपली" मानलेच नाही।।१

संसाराच्या आम्रवृक्षाबरोबर बहरले

की माहेरच्या आठवणीत मन झुरले?

माहेरची ओढ ही निराळीच असते,

नाते हे शेवटी मनाचेच असते॥२

माहेरी माझ्या चौसोपी वाडा,

सासरचा फ्लॅट वाटतो तोकडा.

तरीही या घरी मैत्रिचे नाते,

स्त्रीही शेवटी घरासाठीच उरते॥ ३

नाते हे शेवटी मनाचेच असते॥

माहेरच्यांना वाटले ही सासरीच जाणार,

धनाची पेटी सुद्धा सोबत नेणार.

दुसऱ्याची वस्तू सासरची धन होणार,

पुढे दुरावणार म्हणून दुखावत राहिलो।।४

माहेरच्यांनाही मुलगी परकीच वाटते

नाते हे शेवटी मनाचेच असते

मी सासरची की मी माहेरची?

कधी होते का मी स्वतःची?

दोन्ही घरांमध्ये मी पाव्हणीच राहते,

नाते हे शेवटी जोडण्यावरच असते।।५

कुठे आहे माझे माहेर

कुठे आहे माझे घर,

मी माहेरची की मी सासरची?

कधी होणार मी स्वतःची?।।६

माहेरी सासरी मी पाहुणीच राहते,

दोन्ही घरी माझे असे काहीही नसते।।७

आयुष्याच्या संध्याकाळी, संकटकाळी, माणूस आयुष्याचे पुनरावलोकन करतो. स्त्री सासर- माहेरची तुलना करीत राहते. राणी या आजारात- तेच करत होती. हरवलेले क्षण शोधत होती. नाते हे शेवटी अव्यक्तच राहते. आधीच बलात्कारांनी असुरक्षित जगात, स्त्रीला एकटे पाडले जाते व वेड्यात काढले, की तिचा विरोध गळून जातो. स्वतःच्या स्वतंत्र अस्तित्वाचा प्रश्न, स्त्री आई झाली की पूर्णपणे विसरते. वादळवाऱ्यांचे वीजांचे लोळ, मग मंगळसूत्राच्या दोन वाट्यात भरुन, पार शमतात?

मी रोज राणीला भेटायला जाऊ लागले. तिच्या मोरपिसारा नावाच्या, घराच्या पसाऱ्याकडे, मुला नवऱ्याकडे मी साफ दुर्लक्ष केले. राणीची तब्येत जरा सुधारली.

आमची भेट होत होती.कॉलेजचा गेट टुगेदरचा दिवस जवळ येत होता. मात्र राणीच्या, माझ्या प्रिय मैत्रिणीचा आयुष्यातली, एका दिवसातला, एक तास मागण्याचाही, मला हक्क नव्हता. मात्र कधी...मिरॅकल्स डू हॅपन

एका रात्री राणीच्या नवऱ्याचा फोन आला

“आम्ही सर्वजण क्रूजवर, पार्टीला जाणार आहोत. पार्टी जहाजावर आहे. आम्ही राणीला नेऊ शकत नाही. ती घरी एकटी राहणार, कामवाली येणार नाहीये. त्यापेक्षा तुम्ही राणीला कार्यक्रमाला नेऊ शकता” मी खुश झाले “ हे  यस, आय वन” त्या निमित्ताने मला राणीच्या सहवास मिळणार होता. खुशीत नाचावे असे मला वाटले.

तुमच्या घरच्या राणीचा स्थिती आमच्या या राणीसारखी बुद्धिबळातल्या राणीसारखी आहे की? ही गोष्ट राणीची की माझी? की तुमच्यातल्या कोणची? “बुद्धिबळातल्या सोंगट्या आठवा, त्यातली राणी नसते कारण ती राणी राजाच्या मनात असते, असे भंपक विचार मानले जातात. मला वाटते राणीला स्वतंत्र अस्तित्व देण्याची वेळ आली आहे. बुद्धिबळाच्या

पटावर एक राणी हवी आहे. घरी दारी सासरी माहेरी दोन्हीकडे, स्त्रीला घर कमरा, अस्तित्व हवे आहे. हो स्वतःचे माहेर हवे आहे. माझे घर हवे आहे " मी

"बुद्धिबळाच्या पटावर राणी हवी.

ही गोष्ट राणीची की माझी की तुमची की प्रत्येक स्त्रीची? स्त्रीला आदराने वागवायची सुरुवात, आपण घरापासून लहानपणापासून करायला हवी" आशा

कॉलेज रियुनियनचा दिवस उजाडला. राणीला गाडीतून न्यायाला, आमचा एक मित्र तयार झाला. राणीने तिचा ठेवणीतला, कॉलेजमधलाच जूना लाल पंजाबी सूट घातला. तीस वर्षांनी पुन्हा लांब टॉपची फॅशन, परतून आलीच आहे ना? आम्ही सर्व मित्रमैत्रिणी एकत्र जमलो. एकमेकांच्या सुटलेल्या पोटांची, विरळ केसांची, टकलांची, बदललेल्या वाटांची खुप चर्चा केली. कॉलेजचा सोहळा पार पडला. प्राचार्यांनी सुवर्णपदकधारक राणीला स्टेजवर बोलावले आणि आभाराचे गीत गायला सांगितले. "सौ राणी स्टेजवर या"प्राचार्य

राणी स्टेजवर आली. त्या लाईमलाईट मध्ये ती अजूनही गोड तरुणीच वाटत होती. मधली तीस वर्षे उडून पुन्हा आम्ही लहान तरुण झालो होतो.

"नात्याप्रमाणे वयसुद्धा शेवटी मनाचे असते. वयसुद्धा आपण मानतो ते असते" प्राचार्य

राणीने गाणे म्हटले

"क्यों जिंदगी के साथ हम मजबूर हो गये

ईतने हुए करीब, के सब दूर हो गये."

बुद्धिबळाच्या पटावर राणी हवी आहे.

## ४५प्रेमभंगाच्या म्युझियमचे गाव=    क्रोएशिया-झॅगरेब

क्रोएशियाला प्रेमाचे गाव म्हणतात. येथे दगडा दगडावर, कोणीतरी दंतकथा लिहीलेली असते आणि वेगवेगळ्या प्रेमकथा वारंवार ऐकू येतात. यातील झॅगरेब बद्दल तर काय सांगावे?

१फुड, मगहणजे जेवण, अथवा, अन्ना- मध्ये ट्रफल्स (वेफर्स सारखा गोडपदार्थ) ट्रिलोगीना यी हॉटेलात क्रोशियन वाईन मिळते. संध्याकाळी दिवे लागताना रोशनाई पाहून आपण हरवून जातो.

२पूजा अर्चा-

झॅगरेब मध्ये मध्ययुगीन चर्चेस आहेत. मात्र सेंट मार्कस चर्चला, रोमँटिक चर्च मानतात. या चर्चचा रंग पांढरा असून, छतावर सिरॅमिक टाईल्स, टोकावर, उंचावर झेंडे आणि अन्य प्रतीकांची चित्रे आहेत.

३ म्युझिअम ऑफ ब्रेकअप- 20 सालचे मोस्ट इनोव्हेटिव्ह म्युझिअमचे बक्षिस या म्युझियमला मिळाले आहे. ‘तूटू दे हृदय तुटले तर’ असे म्हणत तुम्ही क्रोएशियात फिरु शकतात. झॅगरेबमध्ये अनेक म्युझिअममध्ये वेळ छान जातो पण वेळ कमी असेल तर ‘तुटलेल्या नात्यांचे वस्तू संग्रहालय’ इथे भेट द्या. ब्रेकअप झालेल्या, हृदय तूटलेल्यांच्या अनेक प्रेमकथा इथे ऐकायला मिळतात. प्रेमिकांच्या खाजगी वस्तू, बूट, हातमोजे, विवाहाचा ड्रेस, पत्र खेळणी, भेटवस्तू येथे हृदयद्रावक कथा सांगतात. तुटलेली नाती व त्यांच्या गूढ दुःखी कॉफी विनोदी रागिट अशा कथा येथे लिहिलेल्या आहेत. कॉफीच्या कपासाठी या जागेवर, येथे लोक भेटतात आणि तासन् तास गप्पा मारतात. जुन्या काळच्या उन्हाळी छतावरचा गप्पा आठवतील. एली कॅफे, किनो युरोपा, कॅफे वेलवेट कॅफे, असे कॅफे आहेत. घोड्याची नालाचे आकाराची, पुतळे मूर्ती कोरीव काम, तलाव, बागा, उद्याने, यांची लेअर टाऊन, क्रोएशियात रेलचेल आहे.

ही सर्व संरचना घोड्याच्या नालेच्या आकारात वसवली आहेत.

४ सहा चौक, बागा मोन्यूमेन्टस् आहेत. कलावंताच्या झॅगरेब कॉर्नर ला, राष्ट्रीय नाट्यगृह पारंपरिक आर्टस्(कला) ॲन्ड क्राफ्ट हस्तकलेचे वस्तू संग्रहालय आहे.

क्रोएशियन राष्ट्रीय नाट्यगृहात भेट दिली, तेव्हा तेथे वेल ऑफ लाईफ, आयुष्याची विहीर हे शिल्प आहे.

५ लीसीटार- डोलॅक मार्केट। मध्येे सर्व रोजच्या वस्तूंची खरेदी होते. झॅगरेब मध्ये लीसीटॉर, हृदयाचे आकार असलेली लाकडी भेटवस्तू मिळते. लीसीटॉर हे पूर्वी येथील, आले घातलेले हृदयाच्या आकारचे खाणे होते. जे प्रेमानेे भेट दिले जाते. येथे खूप वस्तू मिळतात.

६आकर्षक रंग, सुंदर डिझाईन, फारशा उंच गगन भेदी झुंबर नसलेले, क्रोएशिया प्रेमाचे गाव म्हणून प्रसिद्ध आहे. झॅगरेब तर अगदी लहान आहे. फक्त आठ लाख लोकांची वस्ती येथे आहे. झॅगरेब ही क्रोएशियाची राजधानी  आहे.

तीन तास चालत, संपूर्ण झॅगरेब मध्ये फिरता येते.

कॅपटोल झॅगरेब, मधील कॅपटोल मधील चर्चच्या भोवती तटबंदी आहे. या कॅथेट्रॅलला(मिलीटरी) युद्धाची इतिहास होता. गावाचा वरचा भाग मोर्तजी ग्रॅड, तर कालचा भाग डोर्नजी ग्रॅंड मानला जातो. येथे फ्युनिकुलर ट्रेनने आपण दोन मिनिटात जातो इतके ते जवळ जवळ आहेत. म्युझिअम मधील दोन शिल्पे, (झॅगरेब) पहिला, हातात तलवार घेतलेले घोडेस्वार, सेंट जॉर्ज यांचा ब्रॉझचा पुतळा ड्रॅगनच्या शिकारीच्या तयारीत आहे.

दुसऱ्या पुतळयात मृत ड्रॅगन जवळ, तलवार घेऊन जिंकलेला सेंट जॉर्ज आहे. सेंट जॉर्जचे पुतळयाबद्दल कथा आहेत. क्रोएशियात सर्वत्र सांगितली जाणारी कथा म्हणजे राजकन्येचे रक्षण करण्यासठी सेंट जॉर्जने ड्रॅगनला तलवारीने ठार मारले.

हॅपिली लॉस्ट, असे झॅगरेबचे वर्णन केले जाते.

झॅगरेब वॉक ॲन्ड वायर टूर्स 5००० युरो पासून पुढे◌े आहे.

18 व्या 19 व्या शतकातील ऑस्ट्रोहँगेरिअन स्थापत्यशास्त्राचे नमुने येथे बघायला मिळतात.

24 डिग्री तापमान आहे.

क्रोएशिया हा पूर्व युरोप मधील देश आहे. त्याला अँड्रीएटीक समुद्राचा मोठा किनारा लाभला आहे. एक हजार बेटे आहेत. डूब्रोवानकि, झॅगरेब, या पर्यटकांच्या लाडक्या दोन शहर जागा आहेत.

प्रेमभंगाचे म्युझिअम बघायला कधी जायचे?

*******************

## ४६वजन का वाढते?

विनोदी कविता सांगते,

तुम्हाला एक कोडे घालते

सांगा माझे वजन का वाढते॥धृ॥

सुरस चौरस स्वयंपाक करते

खात्रीसाठी खाऊन बघते

दोन तीन पोळया, वाटीभर भाजी

डावभर कढी, दहा वीस भजी॥1॥

एवढेच तर खाऊन बघते, तरी पण माझे वजन का वाढते

एकादशी, शनिवार, रविवार

दाणे भाजते वारंवार

मूठभर दाणे, चवीला गूळ

एखादे केळ, मोदकी नारळ

खवता खवता, खाऊन बघते

मग एकदोनच बशी, खिचडी मलापुरते,

तरी माझे वजन का वाढते?

****************

## ४७ मी कामगार आहे

अठराव्या शतकात लिहीले गेलेली शाहिरी कवने म्हणतात, मी कामगार आहे, तळपती तलवार आहे

कामगार हा अर्थव्यवस्थेचा कणा असतो. अशा कामगाराची सुरक्षा व कामगार कल्याण, हा कळीचा मुद्दा अाहे. कोणत्याही कारखान्यात अथवा संस्थेत संतुलनपत्रात balancesheet मध्ये, कामगार ही खरी मालमत्ता, real asset, असते.

ब्रिटिशांच्या काळात, कापड गिरण्या मोठ्या प्रमाणात सुरु झाल्या, या गिरण्यांत मोठमोठी यंत्रे बसवली गेली. मुंबईचे मँचेस्टर बनु लागले.

येथे तयार होणारे कापड, मनुष्य बळाचा वापर करुन धुतले, रंगवले जाई, यासाठी अनेक घातक रसायने वापरली जात, कामगारांकडून १६/१६ तास काम करुन घेतले जाई, कधी फ्लाईंग शटलचे, लूमचे पट्ट्यात होणारे काही अपघात होत, कामगार जखमी होत, भाजण्याच्या घटना घडत. त्यांतून कामगार संघटनांनी आवाज उठवला. परिणामस्वरुप ई.स.१८८१ साली, कारखाने अधिनियम अस्तित्वात अाला.

या अधिनियमानुसार कामगारांना काहि हक्क प्रदान केले

१ ठराविक तास काम करणे

२ आठवड्याची सुट्टी

३ मूलभूत गरजांची सोय

४ कामगारांच्या आरोग्याची काळजी

५ कामगार सुरक्षेचे उपाय उदा, यंत्राच्या धोकादायक भोवती जाळी लावणे, संरक्षक झाकणे लावणे, सामान्या आणि मानसिक आरोग्य तपासणी ईत्यादि

६ अपघात प्रवण यंत्रात अभियांत्रिकी बदल करणे,

पुढे रासायनिक कारखान्यांचे प्रमाण वाढले. लवकरच असे लक्षात अाले कि, यांत्रिकी अपघातापेक्षा रासायनिक कारखान्यांतील अपघातांचे प्रमाण  व स्वरुप जास्त भयावह अाहेत. भोपाळच्या युनिअन कार्बाईड, दिल्लीच्या श्रीराम मिल च्या क्लोरिन गळती पासुन हा धोका अधीक अधोरेखित झाला. १९८७ च्या कारखाने अधिनियमानुसार रासायनिक कारखान्यांसाठी विशेष तरतुदी केल्या गेल्या ज्या कारखान्यांत १५ टन एलपीजी, १० टन क्लोरिन किंवा ५ टन इथिलिन ऑक्साइड अाहे, अथवा अशाच प्रकारचे धोकादायक रसायने काही प्रमाणात वापरणारे कारखाने, अतिधोकादायक ठरवून त्यांच्यासाठी आपत्ती निवारण व्यवस्थापन आराखडे तयार करणे आवश्यक केले गेले. इतरही अनेक तरतुदी त्यात आहेत. कामगार सुरक्षेसाठी ते आवश्यक पाऊल होते.

कामगार कायद्याने कारखान्यातील कामगारांच्या सुरक्षिततेची जवाबदारी भोगवटादारावर (Occupier) वर टाकण्यात आली आहे. यंत्रसामुग्री, कच्चा माल, तयार माल, उत्पादन प्रक्रियेतील क्लिष्टता, देखभाल इत्यादी सर्व बाबी कारखान्यातील कामगारांची सुरक्षितता ठरवित असतात. त्यातील धोके अधोरेखीत करीत असतात. सहाजिकच ते सर्वात चांगल्या प्रकारे व्यवस्थापनाला ज्ञात असतात. ते धोके दूर करताना खर्च येतो. या खर्चाबद्दल दोन मुद्दे अतिशय महत्त्वाचे आहेत. कामगार सुरक्षेवर, करताना हा खर्च जरी "कर"वजा वाटत असला तरी तो तसा नसतो. कारण त्यामुळे अपघात टळतात, उत्पादन सुरळीत सुरू राहाते, कामगारांचे

मनोधैर्य उच्चकोटीचे राहते, मालाला उत्तम गुणवत्ता असल्याने कारखान्याच्या मालकाची बाजारावर पकड स्थिर राहते.

सुरक्षितते वरील हा खर्च टाळला तर अपघात होण्याने नुकसान होते.भरपाईपोटी खर्च तर होतोच, पण वर नमूद केलेले सर्व फायद्यांचे विरुद्ध रुपात परिणाम होतात. या सर्व बाबींचा विचार करुन कायद्याने कामगार सुरक्षिततेची जवाबदारी भोगवटादारावर सोपवली आहे.

विकसित देशांमध्ये कामगाराला अपघात झाल्यास अतिशय मोठी रकम नुकसान भरपाई म्हणुन द्यावी लागते, ( ज्यामुळे कधी कारखाना बंदच करण्याची वेळ येते). कारण माणसाचे जीवन अनमोल असते. सहाजिकच ते लोकं सुरक्षिततेला जीवापाड महत्त्व देतात. आपल्याकडे किंवा विकसनशील देशात अद्याप तशी परिस्थिती नाही.

अतिशय तरुण मुले असो किंवा अन्य, पण ते जेंव्हा जीव गमावतात, तेंव्हा त्यांच्या नातेवाईकांचे, मातापित्यांचे दु:ख कठोर व्यवस्थापनाच्या लक्षात आणुन देणे ही आजची गरज आहे. भोपाळ दुर्घटनाग्रस्तांचा तोच प्रयत्न अाहे. लाखो रुपये देवुन परत न मिळणारी गोष्ट म्हणजे कामगाराचे आरोग्य व त्यांचा जीव होय. मी सुरवातीलाच तर लिहिलय, कामगार हीच तर खरि मालमत्ता! तर मित्रांनो कामगार दिनाच्या शुभेच्छा

कामगार सुरक्षा, आरोग्याचा विचार

कामगार दिनाचा हाच करा एल्गार

******************

# ४८सहलीला जायचे

सहलीच्या, निसर्गाच्या आठवणी आयुष्यभर, मनातल्या मोरपिसांसारख्या हळव्या करतात. सहलीला जाणे आवडत नाही, अशी व्यक्ती सहसा नाही. माणूस सहलीचे विविध बेत वारंवार करतो.

१) सहल म्हणजे मजाः

रोजच्या कंटाळवाण्या गोष्टींमधला बदल, हवापालट, जागाबदल म्हणजे सहल होय.

२) ताजेतवाने व्हाः

जंगल, नदी, डोंगर, किनारे, रस्ते, वेगळे घर, कौलारु झोपड्या, सुग्रास जेवण, गार हवा, हिरवी झाडी या जागांपैकी कुठेही दिलेली, कुठलीही लहान सहान, भेट ताजेतवाने होण्यास मदत करु शकते. केवळ जवळच्या मित्रमंडळींची भेट, एखादा सिनेमा बघणे, बाजारहाट करणे या सहलीसुद्धा आनंददायी ठरू शकतात. दूरवरचा सूर्यास्त/सूर्योदय बघणे प्रेरक ठरते. सहली या कौटुंबिक असू शकतात अथवा कार्यालयीन असू शकतात. मित्रमैत्रिणीं बरोबरच्या सहली spontaneous planned, neat असतात. कौटुंबिक सहली पूर्णपणे अनियोजित नसतात, पण अधिक काटकसरीच्या असतात.

३) काळः

मुलांच्या शालेय सुट्टीत, सहली करण्याचे प्रमाण जास्ती असते. सहलींचे दलालसुद्धा असतात, हॉटेल्स कंपन्या, पर्यटन व्यवसायाचे, सुगीचे दिवस हे शालेय, कॉलेजच्या सुट्टींशी जोडलेले असतात.

एप्रिल, मे, डिसेंबर, नोव्हेंबर, ऑक्टोबर (दिवाळी) अशा काळात "बॅग भरो निकल पडो" असे दिवस असतात. अगदी हॉस्टेलवर राहणारे लोक सुद्धा वार्षिक सुट्टीत गावी, घरी अर्धा काळ जातात. त्यावेळि (सुट्टीच्या) व सहलींवर अर्धा सुट्टी काळ जातात. या काळात हॉटेल्स महाग असतात.

४) कौटुंबिक सहलीः  कौटुंबिक सहली, धार्मिक असतात, देवस्थान, रस्ता सहल, गड-किल्ले दर्शन/ साहसी असतात.

धार्मिक सहल- यात वार्षिक कुलदेवता दर्शन, ओझरते देवदर्शन बाकी मजा आणि पोटपूजा असू शकते. देवस्थानी जाणे, ही आपल्या पूर्वजांची पूर्वापार चालत आलेली सहलच असे. Change of routine is rejuvenating.

५) देव बसले डोंगरी अथवा नदीकिनारी- देवदर्शनः

देव डोंगरावर असतात, त्यामुळे हवा गार असते, निळे आकाश असते किंवा नदीकिनारी गारवा, मजा येते .बोटींग, पाण्यात खेळणे, डुंबणे, पोहणे यात मजा घेता येतात. थकलेला जीव पुन्हा ताजा होतो. झोक्यांवर झुलता येते, झोपड्यात राहता येते, लोकजीवन समजते. देवदेवतांचे आशीर्वाद मिळतात, चांगले, साधे, गोडधोड जेवण कमी खर्चात मिळते. कॅसेट rewind होते, परत'रूटीन' सुरु करण्यासाठी!

६) रस्ता सहल Joy ride-

फार पूर्वी बैलगाडीने जायचे, तसे हल्ली अख्खे कुटुंबिय गाडीने मामाच्या गावाला जाते. full Style मध्ये. प्रवासाचा त्रास न होता फिरता येते. वाटेत कुठेही थांबता येते, मनमौजी वागता येते. उदा. नाशिक, पुणे, कोल्हापूर. परिसर, निसर्ग, घरगुती गप्पा, चिडवाचिडवी, गॉसिप, बालकांची मस्ती-मारामारी, रूसवे-फुगवे, थोडेफार हाल तरीही या सहलीत मजा येते. सहवासाचा आनंद व प्रवासाची मजा एकत्रित मिळते. सोबत शिदोरी घेता येते. वाटेत चहा बिस्किटे, वडापाव, खिचडी व शीतपेये हल्ली सर्वत्र मिळतातच. पूर्वी केळीच्या पानात झुणका बांधून, कापडी फडक्यात भाकर शिदोरी, दशम्या देत.खाऊ बांधून भूकलाडू तहानलाडू, दशम्या, पुऱ्या, लाडू नेले जात असत, हल्ली आजी, लाडू चिवडा देते.

७) गडकिल्ले सहल—

बालकांना, विद्यार्थ्यांना, तरूणांना इतिहासाने प्रेरित होण्यासाठी या सहली उपयोगी पडतात. इतिहासाचा समृद्ध वारसा समजतो. किल्ले, स्थळे बघता येतात. राजाराणीच्या कथा, राजवाडे यांचा फील घेता येतो. उदा. पन्हाळा, सिंहगड, अजिंक्यतारा.

८) शैक्षणिक सहल—

यात एखाद्या गावाचे ऐतिहासिक म्युझियम, सायन्स सेंटर, जंतर-मंतर वगैरे बघता येते. उदा. औरंगाबाद.

९) साहसी सहली— हल्ली बऱ्याच करमणूक केंद्रांमध्ये साहसी खेळांचे आयोजन असते. खडक चढणे, उंचावरून उडी मारणे (सुरक्षेसह), गाडी ठोकणे (वेगळी छोटी ठोकताच थांबणारी गाडी), बलून राईड, राफ्टींग, वॉटर स्कीइंग असलेल्या Adventure Park मध्ये सहलीला जाता येते. बऱ्याच टेकड्यांवर, नदीकिनारी असे साहसी खेळांचे पार्क बनवले आहे. उदा. किल्ले चढणे, ट्रेक्स, हिमालयन ट्रेक

१०) परंपरा सहल—

ऐतिहासिक ठिकाणे, लोककलांची केंद्रे, लोकांच्या गाण्यांचा आवाज ऐकणे, हस्तकला बघणे, शिकणे, लोकजीवनाचा अनुभव घेणे, अशा परंपरा सहली करता येतात. उदा. जुन्नर, घोडेगाव, कोल्हापूर, नंदुरबार, राजस्थान! खूप गर्मी असते, पण चालते.

सहलीला जायचे का?

*********************

# ४९ बाली(पर्यटन)

स्वस्त परदेशवारीत, बालीचा नंबर दुसरा लागतो. साधारणत: देवळांना भेटी देणे, ही मध्यमवर्गीयांची पर्यटनाचे आनंदाची झालर असते. समुद्रकिनारी अथवा डोंगरावरील देवळाला, पर्यटक भेट देतातच. समुद्रकिनारा बोटीने जाणे, यासाठी बाली ट्रिप प्रिय ठरते. बालीला सुंदर ऐतिहासिक सौंदर्य आहे. येथे स्कूबा डायव्हिंग, पॅरासेलिंग, ऍक्वा वॉकिंग, स्नोस्कींग आणि रिव्हर-राफ्टिंग हे पाण्यातले खेळ येथे खेळता येतात. अगुंगबाली, माऊंट बाटूर (किंटामनी), उबुडचे माकडवन, सफारी टूर्सची मजा येते. नुसादुवा येथे, ३ किमी लांब पांढऱ्या रेतीचा समुद्रकिनारा आहे. पडांग पडांग, पांडवा किनारा, येथे समुद्र शांत आहे. सनबादींग व टॅनिंग साठी, डी विटॅमिन साठी येणारे पर्यटक खूप असतात. समुद्रकिनारीचे अगुंग बाली शॉप व उबुड ही खरेदीची नगरी आहे. १/५ किमतीत Bargaining करता येते. फळे, भाज्यांपासून कपडे, चपला सारे मिळते. कुटा गावी मात्र आंतरराष्ट्रीय दर्जाचे मॉल्स आहेत. उबुड ग्रामीण आहे तर कुटा विदेशलेले आहे. स्थानिक अन्न कुटाला खाता येते. नासी गोरेंग भात मिळतो. सामिष व देशी जेवण मिळते. बांबूच्या स्ट्रॉने पिता येणारे फळांचे रस आहेत.गोवा गजाहा मंदिर आणि जतुलीविह भात गच्ची (rice terrace) येथे समुद्राच्या लाटा आणि गवताची लहर आनंददायी वाटते.

बाटिकचित्र, लाकूड कोरीवकाम, कपडे विणणे, दागिने घडवणे येथे चालते. बालीनीज् मसाज व स्पा येथे आहेत. पण महागडे व असमाधानकारक आहेत. रेलवे नसल्याने रस्त्यांचे जाळे आहे. टॅक्सी, गाड्या महाग आहेत. पर्यटकांकडून पैसे कमावले जातात. बाली येथे लोकगीते, लोकनृत्ये जरूर ऐकावीत पण समुद्राची गाज कानात व भाताच्या तणांचे डोलणे नजरेत भरून आणावे.येताना महाग भेटवस्तू घेण्याची गरज नाही. आपल्या देशात सारेच मिळते. अनुभव मात्र बांधून आणावेत.

************

## ५०पुस्तक परीक्षण

मराठी साहित्य आणि चित्र‘पटकथा’ (शतकी वाटचाल१९१३-२०१३)

लेखक : डॉ प्रवीण नारायण महाजन

गोव्याच्या ४८ व्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात (IFFI) मुख्यमंत्री मनोहर पर्रीकर यांच्या हस्ते व अभिनेत्री श्रद्धा कपूर हिचे उपस्थितीत नुकत्याच प्रकाशीत झालेल्या मराठी साहित्य आणि चित्र‘पटकथा’ (शतकी वाटचाल१९१३-२०१३) या डॉ प्रवीण नारायण महाजन यांच्या अप्रतिम ग्रंथाच्या ६५६ पानांचे वाचन करायला एक महिना लागेल असे वाटले होते. पण ग्रंथ हातात आला आणि तहानभूक हरपून मी वाचून काढला.

संपूर्ण जगभरातच सिनेमा बघायला आवडत नाही, सिनेमाचे वेड नाही, अशी व्यक्ती विरळच म्हणायची. जनमानसात गप्पात, करमणूकीत, समाज परिवर्तनात सिनेमाला अनन्यसाधारण महत्व आहे. गोष्टी सांगणाय्रा ऐकाणार्यांना, पहाणाऱ्यांना तो आकर्षीत करतो.

“ तुझ्या स्वरांवर जगूनी,

वेचिले हे अमृतकण I

तू ईश्वराचे प्रतिरूप,

तू आनंदघन II”

अशा शब्दात लतादीदींचे, लता मंगेशकरांचे, लेखकाने केलेले अर्पण पत्रिकेतील वर्णन व त्यांचा दुर्मिळ फोटो या ग्रंथात आहे. खरेतर  अशा दुर्मिळ फोटोंचा हा ग्रंथ जणू एक संग्रहच आहे.

फार पूर्वी म्हणजे ५० वर्षापूर्वी, आमच्या बालपणी, गावात नवीन सिनेमा लागला की, सरकत्या चाकांच्या गाड्यावर पोस्टर्स, पूर्ण वस्तींमधून फिरत असत . सोबत काठ्या लावून, पाय उंच करून, त्यावर पांढरे पायजमे घातलेली, उंचच उंच माणसे, या सिनेमा पोस्टरांचे सोबत चालत असत. सोबत ढोल पिपाणी वाजवली जाई. रात्री गॅसच्या दिवाबत्ती सोबत, ही नव्या चित्रपटाची मिरवणूक, गावात फिरे.लागलीच, लोक चित्रपट पाहण्याची तारीख व वेळ ठरवून टाकत. पूर्वी सिनेमाला जाणे, हा उत्सव असे. सिनेमा बघणे म्हणजे अफूची गोळी असते. आजदेखील, प्रेक्षक  तीन तास चित्रपटगृहात आपले स्थळ-काळ, अस्तित्व, वर्तमान, प्रश्न सारे काही, विसरून सिनेमाचा आस्वाद घेतात.

डॉ. प्रवीण महाजन यांचा  चित्रपटकथेला साहित्यात मानाचे स्थान देणारा, प्रथमच मराठी चित्रपटकथेला साहित्याचा प्रकार सिध्द करणारा, प्रथमच मराठी चित्रपट, पटकथा, साहित्य यांचा शंभर वर्षाचा आढावा घेणारा, प्रथमच मूळ साहित्यकृती व पटकथा यांचा अतिसूक्ष्म अभ्यास करणारा हा ग्रंथआहे.हा संशोधनाचा अपूर्व रुपेरी ग्रंथ मराठी साहित्य व चित्रपटकथा यांच्या बद्दल अभ्यास करून लिहिल्या गेला आहे. मराठी साहित्य, चित्रपट, शिल्प, नृत्य, नाट्य, या विषयावरील, अल्प आणि दुर्मिळ ग्रंथापैकी एक, असे या ग्रंथाचे वर्णन करता येईल.

मराठी साहित्य आणि चित्रपटकथा या ग्रंथाचा आवाका प्रचंड आहे.

ग्रंथाची रचना- आठ प्रदीर्घ प्रकरणांमध्ये हा ग्रंथ विभागाला गेला आहे.

चित्रपटकथेची व्याख्या, चित्रपटकथेची संरचना, त्यांचे नाविन्य, त्यावरील आक्षेप, चित्रपटकथेचे प्रमुख घटक जसे कथानक, स्वभाव चित्रण, संवाद, गीत, साहित्य निर्मितीची प्रक्रिया, साहित्याच्या मध्यामान्ताराची प्रकिया या सर्व विषयांवर हा ग्रंथ भाष्य करतो. चलचित्राचा भारतीय प्रयोग शाम्बारिका-खरोलिकाने केला. कथात्मक चित्रपटाचा जन्म, चित्रपट

कथाकार जॉर्ज मेलिए यांचे हस्ते झाला. पहिला भारतीय मूक चित्रपट राजा हरिश्चंद्र हा होता. भारतीय चित्रपटसृष्टीचे प्रगतिचे श्रेय दादासाहेब फाळके यांना जाते. पहिला भारतीय बोलपट 'आलमआरा' हा होता. चित्रपटाचे प्रधान घटक निर्माता, दिग्दर्शक, अभिनयकर्ते. गीतकार, संवाद लेखक, संकलक, संगीतकार, छायाचित्रकार, वितरक, प्रेक्षक, समीक्षक हे आहेत. यशस्वी सिनेमाचा, सशक्त चित्रपटकथा हा मूळ आधार असतो. असे ऐतिहासिक आणि शास्त्रीय सत्य लेखक मांडतो. शिवाय या ग्रंथात लेखकाने चित्रपटकथा, नाटक, नभोनाट्य, दूरदर्शन शृंखला यांची तुलना केली आहे.मराठी मूळ चित्रपटकथेचे मूल्यांकन  करताना 'अयोध्येचा राजा, ते 'अस्तित्व' या प्रवासातील आचार्य अत्रे, वि. स. खांडेकर, ग. दि. माडगूळकर, विजय तेंडुलकर, पु. ल. देशपांडे, रणजीत देसाई, यांच्या सारख्या दिग्गज लेखकांचे चित्रपटक्षेत्रातील  योगदानाबद्दल, डॉ. महाजन अभ्यासपूर्ण  रीतीने प्रतिपादन करतो. याविषयीचे, स्वतंत्र प्रकरणात पंधरा चित्रपट कथा प्रातिनिधिक म्हणून घेतल्या आहेत. ज्यातील अयोध्येचा राजा, नवरदेव, प्रतापगड, सामना, नॉट ओन्ली मिसेस राउत, ऐका दाजीबा, देवता, शेजारी, सीता स्वयंवर, गुळाचा गणपती, सवाल माझा ऐका, एक गाव बारा भानगडी, सोंगाड्या, माफीचा साक्षीदार, अस्तित्व या  प्रमुख आहे. खास आनंद म्हणजे ग्रंथात या सर्वच चित्रपटाच्या कथांचा सारांश वाचायला मिळतो. यातील चित्रपटकथेचे कथानक सांगणे म्हणजे पिक्चरची स्टोरी सांगणे ही  पूर्वी घरोघरी संध्याकाळी जमलेल्या बच्चे कंपनीची, इव्हेंट/घटना असे हल्लीच्या भाषेत सांगितले जाऊ शकते.हीच कथनशैली महाजनांनी वापरली आहे. लेखक प्रवीण महाजन यांच्या घरी भेट दिली असता, त्यांच्या अभासिकेत या सर्व चित्रपटांचे दस्तऐवजीकरण अगदी व्यवस्थित आहे.

मराठी साहित्यकृतीवर आधारित चित्रपटकथांबद्दल या पाचव्या प्रकरणात, कादंबरी या साहित्य प्रकारावर आधारित चित्रपटांवर आधारित, एक उपप्रकरण आहे. 'गड आला पण सिंह गेला', 'जैत रे जैत', 'बनगरवाडी', 'चानी', 'कुंकू', 'श्यामची आई', 'सिहांसन', 'उंबरठा' या चित्रपटकथांचे परिशीलन या ग्रंथात अाहे.कथांची तुलना मूळ कादंबरीशी केली आहे. कथा या

साहित्य प्रकारावर आधारित मराठी चित्रपटकथा ‘मधुचंद्र’, ‘मुंबईचा जावई’, ‘श्वास’, ‘रंगल्या रात्री अशा’ इत्यादी आहेत. नाटक, ललित लेख आणि कवितांवर आधारित चित्रपटकथांचे विश्लेषणही या ग्रंथात वाचता येते.

सहाव्या प्रकरणात दिग्दर्शकीय संस्कारांचा अभ्यास आहे. व्ही. शांताराम, भालजी पेंढारकर, मास्टर विनायक, राजा परांजपे, अनंत माने, राजदत्त, दादा कोंडके, जब्बार पटेल, अमोल पालेकर, सचिन पिळगावकर, महेश कोठारे, महेश मांजरेकर, मृणाल कुळकर्णी यांच्या दिग्दर्शक म्हणून केल्या गेलेल्या मेहनतीचा खास उल्लेख आहे. या दिग्दर्शकांच्या प्रतिभेची वैशिष्ट्ये इथे दिसतात.

सातव्या प्रकरणात, तीन भारतीय गाजलेल्या चित्रपटकथा ‘शोले’ (हिंदी), ‘अपूर संसार’ (बंगाली), ‘स्वयंवरम’ (मल्याळी), यांचा अभ्यास आहे. तर विदेशी चित्रपटकथेत ‘गॉन विथ द विंड’ (इंग्रजी), ‘टर्टल कॅन फ्लाय ‘(खुर्दीश), ‘रोशोमन’ (जपानी), ‘बायसिकल थीव्ज’ (इटालियन) या चित्रपटकथांचा आढावा आहे.

त्या- त्या शतकातील, सामाजिक, धार्मिक, आर्थिक, राजकीय परिस्थिती जाणवून घेण्याचे, अभिरुचीपूर्ण माध्यम म्हणजे चित्रपट होय. मूलत: चित्रपटांची निर्मिती, मूळ हेतू करमणूक हा धरून झाली आहे. तरी चित्रपटकथा प्रेक्षकांच्या भावनेचे विरेचन घडवून आणते. १९५३ मध्ये ‘श्यामची आई’, २००३ मध्ये ‘श्वास ‘तर २०११ मध्ये ‘देऊळ’ या चित्रपटकथेवर आधारित चित्रपटांना सर्व श्रेष्ठ राष्ट्रीय पारितोषिक प्राप्त झाले आहे. मराठी चित्रपट तमाशा फड, गावची पाटीलकी, माजघर व अंगण यातून पुढे जाऊन आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रगती करतो आहे. मराठी चित्रपटकथेची अशी नोंद घेतल्या जाणे, ही बाबही निश्चित अभिमानाची आहे.

लेखक डॉ महाजन हे संरक्षण मंत्रालयाअंतर्गत, आय ओ एफ एस कॅडर मध्ये, आयुध निर्माणीला उच्चपदस्थ अधिकारी असून, फेडरेशन ऑफ फिल्म सोसायटीज, शी संलग्न असलेल्या,

निर्झर सिने क्लब नागपूरचे अध्यक्ष आहेत. डॉ. प्रवीण महाजन हे प्रशासक, व्यवस्थापक, अभियंता, ज्योतिषी, मानशास्त्रज्ञ, लेखक, कवी, नाट्यलेखक, नाट्य दिग्दर्शक, अभिनेता, संपादक, चित्रपट समीक्षक, गायक, छायाचित्रकार, वृत्तपट-लेखक, दिग्दर्शक, संपादक असे बहुआयामी व्यक्तिमत्त्व आहे. त्यांनी आठ विषयात विद्यापीठाच्या पदव्या प्राप्त केल्या असून त्यात इंजिनियरींग, साहित्य, मानसशास्त्र, ज्योतिष्य, व्यवस्थापन, चित्रपट निर्मिती, योग शिक्षण सारखे विविध विषय आहेत. त्यांच्या या ज्ञान प्रतिभेमुळे हा संशोधन ग्रंथ, उच्च कोटीचा श्रीमंत झाला आहे. प्रत्येक साहित्य व चित्रपट प्रेमी तसेच साहित्य संशोधकांनी सूक्ष्म रीतीने अध्ययन करावा असा आहे. तसेच विद्यापीठाने कला व ललितकला या विभागात अभ्यासक्रमासाठी घ्यावा असा महत्त्वपूर्ण ठरलेला आहे.

*************************

## ५१गेले ते दिन गेले

जुन्या पिढीचे जुनी कटकट गेली, असे म्हणत आपण जुन्या वस्तू टाकून देतो. जुन्या सवयी टाकतो मात्र नव्या तकनिकीशी तडजोड करताना, कधीतरी मन म्हणते, "गेले ते दिन गेले"

अश्या गेल्या ३० वर्षांपूर्वी च्या लोकप्रिय वस्तू सांगते बघा.

१) टेलिफोन लँडलाईन

पूर्वी १९९२ सालापर्यंत फोन एका जागी बांधलेला असायचा. त्यांना लँडलाईन म्हणत. आता मोबाईल फोन आले आहेत. ते मोबाईल फोन व्यक्ती सोबत सर्वत्र नेता येतात. व्यक्ती त्या फोनशी स्वतः ला बांधून ठेवतात. पूर्वी लँडलाईन वर, सर्वांसमोर बोलावे लागे आणि प्रायव्हसी ची ऐशी तैशी होई.

मत्रिणीला अथवा मित्राला फोन केल्यावर, लॅण्डलाइनवर चुकीची व्यक्ती येई.तर कधी वारंवार रॉंग नंबर लागे.

ज्यांच्या घरी असा फोन असे, त्यांचा नंबर देऊन तिथे निरोप ठेवला जाई किंवा फोनवर त्या व्यक्तीला बोलावत असत.

२)टेलिफोन बूथ - पुढे सार्वजनिक टेलिफोन बूथ आले. १ रुपयाचे नाणं टाकून लोकल फोन होई. रात्री १० नंतर बिल कमी येते, म्हणून रात्री लाईन लावून फोन होई. त्या एस टी डी बूथवर, फोन डिरेक्टरी, म्हणजे फोन नंबर शोधण्यासाठी असलेली पुस्तिका असे. आणि त्यातून फोन नंबर शोधला जाई.

मोठमोठाले फोन नंबर पाठ केले जात असत, अथवा छोटी टेलिफोन डायरी ठेवली जाई.

२) नोकरीसाठी अर्ज करणे- मार्कशीटच्या कॉपी टाईप करून, अॅटेस्ट केल्या जात. पूर्वी नोकरीचा अर्ज प्रत्यक्ष जाऊन त्या अॉफिसात दिला जाई. फोटो लावलेल्या त्या अर्जाला, सीव्ही ऐवजी तेव्हा बायोडेटा असे म्हटले जाई. तो बायोडेटा पोस्टाने पाठवला जाई.

३) कॅसेट रेकॉर्डर- आवडती गाणी ऑडिओ कॅसेट मध्ये ठेवली जात. कॅसेट रेकॉर्डर, तबकडीच्या ग्रामोफोनच्या तबकड्या, व्हिडीओ कॅसेटची लायब्ररी असे व व्हिडीओ आणून सोसायटीतले माणसे एकत्र जमून सिनेमे बघत असते. गायनाचे भजनाचे कार्यक्रम, गणपती उत्सवाचे ऑर्केस्ट्रा, इतकीच करमणूक असे. सिनेमा थिएटर एखादेच असे. व सरकत्या गाडीवरून सिनेमाची पोस्टर्स गावात फिरवली जात.

४) वाचनालय - एखाद्या विषयाचा अभ्यास करण्यासाठी अथवा ते प्रोजेक्त करण्यासाठी वाचनालयातून पुस्तके आणून अथवा तिथे अभ्यासिकेत बसून रिसर्च केला जाई. आता संगणकावर सर्व मिळते. (गुगल सर्च) आता किंडल वर कथा कादंबऱ्या ई बुक्स वाचता येतात.पूर्वी वाचनालय हा जीवनाचा अविभाज्य घटक असे.

५) टाईप रायटर - टाइपिंग साठी रेमिंग्टन चे टाईपरायटर असे. त्यासाठी कागद कार्बन, रिबीन वापरली जाई. चूक दुरुस्त करण्यासाठी व्हाईट इंक वापरली जाई.टाईपिंग शिकण्यासाठी कोर्स केला जाई

६) टेलिग्राम - चांगली किंवा वाईट बातमी कळवण्यासाठी कड्कट्वर चालणारा असा टेलिग्राम वापरला जाई. पोस्ट खाते फार महत्वाचे असे.

७) रॉकेलवर चालणारे स्टोव्ह - स्वयंपाक  करणे, पाणी तापविणे, यासाठी स्टोव्ह वापरला जाई. वातीचे स्ट्रोव्ह आणि भडक्या स्टोव्ह वर रॉकेलच्या काकड्याने आग पेटवून स्वयंपाक केला जाई. १९७० च्या दरम्यान गॅस शेगडी आली, २००७ च्या सुमारास मायक्रोवेव्ह ओव्हन आले.

८) टांगा - वाहतुकीसाठी घोड्याने ओढला जाणारा टांगा १९८० पर्यंत असे. रिक्षा, गाड्या कार्स चा सुळसुळाट नंतर झाला.

९) काचेच्या बाटलीतले दूध - दूध केंद्रांवर काचेच्यात बाटल्यातून दूध विकले जाई. लंबकाची भिंतीवर लावलेली टोल देणारी घड्याळे असत. ज्यांना किल्ली दिली जाई.लवकर ऊठण्यासाठी गजराचे घड्याळ काही घरी असे.

१०) शेंगदाणे कूट करण्याचे यंत्र, ताक करण्याची घुसळणी, मोदकपात्र हांडे, कळशी.बिडाचे तवे, पाणी तापवण्याचा बंब, शेगडी आणि वायन, घंगाळी, खलबत्ता, लंगडी, काशाच्या थाळया, दगडी जाते, अशी भांडी स्वयंपाकघरात असत. स्वयंपाक घरातील या वस्तू आता अडगळीत गेल्या आहेत.

११) कंदील, चिमण्या, लामणदिवे - विजेचे दिवे नसताना, अथवा वीज कनेक्शन नसल्यास, वीज गेल्यास वापरण्यासाठी रॉकेलवर चालणारे कंदील, चिमण्या व लामणदिवे असत. आता विजेरी आल्याने हे दिवे अडगळीत गेले. काही घरी तर पलिते व मशाली वापरल्या जात.

१२) पितळी, फिरकीचे तांबे, - प्रवासात पाणी नेण्यासाठी, त्या काळी पाण्याचे प्लास्टीकचे बाटली ऐवजी फिरकीचे तांबे वापरात असत.

१३) रेडिओ - न्हाव्याच्या धोपटी सारखा रेडिओ खांद्यावर नेत (ट्रॅन्झिस्टर)

१४) पत्र पाठवणे - पूर्वी एकमेकांना ख्याली खुषालीची पत्रे पाठवली जात. पत्र देणाऱ्या पोस्टमनची वाट अंगणात ऊभे राहून बघितली जाई, दिवाळित भाऊबीज आणणाऱ्या मनी अॉर्डरची खास वाट बघितली जाई.

१५) अंगण, तुळशी वृंदावन - घरा भोवतीच्या रिकाम्या जागेस अंगण म्हणत .ज्यात बांधलेले उंच तुळशी वृंदावन असे.

आता ते चित्रपटात अथवा संस्कृती म्युझियम मध्ये बघता येते.

१६) नऊवार साडी

काष्टी घालून नऊवारी साडी बांधली जाई.

तर मंडळींनो या वस्तू आता गेल्या

काळ बदलला आहे,

गेले ते दिन गेले

*************************

## ५२ फुलांच्या गावाला कधी जायचे?                    शुभांगी पासेबंद

देव सर्व सजीवांना वेगवेगळया प्रकारे अाशिर्वाद देत असतो,

फुले हे त्या असिर्वादांपैकी एक भावरुप असते

फुलांचे वेड नाही अशी व्यक्ति विरळाच असते फुलांच्या मंद सुगांधाने प्रत्येकाचेच मन भरुन जाते. काट्या कुटयांनी भरलेली वाट सुगंधीत करण्याची, नजरेला निर्मऴ आनंद देण्याची कला या  फुलांना ऊपजतच माहित आहे, फुलांच्या सोबतित मन डोलते, सुखावते, प्रसन्न होते

उद्रयानांमध्ये मशागत करुन विविध रुपी, विविध रंगी फुले फुलवलि जातात, मात्र अशी मशागत न करता केवाळ निसर्गराजाचे देणे म्हणुन उमलणाऱ्या फुलांचे कास पठार, जगातील अदभुत आश्चर्य आहे.अशी हजारोंच्या संख्येनेफूले उमलतात.कुठल्या परदेशात नाही, महाराष्ट्रातच हो! आपल्या महाराट्रातच, साताऱ्याला, कास पठारावर हि फुलांची दुनिया आहे.अगदी गुरु दत्तने जर ही फुलांची दुनिया, बघितली असति ना, तर त्यंाची काय बिशाद होति की म्हणावे

=ये दुनिया अगर मिल भी जाये तो क्या है, विश्वातील खास असा दर्जा, या कास पठाराला मिळाला अाहे।पश्चिम घाट तर वैश्विक बनलाच आहे, कासचे पठार तर त्या घाट रुपी मुकुटाच्या कोंदणातिल हिराच आहे.

'व्हॅलि अॉ्फ फ्लॉवर्स' सारखे आकर्षक नाव नसले तरी, फुलोंकी घाटी सारखे वलय नसले तरी, 'पुष्प पठार' अशी मराठमोळी उपाधी धारण करणारे ते फुलांचे सुंदर गालिचे अॉगस्ट -सप्टेंबर महीन्यात बहरतात, खरेतर, पथ्थर शब्दांवरुन पठार शब्द आला आहे.त्या पथ्थरावर फुललेल्या फुलांवरुनच 'फूल अौर पथ्थर, चित्रपट सुचला असावा असे मला दर वर्षी

वाटते.

पहिल्या पावसाची सुखद सर येताच ही फुले उमलायला सुरुवात होते.हळु हळु ही फुले तुमच्या स्वागतासाठी मोठी रांगोळी घालतात काही एकरंगी, काही दोन रंगी, काही धुपछाव असलेली, म्हणजे, अर्धी ़फिकी, आर्धी गडद रंगाची असतात.रानफुलांच्या या परडीत मिकीमाउसच्या आकाराची, कपबशा, कंदिल, पिंजरे, तुतरि अशा आकाराची, रंगीत, लाल, जांभळी, रंगकेशरी फुले फुलतात, छोटया टिकली पासुन, ते मुठीएवढी अशी, लोंबत्या वेणीच्या आकाराची, बटणासारखी, अशी विविधता आढळते. अलाउद्दिनच्या गुहेसारखी अजब दुनिया दिसते. कास म्हणजे परमेश्वराची जणु प्रयोगशाळाच आहे.देव अजब गारुडी, वेगवेगळे प्रयोग करतो, प्रयोग बिघडतो, वेगवेगळी फूले चुकुन बनतात, काही हटके, मुद्दाम नवनवी घडवतो

ही जादुई दुनिया सातार्‍यापासुन जेमतेम २० किमि अंतरावर आहे, छौटी फुले वार्‍यापुढे टिकाव धरुन राहतात, या शास्त्रीय तत्वानुसार, फुले फार मोठ्या आकाराची नसतात.

ही दुनिया बघायला, कासला पहाटे जावे.फुलांना स्वसंरक्षणार्थ काटे असताता, त्यामुळे, मळलेल्या पायवाटेनेच जावे, बूट घालुन जावे.निळे ईटुकले डोंगर, पांढरी लाला कमळे फुललेले तळै, लाल पाण्याचे ओहोळ, हिरवी शेते, फुलांचे पांघरुण गुन्डाळलेली सुस्त पृथ्वी, तिला उठवायला आलेले बंडखोर सुर्यनारायण, लाल सोनेरि प्रकाश, निसर्गप्रेमींसाठी लई भारी चित्र असते, लुटा किती सोने लुटायचे तितके! आणि खूष व्हा।

विल्यम वर्दस्वर्थ या लेखकाला, डॅफोडिल्स ही कविता, फुले बघुनच सुचली, आमच्या कासच्या पठारावर, ते लेखक आले असते ना तर त्यांनी खंडकाव्यच लिहीले असते.

कासच्यापठारावर, तुम्हि जणू वनराणी/वनराजा बनून जाता, सोनेरी प्रकाश, राज्याभिषेक करतो.तुम्हीपण त्या डॅफोडिल कवितेत लिहिल्याप्रमाणे नंतर डोळै मिटुन बसाल तेव्हा तुमच्या नजरेसमोर खास कासचे पठार येइल.तेरड्याचा रंग तीन दिवस तशी ही फुले अल्पायुषी असतात, त्यामुळे त्या ठराविक काळातच उमलतात

साताऱ्याजवळ पसर्णीच्या घाटात धनुरधारी सीतामातेची मुर्ती आहे.यापठारांवर शीतामाता एकट्याच वावरल्या, तयामुळे, येथे त्यांचे अश्रु पडले असा समज जनमानसात आहे। त्यामुळे लहान, बुंदक्यासारख्या आकाराच्या फुलाना सीतेचे अश्रु म्हणतात, पांढऱ्या फुलांना सीतेचे पोहे म्हणतात.लांब लोंबत्या एका फुलाला सीतामातेची वेणी असे नाव दिले गेले आहे.अजिंक्यताऱ्यावर सुद्दा अशी फुले आढळतात

पाउस पडला की मला जणु त्या पुष्पपठाराचा, माहेरचा, सांगावा येतो

फुलेच फुले फुललीत ग लेकी

पठारावर जायला ये चटदिशी

घेउन ये सख्या सवंगड्यांना

मान दे फुलांच्या आमंत्रणाला

फुले पुलली आहेत, कासच्या पठारावर कधी जायचे?

फुलांची दुनिया बोलावते आहे

फुलांच्या गावाला कधी जायचे?

*******************

# 53जुनी गाणी, चलनी नाणी.

जेष्ठ नागरिक ही देशाची श्रेष्ठ संपत्ती आहे, हे नागपूरचे सुधाकर सोनार यांनी सिध्द केले आहे.अतिशय पद्धतशीर प्रकारे, श्री. सोनार सर यांनी 1932 ते 1994 पर्यंतच्या हिन्दी आणि मराठी गाण्यांचा संग्रह केला आहे. जुन्या जमान्यातील, रेडिअ‍ो, ग्रामोफोन, ऑडीअ‍ो कॅसेटस् असा खजिना त्यांच्याकडे घरी आहे. मात्र ही सर्व जुनी गाणी, त्यांनी MP3 Format मध्ये, त्यांच्या संगणकामध्ये साठवली आहेत. 1932 पासून च्या संगीत इतिहासाचा सुवर्णकाळ ऐकायला कानसेन असाल तर श्री. सोनार तुम्हाला आनंदाची मेजवानी देतील. संगीताच्या आनंदधारांत चिंब भिजवतील. 2100 अ‍ॉडीयो कॅसेटस् वर, 16000 गाण्यांचे टॅक्स, त्यात 1950 हिन्दी चित्रपटांवरील 14500 ट्रॅक्स, तर मराठी चित्रपटांचे 1500 ट्रॅक्स आहेत. के. एल. सेहगल, के. सी.डे, कानन देवी, नूरजहान, जोहराबाई, सुरैय्या, अमीरबाई कर्नाटकी, ज्युथिका रॉय, शमशाद बेगम, गीता रॉय खुर्शीद या जुन्या गायक गायिकांची गाणी आहेत. चित्रपटांची गाणी, खाजगी अल्बम यामध्ये या सुर्वणकाळाच्या, पुढील वाढीव टप्प्यातील, लतादीदि, आशा मंगेशकर, मन्ना डे, मोहम्मद रफी, मुकेश, तलत मेहमूद, किशोर कुमार, हेमंत कुमार, पंकज मलिक, जगमोहन यांनी गायलेली हिन्दी गीते आहेत. अगदी कुमार सानू, सोनू निगम यांचीदेखील गाणी आहेत.

मराठी गाण्यांचे संग्रहामध्ये सुधीर फडके, लतादिदी, आशाताई, सुमन कल्याणपूरकर, बालगंधर्व, कुमार गंधर्व, वसंतराव देशपांडे, जितेन्द्र अभिषेकी, प्रभाकर कारेकर, अरूण दाते इत्यादींची गीते आहेत. खर्रखर्र नाही, आवाजांच्या बाबतीत चढउतार नाही, गुणवत्ता मस्त आहे. मराठी किचकवध चित्रपटातील ``धुंद मधुमती रात रे ना सरे`` हे गीत त्यांच्याकडे, हिन्दी अनुवादित रूपात सुद्धा आहे. सोनारमामांचे स्मरनात गीतमाला आहेत, गीतकथा आणि आठवणी आहेत.

1931 सालच्या आलमआराच्या, "दे दे खुदाके नामपे प्यारे" गाण्याने या खजिन्याचे दार उघडते . 1994 सालच्या 1942 A Love Story ने खजिना परिपूर्ण होतो.

1994 सालच्या पुढील हे खजिना बनवण्याचे काम, आपला नातू मयुरेश पूर्ण करेल, अशी सुधाकर सोनार सरांना खात्री आहे. ही संग्रहीत गाणी संगणकात आहेत, त्यांची यादी एका पुस्तकात लिखित रूपात आहेत. इतकी जुनी गाणी, सुंदर आवाज सुस्थितीतील संगीत, अशा या खजिन्याचे सुव्यवस्थित अनुक्रमणिकेसह नियोजन आहे. गायक, चित्रपट, चित्रपटाचे बोल, अशा कोणत्याही एका परिमाणाने, आपले आवडते गाणे शोधून ऐकता येते. बोल आठवल्यास बोल अथवा अंदाजाने साल आठवलं तरीही सुधाकर मामा, गाणे शोधून ऐकवतात. वडील माणिक वर्मा, ज्योत्स्नाताई, इ.ची मराठी गाणी ऐकत, तेव्हा सुधाकर सोनार सर हिन्दी चित्रपटगीतांचे रसिक होते. मुलांनी कोणती गाणी ऐकावी यावर बंधन घालायचा तो काळ होता. मला आठवते, आम्हाला देखील 1965 सालचे आठवते की, बिनाका गीतमाला ऐकण्यासाठी अभ्यास पूर्ण करून, चार जणांची परवानगी घ्यावी लागे. सिनेमाला जातांना वडीलांना चोरून जावे लागे. गाणी ऐकणे मेजवानी असे.

त्याकाळी रेडिअो सिलोन, विविध भारती ऐकतच बालक मोठा होई. हेलन, िफअरलेस नादिया, मास्टर भगवान, मेहमूद यांची गाणी तरूणांनी गावी, गुणगुणावी, हे त्याकाळी पालकांना आवडत नसे. अभ्यासाच्या, छोट्या छोट्या गोष्टीतला निर्मळ आनंद घेण्याच्या, जागतिकीकरणा पूर्वीच्या दिवसांच्या, चित्रपटांच्या, गायकांच्या, चित्रपट प्रसंगाच्या, स्पष्ट आठवणी सोनार सर सांगतात.

त्या काळी ही जुनी गाणी, म्हणजे मानसोपचारच होते, आनंद देणारे, प्रेम शिकवणारे, सावरायला मदत करणारे भाव या गाण्यांत होते, असे मला आजही वाटते. सेवानिवृत्ती (रेल्वेमधून) घेतल्यावर सोनार सर संगणक चालवायला शिकले व त्यांनी या गीतसंग्रहाचे, स्वतः संगणकीकरण केले. त्यांच्या मेंदूत खूप गाणी, त्याचे शब्द, गायकांची कलाकारांची, नावे आजही स्पष्ट कोरली आहेत. संगीत दिग्दर्शक गीतकार यांच्या नावासह संगणकावर सुव्यवस्थीतपणे Type करून, ते गाणी शोधतात, ऐकवतात. वीज गेल्यास, इंटरनेट

गेल्यास काम अडू नये म्हणून इंटरनेट शिवाय वापरता येतील, अशा युजर फ्रेंडली मार्गाने, ही गाणी साठवली आहेत.

सहलींना गेल्यावर मित्र आप्तेष्टांकडून देखील, सर जुनी गीते मिळवतात. जुन्या गाण्यांच्या, कलाकारांच्या आठवणी सांगताना त्यांच्या डोळयात वेगळीच चमक येते. आलमआराच्या काळापासूनचा, गीत इतिहास, सोनार सरांच्या मेंदूत आहे. 1966 साली पंडीत जसराज यांनी `सह्याद्री की लडकी` चित्रपटासाठी गायलेले दुर्मिळ गाणे, तलत मेहमूदची, गैरफल्मी गजल. आधुनीक काळातील जगजित सिंग, चित्रा सिंहची गजल गीते, तसेच काही उडत्या चालीची, 1994 पर्यंतची गाणी संग्रहात आहेत.

नागपूर UCN channel तर्फे मुलाखत घ्यायला आलेल्या कलाकाराने, सोनार सरांना नमस्कार केला. ``यातील काही गाणी तर, मला माहित देखील नाही`` अशी प्रांजळ कबुली त्याने दिली. ``तुमच्याकडे जवळ-जवळ सर्व गाणी आहेत`` असे स्तुतिसुमन बऱ्याच जणांनी वाहीले. तरीही ते मग अतिशय नम्रपणे, ``99% च गाणी आहेत. या काळातील, संग्रहात नसलेली गाणी आठवल्यास कळवा, मी समाविष्ठ करीन``. असे उत्तर देतात. अनेक चाहत्यांपैकी, एक चाहता त्यांच्याकडे गाणी ऐकायला आला. आराम खुर्चीत, डोळे मिटून 1934, 35 सालची गाणी ऐकून ढसाढसा रडायला लागला. ``क्यों जिंदगी की राह में, मजबूर हो गये`` चित्रपट साथ-साथ चे गाणे ऐकतांना माझे डोळे देखील पाणावले होते. हल्ली आपण गाणी video रुपात पाहतो, ग्लॅमर उपभोगतो, गाणे जगत नाही, संगीत मनात मुरवत नाही. बाबूल मोरा नैहर छूटो जाये, जब दिलही टूट गया, हम जीके क्या करेंगे, अशा के एल सैगलच्या गाण्यापासूनची जुनी चिरतरुण गाणी ऐकून भावना उचंबळून येतात. विनम्र, हळवे प्रेम, नाजूक नातेसंबंध सांगणारे शब्द असलेली, हळूवार पार्श्र्वसंगीत असलेली गाणी ऐकण्यात 2/3 तास कसे जातात कळतच नाहीत.

1932 ते  1994 या काळातील संगीत, ही श्रेष्ठ कला साधना आहे. तो संगीताचा सुवर्ण काळ होता. चांगल्याला चांगले म्हणणे चांगले, वाईटाला  वार्टट म्हणणे चांगले, वाईटाला

चांगले म्हणणे वाईट आणि चांगल्याला वाईट म्हणणे म्हणजे वाईटाहून वाईट! त्यामुळे जी सोन्यासारखी गाणी होती, त्यांचे मोल सोनार सरांनी केले आहे. ह्या गाण्यांचा वारसा जतन केला आहे. संवेदनशील मनांना स्पर्श करणारी तशी गाणी हल्ली फार कमी बनतात.

``चांदीकी दिवार न तोडी प्यार भरा दिल तोड दिया``- विश्वास.

"राही मनवा दुःखकी चिंता क्यो सताती है"- दोस्ती.

"सावनके झूले पडे, सैयानी हमे तुम कहाँ भूले पडे"- प्यार की प्यास.

"गुजरा हुआ जमाना, आता नही दुबारा"- शिरी फरहाद.

"ये मेरा दिवानापन है"- यहुदी.

"दोस्त दोस्त ना रहा"- संगम.

अशी छान-छान, गेय, मस्त गाणी, सोनार सरांकडे आहेत.

ही स्वरांची जादू फक्त त्यांनी, मित्र मैत्रिणी, कुटुंबिय यांच्या मनोरंजनासाठी पेटीत साठवली आहे. ती $mp_3$ mode मध्ये बदलली असली तरी श्री. सोनार सर, कुणालाही, गुणवत्ता टिकून राहावी यासाठी, Copy करून देत नाहीत. ही जुनी गाणी आजही चालणारी चलनी नाणी आहेतच. पण जुन्या पोस्ट कार्डस् टपाल, तिकीटे, चलनी नाणी यांचा देखील संग्रह, त्यांच्याकडे आहे. नाण्यांमध्ये निझामकालीन, मध्ययुगीन, मराठा कालीन, परकीय चलनातील नाणी त्यांच्या संग्रही आहे. 1854 सालचे ईस्ट इंडीया कंपनीचे, पाव आण्याचे पोस्टाचे तिकीट त्यांच्या संग्रही आहे. स्वतंत्र भारतातील 1947 सालचे एक आण्याचे तिकीट त्यांच्याकडे आहे. 1960 सालचे first day cover पंधरा पैसे किमतीचे पोस्टाचे पाकीट त्यांनी जपून ठेवले आहे. 1830, 1840 18152, 1952 अशा सालची नाणी आहेत. जेष्ठ नागरीकांच्या एका प्रदर्शनामध्ये ह्या पोस्टाची तिकीटे व नाणी यांचे प्रदर्शन श्री. सुधाकर सोनार यांनी केले आहे. (1160 First day covers,

660 नाणी, 6669 तिकीटे इ. आहे. नागपुर येथे, जनरल पोस्ट अॉफिस ला, १०० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल भरलेल्या फिलेटली प्रदर्शनात, श्री सोनार सर यांना रौप्यपदक मिळाले.

सामान्यतः चारचौघांसारखे जीवन आपण जगतो आणि एके दिवशी काळाच्या पडद्याआड जातो. मागे राहते आपले कार्य, आपले नांव, आपले छंद, आपला ठेवा! आपली कला, लेख, आपले संग्रहीत दुर्मिळ काही! गाण्यांचा खजिना जपणारे, सुधाकर सोनार सरांसारखे कलाकार, चिरकाल स्मरणात राहतात-

जन पळभर म्हणतील हाय हाय, मी जाता म्हणतील कार्य काय?असा प्रश्न या, श्रेष्ठ जेष्ठ नागरिकांचे बाबत येतच नाही.

हॅटस अॉफ् टू सुधाकर सोनार सर.

$*****

## ५४सांगू की नको सांगू,

कटुता आठवायला ये

जखम भळभळायला ये, आता आयुष्य कमी उरले

पुन्हा सोडून जायला तरी ये।।१।।

प्रेम लपवणे हेच प्रेम असते, कधीतरी ते दाखवायला ये

तुला माहित आहेत, न येण्याचे बहाणे, तशाच बहाण्याने, परत जायला ये।।२।।

बूज राख माझ्या अहंकाराची रे

स्वीकार करते मी माझ्या चुकांची

पूर्वीसारख्या चूकलेल्या मोहमायांची

पण क्षमा करायला तरी ये।।३।।

कौल देऊन देवळात बसले

नवसांची व्यर्थता दाखवायला ये

सांगू की नको सांगू अपयश माझे

शेवटची इच्छा जाणून तरी ये।।४।।

अंतर पडले म्हणजे येत नाही दुरावा

माझ्या आयुष्याचा प्रवास हा सरावा

सारे संपले ते, साकव का छळावा

मरण्यापूर्वी एकदा चेहरा दाखवायला ये।।५।।

# ५४मार्गशीर्षाची थंडी

माघी गणपती उत्सवातून घरी परतताना, मातीचा ओला वास जाणवू लागला. जी गवताची पाती सकाळी सकाळी ओल्या दवात न्हाऊन सजली होती, ती संध्याकाळी सुद्धा टवटवीत होती. एरवी पांढरे मळकट वाटणारे, बगळे पांढरेशुभ्र वाटत होते. धुक्याचा फिकटसा, अर्धपारदर्शी पडदा असताना, तो कापत सकाळी कामावर जावे लागते आणि भर संध्याकाळी, सहा वाजताच ऊन नकळतच घराच्या छतांवर, झाडांच्या शेंड्यांवर रेंगाळते. तेव्हा अगदी खुशाल समजावे थंडी आली. आपल्या बरोबर शेकोटीचा आनंद घेऊन, धुक्याची शाल पांघरून, फळाफुलांची टोपली भरून घेऊन आली. रंगीबेरंगी आकाशाची दुलई खांद्यावर घेऊन आली. खाऊंची लयलूट सोबत घेऊन आली. थंडी आवडणाऱ्या मुंबईकरांना तसे स्वेटर व शालीचे वावडेच असते. उत्तर भारतीय प्रदेशात स्वेटरची व शालींची जशी खास रेलचेल असते. तशी मुंबईत कधीच नसते. डेहराडून आग्रा दिल्ली इथे जशा स्त्रिया, अगदी सिनेमा बघता बघता स्वेटर विणतात व भराभर स्वेटर विणून आपल्या लाडक्या व्यक्तीच्या शरीरावर चढवतात, तसे मुंबईत शक्यच नसते. अगदी पूर्ण  जीवनकाळात एक स्वेटर बनवला तरी चालतो. अशीही तो स्वेटर कपाटाचीच धन होणार असतो. गरम कपड्यांसाठी जरी नाही, तरी थंडीच्या खास विशिष्ट धुंदीसाठी तरी थंडी सर्वानाच खूप आवडते. शिवाय दुर्मिळ गोष्टींचे आकर्षण मानवाला असतेच.

शरीराला उब आवश्यक असताना थंडीचे व थंड हवेच्या स्थळांचे हळवेसे एवढे आकर्षण माणसाला का असते. ते समजत नाही.गरम प्रदेशातल्या आपल्या देशवासियांना थंड हवेचे प्रदेश आवडतात. तर परदेशी नागरिक, गरम हवा व भरपूर सूर्यप्रकाश साठी आपल्या भारत देशात येतात. तरीही थंडी मात्र सर्वानाच हवीहवीशी असते. सिनेमातील थंडीबद्दल काय बोलायचे? फक्त बघत राहायचे. जो हिरो त्यात फुंकर मारतो, ती मारून श्वास सोडला कि दिसणारा पांढरा धूर बघून आपणच खुश होतो. बर्फाच्छादित शिखरे पाहून व लांब लांब, जनावरांचे, फरचे केसाळ कोट घालून, बर्फासाठी चालण्यासाठीची ऊपकरणे, वापरले जाणारे बूट

घालणारे ते हिरो आणि हिरॉईन पाहून बालपणापासून ते आजपर्यंत प्रत्येक थंडीतील, दवाने भिजलेल्या आठवणी नजरेसमोरून फिरतात. कानाला मफलर बांधून किंवा माकडटोपी घालून प्रत्येकजण सारखेच दिसते, पण त्या आवाजावरून ओळखलेल्या व्यक्ती व ती थंडीची वेळ आठ्वतेच! थंडीला एक वास असतो. गवतीचहाचा, शेकोटीचा, उदा. धुपाचा आणि ताज्या भाकरीचा सुद्धा!

हा ऋतू प्रेमीजनांचा असतो, महाशिवरात्र, शंकर पूजेचा असतो. कोवळया आठवणींचा थंडीचा ऋतु स्मरण रंजकच असतो.

पावसाळा हा तसा मेघदूत मुळे प्रेमासाठी प्रसिद्ध असलेला ऋतू असला, तरीही थंडीवर जेवढी गाणी लिहीली गेली, तेवढी पावसावर सुद्धा लिहिली गेली नाहीत. थंडीत बहुतेकदा विरह व्याकुळता असते. निसर्ग रम्यतेचा साक्षात्कार असतो. सणासुदीचे व सुगीचे कुतूहलाचे वातावरण असते. थंडीत जागरण करायच्या रात्री व सहलीचे दिवस असतात. फारशी दगदग, तडतड न करता, सकाळी उशिरा पर्यंत बिछान्यात लोळायचे फुरसतच दिवस, असेच थंडीचे वर्णन करता येईल. बदल हा निसर्गाचा नियमच असतो. निसर्ग कूस पालटतो. ऋतू बदलत राहतात. किंबहुना काळ पुढे जातो हेच हे ऋतू सांगतात. थंडीचे पाऊल कालच मला डोंगर आडच्या झाडाखाली ओल्या दवावर दिसले. कोवळे ऊन पुढच्या ऋतूचे संदेश देऊ लागले.

चला थंडीचे स्वागत करू या

जाडो कि नर्म धूप और

पूर्वाईया चले,

थंडी सफेद चादरों से लेटे बर्फपर

बैठे राहे तसवुरे जाना किये हुए

दिल धुंडता है फिर वही

फुरसत के रात दिन

जाडे का मौसम आ गया !

# ५५ नाते नजरेचे

नाते नजरेचे कथा आहे, की पत्र ते, तुम्हीच ठरवा

प्रिय अभिषेक,

तुला पत्र लिहायची हि पहिली व शेवटचीच वेळ आहे. पुन्हा ती वेळ कधीही येण शक्य नाही. शिवाय तुला प्रश्न पडेल कि मला "प्रिय " म्हणणारी हि कोण? कदाचित तुला वाटेल कि तुझ्या चाहत्यांच्या म्हणजे फ्यान क्लब मधल्या पैकी हि एक दिसते आहे. एकदम प्रत्यक्ष पत्राने आपल्याशी जवळीक साधायचा प्रयत्न करते आहे. काय हक्क आहे हिला? कदाचित तुझा अहंभाव मोराच्या पिसाऱ्या प्रमाणे फुलून नाचू लागेल व पारितोषिक मिळाल्या प्रमाणे सुखावेल कि माझ्या श्रीमंतीवर, देखण्या रूपावर, अभिनयावर हि सुद्धा फिदा झालेली दिसते आहे. असे पत्र येणे हा तुला आपल्या पुरुषत्वाचा सन्मान वाटेल. शेवटी तुला काय वाटावे हा तुझ्या प्रश्न आहे थांब! कंटाळवाणे वाटते म्हणून हे पत्र बाजूला टाकू नकोस. ग्यानबाची मेख पुढेच आहे. तसे तुझी माझी मैत्री किंवा तुझे माझे नाते काहीच नाही. घाबरू नकोस. आर्थिक व शारीरिक व्यवहारांच्या नाते संबधात तुझ्या आयुष्यात आलेल्या तरुणींपैकी मी नाही. कुठल्याही आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झाडणे, तुझ्यावर बाळंत आणणे हा माझा विचारही नाही. तुझ्या त्या झगमगत्या सरळमार्गी सुखी जीवनाच्या वाटेवरची मी एक हरिणी, हरिणाक्षी, हारिणी आहे. माझे संस्कार कुणाला जाळ्यात पकडायचे नाहीत. काही बाळंत आले तरी तुझे परमपूज्य पिताजी तुला वाचवतीलच! शिवाय असे आरोप झटकून टाकायची तुझी ती खुबीच आहे. मी प्रसिद्धी साठी असे केले, असेही तू म्हणू शकतोस. सर्व प्रकरणात बदनाम स्त्रीच होते. हे मी जाणून आहे.

तो मी नव्हेच मध्ये अनेक तरुणींची आयुष्य बरबाद केल्यावर कोर्टाच्या सुनावणीच्या वेळी लखोबा अंगावरचा किडा झटकून टाकायची जी सूचक खूण करतो त्या प्रकारे, तसेच किंवा कपाळावरची झुलपे मागे झटकावी त्या सहजतेने किंवा हेअर ब्यांडने, तु ते केस जागेवर बसवावे

तसे सहजपणे तू माझे हे पत्र भिरकावून देशील. या अत्याधुनिक जगात नात्यांची किंमत कशी फेडायची व त्यातूनही प्रसिद्धी कशी मिळवायची, हे तुझ्या रक्तातच आहे. न बोलत अनुल्लेखाने दुसऱ्याला मारायची, तर कधी कधी कुणाच्या तर्फे मारायची कला तू फार पूर्वीच आत्मसात केली आहेस. तुला अशी भाषा वापरायची सवय नसेल, कारण तोंड देखल्या व स्तुतीसुमनांच्या उधळणीचा गराडा घालणाऱ्या खुश मस्कऱ्याना  तू आज पर्यंत आजूबाजूला घेऊनच फिरत असतोस, तुझ्या वडिलांपासूनच तू ज्या काही कला शिकलास, त्यापैकी हि तर सर्वात श्रेष्ठ कला आहे न ! चतुर हरहुन्नरी व हुशार म्हणून तुझे कुटुंब पूर्वीपासूनच सर्वश्रुत आहे. तर हे प्रेमपत्र असले तरीही दुर्लक्षिलेल्या, नाकारलेल्या, पुसलेल्या एखाद्या तरुणीचे हेट्मेल (द्वेश पत्र) समजून नाकारू नकोस. वाच पुढे.

तर मी तुझ्या सहवासासाठी आतुर झालेल्या, शारीरिक संबंधांसाठी हपापलेल्या तरुणींपैकी  एक कधीच नव्हते. मी तुझ्याशी कधी बोलले नाही. तुझ्या घरी आले नाही. पेज थ्री पार्टीच्या कार्यक्रमामध्ये मी तुझ्या आजूबाजूलाही नसे. तू मात्र नेहमी माझ्याकडे एकटक पाहत असायचास. का काही सांगता येत नाही. पण तरूणींच मन हरण्यासाठी हि युक्ती तू आत्मसात केली होती. त्यामुळे त्या नजरेचा अर्थ तुला समजला नाही का? तुझे ते एकटक पाहणे मला बरेच काही सांगून जात असे व एक साठी, जुनियर artist  होते. खरे सांगायचे तर मला पण फारशी स्वप्ने, ध्येय, नावलौकीकाची अशा नव्हती. काही दिवस मी त्या मायावी विश्वात स्ट्रगलर म्हणून काम करीत होते. कधी कधी माझ्या घरच्या समोर, कधी माझ्या जाण्या -येण्याच्या वाटेवर तू उभा राहात असे. जवळपास हर तुझे चाहते जमले तर माझ्याकडे हसून बघत तू त्यांना सह्या देत संदेश देत असे, तुझ्या हातात कधी सिगरेट असे. कुणी विचारले इथे काय करतोस तर... सिगारेट प्यायची तल्लफ आली म्हणून थांबलो होतो. हा बहाणा होताच ना! "दस बहाने"  असतातच कि. एका गाण्याच्या शुटींगच्या वेळी इतर युनिट बरोबर मीही होते, त्यवेळी आपली ओळख झाली. आपली मैत्री म्हणावी असे आपले काहीही बोलणे झाले नाही. एकदा तू शुटींग नंतर तुझ्या

गाडीतून मला घरी पोहोचवले. मी जात्याच मुखदुर्बळ ! तुला घरी बोलवावे मला समजलेच नाही. तुझ्या भोवती चमच्यांचा, इतर चाहत्यांचा फ्यान्सचा गराडा नेहमी असे. तू मुळातच देखणा, त्यात हे ग्ल्यामरचे जग व तुझ्या भोवतीचे ते प्रसिद्धीचे व श्रीमंतीचे वलय होते. मला काही गोष्टी समजत नव्हत्या व काही जमत नव्हत्या. तू प्रत्येक वेळी तुझ्या त्या 'तीर नजर' नजरेने बघत असे. कधी ती नजर आश्वासक वाटे, तर कधी शोधक वाटे. एक निश्चित कि, एक नजरेचे नाते आपल्यात तयार झाले होते. मला कधी शोभेच्या बाहुली सारखी सजायची किंवा शिमग्याच्या सोंगा प्रमाणे नाचायची सवय नव्हती. या जगात मोठ मोठ्या कलावंताना बिनचेहऱ्याचे कलावंत म्हणून अंधाराच्या गर्तेत पडावे लागते हे मी जाणून होते. तू एकटक बघतो हे मला समाजात होते. म्हणूनच मी काही दिवस त्या शुटींगला येत होते. या लखलख सोनेरी चंदेरी दुनियेतून बाहेर पडायचे मी ठरवलेच होते. फार पूर्वीच... माझी दिवसाची स्वस्थता (चैन) व रात्रीची झोप, तुझ्यामुळे साफ गेली. या महानगरात ओळखी असतात, मैत्रिणी किंवा मित्र नसतात. अशा ओळखीतले काही जण मला "कोण ते " कुणाच्या प्रेमात पडली आहेस? विचारू लागले. अर्थात मी कधीही कुणाशीही या विषयावर बोलले नव्हते व आपल्या त्या वागण्यात तसे काही नव्हते. पण माझे गुपित माझ्या डोळयांच्या गुहेतून चोरपावलांनी सर्वत्र पसरले होते. तू दिसावा म्हणून मी तुझ्या दर्शनासाठी तासनतास घालावीत असे. वेडी म्हण हवे तर, पण माझी तुझ्यावर भक्ती जडली होती. आजच्या नवपिढी तर खूप हसतील. आपले नाते नजरेचे होते. हसू नकोस.

पाच मिनिटांच्या विठ्ठल -रखुमाईच्या त्या दर्शनासाठी लोक दिवसेंदिवस हालअपेष्टा सहन करीत पायी पायी जातात.

सिद्धी विनायकाच्या दर्शनासाठी तासनतास रांगेत उभे राहतात, शेवटी दर्शन घेतात त्या एका क्षणाचे "ते " नाते नजरेचेच असते ना ! दर्शन म्हणजे तरी काय असते?

परमेश्वराच्या मूर्तीच्या डोळयातून बाहेर फेकले जाणारे तेजोमय किरण आपल्या डोळयांमधून शरीराला स्पर्श करतात. ती दिव्य तेजोमय शक्ती आपल्यात प्रवेश करते. तसा देव

हा सुद्धा काल्पनिकच, तसे नाते सुद्धा काल्पनिकच ना ! शरीराच्या त्या ऐहिक मागण्या पुढे दमटावणे म्हणजे प्रेम, भक्ती असते का ? त्या दर्शन सुखासाठी आतुर भक्तांना विचार हवे तर! नाते फक्त दर्शनाचे असते, नजरेचे असते. आपण भेटायला हवे, बोलायला हवे हे तू मला नजरने सुचवित होतास. पण तू ते तोंडानी कधी सांगतोस याची मी वाट बघत होते. तसा तू इतर मैत्रिणी बरोबर गप्पा मारत होतास. चेष्टा मस्करी करत होतास. माझ्या बाबतीत मात्र तू ती "आय कॉनट्याक्ट ची नजरेची भाषा ठरवली होतीस.

मी आपणहून बोलले तर तू मला सहज प्राप्य समाजशील. असे मला वाटत होते. मी नजर चोरून घेत असे व पुन्हा तू बघत नाही पाहून एकटक बघत असे. नजरेच्या लपंडावातही पुन्हा बळी माझाच जात होता. प्रेम म्हणजे इच्छा कि जपणूक कि वेदना ? कि याहूनही वेगळं काही? निराळे कि तेच ते? कि शोभादर्शक यंत्रातल्या चित्राप्रमाणे त्याच त्या काचेच्या तुकड्यांची वेगवेगळी संरचना ? नक्की काय?

मी हि चंदेरी दुनिया सोडून परत गावी परतले. स्ट्रगलर राहणे, मॉडेल बनणे काहीही जमले नाही.

पूर्ण झगमगाटात तुझे लग्न झाले. पूर्ण देश त्या जलशात सामील झाला. लग्नाच्या वेळी तुझा विवेकच हरवला होता. तुझे आई वडील हपापल्या प्रमाणे पैशाचे प्रदर्शन करत होते व करून घेत होते. माझे अश्रू बघायला कुणीच नव्हते. बरे झाले मी पूर्वीच गावी परतले होते. तुझ्या पार्त्यांमध्ये माझ्या न येण्याचे बहाणे खपले असते.

कदाचित तू मला बोलावलेही नसते. आयुष्य म्हणजे काय हिंदी सिनेमा असतो का? गाणे म्हटले, "देऊळ सोडून धाव " कि देव धावून यायला. देवाला जाग आली नाही. माझ्या नजरेचे नाते संपले. तुझ्या बातम्या, तुझा संसार, तुझी चर्चा, माझी सहनशक्ती संपली. अश्रूही संपले. पण तुझे कौतुक संपले नाही. तू मला फसविले हे मी कुठेही बोलू शकले नाही. अर्थात मी

सांगून विश्वास कोण ठेवणार  होते? माझ्या जवळ जवळकीचे, फसवणुकीचे पुरावे कुठे होते? पुराव्यानाही खोटे ठरविणाऱ्या या जगात मला कोण विचारणार होते. मनाचा दुखावलेला कप्पा मी कायम बंद केला. सामान्य घराच्या सामान्य माणसांना फसवणुकीचे क्षण या कप्प्यात बंद करायला कुणी सांगावे लागत नाही. त्याला तडजोड म्हणतात. जग राहाटीने माझे लग्न झाले. जसे सर्वांचे होते ना तसेच !

तर आज इतक्या वर्षांनी मी तुला पत्र लिहित आहे. खाली नाव वाचल्यावर तू आठवायचा प्रयत्न करशील, तुला प्रश्न पडेल, काय स्वार्थ आहे या बाईचा? हो बघायचो मी हिच्याकडे, पण तो माझा हक्क होता. रस्त्यावरच्या रोमिओना, भिकाऱ्यांना, तरूणाना, वृद्धाना, चांगल्या नजरेच्या लोकांना, वाईट नजरेच्या लोकांना जो हक्क असतो (सुंदर मुलींकडे बघण्याचा), तो हक्क मीही बजावला. तुझा माझा काही संबंध नव्हता.... खरच नव्हता का रे?

माझ्या संसारात मी ठीक आहे. मध्यंतरी माझ्या डोळयासमोर अंधारी आली. डोळे व डोके दुखल्यासारखे वाटायचे, मेंदूवर ताण यायचा. स्कॅनिंग केले. रेपोर्ट कालच आले. थांब पत्र फेकू नकोस. रडक्या बातम्या हि वाचायला हल्ली कुणाला आवडत नाही. पण तुला मी माझ्या नजरेचा मित्र मानते. कुणी पत्र मित्र, खास मित्र,  तसा तू नजर मित्र आहेस, म्हणून तुला सांगते मला डोळयाचा कॅन्सर झाला आहे. येत्या ५ तारखेला माझे ऑपरेशन आहे. कदाचित... कदाचित काय निश्चित त्यानंतर मी हे जाग नक्कीच बघू शकणार नाही. माझे या जगाशी असलेले नाते... नजरेचे नाते यापुढे संपून जाईल. तर मला ऑपरेशन पूर्वी तुला डोळे भरून बघायचे आहे. तू मला भेटायला येऊ शकशील का?

तुझ्या त्या सुखी संसारातून, पार्टी फुल, हैप्पी गो लकी " आयुष्यातून फक्त १० मिनिटे मला भेटायचे आहे. वाटल्यास मी येते तुझ्या घर समोरच्या रस्त्यावर ! मला भेटायला, बघायला, हात वर करून विष करायला तरी ये ! तुझ्या चंदेरी आयुष्यात थोडा समाजसेवेचा मसाला टाकायला, कॅन्सर पेशंट फ्यानला भेटायला आलेली एक कनवाळू प्रतिथयश व्यक्ती म्हणून ये !

हॉस्पिटल .... तारीख... घर... सर्व ऑप्शन तुलाच तर आहेत. तुझ्या नजरेचे माझ्या नजरेशी काही नाते होते कि नाही माहित नाही. माझ्या नजरेच्या नात्यासाठी ये ! कुठलाही सत्कार प्राप्त न झालेले, कुठेही कधीही फ्ल्याश लाइमलाईट मध्ये न आलेले सामान्याहूनही सामान्य आयुष्य मी जगले. एक दिवस कोणतीही तक्रार न करता तोंडातून "ब्र" न काढता, मी या जगातून निघून जाईन. पण त्यापूर्वी एकदा तुला बघायचे होते. नजरेची शपथ ! दुसरा कोणताही स्वार्थ नाही. येशील ना ! डोनेशन मागत नाही, खर्चही मागत नाही. एका नजरेचा प्रश्न आहे. नेत्रदानाने पुढे किती तरी आयुष्य वाचू शकतात. नंतर मी दुसऱ्या डोळ्यांनी बघुजी शकेन पण आपले नाते या डोळ्यांचे आणि या नजरेचे आहे. त्या नात्यासाठी ये.

तुझी मैत्रीण

अनामिका

************

# ५६काश्मीर- फुलवारी

भारतदेशातील काश्मीरला पृथ्वीवरील स्वर्ग म्हणतात. वेगवेगळ्या रंगीबेरंगी फुलांच्या ताटव्यांमुळे काश्मीर मला फुलवारी वाटते. चित्रकारांची आवडती जागा म्हणजे काश्मीर! पारंपरिक गाव, लाकडी भिंती दरवाजे बघायला काश्मीरला जरूर जा! (इतर कारणे आहेतच)

खरेदी- एकाच चित्रात उडणारे पक्षी, देवी देवता, घरे डोंगर, फुले, पटचित्रकलेची चित्रे, कशिदा, काश्मिरी एम्ब्रॉयडरी सुंदर चित्र केलाज बनते. जिती जागती Art Gallery! छोटी दुकाने, लहान घरे, नागमोडी रस्ते, दगडी दिवड्या. हस्तकलेचे सुंदर नमुने काश्मीरला मिळतात. लाकडी कोरीव काम व गरम कपडे. पटचित्र म्हणजे कापडावरील चित्र. ही कला मूळ ओरिसातील रघुराजपूर येथील आहे, पण काश्मिरी लोकांनी आपल्या हस्तकलेत सामील केली आहे. जवळपासची सुट्टीसुद्धा आनंददायी ठरते तर काश्मीरची सुट्टी किती आनंद देईल.

हेतू- नवीन ओळखी, सहवास, रोजच्या दिनचर्येतील बदल, नवीन गोष्टींचा अनुभव घेणे, नवीन कथा अनुभव गाठी बांधणे हा काश्मीर टूरचा हेतू असतोच असतो. मात्र काश्मीरमधील अतिरेकी कारवायांची भीतीदेखील असते.

त्या ट्रॅव्हल टूरचा विमानानेच जाण्याचा option होता. निरभ्र निळे आकाश, बर्फाच्छादित डोंगर! दंग्याधोप्यांमध्येही काश्मिरी जनजीवन चालू राहते. पर्यटनाला महत्त्व दिले जाते. अनेकांची रोजीरोटी, त्यावरच अवलंबून आहे.

हस्तकला व मेजवान्या- कढई व कढाई ही काश्मिरी स्त्रीजीवनाची वैशिष्ट्ये आहेत. चित्रपटांचे चित्रीकरण- अनेक चित्रपटांचे चित्रीकरण काश्मीरमध्ये होते. मुघल गार्डनमध्ये

शालिमार व निशाद बागेला भेट दिली. रंगीत फुलांची ती फुलवारी होती. दाल लेकची सफर शिकाऱ्यातून केली. चष्माशाही बाग, वुलर व मानसबळ तलाव झील पाहिला. बॉबी, mission काश्मीर व काश्मीर की कली या चित्रपटांचे चित्रण येथे झाले आहे.

सोनमर्ग- हिरवीगार कुरणे, दऱ्या, स्वच्छ पाण्याच्या नद्या, चिनार वृक्षाच्या बागा, सिंधू नदीकाठची वस्ती, हिमालयाचे छान दर्शन. हिवाळयात इथे बरेच रस्ते बर्फवृष्टीमुळे बंद होतात (वाहतुकीसाठी.) सोनमर्ग हा पूर्वीचा रेशीम व्यापाराचा मार्ग होता. चीन व Gulf अन्य देशांशी जोडणारा जोझीला पास हा उंच रस्त्यांपैकी एक आहे. लडाखचा बेस camp जोझीला आहे. भारतीय सेनेचा मोठा रक्षकतळ येथे आहे.

झिरो पॉईंट- या काश्मीरच्या ठिकाणी वर्षभर शून्य डिग्री तापमान असते. भीतीदायक चिंचोळे मार्ग आहेत. स्नोरकेलींग, स्कीईंग साठी प्रसिद्ध मैदाने यापुढे आहेत.

गुलमर्ग- नैसर्गिक हिरवी कुरणे, थंडीत बर्फाने झाकलेली असतात. डायसी, पिवळी लहान फुले उमलून गालिचा पसरवतात. फुलवारी आहेत. थंड हवा, प्रदूषण नाही. घोडेसवारी, बैठी घरे, मंजूळ नाद येतो तो सुशांत झाडातून येणाऱ्या वाऱ्याचा व गवतपात्यांचा.

Top up, वरती, गुलमर्गला गोंडोलातून जाण्याचा आनंद घेता येतो. गुलमर्ग ते कोंगदूर व पुढे अफार वाट शिखर अशा दोन टप्प्यांत गोंडोला टूर होते.

पहलगाम- पहलगाम हे माझे पहिले प्रेम आहे. हे हिलस्टेशन म्हणजे काश्मीरची सर्वोत्तम जागा आहे. लहान जलप्रवाह, झोपड्या, फुलवाऱ्या जादू करतात. हवेचा भरवसा नाही. पण आनंदाची संपूर्ण ग्यारंटी आहे. चंदनवारी अरू व्हॅली, बेताब व्हॅली इथे आहेत. अमरनाथ यात्रेची सुरूवात चंदनवारीपासून होते. वाटते इथेच रहावे.बऱ्याचदा वर्तमानपत्रे वाचून श्रीनगरला परत जाऊ नयेसे वाटते.पण जाते, जावे लागते कारण, काश्मीरचे आकर्षण बोलवत

राहते, पाय जड होतात. वाटते टीनएजर प्रियकरांप्रमाणे नाचावे, म्हणावे, 'देखो मैने देखा है ये इक सपना,

फुलों के शहर में हो घर अपना’

जर पृथ्वीवर कुठे स्वर्ग असेल तर तो काश्मीरला आहे.

काश्मीर एक सुंदर फुलवारी आहे, जन्नत आहे.

********************

## ५७तेरे बिना जिया जाये ना

जिया खानच्या, अन्य एका आत्महत्येने मी खूपच  हादरले .नैराश्याने ग्रासल्यावर, विषारी औषधे खाणारी, पंख्याने लटकून, जगाचा निरोप घेऊन, देवाघरी जाणारी माणसे बघून माला नेहमीच वाईट वाटते. वाटते की, नालायक, व्यक्तीवर प्रेम केल्याची, इतकी मोठी शिक्षा ?चूक कुणाची, सजा कुणाला? का?गाडीने  ठोकर देणारा बेशरम धक्का मारून  जख्मी करून जातो   आणि भोगनारा भोग्तोय का ?आजच्या चंगळवादी संस्कृतित महिला असुरक्षित शल्य आहेत .

त्यातील अधिक भावनाप्रधान, हळवी उच्चाच्शिक्षित लोंक नात्यामध्ये अधिक सहन करीत आहेत .

आजच्या तात्पुरत्या नात्यांच्या, काळात खरे प्रेम कोठे? पुरुष स्कोर मोजतो, (उदा एक फालतु जाहिर जाहिरात ).

दुष्ट निर्घ्रुण  अयोग्य पुरुषावर प्रेम करण्याची इतकी शिक्षा जियाच्या नशिबी यावी ?

देव सुद्धा आशा निर्लज्य पुरूषा च्या झो ळित खरे प्रेम का देतो ?फसवनाऱ्या आशा व्यक्तिंना

स्त्री चे  शरिर हवे असते, तिचे फायदे घ्यायचे असतात, त्यांच्या लेखी प्रेम ही सोय, सुविधा असते,

ते कधी गुन्तत   नाही ,

तू नहीं और सही, और नहीं और सही असा सिलसिला ते चालू ठेवतात

पुरुष असे ब्रेकअप्स पचवतो, पुढे जातो, तो काळ, त्या पुरुषाचा कमर्शिअल ब्रेक असतो .काही चांगले तरपुरुष असतात,

त्यांना आपण चर्चेचे बाहेर ठेवू या.तर अशा प्रेम नावाच्या धोक्यात, अशा अनेक हळव्या मुलींचा बळी जात असतो

बदल जाये अगर माली चमन होता नहीं खाली

बहारे फिर भी आती है, बहारे फिर भी आयेंगी

हे सत्य काही, पुरुषा बद्दल असते त्यामुळे अनेक जिया, अनेक सुना, अनेक मुली, विवेका, अनेक सिल्कस्मिथा जात राहतात .कठीण कठीण किती, पुरुष हृदय बाई?समजात काही काळ खळबळ होते, पुन्हा सर्व शांत होते, पुरुष पुढे जातो, त्या स्त्रीला वर पोहोचून त्याला काहीच फरक पडत नाही, तो सुटतो म्हणायला, गुन्तलेलाच नसतो

london ल शिकलेली जिया, अशी हताश होते, बाकिच्यान्नी काय करायचे? कही दिवस नातेवाईक रडतात, झगडतात, पण यश येत नाही.ती नाहक, वर जाते.तेरेबिना जिया जाये ना , पुढे काळ सरकतो, पुढच्या अत्महत्येपर्यंत सर्व शांत होते, पुरुष सेटल होतो, नवनवे डाव मांडतो, कनटाळा आला की तोहि मोडतो, डाव मांडून, मांडून मोड़न्याला सरावतो .स्वर्ग वासी प्रेयसीला कोणीही म्हणत नाही, तेरेबिना जिया जाये ना, म्हणणारी फास लावून, लटकून जीव देणारी वर निघून जाते,

का?

******************

# ५८समर्पण रे समर्पण

इंग्रजीत समर्पण शब्द नाही. मात्र samaritan म्हणजे संकटग्रस्तांना मदत करणारी व्यक्ती आहे. समर्पण शब्दाचा अ र्थ - मोठ्या किंवा श्रेष्ठ वस्तूचा, कोणतीही परतफेडीची अपेक्षा न ठेवता त्याग करणे. बळी, बलीदान, अर्पण, दान, त्याग, सोडणे इ. त्या शब्दाच्या छटा आहेत. भारतीय संस्क ृतीचा पाया सम र्पण हा आहे. या समर्पणाबद्दल काही ज्ञानाचे कण आपण आज जमा करू या. या विषयाबद्दल खालील मुद्दे मांडता येतील.

१. कोणाकोणाप्रति सम र्पण करावे. देश, ध्येय, कला, कुटुंब, मैत्री, प्रेम, परमेश्वर

२. समर्पणाला पोषक घटक व तत्समान मुद्दे गुरु, ऋषीकुल - शि क्षक,

३.अ र्थवृत्तांत आदर्श - सैनि क, वैज्ञ ा नि क, समाजसेवा करणारे, स्त्री - आई, पत्नी

४.व्रतवैक ल्ये - उपवास

का र्यसंस्क ार संस्क ृती - क र्तव्यदक्षता प्रा र्थना - भक्ती - वारी सण डेज ३. सम र्पणाचे शत्रू मोह, चंग ळवाद, क र्मकांड, आराम, क र्तव्यत्याग, आळस, ढासळती मूल्ये, एकाग्रता न होणे

समर्पणाबद्दल विचार जरुर करावा.

******************

# ५९गोष्टी आणि गाणी

गोष्टी आणि गाणी प्रत्येकाचे जीवन म्हणजे एक गोष्ट असते ह्यात प्रसंगानुरूप गाणी असतात. ह्या गोष्टी झाडाखाली सांगितल्या जातात आणि गाणी वेलीच्या सहवासात फुलतात.

वासंती आजीचे मन म्हणजे अशाच गोष्टी आणि गाणी याचे अजब संग्रहालय होते. बालपणाच्या ऐकलेल्या, एस .टी. स्थानकावर कानावर पडलेल्या, टीव्हीवर पाहिलेल्या, प्रवासात घडलेल्या, कथा त्या रंगवून व खुलवून सांगतात. त्यांचे डोळे, हावभाव व उच्चार, अनुरूप शब्द गोष्टी समोर उभी करतात. कुठेतरी कधीतरी दूरवर कानी पडलेली धून त्या जमली नाही तरी गुणगुणतात. मनातल्या गोष्टी मनात ठेऊन राहणाऱ्या ज्या स्त्रिया असतात त्यांना पुराणातली एक गोष्ट सांगितली आहे. ती मी आज सांगते.

एक बाई मनातल्या गोष्टी कधीही कुणाला सांगत नसे व मनातील गाणी मानतच ठेवत असे. एकदा तिचा नवरा जेव्हा घरी आला. तेव्हा त्या गोष्टी कोट बनून खुंटीवरजाऊन बसल्या व ती गाणी दरवाज्यापाशी बूट बनून थांबली. नवरा विचारू लागला पाव्हणे कोण आले आहेत. ती सांगू शकली नाही व नवरा रागावून परदेशी गेला. तेव्हा पासून गावात सर्व कार्यक्रमामध्ये गोष्टी सांगण्याची आणि गाणी म्हणण्याची संधी सर्वांना देण्यात आली. आजी नातवंडांना गोष्टी सांगू लागल्या प्रत्येक गोष्टीला संदेश होता व या गोष्टीचा संदेश काय आहे? असे आजी मुलांना विचारात होत्या. त्यांना न कळल्यास समजावून सांगत असत.

त्यामुळे मुलांनो आपले मन व्यक्त करत जा. कसाही आवाज असू दे. गाणी म्हणत जा. आजी मुलांना गोष्टी सांगून उठल्या. मी त्यांचे ते लगबगीने उठणे बघत बसले. आजीनी देवासमोर दिवा लावला. अंगणात तुळशीवृंदावनात अगरबत्ती लावली व आपल्या नातींकडून त्या शुभंकरोती कल्याणम, आरोग्यम धनसंपदा म्हणवू लागल्या.

त्यांनी त्या श्लोकाचा अर्थ नातीला सांगितलं. सगळयांचे चांगले होऊ दे. म्हणजे आपलेही कल्याण होते. शिवाय सगळयात मोठे धन म्हणजे आरोग्य होय. मुलांना काजू प्रसाद देऊन आजी लगबगीने उठल्या.

मुले आजी पिझ्झा खायला जायची. मॅग्गी खायची ओरडली. आजी त्यांना गच्चीत घेऊन गेल्या. मुलांनी पिझ्झा मध्ये मैदा असतो व बर्गरमध्ये मार्गरिन असते जे तब्बेतीला चांगले नाही. आपण इंडियन पिझ्झा म्हणजे थालीपीठ लोणी खाऊया. नातू मॅगी हवी म्हणून रडू लागला. आजीने उपमा बनवला व म्हणाल्या हेच ते इंडियन मॅगी. मुले चव घेत खाऊ लागली. मीही ते थालीपीठ खाल्ले. भरपूर कोथिंबीर मेथी घातल्यामुळे ते पौष्टिक झाले होते.

त्यानंतर मोठे कलिंगड आम्ही कापून खाल्ले.हेच आपले डेझर्ट आणि बाहेरचे आईस्क्रिम अनेक जंतूंनी भरलेले असेल. बालपणतील स्थुलतेचे प्रश्न वाढू नये, म्हणून मी शीतपेय पण देत नाही. लिंबूसरबत किंवा कोकम सरबत देते.जेवल्यानंतर आम्ही बागेत फेरफटका मारला. आजीने हौसेनी बाग लावली होती. उंच नारळाची झाडे होती. तुमच्या बंगल्यावर नारळाच्या झाडांची जणू मुकुट चढवला आहे असे वाटते आहे. मी त्यांना म्हणाले. वासंती आजी खुश झाल्या व म्हणाल्या अहो निसर्ग हा मोठा चित्रकार असतो. वेडी वाकडी वाढ होऊनही सुंदर दिसणारा सजीव जीव फक्त झाडाचं! माणसांना प्रमाणात आकृतीत वाढावे लागते. आमच्या गावी जेव्हा दुष्काळ पडला होता तेव्हा सुद्धा आम्ही हि झाडे जागवली. रस्त्यावरून पाणी भरून टँकर मागवून पाणी घातले. पर्यावरण व ग्लोबल वॉर्मिंग म्हणून झाडे लावा असे आता सांगतात. पण मी पूर्वी पासून या झाडांना जपले आहेत. पण ....

वासंती आजी नाराज झाल्या.

"काय प्रॉब्लेम आहे? " मी विचारले

"मॅडम समोरच्या प्लॉट मधली माणसे झाडे तोडा म्हणून मागे लागली आहेत. नारळाची पाने व नारळ त्यांच्या प्लॉट मध्ये पडतात. गाडी खराब होते म्हणून भांडतात. मुले म्हणतात रोज भांडण नको तोडून टाक"

"श्री बहुगुणा नावाच्या माणसाने चिपको आंदोलन केले आहे. वृक्षतोडायला आल्यावर हे लोक कार्यकर्ते झाडांना चिकटून उभे राहतात व झाड तोडून देत नाहीत आणि आपल्याकडे सगळीकडे कधी रास्ता रुंदी कारणासाठी तर कधी फलक टांगण्यासाठी झाडांची कत्तल केली जाते" मी म्हणाले.

वासंती आजी म्हणाल्या, " मलाही समजते पण शेजाऱ्यांशी भांडण्यात मला आनंद वाटत नाही. तरीही मी हि झाडे वाचवण्यासाठी प्रयत्न करणार आहे.

त्यांच्या या छोट्याश्या पर्यावरणाच्या रक्षणाच्या कार्यात शुभेच्छा देऊन मी परत पुण्याला आले. तीनचार महिने तसेच गेले. त्या नंतर काही कामासाठी पुन्हा साताऱ्याला जाचयाची वेळ आली. प्रवासात सुवर्ण त्रिकोण चतुष्कोन म्हणून रास्ता रुंदी करण जे केले होते. त्यात बहुतेक झाडांचा बाली गेला होता. तो नेहमी सुंदर वाटणारा पुणे सातारा रस्ता भकास वाटत होता. गाडी वासंती आजीच्या गल्लीत वळली त्यांच्या घराचा तो हिरव्यागार झाडांचा मुकुट तसाच होता. मला हायसे वाटले. सुवर्ण प्रगती झाली नाही तरी चालेल पण निसर्ग रम्यता तशीच राहू दे. जीवनातल्या गोष्टी आणि गाणी तश्याच उमलत राहू दे. तर मित्रानो गोष्टी म्हणजे हे मोठे मोठे वृक्ष अस्ताव्यस्त पसरलेले आणि वेली म्हणजे त्या नाजूक कविता. आजी गोष्टी सांगते व गाणी गाते. बाग फुलवतो वासंती आजी सारखे निसर्गावर प्रेम करा.

तुमच्याही जीवनात गोष्टी आणि गाणी जगवण्यासाठी भरपूर झाडे लावा व जगावं.गोष्टी आणि गाणी सांगत ऐकत गुणगुणत जगावे

******************

## ६०हमारी याद आयेगी ?

कभी तनहाई यो मी हमारी याद आयेगी

अंधेरी छा रहे होंगे, के बिजली छा जायेगी

ये बिजली राख कर जायेगी।

तेरे प्यार कि दुनिया।

न फिर तू जी सकेगा  और

न तुझको मौत आयेगी।

चित्रपट हमराही यातले हे मधुर असे एक छोटेसे गाणे! मात्र संध्याकाळच्या, त्या कातरवेळी भावुकपणे ऐकले, तर कळते कि मुबारक बेगमच्या आवाजात, किती भावना खोल उमटल्या आहेत ते! गायिका मुबारक बेगम, मात्र आपल्या आज, जगातून काय, आठवणीतून देखिल दूर गेली आहे. मुंबईतील एका चाळीत ती कसेबसे दिवस काढत होती. चित्रपट सृष्टीत पार्श्वगायन या क्षेत्रातील। एक आनंदी मुलगी आज मुंबईकर झाली होती हे भुतकाळात जमा झाले आहे. ११ व्या वर्षी अहमदाबादहुन मुंबईत येताना, मनात असलेल्या आशा घेऊन अाली होती. मात्र आताशा ती कौटुंबिक दुःख व गरिबीत दिवस काढत होती. आईये दायरा, हमराही, मधुमती या चित्रपटांनी तिला वैभव व भरभराट दिली. मात्र पती सोडून गेल्यावर, आपल्या दोन मुलांना वाढवतांना, या गायिकेची दमछाक झाली. तिच्या मुलीला आजार झाला होता, तर मुलगा आजदेखील कसे तरी पोट भरतो आहे. शेवटचे काळात, सत्तरीला आलेल्या मुबारक बेगम, दूरदर्शन समोर बसून, आपलीच गाणी दूरदर्शनवर बघतांना, रेडिओवर तिने गायलेली गाणी ऐकतांना रडत झोपत असत.

मुबारक बेगम खंत करत, "कदाचित माझ्यात टॅलेंट नसेल किंवा माझे नशीब तसे असेल", मलाही स्वत:बद्दल असेच वाटते.काळाची गती अशीच असते. सुरवातीचे काळात कलाकार असे लिहितो, गातो जणू दुधाची साय उतू जाते व शेवटी जळका वास उरतो. एका क्षणात यश मिळते व काही काळाने कालचक्र फिरले कि कलाकार साधा दुर्लक्षणीय माणूस बनतो, रसिकांच्या विस्मरणात जातो मोठे मोठे कलाकार वृद्धापकाळात हलाखीचे जीवन जगतात. खरेतर हे मोठे दुःखदायक असते, पण ते सत्यच असते.

तरीही कधी कातरवेळी रेडिओवर हमराहीचे गाणे ऐकले, कि नक्कीच मुबारक बेगम, आम्हाला तुमची आठवण येईल

हो! तुम्हारी याद आयेगी

काळ बदलतो म्हणतात, प्रत्यक्षात काळ तोच अखंड असतो. जीवनधारा वाहत राहते. मात्र या जगात सार्यांना नावीन्य हवे असते. माणसे एकमेकांना देखील तोच तोपण आला, कि कंटाळतात. काही गोष्टी कळतात, पण नवीन प्रवाह स्वीकारावेच लागते. वाहावे लागते व खंत करीत म्हणावे लागते. "तुम्हारी याद आयेगी"

वेळीच सावध व्हावे सावरावे, लागते, चांगले वागावे लागते, व्यवहारी व्हावे लागते!

जातांना म्हणावे लागते,

हमारी याद आयेगी।

***********

## ६१मला काय कमी?

मुलांची लाडकी मम्मी, मला काय आहे कमी

दोन दोन मुले झाली, हुशार श्रीमंत बाहुबली ||

त्या मुलांची आई मी, साम्राज्याची मम्मी मी

गुणी लाडकी समृद्ध मी, मला काय पडेल कमी ||

कॉलेज मधील कार्यक्रमात, माझ्या कवितेला खूप टाळया पडल्या. प्राचार्य म्हणून सार्यांना, आधीच माझे खूप कौतुक होत असे. त्यातच माझ्या "लाडकी मम्मी" हा कविता संग्रह सुद्धा, प्रसिद्ध झाला. सकारात्मक लिखाण, संस्कृतीची पालखी वाहणारी कवियित्री, अशी माझी ओळख होती. गोरा रंग, वाढते वय लपवणे, नीट नेटकी राहणी यामुळे मी खूपच लोकप्रिय होते. दर दोन तीन दिवसांनी माझे नाव, त्या वर्तमानपत्रात येत असे. लोक मालिकांमध्ये काम मिळावे, म्हणून माझ्या कडे खेटे घालत होते. मम्मी म्हणून मी परिचित होते. त्याच कार्यक्रमात, त्यादिवशी एक सेवा निवृत्त प्राचार्या आल्या होत्या. त्यांना त्यांची कविता वाचायची होती, पण त्यांच्या कवितेत कुणाला रस नव्हता. त्यांना कविता वाचण्याची परवानगी वेळे अभावी नाकारली गेली. मला मात्र शेवटी, पुन्हा बोलावून एक अजून कविता, झीनाझिनी वाचायचा आग्रह झाला. दोन्ही मुले व सुना माझा कार्यक्रम बघायला आवर्जून आल्या होत्या.

कार्यक्रमा नंतर आम्ही बाहेर जेवण घेतले. नवरा जेवणाच्या ठिकाणी थेट आला होता. असेच हसणे, फिरणे, गमती जमती, यात आनंदात दिवस चालले होते. घराचे कामकाज सर्व वृध्द सासूबाई बघत होत्या. माझ्या दोन्ही सुना सोबतच गरोदर राहिल्या व एका महिन्याच्या अंतराने

लेकुरवाळया झाल्या. सासूबाईनी सोन्याची फुल उधळली. पणतू बघून त्या खुश झाल्या व सासूबाईनी आनंदात डोळे मिटले.

माझ्या सासूबाई कटकट्या  असूनही, त्यांना मी समजून घेतले. शेवट पर्यंत आनंदात ठेवले. त्यांचे मृत्यू नंतर त्यांची खोली, धाकट्या सुनेच्या ताब्यात गेली. माझे पती त्यांची आई वारल्या नंतर, वर्षाच्या आतच वारले. लहान मुलांना वेगळी बेडरूम हवी म्हणून, मला हॉल मध्ये झोपाल का? अशी गोड विनंती केली गेली. मी नेमकी त्याच वेळी नोकरीतून निवृत्त झाले होते. जास्ती वेळ घरात राहावे लागेल त्यामुळे घरात धुसफूस नको, म्हणून सद्हेतूने मी खोली रिकामी करून दिली. माझी रवानगी हॉल मधील तीन बाय सहाच्या कॉटवर झाली.

..२..

फक्त जवळ ठेवायला एक कपाट मिळाले. त्यात कपडे, वह्या, पुस्तके, कपडे मी ठेऊ लागले.

मुलांचा संतोष हेच माझे धन मानीन, कवितेची शब्द शेकोटी सतत मी पेटवीन

असे म्हणत मी माझे लिखाण, सेवानिवृत्त संघटना, लिखाण परिषद या कामात मन रमवित राहिले. घरातील कामकाज, स्वयंपाकपाणी पूर्वी सासूबाईचे बघत असत. नंतर स्वयंपाकघर सुनांनी ताब्यात घेतले. हळूहळू डायनिंग टेबल, स्वयंपाकघरातून बाहेर आला व हॉल मध्ये माझ्या पलंगाला लागून, जेवणाचे टेबल ठेवले गेले. जेवणाचे प्रकार, विकतचे जेवण व स्वयंपाकीण जे करेल ते खाणे असा प्रकार सुरु झाला. जेवणाच्या टेबलाच्या वर एक फळी ठोकून, त्यावर चांगली आधुनिक भांडी व डबे ठेवून त्यात दुपारचा खाऊ ठेवला जाऊ  लागला. हा खाऊ दिवसा-रात्री कधीही खाल्ला जाऊ लागला.

मुले, सुना, नातवंड, बऱ्याचदा बाहेर जेवू लागले. माझ्या साठी येताना पार्सल येऊ लागले. माझे परिषदेचे काम, कार्यक्रम मुला सुनांना बोअर वाटू लागले. माझ्या कार्यक्रमांना मी एकटीच जाऊ लागले.

कधीही मला उलटून न बोललेली मुले, मला उलट उत्तर देऊ लागली. नाट्य परिषदेत तरुण मुले आली. वृद्धांनी नव्या लोकांना जागा द्यावी, असे म्हटले जाऊ लागले. एका कार्यक्रमा नंतर रात्री अकरा वाजता, मला घ्यायला मुलगा आला होता. तो थोडा गंभीर दिसला. "आई दरवेळी तुला घ्यायला मलाच यावे लागते. एकवेळा मी, एकवेळा दादा असे दोघांना आलटून पालटून घ्यायला बोलावत जा." धाकटा .

"अरे माझे दोन डोळे आहात तुम्ही! हे असे तू बोलतोस?" मी

"हो स्पष्टच सांगतो, तुला दवाखान्यात मीच नेतो, खर्च मीच करतो. माझा मुलगा, माझी पत्नी यांच्या बरोबर वेळ घालवण्याचे ऐवजी, मला इथे तुझ्या कार्यक्रमाचे हॉल जवळ येउन थांबावे लागते. डास चावतात.तुमचे कार्यक्रम कधीहि रात्री ठरलेल्या वेळी संपत नाहीत." धाकटा कटकट करत होता.

"बरे बाबा, तुमचे तुम्ही ठरवा" मी उत्तरले.

घरी गेल्यावर लक्षात आले की सर्वांनी जेवून घेतले होते. प्रत्येकाच्या खोलीत स्वतंत्र दूरदर्शन संच होते. हॉल मधल्या संचावर मी मालिका बघू लागले. थोरला बाहेर आला. त्याच्या डोळ्यात राग होता.

"आई उद्या बंटीची परीक्षा आहे, टीव्ही बंद कर"

"सहज लावला होता, आवाज हळूच आहे." मी समजुतीने सांगितले.

"पण मुलांच्या परीक्षा आहेत. आई तू हल्ली खूप अहंकारी झाली आहेस. घरकाम तू कधी केलेच नाहीस आमचेकडे लक्ष दिले नाहीस आता तर तू अधिक विचित्र झाली आहेस.

..३..

मम्मी, कांचन संध्या, माणसांचे स्नेह, सांज, मृद्गंधा, अशा फालतू कवी कल्पनांमध्ये, तुला जग कळत नाही. "अपरात्री माझे व थोरल्याचे भांडण झाले.

"मी काम केले नाही, तर तुम्ही मोठे कसे झालात?" मी रागावून विचारलं.

"आजीच सर्व करायची" थोरला स्पष्टपणे बोलला.

पुटपुटत, चडफडत मी गप्प झोपले. दुसऱ्या दिवशी, माझ्या माजी कॉलेज मध्ये, एक कार्यक्रम होता. मी छान तयार झाले. पण रंगीत यौवन संपले होते. करडी वृद्धावस्था आली होति, वय लपत नव्हते.खुर्ची गेली होती.त्या हॉलमध्ये जाताना"रात्री मला घ्यायला कुणी आले नाही तरी चालेल मी रिक्षाने येईन." असे मी सांगितले. त्या कार्यक्रमाला वेळ पुरत नाही, म्हणून नव्या प्राचार्यांने माझ्याच भाषणाला व कविता वाचनाला कात्री लावली. मी नाराज झाले. रात्री कार्यक्रमाहून परत निघाल्यावर रिक्षा मिळेना. रिक्षावाल्याचे मीटर खूपच फास्ट होते. शिवाय, त्यात त्याने हाफ रिटर्न भाडे घेतले आणि तीनशे रुपये बिल लागले. मला कार्यक्रमांना घ्यायला यायला, पोहोचवायला, पूर्वी अनेकजण तयार असत.माझ्या गाडीतून यायला उत्सुक असत, पण आज मला कुणि विचारेना. आता वर खर्चाला मुलांनी हळू हळू पैसे देणे बंद केले. मी खर्चासाठी माझे पेन्शन काढून आणू लागले. माझ्याशी बोलणे, मुलांनी हळूहळू कमी केले. विहिणी, सुनांच्या मैत्रिणी, नातवंडांचे ग्रुप्स, सारे जमा झाले कि मला हॉल मध्ये, त्यांच्यात त्या पलंगावर कसेसेच वाटे. स्वयंपाक घरात बसले, कि सुनांना वाटे मी त्यांच्या पदार्थांवर, उधळ माधळीवर, कामावर लक्ष ठेवते. ढवळा ढवळ करते. सोबतच्या मैत्रिणींचे ते ग्रुप, कमी कमी होऊ लागले.

में महिन्यामध्ये, मला वृद्धाश्रमावर, पुस्तक लिहायचे एक काम एका सरांनी दिले. थोडी बिझी राहीन म्हणून मी ते स्वीकारले. एका मैत्रिणिसोबत जाऊ लागले.वेळ बरा जाई.

एका वृद्धाश्रमाला भेट देवून आल्यावर, मी निराश होऊन बसले होते." माझी मुले कधीच अशी वागणार नाहीत, मला वृद्धाश्रमात टाकणार नाहीत. मी त्यांची लाडकी मम्मी आहे." मी मैत्रिणीला म्हणाले

" हो ग, मला पण वाईट वाटले ते वृद्धाश्रम बघून! "मैत्रीण म्हणाली.

बस पकडून मला रात्री चौकात यायला उशीर झाला. त्यानंतर पुढे रिक्षा मिळेना. घरी पोचले तर, मुले काळजी करत होती. नातवंडे येउन चिकटली.

"आई, मोबाईलवर सांगत जा, उशिर होणार ासेल तर, आम्हाला काळजी वाटते." थोरला म्हणाला.

"आई तू कुठे गेली होतीस? "धाकटा रागावून विचारू लागला.

मी मुलांना वृद्धाश्रमाच्या पुस्तका बद्दल सांगितले.

" आई आता तू हि वृद्धश्रमाची नकारात्मकता नको आणूस"

"तुझी स्तुती सर्वजण सकारात्मक आहेस म्हणून करतात. आता हि विचित्र वृत्ती कुठून काढलीस? "थोरला रागावला.

"मम्मी, असे काही करू नका कि घरात दरार येईल" धाकटी सून धमकीवजा आवाजात म्हणाली.

"मम्मी झेपेल तेवढेच कार्यक्रम करत जा." थोरली सून म्हणाली.

"आजी हा हेडफोन आणलाय, टीव्ही बघताना लावत जा. म्हणजे बाहेर आवाजाने त्रास होणार नाही, आवाज  बाहेर जाणार नाही." नातू म्हणाला.

"ठीक आहे" म्हणत मी त्याला जवळ घेतलं. अजून आपण या मुलांना कुटुंबियांना हवे आहोत, याचा मला आनंद वाटला.

मी मैत्रिणीला फोन करून सांगितले, " मुले म्हणतात वृद्धाश्रमाची निगेटिव्हिटी नको. " मी.

"अगं, अजून एक खराडीचा आश्रम बघणे, पूर्ण करू या, नंतर तू हे काम सोड. कुणीतरी शोधू या, अन्य तरुणाला हे काम सोपवू या ." मैत्रीण.

"तिथे माझा कवितेचा कार्यक्रम ठेऊ या." मी

"नवा सेक्रेटरी म्हणतो, माजी प्राचार्या आहेत म्हणून त्यांना बोलावतो, पण हल्ली मम्मी बोबड्या, तोंडातल्या तोंडातच हळू बोलतात, कार्यक्रम रंगत नाही." मैत्रीण सांगू लागली.

"एवढ्या वेळी ठेवा." मी नाराजीने उत्तरले.

"ठीक आहे. वृद्धांना मिठाई वाटा तुम्ही, मी खोबरेल तेलाच्या लहान बाटल्या बक्षिस देईन." मैत्रीण म्हणाली.

"हो, मम्मी म्हातारी झालीय, तिचे साम्राज्य संपले" मी उत्तरले.

मैत्रीण गप्प बसली. " कवितांचा संसार मांडण्यापेक्षा. संसाराची कविता व्हायला हवी होती." मैत्रीण.

त्या आठवड्यात थोरल्या सून बाईचे वडील वारले. " आता माझी आई एकटी कशी राहणार?ते घर भाड्याचे आहे.सोडू दे का? माझी आई इथे राहील" सुनेने स्पष्ट व्यक्त केले.हॉल

मध्ये माझ्या कॉट शेजारी, विहीणबाईंची कॉट आली. आमची दोघिंची कटकट सुरु झाली. मी धुसफुसू लागले. एके दिवशी मुलाच्या ऑफिस मध्ये, मी मुलाला खास भेटायला गेले. कारण घरात विहीणबाई मुळे मीच परकी झाले होते.

" आई ऑफिस मध्ये कशाला आलीस?" तो म्हणाला. मला घेऊन कॅन्टिन मध्ये गेला.

"तू सुनबाई च्या आईला, तिच्या घरी राहा, किंवा काहीतरी स्वत:ची सोय करायला सांग, माझे त्यांच्याशी पटत नाही. त्या रात्रभर लघवीसाठी वारंवार उठतात. खोकतात. त्यांचे कपडे स्वच्छ नसतात. सारखे लोक येतात, त्या सारख्या फोन करतात." मी तक्रारी सांगितल्या.

"मम्मी, अगं तडजोड करायला हवी. माझी बायको म्हणते, तिची आई इथेच राहणार. नाहीतर आम्ही तिघे वेगळ घर घेतो. सहा सहा महिने तू आम्हा दोघा भावांकडे विभागून राहा किंवा मैत्रिणी बरोबर वेगळी राहा. वाटल्यास वृद्धाश्रमात राहा. मला धक्काच बसला. मी गप्पगारच झाले. त्यानंतर मी विहीणबाईंशी थोडे पटवून घेण्याचा, बराच प्रयत्न केला. जिभेवर साखर ठेऊन, गोड बोलण्याचा प्रयत्न केला. पण वेळ निघून गेली होती. दैनिक कार्य तर प्रत्येकाला करावेच लागते.पण घराचे राजस्थानी वाळवंट होण्याची भीती होती.मी नातवंडांचा अभ्यास घ्यायचा प्रयत्न केला. स्वयंपाक घरात माझे पाय रुजवायचा प्रयत्न केला. पण काहीच जमेना व माझे काहीही केलेले, सुना नातवंडाना पटेना. एक नातू खूप उध्दट बोले.दोन्ही सुनां मध्ये हि अनबन होती, पण माझ्या विरोधात एकी होती. विहीणबाईं मुळे, एके दिवशी किरकोळ कारणाने, घरात भांडण झाले. तिथल्या तिथे एकाच फ्ल्याट मध्ये, दोन मुलांच्या दोन चुली झाल्या. सहा सहा महिने वाटून मला जेवण मिळू लागले.

"पोटची दिली हि मुलगी, तुम्हाला विहिणबाई, सांभाळून राहा हो तुम्हीच सासूबाई,

तुमचे खरे नाही"असे हसत विहीणबाई मला म्हणाल्या.

"तुम्ही कन्यादान केली कि पुत्र दान केले." मी रागात विचारले.

सुनबाई खोली बाहेर येऊन भांडू लागली. दोन्ही सुना म्हणाल्या, आम्हाला हि सासूला सांभाळायचे नाही. माझी दोन्ही मुले गप्प बसली.

"बायल्यांनो बायकांना सांगा, आमच्या आईला सांभाळणे, आम्हाला आवश्यक आहे." मी मुलांना रागावून म्हणाले.

"आई तुझ्या साठी, आम्ही आमचे संसार मोडू का?" थोरला म्हणाला.

"तू त्याग करायला हवा, अग आई." धाकटा म्हणाला.

"वृद्धाश्रम काळाची गरज आहे. छान असतात काही आश्रम."विहीणबाई सांगू लागल्या.

"मग तुम्ही का नाही गेलात?मी मुलाची आई आहे" मी चिडून विचारले.

"हल्ली बरोबरीचा काळ आहे"सून म्हणाली

"मग दोघी राहू शकतो ना!"मी अोरडले.दांडग्या, चतुर विहीणबाईनी, जावयाला मी तिला नको अशी, मानेने खूण केली, नाटकी रडायची सुरुवात केली. पंजाबीत शिव्या देऊ लागल्या. आवाज वाढू लागले. शेजारी राहणारे रिकामे, लोक ग्यालरीत येऊन ते ऐकू लागले.

"आई, तू वृद्धाश्रमात जा !" थोरला म्हणाला.

"जर परिस्थिती सुधारली तर, तुला परत बोलावू." धाकटा म्हणाला.

तेव्हा पासून मी या वृद्धाश्रमात आले. महिन्याला पेन्शनचे पैसे इथेच वापरते. वर्षातून एकदा सहल जाते. आठवड्यातून एकदा गोड जेवण, फिस्ट असते. खोलीत आपापला खाऊ, डब्यात भरुन ठेवता येतो. पुस्तके, वर्तमानपत्रे वाचता येतात. दोन्ही मुलगे, सुना महिन्यातून

एकदा येतात. इथेच जेवतात व चारचा चहा पिवून घरी परत जातात. त्यांनाही हि सहलच असते. मला परत नेण्याचे नाव, दोघेही काढत नाहीत. माझे कार्यक्रम अजून काही ठिकाणी होतात.

मुलांची लाडकी मम्मी.

मला या जगात काय कमी" हि कविता म्हणा असा आग्रह होतो.ती कविता वाचताना मला पोटात खूप तुटते. वृद्धाश्रमात मी आनंद शोधतेय. मला जगात नक्की काय कमी आहे, ते मला नीट कळत नाही. पण कमी आहे, हे मात्र मला जाणवतेय. "मला काय कमी" हे मी म्हणू शकत नाही.भीत भीत, नाईलाजाने, मी ह्या वृद्धाश्रमात आले. इतरांचे स्वभाव कसे असतील? आपण या वातावरणात रमू का? हि भीती होतीच. त्या निसर्गरम्य परिसरात पोहोचले. आयुष्याचा जणू हा अर्धविराम होता.

जाता जाताच वृद्धाश्रमाच्या मॅनेजरबाईंनी माझी ओळख, वृद्धाश्रमातील सुधा ताईशी करून दिली. सुधाताई खोलीत डासांसाठी, कासव छाप मच्छर अगरबत्ती लावत होत्या. सुधाताई माझा हात हातात, धरून मुसमुसत होत्या. थोड्या वेळाने शांत झाल्यावर मला म्हणाल्या,

"मी सर्व मैत्रीणीना खोटे सांगितले कि मुलीजवळ अमेरिकेत राहायला चालले आहे. माझे सुनेशी पटेना. माझा मुलगा मला परका वाटू लागला. विचित्र ताण घरात होता. अमेरिकेत मुलीकडे राहायचे, तर तिथेही मी उपरी होते. जगायला तर हवे आणि शक्य तेवढी चांगली अशी राहण्याची स्थिती, शोधायला हवी. स्थलांतरित होणारे पक्षी सुद्धा, आपली जागा बदलून बघतात. आपण तर माणूस आहोत." सुधाताईना मॅनेजरबाईनी शांत केलं व त्या इतर कामांसाठी, बाहेर निघून गेल्या.

" तुम्ही घरसुद्धा विकले होते" मी सुधाताईना विचारले.

" हो मुलाने घर विकताना कबूल केले होते, सहा महिने मी सांभाळीन, सहा महिने तू ताई कडे अमेरिकेत जा. खूप कठोर वाटले ते, मला पण स्वकारावेच लागले. मात्र पुढे मला दोन्ही ठिकाणी कसेतरीच वाटायचे. मी वृद्धाश्रमात आले आणि ईथे रमले." सुधाताई .

"या आश्रमात खूप पक्षी येतात. मोठ्ठी बाग आहे. छोटे देऊळ आहे. टीव्ही आहे. वाटेल तेव्हा पलंगावर झोपायचे आणि मनात येईल तेव्हा खाण्याचे, जरा स्वातंत्र्य आहे. "

"एकटे घर भाड्याने घेवून राहिले, तर?"मी

"अग, चोरीसाठी, जेष्टांचे खून होण्याची भीती असते, पडण्याची भिती, वयोमानाने होती.रात्री सोबतीला, झोपायला येणारी बाई ५००० रुपये घेते. इथे सुरक्षा आहे." सुधाताई

"ईथे आजारी पडलो तर?" मी विचारले.

"अग डॉक्टर येतात, सेवा करणारे नोकर आहेत. आजारी पडायचे तर माणूस, स्वतःच्या घरी सुध्दा पडू शकतो." सुधाताई

"रात्री झोपेतच मरण आले तर? मुले जवळ नसतात ना? मग? इतके वर्ष आपण मुलांना वाढवले, त्यांच्या खस्ता खाल्ल्या त्याचे काय?" मी विचारले.

"अग, देवाची ईच्छा!आपले कर्तव्य आपण केले, आता जमाना OLX चा आहे. नको त्या वस्तू विकून टाका. नको ती नाती झटकून टाका. आहे त्या स्थितीत, आपण हिरव्या निसर्गाच्या सान्निध्यात शेवटचे दिवस गोड करून घ्यायचे." सुधाताई म्हणाल्या.

"ऑल इज वेल" म्हणत मी सुधाताईबरोबर वृद्धाश्रमाच्या प्रार्थना हॉल कडे जाऊ लागले.

लाडकी मम्मी मला काय कमी?

तीन महिने वाटून सांभाळायची

दिली होती हमी।

पण आता,

वृध्दाश्रमात पैसे भरायची दिलीय हमी,

लाडकी मम्मी मी, मला काय कमी?

**********

## ६२दुधातली साय, की दूधावरची साय

दुधातली साय, दुधावरची साय म्हणजे त्या पांचट दुधापेक्षा, अधिक प्रिय, घट्ट चविष्ट, अावडीची वस्तु असते.बायका नवऱ्याला दुध पातेल्यातुन अोतुन वाढतांना, साय लगबगीने मागे करतात, म्हणजे साय नवऱ्यापेक्षा अधिक लाडकी असते.ही साय म्हणजे कोण? कळले ना?शाळेत धडा होता.

नातवंडे म्हणजे ती दुधावरची सायच असतात.पातऴ दुधापेक्षा साय प्रिय असते, बॅंकेच्या ग्राहकांना, मुद्दलापेक्षा, जसे व्याज प्रिय असते, तशी नातवंडे अाजी आणि आजोबांना, मुलांपेक्षाही प्रिय असतात.

अाजी आणि आजोबांना नातवंड घरी, जीवनी, आली की, होणारा आनंद खास असतो, जशी दुधाची परीक्षा सायीवरुन होते, तशी कुटुंबातिल नात्यांची परीक्षा, नातवंडांच्या केल्या जाणाऱ्या लाडावरुन होते.

अशी कशी करशील ग? लाडिक लाडिक लाडा

मी रांगीन घरभर बनून तुझा घोडा, असे लाड आजी आजोबा करतात.

घरात नातवंडे आली की जुनी चाके, पुन्हा फिरवायला खुषीने अाजी आजोबा, पुन्हा तरुण होतात.नातवंडे होणे, यात खरेतर अाजी आणि आजोबांचे कष्ट नसतात, पण स्वता:च्या अपत्य जन्माहुन प्रिय अशी ती घटना, त्यांना सुखावते.लेकीच्या, सुनेच्या, गर्भीणीच्या बाळंतपणात, त्यांना चिंता असतेच, पण खुषी अधिक असते, आपल्याच पोटच्या अातड्याचा वारसदार, नातु/नातवण्ड हा नवा गोळा असतो.फॅमिली ट्री वरचे नवे हार्डवेअर असते.ही अापली छकुली, सुनबाई ही नवी जबाबदारी कशी सांभाऴेल, या काऴजीबरोबरच लाड करायला एक नवा जीव मिऴण्याचा आनंद असतो.अाजी आणि आजोबांना वृद्धत्वात जणु नवा

बालपणाचा अंकुर फुटतो, मायेचा नवा कोंब उमलतो.नाती नातवांच्या रुपाने आपले बालपण ते वृध्द पुन्हा उपभोगतात, रागलोभ विसरतात.

पुढच्या पिढीला अंकुररुपी, दान देऊन काही काळाने आपण जगाचा निरोप घेणार आहोत, त्या अंकुराची जोपासना आजी आजोबा काळजीपुर्वक करतात, नव सृजनाचा आनंद तृप्ततेने उपभोगतात.तरूणवयातील विकार, चीडचीड, विचार, वृद्धत्वात पुढे समजूतदारीत बदलून कुटुंबीय प्रगल्भ झाले असतात, त्यामुळे, जमके लाड करुन बाळाला फुलबतात, लाडावतात.नातवंडांचे प्रेम न कळणारी व्यक्ती समाजात विरळाच असते, मी तर सर्व आजि आजोबांना सांगते की, देव देवळांपेक्षा बालकांत बघावा.

प्रौढत्वी निज शैशवासी जपणे, नातवंडांसवे खेळणे

वृद्धत्व म्हणजे रिकामपण असते, रिकामा वेळ भरपुर हाताशी असतो, त्यामुळे, बाळाचे आईवडिल, जेवढा वेळ देत नसतील, तितका वेळ आजे कंपनी नातवंडांना देते.आपल्या मुलांचे जे जे लाड करायचे राहीले असतील, ते, ते लाड नातवाचे, नातीचे करता येतात.जणु नातवंड ही एक खास भेट देवाने त्यांना दिलेली असते.सर्व स्वप्ने नातवांकडून पूर्ण करता येतात

मेरा नाम करेगा रोशन, जगमे मेरा राज दुलारा

दुधावरची साय असलेल्या, अशा नातवंडात, लेकीची मुले, लेकाची मुले असा भेदभाव केला जाऊ शकतो, थोड्याफार फरकाने, लाडके, दोडके केले जाते, पण ती साय लाडकी असतेच

लोकगीतात म्हटल्याप्रमाणे

लेकीच्या मुला ऊचलून घेते तुला

लेकाच्या मुला जा बस सांदीला, किंवा

जावयाचे पोर हरामखोर, अशी वर्गवारी झाली तरी, पेढे आणि बर्फी इतकीच ती तुलना असते.आजी हा तर मुलाबाळांचा लाडका कट्टा असतो, आईपेक्षाही जवळचे बेट असते, जसे बघा

आई असते जन्माची शिदोरी

आजी असते खाऊची तिजोरी

गोष्टींची पेटी, हक्काची लाडकरी

रागावते पण, आहे मैत्रिण तरी

तिच्या आयुष्याच्या ऊतारावरी

जेव्हा नसते ईतर जबाबदारी

नातवंडामध्ये मूल बनून

हौस घेते आजी भागवून

खेळण्याची, नाचगाण्याची

बागेतील सर्व फुले केसात माळण्याची

लपण्याची, रांगण्याची, रंगण्याची

खेळणी रंगपेटी घेउन दंगण्याची

आजोबा तर नातवाचे खास मित्र, असतात, आजोबा देवाघरी गेलेला एक नातु म्हणतो

आजोबाच्या खोलीत, धुके, धुके, धुकेच

आजोबाशिवाय घर मुके, मुके, मुकेच

दुधावरची साय दुधावर तरंगते, तसे नातवंडांचे तरुण वय, तरंगायचे असते, त्यांना आजोबा अ◌ोल्डफॅशनचे, बोअर वाटतात, वाटु शकतात.अर्थात पुढे मग नातवांनी जाणिव ठेवावी की, आपण सुद्धा आजोबा होवु, तेव्हा काळाच्या मागेच पडलेलो असणार आहोत आपली नातवंड आपल्याला टाळनार, कारण काळ धावतोय ना?असो

सर्व प्रकारचे दिवस साजरे होतात, हॅप्पी ग्रॅंडपॅरेन्टस डे, दुधावरची साय अथवा दूधातली साय, एनजॉय,

आजी आजोबा दिवसाच्या शुभेच्छा

************

## ६३ नावाचीच मी राणी

नावाचीच मी राणि, शीर्षक समजत नाही ना?तसे माझे बुद्धीबळातील राणी हे शीर्षक वाचूनही पटकन लक्षातच येत नाही की, बुद्धीबळाच्या पटावर सोंगट्यांमध्ये राणी नसते.राहा असतो, वजीर असतो, घोडा असतो, ऊंट असतो.आगदी शिपाई सुद्धा असतो, राणी मात्र नसते.का? कारण काय असेल?

न स्त्री स्वातँत्रम् अर्हति।

मुलगी झाली हो, नंतर

मला मुलगी नको ग बाई,

अशा रितीने, समाजात स्त्री नकोशी आहे, हे छुपे सत्य आधुनिकतेचा आव आणला, तरीही लपलेले नाही.

लपून छपून व्यक्त होणारी, स्त्री फक्त एक वस्तु आहोत, ऊपभोगासाठी आहोत असा गैरसमज बाळगणारे या देशात खूप आहेत.काम न मिळणारे, बसून खाणारे, रिकामटेकडे हात, या देशात खूप आहेत.कधी असुरक्षीत सापडलो, तर नराधम सोडणार नाहीत, हे सूज्ञ स्त्री जाणते.आपले पूर्वज तर जाणत होतेच होते, म्हणून तर बुद्धीबळाच्या पटावर राणी नाही.असेल तर तिने राज्याच्या मनात, किंवा घरात, महलात राहावे, कन्यांना, मुख्यता, फक्त पुत्रांना जन्म द्यावा, असे राणीचे स्थान होते, आहे सुद्धा!कारणे काय बरी असतील?

१ असुरक्षितता

प्रगति, महीला सक्षमीकरण, असे शब्द वापरणे फार सोपे असते, महीलावर्गातील समजदार,

आसुरक्षित वावरणारे लोक, या शब्दांचा पुस्तकी, मर्यादित अर्थ जाणुन असतात.स्त्रीने काहि वेगळे करायचे म्हटले, तरीहि त्यांतील धोके लक्षात घेऊन तिला पुढे जावे लागते.

२ नोकरी

स्त्रियांची नोकरी समाजाने स्विकारली, कारण त्यात पुरुषाचा फायदा होता.बायका अशाही फार पूर्वीपासून शेतात काम करीत होत्या, त्याऐवजि त्या, कार्यालये, बँका, दवाखाने, का ॅल सेंटर, अशा सुरक्षीत नोकऱ्या करु लागल्या, कमी त्रास होईल, घराकडे दुर्लक्ष होणार नाही, अशाच नोकऱ्या आजही अशा महीलांद्वारे, आधूनिक म्हणणारे, म्हणवणारे करतात, करुन घेतात.

३ मुले कोणाची?

अर्थात मुले, अपत्ये फक्त बाईचीच जबाबदारी असते.हा समज समाजात आहे.पदोन्नतीची संधि आली की, मुले लहान आहेत, त्यांना कोण सांभाळेल?दोन वर्ष थांब, बाळ चालायला लागू दे.आता त्याला तुझी गरज आहे, एका प्रमोशनने, तु काय चेअरमन होणार आहेस का? असे म्हणून, महीलेला कारकूनच ठेवले जाते, त्यांत सर्वांचा फायदा असतो.तिला घाबरवायला, अनेक अपयशी महीलांच्या कहान्या, ऐकवल्या जातात, अलेली संधी पुढे जाते, ती परतून पुन्हा परत येत नाही.

४ बुद्धीमत्ता

अनेक महीला खूफ बुद्धीवान असतात, मात्र त्याँना मदत करण्याऐवजी, त्यांचा पाय खेचण्याची शर्यत असते, मदत नका करू, पण टोमणे नको असे वाटुन, मिळवती स्वत:ला बावळट म्हणून घ्यायला तयार होते.तिच्या बुद्धीमत्तेचा मोठा भाग, हिमनगाप्रमाणै अव्यक्त राहतो

५ कोंडमारा

धुणे भांडी करणाऱ्या बायकांप्रमाणे, सकाळी आठ वाजता कामावर काय जायचे, मुलांचे हाल होतात, पैशापाठी धावत असते, अशी टिका ऐकून, कमावती स्व:ताच्या तब्येतीची चिंता न करता, राबत राहते.सारखी टिका नको म्हणून ति अव्यक्त राहते.घरात रेस सुरु असते, अन्य गृहिणींची, तिच्याशी तिला कमी लेखण्याची!

६आरोग्य

बुद्धीबळातील राणी, सर्वांची काऴजी घेता घेता, स्व:ताच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करते, असे एका पाहणीत आढळले आहे.

७सपोर्ट सिस्टिम

पूर्वी नोकरदार महीलेकरिता ऊत्तम सपोर्ट सिस्टीम होती, घरि आजी आजोबा होते, जे टिव्हीला चिकटलेले नव्हते, मुले नातवंड सांभाळणे, ह्यात ते आनंद घेत होते.आजच्या मालिका आणि पर्यटन, चंगळवादाच्या साथीत ते तरि कसे सुटणार?आता आजी आजोबा, नातवंडे हा वादाचा विषय आहेत.याला अपवाद आहेत, त्यामुऴे तर काही घरी, महीला पुढे जाऊ शकत आहेत

८ प्रगति

नुसती राबवणुक, हमाली, कामगार क्रिया, पाट्या टाकणे, थातुर मातुर नोकरी करणे, हे महीलांकडून अपेक्षित नाही, महीलांनी आपल्या क्षमतेचा पूर्ण वापर करावा, ऊच्चपदस्थ व्हावे असे अपेक्षित आहे.आलेल्या संधिचा फायदा धेणे, ह्या महीलेच्या मूलभुत हक्काला प्रेरणा देणे, तिला सक्षम करणे, सर्व प्रकारे मदत करणे, ही खरी समाजमनाचे प्रगतिची व्याख्या होऊ शकते

९ लोकसंख्या

वाढत्या लोकसंख्येवर नियंत्रण न घातल्यास, आतिरिक्त असे रिकामे अविचारी पुरुष, स्त्रीचे शत्रू वाढतील, नोकऱ्या अजून कमी होतील, तर गुन्हे वाढतील.जर माणसे कमी राहिली तरच बलात्कार, विनयभंग कमी होतील.नीतीतत्वांची पायमल्ली कमी होईल.सद्ध्या बेकार, काम न मिळणारे हात, गुन्हेगारी कडे वळत आहेत, वाढत्या लोकसंख्येमुळे कुणाचा पायपोस कुणाच्या पायात नाही, सोयी सुविधा कमी पडत आहेत.असुरक्षिततेचा, नैतिक अभावाचा परिणाम, आज स्त्रीवर अधिक होतो आहे.

बुद्धीबळातील राणी, आज एक बाहुली झाली आहे, काम करते आहे, पण मनातून भ्यालेली आहे, असुरक्षिततेचा राक्षस बाढतो आहे, रोजच्या महीलाविषयक गुन्ह्यांच्या बातम्या, बुद्धीबळातील राणीला पिंजऱ्यात कैद करीत आहेत, दिल्लीतिल निर्भया व्हायच्या भितीने, प्रतिबंधात्मक ऊपाय म्हणुन राणी कैद झाली आहे.वेळ अली आहे की बुद्धीबळातील राणी पटावर यावी। तिला तिचे खास स्थान मिळावे।

तोपर्यंत ती नावाचिच राणी राहील.

*****************

## ६४ झपूर्झा अक्षयतृतीया

अक्षयतृतीया म्हणजे वैशाख शुध्द तृतीया होय.उन्हाळा दाहक असला तरीही, निसर्गाचे चैत्रांगण या वेळी वेगळया प्रकारे, तत्कालीन फुलांनी आमरायांनी बहरलेले असते.हा शुभ मुहुर्त, साडेतीन मुहुर्तातील एक असल्यामुळे, शुभ कार्यासाठी या दिवसाची आपण वर्षभर नेहमीच वाट बघत असतो.जमिन फ्लॅट खरेदीसाठी, सोने, हिरे जवाहरात दागिने खरेदी, नववस्त्रखरेदी, नवी सुरुवात नवसंकल्प, सुसंवाद यासाठी हा उत्क्रुष्ट दिवस आहे

नेमेची येति सण, नेमेची होतो सोहळा,

असे काही सणांबद्दल म्हतले जाते, पण या सणाबद्दल असे कधीही म्हटले जात नाही व जाणार नाही.

केळी करा पूजन

या दिवशी, पाण्याच्या माठाला, कच्चे सुत गुंडाळून, त्यावर आंबा ठेवुन त्याची पूजा केली जाते, हा माठ ब्राम्हणाला दान दिला जातो, याला केळी कार ापूजन म्हणतात.पंखा, सुती वस्त्र, उपरणे, माठ, द्राक्षे, अांबे, पन्हे, श्रीखंड यांचे दान व सेवन करतात, काहि घरी पूर्वजांचे स्मरणार्थ काकबली देवुन तर्पण केले जाते, मन:पूर्वक नमस्कार केला जातो, यथाशक्ती नमन केले तरी चालते

झपूर्झा पोरी झपूर्झा

या सणाला झपूर्झा पोरी झपूर्झा, जा पोरि जा, पुढे जा, असे भूतकाळ मागे टाकुन भविष्याकडे जा असा संदेश देणारे भौतिक आणि अध्यात्मिक मिश्र स्वरुप असते.शुभ खरेदी इतकेच, या सणाला। पित्तरांच्या स्मरणार्थ पूजा तर्पण करणे, अभावाचे जीवन जगणार्यांना

सत्पात्री दान करणे, अशा तीन मिती या अक्षयतृतियेत आहेत.धन, अन्न, जल किंवा अन्य अतिरिक्त वस्तुंचे दान करणे, जुन्या न लागणाऱ्या वस्तु देवुन नव्या खरेदीचा मुहुर्त करणे, चैत्रपालवीचे स्वागत करणे अपेक्षित अाहे.पानगळ होवुन झाडे नव्या कोवळया पालविला जागा करुन देतात, तसे मानवाने, जुने मागे टाकुन, भुतकाळ मागे सोडुन, नव्याचे स्वागत करायचे असते.काळ मोठा द्रष्टा असतो, आपले पुर्वज जाणते होते, साचलेपण सोडुन नव्या चैतन्याकडे जाण्यासाठी त्यांनी या सणाचे प्रायोजन केले आहे.जुने टाकायची ईच्छा कधीच होत नसते, संग्रह वाढतच असतो, त्यामुळे, अतिरिक्त देण्याला सणाचा आधार देवुन दान ही कल्पना त्यांनी संतोष धन मानावे ासे सांगुन, दानाची महति मांडली

चैत्रांगण

हा सण जरी वैषाखात येत ासला तारिहि सजलेले चैत्रांगण ही या सणाची खास अोळख असते.या दिवसांत वैशाख वणव्याने पृथ्वी होरपळत असते, सर्व सजीवांच्या, शरीरातील पाणी कमी होवुन पक्ष्यांच्या, प्राण्यांच्या, मानवाच्या जीवाची काहिली होत असते. स्नेहभोजन, वसंतोत्सव साजरा करुन तनमन शांतवण्याचा तो धर्माचा, त्यांचा सणमार्ग होता.

उन्हाळ्याने शरीरे शुष्क झाली असतांना, अंगणात पाणी शिंपडुन, आमराईत, वातावरण निर्मिति करुन एकत्र जमले असता उन्हाळा सुसह्य होवु शकतो हे त्यांनी जाणले.कौतुकसोहळयांना गर्दी होवु शकते म्हणुनच वसंतोत्सव आयोजित केले जाऊ लागले.

उत्सवात या सणाला, चैत्रांगणात, आंबेडाळ, पन्हे, श्रीखंड, चंदन यांची रेलचेल आरोग्यासाठी आवश्यक असते.अक्षय तृतीयेला हळदीकुंकु कार्यक्रम त्यामुळेच योजिले आहेत.

वैशाखांगण

चैत्रांगण, म्हणजे चैत्र गौरीपुजानापासुन सजलेले ते अंगण होय.सडा टाकुन, पाण्याने थंड केलेल्या अंगणात, तुळशी वृंदावनाभोवती सजावट केली जाते, मोठी रांगोळी काढली जाते. ही रांगोळी खास पारंपरिक असते.शुभचिन्हांची रचना, कमळ, पाने, फुले, मानवी आक्रुती, घर, शंख, अशी प्रतीके या रांगोळीत असतात.त्या मातीच्या जलकुंभांभोवति, सतरंज्या अंथरुन बसायची व्यवस्था असते, वाळयाने सुवासिक केलेले पाणी उदकपात्रांत भरलेले असते.चैत्र पाडव्याला स्थापन केलेल्या चैत्र गौरीचे पूजेचे उद्यापन या तिसऱ्या तीजेला वैशाखांन वैशाखांगणात केले जाते.

चैत्रांगणातील तृतीया

अक्षयतृतीयेला चेेत्रांगणात जामलेल्या स्नेह्यांना भिजवलेले हरभरे, कैरी डाळ, पन्हे, चंदन, पंखा, जलकुंभ तलम वस्त्रे अशा वस्तुंचे दान केले जाते, तनमनाला थंडावा लाभावा, हाच हेतु त्यात असतो.बसंतऋतुचे स्वागत, गौरिपुजन, दान, पारंपरिक पध्दतिचे पालन हा मूळ हेतु ठेवुन, हल्ली अाधूनिक बदल कार्यक्रमात केले जातात, मात्र अक्षय तृतीयेचा उत्साह कमी होत नाही

तोषोनि द्यावे पसायदान

उत्सवाइतकेच सत्पात्री दान हा या सणाचा अात्मा आहे, या दिवशी पाणपोया, घातल्या जातात, अन्नदान, जलदान केले जाते.हे दान, अषयतृतीयेचे हे दान, पुण्य अक्षय राहते असा समज आहे.अोंजळभर धान्याच्या दानाने अन्न्ाची कोठारे रिकामि होत नाहीत, उलट पक्षी अाजिच्या खुलभर दूधाच्या दानाने ने शंकराच्या मंदिराचा गाभारा भरतो असे आपला धर्म सांगतो.

आज सकलजनांमध्ये संवाद व्हावा, समाजातील आहेरे गटाने, नाहीरे गटाला काहीतरि सत्पात्री दान करुन, मुख्य प्रवाहात येण्यासाठी हात द्यावा, गारपीटग्रस्त शेतकर्यांना मदत करावी हे अोंजळभर दान मी मागते आहे,

भूता परस्परे घडो मैत्र जीवाचे, अशी आपण सारे प्रार्थना करु या

हा होइल दानपसावो,

येणे वरे, ज्ञानदेवो सुःखिया झाला

असे सर्वजणच या अक्षयतृतीयेला अक्षय सुखी होवु या, भविष्याच्या नवपालवीचे स्वागत करु या

********************

# ६५आईचे आशीर्वाद

"घार हिंडते आकाशी, चित्त तिचे पिला पाशी"

अशी म्हण मराठीत आहे, तशीच एक संकल्पना मला परदेशी साहित्यात वाचण्यात आली. 'हेलिकॉप्टर मदर्स' म्हणजे "घिरट्या घालणाऱ्या आया." या आया, मुले शाळेत गेली, दूर गेली किंवा त्या स्वत: कामावर गेल्या तरीही मुलांच्या आसपास घिरट्या घालत असतात. म्हणजे फोन, इंटरनेट या माध्यमांद्वारे संपर्क साधून असतात.

मुले झिडकारतात, दूर्लक्ष करतात, हिडीसफिडीस करतात. "आई कटकट आहे म्हणतात", पण आई दूर्लक्ष करते. मुलाच्या आसपास वावरणारे, कुणाच्याही नजरेच्या आवाक्याबाहेरचे दुष्ट शक्तिंचे विळखे, तिच्या तिसऱ्या डोळयाला, बरोबर जाणवतात. तिच्या दोन्ही डोळयांची दृष्टी अधू झाली तरी तिच्या  तिसऱ्या डोळयाला सर्व लख्ख दिसत असते. कुठली संगत मुलाला चांगली नाही, कुठला रस्ता मुलीला यायला चांगला नाही हे त्या आईच्या तिसऱ्या डोळयाला त्या व्यक्तिच्या संपर्कात न येताही व त्या रस्त्यावरुन 'न' चालताही बरोबर कळते. तिची टेलीपथी अशी असते.

कंटाळा नाही, वीट नाही

आळस नाही, त्रास नाही

मातेवेगळी, मातेसम कुणी नाही

इतुकी माया कोठेची नाही

(दासबोध)

मुलांना आई दमली असली तरी सोबत यायला आईच हवी. तो बाबा घरात दमल्याची कहाणी ऐकवत पेपर वाचत टीव्ही बघत बसतो. पण दमल्यावर कोलमडून पडे पर्यंत आई कष्ट करत राहाते. पण मुलगा चुकला की "आईचे लाड" हा आरोप येतो.आई बद्दल खूप लिहीले गेले आहे.

आईसारखे दैवत साऱ्या जगतावर नाही

म्हणून श्रीकारानंतर शिकणे अ, आ, ई ...,       असेही लिहिण्यात आले आहे.

मातृत्वाची तयारी, गर्भसंस्कार अशाप्रकारे अनेक आर्थिक मोबदला देवून शिकवले जाणारे वर्ग सुरु झाले आहेत. मात्र या विषयावर स्वानुभव हाच गुरू असतो. घर भर पसारा, आईला बाळंतपणामूळे आलेला अशक्तपणा, आधार नसल्याची भावना, ही मातृत्वाची जबाबदारी यामुळे तिला गोंधळून जायला होते. मुल मोठे झाल्यावर, हे करू, ते करू असा विचार ती स्वत:शीच करत असते. तिला कुणाची मदत मिळाली तरीही आई जे कष्ट करते त्याची जागा तर कुणीच घेऊ शकत नाही.

वळवाच्या पावसाला व आईच्या कष्टाला मोजमाप नसते. कशाही परिस्थितीत असो, कष्टाला आईच हवी! मुलांची नर्स, मैत्रिण, सवंगडी, न्यायाधीश, वकिल, मध्यस्त, स्वयंपाकीण, मोलकरीण सर्व आईच असते. मुलांचे मन मोडू नये म्हणून गळ्यातील चेन मोडून ती त्याला सहलीला पाठवते. जगात लढायला तयार करण्यासाठी - त्याला कराटे क्लासला घाल, पोहायला शिकव. स्वत: काळजी करत बसते. आईही फक्त आईच असते. घरातील इतर गोष्टीतून तिचे लक्ष फक्त मुलातच असते. नवरा अोरडतो, "तुझे हल्ली माझ्याकडे लक्षच नाही", पण ती आईच्या भूमिकेतून बाहेर येऊच शकत नाही. आईपणाचा तोगणवेष घालून ती अहोरात्र आईच्याच भूमिकेत वावरते. ती मुलाच्या द्वारा जगते. मुलांच्या जीवनात तिचे अभेद्य व अटळ स्थान काही

काळच असते पण आईच्या जीवनातील मुलाचे स्थान अाजन्म असते. आईचे लाड हे जन्मभर साथ देतात. कोवळ्या वयापर्यंत मुलाला आई बद्दल खुप प्रेम असते. आईचे हातात पकडलेले बोट त्याला सर्वाधिक जवळचा सुखशांतीचा शॉर्टकट वाटतो.

तेंव्हा शिकलेले कसे छान समजत असे

सगळे रंग तेंव्हा कसे छान वेगळे निघत

इतिहासातील सगळ्या राजांना मिशा असत

तेंव्हाना धनुष्यबाण घेऊन मी लढाईला जात असे (जिंकत असे)

तेंव्हा ना मुठीमध्ये आईचे बोट बंद असे

आईचा मुलावरचा मालकी हक्क तिला जगापासून वेगळे पाडतो, पण तिला पर्वा नसते. मुल व आई यांचे स्वतंत्र राज्य या कालात असते. वडील या काळात पेईंग गेस्ट असतात किंवा बाबांची कहाणी ऐकवत बसतात.

आताशा या वाढत्या वयाबरोबर

मी खुपशी आईसारखी दिसायला लागलेय

जीव हरवून बसलेली असहाय नजर

अोढग्रस्तीला लागलेले अवघे शरीर - सारे तिच्या सारखेच!

आणि सवयही लागलीय तीच तशीच

'अो' न येणाऱ्या हाका मारत बसायची

आई तुझ्या अनावर आर्त हाकेला

उत्तर द्यायचे आम्ही टाळत होतो

तेंव्हा असच थारोळ साठायच का ग?

खरं सांगू का ते सारं आता आठवून

पाझरणारे हे डोळे पुसायला

हवाय आई तुझाच पदर! देशील आई, देशील?

तुला जगवण्यासाठी मी काहीही करु शकत नाही

हे लक्षात आल्यावर मनात विचार आला

तुझी तू जगत होतीस तेंव्हा तरी

तू जगावेस, अस तुझ्यासाठी माझ काही चालल होते का?

मी तुझ्यासाठी काय केले?

आईसाठी करण्यासारखे, खुप काही असते पण तिला गृहित धरुन आपण काहीच करत नाही, आणि तिच्या श्राद्धाला मात्र डोळे टिपून ताटभर जेवण वाढून, कावळा शिवायची वाट बघत बसतो! तरीही आई मुलाला आशीर्वाद देते. आईचे प्रेम असे असते. आईचे लाड असे असतात.

*****

# ६६ देवा बोला हो माझ्याशी

देवा, कोणया अेका कविने म्हटले अाहे की

देव देवळात नाही, देव  नाही देव्हारी

देव चोरुन ने अशी असे कोणाची पुण्याई

मात्र कलियुग अाले अाहे अाणि कोणा पाप्याची नजर देवळातील देवावर पडली अाणि त्याने देव चोरुन नेले

देबळातील दागिने, चान्दीची भान्डी, चोरीला जाण्याचे तुरळक प्रकार घडत असत मात्र अाता कोकणातील

दिवे अागारातील सुवर्ण गणेश मन्दीरातून दीड किलो बजनाची शुध्द सोन्याची मूर्ति चोरटयानी चोरुन नेली अाहे: मूर्ति सोन्याची की दगडाची हा प्रश्न भक्तापुढे कधीच नसतो, अभक्ताकडे असतो ;दिवे अागारातील या गणेशमूर्तिचे बाजारमूल्य चोराना बरोबर माहीत होते

ही गोश्ट तशी १५ वर्शापूर्वीची अाहे दिवे अागार हे तसे कोकणातील छोटेसे गाव, समुद्र किनारी वसलेले, शान्त, लोक खाअुन पिऊन सुखी होते, गावात मन्दिरे होती पण सोन्याची नव्हती, एक दिवस गावातील दर्ौपदी बाई यान्ना माडाच्या वनात खणताना एक २ बाय २ फूट अाकाराची मोठी ताम्ब्याची पेटी सापडली, या पेटीत गणपतीची  सोन्याची सुबक मूर्ति होती, हीऱ्याचे दागिने होते, हो ऽऽ लवकरच सर्व  ठिकाणी बातमी पसरली, दिवे अागार  स्थळ पर्यटन स्थळ बनले 'खानावळी, दुकाने गाड्या, हाँटेल या सर्वानी गाव गजबजले, गणपती बाप्पाची कृपा झाली।

अाज १५ वर्शानन्तर ही  मूर्ति चोरीला गेली, चोर अजूनही सापडत नाही मूर्ति परत मिऴत नाही देवाची मूर्ति असुरक्शित ?सावधान, राञ वैऱ्याची अाहे, देव चोरीला गेला अाहे,

जगी ज्यास कोणी नाही त्यास देव अाहे असे म्हणतात ना, मग देवा तुमचीच चोरी झाली ? तर अाम्ही अाता कोणाकडे बघायचे? देवा बोला हो माझ्याशी,

देवा बोला हो माझ्याशी, देवाऽऽऽऽऽ

***********

## ६७ बलुतं ते आयदान ते शानिपुजा

चला शनिमंदिर प्रवेश झाला! प्रश्न सुटले का? स्त्रियांचे शोषण थांबले का? लोकसत्ताच्या कर्ती करीविती कार्यक्रमांत उर्मिला पवार भेटल्या. लोकसत्ता मध्ये बलुते ते आयदान हा लेख २००२ साली आला होता. त्यावर प्रतिक्रिया म्हणून मी एक पत्र लिहिले होते.

चाळीस वर्षापूर्वी मी बलुतं वाचले होते तेव्हा मी तरुणी होते, नंतर प्रौढा, यथावकाश वृद्धा झाले. काळ बदलला, समाज बदलला, बायकांना मंदिरामध्ये पुरुषांच्या बरोबरीने प्रवेश मिळाला.

पण प्रश्न सुटले का? या अस्तित्वाच्या अस्मितेच्या लढाईत समानता आहे कुठे? अस्तित्वाची लढाई आजही सर्व क्षेत्रात चालू आहे व कायमची ती राहणार आहे.

द्या पवारांनी लिहिले होते त्याप्रमाणे अन्यायाविरुद्ध होणाऱ्या लढाईत कितीतरी जण घायाळ होतात, जखमी पाखरांप्रमाणे, तडफड करतात, आणि शहीद होतात. मंदिर प्रवेश मिळाला पण अजूनही "स्त्री" उपेक्षित आहे. लग्न पत्रिकांमध्ये पुरुषांची नावे लिहिली जातात. कायदा झाला असला तरीही स्थावर जंगम मालमत्ता पुरुष वाटून घेतात. स्त्री, घराची, कन्या, आई उपेक्षितच उरते. असमानतेचे हे मस्तकाच्या चिंधड्या करणारे दुःख पाठीवर वाहूनच जगावे लागते. यश मिळतेच असे नाही. बहुदा स्त्रीला दूर ढकलणे, तिचा हक्क डावलणे व विरोध मोडून काढणे या पायऱ्याकडेच समाजच काळ असतो. अन्यायाचा बुरखा फाडावा, सहनशिलांना धीर द्यावा आणि चुकीच्यa मूल्यांना पाठींबा देणारे उघडे पडावेत म्हणून आज कित्येक वर्ष प्रयत्न सुरु आहेत. विरोध करणरे काही काळ चमकत पुढे रक्त बंबाळ होतात. समाज टीका करतो, छुपे शत्रू तयार होतात. अश्वत्थांम्या सारखी जखम घेऊन कितीतरी काळ अस्वस्थातेत वावरून ती बंडखोर स्त्री, सुधारक पुरुष काळाच्या पडद्या आड जातात.

गिरणी कामगारांच्या संपत होरपळलेली अनेक कुटुंबे, स्वेच्छा निवृत्ती लादले गेलेले अनेक कर्मचारी बंद गिरण्यांमधील मजूर कामगार त्यांचे कुटुंबीय त्यांच्या साठी अट्टाहास केला गेला पण तो अयशस्वी झाला.शोषणाला कंटाळून रेल्वे रुळावर आसरा शोधनाऱ्यांचे दुःख बलुतं मध्ये लिहिले आहे. माझ्या मते स्त्री-पुरुष शोषित- शोषणकर्ता, बळी- छळवादी ह्या जोड्यांमध्ये मुलभूत आते ती अहंकाराची भावना! आणि माणसाला माणूस म्हणून जगण्याचा हक्क नाकारला जाणे म्हणजे अन्याय होय.

भारतीय राज्य घटनेने सर्वांना समान संधी व वागणूक दिली आहे. व्यवहारात हि संधी नाकारणे म्हणजे अन्याय व असा अन्याय झालेली व्यक्ती म्हणजे दलित होय. दलित शब्दाला मी कोणत्याही जातीचा किंवा धर्माचा स्पर्श आहे असे मनात नाही. हरिके जन- हरिजन हा महात्मा गांधीजीनी वापरलेला शब्द म्हणूनच मला आवडतो. समाजात हिंदी चित्रपटांचे मोठेच वेड लोकाना आहे. चित्रपटात हिरो शेवटी सर्व गुंडांना मारतो व शत्रूचा नयनात करतो. तेव्हा सामान्य प्रेक्षक खुश होतो. कारण प्रत्यक्ष जीवनात रात्रभर भुंकून झोप उडवणाऱ्या कुत्र्याला एक दगड मारणे अशक्य प्राय असते. किवा पानपट्टीच्या टपरीवर उभे राहून महिलांची टर उडवणाऱ्याला ठोसा लावणे नामुमकीन असते. अशक्यप्राय असते. मग माणूस त्या हिरोच्या जागी स्वतःला कल्पून एक स्वप्न पाहतो कि कधीतरी आपल्या आयुष्यात अच्छे दिन येतील. जगात प्रेम पसरेल, जणू शनि महाराज गुंडांना बलात्कार्यांना नजरेनेच ठार मारतील. युद्धे, अत्याचार, हिंद, अतिरेकी कारवाया बंद होतील, अशी आशा, म्हणजेच, बलुतं ते आयदान ते शानिप्रवेश हा स्त्रियांच्या श्रध्देचा, न झालेला प्रवास होय

**************

# ६८सणसाखळी

भारतीय सण उत्सव आणि तरूणाई

याचे नाते असते, ,  भारतीय तरुणांमधील 30% तरूण हे सुशिक्षित आहेत तर बाकी 60% तरूण अर्धशिक्षित आहेत. या तरुणांपैकी काही तरूण, भारतीय सण उत्सव परंपरा ओके मानतात तर बाकीच्या तरूणांना हे सण आणि उत्सव हे वेळ काढू पणा वाटतात. 10 % अशिक्षितांना, सण हे हुल्लडबाजीची संधी वाटतात. फार पूर्वीच्या काळी आपल्या, ज्ञातिचे, सम संस्कृतीने लोकांनी भेटावे, त्या सर्वांनी सुखादुःखाची चर्चा करावी, सुसंवाद साधावा या हेतूने सण उत्सव बनवले गेले. हा वारसा शेकडो वर्षांचा आहे.

1) कृषी संस्कृती ः ऋतू परत्वे आरोग्य नातेसबंध, आहार निसर्ग, संवाद, कष्ट, फळप्राप्ती याच्याशी संबंधित असे सण व उत्सव आहेत. भारत हा कृषिप्रधान देश असल्यामुळे, कृषीसंस्कृतीशी निगडीत अशी आपली संण उत्सव संस्कृती आहे. त्या त्या सणाला ते काम, जसे पेरणीच्या वेळी एकत्र जमून, शेतात काम करणे, पेरणी करणे, या सणांचे वेळी पाऊस, शेतीकाम यांचा संदर्भ येतो. तर वसंतऋतूत शेतात तयार पीके डोलत असल्याने, पीक कापणे, सुगीचा संदर्भ येतो.

वसंत, वर्षा, शिशीर, ग्रीष्म या चार ऋतूंशी संदभीर्त क्रमानुसार हे सण व उत्सव बनवले गेले आहेत.

2) मराठी महिन्यानुसार बारा मराठी महिने व चार मराठी ऋतू मानले जातात. खरेतर उन्हाळा, हिवाळा, पावसाळा हे प्रमुख तीन ऋतू आहेत. मात्र या सणांमध्ये तरुणाईचा उत्साह दिसत नाही. हे सण आता वृद्धांचे उरले आहेत. आधुनिक काळात हे सर्वच सण कालबाह्य झाले आहेत असे विचार, आजचे तरुणाईचे दिसतात. फक्त मूठभर 10% तरूण या सण उत्सवांमध्ये भाग घेतात. त्या सणांमधील अधोरेखित हेतू लक्षात न घेता, केवळ पारंपरिक रित,

वेळ घालवण्याचे साधन रिकामेपणाचा उद्योग व सुट्टीची सोय अशा नजरेने सणांकडे हे तरुण बघतात, 14 ते 30 वयोगटातील तरुणांना आज हे सण कालबाह्य झाले आहेत व ते बंद करावेत असेच वाटते.

बारा महिन्यांतील महत्त्वाच्या सणांचा उहापोह आपण बघूया .या सणांमधील तरुणाईचा सहभाग व सण साजरे होण्याचा हेतू साध्य होतो का? हे त्यातून समजेल.

सण उत्सव हे मराठी महिन्याशी संबंधित असल्याने मराठी महिन्यांनुसार आपण सण बघू या.

1) चैत्र - चैत्र, गुढीपाडवा: मराठी नववर्षाची सुरुवात या दिवशी होते. मात्र तरूणाई इंग्रजी वर्ष 1 जानेवारीचे मानत असल्याने त्यांनी गुढीपाडवा हा सण बहुतांशी उपचारापुरताच उरवला आहे.

घरखरेदी, सोने खरेदी यांचा मुहूर्त एवढेच महत्त्व तरुणाईने या सणाला दिले आहे.

नववर्षाचे स्वागत यात्रा, पारंपरिक वेशभूषेत साजरी होते. ती एक फॅन्सी ड्रेस स्पर्धा वाटते. केवळ मित्रसमूह भेटणे एवढा पाडव्याचा अर्थ ते जाणतात. चैत्री नवरात्रीत, देवी बसवणे व देवी नवरात्र उत्सव साजरे होतात. त्यात जत्रेचा भाव अधिक असतो. जैन धर्मीयांचे तीर्थंकार, श्री महावीर यांची जयंती, हिंदूंची हनुमान जयंती चैत्रात येते.

2) वैशाख - पूर्वी लग्नकार्यासाठी वैशाख महिना असे. हल्ली संपूर्ण वर्षभर विवाह होतात, अन् वैशाखाचा भाव कमी झालाय.तरुणाईमुळे. वैशाखातील अक्षयतृतीया या दिवशी पारंपरिक रित्या माठ, पंखा देवून ग्रीष्मऋतूचे स्वागत केले जाई, हे पंचांगातच आहे. फक्त खरेदी मुहूर्त म्हणून अक्षयतृतीया उरली आहे.

खेडोपाडी, आखीतीज प्रिय होती. पण, तरुणाईला त्यांच्या प्रश्नांमुळे शाला, कॉलेज, परिक्षा, नोकरी त्यांचे त्यांचे प्रश्न, मैत्री यामुळे सणराणी अक्षयतृतीया प्रिय वाटत नाही, 14 फेब्रुवारीला येणारा, पाश्चिमात्य लोकांकडून आलेला 'व्हॅन्टाईन डे' मात्र ही तरूणाई साजरी करते. करोडो रुपयांची उलाढाल व्हॅलेन्टाईन डे ला, फुले, भेटकार्डे, भेटवस्तू व चॉकलेट्स मधून होते. शनिजयंती व हनुमान जयंती हे सण केवळ एक अकल्पिताची भिती, म्हणून घाबरत साजरा केला जातो.

3) जेष्ठ - वटपौर्णिमा, वटसावित्री व्रत या महिन्यात येते. पतीला दिर्घायुष्य मिळावे म्हणून, जन्मोजन्मी हाच पती मिळाला म्हणून या महिन्यात स्त्रिया जंगलात जावून, वटवृक्षाची पूजा करतात. वडाच्या पारंब्या या फर्निचर, घराचे वासे यासाठी वापरत, म्हणून वड महत्त्वाचा होता. ऑक्सिजन सोडणारा हा वृक्ष जेष्टात प्रिय असे. मात्र खूप पाऊस देखील कधी जेष्ठात पडतो. वडाच्या फांद्या तोडून, अशी पूजा करणे हा सणांचा अपभ्रंश आलाय. आज तरूणाईला हा सण फॅड वाटतो. कुणी सेल्फी सुद्धा काढून वटपौर्णिमा, या सणाचा उल्लेख करत नाही.

4) आषाढ - हा पंढरपूरच्या वारीचा महीना असतो. विष्णूपूजन या महिन्यात केले जाते. मात्र चातुर्मास तरुणाई पाळत नाही. फेसबुक व्हॉटस्ॲप मधल्या, ज्ञानी तरुण व्यक्तिंना, आषाढाबद्दल खास ज्ञान नाही, वारीची आवडली तरुणाईला नाही.

5) श्रावण - श्रावणाबद्दल गाणी असल्यामुले तरुणाईला श्रावण हा मैत्री, प्रेम, उत्सव यांचा महिना वाटतो. तरुणांना श्रावणी सोमवार, नागपंचमी, राखीपार्णिमा, नारळी पौर्णिमा, जीवती पूजन या क्षेत्रात तरुणाईला रस नाही, मनस्वीपणा, हळवेपणा, थोडाफार श्रावणात तरुणाई दाखवते. भाऊ- बहिणीच्या नात्याचा आदर करते.

इंग्रजाळलेल्या तरुणाईला या महिन्या दरम्यान येणारा मैत्री दिवस फ्रेन्डशीप डे अधिक प्रिय वाटतो. हल्ली शहरात बैल, गायी थोड्याच उरल्या आहेत. बैलांच्या श्रमाला महत्त्व देणारा पोळा, हा सण या महिन्यात येतो.

कृषी संस्कृतीबद्दल कृतज्ञता व्यक्त करणारा हा सण, तरुणाई जाणते पण विनोदावारी उडवून नेते. फक्त पुरण पोळीचा नैवेद्य, मिष्टान्न एवढ्या रुपाने हा सण उरलाय.

6) भाद्रपद - तरुणाईचा लाडका महिना हा भ्रद्रपद आहे व गणपती उत्सव हा सण, तरुणाईचा प्रेममय आवडीचा सण आहे. महिला- हरतालिका करतात. तरुण गणपति सजावट करतात. दहा दिवस तरूणाई खूष असते. शुभकार्यांची सुरवात या महिन्यात होते. तरुणाईला हा सण आवडतो. भाद्रपदाचा कृष्णपक्ष धोंड्या महिना, हाड पक्ष अथवा पितृपक्ष म्हणून अशुभ मानतात. पितर, अथवा मृत नातेवाईकांचे श्राद्ध तरुण करतात. सुसंस्कृतीत त्यांनी पितरांचे श्रण ठेवले आहे तरुणाई ते मानते, पण त्यात भिती अधिक आहे.

7) अश्विन - अश्विनातील घटस्थापना, नवरात्री उत्सव दसरा हे सण तरुणांचे खूप प्रिय सण आहेत. गुजराथी लोकांकडून स्विकारलेला गरबा - दांडिया यामुळे हा सण उत्सव गाजतो.

अश्विन महिन्याच्या शेवटी येणारी दिवशी तरुणाईला खूप आवडते. खरेदी, मिठाई, फराळ नातेवाईकांच्या भेटी, सुट्ट्या, सहली या कारणांनी तरुणाईला नवरात्र व दिवाळी हे सण खूप आवडतात. समृद्धीचा हा सण तरुणाईला नंबर एक सण आहे.

8) कार्तिक - कार्तिकाचे पहिले दोन दिवस पाडवा व भाऊबीज देखील तरुणाईला खूप आवडतात. (दिवाळीचाच भाग असतात) तरुणाई म्हणते, ‘मला कोणत्या शुभाशकुनांची साथ नको’

'वेळ पाहुनी, खेळ मांडणे, ना मंजूर, सण नको संधी नको' ही तरुण पिढी मस्तीत मग्न आहे. कार्तिकातील त्रिपूर पौर्णिमा काही तरुणांना आवडते. या दिवशी खूप दिव्यांची आरास केली जाते. फिल्मी स्टाईलने येणारी करवा चौथ सुद्धा तरुणाई नावाजते.

9) मार्गशीर्ष - खंडोबाची देवदिवाळी, खंडोबाचे नवरात्र, दत्तजन्म हे उत्सव ग्रामीण भागातील तरुणांना आवडतात. मात्र 60% तरुणांना हे उत्सव अज्ञातच होते. फक्त दिव्यांची आरास जोरात गाणी लावणे हे उत्सव तरुण जाणतात.

10) पौष - शाकंभरी पौर्णिमा, तीळगुळाची संक्रांती या कारणाने काही तरुण पौष महिन्यातील पुसीपुनव उत्सव जाणतात. गूळपोळया खाणे, स्नेह वाढवणे मात्र तरुणांना आवडते, मात्र ते तरुणांमध्येच, आपापसात,  जेष्ठांशी नाही.

11) माघ - माघी गणपती उत्सव तरुणाईला आवडतो. पूजा, मजा असा वसंतपंचमीचा उत्सव तरुण जाणतात, मात्र माघ स्नानाबद्दल काहीही माहिती तरुणाईला नाही.

12) फाल्गुन - होळी पौर्णिमा, धुळवड, रंगपंचमी हे सण तरुण जाणतात मात्र सुशिक्षित तरुणांना, या सणांचा खूप राग येतो. धुळवड ते फुगे फेकणे या कारणासाठी देशाची एक सुट्टी वाया जावी ही त्यांना मान्य नाही. रंगांनी कपडे खराब करणे, पाणी वाया घालवणे तरुणांना आवडत नाही. होळी पेटवायला जागा नसते. झाडांचा नाश होतो. हा सण, काही तरुण लोकांना आवडत नाही. मात्र हुल्लडबाजी करणाऱ्यांना हे सण दारू प्यायची, छेडछाडीची संधि वाटतात.

सहा ऋतूंचे सान सोहळे

यातच भान हरावे.

अशी ऋतूपरत्वे असलेली सणसाखळी. तरुणाईला प्रिय वाटत नाही. तरुणांची निसर्गाशी नाळ तुटलेली आहे. त्यामुळे तरुणाईला या सणांमधील काही सण फक्त उत्सव म्हणून आवडतात. जागतिकीकरण, मंदी, यांनी गोंधळलेल्या आंग्लाळलेल्या काळात भारतीय सण उत्सव आणि तरुणाईची सांगड घालायला हवी. सणामध्येही बदल व्हायला हवेत व तरुणांना देखील समजवायला हवे.

सध्यातरी भारतीय सण उत्सवापासून तरुणाने फारकतच घेतली आहे (बहुतांशी) भारतीय संस्कृतीचे रुपडे असलेल्या सणांना अच्छे दिन यावे व, नवतरुणाने, समूहाने त्या सणांमध्ये रस घ्यावा.

********

# ६९मोत्याची मोहनमाळ

'अशी ही चिक मोत्याची माळ' गाणे गणपतीचे वर्णन करते.अशीच मोत्याची माळ घातलेली स्त्री देखणी, कुल वाटते.शिंपल्यात सापडणाऱ्या, मोत्यात थंडावा देण्याते तत्व असते.साधारण पणे, मोत्याचे आवरण पांढरे चकचकीत असते.मात्र काळा मोती देखील असतो. मोत्याची मोहनमाळ देवी सरस्वती माता, गळ्यात घालते. मोती शुभ्र असतो. शिंपल्यामध्ये मासोळी अडकल्यावर तिच्या शरीरातून बाहेर पडणारा स्त्राव, पुढे मोती बनतो. शिंपल्यात बंद राहून बनलेला, प्राणीज असलेला मोती थंड असतो व थंडावा देतो. हैद्राबादचे मोती प्रसिद्ध मानले जात असले, तरी हैद्राबादला समुद्रकिनारा जवळ नाही.कच्छ हून आलेले, त्या भूमित जन्माला आलेले, मोती राजाश्रय, मिळाला.अन्य दागिना तुल्य बळ, नसल्याने पूर्वी व्यापाऱ्यांनी वसवलेला मोती बाजार हैदराबाद ला परंपरेने चालत आलाय.

राजघराण्यातील राण्याकंडे दागिन्यात, पौराणिक चित्रांमध्ये देवीदेवतांच्या गळ्यात, मोत्याची माळ होती. पूर्वी फक्त राजघराण्यात मोती घालायला वापरला जाई.मोती प्रथमच, अरको व्हॉलीतील 13 व्या शतकातील मार्को पोलोने मंगोलियन(प्रथम) राजाला, (युआन साम्राज्याची स्थापना करणाऱ्या) कुबलाईझ खानला दिले, त्याचे वजन 575 कॅरट होते, तो मोती, 3 इंच लांब होता, 2007 साली अबुधाबीत तो मोती, लिलावात विकला गेला. ली पेरेग्रीना हा मोठा मोती रिचार्डबूरने, त्याची पत्नी एलिझाबेद टेलरला दिला होता. एलिझाबेदराणीने, खुषीत, हौशी ने तो मोती रुबी माणिक सह, कंठहारात गंठवला.

पाश्चिमात्य देशात जे राजे राण्याना नेहमीच मोत्याचे हार घालतात, ते विवाहात यश मिळवतात असे मानले जाते . तारुण्यातील पदार्पण मोती घालून साजरे केले जाई. (18 व्या वर्षी भेट मिळे) विवाह वेळी मोंती घालणे महिलांचे साठी, शुभशकून व चांगले चारित्र्य दाखवी. 1900 सालानंतर कृत्रिम मोत्यांची पैदास सुरु झाली. ऑईस्टर शेती सुरु झाली. शिंपल्यात एक मणी ठेवून मोती बनवणे सुरु झाले. सर्वत्र मोंती फॅशन गिफ्ट झाला. निर्जीव मोती जीवंत मानले

जातात.मोती घाम तेल शोषतात. आगीत पेटत नाही. एलिफंटाला, अलिबागला, हैद्राबादला छान मोती मिळतात. जे तुरुंग नसलेले कैदी असतात त्यातली स्त्री ही एक मानली जाते. जिराफ म्हणे पांढरी रेघ ओलांडत नाही बाई म्हणे लक्ष्मणरेखा ओलांडत नाही. तशा बायका सजणे नटणे देखील सोडत नाही. तसा मोती शिंपल्यातच कैदेत बंद झाला तरी बाहेर आल्यावरसुद्धा शालीन राहतो.

काही काळानंतर मोती झिजतो, त्याचे वरचे आवरणाचे कप्पे निघतात. असा तुटका मोती धारण करु नये. डोळयातून ओघळणाऱ्या अश्रूला मोती मानले जाते. इतका मोती पवित्र आहे. पोवळे मोती एकत्र वापरले जातात. मोत्यांच्या मूलतः फिकर बदामी, पिवळसर, गुलाबी, निळसर, राखाडी छटांचे मोती महाग असतात. वेडेवाकडे मोती राईस पर्ल्स म्हणून प्रसिद्ध होतात. वेडेवाकडे असूनही सुंदर दिसतात. हिरे, माणिक, पाचू श्रीमंताचे गळयात मुकुटात मिरवतात, तर मोती हा स्त्री च्या गळयात शोभून दिसतात.

=====

# ७० टोपणनाव

अन्य लोक टोपणनाव देतात .प्रत्येक गोष्टींचे एक खास वैशिष्टय असत त्यानूसार जगभरात वैशिष्ट्यानूसार गावांना शहरांना स्थानांना टोपणनाव दिले जाते. ही टोपणनाव प्रेमच दर्शवतात.

जगभरातील टोपणनाववात

1) सिटी ऑफ लाईट -पॅरिस लीस्बन

2) द बिग ॲपल- न्यूयॉर्क

3) द सिटी ऑफ सेव्हन हिल्स- रोम

4) पर्ल ऑफ द डन्यूब- बुडापेस्ट

5) सिटी ऑफ एन्जल्स- लॉस एंजलिस

6) सिटी ऑफ लिलीज- फ्लॉरेन्स

अशी टोपणनावे विविध शहरांना दिली जातात.

1) आपल्या मुंबईला बेटांचे शहर म्हटले जाते. सिटी दॅट नेव्हर स्लिप्स म्हणतात.

2) कलकत्ता येथे नेहमी विविध सण उत्सव चालत असतात. गरीबीशी लढून धीटपणे कोलकत्ता आज उभे आहे. झोपडीतले लोकसुद्धा खूश राहतात. त्यावरुन कलकत्याला सिटी ऑफ जॉय म्हणतात.

3) बंगलोरची हवा थंड आहे. या शहरात खूप बागा आहे. लालबाग प्रसिद्ध आहे. बागबगिच्च्यांमुळे बंगलोरला गार्डन सिटी म्हणतात.

3) पेन्शनरांचे पुणे विद्येचे माहेरघर पुणे ही पुण्याची वैशिष्टये आहे. त्यामुळे पुण्याला सिटी ऑफ एज्युकेशन म्हणतात.

5) काची कोचीन हो शहर मसाल्यांसाठी प्रसिद्ध आहे. सिटी ऑफ स्पाईस किंवा क्वीन ऑप अरेबिअन सी असेही म्हणतात. पोर्तुगाज लोक येथे मसाल्यांसाठी आले.

6) सिटी ऑफ लेक्स म्हणजे श्रीनगर होय. जम्मू काशिमर ला पॅराडाईज आल कॅथ म्हणतात. एखाद्या शहरात इतके तलाव असणे विशेष आहे. या तलावांमध्ये हाऊसबोट व शिकाऱ्यांनी दल लेक, नागीन लेक, वुलर लेक, मानसबळ लेक या सर्वांमुळे श्रीनगर सिटी ऑफ लेक आाहे.

7) पिंक सिटी असे जयपुरला म्हणतात. येथे सर्व घरे गुलाबी रगांने गुलाबी संगमरवराने रंगवली जातात. सवाई रामसिंग याने आदरतिथ्याचा रंग म्हणून गुलाबी रंगाने प्रीन्स ऑफ वेल्स चे गुलाबी रंगाने स्वागत केले होते.

8) सिटी ऑफ पॅलेसेस हे बिरुद म्हैसुरला मिळते. राजघराणे राज्यरितीचा दसरा उत्सव हत्ती म्हैसुर पॅलेस अनेक अन्य राजवाडे(त्यातील काही आता हॉटेल्स बनली होत) यामुळे म्हैसूर इज सिटी ऑफ पॅलेस.

टोपणनाव डोक्यावर ऊपाधिचा टोप ठेवते

====

## ७१ रिमझिम झरती श्रावण धारा

पावसाळा सुरु झाला, कि, श्रावणात, आषाढ महीन्याचा कोसळणारा पाऊस डोंगराच्या कुशीत स्थिरावतो. श्रावणाचा चीज भुरभुरल्या सारखा दिसणारा पाऊस, संथपणे चिकचिक चिकचिक आवाज करीत सरीवर सरी बरसू लागतो.हिंदी सिनेमावाल्यांत तर श्रावण अगदी लाडिक असा लाडका महिना असतो.

" सावन को आने दो" पासून "आया सावन झुमके "पर्यन्त हिंदीवाले श्रावणाचे नर्तनासाठी आतुर असतात. माझे श्रावणाचे वर्णन करणारे गाणे, मात्र अस्सल मराठमोळे, सुमन कल्याणपुरकर यांनी गायलेले, भावगीत आहे.

रिमझिम झरती श्रावण धारा, धरणीच्या कलशात

प्रियाविण उदास वाटे रातii||धृ||

मेघा असशी, तू आकाशी, वर्षा मधुनी, तू कधी वर्षसी

वर्षा मागून वर्षती नयने

करती नीत बरसात ||१||

बरस असा रे मेघा रिमझिम,

आज यायचे माझे प्रियतम,

आतुरलेले लोचन माझे, बघती अंधारात || २||

प्रासादी या जीवलग येता

कमळमिठीमध्ये भृंग भेटता

बरस असा कि, प्रिया न जाईल माघारी दारात ||३||

स्त्री भाबडी असते, पावसाळ्यातील कातर हुरहूर लावणाऱ्या, जांभळया रात्री, पावसाला सांगते.

"अरे पावसा, माझ्या प्रियाला घेऊन ये।त्याला घरात येऊ देत तदनंतर तू खूप जोरात कोसळ, म्हणजे माझा प्रियतम परत जाऊ शकणार नाही."

हे भावगीत, हे विरहिणीची विलापिनी असले, तरीही हे गीत हळवे निरागस प्रेम दाखवते. प्राथमिक शाळेत शिकत असताना, गायनाच्या शिक्षेकेने आम्हाला हे गाणे शिकवले होते. अल्लड बालिकेतून मी युवती झाले, यथावकाश प्रौढा झाले, पण या गाण्याचा गोडवा इतका छान होता, कि नंतरची कोणतीच श्रावण गीते या गाण्याला कधीही मागे पाडू शकली नाही.आज म.टा च्या माध्यमातून मी हे श्रावणधारांचे चीज भुरभुरणाऱ्या पावसाचे, गीत शेअर करू इच्छिते.

मी मराठी,

माझे लाडके गीत देखील मराठी आहे.

मला त्या गोष्टीचा अभिमान आहे

*****

# 72नाट्यछटा- वेळ मिळत नाही

किती काम दिवसभर करायचे? वेळच मिळत नाही. बाईची जात स्वयंपाकपाणी, कपडे धुणे... कंटाळा येतो. शाळेत असताना मी उत्तम लेखक होते, काहीतरी लिहावे असे अजूनही वाटते. पण वेळच मिळत नाही. नोकरी करणाऱ्या बायका सर्व आवरून अकरा वाजता कामाला जातात तसे मीही अकरा वाजता सर्व आवरून एक तास तरी लिहावे असे नेहमीच ठरवते पण माझा तो निश्चय कधीच पूर्ण होत नाही.दरवर्षी एक जानेवारीला नवीन वर्षाचा नवा संकल्प म्हणून मी चार ओळी तरी लिहायच्या असे ठरवते. मागच्या वर्षी मी चारोळी लिहिली होती.

नवीन वर्षात मला लेखिका व्हायचे

मनातील भावनांना कोंदण द्यायचे

कोंडमारा सांगून व्यक्त व्हायचे

लिहून लिहून आपण लेखिका व्हायचे

कित्येकदा काही कविता, विनोद हास्यास्पद वाटतात. मला असे वाटते की मी अधिक चांगले लिहू शकते, पण मला वेळच मिळत नाही. “सख्या रे घायाळ मी तरूणी, वेळ आणू कोठूनी?” जीवनाला कलाटणी कशी आणू मी? या घरात मी जिथे बसून निवांत लिहू शकेन अशी जागाच नाही. पसाराच पसारा, तो मी नीट आवरला तरी बाहेर येतो. माझी कार्यपद्धती चांगली आहे पण संध्याकाळचे हे मालिकांचे वेड लागले आहे ना. नशाच समजा. लिहावेसे वाटते पण नंतर वाटते, जगात इतके लोक लिहितात, किती जणांना यश मिळते? उलटपक्षी मजा करायचा, थाटात रहायचा वेळ हे लेखक लोक उगीच कागदाचे बोळे करण्यात आणि खर्डेघाशी करण्यात घालवतात. छानछोकीत रहावे, नटावे मुरडावे हे लेखकांना जमत नाही. मला इतका पेशन्सही नाही. पण मला खात्री आहे मी खूप छान लिहू शकते.

मागच्या एक जानेवारीला एक नवी वही आणली आणि लिहिण्याचा निश्चय केला. २-३ दिवस लिहिले नंतर मैत्रिणीचा फोन आला. ती इतर मैत्रिणींच्या बातम्या देत बसली. चुगल्या चहाड्यांत वेळ गेला. त्यानंतर माझ्या लाडक्या मालिकेची वेळ झाली. मालिकेतच वेळ गेला. एकानंतर एक मालिका चालूच राहिल्या. महिनोन् महिने वर्षानुवर्षे मी टीव्ही बघते आहे. काहीतरी करायचे ठरवते, नेहमी वाटते काहीतरी चुकते आहे. काहीतरी छंद जोपासावा, वाचावे, लिहावे. मी पूर्वी लेखिका होते. मैत्रिणी भेटल्या की नवनवीन आंबट कथा पुढे येतच राहतात. ईंद्राणी मुखर्जी, हेमा उपाध्याय, त्याच चर्चांत वेळ जातो.

जुने वर्ष संपले, आज नवीन वर्ष सुरू होणार. आजपासून काहीतरी करायला हवे. चांगले लिहायला टेबल खुर्ची नवे कागद कशाला हवे? मी तर बसच्या तिकीटाच्या मागे सुद्धा कविता लिहिली होती. तिला बक्षीस मिळाले होते. विनोदी कविता लिहिली म्हणून कौतुक झाले होते.

गेले गरम गरम चहा प्यायला

धरू म्हटले कपाच्या कानाला

कान तुटून हातात आला

अंगावरती चहा सांडला

काय म्हणावे या दैवाला

कपडे धुण्याच्या लागा कामाला

दूरदर्शनने लाखो लोकांचे खूप नुकसान केले. घराघरांची थिएटर्स झाली आहेत. कुणी कुणाशी बोलत नाही. बायकांना घरकाम स्वयंपाकापेक्षा मालिकांत अधिक रस आला आहे.

मज वेड लागले टीव्हीचे

कधी सांगा हे वेड संपायचे?

कागद पेन घेतला स्वयंपाकघराच्या ओट्यावरच वाकून लिहायला सुरूवात केली. बाजूच्या फ्लॅटमधून मालिकांचे खूप जोरात आवाज सुरू झाले. माझे लिहिण्यात लक्ष लागेना. मी कागद बाजूला ठेवून उठले. टीव्ही लावला मालिका बघत बसले. आज सत्तर वर्षांची झाले करू करू म्हणून मी काहीच केले नाही. वेळच मिळत नाही बघा!

******

# ७२ मैत्र जीवाचे

जीवन जगण्यासाठी मानवांमधील मैत्री महत्वाची असते.

ज्ञानेश्वर महाराज पसायदानात म्हणतात.

जे खळांची व्यंकटी सांडो

तया सत्कर्मे रती वाढो

भूत परस्परे पडो मैत्र जीवांचे

पसायदान हि आपली प्रार्थना आहे. मात्र अशा आर्त प्रार्थनेला परमेश्वर उत्तर देतोच असे नाही. खल प्रवृत्तीचे लोक वाकडेपणा सोडत नाहीत. खल खलच राहतात ते हिरो बनत नाहीत. या खल प्रवृत्तीच्या लोकांमुळे चांगल्या माणसांना मात्र खूप त्रास होतो.

त्याचा परिणाम म्हणून अनेक स्त्रिया अनेक अश्विनी जीव गमावून बसतात. प्रश्न हा असतो हि दुष्ट माणसे या मैत्र जिवाचे लावण्याच्या लायकीची असतात का?

Sugar is Sugar

Salt is Salt

If you are womaniser

That is not my fault

असे म्हणून या जखमी स्त्रिया जीवनात पुढे जाऊ शकतात. अवघड असते पण अशक्य नाही. या मुर्खांनी दिलेल्या जखमांपेक्षा खूप अधिक सुखाच्या ह्या स्त्रिया हकदार असतात. पण ...... त्या जीव गमावतात. खल मात्र मजेत राहतात (नवीन सावजासह ) पोलिस रेकॉर्ड मधल्या

आकड्यापेक्षा प्रत्यक्ष आत्महत्या खूप पट अधिक असतात. WHO आत्महत्या प्रतिबंधक दिवस १० सप्टेंबरला करतो. जेव्हा एक आत्महत्या होते तेव्हा मध्ये २० आत्महत्या प्रयत्न करणारे असतात. आत्महत्या करणारे आत्महत्या करण्यापूर्वी मारून जावेसे वाटते, जगण्यात राम नाही, मरण यावे. असे कुणाजवळ तरी व्यक्त होतात. मात्र ज्या व्यक्ती जवळ आत्महत्येचा विचार मांडला जातो ती विचारी नसेल तर

तू मूर्ख आहेस, हरलेल्याचे विचार आहेत तुझे, तू म्हणजे "रोता रहे मेरा दिल आहेस" निगेटिव्ह आहेस असे म्हणून तो विचार सिरीयसली घेत नाही. कारण त्या दोन व्यक्तीत मैत्र जीवाचे नसते. वरवरचे नाते असते. जीवांचे मैत्र होणे, मैत्रीभाव वाढणे हि काळाची गरज आहे.

समुपदेशनाने मैत्रीने, प्रेमाने, सद्भावनेने अनेक आत्महत्या टाळता येतात. आजच्या जलदगती, शिष्ट, तोंड देखल्या, समाज रचनेत दुसऱ्याच्या दुःखाची जाणीव असणारे फार थोडे असतात. नमस्कार म्हणायला काय हरकत आहे? पण लोक तेही टाळतात .

आत्महत्येची कारणे अनेक..

१. नातेसंबंध आणि अपेक्षामुळेच आत्महत्या वाढतात. मित्र, मैत्रिणी, कुटुंब, शाळा, कॉलेज, नोकरीतील सहकारी यांच्यात मैत्र नसते.

२. पती पत्नी संबंध- पत्नीला तुच्छ मानणारा पती पत्नीला एका नैराश्याच्या पोकळीत नेतो. पत्नीने मरावेसे वाटते म्हटले कि तिला प्रेम लावणे सोडा "मर कि, तुला कुणी थांबवलंय" असे म्हणतो. लग्न हे आत्महत्येचे मोठे कारण आहे.

दोन भावंडे असतील तर कुटुंबात एकमेकांना आधार होईल म्हटले जाते. पण आई म्हणते दुसरा मुलगा झाला. भाऊ म्हणतो अ गबाई वैरी आला. अशा रितीने भावंडे मित्र बनू शकत नाही व आत्महत्या भांडणातून होतात.

पण कित्येकदा वाटणी पूर्णपणे अधिकृत झाली तरी असंतोष धुमसत राहतो. ते निवृत्तीची स्वप्ने पाहात होते. त्यांना भारतभर फिरायचे होते. पण ती इच्छा अपूर्ण राहिली. शिकलेला मुलगा अडाणी आई वडिलांचा धंदा वाढवण्या ऐवजी बुडवेल कि काय आईला भीती वाटू लागली. ती भीती निराधार नव्हती. निवृत्ती नंतरचे सत्ता जाणे, घरातले प्रश्न सहन करणे अवघड असते. सेवा निवृत्ती नंतर आत्महत्यांचे प्रमाण खूप आहे.

नोकरी- मनासारखी नोकरी मिळत नाही, नोकरीत त्रास होतो. म्हणून आत्महत्या करणारे खूप आहेत. खरे तर जेवायला फक्त डाळ भाता पुरते पैसे लागतात. पण लोक काय म्हणतील? या लोक लज्जेने आत्महत्या होतात. शेवटी एवढेच लिहिते मित्र भाव वाढवायला हवा.

भूता परस्परे पडो

मैत्र जीवाचे

*********

## ७३नैराश्येचे निळे चांदणे

निळया चांदण्यांचे कोष पसरलेले असतात. निळा रंग निराशेचा असतो. दूर दूर डोंगरमाथ्यावर निळे निळे गार गार पावसाचे घरदार! निराश व्यक्ति त्याला चांदणे समजतात. बाहेर यायचे प्रयत्न करत नाही. शुभसंकेत मिळाले यश येईल असे वाटते पण अचानक भूतकाळातील एखादी आठवण एखादा सॅडबॅक मान वर काढतो. नैराश्य येते. मन अगदी कसे ठेवायचे? मनस्थितीच बदलावी परिस्थिती बदलणे शक्य नाही मी अजूनही तीच आहे, वस्तू चोरीला गेल्यावर रडणारी, खेळणे तुटले म्हणून हताश होणारी! अतंरंग बदललेच नाही. जगरित कळलीच नाही. सामान्यतः मन भटकत राहते. तिन्ही काळांमध्ये त्यामुळे ते अति आनंदी राहू शकत नाही. वळेत काम पूर्ण होत नाही, झोप मोडत राहते. गाडी चालवणे अशक्य होते. आपण पुस्तकी किडा आहोत असे वाटते. सेल्फ टॉक करत 24 तासातील 12 तास मन भरकटत राहते. भूतकाळातून वर्तमानात भटकणारे विचार सांगतात की आपण तिच व्यक्ती आहोत, काळ बदललाय पण आपण तेच आहोत. निराश व्यक्ति आपण विवेकाने विचार करीत नाही. पाण्यातून वर उसळणाऱ्या मासळीप्रमाणे कोणताही विचार मनाच्या पृष्ठभागावर येवू शकतो. निराशा परतून सुद्धा येते असे दीपिका पदुकोन सारखी नटी देखील म्हणते. अति सिनेमा व मालिका बघण्याने मनात विचार रेंगाळत नाहीत. पुस्तके पाठोपाठ वाचत गेल्याने ते मेंदूत शिरत नाही. म्हणून हळूहळू कागद पेन्सिल घेवून मुद्दे टिपावे, लिहिलेले मुद्दे वाचावे फास्ट लाईफमुळेहल्ली निराशेचे प्रमाण वाढले आहे. एका बैठकित पुस्तक संपवू नये. मी पुस्तकी किडा उरलेय का? यशाने समजलेली? मार्कांनी तोलली जाणारी? माझ्यापेक्षा थोडी अधिक दुर्दैवी लोकदेखील असतील की? मनासारखे प्रत्येक वेळी होत नसते, निदान सामान्यांचे तरी! मग ते का? नाती हवी तशी पुढे सरकत नाहीत, प्रियकर कायम प्रेम आणि स्तुति करून सुमने बरसत नसलतो, डिसअपॉईंटमेंट, निराशा, अपेक्षाभंग काही काळाने होतच राहतो. वारंवारच्या अपेक्षाभंगाने निराशा येते, राग येतो. राग जवळच्या व्यक्तीवर काढला जातो. आणि त्याचे दुष्परिणाम

वाढतात. जक्षात वास्तव अपेक्षा हव्या. डोळयाला झापड लावून आपापल्या ताटात जेवा. आपापल्या वाटेने चाला. आयुष्य म्हणजे नफानुकसानीचा हिशोब असतो. कबूल करा उवा नाही त्या तोट्याच्या बावनेत रडायला फार वेळ मला मिळाला नाही. कडु गोड मी मुकाटपणे गिळला. त्यामुळे पुढे ते रिप्लेस होते. निराशेचा रंग निळा असतो. बाय डिफॉल्ट आकाश, पाणी सारेच निळे असते. निळया चांदण्यांच कोष घेवून सारे जणच वावरतात.

******

# ७४चैत्रांगण

चैत्रांगणातील चित्रे, चांदण्यांचे कोष, हिमसागर, प्राजक्ताची फुले अशी विविध पुस्तके अनंत गुणमयीने लिहिली. मी फारसे काहीच केले नाही. काय काय कराचे ही यादी दूर फेकून मी या डोंगरावर येवून बसते. पौंगडावस्थेच्या रोशनीचा अंदाज येतो. मी काही फारशी मोठी लेखिका होवू शकले नाही, खुटूखुटू फिल गुड लिहित राहिले. बाहुलीसारखे नटत राहिले. एक अनुवादाचे काम आले होते पण खूपच अस्वस्थ करणारे होते, नाकारले. या क्षणाला विसरून काय काय कारयेच अशा यादी मी करीत नाही. किल्ल्याच्या टोकावर बसून सूर्यास्त निवांत बघणाऱ्या जवानी दिवानीच्या नाटक नाटिकांसारखी मी निवांत राहिले. शांतपणे या टेकडीवर बसून शांत वाटते. अस्वस्थ करणाऱ्या आठवणी इते आहेत पण या ठिकाणी बरे वाटते. ते का? सुखद वेदना न पुसता येणारा बूतकाळ, मैत्री की अन्य काही? काय काय करायचे या यादीत फक्त दरवर्षी एकदा या डोंगरावर येणे मी ठरवते. पांढऱ्या आकृत्या समोर वाचाव्या तसे ते क्षण नाचतात, रडण्यातले, हसवणे, व्यंगचित्रकला होय! अनंतगुणमयी आठवते. हू वॉन्टस् मॅरेज थहे ुरपींीं चरीीळरसश अशी मी मॉर्डन नाही. पण लग्न नको ही तेज शलाका चमकून जाते. ज्या मुलांना तुम्ही अंगाखांद्यावर खेळवले तो मेला तरी चालेल.

काटे वेचून फुले निवडूनी या

निजगुज गुंपून करू सारी ही सांजवेळ

इन मॅजिक अॅन्ड इन लाईफ देअर इज ओन्ली द प्रेझेन्ट सोमेंन्ट द नाऊ विनोद, चिमटे, भाष्य, संदेश सर्वच गप्पांमधून मिळू शकते.

एका लेखिकेच्या वाक्यासमोर वाचकाने लिहिले होते“हरामी साली” तशी अनंतगुणमयी कथा वाचून सांगितले गेले तर लोक म्हणतात. दुर्दैवी! फक्त दोन मिनिट मी विचार केला सता तर माझी कथा अंतर्नाद कथा झाली नसती. बांगड्या, मेहंदी, कपडे, शृंगार सर्व बाईने

करायचे पुरुषाला आकर्षित करायला, तेच मी केले. मी स्त्री 100% राहिले! मनाविरुद्ध घडलेल्या घटना दाबून ठेवल्या. बदल हा जीवनात हवाच असतो. चैत्रांगणातील चित्रे बघणे व काढणे ही पद्धती त्यामुळेच निघाली आहे.

*******************

# ७५लिंब्याची गोष्ट

असे म्हणतात, प्रत्येकाच्या घरी एक लिंब्या वारत असतो. कडुलिंबासारखा कडवट, वाऱ्याने हलणारा, त्या कडवटपणामुळे माणूस घरात नेहमीच चीडचीड करतो, कडवट वागतो.

जीव हा लिंब्याच्या कडवटपणाला कंटाळून न जातो त्यामुले मग घराबाहेर पडावेसे वाटते. बाहेर पडले, वातावरण बदलले की औरा बदलतो, चालल्याने हालचाल असल्याने, स्वच्छ कपडे घातले गेल्याने थोडे ताजेतवाने वाटते. बाहेर फिरताना माणूस खूष असतो. घरातले प्रस्न, किटकिटी सासू, नवरा, घरकाम मोलकरणींचा त्रास थोडा वेळेसाठी, भूतकाळापासून, नकोसा आठवणींपासूनचे स्वातंत्र्य सर्वात श्रेष्ठ असते. जे काही काळ मिळते, मात्र घरी परत आल्यावर परत कडवटपणा येतो.

स्वतःच्या आयुष्यात आहे त्या परिस्थितीत सुख सोधणे सोप्पे नसते. प्रत्येकाचा आपापला सोक्लिअर असतो. त्यातले सुख दुःख ती व्यक्ति स्वतःच फक्त जाणते.

कटू सत्य आयुष्यातील कडवटपाणा, स्त्री जीवनाची गळचेपी दाखवणारे एका चित्राबद्दल ऐकले होते. त्या चित्रात स्त्रीचा चेहरा सिंहाचा होता. टॅटू होते. पण तोकडेकपडे होते. तसेच स्त्री म्हणजे देह असला तरी स्त्रीने सिंहासारखे व्हायला हवे. कडवटपणाचा हा घरात लिंब्या डोक्यात शिरतो असे म्हणतात. घराच्या दरवाजाजवळ औषधी म्हणून, जे लिंबाचे झाड असते. त्यावर लिंब्या नावाचे भूत राहते. अतृप्त आत्मा राहतो. घरात, बागेत, अंगणात चीड चीड होण्याला हा लिंब्या कारणीभूत असतो, मात्र बाहेर फिरायला जाताना हा लिंब्या माणसाच्या मेंदूतून निघून झाडावर बसतो.

आपण बाहेर फिरतो मजा करतो, रमतो अजिबात चीडचीडत नाही. मात्र बाहेरून घरी शिरलो की मूड जातो. डाफरणे सुरू होते. कारण हा लिंब्या दाराबाहेरच्या लिंब्याच्या

झाडावर बसलेला असतो, तो टुणकण उडी मारून घरात शिरताना परत आपल्या झाडाला उर्फ माणसाला धरतो. त्याच्या डोक्यात शिरतो.

घरात शिरल्यावर चिडायचे नाही, भांडायचे नाही ठरवले तरी भांडण होते. अंधश्रद्धा नाही ही मानसिकता आहे कडवटपणा काही काळ दूर राहतो पण कडवटपणा टाळणे सोप्पे नसते. फार प्रयत्न करावे लागतात. कडवट लिंब्या मजेत राहतो, त्रास मात्र आपल्याला होतो. घर टिकवायचे तर लिंब्याला झाडावरच ठेवायचे.

*****

## ७६सिनेमा

मूक चित्रपटातून बोलक्या चित्रपटाकडे आणि कृष्णधवल चित्रपटाकडून रंगीत चित्रपटाकडे हा चित्रपटाचा प्रवास चित्रपटांना अधिक रंजक करून गेला.

गाणी, स्वप्नांचे सेट्स वेगळ्या कथा व्हॉईस डबिंग, कॉम्प्युटर ग्राफिक्स, यामुळे चित्रपट चटक आकर्षक बनले आहेत. सर्व भाषांमधील चित्रपटसृष्टी जोरातच आहे. त्यातल्या त्याल बॉलीवूड (हिन्दी), हॉलीवुड (इंग्रजी) चित्रपट अधिक धंदा करतात. अधिक गाजतात. प्रेक्षकांना वास्तवातील प्रश्नांपासून दूर नेणे आणि तीन तास मनोरंजन हा एकच हेतू चित्रपट बघण्यात असतो. दिशा बदला म्हणजे दशा बदलेल तसे चित्रपट बघा मूड बदलेल असेही म्हणता येते. ती पात्रे, ती व्यक्तिचित्रण आपल्याला (प्रेक्षकांना) काहीतरी वेगला अनुभव देते काही काळ तरी रमवते. सिनेमाला गेल्यावर आपले चेहरे अंधारात सुद्धा चेहऱ्यावर पडणारा तोकड्या प्रकाशात चमकत असतात. छोट्या मोठ्या गोष्टी देखील त्या छायाप्रकाशात खास इफेक्टस्ने सुंदर दिसतात. आपण जणू त्याच जागेवर पोहोचतो. हे कळल्यामुळेच तर चित्रपटांत परदेशी सुंदर देकाव्याच्या ठिकाणी चित्रीकरण करण्याची फॅशन आता, स्वप्नांचे सत्य होणे, सत्याचे स्वप्न होणे चित्रपटातच कळते. प्रेमभूमीत हे चित्रपट तरुणांना लोटतात. सामान्यांच्या आयुष्यात सुद्धा ग्लॅमरस येतो. पळून जावून लग्न करूयात असे बऱ्याच चित्रपटांत हीरो-हिरॉईन सांगू लागले. घरात पंकासुद्दा नसलेले पुलाखाली झोपणारे लोकही विश्वसुंदऱ्यांच्या मागे झाडांमध्ये, बर्फात, मनाने हिरोबरोबर धावू लागतात नटनट्यांचे कपडे कमी होवू लागले. सिनेमांचे तिकीट मिळण्यासाठी प्रयत्न केले जातात. ते डोअरकिपर पाडतो.

चित्रपटासाठी भेटणाऱ्यांमध्ये नजरभेट करून काही -बाही जमवणारे पुढे होते.
चित्रपटात मध्यंतरानंतर काय होईल, स कुणीही अंदाज लावू शकत नाही. चांगल्याचे वाईट होईल अथवा वाईटाचे चांगले होईल. व्हिलन सुधारतात, भाऊ - भाऊ भेटतात, काही पुन्हा हरवतात, जेवढे झटके, शॉक्स तेवडी सिनेमाची जादa व चर्चा होते.

आपल्या पूर्वग्रहांपासून, भूतकाळापासून पळणे चित्रपट शिकवतो. चित्रपटात प्रेम कसे करावे शिकवले जाते (1973, रंजनीगंधा) आता ब्रेकअप फेस कसा करायचा ते चित्रपट शिकवतो. (2010 ए दिल है मुश्किल) सैय्याजी से आज मैने ब्रेकअप कर लिया. ब्रेकअप रिट्ीक्स असतात. जाडो ब्रेक्रर (2010) ला चित्रपट आला होता. ब्रेकअपचे कोचेस असतात.

मुन्नाभाईने मजा करून घे सांगितले. जिंदगी ना मिले दोबारा (2008) ने सहली करून घ्या सांगितले. हम आपके है कौन (1994) ने लग्नाचे सेलिब्रेशन ची फॅशन आणली. वेगवेगळी प्रकरणे करून आयुष्यात सेटल होणारा हिरो संजू (2018) ने दाखवला. मस्ती 1-2-3, गोलमाल 1-2 हे चलनी नाणे झाले. प्रेम आऊटडेटेड झाले. ऑन लाईन डेटिंग, जलद जीवनशैली (फास्ट लाईफ) मुले प्रेम, लग्न, अफेअर चे चित्रपटापेक्षा टाईमपास चे चित्रपट गाजू लागेल फक्त एसएमएस वर मेंदूत बदल घडवणारे डोपॅमाईन वाढवणारे युग आले. ब्रेकअप झाला, delete करा, नवा ग्रुप जॉईन करा. नवीन मित्रमैत्रिणी शोधा, 24 तासात सपोर्ट फॉर ब्रेकअप असी साईट आहे, मेडिटेशन योगा ने हिलींग करा असो सांगतात ब्रेकअप सुद्धा ईझी केला.

सकारात्मकतेच तर अतिरेकच झालाय. 1972 साली आयुष्यभर रडणारे नट नटी हद्दपार झाले. . दारू सढळ वाहू लागली. गुन्हे, मजा, ब्रेकअप, काऊंसेलिंगने आठवड्यात बरे होणारे मालिकांत दिसू लागले. लिव्ह इन रिलेशनशीप उघड उघड दिसू लागली.

सिनेमा चित्रपटगृहांऐवजी व्हिडीओवर पुढे मोबाईलर, वॅपटॉपवर संगणाकांवर देकील चित्रपट पोहोचला, मॉलमधील मोठमोठ्या पडद्यांपासून मोबाईलवर बघितला जाणाऱ्या नेटफिक्स शोज पर्यंत साईज डज नॉट मॅटर म्हमत चित्रपच मनोरंजन करतोय.

चित्रपटांना उशहीशीलेरपव  असतेया सोजला सेन्सॉर नाही, लोकप्रियता कमी झाली नाही पण सिनेमाने आपला ट्रॅक मात्र बदलला आहे. चित्रपटांच्या थिममध्ये गुन्हेगारी, उपभोगवादी वृत्ती, आकर्षक रचना श्रीमंती आहे. सिनेमा नक्की कुठे चालला आहे.

# ७७अनुवादित साहित्य

दोन भाषा, दोन संस्कृती परस्परांच्या सहवासात आल्यानंतर तौलनिक दृष्टीकोन तयार होतो. ही अपरिहार्य गोष्ट आहे. कारण माणूस अनुकरणशील असतो. दुसऱ्या भाषेत जे उत्तम आहे, अनुकरणीय आहे ते आपल्या भाषेत आणून आपली भाषा व आपले साहित्य समृद्ध करणे ही गोष्ट साहित्यनिर्मितीइतकीच महत्त्वाची आहे. सोळाव्या शतकात इंग्रजी काव्य आणि नाट्य वाङ्मयाला जो बहर आला त्याचे प्रमुख कारण अभिजात ग्रीक व रोमन साहित्याची भाषांतरे इंग्रजीत उपलब्ध झाली हे होते. अनुवाद हा भाषांतराचा प्रकार आहे. तो भाषांतरप्रक्रियेचा घटक आहे. शिवाय तो स्वतंत्र साहित्यप्रकारही मानला जातो. परभाषिकांच्या जीवनाबद्दलची उत्सुकता तो शमवतो.

अनुवादाची व्युत्पत्ती संस्कृतमध्ये आहे. मूळ धातु 'वद' म्हणजे बोलणे किंवा सांगणे आणि 'अनु' हा उपसर्ग त्याचा अर्थ 'मागील' असा आहे. म्हणजेच अनुवादात पुनःकथन केले जाते. उदा. श्रीकृष्णाने जे गीतेत तत्वज्ञान सांगितले तेच तत्वज्ञान नंतर ज्ञानेश्वरांनी भावार्थ दीपिकेत सांगितले म्हणून ज्ञानेश्वरांनी गीतेचा मराठीत अनुवाद केला असे म्हटले जाते.

अनुवादाच्या निमित्ताने येणारे परकीय भाषेतील शब्द आपल्या भाषेला समृद्धच करतात. एतद्देशीयत्वाचा अभिमान असला पाहिजे. पण एतद्देशीयत्व सुदृढ, समृद्ध, प्रगत आणि विकसनशील ठेवण्यासाठी विदेशत्व अव्हेरून चालत नाही. म्हणूनच परभाषेतील साहित्याचे अनुवाद करणे ही सांस्कृतिक गरज आहे.

केवळ दोन भाषांवर प्रभुत्व असले म्हणजे अनुवाद उत्तम होतील असे नाही. कारण ज्या भाषेतून साहित्य अनुवादित करायचे ती भाषा, तिथली माणसे, तिथले भावबंध, सांस्कृतिक रचना या सर्वांचे भान अनुवादकाला ठेवावे लागते. असे भान न ठेवता केलेले अनुवाद कृत्रिम,

तुटक व निरस ठरण्याची शक्यता असते. थोडक्यात अनुवाद ही मर्यादित अर्थाने नवनिर्मिती असते. अनुवादकर्त्याने तिला एक आपलेपण दिलेले असते. मुळाच्या अनुरोधाने कोवळिकेने एका जिवंत, समृद्ध सौंदर्यानुभवाचा प्रत्यय जो आनंद मिळतो, तो खास असतो.

*******

# ७८उपेक्षिता उर्मिला

साहित्य विश्वात, आजपर्यंत रामायण ज्याला जसे भावले त्याने ते तसेच मांडले. लोककला, लोकगीतांमध्ये सीतेवर झालेल्या अन्यायाबद्दल, महीलांनी निषेध केलेला वाचतो, आठवतो. जसे की ही ओवी.

सीतेला सासुरवास झाला बहु बहु, सख्यांना तिने वाटला गहूगहू

राम बाई राम, राम हलक्या दिलाचा

सीतामाई देवी, राम नाही तोलाचा

१९५५ साली भूमिकन्या सीता, नावाचे एक त्या काळी  बंडखोर ठरलेले नाटक नाट्यनिकेतन नावाच्या थिएटरने रंगभूमीवर आणले होते. वाल्मिकी रामायणावर आधारित, लक्ष्मणपत्नी उर्मिलेच्या दृष्टीकोनातून, त्या नाटककारांनी हे नाटक मांडले होते. उपेक्षित स्त्रिया, फक्त गृहकार्य करीतच जगतात. उर्मिलादेवी या सीतेच्या जाऊबाई व लक्ष्मणांच्या पत्नी, ह्या ऊर्मिला मातेला वाल्मिकी रामायणात, फक्त तीनचार ओळी त्यांच्या वर लिहाव्यात एवढेच वजन दिले गेले आहे. उर्मिला माता, लक्ष्मणाला तिला वनवासात सोबत घेऊन जावे,  असा खूप आग्रह करतात.जेव्हा राम लक्ष्मण सीता वनात वनवासाला जातात तेव्हा ऊर्मिला वनवासाची तयारी करते. त्यावेळी लक्ष्मण उत्तर देतो."माझा सर्व वेळ वनवासात श्रीराम व सीतामाता यांचे रक्षण करण्यात जाईल. तू इथेच, अयोध्येत राहून माझ्या तीन आईसाहेबांची, तुझ्या तीन सासूबाईंची, सेवा करावी." पतीपत्नीच्या नात्यात, सासवांप्रतिचे कर्तव्य, जबाबदारी ई भावना, अशा मध्येआल्या. उर्मिलामातेच्या आग्रहाला किंमत न देता लक्ष्मण, उर्मिलामातेला, तिच्या सासूच्या

ताब्यात देऊन, राम व सीता यांच्याबरोबर वनवासात गेले. लज्जा चित्रपटात एका प्रसंगात ऊर्मिला मातेचा ऊल्लेख आहे.

उर्मिला मातेला सुद्धा तसा विचार केला तर हा वनवासच होता. चौदा वर्षे उर्मिलामाता कशी राहिली असेल ?याचा विचार, खेद, दुःख तसे कुणालाच नव्हते. आपले पती दूर देशी गेलेली उर्मिला या काळात परित्यक्ताच ठरत नाही का? कधी मला बऱ्याचदा उर्मिलेची ही चौदा वर्षांची एकाकी झुंज, अस्वस्थ करते. लक्ष्मणाची व उर्मिलेची कुचंबणा श्रीरामांना कशी कळली नाही? की ते देखील नाईलाजी होते.

रवींद्रनाथ टागोरांनी त्यांच्या, उपेक्षिता नावाने लिहिलेले लेखात उर्मिला व तिची भावना व्यक्त केली आहे. मैथिलीशरण गुप्त या लेखकांनी उर्मिलेच्या नजरेतून, खास रामकथा सांगितली आहे. त्या खंडकाव्याचे नाव त्यांनी साकेत असे दिले आहे. पण त्यात सुद्धा, मला वाटतं, उर्मिलेच्या त्यागाला न्याय मिळाला आहे, पण पुरेसा नाही .

रामायण हे श्री रामांना देवत्व देते.प्रेम संस्कार, या हेतूने लिहिले जाते. पण पुरूषप्रधान जगात उर्मिलेचा उल्लेख का टाळला जातो. रावणाने केलेल्या सीताहरणानंतर व वनवासानंतर, सीतेला जेव्हा अग्निपरीक्षा देण्यास सांगण्यात आले, त्या वेळी उर्मिलेने विरोध व्यक्त केला होता. सीतेवरच्या अन्यायात, तिला स्त्रीजातीचेच दुःख दिसले असावे. पुढे गर्भवती सीतामाता वाल्मिकींच्या आश्रमात बारा वर्षे राहिल्या. वाल्मिकींनी या काळात रामायणाचा पहिला भाग रचला. रामदरबारात लव कुशांनी रामायण गायले. श्रीरामांना त्याचा आनंद झाला पण......

श्रीराम प्रभू ऐकती,

कुश लव रामायण गाती

या गीतावर, श्रीरामांची प्रतिक्रिया जाणण्यासाठी, वाल्मिकी यावेळी श्रीरामाच्या राजवाड्यात प्रवेश करतात. त्यांना वाटते श्रेष्ठ प्रभू श्रीरामचंद्र आता सीतेला स्वीकारतील. पण श्रीराम पुन्हा सीता मातेची, परीक्षा घेण्याची गोष्ट करतात. यावेळी उर्मिला माता म्हणते (उघडपणे नाही पण अव्यक्तपणे म्हणते) “केवळ स्त्रीच्या चारित्र्याचा का संशय घेतला जातो?” रामायणातील, अव्यक्तपणे वावरलेली उर्मिला, अशी स्पष्टपणे व्यक्त होते. प्रभू श्रीरामचंद्रांची धर्मपत्नी सीतामाता पुन्हा परीक्षा देण्याऐवजी भूमीच्या उदरात सामावते.

ही कथा रामकथा, सीताकथा, उर्मिलाकथा आपणास ज्ञात आहे.पण ऊर्मिला मातेची कथा कुणीही कधीही चित्रपटरूपाने, नाट्यरूपाने पुढे मांडली नाही. प्रायोगिकसुद्धा नाही. भूमिकन्या सीता, हे नाटक देखील, डब्यातच राहिले. कारण त्या नाटकाला उपेक्षा लाभली.

उपेक्षिता उर्मिला, उपेक्षिता सीता, स्त्री ही रामायणकाळापासूनच उपेक्षिताच राहिली. १९५५ साली लिहिलेले भूमिकन्या सीता हे नाटक आजपर्यंत २०१५ सालापर्यंत साठ वर्षे एकदाही एकाही धैर्यवानाने पुन्हा ते नाटक रंगभूमीवर आणण्याचा प्रयत्न केला नाही. एकूणच स्त्रीजीवनाची, सर्व कन्यांची ही उपेक्षाच आहे. भूमीकन्यांची आणि मानवकन्यांची देखील! स्त्रीचे जीवन बंदिनीचेच असते. ती दैवाधीनच असते. श्रीरामजन्म आपण साजरा करतो. जर सीतामातेच्या व उर्मिलादेवीच्या जन्मदिवशी आपण उत्सव करू तेव्हा, आपण स्त्रीजन्माचे स्वागत करण्यास खऱ्या अर्थाने तयार होऊ.

स्त्रीजन्म नाकारणाऱ्या या आपल्या देशात उपेक्षिता स्त्रीबद्दल लिहिणेसुद्धा जणूकाही बंडखोरी ठरते.

मी सहज म्हणून ऐकले होते, ते लिहिले, वाटल्यास माझ्या या लेखाची उपेक्षाच करावी.

# ७९नको माघाची थंडी

कधी नव्हे ते, या वर्षी, थंडीने सर्व जगच गारठले आहे. “थंडीचा फुलला काटा” म्हणत आपण बसून राहतो आणि ऋतूचक्रातील या सर्वोत्तम मासाचा, माघ मासाचा रागराग करतो.. महाशिवरात्र, माघी चतुर्थी हे उत्सव असणारा माघ का आवडत नाही?..

कौन कहता है जो जितता है, वही सिकंदर है, सच तो यह है, मौसम इन्सान के अंदर है

हार जीत अलग अलग नही, एक समुंदर है।, धूप-छाँव, जाडा-गर्मी, सब निरंतर है।।

“माघाची थंडी, माघाची थंडी” म्हणून आपण अंग आकसून घेतो. खूप पाऊस आला की छत्रीत स्वतःला झाकतो. मात्र रिमझिम झरणारा तो तो श्रावण सर्वांनाच आवडतो. “समुद्रबिलोरी ऐना, पृथ्वी ला, पाचवा महिना” असा रम्य शृंगार केलेली पृथ्वी श्रावणात गर्भवती भासते, सहज आवडते. मात्र फक्त श्रावणच महिना १२ महिने कसा असेल ? बाकी अकरा महिन्यांना सुद्धा ऋतूचक्रात महत्त्वाचे स्थान आहे. आनंद, खुषी, ऋतु त, वर्षाऋतूतच थोडीच असतो, श्रावण तर मनात असतो, जनात असतो. आनंद ही वृत्ती असते, श्रावण ही प्रवृत्ती असते. त्यामुळे माघ महिना आला, म्हणून खट्टू व्हायचे नाही. हिरवा शालू नेसून सजलेली श्रावण सरीतली हिरवी पृथ्वी नेहमीच तशी कशी दिसणार? कदाचित जर तसे झाले तर ईतर महीन्याचे, अन्य कुणाचे कौतुक ‘ते’ काय राहणार? निसर्ग कूस पालटत राहतो, ऋतुबदल होतच राहतो.

पानगळीचा माघ वर्षातून एकदा तरी येतोच.सोसावा लागला तर सोसायचे.

कधी शिशिर कधी बहर दोन्ही एक परंतु

डोळयामधले आसू पुसती ओठांवरचे गाणे

वसंत ऋतुइतकीच अन्य ऋतूंमधली लोकगीतेसुद्धा आपले डोळयात अश्रू आणतात. माणूस काय फक्त ग्रीष्मातच होरपळतो असे थोडेच आहे ? होरपळ कधीही होऊ शकते व मलमपट्टीही कधीही होते. ऋतूंचा तसा खास, हातभार,  संदर्भ नाही, तर मनाचा आहे. सुंदर चित्र साध्या कॅनव्हासवर सुद्धा छान दिसते. सुंदर सोनेरी फ्रेममध्ये, ते अधिक आकर्षक दिसते. निसर्ग नेहमीच सुंदर असतो, त्याच्या भाषेत बोलतो, त्याची गाणी गातो .पृथ्वीवर, ऋतूचक्र अव्याहतपणे फिरत राहते, कुणासाठी थांबत नाही.

जीवनाचे चक्र असे फिरे बाळा, हिवाळा उन्हाळा पुन्हा पावसाळा।

माघाच्या थंडीला घाबरू नका. श्रावण मनात ठेवा. मन हिरवेगार होऊ द्या.

सहा ऋतूंचे सान सोहळे त्यातच भान हरावे।

माघाच्या थंडीत, श्रावणाचे स्वप्न पहावे।

उबदार दुलईतून सूर्यनारायणाला पुजावे.

*****

## ८० क्या हाल है क्या दिखा रही हो

तुम इतना जो मुस्कुरा रही हो क्या गम है जिसको छुपा रही हो।।

आँखो में नमी, हँसी लबों पर, क्या हाल है क्या बता रही हो

बन जाएंगे जहर पिते पिते, ये अश्क जो पिती जा रही हो ।।१।।

जिन जखमों को वक्त भर चला है, तुम क्यों उन्हे छेडी जा रही हो

रेखाओं का खेल है मुकद्दर, रेखाओं से मात खा रही हो ।।२।।

क्या ग़म है जिसको छुपा रही हो ?

गायक – जगजीत सिंह, चित्रपट – अर्थ १९८२, गीतकार – अर्थ

खोकर भी जो पाएँ, उसे मुहब्बत कहते है, पाकर भी जो सूर खोएँ, उन्हे गजल कहते है।अशा अर्थाची ही गजल आहे.त्यावेळी, प्रेमभंगाचे नंतर, मी हसून वेळ मारून नेली, मला वाईट वाटल्याचे मी दाखवलेच नाही, असे आपण म्हटले तरीही, मनाचा तो दुखरा कोपरा स्वतःच्या पासून लपवू पाहूनही, लपत नसतो. त्या जखमेवरची खपली काढायला अनेकजण उत्सुक असतात. कधी कधी तर अजाणता, ती खपली निघते व जखम भळाभळा वाहू लागते. छोट्या छोट्या विनोदाला, खळखळून हसलो, स्वतःच्या देहाला वरवर सजवले, तरीही आत जी परिस्थिती आहे, ती काळजातील कळ व तो हाल, ते हाल आपल्यालाच माहित असतो, असतात. कधी कधी तर आपल्याच हातून, चुकून धक्का बसला की, ती जखम चिघळते.

दुःखे किती प्रकारची असतातः जवळच्या व्यक्तीचा मृत्यू, फसवणूक, पैशांची लुबाडणूक, अपमान, नोकरीत छळ, असुरक्षितता, शारीरिक आणि मानसिक आजार, ज्यामुळे, जखमाच होतात.

जिन जखमों को वक्त भर चला है, तुम क्यों उन्हे छेडी जा रही हो।

जुन्या गोष्टी विसरून जा, तो विषय पुन्हा काढायचा नाही, असा सज्जड दम आपण इतरांना सहज देतो, पण अजून अशी औषधाची गोळी निघाली नाही आहे, जी भूतकाळ पुसते. आयुष्याच्या स्टॉक मार्केटमध्ये, आठवणीचे शेअर्स  उरतात.

“ दिल जलता है तो जलने दो किंवा बाबूल मोरा नैहर छुटो जाय”

असे म्हणून रडत केविलवाणे होऊन हातातून सुटलेल्या संधीकडे, बघण्यापलीकडे काही म्हणजे काहीच हातात नसते. स्वार्थी दुनिया मजेत असते. आपल्या त्या अगतिकतेशी, दुनियेला काहीही सोयरसुतक नसते, आधुनिक आव्हानाचा स्वीकार करणे ही नक्की कोणाची गरज असते?की तुमची मजबूरी असते.

अपयशाने ठेच खाऊन पडल्यावर, जो स्वतःला सांभाळून उठतो, खरचटलेल्या पावलांनी पुढे जातो, तो श्रेष्ठ असे म्हटले जाते. पण कधी अपयशानंतर वाटते, काहीच करू नये, नुसते बसून रहावे. खूप खूप सूर्यप्रकाशानंतर, थंड सावली बरी वाटते. तसेच असते. सूर्यप्रकाश, त्याची तीव्रता सहन होत नसते. पारिजातकाच्या फुलासारखे, अंधारानंतरच उमलावे व पुन्हा दिवस उगवण्यापूर्वी मिटून जावे अशीच इच्छा होते.

नवनवीन गोष्टींची, स्वप्नांची इच्छा होतच नाही. काही काळ, लो-प्रोफाईल बरा वाटतो. दिवस-रात्रीची जशी तुलना होऊ शकत नाही तशीच यश-अपयशाची नाही, थोडेसे अपयशसुद्धा हवे म्हणतात.

कोई भी इन्सान छोटा नही होता, कोई भी चुनौती बडी नही होती

पण अपयश माणसाला खचवते. जीवनात, रजतछत्रीसारखी रेशमी गोंडे लावलेले, सत्काराची झूल घातलेले, रेशीमलडी, सळसळत्या तृणपात्यांसारखे रेशमी यश हुलकावणी देते. अर्थ हा चित्रपट तसा धाडसीच होता. परस्त्रीसाठी तेव्हा पती, पत्नीला वाऱ्यावर सोडतो. इंतजार, आशा, वाट पाहणे, आधार शोधणे, अवघड प्रश्न सोडवण्याची केविलवाणी धडपड, यांत तिचा वाया जाणारा काळ, तिला व्यथित करतो. दिवस येतात, जातात, ऋतू बदलतात पण आतली पडझड तशीच राहते. ती दुरूस्त करायला इतर कुणी येणार नसते. काळ हे फार मोठे औषध आहे असे म्हणतात कारण काळ गेल्यावर तो विषय मागे पडतो. जे हरवले ते हृदयाशी घट्ट धरून, आपण बदलतो किंवा नवीन घावामुळे, जुना घाव, फारसा त्रासदायक वाटत नाही.

“अर्थ” या चित्रपटातील हे गाणे म्हणजे गजल वरकरणी आशादायक आहे. मात्र अशी दुसऱ्याच्या दुःखाची जाणीव असणारे, गीतकार सुद्धा पुढच्या पिढीत उरले नाहीत. या गाण्यातील नट, राजकिरण मनोरोगावर परदेशात उपचार घेत होता. नटी शबाना आझमी, उतरत्या वयाच्या उंबरठ्यावर उभी आहे. स्मिता पाटील तर काळाच्या पडद्याआड गेली आहे. उरल्या आहेत त्या फक्त आठवणींच्या रेषाच!

रेखाओं का खेल है मुकद्दर, रेखाओं से क्यों मात खा रही हो, क्या ग़म है जिसको छुपा रही हो।।

******

## ८१आज जाने की जिद ना करो

प्रियकर-प्रेयसी, मित्र मैत्रिणी किंवा कुणी स्नेही, नातेवाईक, मस्त पैकी, एकत्र गप्पागोष्टी करीत असतात. फोन येतो, काम येते आणि काही कारणाने एका व्यक्तीला, ती साथसोबत सोडून, कधी काही काळासाठी, तर कधी कायमचे जावे लागते. बरेच अनुनय विनय करून सहकारी, जाणार्यिला थांबवायचा प्रयत्न करतात.असे वर्णन करणारी, बरीच हिन्दी गाणी आहेत. आज जाने की जिद ना करो। किंवा

तुमने किसीकी जान को जाते हुएँ देखा है

वो देखो मुझसे रूठकर मेरी जान जा रही है।

मन भरले नाही म्हणून जाऊ नको म्हणणारे पुढले गाणे ही आहेच.ते-

अच्छा तो हम चलते है-आन मिलो सजना.

अभी ना जाओ छोडकर के दिल अभी भरा नही – हम दोनों किंवा

जाने दो ना, पास आओ ना, - सागर

अगदी मोहाच्या क्षणी “जाने दो ना” म्हणणारी प्रेयसी अगतिक असते, तर कधी प्रेयसीचे गाव सोडून जाणारा मजनू गातो,

“तेरी दुनिया से होके मजबूर चला मैं बहुत दूर, ” किंवा

“जिस गली में तेरा घर न हो बालमा, उस गली से हमे तो गुजरना नही” म्हणणारा प्रियकर पुढे म्हणतो, “कहीं चल न जाना छोडकर, मेरे हमसफर” किंवा “हम छोड़ चले है महफिल को, याद आएँ कभी तो मत रोना।” असा निरोप  घेतो. कधी अनुनय करताना सुद्धा मनात

अनामिक भीती असते, ह्या नात्यातून ती व्यक्ती कधीही निघून जाईल, आपल्याला तुझ्या वाटेने जा म्हणेल,

“मुझे जा न कहो मेरी जान।”,

“चले जाना नही नैन मिला के, सैया बेदर्दी।”

आपल्याला एकटे सोडून ती/तो जाईल या भीतीने मन काजळते.

“इन लंबी अकेली राहों में, हमें अकेला छोड न जाना!” तरीही जावे लागते.

“ले जा जानेवाले दुआएँ, मेरे दिलकी किसीसे क्या गिला।

तेरी ही ख़ता है, न मेरी ही ख़ता है जो होना था हुआ।” कधी

“दिल तोडके जानेवाले, तुझे दिल ढूँढ रहा है- “

असा शोधसुद्धा पुढे सुरू होतो, शोधक तो, तो मृत्यूपर्यंत चालू राहतो!

दुनियासे जानेवाले जाने चले जाते है कहाँ?, कैसे ढूँढे कोई उनको नहीं कदमों के भी निशान।

अशी अगतिकताही दिसते. कोणताही जातानाचा, निरोपाचा क्षण, शेवटची भेट ठरण्याची भीती वाटते.

“जानेवाले कभी नही आते, जानेवाले की याद आती है।” कोणा एका व्यक्तीचे एकूणच काय, थोड्या काळासाठी असो किंवा दीर्घ काळासाठी असो, दूर निघून जाणे हे नेहमीच दुखःदायक ठरते. पुढची जुदाई टाळण्यासाठी

“चार दिनोका मेल हो रब्बा, बडी लंबी जु‍ुदाई “---म्हणूनच तर गजलमध्ये, शीर्षकातच म्हटले आहे जाने की जिद ना करो। जाणाऱ्याला अडवता येत नाही.

वेळ येताच जावे लागते पण आज जिद्द नको.ऊद्या जा, जो ऊद्या कधीच येणार नाही.

थोडक्यात काय तर, जाऊ नकोस.

*****

## ८3प्रेम म्हणजे काय असते?

मेरी मुहब्बत जवाँ रही है, सदा सही है सदा रहेगी।।

असे लोकप्रिय गीत आहे. कुणी सांगा प्रेम म्हणजे काय असते? पाऊल न वाजवता ते कुठून येते?

ये आग दिल मे लगी हुई है

हमारे मंजिल की रौशनी है।

असे म्हणत त्या प्रेमाच्या पोटी माणूस धावत सुटतो. ते प्रेम म्हणजे कुटुंबाचे असते किंवा अन्य असते, असू शकते.

तुम्हारे चरणों में गर मरेंगे, तो मौत कितनी हसीन होगी

मरणाहूनही प्रिय असे प्रेम हल्लीच्या कलियुगात तरी बघायला मिळत नाही. व्यवहार, थातुर-मातुर करणी, वरवरची नाती, खोटे हसणे, दुभंग व्यक्तिमत्वे, प्रेमाची खरेदी मॉलमध्ये करावी तसे ते व्यवहार प्रेम शब्द सवंग, लोकप्रिय, स्वस्त झाला आहे. काही गाणी, उर्दू शायरी ऐकली की प्रेमाच्या वेदनेचा आविष्कार या गाण्यात बघायला मिळतो. त्या नात्याला वेगळे परिमाण देण्याची आर्तता त्या गाण्यात आहे. नाते कसे आहे त्यावर कुठल्यातरी ध्येयाने वेडे झाल्याशिवाय त्या ध्येयापर्यंत पोहोचण्याची ती पायवाट सापडत नाही. त्या तीव्र इच्छेच्या आगीच्या प्रकाशातच भविष्याची पाऊलवाट दिसते. जेव्हा बोलून सांगून डोळे उघडत नसतात तेव्हा कधी आपण चिडतो, “जाऊ देत!” तुमच्याशी बोलण्यात काही अर्थ नाही. तुम्ही समंजस असाल, कधीतरी हात पोळून व विवेक वापरून वागत असाल तर ठीक आहे, अन्यथा मला दगडावर डोके आपटायचे नाही. म्हणून आपण वाट बदलतो. कुणीतरी हात देऊन त्या प्रेमाच्या खड्ड्यातून बाहेर ओढून काढते. आपण वैतागून म्हणतो “हा फाशी देणारा क्रूर जल्लाद माझ्या

नशिबी आला!” त्या नात्यातून सुटल्यावर वाटते बरे झाले सुटलो एकदाचे! Thank god it is over! प्रेमाची चटणी प्रेमाची भाकर पासून आपण प्रेमाच्या बाजारापर्यंत आलो आहोत. कधी मात्र या कवीचे प्रेम वेगळेच आहे असे वाटते.

तुम्हारे चरणो में अगर मरेंगे

तो मौत कितनी हसीन होगी।

आपण प्रेम करण्यात काय, प्रेम समजण्यात सुद्धा कमी पडतो असे हल्ली वाटू लागले आहे. व्हॅलेंटाईन डेचे कोट्यावधीचे मार्केट बघता काही दिवसांनी प्रेमाचा शेयर बाजार होऊ शकतो. ---- सांगा प्रेम म्हणजे काय असते?

******&*******

## ८४मला विसरून जा

श्रोते, नवीन नट, गायक, नृत्यदिग्दर्शक आले की जुने विसरतात.

आँसू भरी है ये जीवन की राहें

कोई उन से कह दे हमे भूल जाएँ।। धृ।।

वादे भुला दे कसम तोड़ दे वो

हालत पे अपनी हमे छोड़ दे वो

ऐसे जहाँ से क्यों हम दिल लगाएँ ।१।

बरबादीयों की अजब दास्ताँ हूँ

शबनम जो रो दे, मैं वो आसमाँ हूँ

तुम्हे घर मुबारक, हमें अपनी आहे

कोई उन से कह दे हमें भूल जाएँ ।२।

चित्रपट – परवरिश गायक – मुकेश

स्वर्गीय मुकेश यांची पुण्यतिथी ऑगस्ट महिन्यात येते. आकाशाच्याच डोळयाला अश्रूंच्या धारा लागलेल्या असतात. दर्दभऱ्या गाण्यांसाठी प्रसिद्ध असलेले सुप्रसिद्ध गायक मुकेश यांचेच हे वरील गाणे त्यांच्या दर्दभऱ्या मंद स्वरांमुळे खूप गाजले.

किंचित अनुनासिक आवाज हे मुकेश यांचे वैशिष्ट्य होते. नितीन मुकेश या मुकेश यांच्या पुत्राच्या गळयात सुद्धा गाणे होते, स्वर होते, व भाव होते. काळ बदलला आणि तशी

दर्दभरी गाणी तयार होणेच बंद झाले. २२ जुलै १९२३ ला जन्म, व २३ ऑगस्ट १९७६ ला मृत्यू अशी अल्पकाळ मुकेश यांची कारकीर्द हा हिंदी चित्रपटगीतांचा सुवर्णकाळ होता. मुकेश यांनी एकूण हजारो गाणी गायली. त्यांची अनेक गाणी ही त्या गाण्यांमधील वेदनेसाठीच प्रसिद्ध आहेत. त्यांच्याच एका दुसऱ्या गीतात त्यांनी म्हटल्याप्रमाणे,

एक दिन बिक जाएगा माटी के मोल

जग में रह जाएंगे प्यारे तरे बोल।।

स्वर्गवासी मुकेश यांनी विसरणे कसे शक्य आहे? एकेक जण स्वर्गवासी झाले. “कोई उन से कह दे हमें भूल जाएँ” सांगणे सोपे असते ऐकणेही तसे अवघड नसते पण विसरणे अशक्य असते.

स्वर्गवासी मुकेश यांना त्यांच्या स्मृतीदिनाबद्दल श्रद्धांजली। नवीन वर्षी नवीन गायक, नवीन नट येतात. काही काळ चमकतात. पण आज ७५ वर्षांनंतर सुद्धा श्रोत्यांच्या हृदयावर अधिराज्य करणारा मुकेश एखादाच असतो. गायकीचे ज्ञान व सुंदर आवाज यामुळे अजून तरी त्यांची जागा कुणीही घेतली नाही.

*****

## ८४ वेळ मिळत नाही, नाट्यछटा-

किती काम हे!सारखे हेच दिवसभर करायचे? वेळच मिळत नाही. बाईची जात स्वयंपाकपाणी, कपडे धुणे... कंटाळा येतो. शाळेत असताना, मी उत्तम लेखक होते, काहीतरी लिहावे, असे अजूनही वाटते. पण वेळच मिळत नाही. नोकरी करणाऱ्या बायका, सर्व घरकाम आवरून, अकरा वाजता, कामाला जातात .तसे मीही अकरा वाजता सर्व आवरून, एक तास तरी लिहावे, असे नेहमीच ठरवते पण माझा तो निश्चय, कधीच पूर्ण होत नाही.

दरवर्षी, एक जानेवारीला नवीन वर्षाचा नवा संकल्प म्हणून, मी चार ओळी तरी लिहायच्या, असे ठरवते. मागच्या वर्षी मी चारोळी लिहिली होती.

नवीन वर्षात मला लेखिका व्हायचे

मनातील भावनांना कोंदण द्यायचे

कोंडमारा सांगून व्यक्त व्हायचे

काहीतरी लिहून आपण लेखिका व्हायचे

कित्येकदा काही कविता, विनोद हास्यास्पद वाटतात. मला असे वाटते की मी अधिक चांगले लिहू शकते, पण मला वेळच मिळत नाही.

“सख्या रे घायाळ मी तरूणी, वेळ आणू कोठूनी?”

जीवनाला कलाटणी कशी आणू मी?

या घरात मी जिथे बसून निवांत लिहू शकेन, अशी जागाच नाही. पसाराच पसारा, तो मी नीट आवरला, तरी बाहेर येतो. माझी कार्यपद्धती चांगली आहे पण संध्याकाळचे हे मालिकांचे वेड लागले आहे ना. नशाच समजा. लिहावेसे वाटते, पण नंतर वाटते, जगात इतके

लोक लिहितात, किती जणांना यश मिळते? उलटपक्षी मजा करावी, आराम करायचा. थाटात रहायचा वेळ, हे लेखक लोक उगीच कागदाचे बोळे करण्यात आणि मानमोडक खर्डेघाशी करण्यात घालवतात. छानछोकीत रहावे, नटावे मुरडावे हे या लेखकांना जमत नाही. मला इतका लिखाणाचा पेशन्सही नाही. पण मला खात्री आहे मी खूप छान लिहू शकते.

मागच्या एक जानेवारीला एक नवी वही आणली आणि लिहिण्याचा निश्चय केला. २-३ दिवस लिहिले, नंतर मैत्रिणीचा फोन आला. ती इतर मैत्रिणींच्या बातम्या देत बसली. चुगल्या चहाड्यांत वेळ गेला. त्यानंतर माझ्या लाडक्या मालिकेची वेळ झाली. मालिकेतच वेळ गेला. एकानंतर एक मालिका, दहा वाजेपर्यंत चालूच राहिल्या. महिनोन् महिने, वर्षानुवर्षे मी टीव्ही बघते आहे. काहीतरी करायचे ठरवते, नेहमी वाटते, काहीतरी चुकते आहे. काहीतरी छंद जोपासावा, वाचावे, लिहावे. मी पूर्वी लेखिका होते. मैत्रिणी भेटल्या की नवनवीन आंबट कथा, गॉसीप पुढे येतच राहतात. ईंद्राणी मुखर्जी, हेमा उपाध्याय, खून, ई. त्याच चर्चांत वेळ जातो.

जुने वर्ष संपले, आज नवीन वर्ष सुरू होणार. आजपासून काहीतरी करायला हवे. चांगले लिहायला टेबल, खुर्ची, नवे कागद कशाला हवे? मी फार पूर्वी, तर बसच्या तिकीटाच्या मागे सुद्धा कविता लिहिली होती. तिला बक्षीस मिळाले होते. विनोदी कविता लिहिली म्हणून कौतुक झाले होते.

गेले गरम गरम चहा प्यायला, धरू म्हटले कपाच्या कानाला

कान तुटून हातात आला, अंगावरती चहा सांडला

काय म्हणावे या दैवाला, कपडे धुण्याच्या लागा कामाला

दूरदर्शनने, लाखो लोकांचे खूप नुकसान केले. घराघरांची थिएटर्स झाली आहेत. कुणी कुणाशी बोलत नाही. बायकांना, घरकाम स्वयंपाकापेक्षा, मालिकांत अधिक रस आला आहे.मज वेड लागले टीव्हीचे, कधी सांगा हे वेड संपायचे? कागद पेन घेतला, स्वयंपाकघराच्या

ओट्यावरच वाकून लिहायला सुरूवात केली. बाजूच्या फ्लॅटमधून मालिकांचे खूप जोरात आवाज सुरू झाले. माझे लिहिण्यात लक्ष लागेना. मी कागद बाजूला ठेवून उठले. टीव्ही लावला, मालिका बघत बसले. आज साठ वर्षांची झाले मी, करू करू म्हणून मी काहीच केले नाही. वेळच मिळत नाही बघा!

****

# ८५माझी नोकरी

"सकाळी सकाळी ही जाते कुठे?" अशा नजरेने लोक जेव्हा नोकरी करणाऱ्या स्त्रीकडे बघायचे, तेव्हापासून आज 3३ वर्षे मी नोकरी करते आहे. कायम सरकारी नोकरी करणाऱ्या, पांढरपेशा, मध्यमवर्गीय, नोकरदारांमध्ये मी मोडते. पण महाराष्ट्र टाईम्समध्ये जेव्हा प्रश्न विचारला, की कोणते तरी विधायक कार्य तुम्ही कधीतरी केले का? तेव्हा मला जाणवले आयुष्याची वर्षे अशीच वाया निघून गेली. जगात प्रत्येकाला 'मदर टेरेसा' होता येत नाही, 'तहलका' सारखे भांडाफोडीचे कार्य करता येत नाही, 'बाबा आमटे' सारखी समाजसेवा करता येत नाही. आम्ही विधायक कार्य काय करणार? पण आपल्याला दिलेल्या कामाचा, खारीचा वाटा उचलून, मुलांवर चांगले संस्कार करून, आपल्या बुद्धीचा सदुपयोग करून, मी एक सुयोग्य अशी कर्मचारी बनण्याचा प्रयत्न नोकरीत केला हेच माझे विधायक कार्य आहे.

१) नोकरीत सेवाश्रेष्ठता – नोकरीच्या ठिकाणी उत्तम ग्राहकसेवा देणे, हा माझा नेहमीचा मंत्र आहे. पेन्शनर्स, वृद्ध, अपंगांना, गरोदर स्त्रियांना त्रास होऊ नये म्हणून, मी प्रयत्न करते. शक्यतो वातावरण शांत रहावे म्हणून संयम बाळगते.साधारण कार्यालयीन कार्यक्रम – वाचनाची आवड असल्याने, मी गप्पा-गॉसिपमध्ये नसते. पण बदली होऊन जाण्याऱ्या कर्मचाऱ्याला निरोप देण्याचा समारंभ, श्रद्धांजली सभा, हळदी कुंकू, सत्यनारायण पूजा आयोजन अशा साध्या कार्यक्रमांमध्ये मी भाग घेते.

२) पत्रकारिता अभ्यासक्रम – १९९९ साली मराठी पत्रलेखक व पत्रकार संघातर्फे चालविला जाणारा पत्रकारितेचा अभ्यासक्रम मी पूर्ण केला. त्यात मला सुवर्ण पदक मिळाले.

३) सामाजिक बांधिलकी – घर, नोकरी, मुले ह्यांच्यात, मी पूर्णपणे थकून जाते पण काही घटनांमुळे जीवनात, नोकरीत एक अस्वस्थता जाणवू लागली व "समाजातील दुबळया घटकाचा आवाज" अशी पत्रकाराची व्याख्या करून मी "जयबाला आशर" (रेल्वेत गर्दुल्याशी लढून

जखमी झालेली मुलगी) या विषयावर प्रथम लिहिले व नंतर मी कर्मचाऱ्यांचे प्रश्न, मनोरूग्णालय, मलेरिया, निराशा, अशा विषयांवर लिहायला सुरूवात केली. आज मी समाधानी आहे. माझे लिखाण जाळे, मध्य, पश्चिम रेल्वे, हार्बर लाईनपर्यंत पसरले आहे.वडाळा शाखेत, तसे झोपडपट्टीत डोकावून मन उदासही झाले. ठाणे रेलवे स्टेशनवर, रोज लावून ठेवलेली शव, मृतदेह (अपघातग्रस्त प्रवाशांची), नोकरदारांची व एकूणच जीवनाची असुरक्षितता व क्षणभंगुरताच दाखवतात. बॉम्बस्फोट, अपघात, रेल्वेस्टेशनवरचे, गाड्यांमधले बलात्कार, बंदच्या बातम्या, वर्तमानपत्र बातम्या, सामाजिक असुरक्षितताच दाखवतात.

४) स्वेच्छानिवृत्ती योजना – काही चांगलेही कर्मचारी सेवानिवृत्ती घेऊन गेले. काहींच्या बाबतीत ती ऐच्छिक होती, तर काहींवर ती परिस्थितीने लादलेली होती. हल्ली, सहजासहजी नोकऱ्या मिळत नाहीत, कित्येक आर्थिक गैरव्यवहार होत असतात, कंपन्या बंद पडतात. माझ्या सहकारी लोकांच्या, ग्राहक व अन्य “कर्मा” बद्दल व “कर्मचारी” शब्दाबद्दलही कधी धाकधूकच वाटते.

६) निराशा – पगारवाढ, बदल्या, बोनस हे कर्मचाऱ्यांचे जिव्हाळयाचे विषय असतात. पण वाळवी लागावी, तशी उदासीनता, निराशा, काही कर्मचाऱ्यांमध्ये आढळते. वरवर कर्मचारी संबंध सुसह्य व हास्यविनोदाचे व स्नेहमय असतात. वरिष्ठही सज्जन व मदत करणारे असतात. पण काहीजणांच्या मनात अन्याय झाल्याची भावना असते. व्यक्त न होणारी निराशा असते. वारंवार “कंटाळा आला” असे शब्द जे ऐकू येतात, ते निराशेचेच व्यक्त रूप आहे.

७) ताणतणावांचे व्यवस्थापन – आस्थापन विभागाने, ताणतणावांचे व्यवस्थापन करण्यासाठी वेगवेगळी प्रशिक्षण कार्यशाळेची शिबिरे भरविली. योगासनांचे प्राथमिक शिक्षण दिले. पण “ताणतणाव” हा सर्व कर्मचाऱ्यांच्या जीवनात, दडून असावा असे वाटते.

८) रूसवेफुगवे – हेवेदावे, रूसवेफुगवे, पाणउतारे करणारे काही कर्मचारी असतात. फक्त आपणच काम करतो, बाकीचे मजा करतात व आपलेच काम चांगले बाकीच्यांचे थातुरमातुर असेही काहींना वाटते. पण तरीही कर्मचाऱ्यांमध्ये एकी असते. एखादी व्यक्ती आवडली नाही, तर तिला पूर्व ग्रह दूषित पणे अबोला घरणे, तिला एकटे पाडणे, असे बुलिंग मी बघितले आहे.

मी एक सामान्य कर्मचारी आहे. मला फारसे कुणी ओळखत देखील नसावे, नाही, मला खास अशी ओळख नाही. दिलेले, नियोजित, पटलेले, आवडलेले असे सर्व काम, प्रामाणिक पणे केले हेच माझे “विधायक कार्य”. बघा तुम्हाला तरी पटते का? माझी नोकरी अशी आहे

**************

## ८६संध्याछाया भिवविती हृदया

सहस्त्रचंद्रदर्शन शांत केल्यावर, एक वृद्ध गृहस्थ, तृप्त नजरेने, नातवंडांच्या सुखी वैभवशाली कुटुंबाकडे बघत होते. मला म्हणाले."मी खरे तर आज मन थकलेला संन्यासी झालो आहे.पण नातवंड माझी मित्र आहेत" काळ बदलला, हातातून निसटला.आजोबा पुढे म्हणाले.

मी नवलाने बघत विचारले, "आजोबा, इतके सुख मिळाले, तरी तुम्हाला असे वाटते?" सर्वत्र पार्टीचा कलकलाट होता, नातेवाईक जमले होते, आजोबा म्हणाले, "प्रत्येकालाच वाटते, दुसरा खूप सुखी आहे, प्रश्न फक्त मलाच आहे. भूतकाळातील फसवणुकीची वेदना व प्रेमाची वेदनेची कळ, किरकोळ, त्रास तसा प्रत्येक हृदयी असते.

So bless me my sweetheart

With smile let us part

When I grew too old to dream

The blessing will live in my heart…"

मी विचारले, "आजोबा, तुमचे आयुष्य मला नेहमी गूढ वाटले. सांगा आजोबा." आजोबा सांगू लागले, "लहान बाळ जसे दात सळसळताना, आईचे हात चालते, दिसेल ते खाते, पाठ चावत राहते, तसे दैव नेहमीच आपला उपयोग करते. रागीट, चतुर जशी पंचिंग बॅग प्रमाणे, आपला राग व्यक्त करायला दुसऱ्या एखाद्या व्यक्तीचा वापर करीत असतो, तसा नेहमीच परमेश्वराचा हातोडा माझ्या डोक्यावरच थोडा का होईना, का पडतो? संसार

Why me? हा प्रश्न मला नेहमीच पडतो. पत्नी वारली पण संसार आठवत राहते. अंगणातील पालापाचोळा पेटवून, अंगण स्वच्छ झाले म्हणून, मनात चमचमता आनंद भरून

घेण्याच्या वयातली, प्रेयसीची, ती सैराट भेट आठवत राहते. बुजगावण्यांची, खोट्या अभिमानाची, विकृत अशा अपमानांची, भीती आता सरत्या वयात राहत नाही.

देह:आगगाडीच्या पळत्या वेगात, हसत पळत्या दिव्यांची मजा बघताना, आता मनात अंधार दाटून आलेला असतो, वयाची तिन्हीसांज झाडांच्या शेंड्यावरून अलगद खाली उतरते. मन थोडे बधीर होते, फडफड करत नाही, उतारवयात डोळ्यांनी नीट दिसत नाही, कानाने कमी ऐकू येते. मात्र काळाची पावले बरोबर दिसतात, कळतात.

काळाची चाहूल लागायला पुस्तकाची पाने, पक्ष्यांचे आवाज, टॅरो कार्ड, हस्तरेषा काहीही चालते. फक्त तो संदेश नीट समजून, अर्थ काढणे जमत नाही. जेव्हा जीवन म्हणजे युद्धभूमी असते, त्या तरूण वयात भांडणांची भीती वाटते, उतारवयात फक्त मृत्यूचीच भीती वाटते. कोपऱ्यावर तो कुठेसा, विडी शिलगावून घाबरवणारा, लबाड मृत्यू, क्रूर नजरेच्या मवाल्यासारखा बाहुल्या सारखा भिववत राहतो. वृध्दत्वाने वेदनेच्या आरोळया संपल्या आहेत पण एक थंड उदासी मागे उरली आहे. भावना

भविष्याची भीती वाटते. संकट येण्याचे असेल तर भविष्य कळून ते बदलत नाही. फक्त माणूस दोनदा खचतो. एकदा कल्पनेने, एकदा खरेच संकट आल्यावर. व दुसऱ्यांदा तर आपण खचलेलेच असतो. बायको असते तेव्हा भांडत राहतो. वाटतेही ती वारल्यावर मुलांकडे राहू, चकचकीत देश पाहू. पण तसे होत नाही. उलट आपण पत्नी वारल्यावर, त्याच रंगहीन घरात गैरसोयीत रहावे लागते.”

मुले:मी विचारले, “आजोबा, मुलांकडे का जात नाही?” मुले सामान आवरत होती. आजोबा म्हणाले,

“मुले वरवरच्या वृत्तीने ‘या’ म्हणतात. त्यात आग्रह नाही व नसतो. बघ आपले आयुष्य आपल्यालाच जगावे लागते.” वृध्दांची तरुणांसाठी असलेली, ती पार्टी संपली आणि ती

सर्व मुले कुटुंबासह, आपापल्या घरी गेली. पार्टीचा पसारा, घरात उष्टे खरकटे, अर्धवट खाल्लेला केक, पसारा पसरला होता. लाईट गेले. आजोबांनी उठून थरथरत्या हाताने दिवा शोधला, पेटवला, पुटपुटले, “थोडक्यात गोडी.”

दिव्याच्या अर्धवट प्रकाशात ते घर मला भेसूर वाटू लागले. आजोबा म्हणाले, “बेटा तू आता जा, जाताना दार लॅच की चे ओढून घे. मी आता विश्रांती घेतो." आता त्या घरातील, पॉश, गुलाबवर्णी, सुवर्णवर्खी फोटोफ्रेमचे रंग, उडाले होते.

तीन बाय सहाच्या पलंगावर, पाय पोटाशी घेऊन आजोबा निजले. मी दरवाजापर्यंत आले, आजोबा काहीतरी हळू आवाजात पुटपुटत होते, मी कान देऊन ऐकले,

“संध्याछाया भिवविती हृदया।”

वृद्धापकाळ सुखाचा जावा म्हणून काय करावे?

मन कठोर व निश्चयी ठेवावे.जीवनाचे नियोजन करावे.मन शांत ठेवावे.आरोग्य खूप खूप जपावे.

बदलता काळ स्वीकारण्याची मानसिकता आपण बाळगली पाहिजे. देह हाच आपला मित्र असतो.  मी दार ओढून बाहेर पडले. जगात वृद्ध प्रत्येकच माणुस प्रत्येक जण होणार असतो. मग तो माणूस तरूणपणी,  वृद्धांशी विचित्र का वागतो?

का?

*****

**********

# ८८बकेटलिस्ट

काय करायचे याच्या बकेटलिस्ट असतात, या बकेटलिस्ट मध्ये गाणी ऐकणे असु शकते.हिन्दी  गाणी व मन यांचा संबंध असतो. लाडकी हिन्दी गाणी “अल्ला तेरे नाम ईश्वर तेरे नाम’ हम दोनों, ही अमरप्रेम, जीवनाचे माणुसकीचे तत्त्वज्ञान सांगतात.

कुछ तो लोग कहेंगे, लोगोंका काम है कहना’ या विचाराने व्यक्ति लोकांना दोष देत नाही. मात्र देवावर मात्र व्यथित व्यक्तींचा राग असतो. मात्र असे कोणतेही निसर्ग नियम नाहीत, न्यायालय नाही, जिथे न्याय होतो, अन्याय या जगाचा नियम आहे. तरुणांना सण बोअर, पकवणारे वाटतात, पण सणाची गाणी ऐकायला, थोडे फार नृत्य करायला आवडते. तरुणांच्या काळची गाणी, तरुणांना मानसोपचार आहेत, पण जुनी गाणी बघा ...

1) इतनाही उपकार समझ कोई जितना साथ निभाये, कोई न संग मरे.,

मन रे तू काहे न धीर धरे, मन रे तू काहे न धीर धरे - चित्रलेखा

3) मेरी दुनिया को मिटने न देता, क्या जाना तेरी दुनिया का,

प्रीत की कैसी बैरी दुनिया प्रीत ये कैसी बैर?

4) छोड दे सारी दुनिया किसी के लिए,

ये मुनासिब नहीं आदमीके लिए - सरस्वतीचंद्र

5) सब्र कर बंदे ये दिन भी निकल जायेंगे - साईबाबा

6) आवडती मालिका, कसौटी जिंदगी चे शिर्षक गीत बघा

7) जिंदगी क्या है, जैसे जादू का खिलौना है - कसौटी जिंदगी की

8) चन्ना मेरेया, मै रागी बैरागी का चोला पहनके चला।

चंदन हूँ मै अपनी खुशबू छोड चला - ए दिल है मुश्किल

माय बॅड लक इज माय प्रॉब्लेम, नॉट अदरवाईज. आय ॲम गुड कल्चर्ड सॉफ्ट स्पोकन, वेल बीहॅव्हड, सडन  स्पार्क येतो, जणू म्हणा आता माझी सटकली. फुलपाखरांची रंगपंचमी बघणे, सहलीला जाणे, खेळ गप्पा, हवे ते सर्व मिळवणे म्हणजे सुख असे तरुणांना वाटते. त्यांचे ध्येय स्वतःचा व कुटुंबाचा आदर करणे हवे. ही पिढी स्पर्धेच्या युगात, इतरांच्या आयुष्याबद्दल बोलत राहते, पण  मन स्वार्थी आहे. खरे अच्छे दिन तरुणाईला माहित आहेत, ते क्षण तरुणाई सण उत्सवात शोधत नाही. यु वेअर लिव्हिंग बिफोर धिस, यु विल बी आफ्टर धिस, लॅटर अल्सो.

9) ढूंड लेंगे हम किनारे (क्विन)

10) आपने मनके जैसा हो तो अच्छा है, अगर नहीं हुआ तो और भी अच्छा है

क्योंकी वो अल्ला की मर्जी है ।  हरिवंशराय बच्चन

तरुणाई सुसंस्कृत आहेच, मात्र सण संस्कृतीशी परिचित होईल तोच खरा उत्सव असेल पण तरीही ही गाणी ऐकणे, ही आनंदपर्वणी असते. स्वत्:च्या खूप आवडत्या गाण्यांची यादी करा. वरचेवर ऐकत जा, मन आनंदी राहील. हिन्दी गाणी एक प्रकारे मानसोपचारच असतात.

11) गीत गाता हूँ मैं गुनगुनाता हूँ मैं ने हसने का वादा किया था कभी

प्रेम पर्वताची गाणी ऐका

१२)बिते हुओ कलके खातिर, आनेवाला पल मत खोना, सबसे बडी सौगात है जीवन

१३)गम तो एक पन्ना था, जिंदगी की किताब बाकी है।

जीत को हार क्या, खेल अभी भी बाकी है॥

प्रत्येकाची बकेट लिस्ट असेल ती पूर्ण करून घ्या. 'रंग माझा वेगळा' अशी तुमची गाणी उडत्यता चालीची असतील किंवा बिन चालीची देखील असतील, पण ती तुमची लाडकी असतील 'मै मेरी फेवरीट हूँ' या जब वी मेट मधल्या वाक्याप्रमाणे, तुमच्या गाण्यांची लिस्ट बनवा. गुणगुणा

दुनिया में ऐसा कहाँ सबका नसीब है

को कोई अपने पिया के करीब है।

माजी जो हो तो, फिर किनारा भी करीब है॥

गरीब जानके हमको न तुम भुला देना

तुम्ही ने दर्द दिया है, तुम्ही दवा देना॥

गम को अंधेरी रात में दिल को न बेकरार कर

सुबह जरूर आयोगी, सुबह का इंतजार कर।

तुमच्या लाडक्या हिन्दी गाण्यांची बकेट लिस्ट करा व मनसोक्त गुणगुणा.

माझ्या मैत्रिणीला कंबरदुखीने बेडरेस्ट सांगितल्यावर डॉक्टरांनी सांगितलेय, भरपूर गाणी ऐका म्युझिक थेरपीने मन शांत होईल.

चला गाणी ऐकू या गाणी, गुणगुणू या

***********

# ८९पिवळया पंखांचा पक्षी

बच्चोंके छोटे हाथों को, चाँद सितारे छूने दो, चार किताबें पढकर ये भी, हम जैसे हो जायेंगे

इच्छा पूर्ति धन वर्षा के पीछे, दौड में चले जायेंगे

तो पिवळा पक्षी माझ्या स्वयंपाकघरासमोरील झाडावर येवू लागला, ज्या प्रियकराला बघून हृदयात आग पेटते, तो पुढे चटके देवू लागतो. कधी तळपायाची आग, मस्तकात नेतो. तसे पुढे पुढे मला त्या पिवळया पंखाच्या पक्ष्याचे येणे, सवयीचे झाले. मी त्या पिवळया पक्षासाठी ताटलीत पाणी व तांदूळ ठेवू लागले. तो खावून तृप्त होवून उडून जात असे. फार वेळ थांबत नसे. जीवनात भेटणारे सुहृदय देखील असेच असते.

पक्षी बघणे या कलेने संवाद वाढतो. शक्ति व स्मरणशक्ती वाढते वेगळयाच आनंदाशी लिंक होतोय ते तृप्त वाटते. निग्लेट करा त्यात देखील यश येते, अडचणी, दुःख, सुखसोयी - आनंद, खरे सुख फरक कळतो. या सर्वांतच अंतर असते थोडेसे कला व नैराश्य एकत्र येते का?

दीपिका सारख्या नटीला करिअरच्या यशो शिखरावर निराश का वाटले? आपण काय करतोय व ते का करतोय? या संघर्षाने करियरमध्ये निराशा येवू शकते निराशेवर पक्षी निरिक्षण हा चांगला उपाय आहे.

निवृत्त माणसांना 40 वर्षे सवय झालेली असते ते काम, चिकटलेली बाब ही ती ओळख गेल्यावर उणीव भासून नैराश्य येते. पण मी म्हणजे माझी नोकरी फक्त काम नाही. माझे कुटुंब माझी कला देखील आहे. प्रमोशन म्हणजे आनंदी, ध्येय नोकरीवर असताना वाटते. पण पुढे

त्या ध्येयाचे हसू येते कारण काळ बदलतो वेळ बदलते. --- बदलतात, आनंद बदलतो. कारण आपण स्वतः बदलतो. मनातही बदल हा हवाच. प्रमोशन मागे पडते. पिवळ्या पंखाचा पक्षी काही वेळ येतो उडून जातो. सुख व विरंगुळा तसेच असते. सुरवातीला खूप आकर्षण वाटते व पुढे सवय होते. पिवळ्या पंखाचा सोनेरी रंग मला सांगतो की जीवन सुंदर आहे. पोटाची भ्रांत आहे, घरटे लहान आहे, पंख कोमल आहेत पण उम्मीद, आशा आहे. म्हणून तर एक गाणे आहे. पिवळ्या पंखाचा पक्षी नाव सांगे ना, श्रावणाचे ऊन मला झेपेना.

त्या पिवळ्या पक्ष्याला मी नाव ठेवले ‘खंडोबाचा घोडा’ माझी कलात्मकता! बहुतेक लेखिका स्त्रिया असतात. बायकांचे विचार, स्त्रियांच्या कथा स्त्री विषयक दृष्टीकोन व अनुभव या कतांत का नसतो। बायका 50% असतात पण यंग अडल्ट फिक्शनमध्ये बायका लिहितात. त्यांना फारसा कौतुक मिळत नाही. पुरुष म्हणे सामाजिक अंतरंग लिहितो तर बाई लिहिते कौटुंबिक!

तरुणींचे मनोगत लिहिले जात नाही, वाचले जात नाही. त्यांचे देह बघितले जातात. स्त्री साहित्याला खास जागा देण्याची या बुद्धीबळातील राण्यांना त्यांच्या कल्पनांना बुद्धीली वाव दिला तर साहित्यक्षेत्रात अधिक समृद्ध होईल.

$$$$$$

## ९० गाणारे गाव

हे आपल्या भारतातच, मेघालयामधील कोंगथोंग या खेड्याला खासी लोकांचे गाणारे गाव हे नाव पडले आहे. कारण आहे शिठ्ठ्या, गाणी हाका, हाकारणी, बोलावणे सर्व काही गाण्यात  करतात. संपूर्ण जगात असे हे एकमेव गाणारे गाव आहे. खूप अंतर मुख्य वस्तीपासून दूर जंगलवाट तुडवल्यावर इथे पोहचतो इथे आपल्याकडे जशी बारसाला गाणी म्हणतात. तशीच म्हटली जातात. मात्र मूळ जन्मताच बाळाची आई बाळाचे नाव ठेवते व सोबत खास तान बाळाला नाव म्हणून जोडते. प्रत्येक व्यक्तीचा पत्ता एक खास ट्यून, गाण्याची ललकारी ठरवलेली असते. या गावात बैठी लाकडी घरे ज्यावर उतरती छप्परे आहेत मधून जाणाऱ्या नागमोडी रस्त्यावर गाण्याच्या धूना एकू येतात. रोथेले खोंगसिट नावाचे त्या खासी वस्तीचे म्होरक्या आहेत.

कमीत कमी तीस सेकंद टिकेल इतकी गाण्याची धून प्रत्येक व्यक्तीचे नाव म्हणून ठरवली जाते. (फोनला जसा रिंगटोन लावतात तसे) जिंगरवाई लाबेई उदा. जिंगल असे या धूनला म्हणतात. आईने ठरवलेले नाव अथवा धून असला याचा अर्थ आहे. मातृदत्त धून असे म्हणता येईल आता जरा काळ आधुनिक आल्यामुळे हिन्दी चित्रपटांची गाणी नाव धून लावली जाते. पूर्वीसारखी धून गावून हाक मारणे आणि बोलावणे हल्ली कमी झालीय, कारण लोक मोबाईल फोनवर बोलतात.

पूर्वी 'जेवायला चला', 'खेळायला जा' अशा धून असत. आता मोबाईलच्या धून एके येतात. 'मला आठवते मी खूप लहान असताना शेताच्या बांधावर राहणारी नभी तिचा मुलगा राजा याला 'अरे राजा रे' 'रा ओ राजा' 'बयो राजा ये रे' अशा वेगवेगळया हाका मारी त्यात चहाला ये, जेवायला ये, शेळया परत आण, झोपलास का? असे प्रश्न व आज्ञा असत. सोलापूरच्या रात्री घाटात लुटणाऱ्या रामोशी टोळया वेगवेगळया पक्ष्यांचे आवाज काढून, गाडी जातेय, लुटू या अशा खुणा सहकाऱ्यांना करीत असत आवाज धून पक्ष्यांची शीळ असल्याने, प्रवाशांना देखील

समजत नसे की माणसांचा समूह दरोडा घालणार आहे. झाडामागे लपलेला आहे. शीळ गाणारी टोळी, असे या लुटारु समूहाला म्हणत.

कुत्री, मांजरी, गायी, म्हशी, बैल आपापल्या मारलेल्या सुरेल हाकेला उत्तर देत असल्याचे आपण बऱ्याचदा बघतो. सुरेल संगीत ऐकल्यावर झाडे अधिक चांगली वाढतात व गाय अधिक दूध देते. पुंगीवाला अथावा बॅगपायपर ची गोष्ट आपण बालपणीण ऐकली होती ती थोडक्यात सांगते. एका गावात खूप उंदीर होतात. त्यावेळी राजा सांगतो जो कोणी उंदीर गावाबाहेर गालवेल त्याला मी मोटे ईनाम देईल पुंगीवाला उत्तम धून वाजवतो. त्या दूनीला भूलून उंदीर, पुंगीवाल्याच्या मागे जातात व नदीत पडून मरून जातात, मात्र राजा इनाम नाकारतो पुंगीवाला गाणी वाजवत गावी येतो. गावातली बालके त्या पुंगीवाल्याच्याच त्या धूनने भारावून पुंगीवाल्याच्या मागे जातात. पुंगीवाला त्या बालकांना (जंगलात) नेतो. गावकरी घाबरून राजाकडे जातात. राजाला आपली चूक उमगते. राजा पुंगीवाल्याची माफी मागतो. पुंगीवाला बालक सुरक्षित परत आणतो.

थोडक्यात म्युझिक इज मेडिसीन ऑफ माईंड. एकदा एक राजा गाण्यांनी खूष होवून गावकऱ्यांना आज्ञा देतो. 'कायम गाण्यात बोलायचे.' प्रजा सारे काही गाण्यात सांगू लागते. मात्र त्या गाण्यांच्या अतिरेक होतो.

राज्याच्या राजवाड्याला आग लागते. प्रधान वाचवा वाचवा ओरडू लागतो राजाला राग येतो. मात्र गाण्यात आग लागली हे सांगेपर्यंत राजवाड्यात आग वाढते. राजाला चूक उमगते आणि राजा गाण्यात बोलण्याची आज्ञा मागे घेतो.

गाण्याऱ्या गावत असा गाण्यांचा अतिरेक नाही, राजा आला, भांडण झाले, मृत्यू आला तर शब्दात बोलायची मुभा आहे. 500 वर्षे जुनी गाण्याच्या धूनची परंपरा मात्र कोंगठोंग गावी अजून आहे.

टुर्की गावात पक्षी शीळ भाषा दहा हजार लोक वापरतात. डोंगरावरच्या कनाकसी गावी बी भाषा आहे मागील वर्षी यू एन कल्चरल एजन्सीने या गावाला इनटँजिबल कल्चरल हेरिटेज टॅग दिलाय. बदलत्या समाजाच्या व तकनीकी चा मोबाईल अतिरेकाचा परिणाम या गुणगुणणाऱ्या गावावर होतोय. स्कॅन्डेव्हीयन (स्वीडन) नॉर्वे येथे कलनिंग नावाचे संगीत गाई, म्हशी चरणाऱ्या बकऱ्यांना डोंगरावरून परत घरी बोलवण्यासाठी वापरला जातो. हे संगीत लोकप्रिय लोकसंगीत आहे व ते जंगली श्वापदांना दूर पळवून लागते. खूप उंच चढ्या स्वरात हाक येते.गाता गाव, गाणारा गाव, वाव!

***

# ९१ गणेश कृपा

गणेश पूजेत कोणीतरी 'मैं हू ना, मुझपे छोड दो'  म्हटले की मानवाला सुशांत वाटते. गणेश कृपेचे मानसशास्त्र हे असे आहे. लोककलांच्या प्रत्येकच कार्यक्रमात गणेश पूजन आधी होते व नंतर मूळ कार्यक्रम होतो. गणपतीचे सोंग घेणे सुद्धा मानाचे मानले जाते. संचारी बावाचे मानले जाते. गावातील प्रतिष्ठित व सभ्य माणसालाच हे सोंग घेण्याचा सुयोग्य अंगिकारलेला अधिकार असतो. गणपतीच्या सुंदर मुखवटा, लाकडाच्या फळीचा किंवा पुठ्ठ्याचा केला जातो व त्यावर लाखेचा किंवा शेंदराचा रंग लावतात. सुरुवातीला शेणामातीची, पुढे पुढे ही सोंगे प्लास्टर ऑफ पॅरिसची नळी किंवा काही कलाकारा कागदाची ओतीव भाताचे तूस, लगद्याची मुखवटे ही वापरू लागले. गणपती नमनाची खालील पदे प्रसिद्ध आहे.

1) लाल शेंदून ल्याला रे गणपती, मूषक वाहन ज्याला रे गणपती

2) नमो वक्रतुंड गणराया, आलो शरण तुमच्या पाया

3) आज म्या गण नमिला मल्हारीच्या म्हाळसा बानूला

4) ओंकार स्वरूपा, सद्‌गुरू अनंता, अनाथांच्या नाथा

लोककलांमध्ये श्रीकृष्ण विष्णु, देवांचा दरबार, , अप्सरा, मेनका अशांच्यावर विनोद केले जातात पण गणपती बाप्पावर नाही नो वे नेव्हर गणपतीबाप्पाबद्दल चा नितांत आदर लोककलेद्वारे केला जातो. उंदरावर मोरावर, संगणकावर स्क्रन स्वहरवर वर सुद्धा हे गणराया थाटात विराजमान होतात. लोककलांपासून आजच्या काळापार्यंत, प्रत्येक कार्याची सुरुवात ही गणेशचतुर्थीला येणाऱ्या बाप्पांचे विसर्जन गण-नमनाचे होते. आधुनिक काळात लॅपटॉपवर मोबाईलवर  हे पूजन केले जाते. पण आपल्याला आपले गणपती बाप्पा कुणी परके वाटतच नाही. ते दर वर्षी दहा दिवस पाहुणे येणारे एनआरआयच वाटतात. म्हणून तर आपण

वर्षभर म्हणतो भाद्रपदात गणपती येणा आहे येणार हाय! एनआरआय काहीशा रांगड्या ढोबळ व राजाक्षय न लाभलेल्या गावकुसांतील कलांचं आज आधुनिककाळी ऱ्हास होत आहे. पारंपरिक कलाविष्कारांचा संकोच होत आहे. लोककलांमधील गणनमनाचे बारकावे जतन करायची त्यांच्या नोंदी करायची वेळ आली आहे. काही काही गणपतीची कवने कलाप्रकार नाममात्रच उरले आहेत. विधिप्रधानतेकडून आपल्याने ग्रामोत्सव, लोककला रंजकप्रधान बनण्या. परकीय वाघांच्या आक्रमणाने आपली जुने ओबडधोबड प्रा. भारतीय वाघे. कलासंस्कृती नष्ट होवू लागली आहे. ती निरागस कलासंस्कृती जपावी म्हणून यावर्षी सरकारतर्फे या गणेशोत्सवात देशी वाघांना परवानगी देण्यात येईल अशी स्वागतार्ह व संस्कृतीसंवर्धक सूचना आली आहे. तिचे खूप खूप स्वागत! गणपती बाप्पा लोककलांवर छत्रछाया ठेवतीलच. नवनवीन प्रयोग लोककलांमध्ये व्हावेत.

या नाचत रंगूनी गणु बाहो, गौरीच्या हारटी

आर्शिवचन देती संगे. ब्रहंम्याची  पोरटी

गणराया लवकर येई भेटी सकळां देई

नाचत आले हो गणपती पायी घांगुऱ्या वाजती

गणा धावरे मला पावरे

म्हणत महागाईपासून त्या गणरायाने वाचवावे म्हणून जनता धावा करते आहे.

*********

# ९२माहेर गीत

गात सरते माहेरची वाट, माहेरच्या वाटेवरून परत येताना वाटत होते. काय. आहे या माहेरात? आराम? सुख? नाही कुणाकडे गेलो की काम हे करावेच लागते. 2-4 पोळया लाटाव्या लागतात. घाम येणाऱ्या स्वयंपाकघरात राबावेच लागते. माहेरीसुद्धा, कधी चूलखंडाच्या घरी चुलतसासूचा चूलीचा विसर कधीही पडून चालत नाही, कधी माहेरी गरमागरण जेवण वाट बघते. ते परवडणाऱ्या किंमतीत व आरोग्यास पोषक तऱ्हेने बनवलेले असते. माहेरचे कौतुक तर संतानाही असते.

माझे माहेर पंढरी, आहे भीवरेच्या तीरी

बाप आणि आई, माझी विठ्ठल रखुमाई॥1॥

पुंडलिक बंधु आहे, त्याची ख्याती सांगू काय

माझी बहीण चंद्रभागा, करीतसे पापभंगा॥2॥

एका जनार्दनी शरण, करी माहेरची आठवण

प्रॉब्लेम कुटुंब असतात त्यामुळे खूप मुले असलेल्या घरी भांडणे असतात पण -

कधी बहर कधी शिशिर

दोन्ही एक परंतु

डोळयामधले आसू पुसुनी

ओठावरचे गाणे

म्हणून माहेरी जेष्ठ ओव्या शिकवतात

सासरच्या वाटेवर कुचुकुचु काटे

माहेरच्या वाटे जीव माझा दाटे असे वाटते.

माहेर माझा आहेर असाही विग्रह होवू शकतो. तसे हल्ली माहेर फारसे दूर नसतेच. फोन करता येतो भेटता येते. माहेर ला स्त्रीचा हळवा कोपरा असतो.

वाटेने माहेराच्या धावत मन जाते

गुलाब जाई जुई मोगरा फुलविते.

द वर्ल्ड वुई लिव्ह इन इज क्रेडिटेड बाय अवर माइंड तर असा हा माहेरचा भ्रम असतो.

रुणझुणत्या पाखरा, जारे माझ्या माहेरा

माझ्या आईच्या कुशीत, मला मिळू दे उबारा

माहेरगीत गात गात सरते, माहेराची वाट.----

**************

# ९३चन्ना मेरे या

चन्ना मेरे या म्हणजे (चन्ना म्हणजे आत्म्याचा प्रकाश) मे रेया म्हणजे माझ्या.

तू माझ्या आत्म्याचा प्रकाश

तू माझ्या जीवनाचा श्वास

तू माझे साय तूच आभास

माझ्याबवतालीचा सुवास

झरोक्यातला पुसट भास

तुझ्या दारावर मी माझे जुने रस्ते संपवून परत आलोय. मी संपूर्णतया विरक्त बैरागी झालोय. चल निघतो मी आता देवपूजेच्या वेळी दुवा देतांना मला दे. माझ्या ओळखीचा स्वाद ओठांवर ठेव. खरे तर मुंबईचे आयुष्य एकदम फास्ट लाईफ जिथे मारते कांदेवाडी टांगठाकूरद्वार,

न्हाळत्या गर्भवतीच्या सोज्वळ मोहकतेने चमकबंदर! पम तिथे प्रेमात पडल्यावर पाण्याने भरले खिसे माझे, वाण मला छत्रीची अशी पाहिली होती. बामणा घरी लिहिणे का? मी पण लिहिणार असे म्हणत प्रेमिक कवि बनतो. मजे ही जगणे मला सांगायचे आहे म्हणतो. नवीन दुःख फक्त मोबाईल व पेट्रोलवर चालणाऱ्या गाड्या उडवून मी आधुनिक जालेय बाकी तळातली कलागत दुःख तीच आहेत. प्रेम तीच आहेत. प्रेम तेच आहे. प्रेमाची वांरवारिता आणि तीव्रता आणि बेचैनी बदलली आहे.

दुःख वेशीवर टांगण्याशिवाय दुसरा पर्याय नाही केबीसी पण देत नाही. हल्ली सुख देणाऱ्या सुखवस्तीं ऐवजी, पसाराच मनात झालाय तू सध्या काय करतेस?? फक्त आराम या उत्तर देणाऱ्या वयात चन्ना अस्वस्थेतेची टोचणी करतो.

ते हिरव्या पिंपळपाना सारखे प्रेम कुठे जाते. उरते, रुक्षजाळी विरहाच्या रात्रीच्या डोहात उडी मारताना, रात्रीचा अंधार भरून घेताना चन्ना मे रे या आठवते. प्रेम तुटणे हे वास्तव की विस्तव! माझ्या आत्म्याचा प्रकाश

पाहिला मी दूर जातांना

दुःख नको नाते तुटताना

**************

# ९४आईचा पगार किती?

वर्तमानपत्रात, नोकर  पाहिजेत अशी एक जाहिरात वाचली. टाईम्स ऑफ इंडिया 12/09/18 मध्ये एक बातमी आहे. करोडपती व्यक्तीला त्यांच्या युकेत शिक्षणासाठी आलेल्या कन्येसाठी बारा वफादार नोकर पाहिजेत. सिल्व्हरस्वॉन रिक्रूरमेंट कंपनीतर्फे या बारा जागा भरल्या गेल्या

लव्ह रात्री चित्रपटात एक वाक्य आहे. भारतीय बाप परदेशात गेले स्थायिक झाले पण भारतीयच राहिले तसे या करोडपति महोदयांच्या कन्या युके येथे सेंट ॲन्ड युस युनिव्हर्सिटी स्कॉटलँड येथे चार वर्षांच्या शिक्षणाचा कोर्स करते आहे. युकेत विद्यार्थी प्रथमवर्षाला बहुदा त्या त्या संस्थेच्या वसतिगृहात राहतात. मात्र ही सेंट ॲन्ड यु युनिव्हर्सिटी हीने या करोडपतींना मुलीला बाहेर स्वतंत्र सदनात राहायची परवानगी दिली आहे. (प्रिन्स विल्यम याच कॉलेजात शिकले)

आता या कन्येसाठी हवे असलेले बारा नोकर कोणकोणते काम करणार याची यादी ऐका.

1) बटलर, 2) बागकामाला माळी, 3) तीन घरकामाचे नोकर, 4) घर व्यवस्थापक, 5) या विद्यार्थीनीसाठी नोकरानी हाऊसकिपर, 6) गाडीसाठी शॉफर, 7) स्वयंपाकी, 6) तीन पायदळी अथवा सुरक्षारक्षक

एकूण बारा

आनंदी व उत्साही सशक्त स्त्री मोलकरीण कम -पीए हवी मुलीला उठवणे (झोपेतून) तयार करणे, इतरांशी समजावून घेणे रोजची दिनचर्या ठरवून कॉलेजसाठी तयारी ड्रेस करणे व्यक्तीगत खरेदी व कपडे लत्ते यात मदत करणे यासाठी पूर्ण अनुभवी स्त्री हवी, आया पाहिजे.

जेवण वाढणे घर स्वच्छ ठेवणे, बारा जण प्रत्येक वर्षाला 88लाख पगार मिळेल महिना 2.1 लाख विद्यार्थीनी कुटुंबीय, अधून मधून घरची माणसे येवून राहतील, त्यांचेही सर्व बघावे लागेल. बंगल्याची व्यवस्था राखरखाव बघायला हवं!

प्रत्येक घरी ही सर्व कामे एकटी आईच करत असते. इतरांच्या मुलांप्रमाणेच माझ्या लेकसुद्धा देशी परदेशी शिकला. काही मैत्रिणींचे लेकी शिकतात, त्यांच्या घरी व आमच्या घरी माझ्या लेकासाठी ही सर्व कामं, मी एकटी करते, पूर्णतया मोफत! बिनपागरी आया! बारा जणांचे काम एक आई करते. असाही आईचा पगार किती हा प्रश्न चिरतंन काळातील असतो. तुमच्या घरी अाईचा पगार किती आहे?

********************

# ९५मुंबईचे डब्बेवाले

अमेरिका, युरोप व अन्य परदेशांमध्ये मुंबईच्या डब्बेवाल्यांची फारच स्तुति केली जाते. व्यवस्थापनाचे धडे एमबीए लोकांना डब्बेवाल्यांचे आदर्श देवून शिकवले जाते.

कष्टाचे जुगाड, पोटासाठी जुगाड साधासुधा माणूस किती नेटकेपणाने करतो याचे उदाहरण ही जेवणाचे डबे पोहोचवणाऱ्यांची संस्था होय. जुगाड हा शब्द मी चांगल्या अर्थाने वापरले आहे. नेव्हर से डाय असे स्पिरीट म्हणजे जुगाड. अनाकलने अनपेक्षित प्रसंगामध्ये यश मिळवणे याचं डब्बेवाल्यांचीही संघटना एक उदाहरण आहे. प्रिन्स चार्लस जेव्हा भारतात आले (2010) तेव्हा त्यांनी भारतीय डब्बेवाल्यांची खास भेट घेतली (मुंबई येथे) प्रिन्स चार्लस यांच्या विवाहाला डब्बेवाल्यांना आमंत्रण होते.

चांगले जेवण ही मानवाची मूलभूत गरज आहे रोज रोज बाहेरचे कानावळीचे जेवमाने कंटाळा येतो किंवा तब्येत बिघडते. त्यामुळे घरचे जेवण हवे. मात्र हे चाकरमाने भल्या पहाटे घर सोडणार त्यावेळी गृहिमींचे जेवण तयार नसते. त्यामुळे साधारण दहा वाजताच्या सुमारास हे डब्बेवाले घेऊन घरून डब्बा गोळा करून ेक वाजेपर्यंत जेवणाच्या वेळेपर्यंत डबा चर्चगेट, व्हिटी, जिथे ऑफिस असेल तिथे पोहोचवतात. एक चेन असायची. डब्बे पोहोचवणाऱ्यांना एरिया वाटून दिला जातो. अल्युमिनियम गोल डब्यात तीन खणी तीन डबे असतात. डाळ भात भाजी पोळी डब्यात असते. पण झाकण घट्ट असते. तेव्हा रस गळत नाही. लाकडी क्रेटमध्ये हे गोळा केलेले डबे ठेवले जातात. रंगीत फुल्या व गोळे आणि चौकोन या खुणा डब्बा कुठे पोहोचवायचा हे डब्बे वाल्यांना कळते. लोकलगाडीत व पुढे सायकलवर, पाऊस, ऊन, असो जेवणाच्या वेळी डब्बे बरोबर पोहोचतात.

5000 डब्बेवाल्यांची अनवाणी पायांनी काम करणे ही सेना 50 वर्षे काम करते आहे. मुंबईचा डब्बेवाला नावाचा मराठी चित्रपट तर लंचबॉक्स नावाचा हिन्दी चित्रपट येवून

गेलाय. या डब्बेवाल्यांना जेमतेम 5000 रु. पगार मिळतो. या संघटनेचे ऑफिस चर्चगेटला आहे. असंघटित क्षेत्रात काम करतात. ----

अमेरिकेतील रेस्टॉरंट चेन्स व बोस्टनचे व केंब्रिजची हॉटेल 'वन क्रीक अमवे' अशी डब्बे पोहचला. अशी साखळी चालवतात. ती, मुंबईच्या डब्बेवाल्यांवर इनस्पायर होवून. वन वर्ल्ड क्युसिअन कंपनी तर घरी, ऑफिसला जेवण पोहचवते.

आपल्या डब्यांच्या आदर्श व्यवस्थापनालाच या मोठ्या बिझिनेसमनींनी आदर्श व्यवस्थापनालाच बघून इंग्रज सिंगापूर, ऑस्ट्रेलिया येथे देखील आता फुड चेन्स सुरू झाल्या आहेत.

मात्र मुंबईचे डब्बेवाले युनिकच! एकमेव द्वितीय गरज आहे पण सोय नाही हे बघून मुंबईच्या डब्बेवाल्यांमध्ये ही कल्पना आली. स्वातंत्र्यपूर्व काळापासून हे जेवणाचे डबे पोहोचवले जातात.

आता काळ बदलला, घरून डबा येणे बऱ्याच घरी बंद झाले. त्यामुळे कँटिन मधून डबे येतात. ऑफिसेसमध्ये मोठमोठी कॅन्टीन असतात. हल्ली वेगवेगळे अशा आवडीनुसारा मिळते. त्यामुळे डब्बे वाल्यांचा धंदा बसला आहे. कमी झाला आहे. पण अन्नदाता सुखी भव, न्यायाने, व्यवस्थापनाचे बाबत डब्बेवाल्यांचे नाव कायमच घेतले जाईन.

*****************

## ९६ प्रवास लेडीज स्पेशलचा.

रोजचाच तो लोकल गाडीचा डब्बा होता. तेच ते महीला ग्रुप्स. काही निराळे चेहरे होते, तर काही स्त्रिया शांत झोपलेल्या होत्या.

सकाळची झोप, जणू खोप्यातली चिमणी, अशी म्हणावी अशी चिमणझोप होती ती. फेरीवाल्यांच्या आरोळया, गाडीचा धकधक, झुकझुक आवाज येत होता. प्रयेकच स्टेशनवर गर्दी चढत होती. वादावादी धक्काबुक्की होत होती. survival of fittest या डार्विनच्या नियमानुसार तगडी व्यक्ती जिंकत, नाचत मजेत होती. काही महिला पुरुषांसारख्या आक्रमक होत्या, टिक्का टिपणी फायद्यासाठी जमलेले मैत्रिणींचे कंपू खातपीत होते. जी आज आलेली नाही तिला नावे ठेवत होते. कधी, मैत्रिणी आहेत ह्या कल्पनेचे भ्रमाचे भोपळे फुटायला वेळ लागतो. जे फेसबुक वरचे कामाच्या ठिकाणचे, काल्पनिक असे जाळे विणले जाते ते भ्रामक असते. पिंपळपारावर चावडीवर म्हणतात तशाच काही, व्यर्थ चर्चा चालू होत्या. आयुष्यात अनेकजणांची गाठ पडते. काही जणांशी ओळख होते. काहींशी औपचारिक संबध जुळतात. काहींचा सहवास  मिळतो. मात्र मैत्री एखाद्याशीच होते.

तेजतरार स्मार्ट जगात आज प्रत्येकजण धावत आहे. लोकलमध्ये खूप गर्दी आहे. आजूबाजूला माणसे आहेत. पण माणूस एकाकी आहे. टीकेचा धनी आहे. एकाकी बेट बनला आहे. जीवन म्हणजे पैसे उधळीत जाणे, मजा करणे, खाणे, असे विचार काहींचे आहेत. कमावणे उधळणे हेच चक्र, काहीचे आहे.

" सवडच मिळत नाही." लोकल मध्ये एक तरुणी सांगत होती.

काहीजणी गळा मोकळा करायला, बेसूर  गात होत्या. काहीजणी पर्स मधून देवाच्या पोथ्या काढून वाचत होत्या. ज्याची त्याची, लोकलमध्ये असलेली, जागा ९ इंच बाय ११ इंचांची, जेमतेम पाय टेकण्या इतकीच होती. त्यातच त्यांची शान, त्यांची फ्याशन होती, तेच त्यांचे साम्राज्य होते.

एक बाई दगडी ठिकऱ्या वाजवून गात होती.

“बचा हो तो रोटी का तुकडा दिला दो” मात्र तिला फक्त पैसे हवे होते. आंधळी गात होती.

"मी पण ज्याचे पक्व फळापरी सहजपणाने गळले हो, जीवन त्यांना कळले हो"

"जगी, जागी जीवनाचे सार, जाणुनी घ्या सत्वर"

एका वृद्ध दमेकरी नोकरदार स्त्रीचा श्वास गुदमरत होता. ती वारंवार पर्समधून, स्प्रे काढून दम्यासाठी असलेले औषध ओढत होती. पण डब्यात हवाच नव्हती. आत आपल्या झरा वाहतो झुळूझुळू स्वच्छंदी निळानिळा पण बाहेर श्वास गुदमरतो.

खाद्य पदार्थ विकायला फेरीवाले आले. इडल्या वडे. वेफर्स, भराभर संपले. बायका काही काळ खाण्यात बिझी झाल्याने आवाज कमी झाले. सुपारी गोळया बिस्किटे विकणारी सुद्धा आली. खोटे दागिने कानातले, इयर रिंग, टिकल्या बांगड्या, विक्रेतींची विर्क्री झाली.

बाजूच्या पुरुषांच्या डब्यातून गाण्याचे आवाज, भजनाचे आवाज येत होते. त्यावरून प्रेरणा घेऊन या डब्यात सुद्धा गाणी सुरु झाली. मुरकत लाजत, नाराजीने, खुशीने बायका गात्या झाल्या.

गाना आये या ना आये गाना चाहिये.

अशी ती गाणी होती पण त्यात मनाचा ताण हलका करण्याची शक्ती होती. गाडीने वेग घेतला. कुणीतरी वर्तमानपत्रातून मान वर करून फोनवर (मोबाईलवर ) जोरात बोलायला सुरुवात केली. पुढच्या भागात सीटवरून भांडणे सुरु होती. सीटवर खरी बसण्याची गरज, ज्या व्यक्तीला असते, तिला बसायला कधीच जागा मिळत नसते. स्वस्त व मस्त पर्याय म्हणून लोकल स्वीकारावी तर शारीरिक दमणूक होते.

एक फेरीवाली विक्रेती “लेडीज स्पेशल” असे ओरडत आली. सौदर्य प्रसाधने, कंगवे, पावडर, नेलपोलीश वगेरे विकत होती. गर्दीतून सराईतपणे वाट काढत, त्या वस्तू विकत होती. दरवाजात लटकणाऱ्या बायकांना रागावत म्हणाली,

“नुसतीच बुके शिकता तुम्ही. दरवाजात लटकू नये एवढे पण कळत नाही काय? पाय घसरून पडलीस तर फ्याशन कुणाला दाखवशील?"

दारात लटकणाऱ्या थोड्याश्या मागे झाल्या. पृरुशांच्या डब्यातून हसण्याची लकेर उसळली.

गर्दी चढत होती. उतरत होती. लोकल गाडीला, त्याचे काहीच सोयर सुतक नव्हते. माणसांचे वेगवेगळे नमुने वेगवेगळया स्टेशन वरील, उपनगराची लेबले लावून जीवनाच्या मॉल मध्ये फिरत होते. गाणारा ग्रुप अजूनही गातच होता.

“ आदमी मुसाफिर है, आता है जाता है” सुरांची सौदर्यपूर्ण साथ, बेसूर जीवन, लोकलचा कंटाळवाणा प्रवास, असह्य उन्हाळा, सुसह्य करीत होती. जे चालू होते ते चालू होते व चालूच राहत होते. शेवटच्या स्टेशन वर गाडी पुन्हा भरली.

फेरीवाली विक्रेती ओरडत होती “लेडीज स्पेशल ! लेडीज स्पेशल !!

एक वृद्धा रोजचाच वृधाश्रामाचा मुद्दा मांडत होती.

“ म्हातारीचे गाठोडे, बुधीचे खटले” हे शब्द वापरले कि हल्ली मुले बिचकतात. काय शब्द शोधून काढते देव जाने, असा भाव चेहऱ्यावर आणतात.

“म्हातार्यांना ते अडगळ समजतात. Exchange offer ला due असलेले.” दुसरी म्हणाली.

“विषय बदला"तिसरी

कंपूने भजन संपवले.थोडी, सुन्न कि काय म्हणतात तशी शांतता झाली. काही जणी मोबाईल वर खेळत बसतात. "मी कधी नोकरी संपते याची वाट बघत आहे” दुसरी. “परदेशात म्हातारे घरात राहत नाहीत. वृद्धाश्रमात जातात. हल्ली बघा म्हातारे किती जगतात. आई तू ऐंशी वर्ष आम्हाला अडचण करणार? वृद्धाश्रम हे आनंदाश्रम असतात. असे मुलगा म्हणतो.मी जाईन वृध्दाश्रमात. "

नव्या महीला चढल्या, त्यांचे हि श्वास गुदमरतच होते. हळू हळू दादरला गर्दी कमी झाली. बायका सुस्तावल्या. व्हीटी आले.एक तरुणी कविता वाचत होती.

महीला डबा

बायका परत धावू लागल्या.

अज्ञाताच्या दिशेने पहात

न मिळणाऱ्या सवडीच्या शोधात.

आजही ती भेटते मला,

अशी बंद पापण्याच्या काठी,

आजही तेच शब्द मनात,

अन तीच ती कविता ओठी

चर्चा चालू होती., "सवड मिळत नाही. व्रते करू कोणती?"

"बाईचे जेवण उरल्या सुरल्यातच होते. वर्षाला दोन लुगडी दिली कि ती खुश होते. अजून ऊपास कशाला हवा?"

"जन्म देवून मुलांना मोठे केल्यावर, मुले कशी आपण आदर्श वाढवली, हा भ्रमाचा भोपळा फुटतो."

देव म्हणजे आई, आई म्हणजे देव म्हणणारे पुत्र मनाने दूर जावू लागतात.

" आयुष्यातला हा bad patch जाईल चांगले दिवस येतील, हि temporary फेज आहे. दिवस बदलतील हि आशा असते. अशा आशा उच्चारण, मन आनंदी करणे ठेवणे सोपे नसते ती आशा टिकत नाही."एक वृध्दा

काही तरी मिळवण्यासाठी, बरेच काही हरवते. ते हरवणे म्हणजे काय?

जाणायचेय?

मग करुन बघा ना, लेडीज स्पेशलने प्रवास!!!

****

## ९७ वेड्या बहिणीची वेडी हि माया

माझा मुलगा एके दिवशी शाळेतून घरी येताच म्हणाला, “मी शाळेत जाणार नाही, मला बहिण हवी, मला भांडायला कोणीच नाही.” जड दफ्तर उचलायला बहीणच हवी. बहिण भावाच्या नात्याचा हा नवाच पैलू मला कळला. आधुनिक मुले ब्रो, ब्रदर्स बहिणीला सीस म्हणतात.

मी विचारले, “बहिण प्रेम करायला हवी कि भांडायला?” तो उत्तरला, “ ते मी माझ्या लहरीप्रमाणे त्या त्या वेळी ठरवीन.” त्याच्या उत्तराने मी अस्वस्थ झाले.

खरेतर भाऊ म्हणजे बहिणीचा जीव. ज्या माहेरात जीव कायम गुंततो, त्या अंगणातील बहरलेले झाड भाऊ असते. बहिण तर पक्षीण असते, तिला सासरी उडून जावे लागते. सासरी गेल्यावर देखील, बहिणीचे मनपाखरू त्या माहेरझाडावर विसावून येते. भाऊ मात्र बहिणीला युज अंड थ्रो प्रमाणे ठराविक अंतरावर ठेवतो. बहिण भाऊ म्हणजे खरेतर एकाच झाडाच्या दोन फांद्या होत. पण बहिण रुपी फांदी लग्नानंतर त्या झाडापासून तुटते आणि संसाररुपी कुंडीत रुजते. कधी बहरते, कधी बोन्साय होते.पण भाऊ आहे त्या जागी, घरी, ठाण मांडून बसलेले असतात.

राखी पौर्णिमा व भाऊबीज या दोन प्रमुख सणानी, त्या बहिण भावाच्या नात्याला पंचतारांकित रूप दिले आहे. त्या राखीच्या गाण्यात प्रेम व हुरहूर असते.

१. ये राखी बंधन है ऐसा. जैसे सुभद्रा और कृष्ण का

२. बहनाने भाई कि कलाई पे प्यार बांधा है, प्यार के तार से संसार बांधा है

३ सोनियाचे ताटी उजळल्या ज्योती, ओवाळिती भाऊराया रे वेड्या बहिणीची रे वेडी माया.

४, दुध लाह्या चाख, नागोबा भावास राख

सणाला पारंपारिक सुरांनी, हळव्या व्यक्तीला हळवेपण येते. पण एकूणच आधुनिक काळात, बहिण भावाचे नाते लवकरच मुलामा  उडालेल्या, बेगडी जरीसारखे होते. नवी चप्पल जुनी झाली, कि आपोआप फेकली जाते. तसे माहेरी पाचूच्या बनात हळदीची उन्हे, असलेले स्वप्न पूर्ण होतेच असे नाही. सासरी, वर चांदण्या खाली काजवे, असे वाटते.

नवे नाते जुळो न जुळो जुने तुटते.

बहिणीचे लग्न हा बहिणी इतकाच भावाच्या जीवनातील महत्वाचा क्षण असतो. “ताई मला सांग, मला सांग कोण येणार ग पाहुणे.

गोड गोजिरी लाज लाजरी ताई तू होणार नवरी.” फुलाफुलाच्या बांधून माळा मंडप घाला हो दारी”असे अविवाहित भाऊ गातो.

लग्नात हळदीचा घाणा भरला जातो आणि भाऊ म्हणतो. सासुराले बहिण निघाली भावाची लाडी,

नेसली माहेरची साडी”

बहिण सासरी जाते पण माहेरच्या आठवणीने ती गाते.

सावळा बंधू राया, साजरी वहिनीबाई

गोजिरे सोयरा, शिल्पा, ..

वाटेने माहेराच्या धावत मन जाते.

पुढे बहिणीला मुल झाले कि ती मुलाना मामाचे कौतुक सांगते.

मामाच्या गावाला जाऊया,

मामा मोठा तालेवार, रेशीम घेईल हजार वार

मामा मामीच्या भेटीचे स्वप्न, भाचरांच्या सहवासाचा आनंद या कारणाने मामाचा गाव प्रिय ठरतो. भाऊ बहिणीला म्हणतो.

“फुलोंका तारों का सबका कहना है एक हजारोमे मेरी बहाना है, सारी उमर हमे संग रहना है.

बहिणीला त्रास झाला, कि भाऊ म्हणतो. हुरुहुरीने म्हणतो बिते तेरे जीवन कि घडिया आरामकि थंडी छाव मे,

काटा भी न चुभ ने पाये कभी मेरी लाडली तेरे पाव मे.

उस घर से भी दुःख दूर रहे, जिस द्वार पर तेरा द्वार मिले. मैकेकि कभी न याद आये. ससुराल मे इतना प्यार मिले.

भावाच्या मुलांचे कौतुक आत्याला करावेच लागते.

बाळ मोठा आबंद, धरी कुत्राचे तोंड

घरात राज्य वाहिनीचे असते, केविलवाणेपण दडवणारे आई वडील, पुढे हतबल होऊन जातात

ऐसी कळवल्याची जाती, लाभाविण कैसी प्रीती

मुले मस्ती करतात. त्याच्या बडबड गीतांच्या ध्वनीने घर भरून जाते.

१, आपडी थापडी गुळाची पापडी तेलंगीचे एकच पान, धर ग बेबी हाच कान.

२. चांदोबा चांदोबा भागलास का? लिंबोणीच्या झाडामागे लपलास का?

३.गण्या गण्या गणपती, ढण ढण टनटन मारुती

४. इरिंग मिटिंग लवंगा तीरींग

शब्दहीन असते मस्तीत गमतीत रमलेले माहेरचे दिवस उडून जातात. बहिणीला माहित असते, माहेरी फक्त चार दिवसच आपले स्वागत आहे. पाचव्या दिवशी माहेरघरच्यांना ती नकोशी होणार, हे तर जग रहाटीचे सत्य आहे. सासरी परत जायला निघालेली बहिण भावाला नजरेनेच सांगते.

"भैय्या मेरे राखी के बंधन को निभाना"

तिला माहित असते आपण परत माहेरी, जर सासरच्या त्रासाला विटून माघारी आलो, तरीही आपल्याला इथे स्थान नाही.

"ये कहा आ गये हम" अशीच वेळ या माहेरी घरी येईल. लग्न लावून दिले, हातातला उकडलेला गरम बटाटा दूर फेकावा तशी मुलीची जबाबदारी टाळली, कि भावाचा मार्ग मोकळा होतो. एकच मुल मुलगा/मुलगी काहीही होऊ दिले तर बहिण भाऊ या नात्याचा सूर बदलेल. घरोघरी सारखेच सुख नांदेल पण आपला समाज एवढा सुशिक्षित नाही. बहिण भाऊ हा भेद या समाजात कायमच राहतो.

काही कारणाने भाऊ माया पातळ करतो. बहिण मग मुलांना चंदामामा बघ म्हणून, चंद्राला भाऊ मनाते. ओवाळते. भाऊराया दूर असला तरी, तो निदान आई वडिलांना सांभाळतोय ना, मग ठीकच आहे, असे  म्हणत बहीण तात्पुरता दिलासा स्वतःला देते. सासरी बहिण "लेऊ लेणे गरीबीचे, चण खाऊ लोखंडाचे." म्हणून खुशीत, अथवा कशीतरी दिवस काढते. पण आंब्याचा मोहोर येताच माहेरची आठवण येऊन म्हणते. भावाला पाठवून वडिलांनी मला बोलावून घ्यावे.

“अब के बरस भेज भैया को बाबुल, सावन मे लेले बुलाये.”

बहिण भावाचे नाते असे रक्ताचे असते पण हक्काचे नसते. जवळ आहे तरी दूरदूरचे असते. बालपणीची लुटुपुटीची भांडणे, भातुकली, शाळा, फटाके, आईजवळ झोपण्यासाठी जागेवरून केलेली मारामारी, रुसवा फुगी, वेळेवर न आल्यास वाटणारी काळजी, आजारपणातील खस्ता सर्व सर्व आठवतच राहते, आठवणीत ऊरते.माहेरच्या वाड्यातील हा भिडू म्हणजे भाऊ एक कच्चालिंबू असतो. रडीचा डाव खेळतो. राज्य गेले कि डाव मोडतो. पुढे तोच भाऊ आज तरी भाऊ न्यायला येईल, म्हणून बहिणीला खोटी आशा लावतो.

नेसेन मी जुनी साडी चोळी

नाही मागणार नवी कोरी

खाईन मी शिळी पोळी

मागणार नाही ताक तपेली

आईबापासाठी व्याकुळलेली

मी फक्त प्रेमाची आहे भुकेली

आई बापांची लेक लाडली

वाट पाहते भाऊ राया मी खुळी

वेड्या बहिणीची वेडी माया,

जाणून भाऊराया भेटीला या !

**********************

## ९८ परीक्षण

## “नाते शब्दांचे एक गर्भरेशमी चिंतन “

नाते शब्दांचे, हे शुभांगी पासेबंद यांच छोटेस पुस्तक म्हणजे शब्दाच गर्भ रेशमी चिंतन आहे. माणसाच शब्दाशी नात जन्मल्यावर रडल्या बरोबर सुरु होत ते “हे राम” म्हटल्यावर संपत, या संपूर्ण प्रवास्त माणसाशी शब्दांच केवढ अतूट नातं गुंफल गेलंय ते त्या या पुस्तकात उलगडतात.

नाते शब्दाचे नक्की कसे, आधी असे तर कधी कसे,

कधी कुणालाही समजेलसे कधी अनाकलनीय ठसे.

प्रेमाच्या अरुंद गल्लीत दोन व्यक्तींना एकदम जाता येत नाही. दोघांना एकरूप होऊनच जावं लागतं. तद्वत शब्दांशी एकरूप होऊन प्रेमाच्या गावा जावे असे त्या सांगतात.

शब्दांची विविध रूपं त्यांनी मोठ्या विलोभनीयरित्या रेखाटली आहेत. शब्द कधी झुळझुळत्या वाऱ्या सारखे देखणे, कधी काटेरी, कधी टणक, चिलखता सारखे, कधी नवजात. कधी रोचक, कधी कंटाळवाणे असू शकतात.

शब्दांना त्यांच्या अर्थाप्रमाणे त्यांनी दिलेल्या उपमाही चपखल आहेत. जसे साधे हलके शब्द पोपकोर्न लाह्या सारखे असतात. काही शब्द दुधा प्रमाणे, वा खिरीप्रमाणे ओघळतात. म्हणी म्हणजे जणू आटवलेल्या दुधाचे माव्याचे पदार्थच. वाकप्रचार म्हणजे मोजक्या शब्दात आशय सांगणारे काटेरी हलव्याचे अलंकार.

पुस्तकाच्या पानापानावर विखुरलेली, संत साहित्याची पखरण लेखिकेचा सदर विषयातील अभ्यास व्यक्त करते. उदा. शब्दांचे महत्व सांगताना त्यांनी समर्थ रामदास स्वामींच्या रचनेचा आधार घेतलाय.

अक्षर सुंदर वाचणे सुंदर

बोलणे सुंदर, चालणे सुंदर

भक्तीज्ञानवैराग्य सुंदर, करून दावी.

"आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने" म्हणणाऱ्या संत तुकारामचे उचित मुखपृष्ठ पुस्तकाला लाभले आहे. तसेच डॉ. प्रकाश खांडगे व डॉ. विजया वाड यांनी केलेल्या कौतुकामुळे पुस्तकाचे साहित्यिक मूल्य उंचावले आहे. एकूणच "नाते शब्दाचे" हा शब्द खजिना वाचकांना समृद्ध करून जाईल असे वाटते.

तरीही दत्ता हलसगीकर यांच्या अस्मिता" या कवितेचा समावेश व्हायला हवा होता असे वाटत राहतं. शब्दांना वेळीच सावरले म्हणून बरे झाले.

नाहीतर शब्द भलतेच बोलून गेले असते.

शब्दांना माघारी बोलावले म्हणून बरे झाले

नाहीतर शब्द छेद करून पार गेले असते.

शब्द तरुण बंदुकीच्या दारू सारखे ज्वालाग्राही

अस्मितेच्या खाली पोट असते हे त्यांना माहित नाही.

*****************

# ९९ बाणगंगा, आमची मुंबई

मुंबई, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस वरुन पुढे वाळकेश्वर बसने आम्ही बाणगंगा तलावाच्या सहलीला गेलो.

1965 साली, वडिल मला वाळकेश्वर, आणि बाणगंगा, बघायला, घेवून गेले होते.

त्या नंतर, कितीतरी वेळा मी मुंबई ला आले, पण परत, त्या दोन ठिकाणी जाणे जमत नव्हतं. राज भवनात मोर आला, तीन बत्ती चौकात मोठी ईमारत ऊभी राहिली, बाणगंगा महोत्सव, या तलावाच्या सभोवती होई, रोशनाईसह आयोजित केला होता, इत्यादी बातम्या वाचल्या की, तो निसर्ग सौंदर्य पुरेपूर अनुभवत होतो तो परिसर आठवे.

समुद्र, समुद्र किनारा, त्या लाटा आठवणीत येऊ लागतात.

मग जाऊ, कधीतरी योग, येईलच, असा टाळलेला योग आला.

बाणगंगा तलावा जवळ पोहोचलो. मलबारहिल, तीन बत्ती परिसर, आता पार बदलला आहे.मात्र त्या उंच ईमारतीत, बाणगंगा तलाव मात्र तसाच असतो.

ठेविले अनंते तैसेची राहावे

तुका म्हणे जे जे होईल ते ते पाहावे,

असे म्हणणाऱ्या साधूसारखा निवांत आहे, काळे हीरवे पाणी,

दगडी पायऱ्या, जिथे तुरळक लोक येतात .

विविध कथा

बाणगंगा तलावाच्या नावापासूनच कथा कहाणी सुरू होते.राम लक्ष्मण सीतामाता, या परिसरात फिरत होते. श्री रामांना, तहान लागली, त्यांनी लक्ष्मणाकडे पाणी मागितले. समुद्र किनारी गोड्या पाण्याच्या शोधात जावे, असा विचार असताना, श्रीरामाचे आज्ञेनुसार, लक्ष्मणाने बाण मारला.पृथ्वीतून गंगा प्रकटली, म्हणून तिचे नाव बाणगंगा.

दुसरी कथा आहे, की शिवपूजन करण्यासाठी सीता मातेने, वाळूची पिंड बनवली, ( तीच वाळूकेश्वर) मात्र अभिषेक करायला गोडे पाणी हवे होते, समुद्राचे खारे पाणी नको होते.प्रभु श्री रामांनी  जमिनीवर बाण मारला.जो तलाव तयार झाला, त्याचेच नाव बाणगंगा पडले. पाणी पिताना, गंगा गंधासारखे गोड लागले, म्हणून बाणगंगा नाव पडले.

परिसर

बाणगंगा तलावाच्या बाजूला, जवळपास  28 मंदिर आहे. वाळकेश्वर मंदिर बाराव्या शतकातील आहे.सुंदर दगडी दीपमाळ आहे.

विविध पूजा

विविध पूजा, धार्मिक विधी, जलस्नान, अर्ध्यदान, ईशस्तवन, ई साठी, भक्त येथे येतात.काशी, वाराणसी, नाशिक, यांना तुल्य बळ असे बाणगंगा स्थान आहे.

ईतिहास

1127 साली शिहुरा साम्राज्यातील एका भक्ताने भिंत आणि पायऱ्या बांधून, तलाव, मंदिर सुस्थितीत ठेवले. काही कथित नासधूसी नंतर 1715 साली, एका भक्ताने दिलेल्या देणगीतून तलाव ठीक ठाक केला गेला.तलाव चौकोनी असून, चारही बाजूंनी 16  पायऱ्या आहेत.काही पायऱ्याची तूटफूट झाली आहे.बाणगंगा चा ऐतिहासिक तीर्थक्षेत्र दर्जा टिकून आहे. पण पडझड जाणवते.

उंच इमारतींच्या कोंदणात, बाणगंगा तलाव, अंगठीत जडवलेल्या पाचूसारखा दिसतो.

बाणगंगा तलावाची, दोन तासाची सहल, अल्प काळ, भेट खूप आनंद देवून गेली.

******

# १०० जना आजीबाई

या जगात बोलणे सोपे असते पण आजीसारखे खंबीर आयुष्य कुणीही सहज जगले नसते. तिने संसार छान केला. एकदा जेव्हा, वडील कामावर नव्हते तेव्हा रेल्वे यार्डातील अर्धे विझलेले कोळसे ती जमा करून आणि आणि अंगणात त्याची चूल करून,  जनाबाई आजी आणि आम्ही शेजारी,  बागेतील तयार मक्याची कणसे भाजून खावून दिवस काढत असू. आजींना दोन मुले होती. पण आजी पूर्ण गावाची आई माई होती. खरे शूर तो असतो जो अन्याय ग्रस्त असताना न्यायासाठी धडपडतो. अन्यायग्रस्त महिलांना मदत करत मार्गदर्शन करणे, आजी करी व इतरांना हि शिकवी.

त्या काळी आत्महत्येचा प्रयत्न करण्यारया स्त्रियांना सल्ला देणारा,  ग्रुप ती चालवी. जगात नाती बिघडणे, लग्नातला त्रास हा निराश करतो व हेल्पलेस, निराश स्त्री आत्महत्या करते. विस्कटलेली घरटी खूप असतात पण केवळ स्त्रीला संस्कृतीच्या नावाखाली त्रास दिला जातो. हरलेल्या व्यक्तीची हार समाज, एखादे नाटक बघावे तसा त्रयस्थ भावनेने बघतो, ते, वाईट असते, त्याचे वाईट वाटते. आजी निराधारांना आधार देई. बेवारस प्रेतांचे अंत्यसंस्कार स्व खर्चाने करी. इतरांचे प्रश्नाकडे दुर्लक्ष करू नका. असे आजी सांगे. वाईटपणा तिच्या पदरी नेहमी पडे. मोठे नुकसान सोसण्याची ताकद असेल, तर रिस्क घ्यावी असे न सांगता, ती प्रयत्न करून बघा असे सांगे. तडजोड करा पण मन मारून जगू नका असे सांगे.

आजीजवळ म्हणी, बटव्यातील औषधे, लोकगीते यांचा मोठा खजिना होता. “बारशाची गाणी, पाळणे, डोहाळे गीत, अंगाई गीते, ती खूप गाई. जात्यावर तिच्या तोंडातून दळता दळता आपोआपच ओवी तयार होई. तिला आधुनिकतेचे वावडे नव्हते. ती चायनीज जेवण, चाॅकलेटस्, केक घरी बनवी.

"हल्ली माणसाना सेवा हवी असते, पण ते माणूस नको असते.” एक मुलगा म्हणाला.

"माणसे माणूसघाणी झाली आहेत. प्रसिद्ध नटनट्या लेखिका देखील हल्ली वृद्धाश्रमात राहतात. जनाआजी तू तिथे राहा."दुसरा मुलगा म्हणाला

"वृद्धाश्रम म्हणजे सेकंड होम असते. निसर्ग रम्य घर असते." असे ती मुले सांगत असत.

कदाचित पुढे काय घडणार आहे याची जाणे जनाआजी ला होती.तिला पूर्वसूचनाच जणू काही मिळाली होती. दोन मुले असूनही आजीची गैरसोय सुरु झाली. यथाकाले आजीची रवानगी वृद्धाश्रमात झाली. आजीला भेटायला आज जावे, उद्या जावे म्हणत अनेक वर्ष निघून गेली. मध्यंतरी...

जनाआजी वारल्या.

म्हातारी मेल्याचे दुःख नाही, पण काळ सोकावू लागला आहे.

वृध्दाश्रमात वाढ होणे, कसचे लक्षण आहे?

*****

## ज्ञान्यांचे मागणे.

विश्व शांतीसाठी ज्ञानदेवांनी पसायदान मागितले. माझ्यासमोर देव आला तर मी काय मागीन?

मुलांसाठी मी मागेन

देव जरी मज कधी भेटला, माग हवे ते माग म्हणाला

म्हणेन प्रभू रे माझे सारे जीवन देई मम बाळाला.

नवी नवरी - कारे अबोला का रे दुरावा, अपराध माझा असा काय झाला?

श्री बंबानी - मला दुनिया मुठ्ठीत करायची आहे. करोडो करोडो रुपये दे.

श्री धंदाळी- सर्व धंद्यातला नफा माझ्या कडे येऊ दे.

श्री रस्ते- भर रस्त्यावरील मोक्याच्या जागा अडवून मला टपऱ्या टाकू देत.

श्री सनी- अपना सपना मनी मनी

अ नेताजी - गल्ली बोळात फुकट खर्च न करता, बॅनरचे, जाहिरातीचे भाडे न देता, सर्वत्र माझे फलक ब्यानर टांगून चकटफू प्रसिद्धी मिळू दे.

ब नेताजी- गल्लीतून दिल्लीत जायला मिळो.

क िवद्यार्थी - विद्या मिळो न मिळो परीक्षेचा पेपर, विकत मिळू दे.

प्रवासी नोकरदार- लोकलगाड्या वेळेवर येऊन, मला वेळेवर कामावर जायला मिळू दे.

गाडीवान- ट्राफिक जाम नासेलेले रस्ते मिळू देत.

शनी भक्त- मोक्ष मिळो

कर्जदार  कर्ज माफ होऊ दे.

ज्याचे त्याचे मागणे, ज्याला त्याला योग्य वाटते. अध्यात्मिक उन्नती न झालेले आपण सामान्य जन आहोत. आपल्याला आपल्या ऐहिक प्रश्न मोठे वाटतात. आपल्या छोट्या मागण्या योग्य वाटतात. ज्याचे त्याचे प्रश्न ज्याचे त्याचे मागणे.

विश्वशांतीचे मागणे मागणारे ज्ञानदेव महाराज एकमेव आहेत. पसायदान म्हणून श्रेष्ठ ठरते.

बाकी आपण मानतो ते पसाभर दान आपल्याला आवडते.

*****

# आठवा सूर

15ऑक्टोबर हा दिवस, सर ए पी जे अब्दुल कलाम, माजी राष्ट्रपती यांचे स्मरणार्थ वाचक दिन म्हणून साजरा केला जातो. वाचते व्हा, वाचू आनंदे, वाचाल तर वाचाल, असे संदेश आपण नेहमी ऐकतो.वाचन हा संगीतातला, आठवा सूर आहे असे मी सर्वत्र, सभांत सांगते . वाचनाची आवड, तो छंद खूप छान आहे, वाचनालयातून पुस्तक वाचून झाले, नीट बघितले, की परत देता येते.वाचनाची छंद, निर्मळ, विनात्रास असतो.

पुस्तक ही मित्र आहे का हे मुखपृष्टावरुन बघायला हवे. असताताच. माणसांना किंमत देऊन विकत घेता येत नाही.माणसांना हवे तेव्हा या, आपल्या ला नको तेव्हा, जा म्हणता येत नाही.पुस्तकाचे तसे नसते.ती गुपचूप कपाटात , रद्दीत, फुटपाथ वर, रॅकवर पडून राहतात.हवी तेव्हा वाचता येतात.

अर्धी वाचून बंद करता येतात.चहा, पार्टी मागत नाही, मानापमान नाटके करत नाहीत. पुस्तकासारखे मित्र नाहीत.

मी 1 जानेवारी पासून खूप संकल्प करते , गाणी शिकायचे, सात सूर आळवते. मी आरंभशूर आहे.संकल्प 1 नाही सात अधिक एक आठ सुरांना आळवायचा करते. कारण विश्वास आहे मला आठवा सूर साथ सोडणार नाही .समोरच्या करता माझे संकल्प खूप सोपे वाटता त, पण माझ्या करता पृथ्वी प्रदक्षणा परवडली असे अवघड असतात .ही वाचा यादी, उद्या पासून रोज 5 ला उठून फिरायला जायचे, चहात अजिबात साखर टाकायची नाही, जेवणात वरून मीठ अजिबात टाकायचे नाही, रोज च्या वस्तू म्हणजे टू व्हीलर ची, चारचाकी ची, घराची किल्ली, पेन, पाकीट, एकाच जागेवर ठेवणार. सगळया संकल्पाची अशीच मी वाट लावली आहे मी

.आठवा सूर मात्र धरलाय.एक संकल्प मात्र मी गेले कैक वर्ष मनापासून केला आहे आणि तो पाळतो आहे, तो म्हणजे नातेवाईक, दोस्त, शेजारी पाजारी यांच्या कडून दिवाळी अंक किंवा 70 च्या दशकातल्या फाटलेल्या असो, जुन्या, अथवा नवीन  कादंबऱ्या मी दिनवाणा चेहरा करून गोड बोलून काय वाटेल ते करून मागून घेतो, मी ते करायला लाजत, अनमान करत नाही.पुस्तक परत आठवणीने परत देण्याची "सवय तर  आहे" हो .रद्दी सुध्दा वाचते.

तर मित्रांनो वाचते व्हा.

वाचनाला आठवा सूर माना.

अवघड आहे, मान्य आहे मला

वाचते व्हा.

## १०१मै मेरी फेवरिट हूॅं!

जब वी मेट, या चित्रपटात नायिका, आपल्या मित्राला म्हणते की “इतरांना मी आवडते की नाही, मला काय फरक पडतो, मै मेरी फेवरिट हूॅं!”

“मीच एक शहाणा, मीच एक बाजीराव!” अशी टीका आपण ‘आत्मविश्वासू, आनंदी, थोड्याशा अहंकारी’ लोकांवर करतो. पण स्वत:चे स्वत: आनंदी असणे, जगात आवश्यकच असते. तुम्ही सांगा, आपला आनंद इतरांवर का अवलंबून ठेवायचा? आपण कुणाचे लाडके नाही ही गोष्ट खरेच खूप खुपते. पण काय करायचे, परिस्थिती बदलणे शक्य नाही तर मनस्थिती बदला असे आपण नेहमी सांगतो. मी तर माझ्या “मनाची मशागत” कार्यक्रमात ते ठासून सांगते.सांगणे सोपे असते पण ते जमणे सोपे नसते. तुम्ही सुमार आहात, हरकत नाही. लोक तुम्हाला अपमानास्पद वागवतात, तुमच्या बनवलेल्या खाद्यपदार्थांना, तुमच्या आवडी निवडींना, कपड्यांना, नावे ठेवतात, पीठ पीछे टिका करतात, हरकत नाही.तुम्हाला मैत्रिणी नाहीत, मूर्ख कुणी तुम्हाला एकटे पाडतात, घाबरू नका, ‘बी ब्रेव्ह’!

हरवलेल्या क्षणांच्या आठवणी, जीवनात ताटातूट, तत्वहीन भांडणे, उगीचच होणारी भांडणे आपल्याच नशिबी का? होते असे, जाऊ दे, सोडून द्या! त्या त्रासाला, प्रतिसाद कसा द्यायचा, हे तर तुमच्या हातात आहे. तुमचा दृष्टीकोन चांगला ठेवा, मनाशी म्हणा ‘बी ब्रेव्ह’!

मै मेरी फेवरिट हूं।त्या लोकांची कुवत नव्हती मला जाणायची, त्यांच्या जागी ते, माझ्या जागी मी ग्रे ट आहे.

हम तो ये समझेंगे हमने एक पत्थर पूजा।

लेकिन तुमको अपने जैसा, नही मिलेगा दुजा।।

चालते व्हा

घराबाहेर पडा, फिरायला जा.आहे त्यात, आयुष्यात काहीतरी खुपतेय, कंटाळा आलाय, जिवनाला काही अर्थ नाही, असे वाटत असतांना, ज्यष्ठांचा आशीर्वाद, गुरूंचा पाठीवर ठेवलेला हात, मैत्रिणीची गळाभेट, पाळीव प्राण्याचा स्पर्श, काल्पनिक स्पर्श, एखादा लेख, साधा विचार, गप्पा आनंद देवून जातात. विचाराचे अशा स्पर्शाने मूड बदलतो. थोडीफार नकारत्मकता, तुलनात्मक रित्या, थोडा वेळ तरी कमी होते. मन शुध्दी होते. मौनात बसता येते. गाॅसिप

मूर्ख गॉसिप व व्हाटस्अॅप तर रोजचेच असते. ऋतू बदला मूळे कधी नाराज वाटते.बाहेर जावेसे वाटते, पण सोबत नाही.दर वेळी दर ठिकाणी कोणी सोबत कशी मिळणार? मग आपण एकटेच कुठेतरी जावेच लागते. एकटे फिरायला देवदर्शन सोप्पे तसेच सुविधाजनक फिरणे आहे.

देवदर्शन

देवळे गावबाहेर असतात.तिथे जाणे हे एक मूड एलीव्हेटर असते. सिमेंटच्या जंगलातून दूर कधी मुसळधार पाऊस अनुभवायला जा. कधी उन पावसाचा खेळ असतो. ताजीतवानी हिरवळ वेगवेगळया रंगछटात असते, गवत देखील एकसूरी नसते.( जसे की प्रत्येक माणूस वेगळे असते.) रानफुले फुललेली असतात. देवळा भोवती रंगीबेरंगी फुलांचे हार, प्रसादाचे स्टाॅल, विविध माणसे, विक्रते, भिकारी बघा. त्यांच्याकडे काय खुप सुखं असतील काय? काही माणसे, भक्त, रागावलेले, आजी चिडकी असते, तर काही आनंदी असतात. मनुष्य स्वभावाचे इंद्रधनुष्य बघायला मिळू शकते.

बघा मनाशी ठरवा मी माझी लाडकी आहे. हृदयाला थोपटून “All is well” म्हणाच आणि खुष व्हा. आनंद मनात जागवा.

टिप्स देवू?

१ मन करा रे प्रसन्न

२दीर्घ श्वास घ्या

३फुलांचा सुगंध घ्या

४कुणाची तरी स्तुति करा

५लाडके गाणे ऐका

६आरशासमोर ऊभे राहून, स्वत:ला बघून म्हणा, तूच माझी लाडकी राणी आहेस

७गिरकी मारुन स्वत: भोवती फिरा

८दोन वेळा म्हणा “मै मेरी फेव्हरिट हूॅं।”,

या, चला आनंदी आणि फेवरिट बनू या.

*********

# १०२ गच्चीतल्या गप्पा

खरेतर उन्हाळया रात्री, वातानुकूलित खोलीत माझा जीव गुदमरतो. गावातले गच्चीत झोपणे आठवते.गावातली गार हवा, ती हिरवळ, ती बैठी घरे मला आवडते. फार पूर्वी तीस वर्षांपूर्वी पर्यंत, आजचे सारखे, घरोघरी वातानुकूल करणारे यंत्र क्वचितच असे. बाकी उन्हाळ्यातील गर्मीला तोंड देण्यासाठी खसचे पडदे, माठातले पाणि, कलिंगड खापा, अोले पडदे, पंखे, क्वचित कूलर हेच उपयोगात आणत.

रात्री

दिवस कसातरी जाई, पण उन्हाळयात, गच्चीतच रात्री गाद्या अंथरुन, झोपायची पध्दत रुढ होती. संध्याकाळी सहा वाजता, गच्चीतल्या त्या झोपायच्या जागेवर, पाणी शिंपडून, हंडा पेला ठेवून, घरची गृहिणी, रात्रीच्या त्या गच्चीतल्या गप्पांची आणि झोपण्याची तयारी करत असे. काका एखादा कंदिल / विजेरी जवळ ठेवत असत. सुर्य मावळला, की एकेक व्यक्ती गच्चीत येई. रात्री एकेक चांदणी उगवावी, तसे एकेक महाभाग, एकेक जण वर येई आणि गच्चीच्या पॅरापेट वर बसून गप्पा सुरू होत. रोज काहीतरी घडतच असे, प्रत्येक क्षणी! त्यामुळे गप्पा रंगत. एखादी काकू रेडिअो, टीव्ही समोर बसे, पण लवकरच तिचा त्या घरात, एकटेपणात, भावनांच्या कोलाहलात, जीव गुदमरायला लागे. आपल्याला अहंकार ठेवून एकटेच राहावे लागेल, हे जाणून चांदणे सांडलेल्या, गच्चीत ती हजर होई. रात्रीचा बराच वेळ ग्पा गजाली चालत, झोपणे कमी त्याऐवजी, गप्पांमध्येच रात्र संपे.

कायपे चर्चा?

बोलायला विषय काय?

“केवळ आवाज म्हणजे चेतना नव्हे, गप्पा हव्यात, ” आजी म्हणे.

“या गप्पा की चिडवाचिडवी, की एकमेकाला टोमणे मारणे?” मोठ्या वहिनी.

“मुले भांडतात, शब्दांनी चावतात, ” दादा.

“असू दे कुटुंब आहे, ” आजोबा.

“त्या नातेवाईकांपेक्षा मित्र बरे, ” एखादा तरुण.

“अरे मुलांनो, मित्र दुरून राम, ठीक, नीट दिसतात, व्यवहाराची लक्ष्मणरेषा अ◌ोलांडली की त्यांच्यातला रावण खरे रुप दाखवतो, ” दादा.

“या जगात आल्या बरोबर श्वास घेण्यासाठीही रडावे लागते. मात्र आपण जेवण सहज मिळते म्हणून खात सुटतो. जरा जास्तीच जेवलो मी, ” काका.

“खाण्यासाठी जगू नाही, जगण्यासाठी खावे. स्वत:ची चूक कबूल करणे खूपच अवघड असते, मग आपण खात सुटतो, ” डाएट करणारी एखादी तरुणी.

मला असे म्हणायचे होते, माझ्या बोलण्याचा तसा तो अर्थ नव्हता, असे वाद देखील होत आणि होतात

गच्चीतील पॉट आईस्क्रिम

गच्चीत पॉट आईसक्रिमचा कार्यक्रम पूर्वी फार गाजत असे.हल्लि फॅमिली पॅक आणतात, कुलफी आणतात.

बाप रे डास

डास किडे चावू नये, म्हणून मच्छरदाणि बांधली जाते, किंवा मॅट, कॉईल लावतात.सुरक्षा, आरोग्य महत्वाचे असते.

संवाद

माझ्या मनातले, तुमच्या मनापर्यंत पोहोचवतो, ते मी सांगितलेले कळले, असे तुमची नजर सांगते, तेव्हा संवाद पूर्ण होतो.रात्री reading between lines वाला संवाद, चतुर कथनकार कल्पनेने पुर्ण करतो.वाच्यार्थ, लक्ष्यार्थ सांगतो.असे म्हणतात, ऊष्ण कटिबंधातील लोकांना वायफळ गप्पा मारायला खूप आवडते.

कथाकथन

गोष्ट कोण सांगते यावर, त्या गोष्टीची सत्यता अवलंबून असते.एकांगी, मसाला मारके, सांगितलेली गोष्ट, भाव खावून जाते.चित्रपटातसुध्दा दु:खद गीत गाणारा कलाकार, ते गीत गातो व राजा नाराज होतो म्हणून त्याच्यावर सगळे अन्य लोक रागावतात. तसे रडके लोक, या गच्चीतल्या गजालीत सुध्दा नकोसे असतात. अपरात्री गूढकथा, भूतकथा विनोद यांच्या कथा रंगतात.

रंगलेल्या गप्पा

हल्ली पूर्विसारख्या गप्पा रंगतच नाहीत, दणादण आज्ञेपेक्षा हळूवार बाता, गप्पा, थापा हव्या.नाजूक नाती, प्रवासात भेटलेला परका वाटसरु, रंगतदार निसर्ग, गप्पांना सर्व विषय चालतात.

सुहानी चांदनी राते, हमे सोने नहीं देती

आजोबांचे ज्ञान

आम्हाला आजोबा रात्री गोष्टी सांगत, ते भाव मला आजदेखील आठवतात.वाईट बघून नजर, हळुवार भावना मरु नये, म्हणून केलेले ते समुपद्देशन असे, असते.अध्यात्मिक घटना पासून,

ते क्ष ज्ञान, सारे ईथे मिळते.संपूर्ण कुटुंबातील, शेजारचे, विविध वयोगटातील, लोक एकत्र बसतात, बोलतात.

आनंदरंग

हिवाळ्यातील शकोटीभोवतीही अशा कथा रंगत आणतात. जुनाट रंगहीन जीवनातही, गप्पांनी आनंदरंग भरला जातो. म्हणून तर गप्पा “रंगणे” असे म्हटले जाते. रात्री चांदण्यांचि, चंद्रप्रकाशात दौलदारपणे चालणाऱ्या ढगांची चाल, आकाशरुप बघता येते.रात्र तृप्त शांत पहुडलेली असते, काजव्याची एखादी दिवटी चमकते.रंगसावल्या हलतात.रात्री गच्चीत झोपून, पक्षी अोरडला तरी घाबरणारी बाळे सुध्दा धीट होतात.पेगुळलेल्या डोळयांनी चांदण्या बघत रात्र संपते. पहाटे उजेड आणि प्रकाशाचा गोंधळ होतो.

पहाट

संपलेल्या रात्री, वापरलेल्या चादरी, ढीग करुन अस्ताव्यस्त पडलेल्या असतात, मात्र पहाटे कोरा करकरीत दिवस क्षितिजावर उभा दिसतो.चांदण्या असतील तर पाूस पडत नाही, असे मत आहे.पण तरी रात्री एखाद्या वेळी पाऊस कोसळू लागतो किंवा चार शिंतोडे तरी येतात. मग सर्व झोपण्याचा पसारा, गाद्या, पांघरुण घेवून, जीना उतरुन घरात खाली जायचे. घरात गरम होते, पाऊस चकवा देतो, मग परत गच्चीत यायचे! शांत झोप लागायला पहाट होते. पूर्व दिशा फटफटू लागते, रंग रेषा उधळतात, मग अंग आणि रंग वेगळे उरत नाहीत.

दुसरा दिवस सुरु होतो.

गच्चीतील गप्पा, मनाच्या कोपऱ्यात लपून बसतात, रात्री बाहेर येण्यासाठी।

## १०३पेपरवेट

पेपर वाचून झाला , जेव्हा सकाळ झाली
गंगुबाई टीव्ही समोर, आरामात बसली ||धृ||

थोडी गाणी बघून, मग आंघोळ करू
म्हणत बारा वाजेतो, बघतच बसली
जेवणाच्या वेळी, बाई भरपूर जेवली
बोडण भरलेली ताटली, तिथे सरकवली ||१||

दुपारच्या मालिका, बघतच झोपली
उठल्यावर लाडू  चिवडा आणि पोळी,
चहा पिवून पुन्हा गाण्यात रमली
रिमोटनेच च्यानल बदलत राहिली ||२||

रात्री ऑफिसमधील मंडळी  घरी आली
पार्सल चिकन बर्गर वडापाव जेवली
पुन्हा सर्वजणासोबत, गंगू टीव्ही बघत बसली

गंगुबाई टीव्ही समोर पेपरवेट झाली ||३||

अशीच न जाणो किती वर्ष उलटली

गंगुबाई वजनाने शंभर किलो झाली

डाएटको, व्यायाम को मारो गोली

पेपरवेट आज तर  सारीच झाली ||४||

**********

# १०४निष्पाप गाणी

काही गाणी खूप छान असतात.खूप गर्दीच्या ठिकाणी एकाकी वाटावे, खूप आनंदाच्या क्षणी उगीच डोळे भरून आणतात.रंग उडालेल्या आयुष्यात परके व पोरके करून सोडावे असे एखादे लाडके गाणे प्रयेकाचेच खास असतेच. त्या गाण्याचे बोल कानी पडले कि मनाच्या कोपऱ्यात रुसून बसलेले ते मुल, त्याचे अस्तित्व दाखवून देते. साधारणतः एका पन्नास वर्षाच्या पूर्वीची गाणी, हि याच पद्धतीची निष्पाप गाणी होती. जी थेट निष्पाप बालवयात नेतात. सुवर्णसंस्कृतीचे ते क्षण होते .माणसे साधी होती. बोलीभाषा समृद्ध होती. संस्कृतीच्या जतना मध्ये, ओव्या, गाणी कविता, लोकगीते जनमानसात रुजली होती.

“लेऊ लेण गरीबीचे, चणे खाऊ लोखंडाचे

धनी मातुर माझा देवा, वाघावानी असू दे.

सर्व नाते संबंधांची जाण असलेली गाणी हि कौटुंबिक जिव्हाळा दाखवत.

“सावळा बंधू राया साजिरी वहिनीबाई

गोजिरी सोयरा शिरपा मायेच्या बहिणी

वाटेन माहेरच्या धावत मन जात.”

कलाकुसरीने वर्णन करणारी, तरल प्रेम अबोधपणे संयमितपणे व्यक्त करणारी काही गाणी बघा.

“मानसीचा चित्रकार मी तुझे निरंतन चित्र काढतो.

“हात तुझा हातात हवा, “

कुणीतरी आयुष्यात यावे सांगणारे, अगदी “आज कुणीतरी यावे, ओळखीचे व्हावे.” “काय बाई सांगू, ” “सप्तपदी हि रोज चालते....” “बाई बाई मनमोराचा कसा पिसारा फुलाला..”. आईच्या कष्टांचे रूप बदलले, तरीही मातृत्वाच्या वेदना त्याच राहिल्या.

“लिंबलोण उतरू कशी असली दूर लांब तू

इथून दृष्ट काढते निमिष एक थांब तू”

पावसाच्या वर्णनाची गाणी लेखकांचा मास्टरपीसच होती.

“प्रियावीण उदास वाटे आज....” श्रीरामाचे प्रतिबिंब गीतात आढळे.

“वनी धाडला राम, कैकयीने वनी धाडीला राम .....” प्रेमाची वेदना असे ..

“अखेरचे येतील माझ्या हेच शब्द ओठी.... लाख चुका असतील केल्या केली पण प्रीती..”

“केशवा माधवा तुझ्या नामात रे गोडवा..”

“जग हे बंदी शाळा

जो आला तो रमला ... “अशी खंत  गाणी व्यक्त करत असत.

“आली हासत पहिली रात” असा सौम्य शृंगार असे.

धीरगंभीरपणे व्यक्त केलेले जीवनाचे तत्वज्ञानहि असे.

“एक धागा सुखाचा, शंभर धागे दुखाचे,

जरतारी हे वस्त्र मानवा तुझिया आयुष्याचे.”

बालपणीची बडबडगीते हि सुंदरच होती.

“झुकुझुकू झुकुझुकू आगीन गाडी

धुरांच्या रेषा हवेत काढी,

पळती झाडे पाहुया, मामाच्या गावाला जाऊया “

“सांग सांग भोलानाथ पाऊस पडेल काय ?”

“नाच रे मोर आंब्याच्या बनात”

पौगंडावस्थेतील मुलांची हि गाणी होती

“गोरी गोरी पान फुलासारखी छान

दादा मला एक वहिनी आण.”

ताईला स्थळ बघायला पाहुणे येणार, ताईचे लग्न होणार ह्या बद्दलचे हे गाणे

“ताई मला सांग, मला सांग, कोण येणार ग पाहुणे....”

लग्न ठरले, की, “गोड गोजिरी लाज लाजरी ताई तू होणार नवरी

फुलाफुलांच्या बांधून माळा, मंडप घाला ग दारी.”

नवरिची अवस्था सांगणारे गाणे -

“लेक लाडकी या घरची होणार सून मी त्या घरची ....” तर आई वडिलाचे मन व्यक्त करणारे...

“गंगा यमुना डोळयात उभ्या का?

जा मुली जा दिल्या घरी तू सुखी रहा…”

अंगाई गीतामध्ये सुद्धा ममता भरलेली होती.

“लिंबोणीच्या झाडा मागे चंद्र झोपला गं बाई..

आज माझ्या पाडसाला झोप का गं येत नाही..”

बाळाच्या प्रेमात सुद्धा मातृत्वमय असलेली गाणी ..

“बाळा तुझ्या मुले मी झाले आई, होऊ कशी उतराई..” “भाग्य दिले तू मला “

“अरे संसार संसार छोटा कधी म्हणू नये.

राउळाच्या कळसाला लोटा कधी म्हणू नये.”

“राम जन्माला ग सखी राम जन्माला…” असे राम नाम असे.

“गुणी बाळ असा जागशी का रे वाया

नीज रे नीज शिवराया “, असे प्रेम असे.रामाचा पाळणा बारष्याला गायला जाई.

“राम जन्माला ग सखे राम जन्माला “

बाळ झाल्यावर आईपणाच्या जबाबदारीतून आलेला त्याग हि येतोच.

“देव जरी मज कधी भेटला, माग हवे ते माग म्हणाला, म्हणेन प्रभू रे, माझे सारे, जीवन देई मम बाळाला”

कधी मग विरहाचे प्रसंग येतात. आईला मोलकरीण म्हणून राहावे लागते. किंवा जावे लागते .

"अखेरचा हा तुला दंडवत.. सोडून जाते गाव, " म्हणून निरोप घेणे हि दर्दभरे असते.

"जिथे सागरा धरणी मिळते तिथे तुझी मी वाट पाहते." अशी आतुरता असते. तुझ्या विना जगू कशी म्हणून अश्रू ढाळतानाहि खानदानीपणाचा बाज आपल्या या गाण्यांनी कधी हि सोडला नाही.

भक्ती गीतांमध्येहि, भावगीतानामध्ये हि व इतर गीतांमध्येहि सोज्वळ प्रतिमाच भरलेली असे. भूतकाळाबद्दल अवास्तव प्रेमामुळे लिहिते असे समजू नका. त्या गाण्याचे अभिजात सौदर्य आठवा.

"हे चिंचेचे झाड दिसे मज चिनार वृक्षा परी

दिसशी तू नवतरुणी काश्मिरी "

"मयुरा, फुलवीत ये रे पिसारा.."

"बगळयांची माळफुले अजुनी अंबरात."

निसर्ग वर्णना सोबतच उदास विराणी असे

"भेट तुझी माझी स्मरते अजून त्या दिसाची

धुंद वादळाची होती रात्र पावसाची..."

"चांदण्या रात्रीतले ते स्वप्न तू  विसरून जा.

मी कधी होते तुझी हे सर्व तू विसरून जा..."

"हा माझा मार्ग एकला..."

थरथरत्या हातानी आशीर्वाद देणारे वृद्ध आठवीत  डोळयात पाणी आणणारे. गीत, ,

“एकवार पंखावरुनी फिरो तुझा हात

शेवटचे घरटे माझे तुझ्या अंगणात...”

सर्वांची शेवट काहीशी भैरवीत होते, म्हणूनही शेवटी मोडलेल्या भातुकलीसाठी खंत काढणारे, पुढचे गाणे आठवा....

“भातुकलीच्या खेळा मधली राजा आणिक राणी

अर्ध्यावरती डाव मोडला अधुरी एक कहाणी “आताची “कोंबडी पळाली “अशी गाणी गर्दी करतात, खरी गेय, निष्पाप गाणी हरवली आहेत.

.....

# १०५ चला गप्पा मारू या

रोज, सुंदर सकाळचा, पहिला चहा, तिघे एकत्र घेतांना मला सोबत, गप्पा लागतात. त्यादिवशी सकाळचा पहिला चहा घेतांना, मुलाला विचारले, "अरे, गप्प गप्प का? गप्पा

मार." किती नवल बघा की गप्पच्या, विरुद्ध गप्पा हा शब्द येतो.

नवरा म्हणतो “गप्पांना विषय नको का?”

मी: “गप्पांना फक्त दोन माणसे लागतात, विषय नसला तरी चालतो.”

मुलगा: “आई याचे संदर्भासह स्पष्टीकरण कर बघू.”

मी: “मला फक्त संदर्भासह अस्पष्टीकरण करुन, गोंधळ निर्माण करता येतो.”

नवरा: “गप्पांना गंभीर विषय हवा, गप्पा मारायला ऊर्जा हवी, चर्चेत आवाज चढायला हवा.”

मी: “ती काही दूरदर्शनची चर्चा नाही, गप्पांना फक्त दोन माणसे हवीत.”

मुलगा: “मुकी बहिरी चालतील?" Mobile वरच्या, WhatsApp वरच्या, गप्पाच असतात का?.”

मी: “चालेल की, गप्पा मारता येतात whatsapp वर, त्यांना पण! पण अती त्या mobile चे डबीत रमू नये.”

तर, मित्र मैत्रिणींनो, मोबाइल मधल्या आभासी जगात घुसू नका! गप्पा मारा.वेळ मिळेल तेव्हा, वेळ घालवायला, गप्पांना दोन माणसे लागतात. वाचक - लेखक, नट - प्रेक्षक, कलाकार - रसिक, बोलणारा - ऐकणारा. विषय असला नसला तरी चालते. बोलतांना मिळतोच काहितरी विषय!

उदा: हवामान! फार उकाडा होतोय. यावर्षी पाउस कमी झाला.

उदा: महागाई फार वाढली आहे. डायन महागाई. राजकिय पक्षांची कारकिर्द. देवदर्शन, सहली, नातेसंबंध, सिनेमा. सध्या सर्वात चलतीचा विषय - आरोग्य, वजनवाढ, कपडे, नाटक, कलम ३७७, लिव्ह इन रिलेशनशीप, बिघडलेली तरुण पिढी अथवा हट्टी मागची पिढी, झाडे लावा, स्वच्छता करा, पाककृती, चवीचे नखरे, लोकल गाड्या, वृध्द गृहस्थ .

चांदोबा मध्ये, विक्रम आणि वेताळ रात्रीचे गप्पा मारायला सुरुवात करतात.अरेबियन नाईट्स, च्या एक हजार कथा, गप्पा आहेत.भुताटकी च्या कथांचे मूळ, गप्पा हेच असते.

- या वर्षीची नैराश्य दूर दूर करण्याचा ऊपाय करायची, थीम आहे, बोलते व्हा, speak it out, तर बोलते व्हा. अोळखीच्यांशी, अर्ध्या अोळखीच्या लोकांशी, थोडी रिस्क घेण्यायोग्य वाटल्यास परक्यांशी देखील, गप्पा मारा. कुणीतरी शोधा. नाही कुणी मिळाले तर, स्वत:शीच, मनातले मनात गप्पा मारा. नाही तर पुस्तक वाचून, त्या पुस्तकांशी बोला.गप्पा मारुन मानसिक तणाव कमी होतो, असे शास्त्रात सांगितले आहे. चला गप्पा मारू या.

सकाळचा पहिला चहा आलाय, त्यासोबत किंवा त्याव्यतिरिक्त देखील बोला. गप्पा महत्त्वाच्या. काहीही बोला, गप्पा मारा!

*******

## 10६ पारिजातकाची फुले

पारिजातकाचे फुलाला, night Jasmine, or  हरसिंगार म्हणतात. कधी कधी सुभद्रेचे झाड पण म्हणतात. देठ केशरी, अशी, हाताचे बोटाचे पेराएवढी लहान, पांढरी फुले खुप नाजूक असतात. पहाटे अंगणात या झाडाखाली या फुलांचा सडा पडलेला दिसतो. सुर्योदयानंतर ती फुले कोमेजतात. बहरला पारिजात दारी, फुले का पडती शेजारी - असे ही यांचे वैशिष्ट्य आहे.

घाल, घाल पिंगा वाऱ्या माझ्या परसात, माहेरीच्या सुवासाची कर बरसात

या आवडत्या, गाण्याच्या एका कडव्यात खालील अोळ आहे -

अंगणात पारिजातकाचा सडा पडे, फुले वेचायला नेशील तू गडे

अशी पारिजातकाच्या सुगंधाची तुलना माहेर अंगणीच्या गंधाशी केली जाते.

अमर प्रेम चित्रपटात शर्मिला टागोर ही गणिका असते. नंदू नावाच्या, शेजारी राहणारे बालकाला, ती पुत्रवत वाढवते. या नंदू सोबत ती अंगणात पारिजातकाचे झाड लावते. म्हणजे परक्याला आपले मानणे, याचा संबंध पारिजातकाशी, असाही असावा. पारिजातकाच्या झाडाखाली रात्री जाऊ नये, बुंध्याखाली साप असतात, असे बुजुर्ग सांगतात.  ही फुले फार काळ टिकत नाहीत, त्यावरुन अशी नाती दीर्घकाळ राहात नाहीत अशी अल्पायुषी नातेसंबंधांची कहाणी प्राजक्त सांगतो म्हणे. संध्याकाळी घरट्या कडे परतत असतांना पक्षी गोंधळून जातात आणि दिशाहीन फेऱ्या आकाशात घालतात. त्यावेळी म्हणे याच पारिजातकाच्या सुंगधावरुन, ते आपल्या निवाऱ्याचे मुक्कामाचे झाड शोधतात. पक्षांसाठी दिशादर्शकाचे काम सुध्दा पारिजातक करतो. पारिजातक फॅन क्लब सुरू करावा असे मला वाटते. सहसा ही झाडे बागेत, वनात, उपवनात वाढतात. मला असे वाटते -

लाखो तारे आसमान में एक मगर ढूंढे ना मिला।देख के दुनिया की दिवाली दिल मेरा चुपचाप जला

हे गाणे पारिजातकाचे फुलांनी बहरलेले झाड बघून, लेखकाने लिहिले, नायकाने म्हटले असावे. कारण पारिजातकाच्या फुलांच्या अोंजळीचा / परडीचा एकत्रित आनंद घ्यावा लागतो. इतर फुले - जास्वंद, गुलाब, चाफा, कमळ एकेकटे सुध्दा, पुरेसे होतात.

आॅक्टोबर नावाच्या हिंदी चित्रपटात आॅक्टोबर महिन्यातच फक्त ही फुले उमलतात असा उल्लेख आहे. तो तितकासा खरा नाही. या झाडाच्या बिया चपट, गोल तांब्याच्या पैशाच्या आकाराच्या असतात. सर्व फुलांच्या सुगंधाची अत्तरे बनतात पण हा पारिजातकाचा सुगंध बनवणे खुप अवघड असते. पांढऱ्या पाकळया आणि अष्टगंध अथवा शेदुराचा जो केशरी रंग असतो, तशा त्या केशरी देठाची ही फुले अगदी एकमेवाद्वितीय आहेत. पारिजातकाची झाडे हल्ली तर शहरात दिसेनाशीच झाली आहेत. मी कालच कुंडीत लावला आहे, बघू जगतो का, जगला तर फुलतो का, ते ही बघू.

******

# १०७ आनंदशास्त्र

हो! आनंदाचे पण शास्त्र असते. एका देशाने जसा आनंद मंत्री नेमला, नेमके तसे आनंद शास्त्राबद्दल संशोधन चालू आहे.दुःख, विविध, प्रश्न असताना देखील थोडे फ्रेश वाटण्यासाठी हे शास्त्र मानवाला उपयोगी पडेल. आता आंनद पुरे, देवा सुख बास, असे कुणीही म्हणत नाही. अजून आनंद हवा असतो. कारण समाधान नाही. तो आनंद मिळवण्यात हे शास्त्र मदत करेल.

अ) दुःख देणाऱ्या गोष्टी खूप असतात.

1) इच्छा 2) ध्येय 3) तुलना 4) बकेटलिस्ट पूर्ण करायची घाई 5) सहानूभूती नसणे अथवा अति असणे 6) पोकळी वाटते 7) कायम बेस्ट राहण्याची इच्छा 8) लपवाछपवी .

आनंदी कसे व्हावे?

1)जीवनातील अडचणी, दुःखे, वर ऊल्लेख केलेल्या सर्व गोष्टी स्वीकारा. कुणाशी, तरी, कुणाशीही आपले प्रश्न शेअर करा, नम्र रहा. हे ही दिवस जातील हे लक्षात ठेव, गप्पा मारा, हसा, आभासी व्हायचा नात्यात रमू नका, कायम सेंटर ऑफ अटेन्शन, व्हायचा प्रयत्न टाळा, स्वतःचेच मुखवटे व सत्य यांच्यात वाद वाढवू नका, दुःखाच्या वेळी आनंद वाटावा पण दुःख इतरांना कळू नये म्हणून लपवाछपवी करु नका म्हणून प्रयत्न करा, छोट्या छोट्या गोष्टीत आनंद मिळवा.

2)संध्याकाळी सगळयाच पक्ष्यांना, कुठेतरी स्थिरावण्यातची आस लागते तशी निराश मनाला नकारात्मकता, रमायला हवीशी वाटते. पण प्रयत्नपूर्वक निराशेला दूर ठेवा. रात्रीच्या वेळी निद्रिस्त निखारे उमलतात. आकाशी निळया फुलांची नक्षी पसरवतात. रात्र नकारात्मकता वाढवू शकते. पहाटे दिव्याची ज्योत हळूहळू विझते. समाधानाची किरणे, लवकरच मात्र आता उगवणार असतात. त्या रात्री कबरीच्या आत, भूतकाळाचे काळया सावल्यांकडे सुपूर्द

करुन मानवी मन घरी येते. मन लेखणी उचलते. परिस्थिती तीच असते, पण आनंद मानते, नवा दिवस उगवलाय. छोटी छोटी बाते, रोजच्या कामामध्ये सुख माना.

3)गवतावर चाला, ताणतणाव कमी करा, गॅलरीत बसा, पेट व प्राणी, झाडे, मित्र यांचे  बरोबर वेळ घालवा, तुमचा आनंदाचा रिमोट, इतरांच्या हातात देवू नका, पुस्तक वाचा, सायकल चालवा, घर आवरा, स्वच्छ करा, कचरा पसारा आवरा, ओपन स्पेस मध्ये जा चंद्रप्रमाणे बघा.

4)वाईट  सवयी बदला, सुगंध अनुभवा, चांगले जेवण जेवा, चांगले स्वच्छ कपडे घाला, आनंद शोधा.

5) संध्याकाळी चारपाई व सायकल व कंदिल घेऊन आमचे दादा जंगलात जात. थोडा वेळ घालवून परत येत.ती संध्याकाळी मन रमवायला मदत करणारी पध्दती होती.

6)यशाने आनंद मिळतोच पण अन्यवेळीही आनंद मिळायला हवा, संशोधनानंतर सखोल उपाय, समाजाला समजतील.

7) सध्या एवढेच कळते. कला छंद जोपासा, गाणी ऐका, वाद्य शिका, मनातील नकारत्मकता दूर ठेवा. पुस्तके वाचा, आय कॅन मेक यू हॅप्पी_ पॉल मेक्कादी वाचा. चेहरा हसरा ठेवा.

'ऑल इज वेल' म्हणत जा चांगल्या गोष्टींबद्दल धन्यवाद माना कृतज्ञ राहा. भजन आरती म्हणा देवदर्शनाला जा दानधर्म करा भूतकाळ काही काळ विसरा व आनंदी व्हा.

आनंदाचे डोही आनंदतरंग

******

## १०८ अंगणात पारिजातकांचा सडा पडे

अंगणात पारिजातचांचा सडा पडे, फुले वेचायला कधी नेशील तू गडे

घाल घाल पिंगा वाऱ्या माझ्या परसात, माहेरी जा सुवासाची, कर बरसात

मनाचे मूळ ज्या गावी रुजलेले, असते, लाडकी ती असतात .ते गाव आवडते व आठवते. तसेच नाशिक मला आवडते आणि आठवते.अनेक देवळांचे गाव, सहलीचे थंड हवेचे ठिकाण, वाईन कॅपिटल, trip place  चित्रीकरणाचे ठिकाण, विकेन्ड होमचे घर, नाशिकची ओळख खूप आता आत्ताची आहे.    मला नाशिक साधरणतः 1962 च्या पुढचे आठवते. नासिक कंदिलाचे, मिणमिणत्या कमी प्रकाशाचे, श्रीराम मंदिराचे तेल दिव्यांचे व पुढे ट्यूबलाईटचे! चूल, स्टो, गॅसचे, चिखलाचे गाव होते.गावाकडे असलेल्या शेतीची, साऱ्यांना चिंता असे. खुद्द शहरात सुध्दा, खूप उस मळे, ज्वारी मळे, आमराया होत्या, सूर्यफूलांच्या बागा होत्या. श्रीरामकृपेने प्रत्येक घरी विविध कथा होत्या, ज्या मोकळेपणाने चर्चिल्या जायच्या.कुलदीपक,  कुळकलंक होते, दुःख होते, मीठ मसाला लावून शब्दसंपत्ती वाढवून, गप्पा होत. सर्वकाही सर्व जणांना माहीतच होई. सारे जण अखंड बोलत राहात, दुसऱ्याला समजावत असताना, माणूस स्वतःचेच, दुःख देखील, ती कल्पना देखील, चाचपून स्वतःला समजावतो तसे घरोघरी होते.

माझ्या गावच्या पाण्याचे

खोल जमिनीत झरे

कुणी फाकवा अरे माती

झरे होतील पिसारे. (सं)

नाशिकला फळे भरपूर मिळतात. उपास, देवपूजा, देवदर्शन यांना योग्य असे वातावरण तेथे होते.गावकरी साधे, आदरातिथ्यशील लोक होते. आलेल्या प्रत्येक पाहुण्याला, पंचवटीत देवदर्शनाला नेले जाई. अनेक देवळे  व लहान मोठे सरदार वाडे, बघितले जात. श्रीरांमाचे क्षेत्र म्हणून पंचवटी प्रिय होती .आई सतत श्रीरामाचे नाव घेई. एक शेजारी सिंंहस्थ पर्वणीचे वेळी, श्रीरामाचे अयोध्येला जायचे म्हणून, साधू बनण्यासाठी पळून गेला होता. पुढच्या एका सिंहस्थात तो साधू बनून आलेला सापडला. “उंबरठ्यावर मर्यादा,

त्यावरुन ओलांडूनी मातेची माया

कसा गेला रामराया” असे भजन त्याची आई गात असे. सर्व स्त्रिया सुगृहिणी होत्या. अखंड काम करीत असत. उन्हाळी कामात तरबेज होत्या.

भांडी घासून ठेव, लादी पुसून ठेव,

कपडे धुवून ठेव, कुकर लावून ठेव,

चटणी वाटून ठेव, जीव कुटून ठेव

संपला आहे विषय पुस्तक मिटून ठेव. (स)

पॉश कपडे- पॉशचोपडे एखाद्याचकडे पाॅश कपडेअसत. बाकी भारी कपडे फक्त दिवाळी आणि लग्न कार्यात मिळत. बाकी तेच जुने पण स्वच्छ धुतलेले कपडे संपूर्ण शहर वापरी. कॉलेजमध्ये देखील सर्व कॉलेजकन्यका साडी नेसून, दोन्ही खांद्यावर(जयाभादूरी स्टाईल)पदर घेवून, लांब शेपटा हलवत, सायकल चालवत येत असत. बाईने केस मोेकळे सोडल्यावर, तिच्या वर नखरेल अशी टिका होई. नाशिकात प्रत्येक जण कष्टकरी होता. फेअर एन्ड  लव्हली व मॉइजश्चारायजर लावायचे ते दिवस नव्हते. रापलेल्या चेहऱ्याची व भेगाळलेल्या हातांची लाज

वाटत नसे. मुलांची नावे कमलनयन(राम) जानकीनाथ राम, लक्ष्मण असत तर स्त्रियांची नावे सीता, गोदावरी, जानकी हीच असत. उमलत्या कळयांसारखी दिसणारी ती कन्या, लवकरच मोठी स्त्री सुगृहिणी बने व अल्लडपणा, सोडून देई. तर फुलांपरी ते ओठ उमलती, असे दिसणारे कुलदिपक लवकरच शेतकामाला लागत.

मंदिरे- मला आठवते, 1962 साली मोदकेश्वर मंदिराजवळ, मोदकाच्या आकाराचे दगड सापडत. एकवीस चतुर्थ्यांना तिथे दर्शन केल्यास, तो गणपती नवसाला पावतो, असे म्हटले जाते . ढोल्या गणपती, इच्छामणी गणपती, चिंतामणी ही मंदिरे बरीच नंतरचे काळाची आहेत. मंदिर परिसरात सर्वत्र साधू बसलेले असत. दारी येणारे भिक्षूक, साधू, मांगतेभाकर तुकडा घेवून आनंदात जात असत. पावसाळयात तर काळया तुटक्या छत्र्या असत.क्वचित वापरात डकबॅकचे रेनकोट येत.माती व भरपूर चिखल कायम सोबतीला असे. पहाटे दव पडत असे.

कविता संपल्या तरी संपत नाही पाऊस

सर्वच ऋतूत निथळते हाऊस (सं)

दवांमध्ये न्हात होत गवत दाट दाट

पांढऱ्यावरी ही हिरवी नवी पायवाट(सं)

असा निसर्ग असे

खेळीमेळीचा वावर-

दिली कोंबड्याने बाग,

विझे चांदण्याची रांग(सं)

असे वातावरण होते. सारेच पहाटे उठून कामाला, शाळेचे वाटेला, चालायला लागत. देवधर्म खूप असला तरीही माणूसकी धर्म तिथे होता. गरीबाला अन्न देण्यासाठी तिथे अनमन नसे. निदान, चहा तरी दिला जाई.

दगडाच्या देवा दह्याच्या घागरी, अस्पृशाच्या घरी ताक नाही

पाळीव पोपट, गोडफळे त्याला, आणि गरीबाला कदान्नही नाही॥

कारंजी- रविवार कारंजा, पंचवटी कारंजा हे होते, पण येथे धारानृत्य करणारी कारंजी कधीच नव्हती. जागरणे फक्त कोजागीरी व हरतालिकेचे आणि गावातल्या कॉलेज मधल्या अॅन्यूअल गॅदरिंगचीच असत. नाईट लाईट वगैरे चोचले नव्हते. रात्री चांदपाखरु रानराजवे ओरडले तरी भिती वाटे, भूते मनांत होती.

गोऱ्या रंगाचे फार आकर्षण असे. फॉरेन व वस्तू व साड्यांसाठी देवळालीला माणसे जात असत. मोस्ट रोमॅन्टिक असे ते सोमेश्वरला जाण असे, सहल असे.

दोघेजण जाऊ डोंगरावर चांदण्यारात्री

पाण्यात भिजून डोळयांच्या झरतील फुलवाती।त्या शहारात एखादाच डॉक्टर असे व एक डॉक्टरीण बाई सुमन माटे होत्या, बाकी नर्स करी. सर्वच मुली उंच बारीक शेलाट्या असत. डायटिंग न करता, छान दिसत . कारण रिक्षा देखील खूप उशीरा 1978 साली आल्या. बाकी आजारी पडलो की घरगुती उपाय चालत.

साधी माणसे- पोस्टमनची वाट पाहीली जाई. खुशालीची पत्र पंधरा दिवसातून येत. एस. टी. बस शिवाय पर्याय नव्हता. लग्न होणे व स्थळ बघणे हे मोठे कार्यक्रम असत. लग्नासाठी विविध व्रते केली जात. कपालेश्वरच्या मंदिरातील एक ज्योतिषी विवाह स्पेशालिस्ट होता.

साडेसातीची भीती साऱ्यांनाच असते. तेव्हाही होतीच. साधी माणसे पटकन विश्वास टाकत असत. पैसे बूडून अथवा अन्य मार्गाने अनेकजणींची विवाहात फसगत होई.

माणिक आणि गहू यातला फरकही ज्या नाही उमगत

दैवदेव त्यात देईल कोठून, अडाण्याची अशीच फसगत.

नको भाकर नको लबाडी लाचारी

नको रिती उठाठेव नको बखेडा संसारी, दिस राबण्यात जाबा

नीज घ्यावी रातभर(सं)

अशी साधी स्मृतीवान माणसे होती.फुले, निसर्ग बागा- रानमळे सर्वत्र होते.माहेरी अंगणात पारिजातकांचा सडा पडत असे. मंद वासाची फुले वेचून माळा केल्या जात. मालक माळी असे.बकूळ, गुलमोहर, बुचाची झाडे, अनेक वेली, आंबे, नारळ, पेरू, फणसे यांची रोपे द्राक्ष मळे होत. बोराची झाडे होती. बालपणीच्या खूप सुंदर आठवणी व संस्कार देण्यांचे श्रेय त्या नाशिकलाच जाते. गाव कृषीप्रधान होते. कच्च्या कैऱ्यांचे खिरमट, मेथीची भाजी, ठेचा, भाकरी हेच प्रमुख जेवण होते.सहलीला गेले की हेच बांधून नेले जाई.

शाळा- शिक्षण संस्कार:बिनभिंतीची उघडी शाळा लाखो इथले गुरु

झाडे, वेली, पशू, पाखरे यांशी गोष्टी करु

शिक्षकांना खूप मान असे. शिक्षक वर्गातील मुलांवर खूप प्रेम करत असत. मी एकदा शाळेत गेले नाही, तर बाई माझी विचारपूस करायला घरी आल्या होत्या.

झुक झुक अगीनगाडी धूरांच्या रेषा हवेत काढी

पळती झाडे पाहूया मामाच्या गावाला जाऊया,

बेडी पाको बारमाशा किंवा नाचरे मोरा आंब्याच्या वनात, ही गाणी ऐकून शाळेत नृत्य बसवले जाई. गंगा आली रे अंगणी... या सुखांनो या, मेंदीच्या पानावर, ही नृत्ये बनवली जात.

देव घेव

देवदर्शने, व्रतवैकल्ये, सिंहस्थ पर्वण्या, राजकारण ई. या कारणांनी नाशिक गाजू लागले. सिक्युरिटी प्रेस नाशिकरोडला आहे (तिथे नोटा छापल्या जातात) अनेक चित्रपटांचे चित्रीकरण नाशिकला होते. भेळभत्ता व नाशिक चिवडा मस्त लागतो.

नाशिकचा गोदाकाठ- बनारस सारखा पवित्र गोदावरी घाट नाशिकला आहे. त्यामुळे धार्मिक कार्यक्रम इथे होतात. नदीकिनारी फारशी स्वच्छता नाही. गोदावरी देवीचे मंदिर आहे. नदीचे घाट पवित्र आहे. सांडव्याच्या देवीचे मंदिर आहे. हिरवी झाडी आहेत पण ट्रॅफिकही आहे.पुढची प्रगती- एम.आय.डी.सी व शिक्षण अनेक मुंबईच्या संस्थेंच्या उपसंस्था नाशिकला निघाल्या. नोकऱ्यांची संधी मिळू लागली. शिक्षणासाठी मुंबईचे विद्यार्थी नाशिकलाही येवू लागले व नाशिक थोडे आधुनिक होवू लागले.

पंचवटी- म्हणजे पाच वडांच्या आतील परीसर, जिथे सीतामाता राहिली, तो पावन भाग होय. काळाराम, गोराराम व सुंदर नारायणाचे मंदिर येथे आहे. सीतागुंफा आहे. या गुंफेत काहीजण जातात.वाकून जावे लागते. शूर्पणखेचे नाक लक्ष्मणाने कापले(येथे) म्हणून या गावाचे नाव नाशिक असे पडले असे म्हणतात. नारोशंकराची घंटा, मंदिरात आहे.पंचवटीतील पाचही वड अजूनही आहेत, गर्दी त भेदरलेले आहेत. दहीपूल कपालेश्वर मंदिर, तपोवन, रामकुंड, मुक्ती धाम, प्रसिध्द आहेत.

लक्ष्मणरेषा मंदिर- हे मंदिर हल्लीच सुरु झाले आहे. आधी अजिबात नव्हते. टूरिस्ट वाढवण्यासाठी अनेक मंदिरे व मठ इथे नवे सुरू झालेआहेत.

अन्य ठिकाणे- शिर्डीचे साईबाबा मंदिर व नाशिकजवळ आहे. त्र्यंबकेश्वर, सप्तश्रृंगी देवी, सोमेश्वर, कालीदास स्मारक, पांडवलेणी, चांभारलेणी, गंगापूर धरण, ईगतपूरीचे घाटनदेवी मंदिर, धम्मगिरी, अशी अन्य देवळे व ठिकाणे आजूबाजूला आहेत. मुक्तीधाम, धम्मगीरी विविध कथा, कला, दंतकता, लोकगीत यांचा एक ठेवाच आहेत . त्या काळी नाशिकमध्ये अधिक ऐकायला, बघायला मिळे. अंजनेरी डोंगरावर संकट मोचक हनूमान देवांचा वास होता. अनेक औषधी वनस्पती इथे डोंगरावर अजूनही सापडतात. घोटीचा तांदूळ चवदार असतो.येवला पैठणी, शिक्षण संस्था, स्वस्ताई, चर्चा, नट नट्या, या आणि अन्य कारणासाठी नाशिक गाजते.आता तर, खरेतर खूप शहरीकरण झाले आहे.

चित्रपटगृह-त्या वेळी गावात 3 चित्रपटगृहे होती. चित्रमंदिर, प्रभात (दमोदर बरेच नंतर उघडले)मात्र चित्रपट बघायला धावणारे लोक बिनकामाचे आहेत, असा समज प्रस्थापित होता. बाईस्कोपवाला येई, त्याच्याकडे लहान मुले सिनेमा बघत असत.मुंबई किंवा मोठ्या शहरातून आलेले लोक मग पिक्चरची स्टोरी सांगत. रसरंग चोरुन वाचला जाई.बिनाका गीतमाला फार आवडे.इंदिरा गांधी, यांचे नावाने प्रसिद्ध, गरीबी हटाव साडी लोकप्रिय होती.

अंगोईगीत, ओव्या पाळणे, कृषीगीते- यांचा मोठा खजिना आमच्या आई, काकू आत्याकडे होता. सर्व डोहाळेजेवणी, बारशी थाटात होत. बर्थडे चे फॅड, केक कापणे तोपर्यंत नव्हते. नवरात्री, गणपती हे सार्वजनीक होते, पण त्यांचे पीक फोफावत आले नव्हते. त्यात छान गाणी नाटके लोकगीतांची मेजवानी मिळे.

मुंबई- मुंबईचे व पुण्याचे खूप आकर्षण नाशिकच्या लोकांना होते. जेव्हा मनमाड मुंबई पंचवटी एक्सप्रेस सुरु झाली, तेव्हा  गावभर, शहरभर चर्चा झाली होती.तेव्हा  खरेदी मुंबईला, शिक्षण पुण्याला असा समज होता. त्यात मुंबईचे खूप आकर्षण होते. नटनट्यांना बघता येते. खूप मजा मुंबईत येते असा समज होता. घरुन भांडून पळून जाणारी मुले, मुंबईलाच जात आणि भ्रमनिरास झाला की, नासिकला परत येत असत. अन्य प्रांतीयांचे लोंढे त्यामुळेच नाशिकला येवून, ते शहर ताब्यात घेवू लागले.

सासर माहेर-

माहेरच्या अंगणात येती जाती लेकीबाळी, लाजवंतीच्या पायांची दारी उठे रांगोळी

लग्न होवून सासरी गेलेली मुलगी चार दिवस माहेरी दिसली तरीही “असे कसे बरे सासरचे, लोक माहेरी राहू देतात” अशी टिका होई. द्राक्षे नाशिकच्या चिवडा देवदर्शन (रुद्राक्षे), विविध प्रसिध्द लेखक,  फक्त या प्रमुख कारणांसाठी नाशिक प्रसिध्द होते असे नव्हते, अन्य फायदे होते.बदल- बदल हे घडतच राहतात. झपाट्याने जग हे जवळ येतआहे. इंटरनेट चा विळखा पडलाय .लोक रुद्राक्षापेक्षा द्राक्षांमुळे नासिकला नावाजतात.वाईन कॅपिटल झालेले, आज नाशिक इतके बदलले आहे की, त्या तिथे ‘माझिया प्रियेचे झोपडे’ म्हणायला त्या शहरात जमिनीवर झोपड्या(टुमदार) बांधायला जागा मिळणार नाही.

तरीही नाशिकमध्ये काहीतरी खास आहे जे पुन्हा पुन्हा बोलावते.

# १०९साडीची मोहिनी

भारतीय स्त्रियांचा मूळ पोषाख, साडी हाच आहे. सहावार, नऊवार वस्त्र कमरेभोवती गुंडाळून, मानेभोवती लपेटून, ऊन थंडी वाऱ्यापासून स्वरक्षणासाठी वापरले जाते. साडीला साईझ लागत नाही त्यामुळे कुणीही कुणाचीही साडी घालू शकते. वेगवेगळया रितीने साडी नेसण्याचे ८० प्रकार आहेत म्हणे, मला दोनच  येतात.

संस्कृतीतील अहम् वस्त्र, म्हणून साडी प्रिय आहे. मात्र १९९० सालापासून देशातील सांस्कृतिक बदल, स्त्रियांची नोकरी, सुटसुटीत वस्त्रांची गरज, बदलती जीवनशैली, विभक्त कुटुंबपद्धती, या कारणांमुळे साडी मागे पडून, सुटसुटीत, सलवार कमीज, कुर्ता पायजमा, शर्ट पँट, हे ड्रेस लोकप्रिय होऊ लागले. साडी मागास, कालबाह्य वाटू लागली. साडी वृद्ध व वयस्कर स्त्रियांचे वस्त्र ठरली. साडी हा खास १००%भारतीय पोषाख आहे. गळासर, दागिने, जरीकाम केलेले ब्लाऊज, आरसे लावलेली चोळी, ब्रूच, पिन अप, पदरांच्या वेगवेगळया प्रकारच्या रचना यामुळे साडी खुलून दिसते. नऊवारीची, सहावारी, पुढे पाचवारी व पुढे निऱ्या पूर्वीच शिवलेली तयार, अशा प्रकारच्या नवनवीन साड्या चलती फॅशन बनल्या. काठापदराची साडी, खाली मस्त जमिनीपर्यंत पोचणाऱ्या, पायघोळ निऱ्या प्लेट्स, ही फॅशन कायमचीच असते. ब्लाऊजच्या बाह्या, लांबी रूंदी बदलत राहते. बिनबाह्यांचे हवेशीर ते घट्ट कंचुकीसारखे, सरळ, अथवा कटोरी ब्लाऊज असे चोळीचे प्रकार बदलतात, टीशर्ट, फॅशन शोमध्ये, लांब ब्लाऊज सुद्धा साडीवर घालतात.

पॉलिस्टर, हातमाग, खादी, चंदेरी, सुती, ऑरगंडी, रेशमी, ऊनी, मिक्स अशा वेगवेगळया टेक्स्चरच्या साड्या असतात (पोत). हलके अथवा गर्द रंग साडीच्या रूपात फरक पाडतात. जरीचे सोनेरी चंदेरी काठ, भरतकाम, रेशमी कढाई, दोरा वर्क, ठोकळयांनी चित्र

छापणे, यामुळे साडी खुलते. सुंदरी, सुंदर स्त्रीतर कशातही सुंदरच दिसते मग साडीत का नाही दिसणार? मोत्यांचे, सोन्याचे, खड्यांचे, दोऱ्याचे, कुंदन दागिने, साडीला खुलवतात. निळा आकाशी, पांढरे, राखाडी पांढरे, बदामी, लिंबू रंग, वेगळे व्यक्तिमत्त्व दाखवतात, तर गर्द आंबा रंगी, हिरवे, लाल, जांभळे रंग सणासुदीचे खास celebrity रूप दाखवतात.

पाने, फुले, बुंदके, चट्टेरी पट्टेरी, चौकटीचे डिझाईन, साडी खुलवते. जॅकेट, कंबरपट्टा, ब्रूच हे आधुनिक सह-अलंकार साडीवर घालता येतात- मात्र साडी सुंदरतेने कॅरी करावी लागते. लांब पल्लू साडीला खुलवतो. साडी नेसलेली स्त्री खास वाटते. Feminine वाटते.

कपड्यांच्या बाकीच्या फॅशन्स येतात जातात, पण साडी मात्र आज शेकडो वर्षे आपले फॅशन दुनियेतील स्थान टिकवून आहे. साडी नेसण्याचे पध्दतिवर, सोज्वळ, घरंदाज, मादक कशीही वाटू शकते. साडी पारंपरिक व आधुनिक दोन्ही वाटू शकते. भारतीय साडीचे यश त्यातच आहे.

मी आज सहज लोकल गाडीतील स्त्रियांकडे बघितले, गाडीत महीला डब्यात, २०० महीलांमध्ये आम्ही फक्त दोनच महीलांनी साडि घातली होती, साडीला बाय बाय बोलू नका.

महीलांनो साडी नेसत राहा.

****************

## 110 तू असा जवळी रहा

के.बी.सी मध्ये एका महिलेने स्वतः बद्दल असे सांगितले की, माझे आईवडिलांना, लेकीजवळ राहणे, भारतीय परंपरेला धरुन योग्य वाटत नाही आणि सून मुलगा यांच्याशी आईचे वाद होतात.

अॅक्सीस बँकेच्या जाहिरातीत, भावी सासू म्हणजे मुलाची आई लग्नाच्या खरेदीच्या वेळेसच म्हणते “सन व सासूचे सुरवातीला सर्व ठिक राहील, नंतर तुझी बायको म्हणेेल, सासू असे म्हणाली, हे झाले ते झाले, त्यापेक्षा तू आत्ताच वेगळे घर घेवून स्वतंत्र रहा”.

“मुलगा व सून कामावर जातात. मला घरी करमत नाही. एक

“ सासू टीव्ही बघत बसते, झोप होत नाही (आवाजामुळे)”एक कुटुंब. “बोअर होते सदा हे दुखले, ते दुखले”

एक सून .

“आम्हाला आमचे स्वातंत्र्य हवे, मुलगा व सून यांचेबरोेबर कधीतरी ठीक आहे पण कायम एकत्र कुटूंब नको.”

“आमचे सून मुलगा यांच्याशी पटत नाही, पण मन मारुन एकत्र राहतो. “एक .

वरील उदाहरणांवरुन स्पष्ट दिसते की ज्या एकत्र कुटुंबाची, भारतीय संस्कृती ची आपण स्तूती करतो, त्या नातेसंबंधाचा गोडवा गातो. त्या नात्यांतील गोडवा सर्वत्रच सरसकट प्रत्येक घरी उरला आहे का? 99% कुंटूंबात पारंपरिक कारणांनी एकत्र कुटूंब असेलही, मात्र राजाराणीच्या त्या स्वतंत्र घर करण्याची आवड बऱ्याच व्यक्तींच्या मनात असते. उदा,

ऊन ऊन खिचडी, साजूक तूप,

वेगळया घराचे भलतेच सुख

ही कविता 30 वर्षांपूर्वीची आहे.

राजाराणीचा संसार आमचा

पिकनीक पार्टी मजा,

सासू माझी एक सजा

असे गाण्याचा व स्वतंत्र घर करण्याला स्वप्न मानण्याचा, काळ मागे पडला आहे. हल्ली स्वतंत्र घर केले तरीही, फारशी टिका होत नाही. घर लहान पडते, इथून ऑफीस दूर पडते, लोकलला गर्दी असते, ट्रॅफिक फार असतो, अशा कारणांनी, स्वतंत्र राहून, सासर घराशी प्रासंगीक कारणाने एकत्र येणाऱ्यांची संख्या मोठी आहे.

हल्ली तर जेेष्ठ नागरिकांना आपण होवून, वेगळे राहण्याची इच्छा असू शकते, स्वतंत्र बाथरुम व आजारी पडण्याचे, फिरत राहिण्याचे स्वातंत्र्य वृध्दांना हवे असते. आजारपणात सोय व्हावी म्हणून पूर्णवेळ गैरसोय नको, असे म्हणणारे ज्येष्ठ असतात. त्याला पर्याय म्हणजे मुलांनी मुलींनी आईवडिलांच्या जवळ, मात्र स्वंतत्र घर घेवून रहावे. यामुळे लक्ष राहते, अतिपरीचयात अवज्ञा होत नाही व स्वातंत्र्य देखील मिळते.

*****

# 111 घरी माणसे चार

हल्ली प्रत्येक घरी चार माणसे असतात. नवरा बायको, घराचे छत आणि जमीन. पूर्वीच्या काळी सणाला आजूबाजूची माणसे, नातेवाईक एकत्र जमत असत. मिष्टान्न भोजन करुन गप्पा मारुन ताजेतवाने होत असत. दसऱ्याला सोने वाटायला आणि संक्रांतीला तिळगूळ वाटायला घरोघरी, शाळेच्या शिक्षकांकडे जायची पध्दत होती. नातेवाईक एकत्र जमत असत, सणावाराला बालकांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वांना आनंद मिळत असे. नवे कपडे किंवा ठेवणीतले कपडे, मित्र, गप्पा  नातेवाईकांचा सहवास हवाहवासा वाटे.

2018 साली, हल्ली घरोघरी सणाला चार माणसेच असतात. मुलानी वेगळी घरे केलेली असतात अथवा मुले परदेशी गेलेली असतात. (एन आर आय.) झालेली आहेत. सणासाठी एकत्र येणे सुध्दा, जमतेच असे नाही. सर्व तरुणांना ऊत्तम नोकऱ्या नाहीत, ज्यांना आहेत त्यांना, त्या नोकरी टिकवण्यासाठी आटापिटा करावा लागतो. रजा घेवून चालणार नाही. त्यामुळे सणाला सुध्दा घरोघरी दोन माणसे आहेत. दिवाळी दसरा फक्त, ऑनलाईन, अथवा व्यापाऱ्यांच्या फायदा आहे. दागिने घरेदी कपडे, खरेदी पैसे खर्च करणे बाहेर जेवणे हीच सणाची व्याख्या झालीये.

“तुझ्या गोळया माझ्या गोळया, बीपी डायबेटीजच्या गोळया” असे गात वृध्द घरी एकटेच राहतात. तरुण परदेशी आहेत, काही पर्यटनाला गेले आहेत, काही मुलांची करीयर, बालकांची करीयर घडावी, म्हणून मार्कांच्या मागे धावते आहेत. सुट्टीत सुध्दा क्लासेस असतात.

ज्येष्ठांना कुणाच्या तरी सहवासाची गरज असते. मध्यंतरी एका कार्यक्रमात एका बाईने फोन नंबर दिला, जर एकटे वाटले तर फोन करा 1/2 तासाला 100 रुपये घेणार. विभक्त कुटूंब संस्कृती वाढलीये. त्याचवेळी नाईलाज म्हणून वृध्दाश्रमात राहणारे वृध्द आहेत. वृध्दाश्रम हे नाईलाजाने जायचे ठिकाण असले तरीही. कंपनी, सहवास,  सिक्यूरीटी, रेग्यूलॅरीटी, मेडिकल

हेल्प अन्यकारणे त्या दृष्टीने एकट्या वृध्दानां ते  मदतगार होवू शकतात. सर्व जग लोनली प्लॅनेट झाले आहे. मोबाईल टीव्ही वाचून वेळ जात नाही इतकी प्रत्येक व्यक्ती एकाकी झाली आहेे. आमच्या इमारतीत प्रत्येक घरी दोनच माणसे उरलेली आहेत. घरोघरी वृध्दाश्रम आहेत, फोनवर शुभेच्छा देवून सणाचे दिवशी, सर्व  कुटूंबाची जबाबदारी संपते.

मागे उरतात छत, जमीन व दोन माणसे, घरी माणसे चार

******

# 112शब्दांच्या राज्यात

शब्दांच्या राज्यात रमायला सार्यांनाच आवडते. बरीच जण तर पुस्तकी किडे असतात.

वर्डस् वर्थ इज वर्ल्डर्स वर्थ

चांगले शब्द जगाची संपत्ती असते

शब्दांच्या बद्दलच्या काही खास बाबी

1) डॉ. स्यूस यांनी लहान मुलांसाठी जे ग्रीन एग्ज अॅन्ड हॅम ("हिरवी अंडी व सुरण") पुस्तक लिहिले आाहे. त्यात फक्त 50 शब्द असून त्याच त्या शब्दांची वेगवेगळी रचना आहे.

2) युरेनसच्या ग्रहाला जे 24 उपग्रह आहेत त्यांची नावे लेखक शेक्सपीअर यांच्या नाटकातील पात्रांवरुन ठेवली आहेत. उदा. जु लीयट(रोमिओ व ज्युलिएट) मिरांडा(दी टेम्पेस)

ओफॅलिया(हॅम्लर्ट) पोर्टीया प्रास्पे रोकॅलीबन

3) गेटस् ऑफ पॅरॅडाइज- स्वर्गद्वार ही कांदबरी फक्त 2 वाक्यांची आहे मात्र या दोन वाक्यात 40000 शब्द आहेत.

4) 2004 साली प्रेंच लेखक मायलेक थॅलर यांनी 233 पानी कादंबरी प्रकाशीत केली या कांदबरीत एकही क्रियापद नाही(नवल आहे)

शब्दांची गंमत अशी आहे

*****

# 113कालवाकालवी कालवे

देशांतर्गत अथवा आंतरदेशीय तलाव, समुद्र अथवा दोन नद्यांना जोडणाऱ्या भूपृष्ठाला पूल म्हणतात .तसे पाण्याचा चर खोदून दोन नद्या जोडण्यास, उपयोगी, त्या पाणी पूलाला कालवा म्हणतात. हा कालवा दोन जलस्त्रोतांच्या पाण्याची, कालवाकालव करता(पीजे) या कालवा बांधणाचा हेतू खास असतो. तो असतो शेती, जलप्रवाह, पूरस्थितीची तीव्रता कमी करणे, दुष्काळावर मात करणे. या कालव्यातून जलवाहतूक होते. बोटी व मोठी जहाजे या कालव्यातून जाऊन, माणसांना पार करतात, प्रवासाचा वेळ वाचवतात.

या सर्व कालव्यांची उपयोगीता व त्यांचे ऐतिहासिक महत्व खूप आहे.

1) पनामा कालवा- दरवर्षी 44000 जहाजे या कालव्यातून जावून आंतरराष्ट्रीय व्यापाऱ्याला हातभार लावतात. हा कालवा अॅटलँटिक सागराला पॅसिफिक सागराशी जोडतो. उत्तरपूर्व अमेरिकेहून कार्गो शिपला उत्तरी पश्चिमी अमेरिकेत जावून वेळ व इंधन बचतीसाठी मदतगार झाला.

2) सुएझ कॅनॉल-इजिप्त युरोप व एशियाला जोडतो.

ग्रॅण्ड कॅनाल ईटली व्हेनिस- शहररचनेचा सुंदर नमुना- एस- शेपमध्ये व्हेनिस मधून जातो व अंतर्गत प्रवास सुलभ करुन जोडीला सौंदर्य वाढवतात. व्हेेनिसला सिटी ऑफ कॅनॉल्स म्हणतात.

3) सिंगेल कॅनॉल अॅमस्टरडॅममध्ये ़फूल मार्केट त्या सिंगेल कॅनॉलवर भरते.

रिड्यू कॅनॉल- कॅनडा फुनकोशी कॅनॉल जपान गंगा कालवा-भारत असे कालवे प्रसिध्द आहे.

प्रत्येक व्यक्ती एक जलप्रवाह असते स्वतंत्र! दोन जलप्रवाहांना जोडणे सोप्पे नसते. कालव्यांनी नद्या जोडता येतात. माणसांची मने जाती, धर्म, खंड, देश यापलीकडे जावून, मने जोडणारा कालवा, संशोधकाना कधी सापडेल?

****(**

## 114मनाचा फ्रीज- फ्रीजमधले सुख

घरातला किचन फ्रिज गच्च भरला होता. बरेच दिवस आजारपणामुळे, घरकामासाठी उठू शकत नव्हते. आज खूप दिवसांनी जवळजवळ महिन्याने फ्रीज रिकामा करायला घेतला. वाटले फ्रीजमध्ये न जाणो किती जंतू असतील.

काय काय असते या फ्रीजमध्ये?

खायचे पदार्थ

काही जुनी फळे, श्रीखंड, शिळया भाज्या, दुधाची, थोडे थोडे दूध असलेली बरीच पातेली, फळे, तीन चार पीझ्झाचे बॉक्स थोडे थोडे ब्रेडचे तुकडे, त्या फ्रीजमध्ये पडलेले होते. अनेक शीतपेयाच्या बाटल्या होत्या. मागच्या वर्षीच्या पन्ह्याची बाटली होती. चायनीज करण्यासाठी कधीतरी आणलेल्या, वेगवेगळया सॉसच्या बाटल्या, बरीच जुनी चॉकलेट होती.

दूधमलाई

दह्याला तर पाणी सुटले होते. साय पिवळी पडली होती. फॉइलमध्ये गुंडाळलेल्या शिळया चपात्या होत्या. ठोक्याच्या पातेल्यात, शेवयांची खीर होती. प्लास्टिकच्या पाऊचमध्ये पेढे होते. साठलेले

जे अन्न लोणची, मसाले, साखरांबे, कडधान्ये आता अजिबात उपयोगाचे नव्हते.

लोणची, मसाले हे खरतर बेगमनीचे पदार्थ !पण मुंबईच्या हवेत, सारेच खराब होते ना. त्यामुळे फ्रीजचे दार सतत उघडे केले जाई. भरलेल्या वस्तू काढायला सुरवात केली. विविधरंगी, विविधप्रांती शिळी ताजी सर्व प्रकारची चॉकलेट्स सरळ कचराकुंडीत टाकली. कोण्या एकेकाळचे जुने ब्रेड होते.

मळलेली कणीक- पोळयावाली, चार पोळयांची कणीक रात्री लागली तर, म्हणून फ्रीजमध्ये ठेवी. असे खूप उंडे होते.

आईस्क्रिम- भारी होते पण फेकावे लागले. तोंडाला पाणी सुटले, पण पोट बिघडण्यापेक्षा फेकणे बरे म्हणून फेकले.

हिरवी वाडी- हिरवी वाडीतून आणलेली काही रोपे होती. ओल्या फडक्यात बांधून ठेवलेली, फुले  होती. पण ती आता जगतील याची खात्री नव्हती. मी कुंडीत खोचली ती रोपे.

बर्फ- झोंबण्याच्या वेदनेवर लावायला असलेली बर्फाची पिशवी होती.बर्फाचे ट्रे होते. पण वास येवू लागला होता. पेप्सी कोला, कुल्फी होती.

फ्रिजची मानसिकता-

ह्या घरात 3*6 च्या पलंगाएवढी जागा तरी मला मिळावी .पूर्वायुष्यातील गरिबीमुळ, अनुभवामुळे सावधपणामुळे माझे हात आखडलेले राहीले. अवघडत्या मनस्थितीने भावाविश्वापर्यंत श्रीमंती चंगळ, कधी पोचलीच नाही, मी सर्व उरले सुरले फ्रीजमध्ये डम्प केले होते.

कधी काळी लागेल, , कधी लागेल, अचानक कुणी पाहूणा आला तर मुंबई बंद झाली तर, म्हणून आणलेले दूध होते. काही वाट्यात आमटी होती.

सळ सळ ते क्षण सरले, आता वय झाले.वय झाल्याने भराभर ताजे शिजवणे जमत नाही डावावर कामाला जुंपायाला स्त्रिच लागते. घरी पित्याला त्रास नसतो. मोलकरीण धड मिळणे घरगडी तोळामोळाचा मिळायला नशीब लागतेे. माया मातृत्व हा स्त्रीचा शाप आहे का.

माया

माया ममतेमुळे, अन्नपूर्णा असल्यामुळे बाई सर्वांना वाढत राहते. उरलेला साठा करत राहते.

फ्रिज भरुन जातो.

मनाचा फ्रिज साफ करणे सोपे नसते

****

# १ १ ५ पुस्तक परिक्षण

हसताय ना हसायलाच पाहिजे

आशा यांच्या विनोदी काव्यसंग्रहाचे वाचन करणे आनंददायी होती.

हसायलाच हवे, कारण हसण्याने मनावरचा ताण कमी होतो. विनोदी लेखन करणाऱ्या स्त्री लोखिका प कमी आहेत. त्यातील काहींचे लिखाण छान असते तर काहींचे खूप छान असते. आशा यांना हलक्या फुलक्या विनोदाची नाडी अगदी छान सापडली आहेत. रोजचेच प्रसंग रोजच्याच घटना त्यावर विनोद करण्याचे, चिमटे काढायचे आशा यांना चांगले जमले आहे. लेखिकेचे हे नववे पुस्तक आहे.

या पुस्तकाला संचालक अभिनय कट्टा यांची प्रस्तावना लाभली. ह्यात प्रस्थापित लोकप्रिय गाण्यांचे विटंबन काही कवितात आढळते.देवळातले देव, नवरा बदलून दे, लेक लाडकी, बायकोची कैफियत, लीफ्ट, सासूबाईंची श्राध्द, मुंबईच्या बायका, सासूबाई या कविता उल्लेखनिय आहेत.हसणे हे हृदयाचे टॉनिक असते. रक्ताभिसरण वाढवण्याच्या कामी हास्यविनोद उपयोगी पडतात. विनोदी लिहायला विनोदबुध्दी लागते. व्यंग करायला, मेंदूचा खास भाग विकसीत व्हायला हवा असतो. रोजच्या जीवनातल्या प्रसंग त्यातील व्यंग लेखिका टीपकागदाप्रमाणे टिपतात. विनोदी कवियत्री जेष्ठ समाज वर्तुळात लोकप्रिय अशा आशा यांची अशीच अनेक पुस्तक प्रकाशित होवोत.

मुखपृष्ठ- विनोदी कार्टून्स काढणे देखील सोप्पे नसते. असे सुंदरसे चार कवितांवर आधारीत व्यंगचित्र असेलले सूचक मुखपृष्ठ श्री. सतीश यांचे आहे. वडाची पूजा, मोबाईलचे घोटाळे, विमानप्रवास असे तीन प्रसंग मुखपृष्ठावर चित्रीत आहेत. हॅटस् ऑफ टू मुखपृष्ठकार.

हे पुस्तक वाचकांनी संग्रही ठेवावे असे आहे.

मुल्य- 60 रुपये, पृष्ठे-60, मुद्रक- अनामिका एंटरप्राइजेस

# ११६तडा गेलेल्या अब्रुची बाजारात काय किंमत

पूर्वीच मंजुश्री सारडा, हिच्या आरोपी पतीने दुसरा विवाह केल्याची बातमी वाचली. वर्तमानपत्रात ताबडतोब वेगवेगळया स्वरुपात प्रतिक्रिया वाचल्या. गावकरीनी यासंबंधात लिहिलेला लेख मोठा उद्बोधक व एका फार मोठ्या प्रश्नाला वाचा फोडणारा वाटला.

या निमित्ताने माझ्या मनात असंख्य विचारांनी गर्दी केली. प्रथम पत्नीला सोडल्यावर किंवा तिच्या मृत्यूनंतर पुरुष दोन तीन महिन्यात किंवा वर्षांच्या आत लग्न करतो. लग्नाच्या बाजारात त्याला “फक्त लग्नाचा डाग लागलाय”, “वय लहान आहे” असे सांगून त्याची किंमत वाढविली जाते. त्याची दुसऱ्या पत्नीबद्दल अपेक्षाही आपल्याला सुंदर कुमारीका मिळावी हीच असते. कुठल्याही परिस्थितीत विधवा अथवा घटस्फोटित  तो स्वीकारत नाही. पुरुष हा जण काही दुसरेपणाचा, अथवा म्हातारा वगैरे होत नाही. स्त्रीबाबत मात्र दुसऱ्या लग्नाचा म्हणजे अपशकुनी, उष्टावलेली, नासलेली अब्रुचे भांडे तडकलेली काच हे शब्द वापरले जातात.

पुरुष म्हणून मोकळीक-

पुरुषाला 3-4 मुले असली, तरीही तो मुलांसाठी(?) असे कारण सांगून पुनर्विवाह करतो. स्त्रीला मात्र कष्ट करुन, स्वतः अर्थार्जन करुन मुलांचा सांभाळ करावा लागतो. दुसरे लग्न हे शब्द तीने उच्चारले, तरी ती शारीरिक सुखासाठीच लग्न करु इच्छिते अाहे, असे मानले जाते. एकाच वयाचे लेकुरवाळे भाऊबहिण, एकाच वेळी, विधूर विधवा झाले तरी, मी पुरुष आहे म्हणून भाऊ लग्न करतो. बहिण मात्र जीवनभर एकटीच राहते. जणू काही पुरुष असणे हे एक क्वालिफिकेशन असते.

45 वर्षे वय झाल्यानंतर पंचविशीची मुलगा व मुलगी असलेल्या पुरुषालाही 20 वर्षाच्या मुलीशी लग्न करताना असे वाटत नाही. आपल्या मुलीला 45 वर्षांच्या पुरुषाशी लग्न करायची वेळ आल्यास कसे वाटेल कुणाच्याही गरीबीची व अगतिकतेचा फायदा घेतला जातो.

स्त्रीच्या तर सर्वात आधी. पुरुषाच्या पुनर्विवाहाच्या गोष्टी उघड केल्या जातात. स्त्रीकडे मात्र दुसरे लग्न म्हणजे, लपवावा असा, जणू लाजिरवाणा प्रकार मानला जातो.

घटस्फोटितेला विरोध- एका खानदानी कुटूंबात 40 वर्षाच्या गृहस्थाची पत्नी अपघाती मृत्युने फेबूरवारीत वारल्यांनतर त्याने आपल्या 3 मुलींसाठी एप्रिलमध्ये 25 वर्षांच्या मुलीशी लग्न केले. त्याचा छोटा भाऊ मात्र एका निपुत्रीक घटस्फोटितेशी लग्न करु इच्छितो त्यावेळी त्याला घरातले सर्वजण आम्ही विष खाऊ. तू उष्ट्या ताटात कुठे जेवतोस? आपल्या घराण्यातील इतरांची लग्न हाणार नाहीत, तू आम्हाला मेलास" असला सज्जड दम दिला जातो. दुसऱ्या लग्नाच्या, लेकूरवाळया पुरुषाचे लग्न कुमारिकेशी होऊ शकते. मग घटस्फोटितेचे लग्न कुमार तरुणाशी का होऊ नये?

लेकूरवाळी ही केवळ आईच- विनापत्य घटस्फोटितांची ही तऱ्हा तर सापत्य स्त्रियांचे प्रश्न काय विचारता? "मुलींकडे पाहून जन्म काढ ग पोरी. सावत्र बापाचा जाच नको पोरांना" विधवा स्त्रिचा पुनर्विवाह म्हणजे "मुली तू तुझ्या प्रिय पतीला विसरशील का? कशाला आगीशी खेळतेस? दुसरा दादला नसेल तर. सुख नशीबात नाही म्हणून गप्प बस" हा उपदेश केला जातो. पुरुष मात्र पत्नीच्या मृत्यूनंतर मुलींचे कारण पुढ करुन लग्नाला उभे राहतो.(काही बाबतीत हे खरेही असते) काहीजण मात्र एखादी स्त्री अपत्य आहेत म्हणून नको म्हणतात असेल तर पुरुष मात्र मुलींना हॉस्टेल मध्ये ठेवू तू हो म्हण फक्त. जणू काही हॉस्टेलवर ठेवल्यानंतर ती मुले त्याची राहणारच नाही आणि सुरवातीला तर त्याला मुलांसाठीच लग्न करायचे होते ना. दुसऱ्या एका केसमध्ये मी बायको सोडतो, तू माझ्याशी लग्न करायला तयार आहेस का? असे म्हणारेही आहेत. जणू काही एक नोकरी सोडून दुसरी धरायची आहे.

हायकोर्टात जेव्हा माझी कामानिमित्त भेट होती, लिखाणे चालली होती, तेव्हा एक स्त्री बऱ्याचदा भेटायची. तिची केस जवळ जवळ 10 वर्षे चालू होती. मी तीला विचारले, "तुझा नवरा काय म्हणतो?" ती म्हणाली, "त्याने पाट लावलाय पोरे काढलीत. फक्त माझे दुसरे

लग्न होऊ नये म्हणून तो केस लांबवत जातो. वेगवेगळया कोर्टात” अशिक्षित होती ती, पण स्त्रीच्या दुःखाचे एक रुप मात्र दाखवून गेली.

स्त्री मुक्तीचा नेमका अर्थ- श्रीमती दलवाई जेव्हा आमच्या महिला संरक्षण समितीच्या कॅम्पमध्ये आल्या होत्या. तेव्हा त्यानी एक विषय मांडला. प्रौढ कुमारिकांचे घटस्फोटितांचे, विधवांचे, विवाहितांचे प्रश्न एकत्रितपणे सोडवायला हवे. स्त्रीमुक्ती, संसार तोडणे, संसार मोडणे नव्हे.

स्त्रीमुक्ती म्हणजेे मर्यादा, संस्कृती तोडणे नव्हे. स्त्री संस्कृती जबाबदारीने चालवायला तयार आहे. निसर्गाने स्त्रीवर सोपवलेले सर्व संस्कार व जबाबदाऱ्या ती उचलायला तयार आहे. निसर्गात ती नाजूक व कमजोर आहे. म्हणून तिला अन्यायाखाली, दबावाखाली ठेवणे ही चूक आहे. स्त्री मुक्तीचा प्रश्न फक्त दुखावलेल्या व घर नसलेल्या स्त्रियांचा नाही. आज सव्वाष्णं असलेल्या स्त्रियाही, कधी काळी अपघाताने, एकट्या झाल्यानंतर किंवा आपल्या बहिणींवर, मुलींवर, मैत्रिणींवर वेळ आल्यावर या विषयावर बोलायचे असे नाही. आपल्यावर हसतात. जात्यातले रडतात, ही आजच्या स्त्रियांची परिस्थिती आहे आणि आपली बहीण, आई, मैत्रिण या नात्याने स्त्रीशी निगडीत पुरुषसुध्दा ह्या प्रश्नांपासून अलिप्त राहू शकत नाही.

प्रत्येकाने ह्या जबाबदरीने आपला वाटा उचलायला हवा. ज्यानां काही करणे शक्य नसेल, त्यांनी स्त्री मुक्तीचे काम करणाऱ्यांना टोचून बोलू नये किंवा अन्य दु:खि, बाधित स्त्रियांना तूच्छ लेखू नये. हा प्रश्न हिंदू स्त्रीचा किंवा मुस्लीम स्त्री चा नाही, तर तमाम स्त्री जातीचा आहे, एकीचा नाही, हा प्रश्न सर्व मानवजातीचा आहे.

******

## ११७सांग दर्पणा, सांग दर्पणा

जगातील सर्वात्कृष्ट कलाकृती(चित्र) आरसा ही असते. कारण स्वतः इतके लाडके प्रिय चित्र, कुणालाही, अन्य कुणी, नसते. आरशात बघणाऱ्याला स्वतःचा चेहरा/ पूर्णाकृती दिसतो व व्यक्ती ते चित्र निरखून बघते. आरसा हा भ्रामक पणे सत्यदर्शी चित्र दाखवतो. तरीही मानवाला तो आवडतो. अन्यथा इट इज ट्रुथ विच मॅकस मॅन ॲगरी .समोरची आरशातील प्रतिभा-प्रतिमा आपला, भाव, भावना सुध्दा दाखवते. आरसा आवश्यक असतो. तब्येतीचे बदललेले स्वारुप, त्वचेचा रंग, डोळयांचा रंग, स्वतःचे स्वतः न बघता येणारे अवयव, आरशात बघता येतात.

आरशाचे सौंदर्यवर्धक, शृंगारिक, कलादर्श उपयोग होतात. खोलींमधल्या त्या आरशांमुळे, कधी जागा मोठी दिसते, प्रकाश पसरतो, उजेड अधिक वाढतो. आरशांमधल्या इमेजेसचे /परिसराचे छायांचे, कोलाज सुंदर दिसत. राजेराजवाड्यांच्या रुप आरसे महल आईना महल असतें . बाहेर चा सुंदर देखावा आरसे, घरात, परिवर्तन करुन दाखवतो---- परिसर घरात दिसतो. महाराणी पद्मिनीची सुध्दा आरशातील प्रतिमा, अल्लाउद्दीन खिलजीला दाखवण्यात आली होती. घराबाहेर पडताना निघताना एकदा आरशात बघायची सवय बऱ्याच जणांना असते. पर्समध्ये छोटा आरसा बऱ्याच जणी ठेवतात. तलावात स्वतःच्या प्रतिबिंबाच्या प्रेमात, नार्सिसस पडला होता. पण तसा विचार केला तर प्रत्येक व्यक्ती नार्सिससच असते. सकाळपासूनच मानवाला आरसा, हवा असतो. दात घासताना, उठल्यानंतर, आरशासमोर उभे राहतो. अंघोळीच्या खोलीत, आरसा, लहान अथवा मोठा असतो.बेडरुममध्ये कपडे घातल्यानंतर, आपण कसे दिसतो, हे बघायला आरसा असतो. लिफ्टमध्ये आरसा असतो. बँकेच्या लॉकर रुममध्ये, आरसा असतो. सोनाराच्या दुकानात, खूप आरसे लावतात त्यामुळे दागिना घालून तुम्ही कसे

दिसाल,  याचा अंदाज ग्राहकाला येतो. साडीच्या दुकानात पूर्णाकृती प्रतिमा दिसावी, असा मोठा आरसा असतो. गणपतीच्या अथवा देवाच्या मूर्तीमागे, आरसा ठेवायची पध्दत आहे.

फार पूर्वी मेकअपसाठी ड्रेसिंग टेबल नव्हते, तेव्हा शृंगारपेटी असायची. ती पेटी उघडली, की आत चौकोनी आरसा, पेटीच्या वरच्या फळीला असे व पेटीत सौंदर्य साधने असत. काचेच्या मागे पारा लावून/ रंग लावून हा आरसा बनलेला असे. सारखे _सारखे आरशात बघितले की दारिद्रय येते असा पूर्वीचे काळी, समाजात समज होता.

1तेरा मन दर्पण कहलाये. 2आईना वही रहता है चेहरे बदल जाते है

3दर्पण झूटना बोल.

4दर्पण को देखा तूने जब जब किया शृंगार,

अशी आरशा बद्दलची गाणी प्रसिध्द आहेत.

आरशाला आपण इतके गृहीत धरले आहे की आरशाचे महत्व लक्षात येत नाही. आरशावाचून दिवस काढणे, अवघडच असते.

लहानपणी, सारखे सारखे आरशात बघितले की आई रागावे. वारंवार आरशापुढे उभी राहणारी मुलगी, वाया जाईल की काय, ही भिती पूर्वी वाटत असे. हल्ली आरशाचे प्रेम सगळयांनाच असते. वेणीफणी करणे, या एकाच कामासाठी पूर्वी आरसा लागत असे. हल्ली वारंवार, निदान दिन में चार बार, आईना जरुरी होता है.

बायकांच्या नट्टयापट्ट्याला नावे ठेवणाऱ्या पुरुषांना सुध्दा, हल्ली,  आरशाबद्दल प्रेम वाटू लागले आहे. सुंदर दिसावे, टापटीप असे नीटनीटके राहावे या हेतूने आरसे आवश्यकच झाले आहेत.

आरशांच्या खिडकीच्या काचा असलेल्या इमारती, हल्ली बनू लागल्या आहेत.

लहान बोटाएवढे आरसे कपडेपटात डिझाईन साठी वापरतात, आईने वाली चोली, चुनरी, घागरे, साड्या सर्वच काही प्रसिध्द आहेत. हल्ली तर गरब्याला पुरुषसुध्दा, आरसे बसवललेे कपडे घालतात. बैलाच्या झुली, उंटावरचे कापड, गणपतीची आरास, यामध्ये फार पूर्वीपासून लहान आरसे वापरले जात. लमाणी जातीच्या स्त्रियांच्या कपड्यांत, कापडांवर, खूप आरसे जडलेले असत.

नितळ तलाव, जलाशयांना, नेहमी आरशासारखी शांत प्रतिमा दाखवणारे म्हणून, डोळे तलाव, व चष्मापाणी, आरासपाणी, आरसेतलाव अशी नाव ठेवले जात.

जत्रेतील आरशांमध्ये, बहीर्गोल, अंतर्गोल विचित्र अशा, आरशांची रचना असते ज्यात आपण जाड, उंच, लांब, विचित्र दिसतो. करमणूक होते पण आपण पटकन बाहेर पडतो.

बोलणाऱ्या आरशांच्या, गोष्टी चांदोबात असतात. प्रत्यक्षात काही ही न बोलणारा, पण स्तुतिपुजक नसणारा, परिवर्तक आरसा मानवाचा चित्र दाखवतो.आरसा मानवाचा मित्र आहे हे नवलच आहे. सांग दर्पणा मी कशी दिसते? या प्रश्नावर दर्पण, काहीही बोलतच नसतो. दर्पणात बघणारी व्यक्तीच त्या मूकप्रतिसादाचा अर्थ हवा तसा काढते.

आरसा आतले काही न दाखवता, वरवरचा मित्र बनतो.

*************

# ११८मैत्र रे मैत्र

मैत्री कुणाशी करायची?शत्रूचा शत्रू,    मित्र असतो, असा समज आहे.मैत्री करणे, कंपू करणे कुणाला तरी पंखाखाली घेणे, ही एक मोठी धूर्त खेळी असते. मैत्रीबद्दल मोठमोठ्या गोष्टी लिहिल्या जातात. मात्र मैत्री हे एक षड्यंत्र असते. मैत्रीच्या सकारात्मक नाण्याची, ही नकारात्मक दूसरी बाजू आहे. विशेषतः तेव्हा,  जेव्हा आपण शत्रूचा शत्रू म्हणजे मित्र असे म्हणून आपण एखाद्या व्यक्तिशी मैत्री करतो. बाकी सर्व अन्य ईतर, अशा व्यक्तिं पासून आपण वेगळेपण व्यक्त करायला, आपण निवड केलेल्या मित्राशी मैत्री करतो.

मैत्रीची तुलना बागेशी करायची, तर या बागेत काटे, जंतूनाशके, जंतू आहेत. मैत्री ही साधारणतः समविचारी लोकांशी केली जाते. पक्षी थव्याने फिरतात, तसे हे मित्र, सहलीला, लोकलगाडीत, ऑफीसात कंपू करतात. एकत्र गुपिते वाटून घेणे मनमोकळे करणे, सल्ला विचारणे हे मैत्रीचे फायदे आहेत. इतरांना वगळण्याची, मग वाईट सुरवात होतचे. स्वतःवरचे प्रेम हे मैत्रीचे कारण असते. मग आपण इतरांचा द्वेष करु लागतो. मग प्रेम व्यक्त होण्यासाठी एक बाहेरचा शत्रू ठरवावा लागतो.

सात महिन्यांनी मैत्रीत भांडण होते. या भांडणानंतर 40% लोक पुन्हा कधीही एकत्र येत नाही. सॉरी म्हणून प्रयत्न करुनही ही मैत्री पुन्हा जुळत नाही.असे संशोधन करून मान्य केले आहे.

जेवढी मैत्री दाट तेवढा राग मोठा असतो . भांडण मोठे होते. या भांडणानंतर परत मैत्री करायला मन तयार होत नसते. व्यक्तीनूसार स्वभाव बदलतो. पण मैत्री टिकवणे सोप्पे नसते. मैत्री  जुनी होत असली की तिचा रंग उडतो, पण एक सुकूनही मिळतो.

कधीतरी सकारण अकारण फ्रेंडशिप चे शीप बुडण्याची शक्यता असतेच.

नौका डूबी? मग काही काळ कंटाळा आला की पुन्हा मैत्री साठी, कुणी तरी शोधले जाते.शत्रूचा शत्रू मित्र, म्हणून जवळ करताना विचार करा.

मैत्रीसुध्दा जपून करा.

मैत्री आनंद हवा म्हणून करा, कारस्थानाचे कारनामे म्हणून नाही>मैत्री ेहाशि करा. आरोग्यम धनसंपदा

आपल्या प्राथमिकतांमध्ये आरोग्य नेहमी एक नंबर वर ठेवावे. देह हा आपला मित्र असतो.आहार व्यायाम मन हवा, अनुवंशिकता, यावर आरोग्य अवलंबून असते. देह हाच देवाचे घर, दैवी कार्यभूमि आहे.

सामान्य माणूस उपवास, दैवी उपासना करावी म्हणून अनारोग्य कारक अन्न खातो.

उपासना करावी, पण आरोग्याची हेळसांड करु नये.

उपासना ऊपास प्रकृती नुसार करावे.

उपवासाचे पदार्थ पौष्टिक करावे, आरोग्य जपावे.

# 119स्वयंपाकाची कला

स्वयंपाक शब्दात, स्वयं+कला असा शब्द येतो. पाक म्हणजे पकवणे पासून आलेले नाम आहे.स्वयं म्हणजे स्वत बनवावे आहे.  पोट भरणे ही सर्वात आवश्यक असा अर्थ आहे.जेवण करणे, आहार घेणे, ही खाजगी बाब आहे. श्वासा नंतर आवश्यक शरीर क्रीया आहे.

अन्न हे पूर्णब्रम्ह,

उदरभरण नोहे जाणिजे यज्ञकर्म, असे म्हटले जाते. शिवाय आपापले जेवण आपण बनवणे, खाणे हे एक, वैयक्तीक काम, असूनही आनंददायी असते.

कुबल मसालेवाले पण छान जाहिरात करतात, स्वयंपाकातील सुंदर चव घरचे गृहिणींच्या हातची, त्यांनतर आमची!  म्हणजे स्वयंपाकाची चव, ही ज्याला त्याला स्वतःचीच आवडते. आजीच्या हातची चव, शेतातल्या मित्रांच्या पार्ट्या, फळांची टोकरी, आईस्क्रीमचा पॉट यांनी, तेच जेवण मेजवानीत बदलले जाते.

1) घर जैसा खाना -अशी जाहिरात बघून काहीजण आकर्षित होतात. कारण घरच्या सुग्रास जेवणाची चव, जीभेवर रेंगाळत असते .तसेच ते घरच्या सारखे ताट, पेला, वाट्या, तांब्या, पाट असे मांडलेले जेवण आवडणारे, बरेच जण असतात. नोकरी कामानिमित्त, मित्रांसोबत अथवा नाईलाजाने  बाहेर खाणाऱ्यांना घरचे जेवण हवेसे वाटते.

2) घर से बाहर का खाना- रोजचे जेवण जेवून कंटाळणाऱ्याना, बाहेरचे जेवण बरे असे वाटते पंधरा दिवसातून एकदा बाहेरचा चवीचा बदल बरा वाटतो, feast वाटते. बाहेरच्या जेवणात चायनीज, थाई, पंजाबी, दक्षिण भारतीय जेवण, बदल म्हणून आवडते. चपाती, भाकरी, डोसे, आंबोळी, कुलछे भटूरे, ब्रेडपाव, नान, पिझ्झा,  असे वेेगवेगळे पदार्थ खायला, चवीचे नखरे उपभोगायला  साऱ्यांनाच आवडते.

3) जीटी लायसन्स- काही पदार्थ इतके लोकप्रिय होतात. त्यांची ती पारंपारीक चव खास बनते. त्या पदार्थांसाठी पेटंट सारखे खास असे पाकक्रिया लेबल लागते. चिकन टिक्का, करंज्या, अनारसे, खाज्जे, हैदराबादी बिर्यानी. दालपोली (पारशी पुरणपोळी) अशा पदार्थांना पेटंट, लायसेन्स आहे.

4) माँ के हाथ का स्वाद- आई प्रेमाने खिलवते, हे कारण आहेच, पण दुसरेही शास्त्रीय कारण आहे. बालपणी जीभेच्या चवकळया (टेस्ट बड्स) सर्वात जास्त क्रियाशील असतात. त्यामुळे बालपणी खाल्लेले स्वादिष्ट जेवण खूप आठवते, आवडते. वयोमानाने टेसट बड्स कमी क्रियाशील होतात. जीभेला चव राहात नाही. स्वस्त, महाग, गुणवत्ता या कारणांव्यतीरिक्त ही वृध्दापकाळात तोंडाची चव त्यामुळे कमी होते.

5) बाहेरचे जेवण- फोनवर नाश्ता, टीफीन मागवता येतात. नोकरदारांना ऑनलाईनची सोय आहे. जेष्ठांना, कामात गर्क असणाऱ्यांना, स्वयंपाक चविष्ठ न जमणाऱ्यांना, ही अन्न सोय आहे. खूप साईटस वर ह्या मागण्या, बऱ्याच लोकप्रिय आहेत. होम डिलीवरी फास्ट फूड तर खास लोकप्रिय आहे.

स्वयंपाकातील मदतगार यंत्रे-

वॉटस् ॲप वर चपात्या बनवणाऱ्या मशीनचे व्हिडीओ फिरतात. इन्सटंट पॉट नावाचे भांडे बाजारात येणार आहे. त्यात ब्रेड, बिर्याणी, दही, चपाती, ठेपले, दाल केक इत्यादी बनवता येईल.निर्लेप, अंजली, फुड प्रोसेसर्स हे मदतीसाठी येतात

पोटपूजा हा धर्म , पोट उपासना एक कलाच असते. खावे कसे हे देखील, ही महत्वाचे असते.

पंचपक्वान्न- तिचा स्वयंपाक पाच पक्वान्नाचा. म्हणजे वरण, पोळी, लोणचे, भाजी, भात अशी टिका नवख्या सुनेबद्दल करायचे दिवस, कधीच मागे पडले. तिला स्वयंपाकात फारसा

रस नाही. पण कुठे काय चांगले मिळते ते बघून ती ऑर्डर देते असे नव्या सुनेचे कौतूक करायचे दिवस आले आहेत.

पूर्वी पाहूणा आला की शेवया रांधल्या जात असत.आता “दो मिनीट” म्हणत न्यूडल्स बनवतात. आमंत्रण देणारे स्वाद असलेले स्वयंपाकाचा मसाल्यांचा वास दरवळणारे स्वच्छ, कमी तेलातूपाचे, आरोग्यदायी जेवण घरी बनवण्याचीही कला असते.

पाकक्रिया इंटरनेट वर शोधून वेगवेगळया नव्या प्रयोगांनी वेगळी चव शोधण्याची हल्ली फॅशन आली आहे. या अशा स्वयंपाकात आनंद मिळतो विरंगूळा मिळतो .पूर्वीही गृहिणी स्वयंपाक घरातच बिझी असे. हल्ली फेसबूक वॉटस अॅप वर जेवणाचे फोटो टाकले जातात, पूर्वी शेजारी चवीसाठी पदार्थ पाठवला जाई. स्वयंपाकाचा आनंद शिजवणाऱ्याला करणाऱ्याला जसा मिळतो, तसा खाणाऱ्यालाही मिळतो.

अयोध्येत सीतेची रसोई सापडली. सीतागुंफेत सीतामातेची भांडी आहेत म्हणजे सीतादेवी स्वयंपाक करायची असे आपण मानतो. स्वयंपाक घर हे कार्यक्षेत्र आहे. हृदयात जाण्याचा मार्ग हा पोटातून जातो असे मानले जाते, स्त्रीपुरुष सारेचजण हल्ली कामापुरते, काम चलावू तर कधी कधी खास स्वयंपाक, सुध्दा शिकतात.

मग हॉटेलसमोरची गर्दी का हटेना?

काहीही कारण असो, स्वयंपाक करण्यासारखी कला दुसरी नाही.

आर्ट ऑफ लिविंग जसे असते तशीच ही आर्ट ऑफ कुुकिंग लोकप्रिय आहे

****

## १२० परिक्षांचे दिवस

माघाचे दिवस, परिक्षांचे दिवस असतात.तो बाविसावा अनपेक्षित प्रश्न, ते बाविसावा प्रश्न, अपेक्षित असतो हे जाणने, हा प्रवास म्हणजे संपूर्ण वर्षाचा आढावा घेणे असते.

२०१९ नवीन वर्ष सुरु झाले कि सर्वजण विचारतात, जुने वर्ष कसे गेले. मग व्यक्ती विचार करते, कसे गेले जुने वर्ष? आपण खालील मुद्यावर विचार करतो.

१. नवीन खरेदी- गाडी किंवा घर, मोबाईल, दागिने, मोठी खरेदी केली का?

२. कपडे- नवे कपडे घेतले का?

३. लग्न- ज्यांची लग्न ठराविशी वाटत होती, ती ठरली का?

४. नाते संबंध - नवे नाते जुळले का? जुने सुधारले का? जुने टिकले का? नवे बिघडले का? मैत्री ठीक आहे ना?

५. भांडणे - जुन्या वर्षात भांडणाचा त्रास झाला का?मला की ईतरांना झाला.

६. अपेक्षित - अनपेक्षित काही घडले का?

७. सहली- सहली किती केल्या? फॉरेन टूर केली का?

८. बँक खात्यातील जमा, हवी तेव्हढी झाली का?

९. मन - आनंदी झाले का?

१०. आजार - आजार झाले नाहीत ना?

११. नोकरी लागली का?

१२. संतती -परीक्षा, अन्य_ स्वतः किवा मुले परीक्षेत, निट अपेक्षे प्रमाणे पास झाली का?

१३ ते २१ प्रश्न तुम्हीच ठरवा. जगण्याचे धडपडीत, या परीक्षेत, प्रश्नांना २१ अपेक्षित प्रश्नांच्या संचांप्रमाणे वापरून, आपापली उत्तरे, ज्याला त्यालाच शोधावी लागतात.

प्रश्न पत्रिका=गाईड+त्यातील साचेबद्ध, समाजमान्य उत्तरे, २१ अपेक्षित पुस्तकात वाचून, परीक्षेत पास होता येते. पण बाविसावा आवश्यक मोठा प्रश्न? तो अनपेक्षित असतो.अनपेक्षित गोष्टी जास्ती त्रास देतात. परिणाम आपल्याला धक्का देतात.

जीवनात २१ अपेक्षित प्रश्नांसोबत एक बाविसावा प्रश्न, अचानकच दत्त बनून उभा राहतो. तो अपघात, अनारोग्य, नैराश्य, महागाई, ब्रेकअप, चोरी, काळजी, असा कोणताही असू शकतो. आयुष्याच्या परीक्षेत २१ अपेक्षित प्रश्नांनी, पास होता येते, येईलच.

बाविसावा प्रश्न=हो, बरोबर वाचलय तुम्ही, पण मी आज तुम्हाला हा बाविसावा प्रश्न सांगणार आहे.जमले तर २१वा आणि त्याचे उत्तर सुचवणार आहे. ते उत्तरं नक्की बरोबर आहे कि नाही हे मला माहित नाही. मी पण तुमच्यासारखीच, त्या बाविसाव्या अनपेक्षित प्रश्नाशी दर परीक्षेत झुंज देते आहे. तो बाविसावा प्रश्न म्हणजे मला या वर्षी समाधान आनंद मिळाला का?

आनंद हि मनाची अवस्था असते. इर्षा वाटली कि मनाचे समाधान नष्ट पावते. उदा. आपण खुश असतो कि माझे कपडे स्वच्छ धुतले आहेत. पण दुसरी व्यक्ती दिसते, जिचे कपडे खूपच स्वच्छ असतात “भला उसकी कमिज, मेरे कमीज से ज्यादा सफेद कैसे?” हि इर्षा खूप त्रास देते.आपल्या लाडक्या सामान्य, मुलाला चांगली नोकरी लागते. त्याच आनंदात असताना शेजारी भेटतो.तो शेजारी सांगतो, “माझ्या मुलाला परदेशात लाखाचे, प्याकेज मिळाले आहे.

आपला आनंद शेजाऱ्या बद्दलच्या।ईतर कुणाच्या तरी इर्षेने, पार झाकोळून जातो. हा प्रश्न असतो बाविसावा अनपेक्षित प्रश्न होय. मी घरी येऊन मग मुलावर चिडतो. देवावर चिडतो. दिवसभराचे चिडचिडी नंतर, जावु दे म्हणत हळू हळू स्थिरावतो.मग मुले परदेशी जातात.

“तू सफर मेरा तू हि है मंजिल.

तेरे बिना गुजारा ए दिल है मुश्कील, पासून

अब तेरे बिन जी लेंगे हम!असा सफर पालक पार करतो.

अशी नाती, ती  गुंतागुंत, अशी इर्षा आयुष्यात येतेच. मग मन हळूहळू स्थिरावते. बाविसावा अनपेक्षित प्रश्न, असा अधे मध्ये त्रास देतो.

“जिये तो जिये कैसे बिन आपके पासून तेरे बिना भी क्या जिना?” पासून 'अब तेरे बिन जी लेंगे हम" पासून, वेगवेगळया स्टेशनवर थांबते.शेवटी,

"प्यारसे भी जरुरी कई काम है, "असे मानव मनाला समजावतो.हा सफर खूप अवघड असतो. हा सफर माणसाला प्रगल्भ करतो. प्रगल्भता सोपी नसते. जुन्या वर्षात बऱ्याच चुका केल्या, झाल्या, समजल्या, असे आढावा घेताना कळते. नव्या वर्षात त्या टाळायचा प्रयत्न करूया. आनंद व समाधान मिळवू या.

नवीन वर्षाचा निश्चय करू या कि -

१. इतरांनी त्रास दिला, तरी मी स्वानंदाचे सुरक्षा कवच घालून वावरीन.

२. माझ्या मूडवर इतरांना मी हावी होऊन देणार नाही. मी आतून आनंदी होईन.

३.माझ्या आनंदाचा रिमोट कंट्रोल माझ्याच हातात आहे.

४. मी आज कुणाला तरी आनंदी करीन, मदत करीन

५.स्वतःला दुःखी करणे ठीक नाही. काही ना काही उपाय करूया, छान चहा पिवू या.

६. आयुष्य सुंदर आहे. त्यातला आनंद शोषून घेणारा टीप कागद बनू या.

७. रोज सकाळी उठल्यावर स्वगतात म्हणा. ALL IS WELL

८. आजचा दिवस सुंदर आहे. कारण तो आज आहे.

९. मी स्वतः बद्दल विचार करते /करतो, त्याहून अधिक सक्षम आहे.

१०. काळजी करून गोष्टी अपोआप चांगल्या होत नाही. चिंता खाते.

११. रोज आनंदी व्हावे, असे काहीतरी तरी असतेच.

१२. मी प्रयत्न केला तर, मी स्वतः समाधानी होईन.

१३ मी best इतके काम उत्तम करीन.

१४मी मन आनंदी ठेवीन, समाधानी राहीन.

बाविसावा प्रश्न, प्रश्नाचे अुत्तर, मी सांगितले.ठरवा, मी नव्या वर्षी, नवी होईन, आतून आनंदी होईन.

नव्या वर्षाच्या २०१९ च्या शुभेच्छा, **************

# १२१ किमया, किमया

हुषार माणसाला, खूप गोष्टी कळतात, पण वळत नाहीत. काहीतरी आत जाणवते, चंचल  मनाला, बांधून वळले तर सुत बनते नाहीतर मन भूत बनते. मग अशी कोणती खास गोष्ट असते, जिने मनाला आनंद वाटतो? स्वातंत्र्य? छंद? गाणी? खाणे? चोकलेट? फुले? हवा? थंडी? सण? उत्सव?

जीवनात, रूटीन मध्ये, हळूहळू गोंधळाकडून आपण सुनियोजिततेकडे जातो. बाहेरचे कोलाहलात, स्वस्थ होतो. अवघड, ही अशी किमया कोण करते?

सरळ जीवनात, कधी जखमा खूप होतात. वाटते या  भरणारच नाहीत. पण किमया होते. हळूहळू तब्बेत सुधारते. मनाच्या स्वैर विचारावर, शांतीने आरुढ होणे मस्त जमू लागते.

शरीराच्या जखमा भरतात. हृदयाची दरी सांधली जाते. ब्रेकअप मधूनही, मन कणखर होते. रडू येणे कमी होते. जवळ चे नात्याचा, अपमृत्यू त्याला माणूस स्वीकारतो. ती पोकळी भरते.स्वतःचा आत्मा, ते सर्व अपोआप भरून काढतो. मृत्यूला माणूस स्वीकारतो.

किमया होते, लक्षात ठेवा तुमचा निर्मल आनंद तुम्हाला परतून मिळेल, वाईट काळ निघून जातो. श्रद्धा आणि सबुरी ठेवा. काहीतरी किमया होईल.

तंग आ चुके है कश्म कश जिंदगी से हम

पावोगे वही जो, इस जहांको देगे हम

हि किमया व्हायला काळ जावा लागतो. कधी एक तास लागेल. कधी एक वर्ष, कधी एक तप लागेल. खूपच मी प्रवचन देतेय. असे वाटतेय का? नीट सांगते.

अपघाताने जखम झाली कि वाटते मोठ्ठी जखम आहे. १ तासाने टाके घातल्यावर थोडे बरे वाटते. मग हळूहळू सुधारणा होते. लौकरच जखमाचे व्रण पुसट होतात.

हि किमया कोण करते? देह, ती वैश्विक उर्जा कि देव? प्रश्न खूप आहेत. याबद्दल प्रश्नच नाही. अच्छे दिन हवे आहेत. पण.

तेरा किया हुआ बुरा, तेरे पास रेहेगा

तेरा किया हुआ अच्छा, तेरे पास लौटकर आयेगा.

यालाच कर्माचा सिद्धांत म्हणतात. जुने वर्ष संपले म्हणून नाराज होऊ नका. काही तरी नवे येण्यासाठी, जुन्याला जावे लागते. कधीतरी दूर गेलेले यश, मागे पडलेले प्रसंग, रूप बदलून समोर येेतात.नव वर्ष तसेच येईल.

चांगले काम करीत रहा. हिशोब कुणीतरी किमयागार करतो आहे. विश्वास ठेवा.

किमया होते.

*********

# १२२ जीवनधारा

जीवनधारेत वाहते राहा, जागते राहा.

जीवन ही कला आहे की शास्त्र?असा वाद घालणारी, “कसे जगावे”सांगणारी, अशी बरीचशी पुस्तकं, नियतकालिके असतात. मात्र जीवन जगणे, कधीही सहज कळत नसते. या विषयावर मी लिहिते, तेंव्हा मी स्वत:लाही काहीतरी समजावत असते - ते काय?ते सत्य आहे?ते सत्य, हे की ही जीवनधारा वाहाते आहे. या प्रवाहाबरोबर वाहाती राहा, जगती राहा. प्रवाहाविरुध्द पोहायचे प्रसंग येतील, बुडायचे देखील येतील पण तरून जा. सात तत्वे यात येतात।

१. जीवनाचा हेतू: आपण नक्की का जगतो, जीवनाचा हेतू काय? हा प्रश्न बऱ्याचदा, अवेळी अस्वस्थ करू शकतो. बऱ्याचदा हेतू नसलेले आयुष्य आपण जगतो. हसवा फसवी या नाटकामध्ये एक वाक्य आहे - जीवनात काहीतरी करायचे आहे, हे न समजता देखील आयुष्य जाते. आपल्या पूर्वजांनी काही सहेतुक खास केले नाही, म्हणून वाइट वाटून घेऊ नका. काहीतरी करायला हवे हेच त्यांना कळले नाही.असे किंवा पुढे कधीतरी अर्थपूर्ण काही करू म्हणून पुढे पुढे ढकललेल्या, जीवनाचे हेतू बद्दल विचार न करता त्यांचे जीवन संपले.

जीवनाला हेतू हवा. जसा प्रत्येक प्रयोगाला, कामालाअसतो. देवाचा सुध्दा माणूस जन्माला घालण्यात हेतू असतो असे म्हणतात. काही विचित्र शारीरीक, मानसिक घृणा यावी अशा व्यक्तींना जन्माला घालण्यातदेखील देवाचा हेतू असतो की तुम्हाला मानवाच्या या विकृतीची घृणा यावी आणि कसे जीवन जगू नये हे तुम्ही ठरवावे.

२. शाॅर्टकट: जीवनाचा हेतू कसा शोधावा? अनेक पुस्तकांतून देखील हे कळणे अवघड असते पण थोडेफार लिहायचा प्रयत्न करते.

प्रथम १. तुमचे कशावर प्रेम आहे? - कुटूंब, स्वत:चे शरीर, मजा, सुख, कला

जीवनज्योति, जलेगी

२. तुम्हाला काय चांगले जमते? - स्वयंपाक, लिखाण, वाचन

३. जगाला यातील कशाची गरज आहे? - सेवा, विचार, इ

जब मेरी जरुरत थी, कौन आया था?

४. यातून उदरनिर्वाहाएवढे पैसे मिळतील का? -

थोडेफार, खुप व्यापाऱ्यां इतके, नाही मिळणार?जेब बढती नहीं, खर्चे बढतेहै.

या चार प्रश्नांची उत्तरे तुमचे तुम्ही शोधा. दीर्घायुष्यी होणे, समाधानी होणे, आरोग्यवान होणे. निदान साधे जगत राहाणे, माणसाला जमायला हवे.

३. अध्यात्माचे थोडेफार तरी स्थान जीवनात ठेवावे. विपश्यना, Art of Living, ब्रह्मविद्या, हॅप्पी थाॅट्स, चिन्मय मिशन रामकृष्ण मठ इत्यादी, शक्य आहे त्यातून काही परिवर्तन करावे.मनाच्या विविध तत्त्वज्ञानाच्या मार्गातून आनंदाचा शोध घेतला जातो. नक्की जगण्याची इच्छा काय आहे? उर्जा कोण देते? प्रत्येक व्यक्तित देव आहे. असे वेगळे विचार कळतात.

४. स्वगत: प्रत्येक व्यक्तीच्या मनात दुसरा 'मी' असतो. या दुसऱ्या 'मी' शी व्यक्ती बोलते. त्याला स्वगत म्हणतात. हा सेल्फ टाॅक अर्थपूर्ण करावा. सटर फटर, निरुपयोगी दुखद विचार रोखून ठेवावे. मनाचे गोडाऊन करु नये.झोपेतून सकाळी उठून चहापाणी करायला, नैमित्तीक कर्माला लागणे, या सर्वाला एक कारण असते, ते शोधण्यासाठी स्वगत केंद्रीभूत करावे.

५. अवघड आहे: सामान्यपणे बऱ्याच जणांचे आयुष्य, सरळ सोपे नसते. खूप कटू गोष्टी ऐकाव्या लागतात. काही एकाकी क्षण छळतात.निरणय चुकतात. या लोनली प्लॅनेटवर सगळेच अवघड अाहे.

पॅशन, मिशन, प्रोफेशन, व्हेकेशन ही चार प्रेरणास्थाने जगायला प्रवृत्त करतात.थोडक्यात काय तर आवड, कामगिरी, कामधंदा, रोजगार, वाट बघणे, हेतू शोधणे, मैत्री किंवा मित्रत्व शोधणे जरुरी असते.

६. काय करावे: एखाद्या सामाजिक मंडळाशी, कंपूशी स्वत:ला जोडून घ्यावे. सांघिकता ठेवावी, कटूता टाळावी, निदान शत्रुत्व विसरणे, आवडीचे काम करणे. उदा: जीवनाची तुलना, लोकलगाडी प्रवासाशी केली तर, नोकरी साठी हा प्रवास आहे पण प्रवासात, वाचन, गाणी ऐकणे करता येते. जीवनात आनंद व अर्थपूर्णता आणू या. जीवनाचे पुनरावलोकन करता येते. जीवनधारेत राहायचे तर सर्वांनाच असते. जीवन थोडे, सुसह्य, आनंददायी बनवता येते का बघू या.

जीवन अर्थहीन, हेतूहीन वाटणे, हे अजिबात चांगल्या मनस्थितीचे द्योतक नाही. त्यासाठी उपाय करु या.समाजकार्यात रस घेवू या. पैसे, समृध्दी, लोकप्रियता या सोबतच जीवनाला हवा असलेला, अन्य हेतू शोधा.

ईसका नाम है जीवनधारा ईसका, कोई नहीं किनारा.

********************

# १२३ उरला सुरला फराळ

फार वर्षांपूर्वी दिवाळी, अथवा नाताळ, म्हणजे लोकांना मेजवान्यांचा काळ होता. हल्ली वाटेल त्या वेळी, वर्षभर, पैसे फेकून मिष्ठान्न मिळते. फोनवर देखील मागवता येते. फुड ऑर्डर देता येते. माणूस कुठेही, कुणालाही, कधीही भेटते. फोनवर बोलता येते. पूर्वीची दिवाळी दणक्यात तर असेच वर संमेलन असे. त्या काळी, तीस वर्षांपूर्वी दिवाळी अथवा नाताळ अथवा घरचे लग्न ई ची मजा संपली, की नंतर प्रत्येक कुटुंबाकडे आलटून पालटून, एक दिवस आमंत्रण असे. उरलेला फराळ, अधिक ताजा एखादा खास पदार्थ असे जेवण असे. दिवाळी अथवा नाताळ नंतर शाळांना सुट्टी असल्याने लहान मुले फार मस्ती करीत असते. त्यांना मस्ती करायाला संधी, उंडरायला या कारनाम्याने मदत होई. घरातला पसारा आवरायला आया -आज्यांना, पुढचे बेत रचायला, मोलाचा वेळ मिळे. आमच्या वाडीवस्तीत मात्र वेगळीच पध्दत होती.

दिवाळी संपल्यावर, एका दिवशी आया व बच्चे कंपनी, कुटुंब कबिला, उरला सुरला फराळ घेवून एखाद्या नदीकिनारी, टेकडीवर, समुद्रकिनारी, देवळात, बागेत, सहलीला जात असू. 3 वाजता दुपारी निघायचे. कांदे, टोमॅटो, लिंबू, भरपूर पाणी व उरलेला फराळ घेवून, डब्बा पार्टी केली जाई. नाताळला, दिवाळीला शेजारी फराळाचा डबा देणे तर, आता जवळजवळ बंदच झाले आहे. सर्व फराळ विकतचा बँडचाच तर असतो. कसले देणे घेणे ?पण त्याकाळी हे डबे देऊन, देखील उरलेले फराळाचे पदार्थ, या किरकोळ पार्टीत संपवले जात. सोबत गरज पडली तर असावे म्हणून ठेपले व लोणचे नेले जाई. स्वच्छता, ख़रेदी, थंडी, उटणी, तेल, रांगोळ्या, आकाशकंदिल यांची चर्चा चाले. फराळाचे डबे रिकामे करुन रात्री घराकडे चालत येताना, हातातल्या पिशव्या हलक्या झालेल्या असत. मात्र दिवाळी नाताळ सुट्टी संपली ही खंत बोचत असते.

दिवाळी, नाताळ सणावळी खरच संपली, आता सुट्ट्या संपतील, पाहुणे आपापल्या घरी जातील शाळा सुरु होईल, ह्या विचाराने पावले जड होतच. या वेळी सर्वच फराळ छान झाला होता. 'क्ष' ची करंजी, 'य' ची चकली, 'अ' चे अनारसे, 'ब' चे चिरोटे, 'क' ची शेव,

सर्व चर्चा आई, आजी, काकू, मामी करीत असते. पुढच्या वर्षी मदतीला ये हो, करंजीचे वेळी भेटू या, अशा प््कारे सर्व सख्खे शेजारी नातेवाईक एकमेकांना सांगत निरोप घेत असते. आनंददायी दिवाळी, नाताळ, जुने वर्श, उरलेली मजा आवरुन, निरोप घेवून निघून जाई.

किरकोळ पार्टी झाली याचा अर्थ आता दिवाळी नाताळ सुट्टी संपली हे जाणून आम्ही भावंड दप्तर काढून दिवाळी होमवर्क काढून बसत असु.

****************************

## १२४दोन मनांची गाठ

तीस डिसेंबरच्या टाइम्स ऑफ इंडिया मधल्या एका बातमीवरून मला ही कल्पना सुचली,

तर केरळमधील नांबीयार नावाच्या एका व्यक्तीला कॉलराच्या दरम्यान आपली पत्नी सारद पासून दूर जायची वेळ आली होती.कन्नूर येथील कॉलराच्या साथीत, सारदा नावाच्या पहिल्या पत्नीपासून नांबियार सर दूर झाले केरळमधील कायुंबयी,

उठावा बद्दल, केरळमधील संथा, या लेखिकेची कादंबरी, 30डिसेंबर मधील कथेप्रमाणे नंबियार यांची कथा आहे. तीस डिसेंबर नावाची ही कादंबरी केरळातील शेतकऱ्यांच्या बंडावर आधारित आहे.सारडा आणि नंबियार हे एकोणीसशे अडतीस साली, लग्नानंतरकाही दिवसांतच दूर झाले.सारडा तेव्हा तेरा वर्षांची होती. ब्रिटिश काळातील राजवटीतील त्या दिवसांमध्ये, शेतकऱ्यांच्या बंडामध्ये, पति पत्नी दोघांना वेगळे व्हावे लागले. एकोणतीस डिसेंबर रोजी नांबियार आणि इतर सर्व लोक त्यांच्या घराजवळ त्यांच्या जमीनदाराजवळील त्या शेतांमध्ये, जमीनदारांच्या अत्याचारांच्या विरुद्ध धरणे धरण्यासाठी जमले होते. नंबियार यांच्या लग्नाला एकच महिना झाला होता. मात्र पोलिसांनी जमलेल्या जमावावर गोळयांचा वर्षाव केला. नांबियार आणि शारदा यांना दोघांना वेगळे वेगळे व्हावे लागले. कुटुंब तुटले, कारण की शारदा त्या गोळीबारात मृत्यू पडली असा समज नांबियार यांचा झाला. .नांबियार यांना शारदा जीवंत आहे याची कल्पना नव्हती. शारदाने पूर्ण आयुष्य विधवे सारखा काढलं.शारदा असं समजली की नामबियार मृतेयु पावले.नांबीयारनी दुसरा लग्न केलं आणि त्यांनात्या पत्नीपासून मुले झाली या मुलांनीच का मुंबई या कायुंबयी बंडा बद्दल जी कथा लिहिली त्यावरून दोघांनाही गोष्ट आपली असावी असे वाटलेले. लेखिकेने या दोघांची भेट घडवून दिली. आज नांबियार हे नव्वद वर्षांचे आहेत. त्यांची पहिली पत्नी, शारदा, भूतपूर्व पत्नी सत्याशी वर्षाची आहेत.केरळमधील हे जोडपे पती पत्नी बहात्तर वर्षांनी भेटले . निसर्गाची किमया न्यारी असते. एका अपघाताने ब्रिटिश

काळात दूर झालेले हे पती पत्नी स्वतंत्र भारतात बहात्तर वर्षांनी भेटावे हा योगायोगच म्हणावा लागेल.

दोन ओंडक्यांची होते सागरात भेट

एक लाट तोडी त्यांना पुन्हा नाही गाठ

# १२५ रस्त्यावरचं खाणं

आजचे लेखाचा विषय आहे, रस्त्यावरच्या खाण्याचा.हा खास आवडीचा, जनमनातील लेखाचा विषय आहे कारण खेड्यातदेखील हाथगा़ीवर अन्न विक्री चालते.शहरातील रस्ते, खाऊच्या हातगाड्यांनी भरलेले असतात. रस्त्यावरच, चहा पाणी, रसपान, सँडवीच, वडापाव, रस्त्यावरच जेवण घेणे हल्ली चालते.आमच्या काळी नाव ठेवली जात असत.आपण रस्तेका माल सस्तेमे असे खाणे केव्हा जेवतो ?जेव्हा खाऊच्या, अन्न एक्प्रेसच्या वासाने आणि त्या वातावरणामुळे हा  पदार्थ खावासा वाटतो.हो जेवण झाले असेल तर हे देखील खावेसे वाटते. आणि त्या सुगंधाने, स्वादामुळे मोह होतो.पोटातला भूकेने खड्डा पडलेला असतो, तो भरण्यासाठी, आयुष्यातली पोकळी घालविण्यासाठी किंवा उगीचच टाइमपाससाठी सुद्धा रस्त्यावरचे खाणे खाल्ले जाते. या खाण्याला अनेक जण नाव ठेवतात .रस्त्यावरची, पदार्थ करणारी व्यक्ती, सामान भांडी ही अस्वच्छ असतात.हॉटेलमधलं जेवण परवडत नाही, अशी गरीब, कमी दर्जा असलेली, माणसे रस्त्यावर खातात, असे मानले जाते.आवडीने चवीसाठी, परवडते म्हणून, डबा आणणे जमत नाही आणि अन्य कारणांनी ररुत्यांवर खाणाऱ्या व्यक्तीबद्दल फारसे आदराने बोललं जात नाही.स्थूलता वाढवण्यास हे पदार्थ कारण ठरु शकतात.

स्वयंपाकात तरबेज असलेली व्यक्ती तिच्या कुटुंबियांना बाहेर खायला मनाई करते.तरीही सर्वांनाच रस्त्यावरच्या जेवणाची चव आणि त्या चवीची ओढ असते.पोटाच्या तक्रारी असलेली माणसं किंवा अति श्रीमंत माणसं रस्त्यावर जेवत नाहीत.आता समाजात तर जास्त करुन वडापाव हे गोरगरिबांचे जेवण आहे असाही समज आहे.हायवे मॉलवर बरेच जण 50 रुपयाला वडापाव खातात.

रस्त्यावरच्या जेवणात मैदा, खराब तेल, खराब तूप आणि खराब पदार्थ वापरले जातात, या कथित कारणाने त्या जेवणाला विरोध होतो. बाहेरच्या रस्त्यावरच जेवण हे खूप तेलकट असू शकते.पावभाजी आणि वडापाव सामोसे सँडविच डोसे इडल्या पोहे हे पदार्थ हल्ली

सर्रास रस्त्यावर मिळतात कच्छी दाबेली आणि भेल या व्यतिरिक्त फ्रँकी आणि मोमोज देखील हल्ली रस्तोरस्ती विकत मिळतात.झोल मुरमुरी अथवा भेळ अथवा शेवचिवडा फरसाण या कमी त्रास कारणाचे पण अनेक स्टॉल्स असतात.मिसळ पाव देखील सर्वत्र मिळतो चहा पाव फोडणी चा पाव असे पदार्थ देखील मिळतात.सामिष ठेवणाऱ्यांसाठी उकडलेली अंडी आणि, अंडाबुर्जी अथवा आमलेट पाव च्या गाड्या देखील रस्तो रस्ती असतात.पापडी चाट, फाफडा, जिलेबी, खट्टा मिठा अथवा भेळपुरी आणि पाणीपुरी या स्टॉलवर भरपूर गर्दी कायम असते.

घरच्यांनी कितीही विरोध केला आणि कधी काळी आजारपणाला पोट बिघडलं तरी देखील चाहते रस्त्यावर खाण सोडत नाही .मला देखील वडापाव खायला खूप आवडते .वडापाव हल्ला नाही तर नैराश्य येते, असं म्हणणारी पण एक मैत्रीण आहे.चिवडा छोले पुरी खाकरे उपमा सॅण्डवीच, दाल चावल  सुझी असे पदार्थ रस्त्यावर फारसे लोकप्रिय होत नाहीत. मिसळपाव लोकांना आवडतो.ऊरण्याचा वाया जाण्याचा प्रश्न नसतो.

केवळ आरोग्यासाठीच रस्त्यावरचे पदार्थ खाऊ नका असे सांगितले जाते. मात्र माणूस चवीच्या नखऱ्यांमुळे रस्त्यावरचे जेवण जेवायला मोह मोहित होतो.कितीही ठरवल्यावरही रस्त्यावर खायचं नाही तरी निश्चय मोडतो. काही ना काही कारणाने खास वाटत, खावेसे वाटते, मन आवरत नाही अथवा खायची वेळ येते. रस्त्यावर मिळणाऱ्या सारखे पदार्थ मी घरी बनवायचा प्रयत्न केला तरी तसे चवदार होत नाहीत.चांगले तेल, चांगले तूप, चांगले मसाले वापरून, रस्त्यावरच्या सारखी चव येत नाही.आलं लसूण मिरची मसाले घालून देखील ठसका जो रस्त्यावरच्या जेवणामध्ये असतो तसा घरी जमत नाही.मध्यंतरी रस्त्यावरच जेवण स्वच्छ आणि थोडे अधिक आरोग्य दावी व्हावे म्हणून काही प्रयत्न करण्यात आले होते.अर्थात त्या प्रयत्नांना यश आलं नाही अनेक हॉटेलांमधील तळलेले आणि उरलेले तेल, या रस्त्यावरील हातगाड्यांवरील स्वयंपाकासाठी वापरले जाते असाही एक ऐकिव प्रवाद आहे.काळाची गरज म्हणून बाहेरचे खाणे रस्त्यावरचे खाणे आज समाजाने स्वीकारले आहे.स्ट्रीट फूड नावाने ही खाऊ

गल्ली आणि या खाऊ गल्लीतील अनेक दुकाने प्रसिद्ध आहेत.चहा बनवण्याच्या रस्त्यावरच्या गाडय़ांच्या खास पद्धतीमुळे हाच चहा अतिशय चवदार लागतो. अर्थात या चहामुळेआम्लपित्त होते असाही आरोप आहे. पुण्यामध्ये अमृततुल्य आणि मुंबईमधील अन्य ढाब्यांवरील आले, आणि वेळप्रसंगी वेलची गवती चहा तुळशीची पाने घालून बनवलेला चहा चे प्याले देखील लोकप्रिय होतात.तंदुरी चहा म्हणून एक नवीन प्रकारचा चहा सध्या लोकप्रिय होत आहे कुल्हडच्या मातीच्या भांड्या मधून दिला जाणारा चहा देखील लोकप्रिय आहे.साबुदाणा खिचडी वेफर्स फरसाण बिस्किट, चाॅकलेट्स, उपवासाचे पदार्थ साबुदाणा चिवडा, पोहे, उपवासाची मीसळ, थालीपीठ साबुदाणावडा यांहे देखील मोठे मार्केट आहे.आरोग्याचा विचार करता रस्त्यावरचे खाणे हे आरोग्याला घातक असले तरी अपरिहार्य प्रसंगी ते खावेच लागते.रस्त्यावरचे खाणे हा कन्सेप्ट किंवा ही विचारधारा ही दूर होणं शक्य नाही. बदलत्या काळाची ती गरज आहे.गरिबी, बेकारी, महागाई, बदलती जीवनशैली, या कारणांनी, रस्त्यावरचे खाणे खाऊन बरीच जनता हल्ली जगते.

फक्त अधिक स्वच्छतेची आणि आरोग्यदायी अन्न मिळावे ही रास्त अपेक्शा आहे.

थांबते, वडापाव खाण्याची वेळ झाली.

********

# १२६माहेरची वाट

आईवाचून माहेर, दरवाजा  बाहेरचे, अं गणातल्या पांदीपलीकडचे, भावाचे घरी खुर्चीवरचे!

माहेरी आई अंघोळ घालते. न्हाऊ माखू घालते, तेल लावते. निसर्गरम्य ठिकाणी दूरवर फिरायला नेते. आपण सूर्यास्त बघायला बाहेर जातो. माहेर स्वयंपाकघरात कोंडत नाही. माहेरी पदार्थ, स्वंयपाक चुकला तरी, कुणी रागवत नाही. माहेरी परत परत यावेसे वाटते, पण गेल्यावर त्या घरी जास्ती दिवस रहावेसे देखील वाटत नाही. कारण बाईवर सासरची जबाबदारी असते. माहेरी आले की निरोपावर निरोप, तारीख पे तारीख येते, सासरचे पुरुषांची काळजी सुरु होते. मग माहेररपण संपून जाते.

माहेरच्या वाटेवरुन सासरी येताना मन म्हणते “अगले जनम मोहे बेटाही किजीये” माहेरी गेले की अभिज्ञान होते. विसरलेले सारे पुन्हा आठवते. चक्रवाक पक्ष्यासारखी मी माहेरी रात्री अंध होते. पुरुषांना माहेर ही कल्पना कळणे, जरा अवघडच असते. पुरुष दोन्ही घरी राजे असतातच, स्त्री माहेरी राणी-बेटी असते. सासरी राज-दासी होते. “तुझे घर हृदयात” सांगणारा नवरा बायको जर जास्ती दिवसांसाठी माहेरी राहिली, तर वेगळया वाटेवर जाऊ शकतो, व्यसनी होवू शकतो, असे जुन्याकाळी बायका सांगत असत

“सारखे माहेरी येवू नये, यायचे तर बाईने नवऱ्याला आपले सोबत घेऊन यावे”

माहेरची वाट बक्षिसे पाठवते. इच्छानंददायी असते. इथे हरेक ऋतूत आनंदाची पोचपावती मिळते. जणू तिकीटच लावून पडलेला, माहेरी पाठवायच्या लिफाफ्याला ओल स्पर्शून जाते. सहन होईना, अशी सासुरवासाची आग संपते आणि सांगता येणार नाही असा आनंद सुरु होतो. पृथ्वी हिरवा चष्मा लावून सजते. निष्पर्ण बेटावर हिरवळ फुलते, तेजोमय दिनकर सौम्य वाटतो. मन स्वानंदी रमते.

माहेरी, रात्री आकाशातील तारे फिकटतात. तर सकाळी राने हिरवी होतात. जे घडेल अशी भिती वाटत असते, ते होते. वळवाचा  पाऊस येतो. नंतर थांबतो सुध्दा बघा. टेकडीजवळच्या त्या तळ्याकाठी शांतता घर बांधायला येते. पायरव नसलेली, निरव जागा ती असते.पूर्वी घरोघरी रेडिओवर गाणी ऐकली जात, जी ऐकून या टेकडीवर मी कधी हमसून रडले आहे. रात्री तारा उल्का होऊन कोसळतांना दिसला की आम्ही म्हणत असू, “कोण ऐकणार या ताऱ्याचे अरण्यासदन?” तारे प्रेमिक असतात, जे कुणा ना कुणासाठी आत्महत्या करतात.

सकाळी सासरी जावे लागते, सासरचे वाटेवर बोचती काटे, माहेरची अोढ मनी दाटे

*************

## १२७काजव्यांचे झाड

प्रत्येक व्यक्ती म्हणजे एक काजव्याचे झाड असते. त्यादिवशी आम्ही येऊरच्या जंगलात काजव्याचे झाड  बघयाला गेलो. पांढरट खोडाचे झाड भेंडी, नालया जवळ होते. असंख्य दीप लावावे असे ते काजवे चमकत होते. एखादा काजवा एकटाच त्या, झाडावरुन वेगळा निघे, , उडत उडत जाई. आपली वाट शोधायला असलेला दिवा त्या काजव्याने सोबतच तर घेतलेला असतो. झूंडीतून काही कारणाने वेगळे पडला तरीही आपली वाट शोधण्याचा प्रयत्न करणे  त्या काजवा नावाचे किड्याला शक्य असते. जिंकण्याची शाश्वती नसली तरीही नेहमी वाटते, काजवे किती सुंदर आहेत. पण त्या काजव्यांना काय संदेश द्यायचाय मला समजतच नाही. स्वतःचा दिवा स्वतःचा प्रकाशाचे बेट, काजवे स्वतःसोबत नेत असतात. अंधार पडला की तो दिवा लावतात म्हणजे मानव मनात अंधार दाटून आला, तर स्वतःचा दिवा स्वतःला उजेड देईल.मला पुन्हा पुन्हा त्या काजव्याच्या झाडाशी जावेसे वाटले.

आम्ही परत त्या झाडापाशी गेलो .काजवे बघणे यासाठीचा वेळ रात्री दहानंतरचा होता. त्या झाडाखाली विंचू होते. फोटो काढून, काजव्यांचा झाडाचा आनंद घेऊन, मी परत घरी आले. घरकामाला लागले. काजव्यांच्या पंखांची चमकदार उघड झाप मी आठवते. समाजासाठी आपण सुध्दा काहीतरी करु शकतो. कामाला हातभार लावू शकतो. ही सांघिक भावना त्या कीटकांमध्ये आहे. उदा. मधमाश्या, कबुतर ई पक्ष्यांमध्ये आहे. घारी, गिधाडे पण! माणसांमध्ये एकी का नाही? पतिदेवाला, आई-वडिलांना, मुला-बाळांना दिले यापेक्षा अधिक सुख देता येणे घेणे शक्य होते, पण मी माझ्या प्रश्नात मग्न राहिले. इतकी जाणीव मला आहे. अशीच प्रगल्भता इतरांमध्ये नाही. मी सांगते, जवळच्या व्यक्तिला उगीच काहीतरी बोलायचे म्हणून बोलून दुखावू नका. पण उफाळून येते, असे म्हणणे, बोलावे, अशी, ती, तिच्या मनात इतकी कटुता होती? ती मनात दडली होती ?कटुता बाहेर आली,

प्रश्न घेऊन आपण कुणाकडे तरी जातो, आपला प्रश्न त्या व्यक्तिच्या गळयात घालतो. कधी कधी नवे काही जीवनात न येता, जुने हातातून निसटूनच जाते. स्वप्ने आकांक्षा नसतात. त्यावेळी आपल्याला आपल्यातच शेपटीशी असलेला, दिवा पेटवायचा असतो. ही मानवाची शेपटी म्हणजे टेलबोन. या कीटकांना शेपटीच्या मदतीने काही करता येते. जनावरे शेपटीने खूप काही करता. म्हणून मी म्हणते या टेलबोनपाशी असलेला सुविचारी दिवा पाठीशी ठेवा .संघर्षाला घाबरु नका. किताबो में छपते है चाहत के किस्से,

हकीकत की दुनियामें चाहत नही है!

जमाने के बाजार की ये वो शै है,

जिसकी किसीको जरुरत नहीं है!

तर काजव्यांच्या झाडाच्या शोधात राहा!काजवा बना.

***************

# १२८चला सारे गावू या, (गाणारे गाढव)

गाण्यासारखा आनंद जगी नाही. गाणे ऐकणे, आनंददायी असतेच. गाणे म्हणणे, स्वतःला आनंद देणारे, गंमतदायी असते. ऐकणाऱ्यांना सुखद असतेच असे नाही. गाढवाचे गाणे रेकणे म्हणून प्रसिध्द असते. माणूस गाढवाला, अगदी तूच्छ लेखतो. तोंड उघडून गुलाबी जीभ बाहेर काढून, गाढव जो आवाज करतो, त्याला सारेच हसतात. मात्र पुण्याचे सर्वच लईभारी असते. "पुणे तेथे काय उणे'. पुण्यात एक गाढव आहे, जे म्हणे फार छान गाते. रेस्क्यू नावाच्या एका संस्थेने आणलेले गाढव छान गाते. त्या व्हीडोओला 20, 000 जणांनी (कालपर्यंत बघितले) पुण्यात गाढव त्याच्या पिल्ल्याला जन्म दिल्यावर, रस्त्ेवर मरणासन्न पडले होते. पिल्लू मेले होते, मात्र या गाढवाला, संस्थेने औषधोपचार देवून ‘एमिली’ हे सुंदर नाव दिले.

एमिलीला शारिरीक वेदना होत्याच, पण जवळपास कुणीही नको वाटावे, इतक्या मानसिक वेदना होत्या. इतर गाढवांमध्ये हळू हळू एमिली रमलिये आणि ही, हाँ, हँक्यू हँक्यू असे वेगवेगळे सुंदर गाणे म्हणते.

आयलँड मध्ये, हॅरियट लॅरियट नावाचे गाढवाने, म्हटलेले गाणे इंटरनेटवर गाजले. एमिलीचे हे गाणे गाजते आहे.शास्त्रज्ञ म्हणतात खूप खूप आनंद व्यक्त करण्याचा, त्या गाढवांचा गीत गायनाचा प्रकार असावा. आनंदात गावून आनंद वाढतो.

माणसे दुखात गातात, आनंदात गातात, बाथरुम मध्ये गातात, म्हणजे गाणे हे आनंद व्यक्त करण्याचे रुप आहे तसे गाढव देखील गाते. चला आपण पण गाऊया, आनंदी होवू या.

1) निदान एक गाणे छान बसवा

2) बाथरुम मध्ये गाणे गा

3) कॅरेओकेबर गावून बघा

4) गाणी खूप ऐका

विषेश टिप;हे सारे खाजगीतच करा. सार्वजनिक जागी तुम्ही तसे केले, मार पडल्यास तुम्हाला काही दुखापत झाल्यास मी जबाबदार नाही. गाढवांच्या व्हिडीओचे कौतुक झाले, माणसांच्याबाबत भलते काही घडू शकते.

***************

# १२९कसेतरी होतेय

नक्की काय होतेय ते सागंता येत नसले, की आपण सांगतो, मला ना कसेतरीच होतेय. काहीतरी चुकतेय, काहीतरी बिनसलेय, असे जर शब्दात सांगायचे असेल तर ‘कसे तरीच होतेय’ असे सांगितले की समजदारांना समजते. 'बडे बडे देशो में छोटे छोटे, कसे तरीच होता रहता है' असे मी समजते. अशक्तपणा आला, थकवा आला, किंचीत डोक गरम झाल, थोडा ताप जाणवतोय, सर्दी झाली, अंग दुखतेय, पाय दुखताहेत, मी दमले आहे, यापैकी यातले थोडेसे, काहीही होवून जर अस्वस्थ वाटत असेल, तर आपण सांगतो अस्वस्थ वाटतेय, कसे तरीच होतेय. स्वस्थता वाटत नाही. अस्वस्थ वाटतेय म्हटले की उगाच ॲडमिट व्हायचे का असे लोक विचारतात. बाईने सांगितले “जी मचलता है” तर त्याला गोड बायकी बातमीचा रंग येतो. पुरुषांना कसे तरी झाले की,  ते काचेचे पेले काढून लालरंगी पेय घेतात. “कुछ कुछ होता है” सांगितले की प्रेमात पडला की काय? प्रेमात पडली की काय? बिघडली की काय? असे वाटते. कसचा तरी वायरसचा रोग होतोय, म्हटले की मलेरिया फलेरियाची शंका घेतली जाते. सगळेच थोडे थोडे दुखत असते. तपासणी केली की एखादा रिपोर्ट वेगळा येतो प्रत्येकाचाच येतो. जर रिपोर्टस नॉर्मल आले की “मोठ्ठा आजार असा लपतो, बघा, जसे की जणू कॅन्सर, त्याचे निदान लवकर होत नाही” असे म्हणणारे काका भेटतात .कोणी सुहृद, दमली असशील, विश्रांती घे सांगणारे असतात.

आमचा एक नातेवाईक आहे कुणीही आजारी असले की, “व्यायाम कर” सांगतो. बरे झाले डॉक्टर झाला नाही, आय सी यू त सुध्दा लोकांना व्यायाम करायला लावून, किती रुग्ण वर गेले असते  देव जाणे. काका सांगत “शरीर सुट्टी मागत असते बसून राहा” दुसरा नातेवाईक तर एरंडेल घेण्यास सांगतो

“सौ दुखों की एक दवा एरंडेल आजमाये”

असा त्याचा मोटो असतो. एक मैत्रीण काहीही बिनसले की सांगते “डोकेवर तेल अोत, गप्प शांतपणे झोप” माझे दादा सांगायचे “कसतरी होत असेले की सिनेमा बघावे” आजी सांगायची “गरम खिचडी लोणचे, खावून झोपावे.” आईला वाटायचे लेकीला दृष्ट झाली तिची एकच उपाययोजना असे. पाटावर बसून दृष्ट काढून, काळी तीट लावली, की ती मला एक दिवस बाहेर पडू देत नसे. मैत्रीण सांगी, “खूप खरेदी करावी. कसेतरी होत असते, ते थोडेफार कमी कसतरी होतचे” जगातील जवळ जवळ 90% आजारांवर उपचार सापडले आहेत. ज्याने रोग बरा झाला नाही तरी आजार आटोक्यात येतो आणि वेदना सुसह्य होतात मात्र “कसे तरी होतेय” या आजारवर अजून तरी उपचार शोधलाच गेला नाही.

झोपते थोडी, कसेतरीच होतेय पण झोप पण येत नाहीय. परदेशी मैत्रीण म्हणते, “डास फार आहेत मुंबईत, भारतात. चोवीस तास डासाचे मलम लावत जा” एक लेखक मैत्रीण म्हणाली “आत्मपरीक्षण कर, दहा किलो वाचले की 1 ग्रॅम लिहिले जाते. सजगतेचे भान ठेवून ठिबकू दे.

स्ट्रेस वील बी पेन्ड, पेन मधून लेखणीत उतरेल.थांबते, कसेतरीच होतेय

*********************

## १३०साधना कट, cut

साधना नावाची सुंदर नटी जगातून बाहेर गेली. तिचे घर(भाड्याचे) गेले, तिचे सामानही गेले साधना कट मुळे प्रसिध्द, नटीची  छबी आठवा.साधना नायर यांचे सर्व, सामान दुर्मिळ फोटो. एका भंगारवाल्याकडे सापडले अशी, 1 नोव्हेंबर18 ला मुंबई मिरर मध्ये बातमी आली.

डोळयावर खूप मेकअपचा परिणाम झाल्याने किंवा आपण आता तरुण नाही म्हणून साधनाने चित्रसंन्यास घेतला. राजकपूरचे आवारा मधील“मुड मुड के ना देख” नृत्यात साधना समुहात नाचली होती. पण तिचे करियर भाग्य पुढे उजळले.

लव्ह इन सिमला, मेरे मेहबूब, मेरा साया, वह कौन थी, इंतकाम, एक फूल दो माली, आप आये बहार आयी हे तिचे गाजलेले चित्रपट आहेत. 26 डिसंबरे 15, ला राहत्या घरी कोर्टकेस चालू असतांना व पोटाचा कॅन्सर यामुळे नटी साधना हीचा मृत्यू झाला   साधनाचे फोटो, पती आर यू नायरचे फोटो, 7 मार्च 66 च्या साधनाच्या लग्नाचे फोटो त्या भंगारात कचऱ्यात सापडले होते.

थायरॉइडमुळे साधना अभिनेत्री म्हणून मागे पडली.1974 सालच्या गीता मेरा नाम हा तिचा शेवटचा चित्रपट होता.पती परमेश्वर हा चित्रपट तिने निर्माण केला होता. नव्या पिढीला साधना कट एवढीच तिची ओळख उरली आहे.

शेवटी olx  चा जमाना आहे.जुने सारे भंगारात जाणार, मनाची तयारी करायला हवी.

# १३१ चित्रपट रस घेणे

चित्रपटरसग्रहण करणे सोपे नसते, बघणे काय कोणी ही करेल.

मानवाचा, जीवनप्रवृत्तीनूसार क्रिया-प्रतिक्रया संवाद होतो, पाहिलेल्या सिनेमावरुन मानसिकता कळते.

भारतात सिनेमांचा उदय झाला, चित्रपट व्यवसाय जलदगतीने पुढे गेला. त्या सिनेमाचा आस्वाद घ्यायला हवा.

पूर्वी शॉर्ट, इटुकले चिमुकले नाटक होते, पण सिनेमा लोकप्रिय झाला.का?सिनेमाती उच्चारीत व लिखीत भाषा चिन्हे, नवव्यवस्थेतूनच आली, सिनेमात रुपक व्यवहार आला. वास्तव ही कल्पना असते, . कल्पना हे वास्तव असते.सिनेमा व अनूभव सापेक्ष बनतात. जनावरांचे खूर बघून मानवाला बूट बनवावेसे वाटले., चप्पल बूट पाय मोजे हा संबंध कष्टाशी होता, आता पॉश असण्याशी आहे. आपण सिनेमा डोळयांनी बघतो की मेंदूने?

चित्रकला +वास्तूकला+ त्रिमीती =कला असते.

सिनेमाचा, या कलांचा जीवनावश्यक उपयोग काही नाही.मग आपण कला का शिकतो?? ह्याचा निश्चित कारण भाव आहेे. अवकाश आणि व्यक्तिरेखांचे संबंध चालू आहेत.

लेखकाला दिसते म्हणून तो लिहितो, म्हणून तुम्हाला दिसते. विचार अवकाशाला रचतो, तुम्हाला दिसावे, म्हणून सिनेमा बनतो, लेखक लिहितो. तो अनूभव घेवून मोकळे व्हायचे असते, व्हावे. करणारे व बघणारे दोघांनाही माहित असते हे खोटे आहे.फोटोग्रॉफी इज रायटिंग विद फोटोज् (गॅ्फी इज रायटिंग)चित्रपटाची नशा असते. प्रत्येकजण सिनेमा बघते पण चित्रपट कसा बघावा हे शास्त्र असते. जो तो आपल्या नजरेने चित्रपट बघतो. कावड कथांचा म्हणजे खजिना, म्हणजे चित्रपट होय.

ते यंत्र, मुव्हि इज स्टील इमेज मुव्हिंग, कावड कथा लिहून सुरु झाले. बंदूकी सारखी दिसायचे, फोटो काढण्याला शुटिंग म्हटले जाते.6जुलै 1896 मुंबईत सिनेमा थडकला. 1903 साली कथावस्तू असलेले सिनेमे सुरु झाले. ग्रीन ट्रेन रॉबरी, कथन सरणीचे सिनेमे सुरु झाले.

महाराष्ट्रात पटवर्धन बंधू शांबरिक प्रामाणिक हा पहिला सिनेमा बनवला. सर्वात तरुण व नोंदणी असलेली कला आहे. 1913 ला फाळकेंनी सुरु केली. ही चित्रपटकला आहे. सिनेमा हे एंटरटेनमेन्ट फक्त नाही.एंटरटेनमेन्ट शब्दाला 750 अर्थ आहेत. इजी टू अन्डरस्टॅन्ड, अशा सिनेमात संरचना कथा, आत असते, मेक बिलीव्ह गोष्टी असतात. जे दाखवले जाते ते पहा.24 फ्रेम्स फॉर सेकन्ड हाच, स्पीड सिनेमाचा असतो, सिनेमा शॉटस् चे प्रकार आहेत- इएलएस-एल-एस-एमएलएस असे विविध असतात.

रस घेवून सिनेमा बघत जा

***************

# १३२ बंद पडणार बंद पडणार

बदल हे घडतच राहतात, पण एखाद्या कंपनीचा बंद पडणं, फार वाईट असतं.त्याच्या मालकाचा आवाज, आता बंद पडणार आहे.एचएमव्ही बंद पडणार आहे.ब्रिटिश म्युझिक कंपनी एचएमव्ही ही आताच्या डिजिटल युगातील एकूणच वाहिन्यांमुळे बंद पडणार आहे.एडवर्ड एल्गार यांनी 1921 साली स्थापन केलेली ही कंपनी, बंद पडण्याच्या मार्गावर होती.डिजिटल प्रगति, वाहिन्यांचे आक्रमण, टीव्ही, ईंटरनेट मुळे, सीडी डीव्हीडी यांची विक्री कमी झाली आहे.बाजारातील मागणी कमी झाल्यामुळे, हीलको कॅपिटल या कंपनींचे अधीकार्यांनी, मालकानी, त्यांच्या कामाच्या पद्धतीत आणि प्रॉडक्टमध्ये बदल करून पाहिला, मात्र यश आले नाही.2200 कामगारांचे भविष्य अंधारले आहे.हुषार कामगारांच्या, लंडन मधील या कंपनीत काम करणारे अनपेक्शित, मंदीला तोंड देत आहेत.ती कंपनी एवढ्या झपाट्याने बंद पडण्याच्या मार्गावर गेली, हे ऐकून वाईट वाटते आहे.या ख्रिसमसमध्ये आणि एकूणच वर्षभरात तीस टक्के विक्री कमी झाली.डिव्हीडीचे मार्केट मागच्या वर्षीपेक्षा कमी झालेलेआहे.इतके नुकसान सोसून कंपनी पुढे चालवणे शक्य नसल्यामुळे, हिज मास्टर्स व्हॉइस ही जगभरातील प्रसिद्ध कंपनी आता बंद पडण्याच्या मार्गावर आहे .हिज मास्टर्स व्हॉइस म्हणून दिसणारा, कुत्रा आणि त्याच्यासमोर त्याचा तो फोनो आता आपल्याला वस्तुसंग्रहालयात, शोकेसमध्ये बघावा लागेल.

गिरण्या बंद पडल्या, सिनेमा थिएटर बंद पडले, जुने बरेच काही काळाचे पडद्या आड गेले आहे.काळ बदलतो आहे.नवे काहीतरी येते आहे, पण ते जुन्याला नष्ट करते आहे.काय काय बंद पडलेले बघावे लागणार?

****-

# १३३तुझे घर कुठे सांग?

घर हा प्रत्येक सजीवाच्या मनातला हळवा कोपरा असतो.किडामुंगीपासून, प्पक्शी प्राण्यांपासून मानवापर्यंत, सारे जण घर बांधतात.सुंदर माझे घर, असावे घरकुल माझे छान, असावा घरात आपुला चॅाकलेटचा बंगला, छान असावी बंगली, असावे घरटे अपुले छान, असा विचार सारे जण करत असतात.

माझे घर, जुने, पोपडे पडलेले, लिफ्ट नसलेले आहे.इथे लिफ्ट नसली, तरीही मुलायम पडदे नसले तरीही, माझे घर मला आवडते

चार दिवस मी कुठे बाहेर गावी गेले, तरी माझे घर मला बोलावत असते .मला कपड्यांची हाऊस नाही, माणसांची आहे .माझ्या स्वतःच्या घराची ओढ मला खूप वाटते.माझ्या घराच्या ग्रीलमध्ये, मी कुंड्यांमध्ये अस्ताव्यस्त झाडे लावलेली आहेत, ती झाडं सुंदर देखील नसावीत, पण मला माझी ती बाग आवडते .त्या बागेतच एसीच्या डब्यावर, मी पक्ष्यांसाठी पाणी ठेवते .मूळ पुरुष पक्षी रूपात येतो, खाणे खातो, पाणी पितो आणि आशीर्वाद देतो, असा माझा समज आहे .कावळे तर न चुकता येतात.

मध्ये मध्ये उंदीर, खारी, बुलबुल अन्य पक्षी आणि किरकोळ प्राणी उदाहरणार्थ खारी वगैरे देखील येतात.कोकणी दशावतारात, नाटकात लोकनाट्यात जशी सर्व प्रकारची पात्र असतात, तशी माझ्या घरी बरी वाईट सर्व प्रकारचे लोक आणि सर्व सजीवांच्या जातीची माणसं येतात.आमच्या घरी फिरते विक्रेते येतात .भाजीवाल्या येतात .भिकारी साधू बैरागी चोर सर्व जण येतात.जगण्याची समृद्ध अडगळ म्हणावं, असा माझ्या घरी पसारा आहे. तीन पिढ्यांची भांडी आहेत.माझ्या सासूची माझी आणि सुनेची भांडी या घरात आहेत.सर्व प्रकारच्या लागणाऱ्या, न लागणाऱ्या वस्तू आहेत. थोडक्यात काय, वावरायचं घर आहे, शोभेचे नाही.हॉलमध्ये एक कोपरा, माझ्या संगणकाचा आहे .या संगणकांवर मी काम करते.लॅप टॉप

आहे, कॅलेंडर, प्लॅनर आहे आधुनिक वाटणारी लेखनाची सर्व साधन सुद्धा यात समृद्ध पसाऱ्यांमध्ये अतिशय छानपणे सामावून गेली आहेत .आधुनिक आणि पुरातन काळातील वस्तूंचा मेळ इथे उपयोगी अशा प्रकारे दिसून येतो.

मानस चित्र. :घर कसा असावा याचं एक वेगळं मानस चित्र मनात आहे.उदाहरणार्थ

दाट धुक्यातल्या वाटेने त्या घराची जवळीक साधावी

हिरव्यागार बागेत एक बंगली असावी.

एका खोलीत वाचनालय पुढे बंगाळी

अंगण आमराई लिखाणाची खास सोय असावी

चंद्र चांदण्या दिसणारी गच्ची असावी

माझ्या स्वप्नघराचे मानस चित्ती गावी

झाडांची सोबत चंद्राची डोकावणी

गात्या पक्ष्यांची गाणी असावी

घराला माझ्या सुंदर गच्ची असावी

हे माझं स्वप्नच आहे.

माझा लिखाणातील पात्रांशी माझे अनाम निनावी नाते असते. मला ते लिखाण पूर्ण होईपर्यंत त्या पात्रांची नशा चढते.

हॉलमध्ये खिडकीत संध्याकाळी बसून मी विचार करत सूर्यास्त बघत राहते.पूर्वी एका छान रिक्लाइनरवर बसून मी विचार करी .तसे हल्ली आपली मी कधी जमिनीवर बसून, पाय

पसरून लिखाणाचा विचार करते.माझे लिखाण, लोकल ट्रेनमध्ये, तिकिटाच्या मागे, बाहेर प्रवास करताना कुठेतरी सापडलेल्या कागदांच्या वर सुद्धा असते .व्यवस्थित कागदाची एक वही आणि पेन रचून ठेवले असले तरी त्याच्यावर लिहिणे होतेच असेही नाही आणि त्या त्यावेळी सुचते असेही नाही.माझ्या घरी पूर्वी खूप पुस्तकं होती आणि या पुस्तकांचे व्यवस्थित असे छान वाचनालय सुद्धा होते .मात्र पुढे मी ती पुस्तक वाचनालयाला दान दिली, तरीही घरात अजूनही शंभर पुस्तक शिल्लक आहेत.पूर्वीच्या काळी घरांना डोअर बेल अथवा दारावर माणूस आल्याची वर्दी देणाऱ्या घंटा नसत माझ्या माहेरी पण नव्हत्या. मात्र या घरात छान चिमणीची चिवचिव असे संगीत असलेली डोअर बेल आहे

वेळ :माझ्या घरी भेटायला येण्याची वेळ, साधारणपणे कोणतीही असली, तरीही मला सकाळच्या वेळी कुणी भेटायला आलेले आवडत नाही.घरी काम असते आणि सकाळचा मूड हा वेगळा असतो. वेगवेगळया प्रकारच्या ताजेपणामध्ये बाकीच्यांची येण्याने माझ्या आॅरा बदलून जातो.

झोपाळा :माझ्या माहेरी सुंदर झोपाळा होता आणि आम्ही सगळी भावंडं आई वडील त्या झोपाळयावर थोडा थोडा वेळ झुलत असू.

माणसाच्या जीवनाला सुद्धा झुला समजतात कारण की माणसाचे मन वर्तमानकाळातून भूतकाळात व भविष्यकाळात आठवणींमध्ये वर्तमानातआणि स्वप्नांमध्ये जुळत असते.तशी मी लिहीत असते भूतकाळात वर्तमान काळात आणि भविष्यात देखील माझे लिखाण कधी कधी फिरत राहते.माझ्या या घरी झुला नाही, पण मनात मात्र माझ्या कायम हे तीन काळातील, हिंदोळे वर झोपाळे झुलत राहतात.

सक्तीच्या शब्दांनो कुठून धरता शोक असले

मुक्या अंधाराशी विणत बसता दुख कसले

वर्तमानात जगा भविष्याचे स्वप्नपाहा

मग कळेल तुम्हाला जीवन असते कसले.

जीवनामध्ये कुटुंबाचा मोठा वाटा असतो .माझी आई वडील खूप आनंदी होते. त्यांना सर्व गोष्टींची ओढ, आशा होती.आर्थिक ओढाताणीत मर्यादित मिळकतीत आई संसार छान करी, टुकीने करी.कुटुंबातील लोकांनी आपल्याला चांगलं म्हणावं असे आईला वाटे .त्यामुळे माझ्या माहेरी खूप पाहुणे जमत असत.देवदर्शन, काम अथवा बदल या वेगवेगळया निमित्ताने अनेक भोजनभाऊ आमच्या घरी येत असत, जणू काही आमचे घर त्यांचा होटेल पॉइंट होता.आई दादा सगळयांचा खूप करत असत, पण हे लोक आदरातिथ्य घेऊन, वर नाव ठेवत जात असत.जेवण खान शिवाय, कारणाशिवाय जातांना बागेतला वानोळा हे लोक नेत असत.या टीकेला कंटाळून आई नाराज होई.त्यामुळे मी माझ्या सासरी गोतावळा मर्यादित ठेवला, शिवाय मी नोकरीत व्यस्तदेखील असायचे.

वाचनप्रेम :अाम्हा भावंडांमध्ये, माझ्या वडिलांनी वाचन प्रेम रुजवले. शरणपूर लायब्ररीत आम्ही रोज वाचन करायला जात असायचो.कॅनडा कॉर्नर ही आमची, बुचाची फुलं गोळा करण्याची जागा होती.या वाचन छंदाने मला पुढे लेखिका केले .कारण क्लिकेगा तो लिखेगा, म्हणजे जसं तुम्ही वाचाल तसं तुम्हाला लिहावेसे सुचते आणि तुम्ही वाचक असाल तरच लेखक बनू शकता.माझ्या घरी कधीही खास सोय, लिखाणाची खास खुर्ची, काहीच नव्हते आणि आताही नाही .लिखाणाचे कच्चे टिपण, रंगीबेरंगी पेन, चित्र वर्तमानपत्रातील कात्रण, घरी ठेवलेली आहेत.सर्व समृद्ध पसारा माझ्या या घराला अजूनच शोभा आणतो अशी माझी समज आहे.

सुरेश भटांची एक गझल मला दादा मला जनरित सांगतांना नेहमी सांगत असत.

बेटा लक्षात ठेव जग बदलत राहते.

स्वागतासाठी माझ्या भुंकले जे मुखाने

थुंकले तोंडावरील तो माझा सत्कार होता

अंत्ययात्रेला माझ्या गर्दी बरीच जमली

ज्यांनी खांदा दिला ते माझे कुणीच होते

जनरीत माझ्या आई वडिलांना जशी कळली नाही, तशी मला सुद्धा कळलीच नाही.निर्मळ आनंदाचा काळ होता. पुन्हा कधी न मिळायचे ते आपलेपण आणि ते कौतुकाचे बालपण.मला खिडकीशी बसून गप्पा मारणाऱ्या मोठी गच्ची सुंदर मोठीशी बाल्कनी खूप आवडते.

चहाचा घोट कुंकवाचे बोट, टाळूवर तेल चिरमुऱ्यांची भेळ

गोड लोणच्याची बरणी, लोकगीत आणि गाणी

त्यासाठी त्या घरासारखे माझं हे घर सुद्धा तत्पर असते.गर्भरेशमी पोतीचे गोड लाडीक बोलणे ऱ्याघरी रमत नसे तसे मला या घरी सुद्धा जमत नाही. मात्र कर्तव्याला आम्ही कधीही चुकत नाही.माफक अपेक्षाच ते घर होतं, तसंच माफक अपेक्षांचं माझं हे घर सुद्धा आहे .मला जे जे हवं ते ते, त्या घरी सुद्धा मिळाले आणि या या घरी सुद्धा मिळत आहे.संस्कारगंगा पुढचे पिढीत वाहते आहे. घर स्वच्छ असावं म्हणून माणसांना बोलवू नये मुलांनी खेळू नये, इतकी अतिरेकी स्वच्छता माझी नाही.जमेल तेवढी स्वच्छताही मी करते .मात्र लहान मुलांच्या पावलांनी चिखलांनी बरबटलेले, घरभर दुपटे पसरलेले आणि माणसांचा राबता असलेले पॉश नसलेले माझे घर देखील मला आवडते.आधुनिक घरांपुढे माझं घर सो सो च आहे असे अनेक जण माझ्या घराला कदाचित नाव सुद्धा ठेवतील पण माझेघर मला खूप आवडतं.

हे माझं घर आंब्या नारळांच्या सावलीचं

आल्या गेल्याच्या, स्वागताचे

मुलाबाळांचं प्राणी पक्ष्यांचं

आणि येणाऱ्या पाहुण्यांचे.

पाखरू गेले परदेशी उडून रानी

रिकामं घरटं, मौन घरची सर्व गाणी

सप्तश्रुंगी माते आले तुझ्या पायाशी

दे या कुटुंबाला आनंद धनाच्या राशी

- ....

# १३४भूकेचा प्रश्न

आपल्या भारत देशातील मुख्य प्रश्न, दोन आहेत.एक  गरीबी आणि दुसरा भूक. भूकेचा प्रश्न अवघडच आहे. पोटाची भूक ही एक मूलभूत गोष्ट आहे. भूक लागली की अन्नासाठी माणूस बैचेन होतो. स्वच्छ, साधे, खराब न झालेले जेवण, शरीराला, जगायला आवश्यक असते.

अहो माणूस जगतो कशासाठी?या टीचभर पोटासाठी .असे म्हटले जाते. भूकेला कोंडा नीजेला धोंडा,

दात आहे पण चणे नाही, अशा म्हणी प्रसिध्द आहेत.फार पूर्वी जेव्हा भूक मारायला जमत नसे, तेव्हा सासूरवाशीणी जात्यावर दळताना ओवी म्हणत,       भूक लागली थांब ग बाई न्याहारीची सवय का लावली ग आई, हाता तोंडाशी गाठ पडणे, पेटके लाले पडेंगे, तो अकल ठिकाने आयेगी. बसून खातो, खायला आधी कामाला कधी? अशा  अनेक म्हणी व वाक्प्रचार या पोटाच्या भूकेशी संबंधीत आहे. देवधर्मांचे उपवास व न डायेट म्हणून न जेवणे या चर्चेचे बाहेर आहे. व्रतांमध्ये उपवास करुन भूके राहून, ईच्छा शक्ती, वाढवून, आपण हट्टीपणा करुन, त्या देवाकडून काहीतरी हट्ट करुन मागतो. पोटात आग पडली की कळते की पोटभर अन्न मिळणे देखील किती जरुरी आहे. चवीचे नखरे म्हणून स्वाद सुगंध म्हणून, खास नाही म्हणून, अन्न फेकणारे आहेत.ऊगीच अति पोटभर जेवणारे आहेत, त्याच देशांत गरीब देखील आहेत.

गरीबांना, अगतिकांना, पोटाची भूक मारुन, मनात पोटभर जेवणाची कल्पना, नजरे समोर आणावी लागते. मनातल्या मनात शेव कुरमुरे खावून झोपावे लागते .ही गोष्ट आपल्या सारख्या प्रगतीशील राष्ट्रात घडते. आजही भूकबळी पडतात पडू शकतात. युनो सांगते की 9% पैकी 1 माणूस संपूर्ण जगात उपाशी, भूकेला आहे. विकसनशील देशातील 12.9% जनता भूकी आहे.(संदर्भ- द हिंदू25/12/14)दिवसेंदिवस लोकसंख्या वाढते आहे. वाढत्या लोकसंख्येला, नैसर्गिक,  रिर्सोस कमीच पडतात. निसर्गाचा समतोल बिघडल्याने अवकाळी पाऊस, दुष्काळ या

संकटांमुळे धान्य उत्पादन, खाद्य पदार्थांची निर्मीती कमी झालीय, माई सिंधूताई सपकाळ त्यांच्या आत्मकथेत त्या सांगतात की बाळंतपणानंतर, खूप असह्य जी भूक लागते, त्यावेळी त्यांनी आंबूस झालेले, गुरांना खाण्यास देखील योग्य नसलेले, अन्न खाल्ले होते. भूक सहन न होऊन कोणा एका ऋषीने चोरुन मास खाल्ले होते. भूकेला निदान मुरमुरे तरी मिळावे, प्यायला पोटभर पाणी तरी मिळावे.

भूखी मन मेरे, सुन मेरा कहना, जहाँ नही खाना वहाँ नहीं रहना

लाख यहाँ झोली फैलाले, भूखे मरेंगे गरीब बेचारे

लग्नाच्या पंगतींमध्ये हॉटेलामध्ये, पार्टींमध्ये अतिरीक्त असलेले अन्न, काही स्वंयसेवी संस्था गोळा करतात आणि गरजू भूकेल्यापर्यंत पोहोचवतात. मंदिराभोवती गुरुद्वारे व मस्जिदबाहेर, गरजू उपाशी लोक जमा झालेले असतात.रेल्वे स्टेशन, एस.टी. स्टॅन्ड, फूटपाथ येथे बरेचजण अर्धपोटी निजतात. मनूष्यबळ नाही म्हणून, काही घरी वृध्द, अपंग अगतिक आजारी लोक उपाशी निजतात. ‘चूल थंड असणे’ हे वाक्य फार वाईट आहेत. पोटात खड्डा पडणे, पोटात आग पेटणे, पोट मारणे हे दुःखद असते. शहरात तरी हातगाड्यांवर, काही बाही खायला मिळते, पण देशात अंतर्गत भागात, गरीबी व दुर्गमता यामुळे, घासभर भातासाठी देखील तरसावे लागते. गुजराथी लोकांमध्ये, खिचडी नावाची एक कथा आहे. घासभर खिचडीसाठी, माणसाला कष्ट करावे लागतात. बाईला अनेक तडजोडी करायला लागतात. मनाला अशा कथा फार लागतात. एका जेवणासाठी, एका मुसलसर जमातीतील लोक उंदराच्या बिळातील धान्य गोळा करुन खातात. कारण गरीबी व अज्ञान न नापीक शेती दुर्गम भाग हे आहे. उत्पादन, शेती खात्यातील संशोधन व व्यवस्थित पाठपुरावा करुन, तांदूळ, मका, ज्वारी यांची लागवड वाढवावी. घरगुती बागेच्या पींकांची तरतूद होते का बघावे. वाढती गरीबी वाढती लोकसंख्या अपूरी साधने, वाढती भूक कुठेतरी संतुलन व्हायला हवे. अन्न पृथ्वीवर जे पिकते ते आणि खाणारी तोंडे यांच्या ठरावीक निश्चित प्रमाण आहे. ते बिनसून चालणार नाही. भूकेल्या मुलांना, रस्त्यावर सोडून जाण्याचे

प्रकार या देशात घडतात. ‘समय की धारा’ या चित्रपटात(1986),  या घरी नवरा बायको दोघे भांडत असतात.तशात अरुप नावाच्या मुलाला जन्म देतात. ते मुल उपाशी मरते. संजू चित्रपटात नायकाला भीक मिळालेली दाखवली आहेे. (आपकी कसम मध्ये देखील).

आई जेवायला वाढे ना.  बाप भीक मागू देईना,

मग मूल म्हणते, मला जन्माला घालणे अनिवार्य आहे का? चीन ने एक मूल पाॅलिसीने अनेक प्रश्न सोडवले आहेत.आज अवांछित अशा अवस्थेत अनेक बालके आढळतात. आहे त्या जन्मलेल्या सजींवाना, पोटभर अन्न मिळायला हवे. त्याचवेळी हा नवा विचार देखील करायला हवा की, नवीन जीवाला, पालक नीटपणे पोसू शकतील का? नवीन जीव मी जन्माला घालायला हवाच का? त्या बालकाच्या भूकेसाठी, मी काय तरतूद करु शकते? भूकेचा प्रश्न कधी सुटणार?

*****

# १३५ समुद्रखलाशी वास्को- द-गामा

केरळ राज्यात, कोची फोर्ट मध्ये, वास्को द गामा ची समाधी, एक स्मारक आहे. पोर्तूगीजांचे पूर्वज असलेले, गोव्याच्या एका गावाचे नाव वास्को गामा पडले आहे.ते या पोर्तूगीज देश प्रवाशाच्या नावाने पडले आहे. समद्र मार्गे एस. टी गॅब्रीअल, जहाजाने भारतात आलेल्या, वास्को द गामा या खलाशाचे नावाने ते पडलेले आहे. पहीला युरोपीअन प्रवाशी जो समुद्रमार्गे भारतात आला, तो वास्को द गामा होता. 1497 ते 1499 पहिल्यांदा कॅलीकत येथे आले, दुसऱ्यांदा भारतात ते 11/9/1502 ला आले, मात्र तिसऱ्यांदा 25/12/1524 ला कोची येथे मलेरिया ने वारले.

समुद्र मार्गे 20 मे 1448 ला वास्को द गामा कैलीकत कोझीकोडे येथे मसाल्याच्या व्यापाऱ्यासाठी, आलेले हे परकीय प्रवाशी प्रथम मिरे या मसाल्यासाठी आले. भारत देश त्यावेळी मसाला व्यापाऱ्यासाठी प्रसिध्द होता. वास्को द गामा 1524 मध्ये गव्हर्नर होता.सॅन्स पॅरिटल मध्ये जन्मलेले ते कोची मध्ये मलेरियाने मृत्यू पावले.(1524 ला )आताही आपला देश डासांवर व मलेरीयावर विजय मिळवण्यात अपयशी आहे. आंतरराष्ट्रीय संस्कृती व वारसा या संस्यथेतर्फे कोची फोर्ट(केरळ) मधील सेंट फ्रान्सीस चर्च मध्ये दरवर्षी 25 डिसेंबर ला वास्को द गामा ला श्रध्दांजली वाहण्यात येते. इतिहासाची आठवण कोचीची पोर्तूगीजांशी असलेली सुसंवादी नाती, जपण्याचा तो प्रयत्न असतो. कोचीमध्ये तिसऱ्या भेटीत वास्को द गामा, यांनी देह ठेवला. त्याचे थडगे सेंट फ्रान्सीस चर्चचे आवारात बांधण्यात आले. भारतातील सर्वात जुने चर्च प्रसिध्द आहेे.

मात्र 1540 साली वास्को द गामा, यांचे पुत्र पेडा दा सिल्वा गामा, यांनी, वडिलांचे मृतदेहांचे अवशेष पोर्तूगालला नेले. भारतीय पुरातत्व विभागातर्फे या चर्च मधील रखरखाव पाहिला जातो, देखरेख केली जातेे. फिफा वर्ल्डकपचे वेळी, कोची फोर्टचे आजूबाजूचे परिसराची उंची वाढवण्यात आल्यामुळे, पावसाळयात या परीसरात पाणी भरते.

पाईपने, ड्रेनेजने साचलेले पाणी, समुद्रातील, पाण्यात सोडले जाते. पण तरीही तळमजल्यावर, दर पावसाळ्यात कधी महाभरतीचे वेळी थोडे पाणी भरते.वास्को द गामा, यांनी भारताचा शोध लावला असे आपण इतिहासात वाचतो. बाकी वास्को द गामा च्या थडग्याला, केरळ टूरमध्ये भेट देखील देतो.

वास्को द गामा चे जीवन, कार्य, कष्ट जाणून आज त्या समुद्र खलाशाला नमस्कार करु या.

****

# १३६येणार आहे

'येणार आहे' या दोन शब्दांतच खूप मोठी आशा, खूप मोठे आश्वासन, माझे तर सारे जग जणू सामावलेले असते. एका कुठल्याशा भविष्यात घडेल, घडावी, घडणार आहे अशा घटनेची वाट बघणे, या, येणार आहे, अशा, दोन शब्दांमध्ये अपेक्षित असते.

लहान मूल वाट बघते, आजी आजोबा (लाडके) येणार आहेत. शाळेला सुटी येणार आहे. वाढदिवसाची मज्जा येणार आहे. तरुण-तरुणी म्हणतात माझ्या आयुष्यात सुयोग्य व्यक्ती येणार आहे. माझ्याशी ज्याचे भावतरंग जमतील अशा मित्र मैत्रिणी मिळणार आहेत. नवी नोकरी शोधणारी इच्छुक व्यक्ती म्हणते माझ्या आयुष्यात "मी चांगल्या नोकरीला लागलो" तो सुदिन येणार आहे. पदोन्नतीची वाट बघणारी व्यक्ती म्हणते, "मी वरच्या खुर्चीत, एसी केबिनमध्ये बसून राज्य करीन" ती वेळ येणार आहे. काहीतरी चांगले घडण्याचे वर्तमान येणार आहे. राजकारणी जेंव्हा खुर्चीची वाट बघतात, तेंव्हा म्हणतात, "मी त्या पदावर विराजमान होईन तो सुदिन येणार आहे." विवाह घटिकेची वाट बघणारी व्यक्ती म्हणते ती सुवेळ येणार आहे. कलाकार म्हणतात माझ्या कलाकृतीची कदर होवून पारितोषिक, कौतूक मिळेल तो दिवस येणार आहे. पुस्तक प्रकाशित होण्याचा तो दिवस येईल. वो सुबह कभी तो आयेगी. शेतकऱ्यासाठी पाऊस येणार आहे. देशाच्या प्रगतीची वाट बघणारे म्हणतात "अच्छे दिन अायेंगे." शांततेची वाट बघणारे शांतीदूत म्हणतात "शांतीची चादर पांघरण्याचे क्षण येणार आहेत." "स्वच्छ भारत" झाला असे सांगता येईल असा दिवस येणार आहे. परगावी जाण्यासाठी उत्सुक लोक कॅलेंडर वर त्या तारखे कडे बघत म्हणतात ती तारीख येणार आहे. परदेशी जाणारे म्हणतात सुंदर दिवस येणार आहेत.

आज बरीच वर्षे झाली मी या परदेशात शिक्षणासाठी आलो. शिक्षण पूर्ण झाले. खूप मोठे कर्ज काढून परकीय शिक्षण घेतले. पण नोकरी मात्र इथेही मिळेना, म्हणजे मना सारखी

मिळेना. हळूहळू मी एका होटेल मध्ये वेटरचे काम करू लागलो. संध्याकाळी ३ तास काम करुन, उरलेला वेळ नोकरी साठी अर्ज करणे आणि घरकाम यात वेळ जाऊ लागला. होस्टेल सोडले, राहत्या जागेचे पैसे भरायचे होते, शिक्षण कर्जाचा हप्ता भरायचा होता. आई वडील मागत नव्हते पण आपल्या मुलाचे चांगले चालले आहे, असे दाखवण्यासाठी त्यांनाही पैसे पाठवायचे होते. आई बाबा तिस वर्षे मुंबईत राहतात, कोकण सोडून आले ते गेलेच नाहीत. (कदाचित मी सुध्दा पुन्हा भारतात परतणार नाही.) म्हणायला भारतात घर आहे. इथेच राहायचे, पण पायातले बूट फाटले आहेत. पैसे नाहीत, थंडी भागेना झालीय, कोट जूना झाला, गरम कपडे सुध्दा घ्यायचे होते. एका वाचनालयात शिक्के मारणे, कव्हर्स घालणे, नंबर देणे, संगणकावर पंचिंग करणे असे काम करायचे. काही पैसे मिळायचे पण पुरेसे नाही. दवाखान्यात काम केले, भाड्याच्या राहत्या घरातून सुध्दा भाडे परवडेना, म्हणून मी बाहेर पडलो. नोकरी करणाऱ्या मुलांच्या वसतिगृहात एक बेड घेतला. एका वर एक तिन बेड असलेल्या बंक बेडच्या खोलीत जीव गुदमरत असे. आठरा पगड जातीची, प्रकारची, व्यसनाची अगदी वेगवेगळी माणसे होती पण पर्याय नव्हता.

मी हळूहळू स्वयंपाक शिकायचा प्रयत्न केला, भारतीय मानसिकतेमुळे मी कधीही स्वयंपाक केला नव्हता व मला कोणी करू ही दिला नव्हता. त्यामूळे अोटा धूणे, फरशी स्वच्छ करणे अशी कामे माझ्या वर पडली.मी परदेशी येताना मनाशी पुन्हा भारतात परत जायचेच नाही असे पक्के ठरवले होते, तरीही भारताची आठवण येवू लागली. भारतात सुध्दा नोकरी मिळणार नाही. सर्वच मित्र अजूनही थातुर मातुर अशा नोकऱ्यांवरच वेळ काढत आहेत. परत जायचा पर्याय मला अगदी नको होता. फसवायला टपलेले, पैसे काढू लोक भेटतात. शिवाय बापरे भारतातल्या डासांनी भरलेल्या वस्त्या, रेल्वे स्टेशनवरचे चोरटे, भिकारी, उघडी नागडी मुले, माशा घोंगावणारे उघडे अन्न, दर महिन्यात बाहेर येणार नवा घोटाळा, वारंवार ऐकू येणारे ते बलात्कार व विनयभंगाचे प्रकार, कर्कश्श आवाज, टॅक्सीवाले व रिक्षावाल्यांची अरेरावी, सतत

फुगत जाणारी बेकारांची लोकसंख्या, मोबाइल साखळ्या चोरणारे, पावसात भरणारे रस्ते, गर्दी! परत जायची इच्छाच होईना. टीव्ही बघणे हे एकच काम उरले आहे का?

उपऱ्या, परदेशातील १०२ व्या मजल्या वरील या बंक बेडवर जेवढा आनंद आहे, तेवढा ही त्या देशात मिळेल का? बेकारीला कंटाळून कितीतरी तरूण आत्महत्या करतात पण कोणाला काय? परदेशातून परत आलो तर “नोकरी सुटली वाटते याची” अशी कुजबुज परिचित, नातेवाईक करतील. लग्नाचे वय झालय, लग्न कर म्हणून घरचे मागे लागतील. नोकरी नसली, घर नसले तरी चालेल, त्या देशात मुले जन्माला घालणे आवश्यकच मानले जाते जणू! भारत देशी तर कांही रक्तदान करून (विकून) घर चालवतात, कांही चोऱ्या करतात, फूटपाथ वर राहातात पण मुलांना या जगात आणतच राहातात. का? कळत नाही?भारतात लोकसंख्या वाढते, नोकऱ्या नाहीत, Phतरुण शिपायाची मोकरी मागतात, ती सुध्दा मिळत नाही.free netpack आहे, जेवण नाही.

मुझको पैदा किया, संसारमे दो लाशोंने

अौर बरबाद किया कौम के ऐयाशोंने

तेरे दामनमें बता मौतसे जादा क्या है?

आपल्यालाच भविष्य नसतांना मुलांना आपण कोणते भविष्य देतो हे कळण्या एवढे सुध्दा शिक्षण, विचार नसलेली प्रजा वाढते आहे. मग त्यातील अनेक जण गावपळण करतात म्हणजे मुंबईला किंवा परदेशात पळतात. तिथेही काही परिस्थिती फार चांगली असते असे नाही, पण अच्छे दिन “येणार आहे” म्हणत दिवस काढतात.आईचे पत्र आले आहे, सात वर्षात एकदाही आला नाहीस, चार दिवस तरी ये. तिकिटाचे एक लाख रुपये मी कसे कुठून आणू? परदेशातून स्वदेस मध्ये, भारतात येवून शाहरुख खान सारखे, कार्य काही मित्रांनी १ - २ वर्षे केले. दोन वर्षांनी, कंटाळुन ते त्या “आपल्या माणसांना, आपल्या देशाला वैतागून ते परदेशात परत

आले."नोकर कपात, जागतिक मंदीमुळे आता नोकरी मिळण्याची शक्यता आता जवळ जवळ संपत आली आहे. आईला पत्र मात्र लिहायला हवे-

सॅन होजे १८-०७-२०१८

"प्रिय आईस

सध्या नोकरीत खूप महत्त्वाची कॉंट्रॅक्टस् हाती आहेत, त्यामूळे साहेब रजा देत नाहीत. तुला पैसे पाठविणार होतो पण ठरवले रजा मिळेल तेंव्हा येतांना भारी टीव्ही, भारी मोबाइल घेवून येईन. तू काळजी करू नकोस. काही वर्षांनी मी भारतात नक्कीच "येणार आहे". एवढ्या भारी पगाराची नोकरी सोडून मी तिकडे कसा येवू? अगं लोक एन् आर् आय् होण्या साठी झटतात, रडतात. एन आर आय शब्द वारंवार म्हण, बघ, येणार आहे, येणार आहे असे ऐकू येते.

ईथे पगार भरपूर आहे गं, पण खर्च सुध्दा भरपूर आहेत. तू आपलं कोकणातले घर दुरुस्त करायचे म्हणतेस, आई तुम्ही मुंबईला आल्यावर, कधीही परत कोकणात गेला नाहीत, मी कामा निमित्त इथून परदेशातून मुंबईला येवू शकत नाही, कोकणात कोण जाणार?ते घर उगीच रिपेअर करायचे ठरवून, त्यामध्ये शक्ति आणि पैसे खर्च करू नका, कोकणातील गावचे घर विकून टाका. मुंबईच्या घराचे रिपेअर मी येइन, तेंव्हा जरुर करू या. या वर्षी मी येणार आहे. नक्कीच एनआरआय, येणार हाय, येणार आहे."

परदेशातील मुले स्काईपवर आईवडिलांशी बोलतात, दोन तीन वर्षातून एकदा, भारतात येतात, भेटतात, पत्र पाठवतात, फोन करतात, पैसे पाठवतात, यातच सर्व भारतीय पालकांनी आनंद मानायचे दिवस आहेत.आई तू समंजस आहेस.

समजून घेशील, ही आशा आहे

- तुझा लाडका, NRI, non returning Indian.

**ई साहित्य प्रतिष्ठान** दहा वर्षांपुर्वी सुरू झालं. जगभरात ई पुस्तकांची संकल्पना रुजू लागत असतानाच मराठीतही ई पुस्तकं सुरू झाली. मराठीत अमॅझॉन सारखे प्रचंड इन्व्हेस्ट्मेंट करणारे खिलाडी उतरले. त्यांच्यासमोर ई साहित्य म्हणजे अगदीच लिंबुटिंबू. पण गेली दहा वर्षं आणि आजही गुगलवर “मराठी पुस्तक” किंवा “Marathi ebook” टाकले की ४ कोटी ९३ लाख नांवांमध्ये पहिले दुसरे नाव येते ते ई साहित्यचेच. ही करामत आहे आमच्या लेखकांची. वाचकांना सातत्याने दर्जेदार मनोरंजक उच्च प्रतीची पुस्तके “विनामूल्य” देणारे आमचे लेखक हेच या स्पर्धेचे विजेते आहेत.

मराठीत “साहित्यरत्नांच्या खाणी” निपजोत या ज्ञानोबांनी मागितलेल्या पसायदानाला ईश्वराने तेवढ्याच उदारतेने खाणींचा वर्षाव केला. मराठीचे दुर्दैव हे की या खाणींतली रत्ने बाहेर आणणे आणि त्यांचे पैलू पडल्यावर त्यांना शोकेस करणे आणि जागतिक वाचकांसमोर ते पेश करणे यात आपण कमी पडलो. इथे उत्तम साहित्यासाठी भुकेलेले वाचक आणि उत्तम वाचकांच्या प्रतिक्षेतले साहित्यिक यांच्यात ब्रिज बनणे आवश्यक आहे. विशेषतः डॉ. नितीन मोरे यांसारखे साहित्यिक ज्यांना लिहिण्यात आनंद आहे पण त्यापुढील जटील प्रक्रियेत पडण्यात रस नाही अशांसाठी. विदेशांत मोठे लेखक एजंट नेमतात आणि ते बाकी सर्व व्यवहार पहातात. मराठीत ही सोय नाही.

ई साहित्य प्रतिष्ठान ही काही अनुभवी प्रोफ़ेशनल प्रकाशन संस्था नव्हे. पण गेल्या दहा वर्षांत आमच्या हे लक्षात आले की मराठीत रत्नांच्या खाणी आहेत आणि त्यांत उतरून हात काळे करून माती गाळ उपसत राहून जर चिवटपणे काम करत राहिले तर एकाहून एक भारी रत्ने गवसणार आहेत. एखाद्या मोठ्या धनिकाने, पंडितांच्या सहाय्याने, दरबारी आश्रयासह जर हे काम हाती घेतले तर मराठी भाषेतले साहित्य जागतिक पटलावर आपला ठसा नक्की उमटवेल.

डॉ. नितीन मोरे यांची तेरा अप्रकाशित पुस्तके प्रकाशात आणण्याचा मान ई साहित्यला मिळाला. शंभू गणपुले यांची नऊ, डॉ. वसंत बागुल यांची बारा, शुभांगी पासेबंद यांची आठ, अविनाश नगरकर यांची चार,डॉ. स्मिता दामले यांची पाच, डॉ. वृषाली जोशी यांची चार

अशा अनेकांच्या पुस्तकांना वाचकांपर्यंत नेण्याचे भाग्य ई साहित्यला लाभले. असे अनेक “स्वांतःसुखाय” लिहीणारे उत्तमोत्तम लेखक कवी या मराठीच्या “साहित्यरत्नांचिया खाणीं” मध्ये आहेत. अशोक कोठारे यांनी महाभारताच्या मूळ संहितेचे मराठी भाषांतर सुरू केले आहे. सौरभ वागळे, सूरज गाताडे, ओंकार झाजे, पंकज घारे, विनायक पोतदार, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा असे अनेक नवीन लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. ई साहित्यकडे हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. पण आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे लेखक आता येत आहेत. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद. आणि या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

आमेन

सुनील सामंत

अध्यक्ष, ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com
esahity@gmail.com